# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level*

*Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal*

*ISSN:2230-9578 January- 2026 Volume-18 Issue-1(V)*



**Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole**

# MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org



ISSN: 2230-9578
January- 2026
Volume-18 Issue-1(V)

**Please Get in Touch**
Email: jrdrvb.org@gmail.com
Mob: +91-9552416001,+91- 8888454089

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January 2026

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

## Volume-18, Issue-1(V) | January 2026

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR
**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

***Disclaimer***
*The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.*
***© All rights reserved with the Editors.***

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL PARTICULARS

| Name of Journal | JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT |
|---|---|
| **Frequency** | Monthly : Jan to Dec (12 issues per year) |
| **ISSN** | 2230-9578 |
| **Publisher** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Chief Editor** | Dr. Ramesh V. Bhole |
| **Copy right** | Journal of Research and Development |
| **Starting Year** | January 2010 |
| **Subject** | Multi-Disciplinary |
| **Review Process** | Double Blind Peer |
| **Language** | English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages. |
| **Publication Format** | Print |
| **Access** | OPEN ACCESS |
| **License** | Creative Commons (CC BY-NC-SA 4.0) |
| **Phone No.** | +91 93256 65856, +91-8888454089 |
| **Email** | jrdrvb.org@gmail.com |
| **Journal Website** | https://jrdrvb.org |
| **Registered office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India |
| **Admin. Office Address** | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India |
| **Printing** | **Amitsons Digital Copiers** 106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042 |

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

**CHIEF EDITOR**

**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

**ASSOCIATE EDITORS**

**Prof. (Dr.) Madan Mohan Goel**
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

**Dr. Praveen G. Saptarshi**
Visiting Faculty
Salisbury University, United States

**MANAGING EDITOR**

**Dr. Santosh P. Mane**
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

## EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **BABALOLA, Ayodele Samuel**<br>Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian | **Dr. Lal Mervin Dharmasiri**<br>Senior Professor and Chair Head of Geography<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Vijayanand Selvaraj**<br>Data Strategist and Artificial Intelligence Lead<br>Information Technology (IT), Houston,Texas, USA |
| **Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud**<br>Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine. | **Prof. A.G. Amarasinghe**<br>Senior Lecturer Grade<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Dr. Gyanaranjan Sahoo**<br>Extension Scientist<br>Orissa University of Agriculture & Technology, Orissa India |
| **Dr. RVS Praveen**<br>Director<br>Digital Engineering and Assurance, USA | **Dr. Ranjan Kalita**<br>Principal<br>Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam | **Dr. S. C. Advitot**<br>Principal<br>CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot |
| **Dr. Kulkarni Swanand Gajanan**<br>Associate Professor,<br>Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur- | **Dr. Anurag Shrivastava**<br>Professor & Post Doctoral,<br>Lincoln University College (LUC)<br>Petaling Jaya, Malaysia, Malyasia | **Prof. (Dr.) F. M. Nadaf**<br>Principal,<br>Government College Borda Margao Goa (Autonomous), India |
| **Dr. Tushti Sharma**<br>Royal School of Languages,<br>The Assam Royal Global University, Guwahati, Assam | **Dr. Sandeep Rout**<br>Faculty of Agriculture,<br>Sri Sri University, Cuttack, Odisha | **Dr. Daneshwar. R. Pandey**<br>Assistant Professor,<br>Head Of Department<br>S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat |

### Co Editors

| | | | |
|---|---|---|---|
| **Dr.P. A. Sutawane**<br>Professor and HoD Dept.of History ,<br>Shri Shivaji College Parbhani. | **Dr. L.M.Jirewad**<br>Associate Professor,<br>Dept.of History,<br>Shri Shivaji College Parbhani. | **Mr. P. L. Kadam**<br>Lecturer, Dept.of History,<br>Shri Shivaji College Parbhani. | **Dr. P.J. Nadare**<br>Lecturer, Dept.of History,<br>Shri Shivaji College Parbhani. |

**PUBLISHER**
**Dr. Ramesh V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

Print Letter ( 146 )

विधानसभा
महाराष्ट्र

# प्रकाश सुंदरराव सोळंके

आमदार : २२९,माजलगाव विधानसभा मतदारसंघ जि.बीड
अध्यक्ष : मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ,औरंगाबाद

E-mail : solanke.prakash76@gmail.com
पत्ता : सादोळा रोड, केसापुरी कॅम्प, ४३१ १४२ माजलगाव जि.बीड

जा.क्र. जा.क्र./वि.स.स / 1813

दि. 08 /01 / 2026

## संदेश

श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे दि.17 जानेवारी, 2026 रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या भारतीय पर्यटन : आव्हाने संधी आणि उपाययोजना या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेस हार्दिक शुभेच्छा देताना मला अत्यंत आनंद होत आहे.

भारतीय पर्यटन हे केवळ आर्थिक उपक्रम नसून ते आपल्या संस्कृती, वारसा, पर्यावरण आणि सामाजिक जीवनाशी निकटतेने जोडलेले आहे. जागतिकीकरण, तंत्रज्ञान आणि प्रवासाच्या बदलत्या प्रवृत्तींच्या पार्श्वभूमीवर पर्यटन क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. अशा वेळी पर्यटनासमोरील आव्हाने, संधी आणि शाश्वत विकासासाठी आवश्यक उपाययोजनांवर सखोल शैक्षणिक चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. ही परिषद अभ्यासक, संशोधक आणि तज्ज्ञांना विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी तसेच संशोधनातून नवे दृष्टिकोन मांडण्यासाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ ठरेल, असा मला विश्वास आहे. या परिषदेसाठी परिश्रम घेणाऱ्या आयोजन समितीचे, प्राध्यापकांचे आणि सर्व सहकार्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

ही परिषद शैक्षणिक उद्दिष्टे यशस्वीरीत्या पूर्ण करतो, अशी सदिच्छा व्यक्त करतो.

आपला,

(आ.प्रकाश सोळंके)

जा.क्र.मशिप्रमं / २० - २० /    दिनांक : / / २०

## *शुभेच्छा संदेश.....*

सरचिटणीस,
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी यांच्या वतीने दि. १७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या **"भारतीय पर्यटन : आव्हाने, संधी आणि उपाययोजना" या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेस माझ्या हार्दिक शुभेच्छा.**

आजच्या काळात पर्यटन क्षेत्र देशाच्या आर्थिक विकासात, रोजगारनिर्मितीत आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मात्र, त्याचबरोबर शाश्वतता, पायाभूत सुविधा आणि नैतिक मूल्यांशी संबंधित अनेक आव्हानेही समोर येत आहेत. या सर्व मुद्द्यांवर विचारमंथन करण्यासाठी अशी शैक्षणिक परिषद अत्यंत उपयुक्त ठरते.

या परिषदेचे आयोजन करून महाविद्यालयाने संशोधन व गुणवत्तापूर्ण शिक्षणाप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली आहे. आयोजन समितीच्या सर्व सदस्यांचे मी अभिनंदन करतो व ही परिषद सर्व सहभागींसाठी ज्ञानवर्धक ठरो, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**परिषदेस मनःपूर्वक शुभेच्छा!**

सरचिटणीस,
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

## महाविद्यालय विकास समिती (CDC) चे अध्यक्ष / प्रमुख सदस्य यांचा संदेश

श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे दि. १७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित ***"भारतीय पर्यटन : आव्हाने, संधी आणि उपाययोजना"*** या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेस शुभेच्छा देताना मला विशेष आनंद होत आहे.

अशा प्रकारच्या शैक्षणिक परिषदांमुळे शिक्षण आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ होते. पर्यटन हा बहुविषयक अभ्यासाचा भाग असल्याने त्यामध्ये सातत्याने संशोधन, चिंतन आणि नव्या दृष्टिकोनांची गरज असते. शाश्वत विकास, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक जबाबदारी या दृष्टीने या परिषदेत होणाऱ्या चर्चा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतील, असा मला विश्वास आहे.

या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या प्राचार्य, प्राध्यापकवर्ग आणि आयोजन समितीचे मी अभिनंदन करतो. ही परिषद महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रतिमेला अधिक बळकटी देईल, अशी अपेक्षा आहे.

परिषदेस यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा!

Hemant

***श्री. हेमंतराव जामकर***

अध्यक्ष

महाविद्यालय विकास समिती (CDC)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January - 2026


| Sr. No. | CONTENTS | Page No. |
|---|---|---|
| 1. | भारतातील पर्यटन व्यवसाय : आर्थिक विकासातील योगदान आणि शाश्वत पर्यटनापुढील आव्हाने<br>**राम गणपतराव शेवलीकर** | 1-7 |
| 2. | भारतीय पर्यटन आणि बंजारा ऐतिहासिक वारसा स्थळे<br>**राठोड रमेश बाबूराव, प्रा.डॉ. लिगाडे ओमशिवा विश्वनाथ** | 8-11 |
| 3. | शिवकालीन पर्यटन संकल्पना व तिचे आधुनिक पर्यटन व्यवस्थेवरील प्रभाव<br>**विनोद सखाराम बोरकर** | 12-16 |
| 4. | नरनाळा किल्ला आणि पर्यटन व्यवसायाच्या संधी<br>**प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे** | 17-19 |
| 5. | आधुनिक युगात विकसित झालेला प्रवास आणि पर्यटनांचा ऐतिहासिक अभ्यास<br>**प्रितम धोर्डिबा टिळक, डॉ. लक्ष्मीकांत एम. जिरेवाड** | 20-22 |
| 6. | मराठवाड्यातील ऐतिहासिक स्थळे आणि पर्यटनातील समस्या<br>**डॉ. डी.एन.रिठे** | 23-25 |
| 7. | खुलदाबाद : पर्यटनाच्या दृष्टीने ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व<br>**प्रा.डॉ.मुजीब मुसा सय्यद** | 26-29 |
| 8. | भारताच्या शाश्वत विकासात पर्यटन धोरणांची भूमिका : एक चिकित्सक अध्ययन<br>**श्री. बनसोडे प्रदीप बालासाहेब, डॉ. प्रा. बावळे नितीन पी.** | 30-33 |
| 9. | भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC): कामगिरी – एक विश्लेषणात्मक दृष्टीक्षेप<br>**डॉ. रमेश धनराज जाधव** | 34-37 |
| 10. | जालना जिल्ह्यातील मंदिरे आणि धार्मिक पर्यटन<br>**प्रा.डॉ. मोतीराम विठ्ठलराव कदम** | 38-41 |
| 11. | पर्यटन विकासात वाहतूक साधनांचे योगदान<br>**प्रा. डॉ. प्रदीप बन्सीधर सिसोदिया** | 42-45 |
| 12. | मराठवाडातील पर्यटन क्षेत्र - समोरील समस्या व आव्हाने- एक अभ्यास<br>**डॉ. राजाराम राय पिंपळपल्ले** | 46-49 |
| 13. | मराठवाड्यातील ज्योतिर्लिंगे: धार्मिक पर्यटनाचा ऐतिहासिक आढावा<br>**प्रा. डॉ. कऱ्हाळे उत्तम सीताराम** | 50-53 |
| 14. | पर्यटन स्थळांच्या विकासासाठी शासकीय यंत्रणांचे कार्य<br>**प्रा. डॉ. विलास कऱ्हाळे** | 54-56 |
| 15. | पर्यटनाचे विविध प्रकार<br>**प्रा. डॉ. विठ्ठल व्ही. घुले, गजानन विश्वनाथ गायकवाड** | 57-60 |
| 16. | पर्यटन के क्षेत्र में हिंदी भाषा का महत्व और रोजगार के अवसर<br>**प्रो. डॉ. शेषराव लिंबाजी राठोड** | 61-63 |
| 17. | राहुल सांकृत्यायन के यात्रा वर्णन 'मेरी यूरोप यात्रा' की मूल संवेदना<br>**प्रो. डॉ. संजय जाधव** | 64-69 |
| 18. | भारतातील धार्मिक पर्यटन : एक संधी<br>**प्रा. गणेश तुकाराम मोकासरे** | 70-72 |
| 19. | आधुनिक पर्यटन उद्योगाचे घटक<br>**डॉ. सुभाष रा. रगडे** | 73-76 |

| | | |
|---|---|---|
| 20. | गडांचा राजा आणि राजांचा गड<br>**प्रा. डॉ. अविनाश कोंडीबा खोकले** | 77-80 |
| 21. | पर्यटकभिमुख पर्यटन<br>**डॉ. भालेराव जी. पी.** | 81-83 |
| 22. | भारतीय पर्यटन आणि संगीत महोत्सव<br>**प्रा.एस.के.कोकाटे** | 84-88 |
| 23. | पर्यटन आणि व्यक्तिमत्व विकास<br>**पल्लवी सर्वोत्तमराव कुलकर्णी** | 89-91 |
| 24. | परभणी जिल्ह्यातील हतनूर येथील श्री नागनाथ मंदिर स्थापत्याचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास<br>**प्रविण लक्ष्मणराव कदम** | 92-94 |
| 25. | भारतीय पर्यटनातील ऐतिहासिक स्थळे : एक वर्णनात्मक अभ्यास(Historical Sites in Indian Tourism: A Descriptive Study)<br>**डॉ. प्रमोद एस. मेश्राम** | 95-100 |
| 26. | जागतिक क्रीडा पर्यटनाची आर्थिक वाढ,आर्थिक परिणाम आणि रोजगाराच्या संधी : भारताची भूमिका(२०१३-२०२३)<br>**डॉ. संतोष बाबुराव कोकिळ, डॉ. खाजा अब्दुल खदीर** | 101-105 |
| 27. | भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे<br>**डॉ. संजीवनी चंद्रशेखर बारहाते** | 106-112 |
| 28. | भारतीय पर्यटन एक ऐतिहासिक वारसा<br>**प्रा डॉ.लक्ष्मीकांत मारुतीराव जिरेवाड** | 113-115 |
| 29. | पर्यटन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण<br>**डॉ. राजाभाऊ व्यंकटराव नवगणकर** | 116-119 |
| 30. | पर्यटन व्यवसाय आणि पर्यावरण संतुलन<br>**प्रा. डॉ.परिमल अरविंद सुतवणे** | 120-123 |
| 31 | कृषी पर्यटनातून ग्रामविकास<br>**प्रा.डॉ. प्रल्हाद भोपे** | 124-127 |
| 32 | मेडिकल टुरिजम: भारतातील वाढती संधी<br>**डॉ. प्रियांका डोल्हारे** | 128-132 |
| 33 | पर्यटन क्षेत्रात मार्गदर्शकाची भूमिका<br>**डॉ. सीमा बाबाराव नानवटे** | 133-138 |
| 34 | परभणी जिल्ह्यातील पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळे<br>**काळदाते वैजनाथ विश्वनाथ** | 139-142 |
| 35 | मातृतिर्थ माहूर: धार्मीक पर्यटनत्मक अभ्यास<br>**डॉ. प्रविण ज.नादरे** | 143-146 |
| 36 | धार्मिक पर्यटन : मुदगल येथील प्राचीन इतर मंदिरे<br>**प्रा. डॉ. जी. एस. पिसे** | 147-150 |
| 37 | भारतीय पर्यटनाच्या विकासातील लोकप्रशासनाची भूमिका<br>**प्रा. डॉ. मधुकर फकीरा राऊतराहे** | 151-155 |

| | | |
|---|---|---|
| 38 | भारतीय पर्यटन आणि सामाजिक विकास<br>**प्रा. डॉ. विश्वनाथ माधवराव सूर्यवंशी** | 156-159 |
| 39 | भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक ठिकाण : राष्ट्रकूटांची राजधानी कंधार<br>**प्रा. किशोर जळबा सुर्यवाड** | 160-163 |
| 40 | हिंदी का यात्रा-साहित्य<br>**प्रोफे.डॉ.अनिल ढवळे** | 164-167 |
| 41 | ब्रिटिश वसाहतवादी कालखंडातील धाराशिव जिल्ह्याचे पर्यटनातील महत्त्व : बदलते स्वरूप आणि वर्तमान<br>**युवराज कोंडीबा नळे, प्रा डॉ विष्णू बब्रुवान वाघमारे** | 168-172 |
| 42 | वझुर ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळ<br>**श्री प्रल्हाद भगवानराव पवार** | 173-177 |
| 43 | पर्यटन स्थळांच्या माध्यमातून भारताच्या इतिहासाचे दर्शन<br>**डॉ. अशोक गंगाराम अंभोरे** | 178-179 |
| 44 | पर्यटन आणि स्थानिक विकास<br>**अनिल मनोहरराव देशमुख** | 180-183 |
| 45 | भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळे<br>**प्रा. डॉ. मधुकर रामचंद्र साठे** | 184-187 |
| 46 | महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीमधील प्रसारमाध्यमांचा सहभाग<br>**डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे** | 188-192 |
| 47 | पर्यटनामुळे भारतीय शहरी, ग्रामीण आणि आदिवासी समाजात घडून आलेल्या सामाजिक बदलांचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**प्रा डॉ एस पी ढोले** | 193-198 |
| 48 | पर्यटनाचा सांस्कृतिक प्रभाव<br>**प्रा. परमेश्वर नारायणराव वांगकर** | 199-202 |
| 49 | भारतीय पर्यटन व मराठी साहित्य<br>**प्रा. डॉ. आर. एस. बडूरे** | 203-205 |
| 50 | किल्ले पर्यटन आणि ऐतिहासिक जाणीव<br>**प्रो.डॉ. नितीन बावळे, प्रेमला आश्रोबा माने** | 206-208 |
| 51 | भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांचा वारसा एक चिकित्सक अभ्यास<br>**संदीप सोमनाथ भेंडेकर** | 209-211 |
| 52 | महाराष्ट्र पर्यटनाचा वारसा जोपासणारे राज्य: एक ऐतिहासिक अभ्यास<br>**प्रा. डॉ. काशीनाथ चव्हाण** | 212-215 |
| 53 | पर्यटनस्थळ लोणार सरोवर : संवर्धन व जनजागृती<br>**प्रा. पल्लवी शिवाजीराव जाधव** | 216-219 |
| 54 | जिंतूरच्या नेमगिरी लेण्या: एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ<br>**प्रा. डॉ. उद्धव उमाजी राऊत** | 220-223 |
| 55 | शिवकालीन किल्ले व पर्यटन :रायगड -एक अभ्यास<br>**डॉ. बोकारे तुकाराम एकनाथराव** | 224-227 |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January - 2026


| | | |
|---|---|---|
| **56** | पर्यटन आणि भारत<br>**डॉ. राहुल चोखाजी साळवे** | **228-232** |
| **57** | परभणी जिल्ह्यातील महत्वपूर्ण मंदिरे व पर्यटन स्थळे :एक अभ्यास<br>**नागेश सखारामपंत जोशी** | **233-239** |
| **58** | पर्यटन आणि वाढत जाणारा चंगळवाद - एक समाजशास्त्रीय अभ्यास<br>**प्रा डॉ तुकाराम फिसफिसे, डॉ विश्वनाथ सूर्यवंशी** | **240-244** |
| **59** | ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व परिणाम व उपाययोजना : एक अभ्यास<br>**श्रीकांत बापूराव बोकारे** | **245-249** |
| **60** | परभणी जिल्हयातील धार्मिक (यात्रा उत्सव) पर्यटन एक अभ्यास<br>**विश्वमित्र गाडगे , प्रा. डॉ. नितीन बावळे** | **250-254** |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतातील पर्यटन व्यवसाय : आर्थिक विकासातील योगदान आणि शाश्वत पर्यटनापुढील आव्हाने

**राम गणपतराव शेवलीकर**
सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद जि. नांदेड

**Manuscript ID**:
JRD -2026-180101
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 1-7
January 2026
**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन व्यवसायाचा भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण वाटा आहे. पर्यटनामुळे रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधांचा विकास, स्थानिक उद्योगांना चालना, कृषी व ग्रामीण विकास, परकीय चलनाची प्राप्ती तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन मिळते. मागील दशकात भारताच्या जागतिक पर्यटनातील वाट्यात लक्षणीय वाढ झाली असून GDP मध्ये पर्यटनाचे योगदानही वाढले आहे. तथापि, पायाभूत सुविधांची कमतरता, स्वच्छतेचा अभाव, सुरक्षिततेच्या समस्या, नैसर्गिक आपत्ती व अपघात ही पर्यटन विकासासमोरील प्रमुख आव्हाने आहेत. शाश्वत पर्यटन विकासासाठी पर्यावरण संरक्षण, परिसंस्था जतन, सार्वजनिक-खाजगी भागीदारी, स्थानिक सहभाग आणि प्रभावी नियोजनाची आवश्यकता आहे. अशा सर्वंकष प्रयत्नांमुळे पर्यटनातून देशाचा आर्थिक विकास साधता येईल तसेच स्थानिक लोकांच्या उत्पन्न व रोजगाराच्या संधी वाढतील.*

***मुख्यशब्द (Keywords):*** *पर्यटन व्यवसाय, आर्थिक विकास, शाश्वत पर्यटन, रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा, परकीय चलन प्राप्ती, स्थानिक उद्योग, कृषी पर्यटन, सांस्कृतिक वारसा, पर्यावरण संरक्षण*

## प्रस्तावना:

मानवाच्या मनात सतत काहीतरी नवीन शोधण्याची, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची, नवीन अनुभव घेण्याची आणि स्वतःच्या अस्तित्वाचा अर्थ शोधण्याची नैसर्गिक ओढ असते. पृथ्वीवरील निसर्गाची वैविध्यता आणि दैनंदिन मानवी जीवनातील घटकांचा शोध घेण्याचा मानवाचा स्वभाव आहे. "केल्याने देशाटन । पंडित मैत्री सभेत संचार । शास्त्रग्रंथ विलोकन । मनुजा चातुर्य येतसे फार । "या मराठी सुभाषिताप्रमाणे विविध ठिकाणी देशाटन म्हणजे प्रवास केल्याने मनुष्याला चातुर्य प्राप्त होते, कारण त्यातून त्याला विविध ठिकाणचे अनुभव प्राप्त होत असतात. त्यामुळेच जगभरातील पर्यटक विविध ठिकाणी विविध हेतुने पर्यटन करत असतात. रोजच्या धका-धकीच्या जीवनात ताण-तानावापासून मुक्त होण्यासाठी नवीन ठिकाणी जाऊन विश्रांती घेणे, मनोरंजन करणे, विविध प्रदेशातील लोकांच्या चालीरीती, जीवनशैली, प्रथा-परंपरा समजून घेणे, ऐतिहासिक स्थळे, निसर्गाची विविधता, वैज्ञानिक ठिकाणे यांना भेटून ज्ञान घेणे, तीर्थक्षेत्रांना भेटी देणे, नोकरी, व्यवसाय, वैद्यकीय उपचार इ. उददेशाने प्रामुख्याने पर्यटन केले जाते. त्याचबरोबर नवीन ठिकाणची संस्कृती जाणून घेणे, भाषा, कला, निसर्ग सौन्दर्य, त्याठिकाणचा भूगोल, समाजाची जीवनपद्धत, प्रथा-परंपरा, खानपान, रहनसहण, धार्मिक जीवन इ. चे अवलोकन करण्यासाठी जगभरात पर्यटन केले जाते. युनायटेड नेशन टुरिझम लायब्ररीनुसार 'पर्यटन ही एक सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटना आहे, ज्यामध्ये वैयक्तिक किंवा व्यावसायिक हेतूंसाठी लोकांच्या नेहमीच्या वातावरणाच्या बाहेर देश किंवा इतर ठिकाणी जाणे समाविष्ट आहे.'

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
राम गणपतराव शेवलीकर, सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद जि. नांदेड

**How to cite this article:**
*शेवलीकर, . राम . गणपतराव. (2026). भारतातील पर्यटन व्यवसाय : आर्थिक विकासातील योगदान आणि शाश्वत पर्यटनापुढील आव्हाने. Journal of Research & Development, 18(1(V)), 1–7.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18477471*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18477471

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटन हा तसा अत्यंत जुना व्यवसाय असून प्राचीन काळी ज्ञान, विविध कला ग्रहण करण्यासाठी पर्यटन केले जात असे. आजच्या जागतिकीकरणाच्या व तंत्रज्ञानाच्या युगात जग जवळ आले आहे. पर्यटनासाठी लागणारी साधने वाहतूक व दळणवळणाची, माहिती व तंत्रज्ञान इत्यादींची उपलब्ध झालेली आहेत. त्यामुळे जगभरात पर्यटन उद्योगाचे महत्व वाढलेले आहे. प्रस्तुत संशोधन लेखात पर्यटनाची जागतिक व भारतातील सद्यस्थिती, भारताच्या अर्थव्यवस्थेतील पर्यटन व्यवसायाचे योगदान, शाश्वत पर्यटनापुढील आव्हाने आणि उपलब्ध संधी इत्यादिंचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन उद्दिष्टे:**

- भारतातील पर्यटन व्यवसायाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.
- भारताच्या अर्थव्यवस्थेत पर्यटन व्यवसायाचे योगदान अभ्यास करणे.
- भारताच्या पर्यटन व्यवसायापुढील आव्हानांचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आला असून तथ्य संकलनासाठी दुय्यम साधने त्यात पुस्तके, शासकीय अहवाल, मासिके, वर्तमानपत्र आणि इंटरनेट वरील माहिती इ चा आधार घेण्यात आला आहे.

**पर्यटन- वर्तमान जागतिक स्थिती :**

देशातील व परदेशातील पुरातन वास्तू, निसर्गरम्य ठिकाणे, तीर्थक्षेत्र, ऐतिहासिक वारसा दर्शविणारी लेण्या, स्तूप, मंदिरे, किल्ले, विविध प्रदेशातील लोकांच्या संस्कृती, राहणीमान, जीवनपद्धती मुख्यतः जगभरातील पर्यटकांना आकर्षित करत असतात. सन १९७० मध्ये युनायटेड नेशन्स वर्ल्ड टुरिझम ऑर्गनायझेशनच्या कायद्यांचा स्वीकार केल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिवस म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय सहकार्य, शाश्वत विकास आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांना प्रोत्साहन देण्यासाठी पर्यटनाच्या भूमिकेबद्दल जागरुकता निर्माण करणे हा यामागील उद्देश आहे. मागील पाच दशकांत, आंतरराष्ट्रीय पर्यटन १९७५-२०२५ या कालावधीत २२२ दशलक्षवरून १.५ अब्जपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे, पर्यटणामुळे आर्थिक विकास आणि जागतिक कनेक्टिव्हिटीला चालना मिळाली आहे. या काळात निर्यात महसूल अकरा पटीने वाढला आहे. पर्यटन हा जागतिक अर्थव्यवस्थेतील एक महत्वपूर्ण व्यवसाय बनला असून त्यामुळे रोजगार वाढ आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन मिळाली आहे. कोविड-१९ महामारीमध्ये जागतिक पर्यटन क्षेत्रावर वाईट परिणाम घडून आला. या महामारीच्या धक्क्यांनंतर पर्यटन व्यवसाय पुन्हा नव्याने वाढीस लागला आहे. संयुक्त राष्ट्र पर्यटन संस्थेनुसार, २०२४ मध्ये जगभरातील आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या १,४६५ दशलक्षांवर पोहोचली, जी मागील वर्षाच्या तुलनेत १२.१७% ची वाढ दर्शवते. हा आकडा २०१९ मध्ये नोंदवलेल्या महामारीपूर्व काळातील १,४६६ दशलक्ष या पातळीच्या जवळपास आहे. ही पुनर्प्राप्ती पर्यटनातील मजबूत जागतिक पुनरुत्थानाचे प्रतीक असून पर्यटन आर्थिक वाढ, रोजगार निर्मिती आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीत महत्वपूर्ण योगदान देत आहे. भविष्यात शाश्वत पर्यटन, सर्वसमावेशक वाढ, जागतिक संबंध सलोख्याचे ठेवण्यासाठी जगभरातील पर्यटन व्यवसायाला चालना मिळणे आवश्यक आहे.

**भारताच्या अर्थव्यवस्थेत पर्यटन व्यवसायाचे योगदान:**

भारत हा समृद्ध ऐतिहासिक वारसा तसेच वैविध्यपूर्ण सामाजिक, भौगोलिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवन लाभलेला आशिया खंडातील महत्वपूर्ण देश आहे. भारताची समृद्ध संस्कृती, ऐतिहासिक वारसा असणाऱ्या अनेक वास्तू जगभरातील पर्यटकांना देशात आकर्षित करत असतात. युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीत भारतातील एकूण ४२ वास्तू समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये आग्र्याचा ताजमहाल, अजिंठा लेणी ( महाराष्ट्र ), नालंदा महाविहार ( बिहार ) , सांची येथील बौद्ध स्मारके, चंपानेर येथील मंदिरे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल, गोव्यातील चर्च, धोलविरा हडप्पा नगरी, वेरूळची लेणी, फतेहपुर सिक्री, चोल मंदिरे, हम्पी येथील मंदिरे, महाबलिपुरम येथील स्मारके, पटटदकल येथील स्मारके, राजस्थान मधील डोंगरी किल्ले, अहमदाबाद शहर, हुमायूनचा मकबरा, दिल्ली, जयपूर शहर, काकतीय मंदिर तेलंगाणा, खजुराहो लेणी, बौद्धगया मंदिर, माऊंटेन रेल्वे(दार्जिलिंग) , कुतुबमिनार (दिल्ली), लाल किल्ला परिसर (दिल्ली), भीमबेटका गुहा, दक्षिण भारतातील होयसळ मंदिरे, शांतिनिकेतन ( प. बंगाल) , सूर्यमंदिर कोणार्क, जंतर मंतर (जयपूर) , ग्रेट हिमालय नॅशनल पार्क, काझीरंगा राष्ट्रीय उद्यान, केवलादेवी राष्ट्रीय उद्यान, नंदा देवी आणि व्हॅली ऑफ फ्लॉवर्स राष्ट्रीय उद्यान ( प. हिमालय), सुंदरबन राष्ट्रीय उद्यान, पश्चिम घाट, खांगचोंदझोंगा राष्ट्रीय उद्यान अशा जगप्रसिद्ध वास्तू

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

यांचा समावेश आहे. भारतातील प्राचीन मंदिरे, स्तूप, राजवाडे, किल्ले, चित्रकला, हस्तकला, लोककला, नृत्य व संगीत, धार्मिक स्थळे, हिमालय पर्वतरांगा, गंगा, गोदावरी, कृष्णा, नर्मदा, गोवा सारखे समुद्रबीच या सारख्या नैसर्गिक संपदांना भेट देण्यासाठी तसेच भारतातील सामाजिक, आर्थिक धार्मिक जीवन पद्धती, संस्कार अनुभवण्यासाठी, अवलोकन करण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक देशात पर्यटन करत असतात. मागील दशकात भारताच्या पर्यटन क्षेत्रात अभूतपूर्व वाढ झाली आहे. जागतिक पर्यटनातील भारताचा वाटा ०.६३ % वरून १.४५ % पर्यंत वाढला आहे.

भारतातील परदेशी पर्यटकांचे आगमन (FTA) २०२१ मध्ये १५.२७ लाखांवरून २०२४ मध्ये ९९.५२ लाख पर्यंत वाढले. देशांतर्गत पर्यटकांच्या भेटी ३०३.५९ कोटींवर पोहोचल्या. जून २०२५ पर्यंत, इनबाउंड पर्यटन १६.५ लाख आणि आउटबाउंड अभ्यागत ८४.४ लाखांपर्यंत पोहोचले, ज्यामुळे ₹५१५३२ कोटी परकीय चलन प्राप्त झाले. राष्ट्रीय लेखा आकडेवारी २०२५ नुसार, २०२३-२४ मध्ये पर्यटनाने GDP मध्ये ₹१५.७३ लाख कोटी (५.२२ %) योगदान दिलेले आहे. नियतकालिक कामगार दल सर्वेक्षणानुसार, या क्षेत्राने ३६.९० दशलक्ष प्रत्यक्ष आणि ४७.७२ दशलक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्माण केला, जो एकूण रोजगाराच्या १३.३४ % आहे. २०२४ मध्ये, भारताची पर्यटनातून मिळणारी परकीय चलन कमाई (FEEs) ३५.०१६ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती, जी २०२३ मधील ३२.१८९ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या तुलनेत ८.७८% वाढ दर्शवते. ही रक्कम जागतिक पर्यटन उत्पन्नाच्या अंदाजे २.०२% होती, जी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन बाजारपेठेत भारताची वाढती ऊंची दर्शविते.भारताने जागतिक पर्यटन क्षेत्रात आपले स्थान ठळकपणे निर्माण केले आहे, एकूण आंतरराष्ट्रीय पर्यटकांपैकी १.४० % पर्यटक भारतात येतात. पर्यटनातून भारताची परकीय चलन कमाई (FEE) लक्षणीयरीत्या वाढली, असून जागतिक पर्यटन महसुलात भारताचा वाटा २.०२ % आहे. कोरोना महामारीच्या वर्षांमध्ये पर्यटणातून मिळणाऱ्या उत्पन्नात तात्पुरती घट होऊनही, ती २००१ मधील ३.२० अब्ज डॉलर्सवरून २०२४ मध्ये ३५.०२ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली. भारताच्या जागतिक क्रमवारीत कालांतराने लक्षणीय सुधारणा झाली आहे. २००१ मध्ये भारताची अर्थव्यवस्था जागतिक पर्यटणात ३६ व्या स्थानावरून २०१६-२०१८ मध्ये सर्वोच्च १३ व्या स्थानावर पोहोचली व २०२४ मध्ये १५ व्या स्थानावर स्थिर झाली.

**तक्ता क्र. १ :** जागतिक पर्यटणातून प्राप्त उत्पन्न- जग आणि भारत २०११- २०२४, ( अब्ज डॉलर्स मध्ये )

| वर्ष | जागतिक उत्पन्न | वाढीतील बदल )%( | भारताचे उत्पन्न | वाढीतील बदल )%( | भारताचा वाटा )%( | भारताचा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| २०११ | १०४२ | ११.९२ | १७.७१ | २२.२० | १.७० | १८ वा |
| २०१२ | १११७ | ०७.२० | १७.९७ | १.५० | १.६१ | १६ वा |
| २०१३ | ११९८ | ७.२५ | १८.४० | २.३६ | १.५४ | १६ वा |
| २०१४ | १२५२ | ४.५१ | १९.७० | ७.०८ | १.५७ | १५ वा |
| २०१५ | १२१७ | २.८० | २१.०१ | ६.६७ | १.७३ | १४ वा |
| २०१६ | १२४७ | २.४७ | २२.४३ | ६.७४ | १.८० | १३ वा |
| २०१७ | १३४९ | ८.१८ | २२.३७ | २२.०१ | २.०३ | १३ वा |
| २०१८ | १४३९ | ६.६७ | २८.५७ | ४.४० | १.९९ | १३ वा |
| २०१९ | १४८७ | ३.३४ | ३०.७२ | ७.५४ | २.०७ | १४ वा |
| २०२० | ५५८.० | -६२.४७ | १३.०४ | -५७.५७ | २.३४ | १३ वा |
| २०२१ | ६५५.० | १७.३८ | ८.६५ | -३३.६४ | १.३२ | २३ वा |
| २०२२ | ११४२.० | ७४.३५ | २१.३६ | १४६.९१ | १.८७ | १६ वा |
| २०२३ | १५३६ | ३४.५० | ३२.१९ | ५०.७० | २.१० | १४ वा |
| २०२४ | १७३१.० | १२.७० | ३५.०२ | ८.७८ | २.०२ | १५ वा |

**स्त्रोत:** पर्यटन मंत्रालय, भारत सरकार (भारत पर्यटन माहिती संग्रह, २०२५)

**१. राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा :**

भारतातील नैसर्गिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक वैविध्यता देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करतात. भारतातील प्रसिद्ध वास्तूकला, शिल्पकला, प्राचीन मंदिरे, किल्ले, राजवाडे, कला, संस्कृती, समृद्ध इतिहास, नद्या डोंगरे, धार्मिक स्थळे पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक देशात आगमन करतात. भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे विदेशी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

चलनाची प्राप्ती वाढत आहे. तसेच देशांतर्गत पर्यटनही वाढले आहे. उदा. १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान उत्तरप्रदेशातील प्रयग्रज येथे झालेल्या महाकुंभ मेळाव्यात ६६ कोटीपेक्षा अधिक लोकांनी सहभाग नोंदवला होता. पर्यटणामुळे देशातील हॉटेल, रिसोर्टस वाहतूक, रेस्टॉरंट, रस्ते, रेल्वे, विमान वाहतूक, बँका, विमा, स्थावर मालमत्ता इ मध्ये गुंतवणूक वाढून देशाच्या जीडीपीत वाढ झाली आहे. राष्ट्रीय लेखा आकडेवारी २०२५ नुसार, २०२३-२४ मध्ये पर्यटनाने भारताच्या GDP मध्ये ₹१५.७३ लाख कोटी (५.२२ %) योगदान दिलेले आहे.

**रोजगार निर्मितीतील योगदान :**

पर्यटन क्षेत्र भारतासारख्या विकसनशील देशात सर्वसमावेशक रोजगारसंधी निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. पर्यटन व्यवसायामुळे भारतात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत. हॉटेल्स व रेस्टॉरंट , वाहतूक, दळणवळण, टुरिस्ट मार्गदर्शन इ. क्षेत्रात रोजगार वाढत आहे. नियतकालिक कामगार दल सर्वेक्षणानुसार, या क्षेत्राने ३६.९० दशलक्ष प्रत्यक्ष आणि ४७.७२ दशलक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्माण केला, जो एकूण रोजगाराच्या १३.३४ % आहे.पर्यटन स्थळांच्या विकासासाठी रस्ते, रेल्वे, इमारती, विमानतळे याठिकाणी पायाभूत सोयी निर्माण केल्या जात आहेत. त्यातूनही रोजगारसंधी वाढल्या आहेत. उदा. भारतात राम मंदिर व स्टॅच्यू ऑफ लिबर्टीच्या बांधकामामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे अनेक नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. पर्यटणामुळे हॉटेल, वाहतूक, हस्तकला, मार्गदर्शक, विक्रेते आणि पार्क कर्मचाऱ्यांसाठी हजारो नोकऱ्या निर्माण झाल्या असून पायाभूत सुविधा आणि रियल इस्टेट मध्ये गुंतवणूक वाढून रोजगारात वाढ झाली आहे.

**तक्ता क्र. १ : भारतातील पर्यटन क्षेत्रातील रोजगार**

| रोजगार/वर्ष | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| रोजगारातील वाटा ( %) | ५.०२ | ५.०२ | ५.१७ | १.५० | १.७५ | ५.० |
| प्रत्यक्ष रोजगार ( %) | २.६१ | २.६० | २.६९ | ०.७८ | ०.९१ | २.६० |
| अप्रत्यक्ष रोजगार ( %) | २.४१ | २.४१ | २.४८ | ०.७२ | ०.८४ | २.४० |

**स्त्रोत:** पर्यटन मंत्रालय, भारत सरकार

**२. गुंतवणुकीत वाढ :**

पर्यटन क्षेत्राच्या विकासामुळे देशातील पायाभूत सोयी रस्ते, रेल्वे, विमान वाहतूक, हॉटेल व रेस्टॉरंट, बँका व विमा, बांधकाम, रियल इस्टेट, नृत्य, हस्तकला व कुटीरोदयोग, मनोरंजन, किरकोळ व्यापार, पर्यटनमार्गदर्शन, शेतीसंस्कृती इ क्षेत्रात सार्वजनिक व खाजगी गुंतवणूक वाढली आहे. भारतात हॉटेल, रिसॉर्ट व रेस्टॉरंट मधील FDI २०२२ मध्ये २८२७.४४ कोटी एवढी होती, ती वाढून २०२४ मध्ये ११४९०.१८ कोटी एवढी झाली होती.

**तक्ता क्र. २ : हॉटेल व रेस्टॉरंटमधील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक**

| वर्ष | परकीय गुंतवणूक ( कोटी रुपये ) | परकीय गुंतवणूक ( दशलक्ष अमेरिकन डॉलर ) |
|---|---|---|
| २०२२ | २८२७.४४ | ३५९.६८ |
| २०२३ | ३६३६.२५ | ४४०.३३ |
| २०२४ | ११४९०.१८ | १३७३.११ |

**स्त्रोत:** www-pib-gov-in

**३. विदेशी चलनाची प्राप्ती :**

भारतातील धर्म, परंपरा, संस्कृती, लोकांची जीवनपद्धती, अतिथि देवो भव् जपणारी समृद्धी संस्कृती अनुभवण्यासाठी आणि ताजमहाल, रायगड किल्ला, लाल किल्ला, प्राचीन मंदिरे, म्युझियम अशा विविध ऐतिहासिक वास्तूंना भेटण्यासाठी , हिमालय, जम्मू-काश्मीर, अंदमान निकोबर, लेह-लदाख, हिमाचल प्रदेश, केरळ, गोवा, राजस्थान, महाराष्ट्र येथील विविध नैसर्गिक सौन्दर्य, वाराणसी, बोधगया, मथुरा, वृंदावन यांसारख्या पवित्र स्थळांना भेट देऊन आध्यात्मिक शांती मिळवण्यासाठी, येथील कला, विविध सण-उत्सव, खाद्य संस्कृती, शिक्षण इ. चे अवलोकन करण्यासाठी भारतात विदेशी पर्यटक मोठ्या प्रमाणात येत आहेत. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात पर्यटन हा विदेशी चलन मिळविण्याचे महत्वाचे साधन बनला आहे. २०२४ मध्ये, भारताची पर्यटनातून मिळणारी परकीय

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

चलन कमाई (FEEs) ३५.०१६ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती, जी २०२३ मधील ३२.१८९ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या तुलनेत ८.७८% वाढ दर्शवते. ही रक्कम जागतिक पर्यटन उत्पन्नाच्या अंदाजे २.०२% होती, जी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन बाजारपेठेत भारताची वाढती स्थिति दर्शविते.

**४. पायाभूत सुविधांचा विकास :**

आजच्या युगात वाहतूक व दळवळणाच्या सोयी उपलब्ध झाल्याने जगभरात पर्यटन व्यवसायाला चालना मिळाली आहे. पर्यटन देशात स्थानिक भागात रोजगारात वाढ करण्याचे, विदेशी चलन मिळकतीचे साधन बनले असून भारतात जगभरातील पर्यटकांना आकर्षीत करण्यासाठी देशातील रस्ते, रेल्वे, विमानतळे, बंदरे, अशा वाहतूक तसेच हॉटेल व रेस्टॉरंट, डिजिटल सोयी अशा पायाभूत सोयींमध्ये सार्वजनिक व खाजगी गुंतवणूक वाढली आहे, त्यातून देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लागला आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने देशात शाश्वत पर्यटन विकसित करण्यासाठी स्वदेश दर्शन २.० योजना सुरू केली असून त्यांअंतर्गत पायाभूत सुविधा निर्मितीसाठी गेल्या दोन वर्षांत, मंत्रालयाने ₹२१८०.८७ कोटी खर्चाचे ५२ प्रकल्प मंजूर केले आहेत. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये देशातील पायाभूत सुविधा आणि कौशल्य विकासाला बळकटी देण्यासाठी पर्यटनासाठी २५४१.०६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तक्ता क्र. ३ वरून लक्षात येते की, पर्यटन विकासासाठी मंजूर झालेली रक्कम मोठी असली तरी वितरित झालेली रक्कम मात्र अत्यंत कमी आहे.

**तक्ता क्र. ३ : स्वदेश दर्शन २.० योजनेअंतर्गत समाविष्ट केलेली काही पर्यटनस्थळे व मंजूर निधी**

| राज्य/केंद्र शासित प्रदेश | मंजुरीचे वर्ष | स्थळ | अनुभवाचा प्रकार | मंजूर निधी (कोटी रु.) | वितरित रक्कम (कोटी रु.) |
|---|---|---|---|---|---|
| बिहार (पूर्व) | २०२४-२५ | बोधगया | आध्यात्मिक/ आरोग्य – बौद्ध ध्यान | १६५.४४ | १६.५४ |
| हिमाचल प्रदेश (उत्तर) | २०२४-२५ | उना(माँ चिंतपूर्णी) | तीर्थक्षेत्र/मंदिर विकास – माँ चिंतपूर्णी देवी मंदिर | ५६.२६ | ५.६२ |
| कर्नाटक (दक्षिण) | २०२३-२४ | हंपी | वारसा/सामुदायिक – प्रवासी कोपरे उभारणे | २५.६३ | २.५६ |
| लक्षद्वीप(बेटे) | २०२४-२५ | बंगारम | किनारी/विश्रांती – बंगारम येथे पर्यटकांचा अनुभव | ८१.१८ | ८.११ |
| मेघालय (ईशान्य) | २०२३-२४ | सोहरा | साहसी/निसर्ग – मेघालयीन युगातील गुहांचा अनुभव | ३५.४५ | ३.२४ |
| पंजाब(वायव्य) | २०२३-२४ | अमृतसर | सांस्कृतिक/सीमा – अटारी येथे सीमा पर्यटनाचा अनुभव | २५.९० | २.५९ |

स्त्रोत : https://pib.gov.in

**५. स्थानिक व्यवसायांना चालना :**

पर्यटन आणि स्थानिक उद्योग एकमेकांना पूरक आहेत. पर्यटन व्यवसायातून देशातील स्थानिक व्यवसायांना चालना मिळते. पर्यटणातून परिसरातील खाद्य, कला व संस्कृती, स्थानिक परंपरा, कृषी उत्पादन इ. ना मागणी निर्माण होते. भारतात ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक पर्यटन स्थळाच्या परिसरात कुटीरउद्योग, व्यापार, हॉटेल, डिजिटल सेवा (हॉटेल, वाहतुक सोयी ची ऑनलाइन बुकिंग) टुरिस्ट गाईड, गृह उद्योग उदा. पापड, लोणचे उद्योग, हस्तकला कलाकुसर इ. उद्योगांच्या विकासाला चालना मिळालेली आहे.

**६. कृषी व ग्रामीण विकासाला मदत :**

भारतात ग्रामीण भागात उदरनिर्वाहासाठी शेती क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. परंतु हवामान बदल, शेतमालाच्या उत्पादन व किमतीतील अनिश्चितता, आयात धोरण यामुळे शेती क्षेत्रात अनेक समस्या उद्भवल्या आहेत. भारतातील शेतीला पुरक व्यवसायाची आवश्यकता आहे. भारताच्या ग्रामीण भागात अनेक ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. अशा ठिकाणी कृषी पर्यटन हा भारतात शेतीला उपयुक्त पूरक व्यवसाय बनत आहे. शेतातील सेंद्रिय भाजीपाला, फळे, घरगुती खाद्यपदार्थ , ग्रामीण संस्कृती, हस्तकला, नृत्य, संगीत इ. शहरी भागातील पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. शेतीला पूरक व कमी भांडवलातून सुरू करता

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

येणाऱ्या कृषी पर्यटणातून स्थानिक सांसाधनाचा चांगला उपयोग होतो आणि शेतकरी, महिला व युवकांना रोजगार मिळत आहे. महाराष्ट्रात पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, परभणी अशा अनेक ठिकाणी कृषी पर्यटन केंद्र विकसित झाली असून त्यामुळे ग्रामीण परिसरात नवी ऊर्जा मिळाली आहे.

**७. राष्ट्रीय एकात्मता :**

पर्यटनामुळे देशाचा वैभवशाली इतिहास, समृद्ध संस्कृती, महापुरुषांचे राष्ट्र जडणघडणीत योगदान, विविध प्रदेशातील ऐतिहासिक स्थळे, संस्कृती, भाषा, प्रथा, जीवन पद्धती, निसर्गसौन्दर्य इ. ची ओळख होते. सांस्कृतिक देवाण-घेवाणीतून राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव वाढण्यास मदत होते. म्हणून पर्यटन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक विविधता जपण्याचे साधनही आहे.

**८. आंतरराष्ट्रीय सहकार्य:**

पर्यटन हे राष्ट्रा- राष्ट्रात सांस्कृतिक देवाणघेवाण, सहकार्य व शांतता वाढण्यास, आर्थिक व राजकीय संबंध सलोख्याचे करण्यास मदत करते. भारतात विविध धर्म, जात, पंथ, भाषा, संस्कृती, प्रथा-परंपरा, असलेले लोक गुण्यागोविंदाने, सहकार्य वृत्तीने राहतात. त्यामुळे जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा समृद्ध ऐतिहासिक, धार्मिक व लोकशाही संस्कृती लाभलेला देश म्हणून उंचावलेली आहे. पर्यटन व्यवसायामुळे भारताचे इतर देशासोबत सलोख्याचे संबंध निर्माण झाले आहेत. भारतात अमेरिका, बांग्लादेश, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, सिंगापूर मलेशिया फ्रांस, रशिया, श्रीलंका इत्यादि देशातील पर्यटक दरवर्षी ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक पर्यटन स्थळांना भेटण्यासाठी येतात. त्यामुळे भारताचे आंतरराष्ट्रीय संबंध सलोख्याचे व शांततेचे राहण्यास मदत झाली आहे.

**भारतातील पर्यटन व्यवसायापुढील आव्हाने :**

भारतात ऐतिहासिक, नैसर्गिक व धार्मिक पर्यटन स्थळांना भेट देण्याचा पर्यटकांचा कल आढळून येतो. मागील काही वर्षात देशातील शिलॉन्ग, लेह-लदाख, कारगिल, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड, मेघालय, केरळ, अंदमान-निकोबर या पर्यटन स्थळांच्या पर्यटकांना भेटी वाढल्या आहेत. पर्यटनातून देशात रोजगार निर्मिती वाढली असली तरी भारताच्या पर्यटन व्यवसायापुढे अनेक आव्हाने आहेत. शाश्वत पर्यटन विकास साधण्यासाठी पर्यटन व्यवसायापुढील आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे.

**१. पायाभूत सोयींची कमतरता :**

पर्यटन वाढीसाठी विविध वाहतूक सोयी रस्ते, रेल्वे, हवाई मार्ग, बंदरे इ., हॉटेल्स, रेस्टॉरंट, स्वच्छता गृहे, पाणी, शांतता व सुरक्षितता, इंटरनेट व दूरसंचार, डिजिटल सोयी (ऑनलाइन बुकिंग, स्मार्ट गाईड्स, ई-टिकिटिंग), पर्यटन माहिती अशा पायाभूत सोयी आवश्यक असतात. भारतात शाश्वत पर्यटन वाढीसाठी अशा पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात अनेक ऐतिहासिक पर्यटन स्थळ पुरातन मंदिरे, किल्ले परिसरात पर्यटन सुविधा रस्ते, हॉटेल्स, पाणीपुरवठा, सुरक्षा व स्वच्छता अशा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे दुर्लक्षित आहेत. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा पुरविणे हे मोठे आव्हान आहे. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, केरळ, गोवा, राजस्थान या राज्यासारख्या पर्यटन सुविधा संपूर्ण देशातील पर्यटन स्थळांना देणे आवश्यक आहे.

**२. स्वच्छता :**

शाश्वत पर्यटन वाढीसाठी स्वच्छता महत्वाची असते. वाहतूक साधने, हॉटेल्स व पर्यटन स्थळे स्वच्छ असल्यास पर्यटकांची संख्या वाढते. भारतात पर्यटन विकासातील स्वच्छता हे महत्वाचे आव्हान आहे. नागरिकांमध्ये जगरुकतेचा अभाव, अति पर्यटन, कचरा व्यवस्थापनाच्या अपुऱ्या सोयी इ. मुळे भारतात अनेक धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळाच्या ठिकाणी, जलप्रदूषण. कचरा व प्लॅस्टिक प्रदूषण आढळून येते. धार्मिक पर्यटन स्थळाजवळील नद्या, तलाव, समुद्रकिनारे पर्यटकांनी अस्वच्छ केलेली आढळतात. सरकार स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छता राखत असली तरी अजून व्यापक प्रयत्नाची गरज आहे.

**३. शांतता व सुरक्षितता :**

पर्यटनासाठी पर्यटक सुरक्षाही महत्वाची असते. पर्यटन स्थळी स्त्री पर्यटकांना सुरक्षितता असायला हवी. पर्यटन स्थळाच्या ठिकाणी चोरी, लूट व दहशतवादी हल्ला अशा घटना आढळून आल्यास पर्यटकांचा विश्वास कमी होतो. जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद, महाराष्ट्रातील गडचिरोली नक्षलवादामुळे पर्यटणावर विपरीत परिणाम झालेला आढळून येतो. २२ एप्रिल २०२५ रोजी भारतातील जम्मू आणि काश्मीरमधील लोकप्रिय पर्यटन स्थळ असलेल्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देशाला हादरवून

टाकले. या क्रूर घटनेत भारताच्या विविध राज्यांतील २६ निष्पाप पर्यटकांचा बळी गेला होता. त्यामुळे या भागातील पर्यटन व्यवसाय कमी झाला आहे.

४. **नैसर्गिक आपत्ती :**

भारतात पर्यावरणात होणाऱ्या बदलांचा पर्यटन व्यवसायावर विपरीत परिणाम होत आहे. वाढते तापमान, पूरस्थिती, अतिवृष्टी, ढंगफुठी, भूस्खलन, पाण्याची पातळी वाढणे, बर्फवृष्टि, खराब हवामान, इ. नैसर्गिक आपत्तीमुळे वाहतूक सोयी बंद असल्यामुळे पर्यटन व्यवसाय थांबतो. त्यामुळे रोजगार, व्यापार, हॉटेल्स, कुटिरोद्योगाचे यावर विपरीत परिणाम होतो. उदा. उत्तराखंड मध्ये भागात धार्मिक व निसर्ग पर्यटन पर्यटन स्थळ पावसाळ्यात बंद असतात. नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी हवामानाचा अंदाज घेण्यासाठी एआय सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणे उपयुक्त ठरते.

५. **अपघात:**

भारतात पर्यटन स्थळांवर अनेकदा अपघात घडतात. उदा. समुद्रकिनाऱ्यांवरील पाण्यात बुडणे, पर्वतीय प्रदेशातील पॅराग्लायडिंग किंवा बोटिंग करताना अपघात होणे, आणि मद्यप्राशन करून वाहन चालवणे, वेगावर नियंत्रण नसणे इ मुळे रस्त्यांवरील वाहनांचे अपघात होणे यांचा समावेश होतो. तसेच तांत्रिक बिघाड, खराब हवामान यामुळेही अपघात घडून येतात. नद्या, धबधबे व समुद्र किनारी पर्यटकांना पाण्याचा प्रवाह/ अंदाज माहीत नसल्यामुळे अपघात घडून येतात. अति उत्साहाने पर्यटक स्थानिक प्रशासनाच्या सुचनांचे पालन न करणे हेही पर्यटन स्थळी अपघात घडून येण्याचे कारण असल्याचे आढळून येते. हे टाळण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि पर्यटकांनी खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**सारांश**

आर्थिक वृद्धी, आंतरराष्ट्रीय सहकार्य, सांस्कृतिक देवाणघेवाण, पायाभूत सोयींची निर्मिती, रोजगार संधी, कृषी विकास, स्थानिक उद्योग व व्यापाराला चालना, विदेशी चलनाची प्राप्ती अशा अनेक बाबतीत भारताच्या अर्थव्यवस्थेत पर्यटन व्यवसायाचे योगदान दिवसेंदिवस वाढत आहे. मागील दशकात जगतिकिकीकरण, खाजगी व सार्वजनिक क्षेत्रामार्फत पर्यटन सुविधांमध्ये झालेली वाढ, शाश्वत पर्यटन वृद्धीसाठी सरकारने केलेले प्रयत्न यामुळे भारताचा जागतिक पर्यटणातील वाटा ०.६३ % वरून १.४५ % पर्यंत वाढला आहे. भारताच्या पर्यटन व्यवसायात अनेक संधी आहेत, तथापि पर्यटन व्यवसायाचा असमान विकास, पायाभूत सुविधांची कमतरता, अस्वच्छता, सुरक्षितता अशी अनेक आव्हाने भारताच्या पर्यटन विकासात आहेत. शाश्वत पर्यटन वाढीसाठी भारतात पर्यटनाचा प्रचार-प्रसार, परिसंस्था जतन , जंगले, वन्यजीव संरक्षण, एकंदरीत जैवविविधतेचे व पर्यावरण संरक्षण करणे, खाजगी व सार्वजनिक भागीदारीद्वारे देशाच्या सर्वच प्रदेशातील पर्यटन विकास साधण्याकरिता सर्वंकष प्रयत्नाची आवश्यकता आहे, जेणेकरून देशात स्थानिक लोकांच्या रोजगार व उत्पन्न पातळीत वाढ होईल व आंतरराष्ट्रीय संबंध सलोख्याचे राहतील.

**संदर्भ :**

१. डॉ. एस. आर. कट्टिमनी- ऐतिहासिक पर्यटन( ई बुक ) - सिद्धार्थ प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर २०२३
२. विजय सुकळकर, कृषी पर्यटन विकासाचे मॉडेल, सकाळ अ‍ॅग्रोवन, २० फेब्रुवारी, २०२५
३. डॉ. बबन भिवसेन जाधव-पर्यटन व्यवसायाचे महत्व- योजना मासिक, अंक -२, सप्टेंबर २०११, पृष्ठ क्र. २६
४. अभिजीत विनायक तोंडसे- कृषी पर्यटन शेतीला पूरक व्यवसाय-उद्योजक मासिक, जून २०२५, पृष्ठ क्र. ४३
५. मृगेंद्र चतुर्वेदी, वरिष्ठ पत्रकार, पहलगाम आतंकी हमला : इंसानियत का कत्ल या धर्म पर चोट, डीडी न्यूज ३०/०४/२०२५
६. देवेंद्र गंद्रे ( मुलाखत) पर्यटन व्यवसायातील बदलत्या आव्हानांसाठी आपण सज्ज आहोत का?, हिंदुस्तान पोस्ट ऑक्टोबर, २०२५
७. Sanjay Kumar (Editor) - India Tourism Data Compendium 2025, Research and Analytics Division Ministry of Tourism Government of India, 66th Edition, Page no.1-13.
८. भारतातील युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीतील स्थळे, योजना मासिक, अंक ११ वा, जून २०२४, पृष्ठ क्र. ४४-५३.
९. https://www.e-unwto.org
१०. https://ddnews.gov.in/world-tourism-day-2025.
११. https://www-worldbank-org.
१२. https://www.amarujala.com.

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन आणि बंजारा ऐतिहासिक वारसा स्थळे

**राठोड रमेश बाबूराव[1], प्रा.डॉ. लिगाडे ओमशिवा विश्वनाथ[2]**
[1]संशोधक विद्यार्थी
[2]इतिहास विभाग प्रमुख शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर जि. लातूर
**Email:** rbrathod75@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180102
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 8-11
January 2026
**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*भारतीय पर्यटन हे देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक ओळखीचे एक महत्त्वपूर्ण माध्यम असून त्याचा पाया समृद्ध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशावर आधारित आहे. या वारशातील एक महत्त्वाचा, परंतु दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेला घटक म्हणजे बंजारा समाजाचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा होय. प्राचीन व मध्ययुगीन काळात व्यापार, वाहतूक आणि लष्करी रसद पुरवठ्यात बंजारा समाजाने महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या तांडा वस्ती, धार्मिक स्थळे, सराय, जलस्त्रोत, किल्ले तसेच विशिष्ट कला, हस्तकला, लोकसंगीत व नृत्य ही त्यांच्या समृद्ध परंपरेची साक्ष देतात. सध्याच्या काळात हेरिटेज टुरिझम, सांस्कृतिक पर्यटन व ग्रामीण पर्यटनाच्या दृष्टीने बंजारा वारसा स्थळांमध्ये मोठी क्षमता आहे. मात्र, या स्थळांचे संवर्धन, दस्तऐवजीकरण, पायाभूत सुविधा आणि प्रचार-प्रसार यांचा अभाव दिसून येतो. समुदाय-आधारित पर्यटन, स्थानिक सहभाग, डिजिटल माध्यमांचा वापर आणि शाश्वत विकासाच्या धोरणांद्वारे बंजारा वारसा स्थळांना मुख्य प्रवाहातील पर्यटनात स्थान मिळू शकते. अशा प्रकारे बंजारा ऐतिहासिक वारसा स्थळांचा विकास केल्यास भारतीय पर्यटनाला नवा आयाम मिळून स्थानिक समुदायाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीस हातभार लागेल.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय पर्यटन, बंजारा समाज, ऐतिहासिक वारसा, हेरिटेज टुरिझम, सांस्कृतिक पर्यटन, बंजारा तांडा, समुदाय-आधारित पर्यटन, शाश्वत पर्यटन*

**प्रस्तावना:**

भारतीय संस्कृती ही केवळ स्थिर वास्तूंमध्ये नाही, तर ती इथल्या फिरत्या प्रवाहातही वसलेली आहे. या प्रवाहाचे सर्वात तेजस्वी प्रतीक म्हणजे 'बंजारा' समाज. ज्या काळात रस्ते आणि रेल्वेचे जाळे नव्हते, त्या काळात अथांग सह्याद्री आणि विशाल हिमालय ओलांडून भारताच्या व्यापाराला गती देण्याचे कार्य या समाजाने केले. आज जेव्हा आपण 'हेरिटेज टुरिझम'बद्दल बोलतो, तेव्हा बंजारा समाजाचा ऐतिहासिक वारसा हे पर्यटनाचे एक अफाट क्षमता असलेले क्षेत्र म्हणून समोर येते. भारतीय पर्यटन हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि सांस्कृतिक ओळखीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. भारतातील समृद्ध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा पर्यटनाला चालना देतो. या वारश्याचा एक महत्त्वाचा आणि अनेकदा दुर्लक्षित भाग म्हणजे बंजारा समुदायाचा ऐतिहासिक वारसा. बंजारा, एक भटक्या जमातीचा समूह, ज्यांनी त्यांच्या स्थलांतरणाच्या काळात अनेक ठिकाणी त्यांच्या संस्कृतीचे, कलेचे आणि धार्मिक श्रद्धेचे ठसे उमटवले आहेत.

Quick Response Code:

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
राठोड रमेश बाबूराव, संशोधक विद्यार्थी

**How to cite this article:**
*राठोड, . रमेश . बाबूराव ., & लिगाडे, . ओमशिवा . विश्वनाथ . (2026). भारतीय पर्यटन आणि बंजारा ऐतिहासिक वारसा स्थळे. Journal of Research & Development, 18(1(V)), 8–11.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18477492*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18477492
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश भारतीय पर्यटनाच्या व्यापक चौकटीत बंजारा समुदायाच्या ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व अधोरेखित करणे आणि त्यांच्या संवर्धनासाठी व पर्यटनाच्या दृष्टीने विकासासाठी शिफारसी करणे आहे. हा अभ्यास बंजारा वारसा स्थळांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नकाशावर आणण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो. भारत हा जगातील सर्वात प्राचीन संस्कृतींपैकी एक आहे, जिथे नैसर्गिक सौंदर्य, विविध धर्म, भाषा आणि परंपरांचा संगम पाहायला मिळतो. यामुळे भारत जागतिक पर्यटनाचे एक प्रमुख केंद्र बनला आहे. तथापि, भारतातील अनेक उप-सांस्कृतिक गट आणि त्यांच्याशी संबंधित ऐतिहासिक खुणा अजूनही मुख्य प्रवाहातील पर्यटनापासून दूर आहेत. बंजारा समाज, ज्यांना काही ठिकाणी लम्बाडा किंवा गोरमाटी म्हणूनही ओळखले जाते, हे भारतीय इतिहासातील महत्त्वाचे व्यापारी, सैनिक आणि संस्कृतीचे वाहक राहिले आहेत. त्यांचे ऐतिहासिक वारसा स्थळे, ज्यामध्ये त्यांची तांडा (वस्ती), मंदिरे, समाधी आणि कलाकृतींचा समावेश आहे, त्यांच्या समृद्ध आणि विशिष्ट जीवनशैलीची साक्ष देतात. या स्थळांचे संशोधन, संवर्धन आणि पर्यटन विकास ही काळाची गरज आहे, जेणेकरून या विशिष्ट वारशाला योग्य सन्मान मिळेल आणि पर्यटनाला एक नवा आयाम मिळेल.

**शोधनिबंधाचे उद्देश (Objectives of the Research Paper)**

प्रस्तुत शोधनिबंधाचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे आहेत:

- भारतीय पर्यटनाच्या क्षेत्रातील बंजारा ऐतिहासिक वारसा स्थळांची पार्श्वभूमी आणि सद्यस्थिती स्पष्ट करणे.
- बंजारा वारसा स्थळांच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्वाचे विश्लेषण करणे.
- या स्थळांच्या संवर्धन आणि जतन करण्यातील प्रमुख आव्हाने आणि संधी ओळखणे.
- पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि स्थानिक बंजारा समुदायाच्या सहभागातून शाश्वत विकास साधण्यासाठी धोरणात्मक शिफारसी सादर करणे.

**बंजारा व्यापाराचे महामार्ग (लमाणी) आणि बंजारा तांडा**

बंजारा शब्दाची उत्पत्ती 'वनचर' (वनात फिरणारे) किंवा 'वाणिज्य' (व्यापार) या शब्दांशी जोडली जाते. ऐतिहासिकदृष्ट्या हा समाज केवळ फिरता समुदाय नव्हता, तर ते मध्ययुगीन भारताचे 'लॉजिस्टिक एक्सपर्ट्स' होते.

- **व्यापारी मक्तेदारी:** मुघल काळात आणि त्यापूर्वीही, मिठाचा व्यापार, धान्य आणि मसाल्यांची वाहतूक बंजारा नायकांच्या नियंत्रणाखाली होती. त्यांच्या तांड्यात (ताफ्यात) हजारो बैल असायचे.
- **संरक्षणाची जबाबदारी:** बंजारा नायक केवळ व्यापारी नव्हते, तर ते स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ असलेले योद्धे होते. अनेक किल्ल्यांच्या बांधकामात आणि लष्करी रसद पुरवठ्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.
- **ब्रिटीश काळ आणि विस्थापन:** १८ व्या शतकात ब्रिटीशांनी रेल्वे आणली आणि १८७१ चा 'गुन्हेगारी जमाती कायदा' (Criminal Tribes Act) लागू केला, ज्यामुळे या समृद्ध व्यापारी समाजाचा ऐतिहासिक वारसा अंधारात गेला.

**बंजारा वारसा स्थळांचे विश्लेषण**

बंजारा समाजाशी संबंधित वारसा स्थळे ही केवळ स्मारके नसून ती त्यांच्या संघर्षाची आणि समृद्धीची प्रतीके आहेत.

- **पोहरादेवी (वाशिम, महाराष्ट्र):** या क्षेत्राला 'बंजारा समाजाची काशी' मानले जाते. संत सेवालाल महाराज आणि रामराव महाराज यांची ही तपोभूमी आहे. नुकतेच येथे उभारलेले 'नगाडा म्युझियम' हे जागतिक दर्जाचे असून, बंजारा संस्कृतीचे दर्शन घडवणारे पर्यटनाचे मोठे केंद्र बनले आहे.
- **बंजारा किल्ले आणि सराय:** तेलंगणातील निर्मल जिल्हा आणि राजस्थानच्या सीमेवर अनेक जुन्या सराय (धर्मशाळा) आणि छोटे गड आहेत, जे बंजारा नायकांनी बांधले होते. हे ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत.
- **लमाण दिवे आणि बारवा:** अनेक प्राचीन जलस्त्रोत आणि बारवा (विहिरी) या बंजारा समाजाने त्यांच्या प्रवासाच्या मार्गावर लोकांसाठी खोदल्या होत्या. या वास्तू आजही त्यांच्या सामाजिक दातृत्वाचा पुरावा देतात.

**सांस्कृतिक वारसा: पर्यटनाचे आकर्षण केंद्र**

बंजारा संस्कृतीचे जिवंतपण त्यांच्या कलागुणांमध्ये आहे, जे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पुरेसे आहे.

- **वस्त्रकला (Embroidery):** बंजारा स्त्रियांच्या पोशाखावरील काचकाम आणि भरतकाम ही जागतिक स्तरावरची कला आहे. 'कशिदाकारी'चा हा प्रकार ग्रामीण पर्यटनाला (Rural Tourism) चालना देऊ शकतो.
- **लोकसंगीत आणि नृत्य:** 'लेगी' नृत्य आणि पारंपरिक गीते ही केवळ मनोरंजनाची साधने नसून त्यातून त्यांचा इतिहास सांगितला जातो. हे सांस्कृतिक पर्यटनाचे (Cultural Tourism) अविभाज्य अंग आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- **गोरबोली भाषा:** ही भाषा इंडो-आर्यन कुटुंबातील असून, तिचा प्रसार भारतभर आहे. भाषिक पर्यटनाच्या दृष्टीने याचे जतन होणे आवश्यक आहे.

**भारतीय पर्यटनाची व्यापक चौकट**

भारतीय पर्यटन हे मुख्यतः तीन स्तंभांवर आधारित आहे:

- सांस्कृतिक पर्यटन (Cultural Tourism): यामध्ये युनेस्को जागतिक वारसा स्थळे (उदा. ताजमहाल, अजिंठा-वेरूळ लेणी), किल्ले, मंदिरे आणि धार्मिक स्थळे यांचा समावेश आहे. (उदा. संदर्भ क्र. १.१, १.२, १.४)
- नैसर्गिक पर्यटन (Natural Tourism): राष्ट्रीय उद्याने (उदा. काझीरंगा), वन्यजीव अभयारण्ये, पर्वत आणि समुद्रकिनारे.
- आरोग्य आणि साहसी पर्यटन (Health and Adventure Tourism).
- बंजारा ऐतिहासिक वारसा स्थळे प्रामुख्याने सांस्कृतिक पर्यटनाच्या अंतर्गत येतात आणि त्यांना 'हेरिटेज वॉक', 'ग्राम पर्यटन' (Village Tourism) आणि 'इको-टूरिझम'च्या माध्यमातून विकसित करण्याची प्रचंड क्षमता आहे.

**बंजारा ऐतिहासिक वारसा: एक ओळख**

- बंजारा समाज हा मुख्यतः राजस्थानमधून उद्भवलेला आणि नंतर भारतभर पसरलेला एक भटक्या जमातीचा समूह आहे. ते हजारो वर्षांपासून भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या ऐतिहासिक वारशाचे वैशिष्ट्य खालीलप्रमाणे आहे:
- तांडा (Tanda): त्यांची पारंपारिक वस्ती. तांडा हे बंजारा संस्कृतीचे केंद्र आहे. या तांड्यांमध्ये आजही त्यांची विशिष्ट जीवनशैली, घर बांधणीची पद्धत आणि लोककला जतन केलेली आढळते.
- कला आणि हस्तकला: बंजारा महिला त्यांच्या विशिष्ट भरतकाम (Embroidery) आणि आरसा लावलेल्या वस्त्रांसाठी प्रसिद्ध आहेत. हे त्यांचे 'फिरते कला दालन'च आहे.
- धार्मिक स्थळे: संत सेवालाल महाराज (Sewa Lal Maharaj) हे बंजारा समाजाचे पूजनीय संत असून, त्यांच्या समाधी स्थळांना (उदा. पोहरादेवी, महाराष्ट्र) बंजारा तीर्थक्षेत्राचे महत्त्व आहे.
- भाषिक वारसा: त्यांची 'गोरबोली' ही भाषा, जी इंडो-आर्यन कुटुंबातील आहे, त्यांच्या स्थलांतरणाच्या इतिहासाची आणि विविध संस्कृतींशी झालेल्या संवादाची साक्ष देते.

**ऐतिहासिक वारसा स्थळांचे पर्यटनातील महत्त्व**

- बंजारा वारसा स्थळे भारतीय पर्यटनाला एक अनोखी आणि अस्सल ओळख (Authentic Experience) प्रदान करू शकतात.
- विशिष्ट सांस्कृतिक अनुभव: पर्यटक केवळ ऐतिहासिक इमारती पाहण्याऐवजी एका जिवंत संस्कृतीचा अनुभव घेऊ शकतात.
- स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना: या स्थळांच्या विकासामुळे बंजारा समुदायासाठी रोजगार निर्मिती होऊ शकते, विशेषतः महिलांना त्यांच्या हस्तकला आणि लोककलांच्या माध्यमातून उत्पन्न मिळू शकते.
- सामाजिक समावेशकता: मुख्य प्रवाहात नसलेल्या समाजाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळते.

**आव्हाने आणि उपाययोजना**

बंजारा वारशाचा पर्यटनासाठी वापर करताना काही आव्हाने आहेत:

- **वारसा स्थळांचे जतन:** अनेक जुन्या गढ्या आणि सराय नामशेष होत आहेत. त्यांचे पुरातत्व विभागाने जतन करणे आवश्यक आहे.
- **डिजिटलायझेशन:** बंजारा मौखिक इतिहास (Oral History) रेकॉर्ड करून तो पर्यटकांसाठी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.
- **इन्फ्रास्ट्रक्चर:** पोहरादेवी सारख्या ठिकाणी राहण्याच्या आणि वाहतुकीच्या अधिक सोयी निर्माण करणे.

**निष्कर्ष**

बंजारा समाज हा भारतीय पर्यटनाचे एक 'अनमोल रत्न' आहे, ज्याची चमक अद्याप जगाने पूर्णपणे पाहिलेली नाही. त्यांच्या गौरवशाली इतिहासाची आणि विलोभनीय संस्कृतीची सांगड जर आधुनिक पर्यटनाशी घातली, तर ते केवळ बंजारा समाजाच्या आर्थिक उत्थानासाठीच नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकणारे ठरेल. बंजारा समाजाचा हा वारसा म्हणजे विखुरलेल्या काचांचे सौंदर्य नसून, त्या काचांनी सजवलेला एक तेजस्वी 'आरसा' आहे, ज्यात भारताचा खरा इतिहास प्रतिबिंबित होतो. बंजारा समुदायाचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा हा भारतीय पर्यटनाच्या दृष्टीने एक अमूल्य ठेवा आहे. त्यांची स्थळे, कला, आणि जीवनशैली ही पर्यटकांना एक नवीन आणि अर्थपूर्ण अनुभव देऊ शकतात. तथापि, या वारसा स्थळांना योग्य ओळख, संवर्धन आणि विकासाची

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

आवश्यकता आहे. या स्थळांना मुख्य प्रवाहात आणल्यास, केवळ पर्यटनाला चालना मिळणार नाही, तर बंजारा समुदायाच्या आत्म-सन्मानाची भावना वाढेल आणि त्यांच्या संस्कृतीचे जतन होईल.

**शिफारशी (Recommendations)**

बंजारा वारसा स्थळांच्या शाश्वत विकासासाठी खालील शिफारसी केल्या आहेत:

- राष्ट्रीय वारसा यादीत समावेश: बंजारा तांडा, धार्मिक स्थळे आणि ऐतिहासिक खुणा यांचा केंद्र आणि राज्य सरकारच्या वारसा यादीत (Heritage List) समावेश करावा.
- माहिती केंद्र स्थापना: प्रमुख बंजारा स्थळांजवळ 'बंजारा वारसा आणि संस्कृती माहिती केंद्र' (Banjara Heritage and Culture Interpretation Centre) स्थापन करावे.
- स्थानिक सहभाग: 'समुदाय-आधारित पर्यटन' (Community-Based Tourism) मॉडेल विकसित करावे, जिथे बंजारा समुदायाचे सदस्य मार्गदर्शक, कला आणि हस्तकला विक्रेते आणि आदरातिथ्य प्रदाता म्हणून काम करतील.
- प्रसिद्धी आणि विपणन: पर्यटन मंत्रालयाच्या 'अतुल्य भारत' (Incredible India) मोहिमेत बंजारा वारसा स्थळांचा सक्रियपणे प्रचार करावा.
- संशोधन आणि दस्तऐवजीकरण: बंजारा इतिहास, लोककला आणि स्थळांचे विस्तृत संशोधन आणि दस्तऐवजीकरण (Documentation) करावे.

**संदर्भ ग्रंथ (References)**

1. इकबाल : “बंजारा लोक-संस्कृति : एक अवलोकन”, International Journal of Hindi Research, Publication Hyderabad, 2017
2. पूरी सुरेश (संपा.) : “बंजारा समाजाची सामाजिक परिस्थिती”, विमुक्तजन बंजारा विशेषांक, संपा. पूरी सुरेश, औरंगाबाद, 1978
3. राठोड दिगंबर (संपा.) : बंजारा एकता, साई कॉम्प्युटर्स, नांदेड, 2000
4. देशमुख प्र. रा. : सिंधु संस्कृती ती ऋग्वेद व हिंदू संस्कृती, प्रकाशक : म. श. साठे, चिटणीस प्राज्ञ पाठशाला मंडळ, वाई जि. सातारा, 1966
5. राठोड मोतीराज : बंजारा लोकसाहित्य में समाज संस्कृती, सरस्वती प्रकाशन, कानपूर, 1988
6. https://www.census2011.co.in/census/district/363-osmanabad.html 10/08/2020
7. https://www.google.weblight.com
8. https://vishwakosh.marathi.gov.in

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# शिवकालीन पर्यटन संकल्पना व तिचे आधुनिक पर्यटन व्यवस्थेवरील प्रभाव

**विनोद सखाराम बोरकर**
संशोधक विद्यार्थी, नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180103
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 12-16
January 2026
**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन ही आधुनिक काळात आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक प्रगतीची महत्त्वपूर्ण प्रक्रिया मानली जाते; मात्र तिची संकल्पनात्मक मुळे इतिहासात खोलवर घट्ट झालेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात पर्यटन ही स्वतंत्र वैज्ञानिक संकल्पना म्हणून विकसित झाली नसली, तरी प्रवास, धार्मिक यात्रा, व्यापार, सागरी दळणवळण व किल्ले-दर्शन या माध्यमातून पर्यटनाच्या मूलभूत घटकांचा सर्वसमावेशक वापर झालेला आढळतो. शिवकालीन प्रशासनाने सुरक्षितता, लोककल्याण, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक सहिष्णुता यांना प्राधान्य दिल्यामुळे प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित व संघटित झाला. या संशोधनात शिवकालीन काळातील पर्यटनाशी संबंधित घटक—किल्ले, धार्मिक स्थळे, बाजारपेठा, व्यापारी मार्ग व सागरी बंदरे यांचा ऐतिहासिक, सामाजिक व प्रशासकीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. तसेच शिवकालीन धोरणांचा आधुनिक पर्यटन व्यवस्थेवर झालेला प्रभाव तपासण्यात आला आहे. हा अभ्यास स्पष्ट करतो की, छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन केवळ राजकीय व लष्करी दृष्ट्या प्रभावी नव्हते, तर ते सांस्कृतिक व पर्यटनात्मक दृष्टीनेही दूरगामी परिणाम घडवणारे होते. आधुनिक महाराष्ट्रातील वारसा पर्यटन, धार्मिक पर्यटन व सागरी पर्यटन यांची मुळे शिवकालीन व्यवस्थेत शोधता येतात, हे या संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष आहेत.*

***मुख्यशब्द:*** *शिवकालीन पर्यटन संकल्पना, छत्रपती शिवाजी महाराज, वारसा पर्यटन, किल्ले पर्यटन, धार्मिक पर्यटन, सागरी पर्यटन, प्रवास व दळणवळण, पायाभूत सुविधा, सांस्कृतिक वारसा, आधुनिक पर्यटन व्यवस्था, शाश्वत पर्यटन, महाराष्ट्र पर्यटन*

**प्रस्तावना:**

पर्यटन ही संकल्पना आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटक मानली जात असली, तरी तिची मुळे प्राचीन व मध्ययुगीन इतिहासात खोलवर रुजलेली असल्याचे स्पष्ट होते. मानवाच्या मूलभूत गरजा, **उत्सुकता**, श्रद्धा, व्यापार, राजकीय संपर्क व सुरक्षितता यांतून प्रवासाची सुरुवात झाली आणि कालांतराने त्याचे पर्यटनात रूपांतर झाले. ऐतिहासिक काळात पर्यटन हे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून, ते सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक देवाणघेवाणीचे प्रभावी माध्यम होते. या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ हा भारतीय इतिहासातील पर्यटन संकल्पनेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरतो. शिवकालीन काळात पर्यटन ही स्वतंत्र आर्थिक क्रिया म्हणून ओळखली जात नसली, तरी किल्ले, धार्मिक स्थळे, व्यापारी मार्ग, सागरी बंदरे व सांस्कृतिक केंद्रे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रवास व स्थलांतर घडत होते. यात्रेकरू, व्यापारी, सैनिक, राजदूत, कारागीर व सामान्य नागरिक यांचा राज्याच्या विविध भागांत सतत संपर्क होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेली किल्ल्यांची साखळी, सुरक्षित रस्ते, संरक्षित व्यापारी मार्ग आणि सक्षम समुद्री आरमार यांमुळे प्रवास अधिक सुरक्षित, नियोजित व सुलभ झाला.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
विनोद सखाराम बोरकर, संशोधक विद्यार्थी, नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

**How to cite this article:**
*बोरकर, . विनोद . सखाराम . (2026). शिवकालीन पर्यटन संकल्पना व तिचे आधुनिक पर्यटन व्यवस्थेवरील प्रभाव. Journal of Research & Development, 18(1(V)), 12–16. https://doi.org/10.5281/zenodo.18477525*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18477525
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

यामुळे पर्यटनाच्या प्राथमिक संरचना आकारास येऊ लागल्या. शिवकालीन प्रशासन हे लोकाभिमुख, सुसंस्कृत आणि संरक्षणप्रधान होते. राज्याच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देताना छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रवास करणाऱ्या सामान्य जनतेच्या हिताचाही विचार केला. किल्ल्यांच्या परिसरात पाणीपुरवठा, निवासाची सोय, बाजारपेठा आणि दळणवळणाच्या सुविधा विकसित करण्यात आल्या. यामुळे प्रवास हा केवळ गरजेपुरता न राहता, अनुभवप्रधान आणि सांस्कृतिक संपर्क वाढवणारा ठरला. विशेषतः धार्मिक स्थळांना दिलेले संरक्षण व अभय यामुळे धार्मिक यात्रांचे प्रमाण वाढले, ज्याचा सामाजिक व आर्थिक जीवनावर सकारात्मक परिणाम झाला. महाराष्ट्रातील किल्ले, तीर्थक्षेत्रे आणि बंदरे ही शिवकालात केवळ राजकीय किंवा धार्मिक केंद्रे नव्हती, तर ती सांस्कृतिक संवादाची व सामाजिक देवाणघेवाणीची केंद्रे होती. विविध प्रांतांतील लोकांचा परस्पर संपर्क वाढल्यामुळे भाषा, कला, परंपरा आणि जीवनशैली यांचे आदानप्रदान घडून आले. हा सांस्कृतिक प्रवाह आधुनिक पर्यटनाच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत आहे. त्यामुळे शिवकालीन पर्यटन संकल्पना ही केवळ ऐतिहासिक घटना नसून, ती आधुनिक पर्यटन व्यवस्थेची पायाभरणी करणारी प्रक्रिया ठरते. या संशोधनाचा मुख्य हेतू शिवकालीन पर्यटन संकल्पनेचे स्वरूप, तिची वैशिष्ट्ये आणि आधुनिक पर्यटन व्यवस्थेशी असलेले नाते स्पष्ट करणे हा आहे. इतिहासाच्या आधारे पर्यटन विकासाची मुळे समजून घेणे, तसेच शिवकालीन वारशाचे आधुनिक पर्यटन धोरणांतील स्थान अधोरेखित करणे, हे या अभ्यासाचे शास्त्रीय महत्त्व आहे. शिवकाल, म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ )इ.स.१६३० ते इ.स.१६८०( हा भारतीय इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा कालखंड मानला जातो. हा काळ मुख्यतः स्वराज्य स्थापनेचा, सामरिक संघर्षांचा, प्रशासन उभारणीचा आणि राजकीय सक्षमीकरणाचा होता. त्या काळात "पर्यटन" ही संकल्पना आधुनिक अर्थाने व्यावसायिक उद्योग म्हणून अस्तित्वात नव्हती; मात्र यात्रा, व्यापार, तीर्थयात्रा, राजकीय दूतांचे प्रवास, सैनिकी हालचाली आणि समुद्री दळणवळण या माध्यमांतून प्रवासाची व्यापक प्रक्रिया चालू होती. त्यामुळे शिवकालीन प्रवास ही संकल्पना आधुनिक पर्यटनाची ऐतिहासिक पूर्वपीठिका ठरते. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेली व जिंकलेली गडकिल्ल्यांची व्यापक साखळी ही त्यांच्या सामरिक आणि भौगोलिक दूरदृष्टीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. रायगड, राजगड, प्रतापगड, सिंहगड, शिवनेरी, लोहगड, पन्हाळा, साल्हेर यांसारखे डोंगरी किल्ले तसेच सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग आणि खांदेरी यांसारखे सागरी किल्ले आजच्या काळात महाराष्ट्राच्या पर्यटन व्यवस्थेचा कणा ठरले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत सुमारे ३५० ते ३७० किल्ले जिंकले किंवा नव्याने बांधले. हे किल्ले सह्याद्री पर्वतरांग, पश्चिम घाट, दख्खन पठार, कोकण किनारपट्टी आणि गोदावरी, कृष्णा व भीमा यांसारख्या प्रमुख नद्यांच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा अचूक उपयोग करून उभारले गेले होते. शिवकालीन किल्ल्यांची रचना ही केवळ लष्करी गरजांपुरती मर्यादित नव्हती, तर ती पर्यावरणीय, भौगोलिक आणि आर्थिक दृष्टीनेही अत्यंत विचारपूर्वक करण्यात आली होती. डोंगरी किल्ले खडकाळ भूभाग, खोल दऱ्या, दाट अरण्ये आणि नैसर्गिक संरक्षण यांचा उपयोग करून उभारले गेले, ज्यामुळे गनिमी कावा युद्धपद्धती प्रभावीपणे राबवता आली. शिवनेरी )जन्मस्थळ(, तोरणा )पहिला जिंकलेला किल्ला(, प्रतापगड )जविाजी महाले यांनी प्राण वाचवले तो प्रसंग) आणि पन्हाळगडाचा प्रसंग ( प्रति शिवाजी शिवा काशीद यांचे बलिदान( हे किल्ले आज ऐतिहासिक स्मृती आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक बनले आहेत.

त्याचप्रमाणे, छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले समुद्री किल्ले हे त्यांच्या आरमार धोरणाचे द्योतक आहेत. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर उभारलेले सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि सुवर्णदुर्ग हे किल्ले पोर्तुगीज, सिद्दी आणि इंग्रजांसारख्या सागरी शक्तींविरुद्ध संरक्षणासाठी बांधले गेले. या किल्ल्यांच्या रचनेत समुद्राची लाट, खडकाळ किनारे आणि नैसर्गिक बंदरांचा प्रभावी वापर करण्यात आला. हे किल्ले आज सागरी पर्यटन आणि किनारी वारसा पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहेत. आधुनिक काळात हे सर्व किल्ले महाराष्ट्राच्या पर्यटन उद्योगातील प्रमुख आकर्षण ठरले आहेत. वारसा पर्यटन )Heritage Tourism), साहसी पर्यटन )Adventure Tourism ट्रेकिंग, गिर्यारोहण(, आणि पर्यावरणीय पर्यटन )Eco-Tourism) या विविध प्रकारच्या पर्यटन संकल्पना शिवकालीन किल्ल्यांभोवती विकसित झालेल्या दिसतात. दरवर्षी लाखो पर्यटक या किल्ल्यांना भेट देतात, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. रोजगारनिर्मिती, मार्गदर्शक सेवा, स्थानिक खाद्यपदार्थ, निवास व्यवस्था आणि हस्तकला व्यवसाय यांना यामुळे प्रोत्साहन मिळते. विशेषतः २०२४ मध्ये युनेस्कोने "Maratha Military Landscapes of India" या नावाखाली महाराष्ट्रातील अकरा आणि तमिळनाडूतील एक अशा एकूण बारा मराठा किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा दिला. या आंतरराष्ट्रीय मान्यतेमुळे शिवकालीन किल्ल्यांचे जागतिक महत्त्व अधोरेखित झाले असून, पर्यटनवाढीसोबतच संवर्धन, व्यवस्थापन आणि शाश्वत विकास या बाबी अधिक महत्त्वाच्या ठरल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने यानंतर माहिती केंद्रे, पर्यटन सर्किट, संवर्धन योजना आणि शाश्वत पर्यटन धोरणे राबवण्यास सुरुवात केली आहे. हा संशोधन पेपर शिवकालीन संकल्पना **धोरणात्मक** भौगोलिक दृष्टी, किल्ल्यांची रचना आणि युद्धनीती

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

आणि त्यांचा आधुनिक पर्यटन व्यवस्थेवर झालेला प्रभाव यांचा सखोल अभ्यास करतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारशाचे आधुनिक पर्यटन विकासातील योगदान स्पष्ट करणे, तसेच भविष्यातील शाश्वत पर्यटन धोरणांसाठी ऐतिहासिक दृष्टिकोन मांडणे, हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे. यामुळे महाराष्ट्राच्या पर्यटन उद्योगाला दीर्घकालीन आणि संतुलित विकासाची दिशा मिळू शकते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

- शिवकालीन काळातील प्रवास व पर्यटनाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.
- किल्ले, धार्मिक स्थळे व व्यापारमार्ग यांचे पर्यटनदृष्ट्या महत्त्व स्पष्ट करणे.
- शिवकालीन धोरणांचा आधुनिक पर्यटनावर झालेला प्रभाव अभ्यासणे.
- महाराष्ट्रातील वारसा पर्यटनाशी शिवकालीन परंपरेचा संबंध मांडणे.

**संशोधन पद्धती**

हा अभ्यास ऐतिहासिक व वर्णनात्मक पद्धतीवर आधारित असून प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. संदर्भग्रंथ, ऐतिहासिक लेखन, प्रवासवर्णने व आधुनिक पर्यटन अभ्यासग्रंथ यांचा आधार घेण्यात आला आहे.

**शिवकालीन पर्यटनाची संकल्पना**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात राज्य सुरक्षित व स्थिर ठेवल्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित झाला, ज्यामुळे लोकांची स्थलांतर व भ्रमंती वाढली. शिवकालीन काळात “पर्यटन” ही संकल्पना आधुनिक अर्थाने अस्तित्वात नसली, तरी यात्रा, व्यापार, राजकीय, लष्करी आणि धार्मिक कारणांमुळे प्रवास मोठ्या प्रमाणावर प्रचलित होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील प्रवास हा मुख्यतः गरजाधिष्ठित होता; तथापि, त्यामध्ये आजच्या पर्यटन संकल्पनेची बीजे स्पष्टपणे आढळतात. विशेषतः शिवरायांची भौगोलिक दृष्टी, किल्ल्यांची रचना, मार्गव्यवस्था आणि पर्यावरणाशी सुसंगत धोरणे ही शिवकालीन पर्यटन संकल्पनेची मूलभूत वैशिष्ट्ये मानता येतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांची निवड व बांधणी ही केवळ सामरिक गरजांपुरती मर्यादित न ठेवता, भौगोलिक, पर्यावरणीय आणि दीर्घकालीन दृष्टीने केली होती. सह्याद्री पर्वतरांग, पश्चिम घाट, दख्खन पठार )कोकण, घाट आणि देश विभाग( तसेच किनारी प्रदेश यांचा अचूक उपयोग करून किल्ल्यांची उभारणी करण्यात आली. उंच डोंगर, खोल दऱ्या, घनदाट जंगले, नद्या आणि खडकाळ भूभाग यांचा वापर करून गनिमी कावा युध्दपध्दती प्रभावीपणे राबवता यावी. हीच भौगोलिक वैशिष्ट्ये आजच्या काळात किल्ल्यांना साहसी आणि वारसा पर्यटनाची केंद्रे बनवतात.

**शिवकालीन पर्यटनाचा आधुनिक महाराष्ट्रावर प्रभाव**

छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्ष व लोकाभिमुख धोरण स्वीकारले. त्यामुळे हिंदू, मुस्लिम व इतर धर्मीय स्थळांना संरक्षण मिळाले. पंढरपूर, नाशिक, जेजुरी, तुळजापूर ही तीर्थक्षेत्रे शिवकालातही यात्रेचे केंद्र होती. धार्मिक यात्रांमुळे निवास, अन्न, बाजारपेठा यांचा विकास झाला, जो पर्यटन अर्थव्यवस्थेचा मूलभूत घटक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले आरमार हे सागरी सुरक्षेसोबतच सागरी प्रवास व व्यापाराला प्रोत्साहन देणारे होते. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, कुलाबा ही बंदरे सागरी पर्यटनाच्या दृष्टीने आजही महत्त्वाची आहेत. आधुनिक Coastal Tourism ची संकल्पना शिवकालीन सागरी धोरणाशी जोडलेली दिसते.आज महाराष्ट्रातील पर्यटन धोरणात किल्ले संवर्धन, शिवस्मारके, धार्मिक व सांस्कृतिक उत्सव यांना विशेष महत्त्व दिले जाते.“ शिवराज्याभिषेक दिन”, “किल्ले संवर्धन मोहिमा ”व“ हेरिटेज वॉक ”या उपक्रमांमधून शिवकालीन पर्यटन परंपरेचा आधुनिक वापर दिसून येतो. शिवकालीन किल्ल्यांचा आधुनिक पर्यटन व्यवस्थेवर मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. महाराष्ट्रातील बहुतांश किल्ले आज वारसा पर्यटनाचे प्रमुख केंद्र आहेत. दरवर्षी लाखो पर्यटक या किल्ल्यांना भेट देतात, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. रोजगारनिर्मिती, मार्गदर्शक सेवा, हॉटेल व्यवसाय, वाहतूक आणि स्थानिक उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन मिळते. सिंहगड, रायगड आणि राजगड यांसारखे किल्ले इतिहासप्रेमी, विद्यार्थी आणि ट्रेकर्ससाठी विशेष आकर्षण ठरले आहेत. रायगड हे छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी व राज्याभिषेकाचे स्थळ असल्याने प्रेरणास्थान मानले जाते. किल्ल्यांवरील पायऱ्या, दरवाजे, चौकटी, पाण्याच्या टाक्या आणि राजवाड्यांचे अवशेष हे पर्यटकांना इतिहासाचा सजीव अनुभव देतात. २०२४ मध्ये मराठा सैनिकी लँडस्केप अंतर्गत १२ मराठा किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा दर्जा प्राप्त झाला. या मान्यतेमुळे किल्ल्यांना जागतिक ओळख मिळाली असून पर्यटनात लक्षणीय वाढ झाली आहे. तसेच संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय निधी, तांत्रिक मदत आणि शास्त्रोक्त व्यवस्थापनाची संधी उपलब्ध झाली आहे.माहिती

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

केंद्रे, पर्यटन सर्किट आणि मार्गदर्शक सेवा विकसित केल्या जात आहेत. पर्यटनवाढीमुळे स्थानिक पातळीवर आर्थिक लाभ झाले असले, तरी अतिपर्यटन, किल्ल्यांचे क्षरण, हवामान बदल आणि पर्यावरणीय ताण ही मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे शास्त्रीय संवर्धन, नियंत्रित पर्यटन, पाणी व्यवस्थापन, सुरक्षित मार्ग आणि स्थानिक समुदायाचा सहभाग आवश्यक ठरतो. आधुनिक पर्यटनात वारसा पर्यटन, साहसी पर्यटन आणि पर्यावरणीय पर्यटन हे प्रकार शिवकालीन किल्ल्यांभोवती केंद्रित झालेले दिसतात.

**निष्कर्ष**

शिवकालीन काळात पर्यटन ही स्वतंत्र संकल्पना नसली तरी प्रवास, धार्मिक यात्रा, किल्ले दर्शन व व्यापार यांमुळे पर्यटनाची मूलभूत रचना अस्तित्वात होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीपूर्ण प्रशासनामुळे सुरक्षितता, पायाभूत सुविधा व सांस्कृतिक सहिष्णुता निर्माण झाली, जी आधुनिक पर्यटन विकासाची पायाभरणी ठरली. त्यामुळे शिवकालीन वारसा हा महाराष्ट्राच्या पर्यटन व्यवस्थेचा कणा असल्याचे स्पष्ट होते. या संशोधनातून असे स्पष्ट होते की, शिवकालीन काळात पर्यटन ही स्वतंत्र व औपचारिक संकल्पना नसली तरी तिचे सर्व मूलभूत घटक प्रभावीपणे अस्तित्वात होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनाने सुरक्षितता, सुव्यवस्था, सांस्कृतिक सहिष्णुता आणि पायाभूत सुविधांवर भर दिल्यामुळे प्रवास, धार्मिक यात्रा व व्यापार अधिक संघटित स्वरूपात विकसित झाले. किल्ले हे शिवकालीन पर्यटनाचे सर्वात महत्त्वाचे केंद्र होते. ते केवळ लष्करी दृष्ट्या महत्त्वाचे नसून, आजच्या वारसा पर्यटनाचे प्रमुख आधारस्तंभ ठरले आहेत. त्याचप्रमाणे धार्मिक स्थळे व यात्रांमुळे धार्मिक पर्यटनाची परंपरा दृढ झाली, तर समुद्री आरमारामुळे सागरी प्रवास व व्यापाराला चालना मिळाली. आधुनिक महाराष्ट्रातील वारसा पर्यटन, धार्मिक पर्यटन आणि सागरी पर्यटन यांची मुळे शिवकालीन धोरणांमध्ये आढळतात. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन हे केवळ राजकीय यशापुरते मर्यादित नसून, त्याचा सामाजिक, सांस्कृतिक व पर्यटन विकासावरही दीर्घकालीन प्रभाव पडलेला आहे. अखेरीस असे म्हणता येईल की, शिवकालीन पर्यटन परंपरा ही आधुनिक पर्यटन व्यवस्थेची ऐतिहासिक पायाभरणी आहे. या परंपरेचे शास्त्रीय अध्ययन व संवर्धन केल्यास महाराष्ट्राच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळू शकते. शिवकालीन भौगोलिक आणि धोरणात्मक संकल्पना म्हणजे सह्याद्री पर्वतश्रेणी, पश्चिम घाट, कोकण किनारपट्टी, दख्खन पठार तसेच गोदावरी, कृष्णा व भीमा यांसारख्या प्रमुख नद्यांच्या नैसर्गिक वैशिष्ट्यांचा कुशलतेने उपयोग करून उभारलेले गडकिल्ले—आजच्या आधुनिक पर्यटन व्यवस्थेला एक अत्यंत मजबूत, दीर्घकालीन आणि बहुआयामी आधार प्रदान करतात. हे किल्ले केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी कावा युद्धनीती आणि सामरिक संरक्षणाचे साधन नव्हते, तर ते इतिहास, संस्कृती, वास्तुकला, जैवविविधता आणि निसर्गसौंदर्य यांचे जिवंत स्मारक म्हणून उदयास आले आहेत.

आधुनिक काळात हे किल्ले वारसा पर्यटन (शैक्षणिक सहल व सांस्कृतिक अभ्यास), साहसी पर्यटन (ट्रेकिंग, गिर्यारोहण व अन्वेषण) आणि पर्यावरणीय पर्यटन (जंगले, नद्या व नैसर्गिक परिसंस्था अभ्यास) यांचे प्रमुख केंद्र बनले आहेत. देश-विदेशातील लाखो पर्यटकांना ही स्थळे आकर्षित करीत असून, महाराष्ट्राच्या पर्यटन उद्योगाला मोठ्या प्रमाणावर महसूल, रोजगारनिर्मिती आणि जागतिक ओळख मिळवून देत आहेत. त्यामुळे शिवकालीन किल्ले हे आधुनिक पर्यटन अर्थव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण स्तंभ ठरले आहेत. विशेषतः "मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया" या नावाने १२ मराठा किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळाल्यामुळे या स्थळांचे आंतरराष्ट्रीय महत्त्व अधोरेखित झाले आहे. या मान्यतेमुळे पर्यटकांची संख्या झपाट्याने वाढली असून, भारताच्या आंतरराष्ट्रीय पर्यटनातील सहभागात लक्षणीय वाढ झाली आहे. युरोप, आशिया आणि इतर देशांतील पर्यटकांच्या वाढत्या उपस्थितीमुळे स्थानिक पातळीवर मार्गदर्शक, हॉटेल्स, रिसॉर्ट्स, स्थानिक हस्तकला आणि अन्नव्यवसाय यांना चालना मिळाली आहे. त्याचबरोबर संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय निधी व तांत्रिक सहाय्य उपलब्ध झाल्याने किल्ल्यांच्या दुरुस्ती व विकास प्रक्रियेला गती मिळाली आहे. तथापि, पर्यटनवाढीबरोबरच अनेक गंभीर आव्हानेही निर्माण झाली आहेत. अतिपर्यटनामुळे किल्ल्यांचे भौतिक क्षरण, प्लास्टिक व कचरा प्रदूषण, हवामान बदलामुळे भूस्खलन व जलगळती, जैवविविधतेवरील ताण आणि अपुरी देखभाल या समस्या अधिक तीव्र झाल्या आहेत. रायगड व सिंहगड यांसारख्या लोकप्रिय किल्ल्यांवर वाढलेली गर्दी स्थानिक पर्यावरणासाठी धोकादायक ठरत असून, समुद्री किल्ल्यांवर किनारी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत आहे. याशिवाय, किल्ल्यांच्या वास्तुकलेला होणारे नुकसान आणि स्थानिक समुदायांच्या पारंपरिक जीवनशैलीत होणारा हस्तक्षेप हीदेखील महत्त्वाची चिंता आहे. या पार्श्वभूमीवर भविष्यात शाश्वत पर्यटन व्यवस्थापन अत्यावश्यक ठरते. स्थानिक समुदाय, राज्य व केंद्र सरकार, पुरातत्त्व विभाग, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि खाजगी क्षेत्र यांचा समन्वय साधूनच ही वारसा स्थळे जतन करता येतील. शास्त्रोक्त संवर्धन योजना, पर्यटक क्षमतेचे नियमन, पर्यावरणपूरक उपक्रम, समुदाय सहभाग, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि दीर्घकालीन धोरणात्मक नियोजन या बाबी पर्यटन विकासासाठी निर्णायक ठरतील.अखेर असे म्हणता येईल की, छत्रपती शिवाजी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

महाराजांचा वारसा हा केवळ भूतकाळातील गौरव नसून, तो आधुनिक काळात स्फूर्ती, आर्थिक विकास आणि सांस्कृतिक ओळखीचा प्रभावी स्रोत आहे. शाश्वत, समावेशक आणि पर्यावरणस्नेही पर्यटन धोरणांद्वारे शिवकालीन किल्ले पुढील पिढ्यांसाठी जतन केले गेले, तरच छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल. परिणामी महाराष्ट्राचा पर्यटन उद्योग जागतिक स्तरावर अधिक सक्षम बनेल, भारताच्या सांस्कृतिक वारशाला बळकटी मिळेल आणि स्वराज्याच्या मूल्यांना आधुनिक संदर्भात नवे आयाम प्राप्त होतील.

**संदर्भ ग्रंथ**


1. गो.स.सरदेसाई, *मराठ्यांचा इतिहास,* खंड १–३, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
2. Stewart Gordon the Marathas 1600–1818, Cambridge University Press, Cambridge.
3. अ.रा.कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र समाज, अर्थव्यवस्था आणि प्रशासन, पुणे.
4. महाराष्ट्र पर्यटन धोरण दस्तऐवज, पर्यटन विभाग, महाराष्ट्र राज्य शासन, मुंबई.
5. प्र.के.घाणेकर,किल्ले महाराष्ट्र
6. रामचंद्रपंत अमात्य, आज्ञापत्र
7. एस. आर पाटील - पर्यटन अभ्यास सिद्धांत आणि व्यवहार
8. डॉ. शरद पाटील – *पर्यटनशास्त्र सिद्धांत व व्यवहार*
9. Historicity Research Journal - (पर्यटनात ऐतिहासिक किल्ल्यांचे महत्त्व(, खंड 5, अंक 10, 2019.
10. UNESCO World Heritage Centre Maratha Military Landscapes of India UNESCO World Heritage Listing Report, 2024.

JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT ISSN: 2230-9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# नरनाळा किल्ला आणि पर्यटन व्यवसायाच्या संधी

**प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे**

इतिहास विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

**Manuscript ID:**
JRD -2026-180104
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(V)
Pp. 17-19
January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*नरनाळा किल्ला हा विदर्भातील अकोला जिल्ह्यातील एक प्राचीन, विशाल व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण किल्ला असून त्याचा इतिहास बहमनी, इमादशाही, मुघल, मराठा व ब्रिटिश कालखंडाशी निगडित आहे. किल्ल्याची भव्य तटबंदी, दरवाजे, बुरुज, तलाव व स्थापत्यवैशिष्ट्ये ही तत्कालीन स्थापत्यकलेची साक्ष देतात. इतका समृद्ध ऐतिहासिक व नैसर्गिक वारसा असूनही किल्ल्याचा पर्यटनदृष्ट्या अपेक्षित विकास झालेला नाही. आधुनिक काळात पर्यटन हे रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्थेचा विकास व सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनाचे प्रभावी माध्यम ठरले आहे. नरनाळा किल्ला ऐतिहासिक, सांस्कृतिक, साहसी, नैसर्गिक व इको-टुरिझमसाठी मोठ्या संधी उपलब्ध करून देतो. मेळघाट टायगर रिझर्व्हच्या सान्निध्यामुळे वन्यजीवन निरीक्षण, ट्रेकिंग, फोटोग्राफी व निसर्गभ्रमंती यांना चालना मिळू शकते. योग्य नियोजन, पायाभूत सुविधांचा विकास, स्थानिकांचा सहभाग, मार्गदर्शक प्रशिक्षण, निवास व भोजन व्यवस्था तसेच डिजिटल प्रचार केल्यास नरनाळा किल्ला पर्यटन व्यवसायाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनू शकतो. अशा शाश्वत पर्यटन विकासामुळे ऐतिहासिक वारशाचे जतन होऊन स्थानिक समाजाच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीस हातभार लागेल.*

***मुख्यशब्द :*** *नरनाळा किल्ला, ऐतिहासिक पर्यटन, सांस्कृतिक वारसा, पर्यटन व्यवसाय, विदर्भ पर्यटन, साहसी पर्यटन, इको-टुरिझम, स्थानिक रोजगार, शाश्वत पर्यटन, महाराष्ट्राचे किल्ले*

**प्रस्तावना:**

इतिहास, भूगोल आणि सांस्कृतिक वारसा यांचा संगम असलेले किल्ले हे महाराष्ट्राच्या वैभवाचे प्रतीक मानले जातात. सह्याद्री पर्वतरांगांपासून विदर्भाच्या पठारापर्यंत पसरलेल्या किल्ल्यांनी केवळ संरक्षणात्मक भूमिका बजावली नाही, तर त्यांनी सामाजिक, राजकीय व आर्थिक घडामोडींनाही दिशा दिली. विदर्भातील अकोला जिल्ह्यात स्थित नरनाळा किल्ला हा अशाच ऐतिहासिक व भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाच्या किल्ल्यांपैकी एक असून त्याचा इतिहास बहमनी, इमादशाही, मुघल व मराठा कालखंडाशी निगडित आहे. नरनाळा किल्ल्याची भव्य तटबंदी, दरवाजे, बुरुज, तलाव व स्थापत्य वैशिष्ट्ये ही तत्कालीन स्थापत्यकलेची साक्ष देतात. इतका समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभूनही नरनाळा किल्ल्याचा पर्यटनाच्या दृष्टीने अपेक्षित विकास झालेला दिसून येत नाही. आधुनिक काळात पर्यटन हे केवळ विरंगुळ्याचे साधन न राहता रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्थेचा विकास आणि सांस्कृतिक संवर्धनाचे प्रभावी माध्यम बनले आहे. आजच्या बदलत्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत ऐतिहासिक स्थळांचे पर्यटनाच्या माध्यमातून पुनरुज्जीवन करणे ही काळाची गरज ठरली आहे. नरनाळा किल्ल्यासारख्या ऐतिहासिक स्थळांमध्ये पर्यटन व्यवसायाच्या संधी विकसित केल्यास स्थानिक लोकांना रोजगार, लघुउद्योगांना चालना आणि सांस्कृतिक वारशाचे जतन साध्य होऊ शकते. विदर्भातील अकोला जिल्ह्यात अकोटच्या जवळ सातपुडा डोंगर रांगेत वसलेल्या नरनाळा किल्ल्याला महाराष्ट्रातील प्राचीन, विशाल आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण किल्ल्यांपैकी एक मानले जाते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे, इतिहास विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

**How to cite this article:**

*मरकाळे, . अनंत . दादाराव .* (2026). *नरनाळा किल्ला आणि पर्यटन व्यवसायाच्या संधी. Journal of Research & Development, 18(1(V)), 17–19.* https://doi.org/10.5281/zenodo.18477713

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18477713

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

सतपुडा पर्वतरांगेतील दऱ्या खोऱ्यांच्या हिरवाईने व नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या परिसरात असलेले किल्ल्याचे अवशेष आजही त्यांच्या भव्यतेची व समृद्ध वारशाची साक्ष देतात. या किल्ल्याचा शतकानुशतकांचा इतिहास प्राचीन, मध्ययुगीन राजसत्ता, सातवाहनकालीन वास्तुकला आणि मराठा–मुघल राजकारणाचा संगम ईथपर्यंत पोहोचलेला दिसतो. आजच्या पर्यटनावर आधारित अर्थव्यवस्थेत असा किल्ला म्हणजे ऐतिहासिक पर्यटन, नैसर्गिक पर्यटन, साहसी पर्यटन आणि सांस्कृतिक पर्यटनासाठी अत्यंत मोठी संधी आहे. नरनाळा किल्ल्याचा इतिहास अनेक राजवटींच्या उत्थान–पतनाचा साक्षीदार आहे. काही इतिहासकारांच्या मते या किल्ल्याची मूळ रचना गोंड राजांनी केली, तर काही संशोधक हे स्थान यदुवंशी राजांनी विकसित केले असे मानतात. किल्ल्याचा सर्वात प्राचीन लिखित उल्लेख १०व्या-११व्या शतकाच्या आसपास सापडतो. १४व्या–१५व्या शतकात विदर्भाचा मोठा भाग बहमनी सुलतानांच्या ताब्यात होता. या काळात किल्ल्याचा प्रचंड विस्तार करण्यात आला. पुढे बहमनी साम्राज्य फुटल्यानंतर इमादशाही आणि वऱ्हाड सुभ्याच्या राजकारणात नरनाळा महत्वाचे लष्करी केंद्र बनले. १६व्या शतकात वऱ्हाड प्रांतावर मुघल साम्राज्याने कब्जा केला आणि नरनाळा किल्ल्याचे महत्त्व अधिकच वाढले. मुघल सैन्याच्या दृष्टीने हा किल्ला राजनैतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा होता. १७व्या-१८व्या शतकात मराठा साम्राज्याचा विस्तार होत असताना नरनाळा किल्ला अनेक वेळा मराठ्यांनी जिंकला. पण काही काळ मुघल सैन्यानेही पुन्हा किल्ल्यावर कब्जा केला. या संघर्षामुळे किल्ला पुन्हा पुन्हा युद्धाचे केंद्र बनला. १८०३ मध्ये झालेल्या दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धानंतर नरनाळा ब्रिटिशांच्या ताब्यात गेला. पुढे किल्ल्याचे लष्करी महत्त्व कमी झाल्याने तो ब्रिटिश प्रशासनासाठी फक्त एक निरीक्षण केंद्र राहिला.

नरनाळा किल्ल्याची भौगोलिक रचना अत्यंत सुबक आणि संरक्षणात्मक दृष्टीने योग्य आहे. किल्ल्याच्या भिंती ३०–४० फूट उंचीच्या असून त्यात रक्षा मनोरे, तोफा ठेवण्यासाठी बांधलेले बुरूज आणि चौकशी दरवाजे आहेत. दगडी बांधकाम आजही मजबूत टिकून आहे. या किल्ल्याचे मुख्य आकर्षण हे या किल्ल्यातील काही प्रमुख दरवाजे दरवाजे आहेत. या दरवाजांवर कोरीव काम केलेले आहे. यामध्ये महाकाली दरवाजा हा खूप सुबक कलाकृती आहे. या दरवाज्यांवर कोरलेल्या शिलालेखांमुळे त्या त्या राजवटींची माहिती मिळते. किल्ल्यात प्राचीन राजवाडे, दालने, मशिदी, पाणवठे, घोड्यांचे तबेले, धान्यकोठारे, पाणी व्यवस्थेसाठी नाले, बालेकिल्ले असे अनेक अवशेष आजही अभ्यासकांना आकर्षित करतात. नैसर्गिक पाण्याचा स्रोत असलेले किल्ल्यातील तलाव किल्ल्याच्या जलव्यवस्थेचा एक उत्कृष्ट नमुना आहेत. आज नरनाळा किल्ला महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहे. काही ठिकाणी अवशेषांची जीर्ण अवस्था दिसते, नरनाळा किल्ला विविध प्रकारच्या पर्यटनासाठी उपयुक्त आहे. अलीकडच्या काळात पर्यटक, इतिहास अभ्यासक, साहसी गट आणि ट्रेकर्समध्ये किल्ल्याची लोकप्रियता वाढत आहे. किल्ल्याच्या आसपासचे जंगल मेळघाट टायगर रिझर्व्हचा भाग असल्यामुळे पर्यटकांना इतिहासाबरोबरच वन्यजीवन निरीक्षण आणि नैसर्गिक सौंदर्याचा आनंदही मिळतो. इतिहासातील अनेक राजवटी, युद्धे, प्रशासन आणि लष्करी कारभाराशी संबंधित असंख्य अवशेष येथे पाहायला मिळतात. ट्रेकिंग, निसर्गभ्रमंती, फोटोग्राफी हे साहसी पर्यटनासाठी उत्तम संधी आहे. मेळघाट टायगर रिझर्व्हमुळे पर्यटकांना वाघ, चित्ते, हरणे, अस्वल, विविध पक्षी अशी जैवविविधता पाहायला मिळते. किल्ल्यात आणि आसपासच्या परिसरात प्राचीन मंदिरे, शिलालेख, दरगाह आहेत. नरनाळा किल्ला या परिसरासाठी मोठा आर्थिक स्रोत बनू शकतो. स्थानिक युवक, इतिहासप्रेमी लोक प्रशिक्षण घेऊन मार्गदर्शक बनू शकतात. किल्ल्याची माहिती युद्धांचा इतिहास व वास्तूशिल्पाचे विश्लेषण वन्यजीवन ही सर्व माहिती देऊन मार्गदर्शकाचा व्यवसाय करून ते उत्पन्न मिळवू शकतात. सध्या किल्ला परिसरात राहण्यासाठी सुविधा कमी आहेत. स्थानिक लोकांनी होमस्टे, लॉजिंग, रिसॉर्ट सुरू केल्यास ग्रामीण पर्यटन वाढेल व रोजगार निर्मिती होईल. त्यातून स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होईल. विदर्भातील पारंपरिक खाद्यपदार्थ झुणका-भाकर, रोडगे व स्थानिक फळे वऱ्हाडी मेजवानी पर्यटकांमध्ये खूप लोकप्रिय ठरू शकतात. स्थानिक युवक ट्रेकिंग ग्रुप, नाईट कॅम्पिंग, सायकलिंग टूर्स यांसारखे उपक्रम चालवू शकतात. भारतात साहसी पर्यटनाची मागणी वाढत असल्याने ही मोठी संधी आहे.

या परिसरात सहज उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांपासून जसे सागवान लाकूड, बांबू व गवत यापासून हाताने बनवलेल्या वस्तू ग्राहकांसाठी खुप आकर्षक ठरू शकतात. यामधून स्थानिक महिलांसाठीही रोजगार निर्माण होऊ शकतो. या परिसरात पर्यटन, आतिथ्य, संस्कृती यावर आधारित प्रशिक्षण संस्था सुरू होऊ शकते. किल्ला आणि परिसर फिल्म शूटिंगसाठी आदर्श ठिकाण आहे. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होऊ शकतो. या किल्ल्याचा पर्यटन व्यवसायाच्या दृष्टिकोनातून विकास केल्यास रोजगार निर्मिती होईल. हॉटेल, ट्रान्सपोर्ट, गाईड, दुकाने यांना रोजगार मिळेल. कृषीउत्पादन व हस्तकला वस्तूंच्या मागणीत वाढ होईल. युवकांना गावातच रोजगार मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील विकास होईल. तसेच स्थानिक संस्कृतीचा प्रसार होईल. ग्रामीण लोकांचे रोजगारासाठी शहराकडे होणारे स्थलांतर थांबेल. त्याचबरोबर ऐतिहासिक वारसा जतन होईल. नवीन पिढीला इतिहासाची माहिती होईल. यामधून पारंपरिक उत्सवांना प्रोत्साहन मिळेल. नरनाळा किल्ला पर्यटनदृष्ट्या समृद्ध क्षेत्रे असूनही काही अडथळे अद्याप आहेत. किल्ल्यावर जाण्यासाठी रस्ते आणि वाहतूक व्यवस्था नाही. किल्ल्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्यांची गुणवत्ता सुधारल्यास पर्यटकांची संख्या

वाढेल. स्वच्छता आणि मूलभूत सुविधा पिण्याचे स्वच्छ पाणी, शौचालये बसण्याची व्यवस्था माहिती फलक ह्या सुविधा आवश्यक आहेत. पर्यटकांना इतिहासाची अचूक माहिती देण्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक आवश्यक आहेत. सर्वात महत्त्वाचे सोशल मीडिया, वेबसाइट्स, ट्रॅव्हल व्लॉग, पर्यटन प्रदर्शनांद्वारे किल्ल्याचा प्रचार करणे आवश्यक आहे. नरनाळा किल्ला हा महाराष्ट्राचा एक अद्वितीय ऐतिहासिक आणि सांस्कृतिक खजिना आहे. शतकानुशतकांचा इतिहास, भव्य तटबंदी, पराक्रमी राजवटींचे अवशेष आणि आजूबाजूचे नैसर्गिक वातावरण यामुळे हा किल्ला पर्यटनाचे उत्कृष्ट केंद्र बनू शकतो. योग्य नियोजन, सरकारी मदत, स्थानिकांचा सहभाग आणि पायाभूत सुविधा विकसित झाल्यास नरनाळा किल्ला पर्यटन व्यवसायाचे एक मोठे केंद्र होऊ शकतो. पर्यटनाचा विकास झाल्यास स्थानिकांना रोजगार, आर्थिक वाढ आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो. इतिहास, निसर्ग आणि व्यवसाय या तिन्हींचा सुंदर संगम म्हणजे नरनाळा किल्ला आणि त्यातील पर्यटन संधी ज्याचा लाभ पुढील पिढ्यांनाही होऊ शकतो.

**निष्कर्ष:**

नरनाळा किल्ला हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून विदर्भातील पर्यटन विकासासाठी एक महत्त्वपूर्ण केंद्र ठरू शकतो. किल्ल्याची भौगोलिक रचना, ऐतिहासिक पार्श्वभूमी, स्थापत्यवैशिष्ट्ये आणि नैसर्गिक सौंदर्य या सर्व घटकांमुळे सांस्कृतिक, ऐतिहासिक व साहसी पर्यटनाच्या दृष्टीने येथे मोठ्या संधी उपलब्ध आहेत. योग्य नियोजन, संवर्धन व प्रचार केल्यास नरनाळा किल्ला पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देऊ शकतो. पर्यटन पायाभूत सुविधांचा विकास, मार्गदर्शक सेवा, निवास व भोजन व्यवस्था, स्थानिक हस्तकला व लोककला यांना प्रोत्साहन दिल्यास रोजगारनिर्मितीच्या संधी वाढतील. तसेच शैक्षणिक सहली, संशोधन अभ्यास, वारसा पर्यटन आणि इको-टुरिझम यांद्वारे किल्ल्याचे महत्त्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अधोरेखित करता येईल. डिजिटल माध्यमांचा वापर करून माहितीप्रसार व ब्रँडिंग केल्यास पर्यटकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढू शकते. अशा प्रकारे नरनाळा किल्ल्याचा शाश्वत पर्यटन विकास केवळ ऐतिहासिक वारशाचे जतन करणार नाही, तर स्थानिक समाजाच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसही हातभार लावेल. म्हणूनच नरनाळा किल्ला आणि पर्यटन व्यवसायाच्या संधी यांचा समन्वय साधून दीर्घकालीन, नियोजित व शाश्वत पर्यटन धोरण राबविणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची :**

1. कुलकर्णी, आर. के., भारतीय इतिहासाचा अभ्यास, पुणे, २०१५.
2. घोष, बी. एन., Tourism and Heritage in India, Delhi, 2012.
3. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, वारसा स्थळे माहिती पुस्तिका, २०२०.
4. UNESCO, World Heritage Sites in India, 2019.
5. देशमुख, स. ग., पर्यटन आणि संस्कृती, औरंगाबाद, २०१८.
6. शर्मा, आर. एस., Ancient India, New Delhi, 2008.
7. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पर्यटन अहवाल, २०२१

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# आधुनिक युगात विकसित झालेला प्रवास आणि पर्यटनांचा ऐतिहासिक अभ्यास

**प्रितम धोर्डिबा टिळक[1], डॉ. लक्ष्मीकांत एम. जिरेवाड[2]**
[1]संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
[2]मार्गदर्शक, श्री. शिवाजी कॉलेज परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180105
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 20-22
January 2026
**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*आधुनिक युगात विज्ञान, तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्रांतीमुळे प्रवास व पर्यटन क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन झाले आहे. पूर्वी मर्यादित स्वरूपात असलेले पर्यटन आज एक जागतिक उद्योग बनले असून रेल्वे, विमानसेवा, रस्ते वाहतूक आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे सर्वसामान्यांसाठी प्रवास सुलभ झाला आहे. ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक व निसर्गरम्य स्थळांना भेट देण्याची मानवी जिज्ञासा पर्यटनाच्या विकासाला चालना देणारी ठरली आहे. भारतासारख्या समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभलेल्या देशात किल्ले, मंदिरे, लेण्या, संग्रहालये आणि ऐतिहासिक वास्तू पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनले आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणामुळे पर्यटन उद्योगाचा वेगाने विस्तार झाला. आधुनिक काळात पर्यटन हे केवळ करमणुकीपुरते मर्यादित न राहता रोजगारनिर्मिती, आर्थिक विकास, सांस्कृतिक देवाण-घेवाण आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनले आहे. डिजिटल माध्यमे, ऑनलाइन बुकिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती तंत्रज्ञानामुळे पर्यटन अधिक सुलभ, सुरक्षित व नियोजित झाले आहे. शाश्वत पर्यटनाची संकल्पना स्वीकारल्यास पर्यावरण संरक्षणासोबतच सांस्कृतिक वारशाचे जतन साध्य होऊ शकते. अशा प्रकारे आधुनिक युगातील प्रवास व पर्यटनाचा ऐतिहासिक अभ्यास समाज, अर्थव्यवस्था आणि जागतिक संस्कृती यांना जोडणारा महत्त्वपूर्ण दुवा स्पष्ट करतो.*

***मुख्यशब्द :*** *आधुनिक पर्यटन, प्रवासाचा इतिहास, पर्यटन उद्योग, ऐतिहासिक पर्यटन, सांस्कृतिक वारसा, औद्योगिक क्रांती, डिजिटल पर्यटन, शाश्वत पर्यटन, जागतिकीकरण, भारतातील पर्यटन*

**प्रस्तावना:**

आधुनिक काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे पर्यटन हे केवळ चैनीचे साधन न राहता एक जागतिक उद्योग बनले आहे. आठव्या शतकात पर्यटन या शब्दाचा उगम झाला, असला तरी औद्योगिक क्रांतीनुसार रेल्वे आणि स्टीम शिफ्टच्या शोधामुळे ते खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांसाठी सुलभ झाले. आधुनिक युगात विकसित झालेल्या प्रवास आणि पर्यटनांचा अभ्यास ज्यामध्ये औद्योगिक क्रांतीनंतर वाहतुकीच्या साधनांमुळे रेल्वे, विमान आणि सुट्ट्यांच्या सोयीमुळे सर्वसामान्यांसाठी प्रवास सुलभ झाला. ज्यामुळे जगभरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि निसर्गरम्य स्थळांना भेट देणे शक्य झाले आहे. जसे कि भारतातील आगाखान पॅलेस, वेरूळ, अजिंठा किंवा युरोपमधील समुद्रकिनारी ज्यामुळे पर्यटन हा एक मोठा उद्योग बनला आहे. व्यक्तीला आपल्या पूर्वजांच्या ऐतिहासिक बाबींविषयी घटना घडामोडींची माहिती याविषयी आवड असते. यातूनच पर्यटनाला चालना मिळते. किल्ले, लेण्या, मंदिरे, मुर्त्या, राजवाडे, वास्तु संग्रहालय इतर ऐतिहासिक वास्तूंना भेटी दिल्या जातात.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18477645
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
प्रितम धोर्डिबा टिळक, संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर

**How to cite this article:**
*टिळक, . प्रितम . धोर्डिबा ., & जिरेवाड, . लक्ष्मीकांत . एम. (2026). आधुनिक युगात विकसित झालेला प्रवास आणि पर्यटनांचा ऐतिहासिक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 20–22.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18477645*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

भारत हा ऐतिहासिक वारसाच्या दृष्टिकोनातून समृद्ध असा देश आहे प्राचीन काळापासून आधुनिक युगापर्यंत विविध राजेशाहीच्या कालखंडात विविध इमारती राजवाडे, किल्ले, मंदिरे, लेण्या भारतामध्ये आजही जतन करून आढळलेले दिसते. म्हणूनच लाखो पर्यटक देश विदेशातून भारतात पर्यटन करतात. पर्यटनावर आधारित रस्ते, वाहतूक, दळणवळण मनोरंजनाची साधने, निवासस्थाने पर्यटनाच्या वाढीस मदत करतात व हा पर्यटन व्यवसाय भरभराटीस येत आहे. विसाव्या शतकाच्या शेवटी खाजगीकरण, उदरीकरण, जागतिकीकरण यामुळे समाज जीवनाला संपूर्ण बाबींमध्ये बदल झालेले आहेत, म्हणूनच तर एकविसावे शतक हे पर्यटनांचे शतक म्हणून ओळखले जाते. बदलत्या परिस्थितीमध्ये पर्यटन आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर सुद्धा महत्त्वाचे मानले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात व्यक्तीच्या विकासासाठी सामाजिक जीवनाला गतिशील बनविण्यासाठी व राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पर्यटन या क्षेत्राची आवश्यकता भासल्याशिवाय राहत नाही. आधुनिक काळामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय वातावरणामुळे ही पर्यटनाचे महत्त्व अलीकडील काळात वाढत आहे.

**पर्यटनाची व्याख्या:**

- "पर्यटक या शब्दाला इंग्रजी मध्ये Tourist म्हटले जाते. ज्याचा लॅटीन भाषेमध्ये Tourns असे म्हटले जाते. पर्यटनाला इंग्रजीमध्ये Tourism असे म्हटले जाते. Tourism हा शब्द लॅटिन भाषेतील Tourns या शब्दापासून तयार झाला आहे. तर याचा अर्थ Journey प्रवास असा होतो."[1]
- टूर्मर यांच्या मते, परदेशी माणसाच्या एखाद्या देशात, प्रदेशात व शहरात आगमन वास्तव्य भ्रमंती आणि तेथून जाणे म्हणजे पर्यटन होय.
- आयसेट नुसार, लोकांनी आपल्या घराबाहेर आपल्या इच्छेनुसार केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.

**पर्यटनांच्या विकासाची टप्पे:**

**प्रारंभिक काळ:**

युरोपमधील ग्रँड टूर यासारख्या प्रवासामधून आधुनिक पर्यटनाची पाळेमुळे सापडतात. "सिंधू संस्कृतीच्या काळापासून भारतीय व्यापारी मेसोपोटेमिया सारख्या दूरच्या संस्कृतीशी व्यापारासाठी प्रवास करत असत".[2] प्राचीन काळामध्ये भारतातून किंवा भारतामध्ये व्यापारासाठी किंवा संस्कृती अभ्यासासाठी पर्यटनाचे महत्त्व आहे. " थॉमस कुक यांना आधुनिक व संघटित पर्यटनाचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांनी 1850 दशकात पहिल्यांदा दुर आयोजित केल्या"[3]

**आधुनिक युग:**

विसाव्या शतकात विमान वाहतुकीच्या विकासामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रचंड वाढले. पर्यटन हे आज प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे आधुनिक अंग झालेले असल्याने आणि संस्कृतीचा भाग आहे. जंगल, समुद्र, आकाश कुठेही पर्यटन करता येते. हजारो ट्रॅव्हल्स कंपन्या त्यांचे प्रचंड मार्केटिंग, आधुनिक सोयी सुविधांच्या वर्तमानपत्रातल्या जाहिराती, लाखो रुपयांचे पॅकेजेस आणि तणावरहित प्रवासामुळे आज प्रवासात एक प्रकारची निश्चिंतता आलेली आहे. "आधुनिक पर्यटन आता केवळ करमणूक नसून ते लोकांना त्यांच्या जागेच्या आणि वेळेच्या संदर्भात स्वतःला समजून घेण्यास मदत करते. याचे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिणाम होतात."[4]

**पर्यटनाचे विविध प्रकार:**

- **ऐतिहासिक पर्यटन:**

  जुन्या वारसा स्थळांना आणि किल्ल्यांना भेट देणे.
- **परिपर्यटन:**

  निसर्ग संवर्धन आणि स्थानिक संस्कृतीचा आदर राखून केलेले प्रवास.
- **आरोग्य आणि वैद्यकीय पर्यटन:**

  उपचारासाठी केलेला प्रवास.
- **कृषी पर्यटन:**

  "शहरी लोकांना ग्रामीण जीवनाची ओळख करून देणे तसेच सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय दृष्ट्या मानवी जीवनाशी अत्यंत संकीर्णपणे जोडलेला दुवा आहे."[5]

- **तंत्रज्ञानाचा प्रभाव:**

  डिजिटल युगामुळे पर्यटनात क्रांती घडवून आलेली आहे.
- **ऑनलाइन बुकिंग:**

  एआरबीएनबी.बुकिंग डॉट कॉम सारख्या प्लॅटफॉर्ममुळे राहणे आणि प्रवासाचे नियोजन सोपे आणि सहज झालेले आहे.
- **माहिती तंत्रज्ञान:**

  मोबाईल ॲप्स रियल टाईम माहिती आणि सोशल मीडियामुळे पर्यटकांना नवीन ठिकाणांची माहिती त्वरित मिळते.
- **ए आय आणि डेटा:**

  वैयक्तिक आवडीनुसार सहलीचे नियोजन करणे आता यामुळे शक्य झाले आहे.

**आर्थिक आणि सामाजिक महत्त्व:**

- **रोजगार:**

  पर्यटन हा जगातील सर्वात मोठा उद्योग असून तो कोट्यावधी लोकांना रोजगार देतो.
- **सांस्कृतिक देवाण-घेवाण:**

  पर्यटनामुळे विविध देशातील लोकांमध्ये संवाद वाढून गैरसमज दूर होण्यास मदत होते.
- **शाश्वतता:**

  सध्याच्या काळात पर्यावरणावर होणारे विपरीत परिणाम टाळून शाश्वत पर्यटन करण्यावर भर दिला जातो.

**निष्कर्ष:**

- आधुनिक पर्यटन हे केवळ फिरण्या पुरते मर्यादित नसून ते अर्थव्यवस्था तंत्रज्ञान आणि जागतिक संस्कृतीला जोडणारा एक महत्त्वाचा दुवा आहे.
- भविष्यात डिजिटलायजेशन आणि शाश्वत सराव या उद्योगाला नवी दिशा देतील.
- पायाभूत सुविधांचा विकास पर्यटनामुळे विकसित होईल.
- सांस्कृतिक वारसा आणि परंपराचे जतन केल्यास पर्यटनाला वाव मिळेल.
- पर्यटन लोकांना जगभरातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांना भेट देण्याची संधी देतो.

**संदर्भ:**

1. कटीमनी एस.आर,(2023), ऐतिहासिक पर्यटन, सिद्धार्थ प्रकाशन, कोल्हापूर.
2. गट्टी जी.व्ही, Historicty Research Journal -, समृद्ध कलेचा प्राचीन वारसा, Vol- ४,२०१६.
3. रणजीत ,2016, Introduction and Historical Development of Tourism.
4. Department of History- UW-Madison.
5. मगर जयकुमार, 2023, पर्यटन मराठी विश्वकोश.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# मराठवाड्यातील ऐतिहासिक स्थळे आणि पर्यटनातील समस्या

**डॉ. डी.एन.रिठे**
इतिहास विभाग र.भ,अट्टल महाविद्यालय गेवराई जि.बीड

**Manuscript ID**:
JRD -2026-180106
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(V)
Pp. 23-25
January 2026

**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*मराठवाडा हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक व वारसागतदृष्ट्या समृद्ध असा प्रदेश असून सातवाहनांपासून मराठ्यांपर्यंत विविध राजवटींचा ठसा येथे आढळतो. अजंठा–वेरूळ लेणी, देवगिरी किल्ला, बीबी का मकबरा तसेच अनेक धार्मिक व सांस्कृतिक स्थळांमुळे मराठवाड्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटनाची मोठी क्षमता आहे. आधुनिक काळात पर्यटन हे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचे प्रभावी माध्यम बनले असले, तरी मराठवाड्यातील पर्यटन विकास अपेक्षित गतीने झालेला नाही. अपुरी वाहतूक व दळणवळण व्यवस्था, मूलभूत सुविधांचा अभाव, ऐतिहासिक स्थळांचे अपुरे संवर्धन, प्रशिक्षित मार्गदर्शकांची कमतरता, मर्यादित प्रचार-प्रसार आणि डिजिटल माध्यमांचा कमी वापर या प्रमुख समस्या पर्यटन विकासात अडथळा ठरतात. तसेच स्थानिक लोकांचा सहभाग, कौशल्यविकास व रोजगारनिर्मितीच्या संधी पुरेशा प्रमाणात विकसित झालेल्या नाहीत. योग्य नियोजन, शास्त्रीय संवर्धन, प्रभावी प्रचार, पायाभूत सुविधांचा विकास आणि स्थानिक लोकसहभाग यांच्या माध्यमातून मराठवाड्यात शाश्वत पर्यटन विकास साध्य होऊ शकतो. त्यामुळे मराठवाड्यातील ऐतिहासिक स्थळे ही केवळ भूतकाळाची साक्ष नसून भविष्यातील पर्यटन व आर्थिक विकासाची मोठी संधी आहेत.*

***मुख्यशब्द:*** *मराठवाडा, ऐतिहासिक स्थळे, पर्यटन विकास, पर्यटनातील समस्या, सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक पर्यटन, पायाभूत सुविधा, शाश्वत पर्यटन*

## प्रस्तावना:

मराठवाडा हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक व वारसागतदृष्ट्या अत्यंत समृद्ध असा प्रदेश आहे. मराठवाडा प्रदेशाला प्राचीन काळापासून सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, बहमनी, निजाम, मुघल व मराठा सत्तांचा समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. या विविध राजवटींच्या कालखंडात उभारण्यात आलेली लेणी, किल्ले, मंदिरे, मशीदी, दर्गे व स्मारके आजही त्या इतिहासाची जिवंत साक्ष देतात. अजंठा–वेरूळसारखी जागतिक वारसा स्थळे मराठवाड्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख देतात. आधुनिक काळात पर्यटन हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचे प्रभावी माध्यम बनले आहे. ऐतिहासिक पर्यटनामुळे स्थानिक रोजगार निर्मिती, लघुउद्योगांना चालना, तसेच सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन होते. मात्र, मराठवाड्यात पर्यटनाची प्रचंड क्षमता असूनही ती अपेक्षित प्रमाणात विकसित झालेली दिसून येत नाही. त्यामुळे मराठवाड्यातील ऐतिहासिक स्थळे आणि पर्यटन विकास यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

## संशोधनाची उद्दिष्टे

- मराठवाड्यातील प्रमुख ऐतिहासिक स्थळांची माहिती संकलित करणे.
- या स्थळांचा पर्यटन विकासातील वाटा अभ्यासणे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
डॉ. डी.एन.रिठे, इतिहास विभाग र.भ अट्टल महाविद्यालय,गेवराई जि.बीड

**How to cite this article:**
*रिठे, . डी . एन. (2026). मराठवाड्यातील ऐतिहासिक स्थळे आणि पर्यटनातील समस्या. Journal of Research & Development, 18(1(V)), 23–25.* https://doi.org/10.5281/zenodo.18477757

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18477757

- पर्यटन विकासातील अडचणी व समस्या ओळखणे.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. संशोधन लेख, शासकीय अहवाल, पर्यटन विभागाची माहिती व संकेतस्थळे यांचा आधार घेतला आहे.

**मराठवाड्यातील प्रमुख ऐतिहासिक स्थळे**

**अजंठा लेणी:** अजंठा लेणी ही बौद्ध धर्माशी संबंधित जागतिक वारसा स्थळ असून इ.स.पू. 2रे शतक ते इ.स. सहावे शतक या कालखंडातील आहेत. भित्तीचित्रे व शिल्पकलेसाठी अजंठा जगप्रसिद्ध आहे.

**वेरूळ लेणी:** वेरूळ लेणी ही बौद्ध, हिंदू व जैन धर्मीय लेण्यांचा अव्दितीय संगम आहे. कैलास मंदिर हे एकाच खडकातून कोरलेले जगातील अव्दितीय स्थापत्यकलेचे उदाहरण आहे.

**देवगिरी किल्ला:** देवगिरी किल्ला हा भारतातील अभेद्य किल्ल्यांपैकी एक मानला जातो. त्याची संरक्षण व्यवस्था, स्थापत्य व ऐतिहासिक महत्त्व पर्यटकांना आकर्षित करते.

**बीबी का मकबरा:** औरंगजेबाची पत्नी दिलरस बानू बेगम हिच्या स्मरणार्थ बांधलेले हे स्मारक 'दख्खनचा ताजमहल' म्हणून ओळखले जाते.

**धार्मिक व सांस्कृतिक स्थळे**

घृष्णेश्वर, परळी वैजनाथ, औंढा नागनाथ, नांदेड येथील हजूर साहेब, तसेच अनेक दर्गे व मंदिरांमुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळते.

**मराठवाड्यातील पर्यटनाचे महत्त्व**

मराठवाड्यातील ऐतिहासिक पर्यटनाचे महत्त्व बहुआयामी स्वरूपाचे आहे. पर्यटनाच्या माध्यमातून केवळ आर्थिक लाभ होत नाही तर सामाजिक व सांस्कृतिक विकासालाही चालना मिळते. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते हॉटेल व्यवसाय, वाहतूक, हस्तकला, मार्गदर्शक सेवा यांसारख्या क्षेत्रांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. ग्रामीण व मागास भागांचा विकास होतो अनेक ऐतिहासिक स्थळे ग्रामीण भागात असल्याने त्या भागांचा सर्वांगीण विकास साधला जातो. सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन होते पर्यटनामुळे लोकांमध्ये इतिहासाबद्दल जागरूकता निर्माण होते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठवाड्याची ओळख निर्माण होते. तसेच सांस्कृतिक आदान–प्रदानास चालना मिळते. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर प्रदेशाची ओळख निर्माण होते.

**पर्यटन विकासातील समस्या**

मराठवाड्यात पर्यटन विकासास अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अपुरी वाहतूक व दळणवळण व्यवस्थेमुळे काही ऐतिहासिक स्थळांपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य रस्ते व सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नाही. पर्यटन विकासासाठी रस्ते, वाहतूक, स्वच्छता आणि निवास व्यवस्था अत्यंत महत्त्वाची असते. मराठवाड्यातील अनेक पर्यटनस्थळांकडे जाणारे रस्ते खड्ड्यांनी भरलेले किंवा अरुंद आहेत. सार्वजनिक वाहतूक थेट उपलब्ध नसल्याने अनेक पर्यटक प्रवास टाळतात. काही ठिकाणी परवडणाऱ्या आणि स्वच्छ निवास सुविधांचा अभाव जाणवतो, तर स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सोयीही अपुऱ्या असतात. पर्यटकांसाठी मूलभूत सोयींचा अभाव दिसून येतो जसे स्वच्छतागृहे, निवास व्यवस्था, माहिती केंद्रे यांची कमतरता आहे. त्याच प्रमाणे ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धनाकडे दुर्लक्षहोत असल्याचे दिसून येते अनेक स्थळे जीर्ण अवस्थेत असून तेथे शास्त्रीय संवर्धनाचा अभाव दिसतो. प्रशिक्षित मार्गदर्शकांची कमतरताही जाणवते. तसेच मराठवाड्यातील अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांची माहिती पर्यटकांपर्यंत पोहोचतच नाही. डिजिटल माध्यमांचा वापर मर्यादित आहे. सोशल मीडिया मोहीम, विश्वासार्ह वेबसाइट्स आणि ऑनलाइन बुकिंग सुविधा कमी प्रमाणात आढळतात. त्यामुळे या प्रदेशाची ओळख देश-विदेशात प्रभावीपणे निर्माण होत नाही. काही ठिकाणी कचरा व्यवस्थापन अपुरे असल्याने परिसर अस्वच्छ दिसतो. अनियंत्रित बांधकामे, अतिक्रमण आणि निष्काळजी पर्यटनामुळे वारसा स्थळांची हानी होते. पाण्याच्या टंचाईमुळे उन्हाळ्यात पर्यटनावर परिणाम होतो. स्मारकांच्या संरक्षणासाठी आवश्यक निधी आणि तांत्रिक देखभाल नियमितपणे होत नाही. पर्यटनातून रोजगार आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते, मात्र याबाबत स्थानिकांना पुरेशी माहिती दिली जात नाही. कौशल्यविकास, होम-स्टे, हस्तकला विक्री अशा उपक्रमांमध्ये सहभाग वाढवणे आवश्यक आहे. पर्यटन विकासात ग्रामीण समुदायांचा आवाज आणि सहभाग वाढल्यास टिकाऊ विकास साधता येईल.

**निष्कर्ष**

एकूणच मराठवाड्यात पर्यटनाची अपार क्षमता असताना तिचा पुरेपूर उपयोग झालेला नाही.मराठवाड्यातील ऐतिहासिक स्थळे ही केवळ भूतकाळाची साक्ष नसून वर्तमान व भविष्यकाळातील पर्यटन विकासाची मोठी संधी आहेत. योग्य नियोजन, प्रभावी प्रचार, शास्त्रीय संवर्धन व स्थानिक लोकसहभाग यांच्या माध्यमातून मराठवाडा हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर ठळकपणे

उभा राहू शकतो. शासन, स्थानिक प्रशासन, अभ्यासक व समाज यांचा समन्वय साधल्यास शाश्वत पर्यटन विकास साध्य होऊ शकतो. त्यामुळे मराठवाड्यातील ऐतिहासिक स्थळे आणि पर्यटन यांचा अभ्यास हा काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची**


1. रमेशचंद्र, भारत के ऐतिहासिक एवं पर्यटन स्थल, निळकंठ प्रकाशन, २००६.
2. दूबे अभयकुमार (संपा) भारत का भूमंडलीकरण, वाणी प्रकाशन, नवी दिल्ली, २००३.
3. यात्रा व पर्यटन प्रतिस्पर्धा सुचकांक २०१७.
4. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ : माहिती पुस्तिका.
5. विविध संशोधन जर्नल्स व लेख.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# खुलदाबाद : पर्यटनाच्या दृष्टीने ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व

**प्रा.डॉ.मुजीब मुसा सय्यद**
इतिहास विभाग प्रमुख कला महाविद्यालय बिडकिन ता. पैठण
**Email:** smujeeb.syed@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180107
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 26-29
January 2026
**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*मानव स्वभावतः जिज्ञासू आहे. नवीन प्रदेश, विविध संस्कृती, निसर्गसौंदर्य, ऐतिहासिक वारसा आणि सामाजिक जीवनशैली जाणून घेण्याची इच्छा मानवाला प्रवासाकडे आकर्षित करते. या प्रवासातून निर्माण होणाऱ्या क्रियाकलापांना पर्यटन असे म्हणतात. आधुनिक काळात पर्यटन केवळ मनोरंजनाचे साधन न राहता, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाचे प्रभावी माध्यम बनले आहे. खुलदाबाद (ता. खुलदाबाद, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)) हे महाराष्ट्रातील एक प्राचीन व ऐतिहासिक नगर असून ते धार्मिक, सांस्कृतिक व स्थापत्य वारशासाठी ओळखले जाते. "दक्षिणेचे बनारस" व "संतांची दरी (Valley of Saints)" म्हणून प्रसिद्ध असलेले खुलदाबाद सूफी परंपरा, मुघलकालीन इतिहास व धार्मिक सहिष्णुतेचे प्रतीक आहे. प्रस्तुत शोध निबंधात खुलदाबादच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करून त्याचे पर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. ऐतिहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक याचे विश्लेषण करण्यात आले आहे. या अभ्यासातून असे दिसून येते की योग्य संवर्धन व नियोजन केल्यास खुलदाबाद हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ऐतिहासिक-धार्मिक पर्यटन केंद्र होऊ शकते.*

***कीवर्डस्:*** *खुलदाबाद, ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, सूफी परंपरा, सांस्कृतिक वारसा.*

**प्रस्तावना:**

पर्यटन हे आज जागतिक अर्थव्यवस्थेचे एक प्रभावी साधन बनले आहे. ऐतिहासिक पर्यटनाच्या माध्यमातून एखाद्या प्रदेशाचा इतिहास, संस्कृती व सामाजिक परंपरा जगासमोर मांडल्या जातात. भारतात ऐतिहासिक पर्यटनाला मोठे महत्त्व असून महाराष्ट्र राज्यात अनेक प्राचीन स्थळे आहेत. त्यापैकी खुलदाबाद हे नगर मध्ययुगीन इतिहास, सूफी संतांची परंपरा व मुघल वारसा यांमुळे विशेष महत्त्व प्राप्त करते. पर्यटन म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या नेहमीच्या वास्तवस्थानापासून मनोरंजन, शिक्षण, धार्मिक, व्यावसायिक किंवा आरोग्याच्या कारणांसाठी केलेला तात्पुरता प्रवास. जागतिक पर्यटन संघटनेनुसार (UNWTO), "पर्यटन म्हणजे व्यक्तीने एका वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी केलेला स्वेच्छेचा प्रवास." भूतकाळाशी संबंधित किल्ले, स्मारके, प्राचीन नगरे, लेणी, राजवाडे इत्यादी स्थळांना भेट देणे म्हणजे ऐतिहासिक पर्यटन. उदा. अजिंठा-एलोरा, ताजमहाल, हम्पी.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- खुलदाबादच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
- खुलदाबादमधील प्रमुख पर्यटनस्थळांचे विश्लेषण करणे.
- पर्यटनाच्या दृष्टीने खुलदाबादचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करणे.
- पर्यटन विकासाच्या शक्यता व अडचणी अभ्यासणे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18477820

**Address for correspondence:**
प्रा.डॉ.मुजीब मुसा सय्यद, इतिहास विभाग प्रमुख कला महाविद्यालय बिडकिन ता. पैठण

**How to cite this article:**
*सय्यद, . मुजीब . मुसा. (2026). खुलदाबाद : पर्यटनाच्या दृष्टीने ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व. Journal of Research & Development, 18(1(V)), 26–29. https://doi.org/10.5281/zenodo.18477820*

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**खुलदाबादचा ऐतिहासिक आढावा:**

खुलदाबादचे प्राचीन नाव रौजा असे होते. तेराव्या-चौदाव्या शतकात सूफी संत हजरत झर झरी झर बख्श (रहे.) (शेख बुर्हानुद्दीन घरीब) यांच्या वास्तव्यामुळे हे ठिकाण इस्लामी अध्यात्माचे केंद्र बनले. दिल्ली सल्तनत व मुघल काळात खुलदाबादचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व अधिक वाढले. मुघल सम्राट औरंगजेब यांनी आयुष्याचा शेवटचा काळ येथे व्यतीत केला. त्यांच्या इच्छेनुसार अत्यंत साध्या स्वरूपात त्यांची कबर येथेच बांधण्यात आली. ही कबर मुघल इतिहासातील वैचारिक साधेपणाचे प्रतीक मानली जाते.

**खुलदाबादची नगररचना:**

देवगिरी-दौलताबादच्या उत्तरी पठारावर बसलेले हे एक सुंदर नगर आहे. या नगराला चोहोबाजूनी भक्कम तटबंदी आहे. या तटबंदीची लांबी चार हजार सहाशे वीस फूट आहे. ही तटबंदी आणि प्रवेशद्वार आजही ९५ टक्के सुरक्षित आहे. आजाद बिलग्रामी आपल्या **'रौजतुल औलिया'** या ग्रंथात या तटबंदीविषयी सविस्तर माहिती देतात. बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शहजादा शाह आलम बहादूरशहा याने तटबंदी बांधली असा उल्लेख येतो. त्यांच्या वसियतीनुसार त्यास या शहरात हजरत स. जैनोद्दीनच्या समाधीजवळ दफन करण्यात आले.

**खुलदाबादमधील प्रमुख पर्यटनस्थळे:**

**तलाव :**

खुल्दाबादच्या परिसरात अनेक तलाव बांधल गेले आहेत. आजही ते प्राचीन व मध्ययुगीन काळाची साक्ष देतात. या तलावांचे बांधकाम मुस्लिम धर्मीय येण्यापूर्वीच झालेले आहे असे तीन तलाव आहेत.

१) सूर्य कुंड ,२) परियोंका तालाब ३) भद्रा तलाव.

वरील तिनही तलाव दगडांनी पक्के बांधलेले आहेत. त्या शिवाय- सूर्यकुंड, आम तलाव, जामून तलाव,कोरा तलाव, खाकसार तलाव, परियोंका तलाव, हौज-ए-खास (तटबंदीच्या आत), धर्म तलाव, पांगरा तलाव आणि भद्र तलाव ची अवशेष दिसून येतात.

**उद्यानः**

खुल्दाबाद नगरात अतिशय सुंदर उद्यान होते. त्याचे अवशेष आजही पाहावयास मिळतात. प्रवेशद्वाराला लागून लालबाग होती. तसेच बनीबेगम उद्यान अद्यापही चांगल्या अवस्थेत आहे. मुनीम बाग अतिशय सुंदर होती. या उद्यानात छोटे-छोटे सुंदर जलाशय होते. या उद्यानाला पाण्याची व्यवस्था खाकसारच्या तलावातून भूमीअंतर्गत खापरी पाईपलाईनच्या मार्फत केलेली होती. या जलाशयातून खापराच्या पाईपने सर्व शहराला पाणीपुरवठा केला जात असे.

**गृह शिल्प:**

खुल्दाबादेत ठिकठिकाणी हिंदुस्थानी, अरब, पर्शियन, तुर्की, गृह शिल्पांचे दर्शन घडते, दर्गाचे घुमट, मशिदी, धर्मशाळा, सराय १४व्या शतकाच्या प्रारंभीची वास्तुशिल्पे होती. त्यांचे अवशेष आपण आजही पाहू शकतो हे एक ऐतिहासिक सत्य आहे की इ.स. १३२७ मध्ये मुहम्मद बीन तुघलकाने जेव्हा देवगिरीला आपल्या राजधानीची जागा दिली तेव्हा त्याने सर्वांना दिल्ली सोडून देवगिरी दौलताबाद येथे स्थायिक होण्याचा आदेश दिला. यानुसार सर्वच स्तरांतील लोक देवगिरीस येऊन स्थायिक झाले. यात सर्व व्यवसाय करणारे कारागीर, सूफी संत, फकीर तसेच चित्रकार, शिल्पकार सुद्धा होते. याच लोकांनी दौलताबादच्या वैभवात भर टाकली. स्थानिक राजकारागिरांना अरबी-पर्शियन कला अवगत नव्हती. उत्तरेतील कारागिरांनी महल, दर्गा, घुमट, मशिद, सराय, उद्यान, हौद बांधले. या बांधकामात मात्र कारागीर स्थानिक असल्याने स्थानिक हिंदू शैलीची छाप स्पष्टपणे निदर्शनास येते.

**सराये आलमगीर :**

खुल्दाबादेतील मध्ययुगीन अवशेषांपैकी सराये आलमगीर हे एक होय. यास कठडा म्हणत. आज येथे पोलीस ठाणे आहे. या वास्तूचे बांधकाम समकोन चतुर्भुज आहे. कमानी खोल्या आहेत. या वास्तूत एक मशिद आहे. यास लागून तीन खोल्या आहेत. यावर लहान घुमट बांधलेले आहेत. मशिदच्या पूर्वेला एक बारदारी आहे. यास लागून काही खोल्या आहेत. जवळच एक विहीर आहे. या सरायेचा काही भाग दोन मजली आहे. उत्तरेकडच्या प्रवेशद्वारावर एक अभिलेख आहे. त्यावरून असे स्पष्ट होते की, ही वास्तू औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याच्या खान नावाच्या सेवकाने बांधली असावी.

**मकबरा बनी बेगम:**

बनीबेगम हिचे मूळ नाव जहानझेब बानू बेगम होते. ती औरंगजेबाचा द्वितीय क्रमांकाचा पुत्र आजमशहाची पत्नी होती. या उद्यानात तिची समाधी आहे. ही समाधी धर्मतलावाला लागून आहे. उद्यानाला लागून मशिदी, दर्गे असल्याने ही वास्तू अधिकच शोभायमान दिसते. उद्यानाचे प्रवेशद्वार अतिशय भव्य सुंदर आहे. या प्रवेशद्वाराची तुलना फक्त भडकलगेट (औरंगाबाद) शीच केली जाऊ शकते. या उद्यानाला चोहोबाजूंनी छोटी तटबंदी आहे. या वास्तूचे संपूर्ण बांधकाम मोगल शैलीचे आहे. बनी बेगमचा मकबरा मध्यभागी असून त्याचे नक्षीकामे अतिशय सुंदर असून त्यात वेलबुट्ट्यांचे कौशल्य अतिशय नाजूकतेने हाताळल्याचे दिसते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**मलिक अंबरचा मकबरा:**

मलिक अंबर अहमदनगरच्या निझामशाहीत दिवाण आणि सेनापती पदावर होता. त्याचा मृत्यू १४ मे १६२६ मध्ये झाला. त्याने आपल्या हयातीत हजरत खाजा जर जरी जर बक्षच्या दग्र्यामागे स्वतःसाठी मकबरा बांधला होता. ही वास्तू सहा फूट उंच ओट्यावर संपूर्ण दगडाने बांधलेली आहे. दगडांवर अतिशय सुंदर नक्षी काम केलेले आहे. समग्र महाराष्ट्रात एवढा सुंदर मकबरा पाहावयास मिळत नाही. (काही संदर्भ साधनांमध्ये मलिक अंबरचा मकबरा सध्या स्थितीत शासकीय वैद्यकीय रुग्णालय (घाटी) कर्मचारी निवासस्थान परिसरात असल्याची माहिती मिळते)मोठे घुमट आहे. घुमटाला आतून सुंदर कोरीव नक्षी आहे व काही ठिकाणी पवित्र कुराणाचे श्लोक कोरलेले आहेत. दर्गाहा बरोबर खुल्दाबादेत अनेक मशिदी आहेत, यामुळेच हे दर्गा आणि मशिदीचे शहर म्हणून ओळखले जाते. खुल्दाबादचा परिसर दर्गा व मशिदींनी भरलेला आहे. खुल्दाबादच्या परिसरात सूफींची समाध्या सुद्धा पुष्कळ आहे. सुफींनी भरलेला हा परिसर आहे.

**हजरत शहाजलालोद्दीन गंज-ए-रवाँ:**

ह.मोमीन ह. अरिफ बिल्ला या सूफी नंतर ह. शहाजलालोद्दीन गंजे रवाँ यांचे आगमन झाले. या सूफीचे मूळ नाव मोहम्मद होते. जलालोद्दीन ही त्यांची उपाधि होय. यांचा जन्म हौजरी ५६६ मध्ये खिरखानमध्ये झाला. त्यांनी प्राथमिक शिक्षण त्यांच्या वडिलाकडे पूर्ण केले. ते सुद्धा सूफी व प्रसिद्ध विद्ववान होते. कुराण व हदीसचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी बगदाद येथे सय्यद नसवाईकडून ज्ञान प्राप्त केले. पुढे धर्मशास्त्रात पारंगत झाल्यानंतर ह. शेख शहाबोद्दीन सोहरवदर्दी या सूफीच्या सेवेत राहून ईश्वरी ध्यानात मग्न झाले. शेवटी त्यांच्याकडून शिष्यत्व स्वीकारून खिलाफत घेतली. यानंतर तर ते जप, तप, साधनेत मग्न झाले. गुरू आजारी असता गुरूच्या आदेशाने शहा जलालोद्दीनने लोकांना प्रवचन दिले.

**हजरत बुऱ्हाणोद्दीन गरीब:**

इ.स. १३०० मध्ये दक्षिणेत प्रथमच सुसंघटित रीतीने धर्मप्रसार करणाऱ्या मुन्तजबोद्दीन यांचा बुऱ्हाणोद्दीन हा मोठा भाऊ होय. यांचा जन्म पूर्व पंजाबातील हांसी या शहरी १२५४ इ.स. साली झाला. यांचे वडील मुहम्मद महेमूद स्वतःच सूफी स्वभावाचे होते व निजामोद्दीनचे भक्त होते. जमालिया पंथाचे खाजा जमालुद्दीन हे बुऱ्हाणोद्दीनचे मामा होते.

**औरंगजेबाची कबर:**

औरंगजेबाची कबर ही साधेपणासाठी प्रसिद्ध असून ती ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. राजकीय वैभव असूनही साधी कबर असणे हा मुघल इतिहासातील वेगळा दृष्टिकोन दर्शवतो.

**हजरत झर झरी झर बख्श दर्गा:**

ही दर्गा सूफी परंपरेचे प्रमुख केंद्र आहे. उर्स महोत्सवाच्या काळात देशभरातून भाविक येथे येतात, ज्यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळते.

**भद्रा मारुती मंदिर:**

झोपलेल्या अवस्थेतील हनुमान मूर्तीमुळे भद्रा मारुती मंदिर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. हे मंदिर हिंदू धार्मिक पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र आहे.

**तटबंदी व ऐतिहासिक वास्तू:**

खुलदाबादची तटबंदी, मशिदी व मकबरे मध्ययुगीन स्थापत्यकलेचे उत्कृष्ट नमुने आहेत.

**पर्यटनाच्या दृष्टीने खुलदाबादचे महत्त्व:**

खुलदाबाद हे ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र आहे. हिंदू-मुस्लिम धार्मिक सहअस्तित्वाचे जिवंत उदाहरण म्हणून हे शहर ओळखले जाते. अजंठा-वेरूळ-छत्रपती संभाजीनगर पर्यटन सर्किटमध्ये खुलदाबादचे स्थान महत्त्वाचे आहे.

**निष्कर्ष:**

खुलदाबाद हे केवळ धार्मिक स्थळ नसून ते भारतीय इतिहास, सूफी परंपरा व सांस्कृतिक सहिष्णुतेचे प्रतीक आहे. योग्य नियोजन, संवर्धन व शासकीय सहकार्याने खुलदाबादला एक महत्त्वाचे ऐतिहासिक-धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करता येऊ शकते. पर्यटन हे केवळ करमणुकीचे साधन नसून, सामाजिक परिवर्तन, आर्थिक विकास आणि सांस्कृतिक जतनाचे प्रभावी माध्यम आहे. योग्य नियोजन, संवर्धन आणि जबाबदारीच्या दृष्टीकोनातून पर्यटनाचा विकास केल्यास तो राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीस निश्चितच हातभार लावू शकतो.

**संदर्भ साहित्य:**

1. पगडी सेतू माधवराव : सूफी संप्रदाय, परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई,१९५३.
2. वकील अलीम : 'सूफी संप्रदायाचे अंतरंग' प्रतिमा प्रकाशन, पुणे, इ.स.२०००,

3. देशपांडे अच्युत नारायण: 'मराठी वाङ्मयाचा इतिहास व्हीनस प्रकाशन पुणे १९७३'.
4. डॉ. एजाज शेख, “सूफी संप्रदाय ( तत्त्वज्ञान : धार्मिक व सामाजिक )” चिन्मय प्रकाशन,
5. औरंगाबाद,२००९.
6. औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन.
7. सतीश चंद्र, मध्ययुगीन भारत, एस. चंद प्रकाशन,नवी दिल्ली २००१.
8. Eaton, Richard M., Sufis of the Deccan, Princeton University Press.
9. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग – https://asi.nic.in
10. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ – https://www.maharashtratourism.gov.in

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारताच्या शाश्वत विकासात पर्यटन धोरणांची भूमिका : एक चिकित्सक अध्ययन

**श्री. बनसोडे प्रदीप बालासाहेब[1], डॉ. प्रा. बावळे नितीन पी.[2]**
[1]संशोधक विद्यार्थी (M.A., B.Ed., SET)
[2]संशोधक मार्गदर्शक (इतिहास विभाग प्रमुख शारदा महाविद्यालय, परभणी)
**Email: bansode4141@gmail.com**

**Manuscript ID:**
JRD -2026-180108
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 30-33
January 2026
**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*भारत हा सांस्कृतिक, ऐतिहासिक व नैसर्गिक वैविध्याने समृद्ध देश असून पर्यटन हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक बनला आहे. पर्यटनामुळे रोजगारनिर्मिती, परकीय चलनप्राप्ती आणि पायाभूत सुविधांचा विकास घडून येतो. तथापि, केवळ आर्थिक वाढीवर केंद्रीत पर्यटन विकासामुळे पर्यावरणीय ऱ्हास, सामाजिक विषमता आणि स्थानिक संस्कृतीवर दबाव निर्माण होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे शाश्वत विकासाच्या चौकटीत पर्यटन धोरणांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत अभ्यासात भारतातील राष्ट्रीय पर्यटन धोरणे (१९८२, २००२ व २०१५ मसुदा) आणि त्यांचा शाश्वत विकासाशी असलेला संबंध चिकित्सक दृष्टीने विश्लेषित करण्यात आला आहे. या धोरणांमध्ये शाश्वत, समावेशक व जबाबदार पर्यटनाचा उल्लेख असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक मर्यादा दिसून येतात. आर्थिक लाभांचे असमान वितरण, स्थानिक समुदायांचा मर्यादित सहभाग, पर्यावरणीय वहनक्षमता दुर्लक्षित होणे आणि धोरणे व अंमलबजावणी यांतील दरी ही प्रमुख समस्या आहेत. योग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी, स्थानिक लोकसहभाग आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधल्यास पर्यटन धोरणे भारताच्या शाश्वत विकासात प्रभावी भूमिका बजावू शकतात.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय पर्यटन, शाश्वत विकास, पर्यटन धोरणे, आर्थिक शाश्वतता, सामाजिक शाश्वतता, पर्यावरणीय शाश्वतता, स्थानिक समुदाय सहभाग, पर्यटन विकास*

**प्रस्तावना:**

भारत हा सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक व जैवविविधतेने समृद्ध असा देश आहे. हिमालयीन प्रदेश, समुद्रकिनारे, वाळवंटे, घनदाट अरण्ये तसेच प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक स्थळे यांमुळे भारताला जागतिक पर्यटन नकाशावर विशेष स्थान प्राप्त झाले आहे.[१] पर्यटन हा केवळ विरंगुळ्याचा विषय न राहता तो भारतीय अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक बनला आहे. पर्यटन क्षेत्रामुळे रोजगारनिर्मिती, परकीय चलन प्राप्ती, पायाभूत सुविधांचा विकास आणि प्रादेशिक विकासास चालना मिळते.[२] शाश्वत विकासाच्या संकल्पनेत आर्थिक वाढ, सामाजिक समता व पर्यावरणीय संरक्षण यांचा समतोल साधण्यावर भर देण्यात येतो. पर्यटन विकास हा जर केवळ आर्थिक नफ्यावर केंद्रीत असेल, तर पर्यावरणीय ऱ्हास व सामाजिक असमतोल निर्माण होण्याची शक्यता वाढते. म्हणूनच भारतातील पर्यटन धोरणे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी कितपत सुसंगत आहेत, याचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**संशोधन समस्येचे स्वरूप :**

भारत सरकारने विविध कालखंडांत राष्ट्रीय पर्यटन धोरणे जाहीर केली असली, तरी त्यांच्या अंमलबजावणीबाबत अनेक प्रश्न उपस्थित होतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
बनसोडे प्रदीप बालासाहेब, संशोधक विद्यार्थी (M.A., B.Ed., SET)

**How to cite this article:**
*बनसोडे, . प्रदीप . बालासाहेब ., & बावळे, . नितीन . पी . (2026). भारताच्या शाश्वत विकासात पर्यटन धोरणांची भूमिका : एक चिकित्सक अध्ययन. Journal of Research & Development, 18(1(V)), 30–33.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18477844*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18477844

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

"पर्यटनामुळे आर्थिक लाभ होत असताना पर्यावरणीय हानी, नैसर्गिक संसाधनांचा अति-वापर, स्थानिक संस्कृतीवरील दबाव आणि सामाजिक विषमता वाढताना दिसते. अनेक पर्यटन स्थळांवर अति-पर्यटनामुळे पर्यावरणीय वहनक्षमता दुर्लक्षित केली जाते."[३] याशिवाय, पर्यटन विकासाचा लाभ मोठ्या उद्योगांपुरता मर्यादित राहून स्थानिक समुदाय अपेक्षित लाभांपासून वंचित राहतो. त्यामुळे पर्यटन धोरणे व शाश्वत विकास यांतील प्रत्यक्ष संबंधांचा समग्र अभ्यास करणे हीच या संशोधनाची मुख्य समस्या आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- भारतातील प्रमुख पर्यटन धोरणांचा ऐतिहासिक आढावा घेणे.
- शाश्वत विकास संकल्पनेच्या संदर्भात पर्यटन धोरणांचे विश्लेषण करणे.
- पर्यटन धोरणांचा आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय परिणाम अभ्यासणे.
- धोरणे व प्रत्यक्ष अंमलबजावणी यांतील फरक स्पष्ट करणे.

**संशोधनाची व्याप्ती व आढावा :**

प्रस्तुत संशोधन भारतातील राष्ट्रीय पर्यटन धोरणे आणि त्यांचा शाश्वत विकासाशी असलेला संबंध यापुरते मर्यादित आहे. यात 1982, 2002 व 2015 (मसुदा) या धोरणांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच पर्यटनाचा आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय परिणाम या तीन परिमाणांतून विचार केला आहे.

**साहित्याचा आढावा :**

Mathieson व Wall यांनी पर्यटनाचा आर्थिक लाभ असला तरी सामाजिक व पर्यावरणीय दुष्परिणाम संभवतात, असे स्पष्ट केले आहे. Weaver यांच्या मते शाश्वत पर्यटन हे दीर्घकालीन विकासासाठी आवश्यक आहे. भारतीय संदर्भात भोसले व जाधव यांनी पर्यटन धोरणांतील अंमलबजावणीच्या मर्यादा अधोरेखित केल्या आहेत.

**भारतातील पर्यटन धोरणांचा ऐतिहासिक आढावा व शाश्वत विकास :**

**पर्यटन धोरणांची संकल्पनात्मक पार्श्वभूमी :**

पर्यटन धोरण म्हणजे एखाद्या देशाने पर्यटन विकासासाठी स्वीकारलेली दीर्घकालीन दिशा, उद्दिष्टे व अंमलबजावणीची चौकट होय. पर्यटन धोरणांचा मुख्य उद्देश पर्यटन संसाधनांचा नियोजनबद्ध वापर करून आर्थिक विकास साधणे हा असतो. मात्र "आधुनिक काळात पर्यटन धोरणे ही केवळ आर्थिक वाढीपुरती मर्यादित न राहता सामाजिक व पर्यावरणीय जबाबदारीशी निगडित झाली आहेत."[४] शाश्वत विकासाच्या पार्श्वभूमीवर पर्यटन धोरणांचा विचार करता, पर्यटन विकासामुळे नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, स्थानिक समुदायांचा विकास व सांस्कृतिक वारशाचे जतन अपेक्षित मानले जाते. त्यामुळे भारतातील पर्यटन धोरणांचा ऐतिहासिक अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते.

**भारतातील पर्यटन धोरणांचा विकास : ऐतिहासिक आढावा**

**१. राष्ट्रीय पर्यटन धोरण (१९८२)**

"स्वातंत्र्यानंतर भारतात पर्यटन क्षेत्राला प्रथमच राष्ट्रीय पर्यटन धोरण, १९८२ द्वारे स्पष्ट दिशा देण्यात आली. या धोरणात पर्यटनाला 'उद्योगाचा दर्जा' देण्यात आला".[५] पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती, परकीय चलनप्राप्ती व राष्ट्रीय एकात्मता साधणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट होते. तथापि, या धोरणात पर्यावरणीय संरक्षण व शाश्वततेचा सुस्पष्ट उल्लेख आढळत नाही. पर्यटन विकास हा मुख्यतः आर्थिक दृष्टिकोनातून पाहिला गेला असल्याचे दिसून येते.[६]

**२. राष्ट्रीय पर्यटन धोरण (२००२)**

२००२ च्या पर्यटन धोरणात "High Value – Low Impact Tourism" ही संकल्पना मांडण्यात आली. या धोरणात शाश्वत पर्यटनाचा उल्लेख करण्यात आला असून पर्यावरणीय हानी कमी ठेवून पर्यटन विकास साधण्यावर भर देण्यात आला. या धोरणामध्ये ग्रामीण पर्यटन, इको-टुरिझम व सांस्कृतिक पर्यटन यांना प्रोत्साहन देण्यात आले. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत पर्यावरणीय वहनक्षमता व स्थानिक समुदायांचा सहभाग मर्यादित राहिल्याचे अनेक अभ्यासकांनी नमूद केले आहे.

**३. राष्ट्रीय पर्यटन धोरणाचा मसुदा (२०१५)**

"२०१५ च्या मसुदा धोरणात शाश्वत, समावेशक व जबाबदार पर्यटनावर विशेष भर देण्यात आला आहे."[७] या धोरणात स्थानिक समुदायांचा सहभाग, कौशल्य विकास, पर्यावरण संरक्षण व डिजिटल पर्यटन यांसारख्या बाबींचा समावेश करण्यात आला. तथापि, हे धोरण अद्याप अंतिम स्वरूपात प्रभावीपणे अंमलात आलेले नसल्यामुळे त्याची प्रत्यक्ष परिणामकारकता मर्यादित राहिली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**पर्यटन धोरणे व शाश्वत विकास : विश्लेषण**

**(अ) आर्थिक शाश्वतता :**

शाश्वत विकासाच्या त्रिमितीय चौकटीत (आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय) आर्थिक शाश्वतता ही Tourism Policy Analysis मध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजावते. आर्थिक शाश्वतता म्हणजे रोजगारनिर्मिती, आर्थिक समावेशन, परकीय चलनप्राप्ती आणि दीर्घकालीन स्थिर वाढ यांचा समतोल साधणे. भारतासारख्या विविध आर्थिक आणि सामाजिक संरचनेच्या देशात पर्यटन धोरणांनी या घटकांमध्ये संतुलन साधणे गरजेचे आहे, कारण पर्यटनातील वाढ जर आर्थिक दृष्टिने असंतुलित या, तर ती दीर्घकालीन विकासाला हानी पोहोचवू शकते. “पर्यटन धोरणांमुळे भारतात रोजगारनिर्मिती व प्रादेशिक विकासास चालना मिळाल्याचे दिसून येते. तथापि, पर्यटनातून होणारा आर्थिक लाभ समान रीतीने वितरित होत नसल्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण होतो.”[८]

**(आ) सामाजिक व सांस्कृतिक शाश्वतता :**

शाश्वत विकासाच्या संकल्पनेत आर्थिक प्रगतीइतकीच सामाजिक समता व सांस्कृतिक जतन यांना महत्त्व दिले जाते. पर्यटन हे केवळ आर्थिक उपक्रम नसून ते समाजजीवन, संस्कृती, परंपरा, मूल्यव्यवस्था व स्थानिक जीवनशैली यांच्यावर थेट परिणाम करणारे माध्यम आहे. त्यामुळे पर्यटन धोरणे आखताना सामाजिक व सांस्कृतिक शाश्वततेचा विचार करणे अनिवार्य ठरते. भारतासारख्या बहुसांस्कृतिक, बहुभाषिक आणि सामाजिकदृष्ट्या विविध देशात हा मुद्दा अधिक संवेदनशील व महत्त्वाचा आहे. “पर्यटनामुळे सांस्कृतिक देवाणघेवाण वाढते, मात्र अति-पर्यटनामुळे स्थानिक संस्कृतीचे व्यापारीकरण होते.”[९] धोरणांमध्ये समुदाय सहभागाचा उल्लेख असला तरी प्रत्यक्षात तो मर्यादित आहे.

**(इ) पर्यावरणीय शाश्वतता :**

पर्यावरणीय शाश्वतता ही शाश्वत विकासाची अत्यंत महत्त्वाची व मूलभूत बाजू आहे. पर्यटन हे निसर्गसंपत्ती, पर्यावरणीय परिसंस्था, जैवविविधता आणि नैसर्गिक सौंदर्य यांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. त्यामुळे पर्यटनाचा विकास जर पर्यावरण-संवेदनशील नसेल, तर तो दीर्घकालीन दृष्टीने विनाशकारी ठरू शकतो. भारतात पर्वतीय, सागरी, जंगल, वाळवंटी व सांस्कृतिक परिसंस्था मोठ्या प्रमाणावर पर्यटनाच्या कक्षेत येतात. या पार्श्वभूमीवर पर्यटन धोरणे पर्यावरणीय शाश्वततेशी कितपत सुसंगत आहेत, याचे चिकित्सक विश्लेषण करणे आवश्यक ठरते. इको-टुरिझम व पर्यावरण संरक्षणाचा उल्लेख धोरणांत आढळतो; परंतु अनेक पर्यटन स्थळांवर पर्यावरणीय वहनक्षमता दुर्लक्षित केली जाते. परिणामी जैवविविधतेवर विपरीत परिणाम होतो.

**चिकित्सक निरीक्षण :**

चिकित्सक दृष्टिकोनातून पाहता, पर्यटनामुळे निर्माण होणारे आर्थिक लाभ सर्व स्तरांपर्यंत समानरीत्या पोहोचत नाहीत. मोठे पर्यटन प्रकल्प, बहुराष्ट्रीय हॉटेल साखळ्या आणि खासगी गुंतवणूकदार यांनाच प्रामुख्याने लाभ मिळतो, तर स्थानिक समुदाय, लघुउद्योग आणि पारंपरिक व्यवसाय दुय्यम ठरतात. त्यामुळे पर्यटन आर्थिक विकासाचे साधन ठरण्याऐवजी काही ठिकाणी आर्थिक विषमता वाढवणारे माध्यम बनत आहे. भारताच्या पर्यटन धोरणांमध्ये शाश्वत विकासाची संकल्पना स्वीकारलेली असली, तरी ती प्रामुख्याने कागदोपत्री मर्यादित राहिल्याचे दिसून येते. धोरणे व प्रत्यक्ष अंमलबजावणी यांतील अंतर हीच भारतीय पर्यटन विकासाची प्रमुख समस्या आहे.

**निष्कर्ष :**

- भारतातील पर्यटन धोरणे सैद्धांतिकदृष्ट्या शाश्वत विकासाशी सुसंगत असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत त्रुटी आढळतात.
- स्थानिक समुदायांचा सहभाग, पर्यावरणीय संरक्षण आणि समतोल विकास यांकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.
- स्थानिक समुदाय, लघु उद्योजक आणि पारंपरिक व्यवसाय यांना अपेक्षित लाभ मिळत नसल्यामुळे आर्थिक शाश्वततेचे उद्दिष्ट पूर्णतः साध्य होत नाही.
- पर्यटन सामाजिक सशक्तीकरणाचे साधन ठरण्याऐवजी काही ठिकाणी सामाजिक तणावाचे कारण ठरत असल्याचे दिसून येते.

**शिफारशी :**

- पर्यटन धोरणांमध्ये स्थानिक समुदायांचा सक्रीय सहभाग वाढवावा.
- प्रत्येक पर्यटन स्थळासाठी पर्यावरणीय वहनक्षमता निश्चित करावी.
- पर्यटन धोरणे शाश्वत विकास उद्दिष्टांशी (Sustainable Development Goals-SDG) संलग्न करावीत.

**संदर्भसूची :**

१. पर्यटन व भारतीय समाज, शर्मा आर. के. कॅनडा प्रकाशन, दिल्ली, २०१३, पृ. क्र. १५
२. India Tourism Statistics, Ministry of Tourism, Government of India, New Delhi, 2019, p. no. 3
३. पर्यटन धोरण व ग्रामीण विकास, जाधव एस. आर., साई प्रकाशन, औरंगाबाद, २०१८, पृ. क्र. ९७
४. Sustainable Tourism Development, Singh S., Kanishka Publishers, New Delhi, 2010, p. no. 33

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

५. National Tourism Policy, Government of India, Ministry of Tourism, New Delhi, 1982, p. no. 6
६. भारतातील पर्यटन उद्योग, भोसले डी. एन., फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१६, पृ. क्र. ४२
७. Draft National Tourism Policy, Government of India, Ministry of Tourism, New Delhi, 2015, p. no. 18
८. पूर्वोक्त (३)
९. Cultural Tourism in India, Sharma P., Rawat Publications, Jaipur, 2015, p. no. 61

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC): कामगिरी – एक विश्लेषणात्मक दृष्टीक्षेप

**डॉ. रमेश धनराज जाधव**
उप- प्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख, आर. सी. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरपूर जि. धुळे
**Email:** jadhavramesh1969@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180109
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 34-37
January 2026
**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन हा आधुनिक काळातील जागतिक अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक बनला आहे. अनेक विकसित आणि विकसनशील देशांनी पर्यटन क्षेत्राचा उपयोग राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे, रोजगार निर्मिती करणे, सांस्कृतिक ओळख वृद्धिंगत करणे आणि आंतरराष्ट्रीय संबंध दृढ करण्यासाठी केला आहे. भारतासारख्या प्राचीन सांस्कृतिक परंपरा, वैविध्यपूर्ण भौगोलिक रचना, ऐतिहासिक वारसा, धार्मिक स्थळे आणि नैसर्गिक सौंदर्य असलेल्या देशासाठी पर्यटन विकास हे केवळ आर्थिक साधन नसून सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. भारत सरकारने पर्यटन क्षेत्राचा नियोजित आणि संस्थात्मक विकास साधण्यासाठी विविध धोरणे राबविली असून त्यामध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळ (India Tourism Development Corporation – ITDC) या संस्थेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रस्तुत संशोधन लेखात ITDC च्या स्थापनेची पार्श्वभूमी, ऐतिहासिक विकास, धोरणात्मक उद्दिष्टे, कार्यक्षेत्र, आर्थिक कामगिरी, सामाजिक व सांस्कृतिक योगदान, तसेच बदलत्या जागतिक पर्यटन परिस्थितीत महामंडळासमोरील आव्हाने आणि भविष्यातील संधी यांचा सखोल व विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे. या अभ्यासातून ITDC च्या कामगिरीचे सर्वांगिण मूल्यांकन करता येते आणि भारतीय पर्यटन क्षेत्रातील तिच्या स्थानाची स्पष्ट कल्पना येते.*

***की-वर्ड:*** *आतिथ्य उद्योग, पर्यटन पायाभूत सुविधा, आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती, पर्यटन धोरण, सांस्कृतिक पर्यटन, शाश्वत पर्यटन, भारतातील पर्यटन उद्योग*

## प्रस्तावना:

पर्यटन ही संकल्पना मानवी इतिहासात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. धार्मिक यात्रा, व्यापारी प्रवास, शिक्षणासाठी केलेले भ्रमण आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या स्वरूपात पर्यटनाचा प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांतीनंतर वाहतूक साधनांचा विकास, उत्पन्नात वाढ आणि विश्रांतीसाठी उपलब्ध वेळ यांमुळे पर्यटनाला आधुनिक स्वरूप प्राप्त झाले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यटन उद्योगाने जागतिक स्तरावर प्रचंड विस्तार केला. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक पर्यटन संघटनेनुसार पर्यटन उद्योग हा जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या आणि सर्वाधिक रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. भारताच्या संदर्भात पाहिले असता, येथे सिंधू संस्कृतीपासून ते आधुनिक काळापर्यंतचा प्रदीर्घ इतिहास, बौद्ध, जैन, हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन अशा विविध धर्मांचे प्रभावी वारसा, हिमालयापासून समुद्रकिनाऱ्यांपर्यंत पसरलेली भौगोलिक विविधता आणि असंख्य लोकपरंपरा आढळतात. या सर्व घटकांमुळे भारत पर्यटनासाठी अत्यंत समृद्ध देश मानला जातो. तथापि, स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात भारतात पर्यटन क्षेत्राकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. पर्यटन सुविधा अपुऱ्या, व्यवस्थापन असंघटित आणि प्रचार मर्यादित स्वरूपाचा होता.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
डॉ. रमेश धनराज जाधव, उप- प्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख, आर. सी. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरपूर जि. धुळे

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18477874

**How to cite this article:**
*जाधव, . रमेश . धनराज . (2026). भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC): कामगिरी – एक विश्लेषणात्मक दृष्टीक्षेप. Journal of Research & Development, 18(1(V)), 34–37.* https://doi.org/10.5281/zenodo.18477874

यामुळे भारताची पर्यटन क्षमता पूर्णपणे वापरली जात नव्हती. या पार्श्वभूमीवर पर्यटन क्षेत्राचा नियोजित विकास करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर भारताचे स्थान दृढ करण्यासाठी भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. ITDC च्या माध्यमातून भारताने पर्यटन उद्योगात एक सुव्यवस्थित आणि व्यावसायिक आराखडा तयार केला, ज्यामुळे देशाच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेवर सकारात्मक परिणाम झाला.

**उद्देश:**

- भारतीय पर्यटन विकास महामंडळ (ITDC) यांच्या स्थापनेची पार्श्वभूमी व विकासाचा अभ्यास करणे.
- पर्यटन उद्योगाच्या संघटित विकासामध्ये ITDC ने बजावलेल्या भूमिकेचे विश्लेषण करणे.
- ITDC च्या आर्थिक कामगिरीचा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
- पर्यटनाच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक व प्रादेशिक विकासात ITDC च्या योगदानाचे मूल्यमापन करणे.
- बदलत्या जागतिक पर्यटन परिस्थितीत ITDC समोरील आव्हाने व भविष्यातील शक्यता समजून घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधन प्रामुख्याने दुय्यम माहितीस्रोतांवर आधारित असून त्यामध्ये भारत सरकारचे पर्यटन मंत्रालय, भारतीय पर्यटन विकास महामंडळाचे वार्षिक अहवाल, आर्थिक सर्वेक्षणे, पंचवार्षिक योजना अहवाल, तसेच पर्यटनविषयक शासकीय व निमशासकीय प्रकाशने यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय पर्यटन विषयावरील मान्यताप्राप्त पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके आणि विश्वकोशीय संदर्भांचा उपयोग करून आवश्यक माहिती संकलित करण्यात आली आहे.

**भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना व ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना १ ऑक्टोबर १९६६ रोजी भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाअंतर्गत करण्यात आली. या स्थापनेमागे पर्यटन क्षेत्राला एक संघटित, व्यावसायिक आणि संस्थात्मक स्वरूप देण्याची गरज होती. स्थापनेपूर्वी भारतात काही मोजकी हॉटेल्स आणि प्रवास सेवा कार्यरत होत्या, परंतु त्या प्रामुख्याने खासगी किंवा स्थानिक स्वरूपाच्या होत्या. विदेशी पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या निवास सुविधा, वाहतूक व्यवस्था आणि मार्गदर्शन सेवांचा मोठ्या प्रमाणावर अभाव होता. ITDC ने स्थापनेनंतर अल्पावधीतच पर्यटन उद्योगात महत्त्वपूर्ण पायाभूत बदल घडवून आणले. हॉटेल उद्योगाचा विस्तार, प्रवास आणि टूर सेवा, पर्यटन प्रचार साहित्याची निर्मिती, तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटन संस्थांशी सहकार्य या माध्यमातून ITDC ने पर्यटन क्षेत्रात एक नवे पर्व सुरू केले. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असूनही ITDC ने व्यावसायिक कार्यपद्धती स्वीकारून पर्यटन उद्योगात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

**ITDC ची उद्दिष्टे, भूमिका आणि कार्यक्षेत्र:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाचे उद्दिष्ट केवळ आर्थिक नफा मिळविणे नसून पर्यटनाच्या माध्यमातून राष्ट्रीय विकास साधणे हे आहे. पर्यटन पायाभूत सुविधा निर्माण करणे, दर्जेदार आतिथ्य सेवा उपलब्ध करून देणे, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करणे, तसेच पर्यटन उद्योगासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे ही ITDC ची मूलभूत उद्दिष्टे आहेत. ITDC चे कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक आहे. यामध्ये हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सचे व्यवस्थापन, अशोक टूर्स आणि ट्रॅव्हल्स च्या माध्यमातून प्रवास सेवा, विमानतळांवरील ड्युटी-फ्री दुकाने, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन, पर्यटन प्रशिक्षण संस्था आणि सल्लागार सेवा यांचा समावेश होतो. ITDC च्या माध्यमातून भारतातील पर्यटनाला एक दर्जेदार प्रतिष्ठा मिळाली आहे. याचा परिणाम फक्त आर्थिक वाढीत नव्हे, तर देशाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विकासातही झाला आहे.

**ITDC ची कामगिरी: आतिथ्य उद्योगातील योगदान:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाची सर्वात लक्षणीय कामगिरी म्हणजे आतिथ्य उद्योगातील योगदान. 'अशोक ग्रुप ऑफ हॉटेल्स'च्या माध्यमातून ITDC ने भारतात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या हॉटेल्सची उभारणी केली. ही हॉटेल्स केवळ पर्यटकांसाठी निवास सुविधा पुरविणारी केंद्रे नसून शासकीय बैठक, आंतरराष्ट्रीय परिषद, सांस्कृतिक कार्यक्रम आणि राजनैतिक चर्चांचे केंद्र बनली आहेत. त्यामुळे भारतात हॉटेल उद्योगात गुणवत्ता, शिस्त आणि व्यावसायिकता यांचे मानदंड प्रस्थापित झाले. ITDC च्या हॉटेल्सनी विदेशी पर्यटकांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि दर्जेदार सेवा दिल्यामुळे भारताचा पर्यटन क्षेत्रावरील विश्वास वाढला. या हॉटेल्समुळे भारतातील

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

महानगर तसेच काही पर्यटन केंद्रे आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी सुसज्ज झाली. याचा थेट परिणाम पर्यटन प्रवाह वाढण्यात आणि परकीय चलन मिळकतीत वाढ होण्यात दिसून येतो.

**पर्यटन प्रचार, विपणन आणि प्रतिष्ठा निर्मिती:**

पर्यटन प्रचाराच्या क्षेत्रात ITDC ची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. स्थापनेपासूनच ITDC ने भारताच्या पर्यटन क्षमतेचा प्रचार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग केला. आंतरराष्ट्रीय पर्यटन मेळावे, सांस्कृतिक महोत्सव, रोड शो, प्रदर्शन आणि प्रचार साहित्य यांच्या माध्यमातून भारताची ओळख जागतिक पातळीवर पोहोचविण्यात आली. ऐतिहासिक स्मारके, धार्मिक स्थळे, नैसर्गिक पर्यटन, साहसी पर्यटन, वैद्यकीय पर्यटन अशा विविध प्रकारांना ITDC ने प्रसिद्धी दिली. पर्यटन विपणनाच्या माध्यमातून भारताची प्रतिमा केवळ प्राचीन आणि पारंपरिक देश म्हणून नव्हे, तर आधुनिक, गतिशील आणि स्वागतशील पर्यटन स्थळ म्हणून निर्माण झाली. ITDC ने "इन्क्रेडिबल इंडिया" सारख्या राष्ट्रीय पर्यटन मोहिमांना प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर पाठबळ दिले आणि सरकार व खासगी क्षेत्र यांच्यात समन्वयाची भूमिका बजावली.

**पर्यटन शिक्षण आणि मानव संसाधन विकास:**

पर्यटन उद्योगाचा दीर्घकालीन आणि शाश्वत विकास प्रशिक्षित मनुष्यबळावर अवलंबून असतो. ITDC ने ही गरज ओळखून पर्यटन आणि आतिथ्य शिक्षणासाठी विविध प्रशिक्षण संस्था आणि कार्यक्रम सुरू केले. हॉटेल व्यवस्थापन, केटरिंग सेवा, प्रवास नियोजन, ग्राहक सेवा आणि कार्यक्रम व्यवस्थापन या क्षेत्रांत प्रशिक्षण देऊन कुशल मनुष्यबळ तयार करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आणि पर्यटन उद्योगातील सेवा दर्जा उंचावला. मानव संसाधन विकासाच्या माध्यमातून ITDC ने पर्यटन उद्योगात व्यावसायिक संस्कृती रुजवली. प्रशिक्षित कर्मचारी, व्यवस्थापक आणि सेवा प्रदाते यांमुळे भारतातील पर्यटन अनुभव अधिक दर्जेदार आणि विश्वासार्ह बनला.

**आर्थिक कामगिरी आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम:**

अलीकडील दशकात ITDC ची आर्थिक कामगिरी लक्षणीय राहिली आहे. विशेषतः कोविड-१९ महामारीनंतर पर्यटन उद्योगाला मोठा फटका बसला असतानाही ITDC ने हळूहळू आर्थिक पुनरुज्जीवन साधले. उत्पन्न, टर्नओव्हर आणि निव्वळ नफ्यात झालेली वाढ ही महामंडळाच्या कार्यक्षम व्यवस्थापनाची साक्ष देते. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असूनही ITDC ने आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि व्यावसायिकता टिकवून ठेवली आहे. ITDC च्या आर्थिक कामगिरीचा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवरही सकारात्मक परिणाम झाला आहे. पर्यटनाच्या माध्यमातून परकीय चलन मिळकत वाढली, कर महसूल वाढला आणि थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली. पर्यटनाशी संबंधित वाहतूक, हस्तकला, अन्न उद्योग आणि स्थानिक व्यवसायांनाही याचा लाभ झाला.

**सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक परिणाम:**

ITDC च्या कार्यामुळे पर्यटन उद्योगातून केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक आणि सांस्कृतिक परिणामही दिसून येतात. पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आणि ग्रामीण तसेच मागास भागांच्या विकासाला चालना मिळाली. हस्तकला, लोककला, पारंपरिक नृत्य, संगीत आणि खाद्यसंस्कृती यांना पर्यटनाच्या माध्यमातून नवसंजीवनी मिळाली.

पर्यटनामुळे विविध राज्यांतील सांस्कृतिक परंपरा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचल्या. यामुळे सांस्कृतिक संवर्धनासोबतच राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळाले. विविध भाषा, धर्म आणि परंपरांचा अनुभव पर्यटकांना मिळाल्यामुळे भारताची सांस्कृतिक विविधता अधिक ठळकपणे अधोरेखित झाली.

**ITDC आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांतील भूमिका:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने केवळ पर्यटन सुविधा निर्माण करण्यापुरती भूमिका मर्यादित ठेवली नाही, तर भारतात आयोजित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये, शिखर परिषदांमध्ये आणि राजनैतिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. आशियाई खेळ, सार्क परिषद, जी-२० बैठक, राष्ट्रकुल परिषद यांसारख्या कार्यक्रमांसाठी ITDC अंतर्गत हॉटेल्स आणि सेवांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. या कार्यक्रमांच्या माध्यमातून भारताची संघटन क्षमता, आदरातिथ्य परंपरा आणि व्यवस्थापन कौशल्य जागतिक पातळीवर अधोरेखित झाले. परकीय प्रतिनिधी, राजनैतिक अधिकारी आणि आंतरराष्ट्रीय माध्यमे यांच्यावर ITDC च्या सेवांचा सकारात्मक प्रभाव पडला, ज्यामुळे भारताच्या पर्यटनप्रतिष्ठेला दीर्घकालीन लाभ झाला.

**ITDC आणि ग्रामीण व आदिवासी पर्यटनाचा विकास:**

अलीकडील दशकांत ITDC ने ग्रामीण आणि आदिवासी पर्यटनाच्या विकासाकडे लक्ष वळवले आहे. मोठ्या शहरांपुरते पर्यटन मर्यादित न ठेवता, ग्रामीण भागातील सांस्कृतिक परंपरा, स्थानिक सण, लोककला, पारंपरिक जीवनशैली यांना पर्यटनाशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती झाली तसेच स्थलांतराचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली. आदिवासी पर्यटन प्रकल्पांमुळे स्थानिक समुदायाला त्यांच्या संस्कृतीची ओळख जपता आली आणि आर्थिक स्वावलंबन साधता आले. या प्रकारचे पर्यटन सामाजिक समावेशन आणि संतुलित विकासाचे उदाहरण ठरले.

**ITDC ची बदलत्या पर्यटन धोरणांशी जुळवून घेण्याची क्षमता:**

पर्यटन क्षेत्र सतत बदलत असते. कोविड-१९ नंतर पर्यटन उद्योगास मोठा धक्का बसला; मात्र ITDC ने या संकटातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. सुरक्षित पर्यटन, आरोग्यविषयक प्रोटोकॉल, डिजिटल बुकिंग प्रणाली, संपर्कविरहित सेवा यांचा स्वीकार करून महामंडळाने स्वतःला नव्या परिस्थितीशी जुळवून घेतले. देशांतर्गत पर्यटनावर भर देण्यात आला आणि लघु सहली, धार्मिक पर्यटन, आरोग्य पर्यटन यांसारख्या नव्या प्रवाहांना चालना देण्यात आली. यामुळे ITDC ची संस्थात्मक लवचिकता आणि दीर्घकालीन दृष्टिकोन स्पष्ट होतो.

**ITDC समोरील आव्हाने:**

यशस्वी कामगिरी असूनही ITDC ला अनेक आव्हाने आहेत. खाजगी आणि बहुराष्ट्रीय पर्यटन कंपन्यांची वाढती स्पर्धा, डिजिटल तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची गरज, पर्यावरणीय शाश्वततेचे प्रश्न आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रशासकीय मर्यादा ही प्रमुख आव्हाने आहेत. आधुनिक पर्यटक अधिक वैयक्तिकृत, तंत्रज्ञानाधारित आणि पर्यावरणपूरक पर्यटन अनुभवाची अपेक्षा करतात. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ITDC ला आपली धोरणे आणि कार्यपद्धती सातत्याने अद्ययावत करावी लागेल.

**भविष्यातील दिशा आणि शक्यता:**

भविष्यात ITDC ने शाश्वत पर्यटन विकासावर विशेष भर देणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा, ग्रीन हॉटेल्स, ग्रामीण व आदिवासी पर्यटनाचा विकास, डिजिटल पर्यटन सेवा आणि सार्वजनिक-खासगी भागीदारी या माध्यमातून ITDC आपली भूमिका अधिक प्रभावीपणे बजावू शकते. पर्यटन विकासासोबत पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक समावेशन यांचा समतोल साधणे ही भविष्यातील सर्वात मोठी गरज आहे.

**निष्कर्ष:**

भारतीय पर्यटन विकास महामंडळ हे भारतातील पर्यटन उद्योगाच्या संघटित विकासाचे एक महत्त्वाचे आणि विश्वासार्ह साधन आहे. स्थापनेपासून आजपर्यंत ITDC ने पर्यटन पायाभूत सुविधा, आतिथ्य सेवा, आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती आणि सांस्कृतिक प्रचार या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बदलत्या जागतिक पर्यटन परिस्थितीत अनेक आव्हाने असली तरी योग्य धोरणात्मक सुधारणा, तांत्रिक नवकल्पना आणि शाश्वत विकासाच्या माध्यमातून ITDC भारतीय पर्यटन क्षेत्राला भविष्यात अधिक उंचीवर नेऊ शकते. त्यामुळे भारतीय पर्यटन इतिहासात ITDC चे स्थान अत्यंत महत्त्वाचे, दूरगामी आणि प्रेरणादायी आहे.

**संदर्भ:**


१) शर्मा, जे. के., भारतातील पर्यटन विकास, कणिष्क पब्लिशर्स, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती, २००४.

२) भारत सरकार, राष्ट्रीय पर्यटन धोरण, पर्यटन मंत्रालय, नवी दिल्ली, सुधारित आवृत्ती, २००२.

३) भारतीय पर्यटन विकास महामंडळ, वार्षिक अहवाल, ITDC प्रकाशन विभाग, नवी दिल्ली, विविध वर्षे.

४) भारत सरकार, इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया : पर्यटन क्षेत्र, अर्थ मंत्रालय, नवी दिल्ली, विविध आवृत्त्या.

५) मराठी विश्वकोश मंडळ, मराठी विश्वकोश (खंड : पर्यटन व सेवा उद्योग), महाराष्ट्र राज्य, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८९.

६) पाटील, एस. आर., भारतीय अर्थव्यवस्था आणि पर्यटन, विद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१०.

७) Ministry of Tourism, Government of India, *India Tourism Statistics*, Government Publication, New Delhi, Latest Edition.

८) कुलकर्णी, आर. डी., सेवा क्षेत्र आणि राष्ट्रीय विकास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१५.

९) भारत सरकार, भारताचा पंचवार्षिक आराखडा : पर्यटन विकास, नियोजन आयोग, नवी दिल्ली, विविध आवृत्त्या.

१०) भारतीय पर्यटन विकास महामंडळ, ITDC : भूमिका व कामगिरी, अंतर्गत प्रकाशन, नवी दिल्ली, २०१८.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# जालना जिल्ह्यातील मंदिरे आणि धार्मिक पर्यटन

**प्रा.डॉ. मोतीराम विठ्ठलराव कदम**
इतिहास विभाग, राजर्षी शाहु महाविद्यालय, परभणी
**Email:** kadammotiram8@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180110
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 38-41
January 2026
**Submitted:** 10 Dec. 2025
**Revised:** 20 Dec. 2025
**Accepted:** 10 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*भारत हा सांस्कृतिक, ऐतिहासिक व नैसर्गिक वैविध्याने समृद्ध देश असून पर्यटन हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक बनला आहे. पर्यटनामुळे रोजगारनिर्मिती, परकीय चलनप्राप्ती आणि पायाभूत सुविधांचा विकास घडून येतो. तथापि, केवळ आर्थिक वाढीवर केंद्रीत पर्यटन विकासामुळे पर्यावरणीय ऱ्हास, सामाजिक विषमता आणि स्थानिक संस्कृतीवर दबाव निर्माण होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे शाश्वत विकासाच्या चौकटीत पर्यटन धोरणांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत अभ्यासात भारतातील राष्ट्रीय पर्यटन धोरणे (१९८२, २००२ व २०१५ मसुदा) आणि त्यांचा शाश्वत विकासाशी असलेला संबंध चिकित्सक दृष्टीने विश्लेषित करण्यात आला आहे. या धोरणांमध्ये शाश्वत, समावेशक व जबाबदार पर्यटनाचा उल्लेख असला तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक मर्यादा दिसून येतात. आर्थिक लाभांचे असमान वितरण, स्थानिक समुदायांचा मर्यादित सहभाग, पर्यावरणीय वहनक्षमता दुर्लक्षित होणे आणि धोरणे व अंमलबजावणी यांतील दरी ही प्रमुख समस्या आहेत. योग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी, स्थानिक लोकसहभाग आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधल्यास पर्यटन धोरणे भारताच्या शाश्वत विकासात प्रभावी भूमिका बजावू शकतात.*

***मुख्यशब्द :*** *भारतीय पर्यटन, शाश्वत विकास, पर्यटन धोरणे, आर्थिक शाश्वतता, सामाजिक शाश्वतता, पर्यावरणीय शाश्वतता, स्थानिक समुदाय सहभाग, पर्यटन विकास*

**प्रस्तावना:**

भारत ही ऐतिहासिक व धार्मीक पर्यटनाची भूमी म्हणून ओळखली जाते. सुरवातीच्या काळात पर्यटन हे धार्मिक घटकांशीच संबंधित असलेले दिसुन येते. त्यामुळे धार्मीक स्थळांना पर्यटनाच्या दृष्टीने अधिक महत्व प्राप्त झाले आहे. स्थानिक इतिहास, संस्कृती व प्राचीन मंदिरांनी समृद्ध असलेल्या म्हणून जालना जिल्हा ओळखला जातो. प्रत्येक धर्मात त्यांच्या धार्मीक वारसा जाताना पवित्र धार्मिक स्थळांचा विकास होत गेला त्यामुळे धार्मिक पर्यटन स्थळे नावारुपाला आली. जालना जिल्हयातील धार्मिक पर्यटनस्थळांमुळे महाराष्ट्रातील व देशातील अनेक पर्यटक येथे भेटी देतात. धार्मीक पर्यटन हे एक प्रभावी माध्यम आहे, की ज्यामुळे जालना जिल्यातील प्राचीन मंदिरांचा स्थानिक इतिहास संपूर्ण जगाला ज्ञात होईल यात शंका नाही.

**उद्देश :**

- जालना जिल्हयातील पर्यटनाचे महत्व स्पष्ट करणे.
- जालना जिल्हयातील सांस्कृतिक ठेवा अभ्यासणे.
- जालना जिल्ह्यातील समाजाचा धार्मिक दृष्टीकोण जाणून घेणे

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18477896
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
प्रा.डॉ. मोतीराम विठ्ठलराव कदम, इतिहास विभाग, राजर्षी शाहु महाविद्यालय, परभणी

**How to cite this article:**
*कदम, . मोतीराम . विठ्ठलराव . (2026). जालना जिल्ह्यातील मंदिरे आणि धार्मिक पर्यटन. Journal of Research & Development, 18(1(V)), 38–41.* https://doi.org/10.5281/zenodo.18477896

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- जालना जिल्ह्यातीची ऐतिहासीक पार्श्वभूमी विशद करणे.

**ग्रहितक:**

- जालना जिल्हा पर्यटन दृष्टीने महत्वाचा जिल्हा आहे.
- जालना जिल्ह्याला सांस्कृतिक वारसा आहे.
- मराठवाड्याच्या इतिहासात जालना जिल्ह्यास महत्वाचे स्थान आहे.
- जालना जिल्ह्यातील हिंदुधर्म संस्कृतीच्या पाऊल खुणा जोपासल्या आहेत.

जालना शहराचे प्राचीनत्व रामायण काळाशी जोडले जाते. जनक कन्या जानकी (सिता) च्या वास्तव्यामुळे या स्थानास पुर्वी जनकपुरी असे संबोधले जात होते. तसेच यादव राजा कान्हेरदेव (कृष्णदेव) याचा हत्तीदल प्रमुख जल्हण याचे वास्तव्य येथे असल्यामुळे या शहराचे नाव जाल्हनापुर असे पडले असावे तर हकीम इब्राहमी सिद्दिकी याच्या मते या शहरात असलेले पाण्याचे दुर्भिक्ष्य म्हणजे जल-ना यावरुन जालना हे नाव पडले असावे. तर महानुभव साहित्यात (स्थानपोथीत) यांची नोंद 'हिवराळी' अशी येते. जालना जिल्हा महाराष्ट्राच्या नकाशामध्ये मध्यभागी येतो.

**जालना जिल्ह्यातील धार्मीक स्थळे:**

जालना जिल्ह्यात शैव, वैष्णव व महानुभव पंथाची मंदिरे आज ही आस्तीत्वात आहे. बरीच मंदिरे हेमाडपंथीय असून ती काळाच्या ओघात मोडकळीस आलेली आहेत. तसेच जालना जिल्ह्यातील सर्वोतम मंदिर 'अन्वा' येथील होय. 'जालना जिल्ह्यात राष्ट्रकुट काळात भोकरदन लेणी अस्तीत्वात आली. राष्ट्रकूट काळात भोकरदन हे 700 गावांच्या विभागाचे मुख्यालय होते. आणि त्यांच्या प्रशासक राष्ट्रकुट 'भागाह' हा होता ज्याने इ.स. 973 मध्ये राष्ट्रकुट सत्तेचा अंत केला'.[1] या लेणीतील अनंतशायी विष्णु, सूर्य, बालराम, महिषासूरमर्दिनी इ. शिल्पे आहेत.

**1) तुकाई मंदिर- आलापूर:**

भोकरदनहुन जवळच असलेल्या आलापूर गावाजवळ हे महनुभाव संप्रदायाचे ठिकाण असलेले चक्रधर ज्ञान मंदिर आहे हे मंदिर तुकाई या नावाने प्रख्यात आहे. भोकरदन लेणीला लागूनच हे मंदिर आहे. या मंदिराचा सभामंडप फक्त शिल्लक आहे. मूळ मंदिराचे प्रवेशद्वार उपयोगात आणले. सभामंडपात चार स्तंभ आहेत. सभामंडपा च्या समोर पश्चिम बाजूला महानूभाव संप्रदायाचे पवित्र आसन आहे. हे मुळ् मंदिर विष्णुचे किंवा रामाचे मंदिर असण्याची शक्यता आहे, हे मंदिर असलेल्या ठिकाणी प्राचीन रामापुर पेठ होती. लिळाचरित्रात उल्लेख असलेले रामनाथाचे हेच मंदिर असावे.

**2) श्री रामेश्वर मंदिर- आलापूर:**

भोकरदन येथून 2 कि.मी. अंतरावर आलापूर गावाच्या पुढे खेळणा नदीच्या तीरावर रामेश्वर मंदिर आहे. हे मंदिर हेमाडपंथीय असून ते 13व्या शतकात निर्माण केले असावे. मंदिराचा सभामंडप नाहीसा झाली. मंदिराच्या बाह्य भागावार सुंदर नक्षीकाम आहे. हे मंदिर सध्या जमीनीत दबलेले आहे. खेळणा नदीत उतरण्यासाठी पायऱ्या तयार करण्यात आलेल्या आहेत. येथे पूर्वी घाट असण्याची शक्यता आहे. स्थानपोथीत चक्रधर स्वामी रामनाथाच्या मंदिरात राहतात. ते मंदिर आज रामेश्वर मंदिर म्हणुन ओळखले जाते. या मंदिराची रचना, सभामंडप, अंतराळ, गर्भगृह अशी होती. सध्या मात्र गर्भगृह शिल्लक आहे. सभामंडप व अंतराळ नष्ट झाले आहेत. या मंदिराच्या शिल्पावशेषावर यादवकालीन छाप आहे. डॉ. सोमनाथ रोडे यांच्यामते भोगवर्धन येथील रामेश्वर मंदिर चालुक्य यादव काळात बांधले गेले.'डॉ. अरुणचंद्र पाठक यांच्या मते हे मंदिर यादव कालीन असून 12/13 व्या शतकात बांधण्यात आले असावे'.[2] येथील शैली व शिल्पावरुन हे मंदिर 12 व्या शतकात बांधले गेले, हे डॉ. प्रभाकर देव यांनी आपल्या 'The Temples of Marathwada' या ग्रंथात मांडले मत ग्राह्य वाटते.

**3) शिवमंदिर- अन्वा:**

अन्वा गावात मध्यवस्तीत प्रसिध्द शिव मंदिर आहे. मंदिर पुर्वाभिमुख आहे. मंदिर ४ फुट उंचीच्या पीठावर आहे. पीठाला पायऱ्या आहेत. या पायऱ्याच्या दोन्ही बाजुला दोन देवकोष्टे आहेत. देवकोष्ठांमध्ये शिल्पे नाहीत. मंदिरात एक गर्भगृह शिवाय खुला मंडप व अंतराळ अशी रचना आहे.' मंदिराला मुखमंडप नाही. मंदिरात जाण्यासाठी दोन टप्पात पायऱ्या आहेत. पायऱ्यांच्या सुरुवातीला दोन्ही बाजुस कोनोडे आहेत. त्यात 'जय विजय प्रतिमा आहेत.'[3] मंडपाच्या तिन्ही भिंतीवर आकर्षक भद्र आहेत. मंडपाच्या तिन्ही बाजुला

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

अर्ध भिंती आहेत. मंडपाला आतील बाजुने थोडे उंचावले असे पीठ आहे. मंडपाचे छत म्हणजे स्थापत्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे. छत हे घुमटाकारआहे. घुमटाच्या मध्यावर एक अर्धवट उमलते फुल असे कोरलेले आहे. त्यांच्या भोवती लहान लहान आठ फुले कोरलेली आहेत. अंतराळाचा आकार 8x4 फुट आहे. मंदिराचे गर्भगृहाचे प्रवेशद्वार हे पाच द्वारशाखांनी सजलेले आहे. ललापट्टीवरील ललाट बिंबावर गणेश अर्धपर्याकासान विराजमान आहे. गर्भगृह 8x8 चौरासाकृती आहे. मंदिरात एकूण 50 स्तंभ आहेत. मंदिराच्या बाह्यभिंतीवर प्रमुख देवकोष्ठ आहेत. त्यामध्ये गजलक्ष्मी, शिल्प, दुसऱ्या देवकोष्ठामध्ये वराह, तर तिसरा देवकोष्ठक रिक्त आहे. देव कोष्ठकांवर सुंदर कोरीव काम आहे. मंदिरावर विशेषत: बाह्यांगावर अनेक देवीच्या प्रतिमा अंकीत केलेल्या आहेत. मातृकांच्या विविध प्रतिमाचे एवढ्या मोठ्या प्रमाणातील अलंकरण, वैष्णव मुर्तीच्या मध्ये चतुविर्शती मुर्ती प्रकारातील विष्णुच्या अर्धागिनीच्या प्रतिमांचे शिल्पांकण हे ह्या मंदिराचे वैशीष्टे म्हणून सांगता येतील. 'डॉ. गो.बा. देगलूरकर यांच्या मते', 'अन्वा' येथील मंदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराच्या चौकटीवरील वैष्णव द्वारपाल, लक्ष्मी गरुड तसेच मंडपावरील सर्व प्रतिमा, कोनाडातील नृसिंह, वराहची प्रतिमा आणि शिवप्रतिमेचा अभाव लक्षात घेता हे मंदिर शिवाचे नसून वैष्णव देवीचे असण्याची शक्यता आहे.'[4]

**4) श्री विठ्ठल मंदिर- राजूर:**

राजूर या ठिकाणी यादवकालीन हेमाडपंथीय मंदिर आहे. हे मंदिर मुळात शिवमंदिर असावे. नंतरच्या कालखंडात मंदिराच्या गर्भगृहात श्री विठ्ठलाची मूर्ती ठेवण्यात आली तेव्हा पासून हे मंदिर विठ्ठल मंदिर म्हणून ओळखले जावू लागले. हे मंदिर एका उंच टेकटीवर बांधण्यात आले आहे. मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराचा बाध्यभाग सपाट आहे. त्यावर कसलेही कोरीव काम केले नाही मंडपात एकुण 20 स्तंभ होते, त्यापैकी आज केवळ 1 स्तंभ अवशेष रूपाने शिल्लक आहे. अंतराळाला गोलाकृत्ती छत आहे. गर्भगृहात विठ्ठल-रुक्मिणीची मुर्ती तसेच शिवलिंग व नंदी आहे. मुळात हे महादेवाचे मंदिर असावे. चक्रधर स्वामी भ्रमण करीत असताना राजूर येथील शिवमंदिरात आले होते. याबाबत स्थानपोथीत या मंदिराची नोंद येते हे मंदिर गावाच्या पश्चिमेस भीउडाऊवाचे देऊळ, पूर्वाभिमुख असून त्यास जगती आहे. एका उंच टेकड्यावर असेल्या जगती अंतर्गत गणेश व शिवमंदिरे असलेल्या यादवकालीन देवळीचा समुह असावा. यातील मुख्य देऊळ महादेवाचे असुन ते 'भीउडाऊवाचे देऊळ'[5] असावे जे आज विठ्ठल मंदिर म्हणून ज्ञात आहे.

**5) श्री. गणपतीचे मंदिर- राजुर:**

महाराष्ट्रात गणपतीची साडेतीन पीठे आहेत. 1) मोरेगाव 2) चिंचवड 5) राजूर हे पुर्णपीठ आहे. राजूर या गावाची नोंद स्थानपोथीत 'राजौरी' अशी आहे. गणेश मंदिराची रचना गर्भगृह, त्यापुढील अंतराळ, व सभागृह अशी असावी. आजही यादवकालीन गर्भगृह कायम असून पुढील संभामंडप नव्याने बांधण्यात आला आहे. या मंदिरालगत असलेली दीपमाळ, अल्लाउद्दीन खिलजीने पाडल्याची माहीती लोक सांगतात.

**6) जाळीचा देव (श्री चक्रधर स्वामी)- जयदेवाडी:**

जाळीचा देव (श्री चक्रधर स्वामी) हे ठिकाण जयदेववाडी म्हणुन ओळखले जात. जयदेववाडी हे महानुभाव पंथाचे महत्वाचे श्रध्दास्थान आहे, हे ठिकाण जालना औरंगाबाद व बुलडाणा जिल्हयाच्या संगम जवळ असलेले ठिकाण आहे. श्रीचक्रधर स्वामी भ्रमण करीत या ठिकाणी आले असताना या ठिकाणी घनदाट झाडी होती. झाडी मध्ये वेलीची जाळी होती. त्यामध्ये वाघीणीची दोन पिल्ले होती. चक्रधरांनी उचलून खेळविले. चक्रधरांनी त्या वाघीणीमधील क्रुरता कमी केली असे महानुभाव पंथीय या ठिकाणाविषयी सांगतात. या ठिकाणी महानुभाव पंथीयांनी मंदिर बांधले आहे. हे महानुभाव पंथीयांचे पवित्र व महत्वपुर्ण स्थान आहे.

**7) मत्सोदरी देवीचे मंदिर- अंबड:**

अंबड येथे मत्सोदरी डोंगर आहे. डोंगराचा आकार माशाच्या आकारा प्रमाणे आहे. या डोंगरातील नैसर्गीक गुहेत देवीच्या मंदिराचा गाभारा आहे. 'अंबरीष' ऋषीनी उग्र तपश्चर्या साठ वर्ष केली. त्यामुळे जगदंबा प्रसन्न झाली. अंबरीष ऋषीनी महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती अशा तीन स्वरुपात तिची स्थापना या डोंगरावर केली.'[6] 'येथे मातापूर, तुळजापूर व कोल्हापूर येथील देवीचे ठाणे पण मानले जाते. या तीन स्वरुपातील देवी मंदिराचे अवशेष डोंगरमाथ्यावर आढळून येतात. आज आस्तित्वात असलेले देवीचे मंदिर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधले असून त्यामध्ये वरील तीन देवीचे तांदळे स्थापन केले आहेत.

**8) खडकेश्वर मंदिर-जामखेड:**

गावाच्या जवळ असलेल्या जांबुवंत लेण्यावरुन या गावाचे नाव 'जामखेड' पडले आहे. त्याचे पुर्वीचे नाव 'जांबूरखेड' असे होते. नंतर त्यांचे नाव 'जामखेड' असे झाले. धामवती नदीच्या डाव्या काठावर हे मंदिर आहे. मंदिर हे पश्चिमुखी आहे. मंदिराची बऱ्याच

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

प्रमाणात पडझड झालेली आहे. खडकेश्वर मंदिरात 'मुखमंडप', मंडप, अंतराळ व गर्भगृह अशी रचना आहे. मुखमंडपाचे छत सपाट असून छताची पारंपारीक रचना आहे. मंदिराचे मुळचे शिखर पडल्यामुळे स्थापत्य शैली निश्चित सांगता येत नाही.

मंडप हा पुर्व-पश्चिम 24 फुट रुंद तर दक्षिण-उत्तर 28 फुट लांब आहे. मंदिरात एकूण 20 स्तंभ आहेत. स्तंभाच्या शीर्षावर यक्ष कोरलेले आहेत. स्तंभावर महाकाव्यातील प्रसंग शिल्पांकित केलेले आहेत. अंतराळ पुर्व-पश्चिम साडे आठ फुट तर दक्षिण-उत्तर साडे दहा फुट लांब आहे. अंतराळाचा घुमट लहान आहे. गर्भगृह, नंदीमंडप आहे. नंदीमंडप मोडकळीस आला आहे. परंतू नंदी सुस्थितीमध्ये आहे.

**8) श्री विज्ञानेश्वराचे मंदिर- आपेगाव:**

अंबड तालुक्यातील गोदावरीच्या उत्तर काठावर आपेगाव हे विज्ञानेश्वराचे म्हणून ओळखल्या जाते. येथील शिवस्थानाला विविध पैलु असून त्यांच्या अनेक अंगानी विचार करावा लागतो. 'आपेगाव येथील शिवस्थान हे स्वयंभू स्थान आहे. त्याला नंतर शिवपिंडाचे स्वरुप देण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसते.'[7]

मुळात एकाश्म पाषाणातील पिंड व योनी भाग आहे. पिंडीसमोरील योनीभागात दोन छिद्रे आहेत. शिवपिंडीला चारही बाजुंनी शिवमुखाचा आकार देण्याचा प्रयत्न झाला असावा. 'सदाशिव' प्रकारात येणारी ही शिवपिंड आहे. यादवकाळात या ठिकाणी मंदिर बांधले होते. त्यावेळी या स्थानाचे नाव वंकनाथ असे होते. वंकनाथ ही शिवाचेच एक नाव. पुढे मात्र यांचे संस्कृत स्वरुप विज्ञानेश्वर झाले. त्यावेळेसचा शिलालेख गर्भगृहाच्या बाजुस बांधकामात बसविलेला आहे. तो लेख असा.

'श्रीवंकनाथदेवाचे चरण ओलगा हो | से जन्मजत्म का
यरछ धारुपंडित अन्वय पय | पंडितसु षेईदेओ पंडितु-जी
ऊओलग अवधारिजे महाप्रसादु || कालांतरी आंत फे
डी तेआ श्रीगिरीराजदेवीची आण || पालितां भले ही ||'[8]

मुलत: लेखात कुठेही काळाचा उल्लेख नाही. पण एकूण अक्षरावरील व यादव कालीन रुढ देवनागरी लिपीतील हा डॉ. तुळपुळे यांनी शके 1100 (इ.स.1178) असा निश्चित केला आहे.

**निष्कर्ष:**

जालना जिल्ह्याला जसा धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा दिसून येतो, आमरिष ऋषीची तपोभुमी म्हणून अंबडचे प्राचीन काळापासून महत्व आहे. दत्तात्रेयाप्रती असलेली महानुभाव पंथीयांचा श्रध्दाभाव स्पष्ट दिसतो. तसेच महानुभाव पंथीयांची अनेक स्थळे पवित्र आहेत. कारण श्री चक्रधर स्वामींनी त्या ठिकाणी वास्तव केले होते. जसे जयदेववाडी हे ठिकाण होय. तसेच शैव व वैष्णव पंथीयाची हेमाडपंथीय मंदिरे मोडकळीस आलेली आहेत. तसेच मधल्या काळात शैव व वैष्णव संप्रदाय हे सुध्दा एकमेकांच्या धार्मिक स्थळावर अतिक्रमण करुन स्वत:च्या पंथाचे वर्चस्व केले आहे. जसे अन्वा येथील शिव मंदिर हे मुळात वैष्णव देवीचे होते. तर राजुर येथील विठ्ठल मंदिर हे पुर्वीचे शिव मंदिर होते. यावरुन हिंदुधर्मातही एकमेकावर अतिक्रमण केलेले आहे.

**संदर्भ सुची:**

1. Thosar H.S. 'Historical Geography of Maharashtra and Goa' P.451
2. पाठक अरुणचंद्र शं. 'गोदावरी खोरे- एक सांस्कृतिक अभ्यास' अप्रकाशित शोधप्रबंध
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, 1985, पृ.361
4. Deglurkar G.R., 'Temple Architecture and Sculpture of Maharashtra' Nagpur, 1974 P.32
5. देगलुरकर गो.बा., 'अन्वा येथील शिवमंदिर- एक पुनर्विचार', विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिकांक, नागपूर, 1973, पृ.151
6. पाठक अरुणचंद्र, 'स्थानपोथी'- एक पुरात्वीय अभ्यास (यादवकालीन महाराष्ट्र)', महाराष्ट्र राज्य
7. साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथम आवृत्ती, 2013, पृ.310
8. गोसावी मधुकर- 'श्री मत्स्योदरी देवी महिमा, श्री ऑफसेट प्रिंटर्स, औरंगाबाद, शके 1927, पृ. 6-7.
9. डॉ. पाठक अरुणचंद्र शं. – स्थानपोथी, पुर्वोक्त, पृ. 301.
10. तुळपुळे शं.गो., 'प्राचीन मराठी कोशिव लेख', पुणे विद्यापीठ, पुणे, 1993 (लेख-75)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन विकासात वाहतूक साधनांचे योगदान

**प्रा. डॉ. प्रदीप बन्सीधर सिसोदिया**
श्री दत्त, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हदगाव जि. नांदेड
**Email:** pradipsisodia@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180111
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 42-45
January 2026
**Submitted:** 11 Dec. 2025
**Revised:** 21 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन क्षेत्र हे जगातील सर्वात वेगाने वाढणारे उद्योग क्षेत्र बनले आहे. 21 व्या शतकात पर्यटन हा एक स्वतंत्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून झपाट्याने विकसित झाला आहे. पर्यटनाच्या वाढीसाठी वाहतूक व्यवस्था ही मुख्य आधारस्तंभ बनली आहे. प्राचीन काळी पर्यटन भौतिक असुविधेमुळे खडतर होते. दळणवळणाच्या क्षेत्रात क्रांती झाल्यामुळे आज अत्याधुनिक वाहतुकीच्या व्यवस्था पर्यटकांसाठी उपलब्ध झाल्या आहेत. पर्यटकांना गंतव्य स्थानापर्यंत पोहोचण्यासाठी वाहतुकीचे विविध प्रकार महत्त्वाची भूमिका पार पाडतात.*

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून भारतीय भूमी विदेशी पर्यटकांसाठी आकर्षणाची प्रमुख केंद्र होते. भारतीय संस्कृती तत्कालीन जगतात प्रभावशाली होती. हिंदू संस्कृती बौद्ध संस्कृती चे आकर्षण चीन व आग्नेय आशियायी प्रांतामध्ये होते. प्राचीन काळात काही चिनी पर्यटक बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी भारतात आले होते. अतिशय खडतर आणि प्रतिकूल हवामान व भाषेचा प्रश्न असून देखील फाहीयान, युएन संग, यांनी भारताला भेट दिली. त्यांच्या प्रवास वर्णनात तत्कालीन दळणवळणाची साधने आपल्याला ज्ञात होतात. घोडे, खेचर, याक व पायी प्रवास त्यांनी पूर्ण केला. मध्ययुगीन काळात भारताला भेट देणारे अनेक पर्यटक मध्य आशियातील व अरब देशातील होते सोबतच युरोपमधील देखील होते. यात मार्कोपोलो, इब्नबतूता, निकीतीन बारबोसा, अब्दुल रझाक, इत्यादींचा उल्लेख होतो. हे परकीय प्रवासी जल मार्गाने भारतामध्ये आले होते. यातील बराचसा प्रवास बैलगाडी, घोडागाडी, उंट, घोडे, खेचर, याक, उंट, पालखी, डोली, व जलवाहतुकीच्या बाबतीत छोट्या शीडांच्या नौका असणाऱ्या जहाजांचा वापर करण्यात आला होता. औद्योगिक क्रांतीनंतर मानवी जीवनात अमुलाग्र बदल झाले. त्याच प्रकारे दळणवळणाच्या साधनात देखील अनेक बदल आपल्याला आढळून येतात. वाफेच्या शक्ती चा वापर करून रेल्वे तसेच आगबोटी द्वारे प्रवासाचे साधन उपलब्ध झाले. हवाई क्षेत्रात विमान वाहतूक सुरू झाली. वाहतूक व्यवस्थेत झालेले हे क्रांतिकारी बदल पर्यटन उद्योगाच्या वाढीस अत्यंत अनुकूल ठरले. वाहतूक व्यवस्था यात झालेले क्रांतिकारी बदल पर्यटन उद्योगाच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरले आहेत. या प्रस्तुत संशोधनात पर्यटन क्षेत्रातील प्रमुख वाहतूक प्रकार, तसेच नव्या आधुनिक वाहतूक तांत्रिक प्रकारांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्देश :**

- पर्यटन ही संकल्पना समजून घेणे
- इतिहासातील वाहतुकीच्या साधनांचा आढावा घेणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
प्रा. डॉ. प्रदीप बन्सीधर सिसोदिया, श्री दत्त, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हदगाव जि. नांदेड

**How to cite this article:**
*सिसोदिया, . प्रदीप . बन्सीधर. (2026). पर्यटन विकासात वाहतूक साधनांचे योगदान. Journal of Research & Development, 18(1(V)), 42–45.* https://doi.org/10.5281/zenodo.18477926

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18477926
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- पर्यटन उद्योगात वाहतूक प्रकाराचे योगदान अभ्यासणे.
- पर्यटन क्षेत्राच्या वाढीसाठी वाहतूक सुविधांच्या सुधारणा अभ्यासणे.

**गृहीतके:**

- पर्यटन हे पूर्वापार मानवांची सहज प्रवृत्ती आहे.
- पर्यटन उद्योगात वाहतूक साधनांमुळे गती प्राप्त झाली.
- वाहतूक साधनांमध्ये सुधारणा झाल्यामुळे पर्यटन क्षेत्राचा विकास झाला आहे.

**अध्ययन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. अध्ययन विषयाशी निगडित प्रकाशित लेख, अप्रकाशित लेख, मासिके, वृत्तपत्रे, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट व इतर संशोधकांचे संशोधन इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे.

**पर्यटनाचा अर्थ:**

पर्यटन हा शब्द Tour या शब्दापासून निर्माण झाला आहे. Tour हा शब्द लॅटिन भाषेतील टॉरनस या शब्दापासून आलेला आहे. टूर या शब्दाची अजून एक उत्पत्ती हिब्रू भाषेतील Tour या शब्दापासून मानली जाते. Tornous चा अर्थ वर्तुळ किंवा वर्तुळाकार या प्रकारापासून वर्तुळाकार प्रवास हा शब्द रूढ झाला आहे. पर्यटक ज्या ठिकाणापासून पर्यटना सुरुवात करतो त्याच ठिकाणी विविध स्थानांना भेटी देऊन पर्यटक परत येतो त्यास वर्तुळाकार प्रवास म्हणतात. विश्व पर्यटन संघटना: जेव्हा लोक 24 तासापेक्षा जास्त व एक वर्षापर्यंत आपल्या कार्यस्थळापासून बाहेर पडतात या प्रकाराला पर्यटन म्हणता येईल. हुंजीकर व क्राफ्ट: पर्यटन म्हणजे असा एक कार्यक्रम ज्याचा संबंध परकीय प्रवास व वास्तव्य याच्याशी आहे. हे वास्तव्य अल्पकाळासाठी मोबदला देऊन केलेले असते.

**पर्यटन आणि परिवहन:**

परिभाषेनुसार, पर्यटनामध्ये परिवहन हा एक अत्यावश्यक घटक आहे, जो पर्यटनस्थळांना प्रादेशिक व आंतरप्रादेशिक पातळीवर परस्परांशी जोडतो आणि पर्यटकांना आकर्षणं, निवास व विविध मनोरंजनात्मक सेवांपर्यंत पोहोचवतो. रोबिन आणि डुवर (2011) यांच्या मते, परिवहन आणि पर्यटन क्षेत्रांमध्ये एक मजबूत परस्परावलंबित्व आहे. कारण एखाद्या स्थानाची जीवनशक्ती आणि आकर्षण हे परिवहनावर अवलंबून असते, तसेच पर्यटक त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी परिवहन साधनांवरच अवलंबून असतात. **परिवहन** हा पर्यटनाचा मूलभूत घटक आहे. त्यासोबतच आकर्षणे, निवास आणि सुविधा हे इतर तीन आवश्यक घटक आहेत. पर्यटनाच्या यशस्वीततेत परिवहनाचा मोठा वाटा आहे. हाच तो माध्यम आहे ज्याद्वारे पर्यटक भौतिक स्वरूपात पर्यटनस्थळांवर पोहोचतात. प्रवासादरम्यान वापरलेली वाहने, प्रवासाचा कालावधी आणि त्यामध्ये होणारा अनुभव हा पर्यटकांच्या समाधानाचा महत्त्वाचा भाग असतो. प्रवास जसा वाढतो तसा पर्यटक प्रवास अधिक मनोरंजक, आरामदायी आणि संस्मरणीय करण्याचा प्रयत्न करतात. योग्य परिवहन माध्यम त्यांच्या विश्रांतीच्या भावनेला प्रोत्साहन देते आणि त्यामुळे ते स्वतःमध्ये एक पर्यटन आकर्षण ठरते.

**कोवाल्स्की व लेन्नोसेविक:** दोन स्पर्धात्मक पर्यटन स्थळांपैकी, ज्याठिकाणी उत्तम परिवहन सुविधा आहेत ते स्थान, कमी पोहोचक्षम असलेल्या ठिकाणांच्या तुलनेत अधिक विकसित होण्याची आणि पर्यटकांना आकर्षित करण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे परिवहनाचे स्थान, क्षमता, कार्यक्षमता आणि उपलब्ध सुविधा कोणत्याही पर्यटनस्थळाच्या प्रगतीमध्ये प्रमुख भूमिका बजावतात. परिवहनाच्या विकासासाठी सशक्त पायाभूत सुविधा आवश्यक असतात. कारण परिवहन व्यवस्थेमध्ये विविध साधनांचा समावेश असून, पर्यटकांसाठी हवाई प्रवास, रेल्वे प्रवास, रस्ते वाहतूक, जलवाहतूक, सायकल प्रवास, घोडागाडी, हेलिकॉप्टर टूर, केबल कार आणि फ्युनिक्युलर, कार आणि मोटार प्रवास आणि कोच पर्यटन यासह अनेक प्रकारची वाहतूक उपलब्ध आहे.

**रस्ते वाहतूक (Road Transport):** वाहन व प्रवासी यांना एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याच्या सोयीसाठी तयार करण्यात आलेले जमिनीवरील मार्ग. रस्ते हे दळणवळणाचे महत्त्वाचे साधन आहे. भारतातील रस्ते वाहतुकीचा इतिहास भारतीय संस्कृती इतका जुना आहे. सध्या भारतामध्ये 45.3 लाख कि. मी. लांबीचे जगातील सर्वात मोठे रस्त्यांचे जाळे आहे. 1990 पासून भारतात नवीन महामार्ग निर्मिती सुरू झाली. रस्ते बांधकाम विकासात नवीन फुलांची निर्मिती करण्यात आली. अनेक ठिकाणी बोगद्यांची निर्मिती करण्यात आली. यामुळे पर्यटकांना रस्ते मार्गाने पर्यटन स्थळाला भेट देण्यासाठी अधिक सुलभता निर्माण झाली. रस्ते वाहतुकीच्या विकासामुळे दुर्गम पर्यटन स्थळापर्यंत थेट संपर्क प्रस्थापित झाला. केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री, यमुनोत्री, चारधाम परियोजना यापूर्वी अतिशय खडतर मानली जात होती. रस्ते विकासामुळे यात सुलभता निर्माण झाली. रामायण सर्किट, बुद्धा सर्किट, कृष्णा सर्किट, व पूर्वोत्तर सर्किट साठी रोड मॅप तयार करण्यात आला. यामुळे पर्यटन स्थळाला भेट देण्याचा प्रवासाचा कालावधी कमी

झाला. आज महाराष्ट्रातील समृद्धी महामार्ग, दिल्ली मुंबई एक्सप्रेस वे, द्वारका एक्सप्रेस वे, गंगा एक्सप्रेस वे या महामार्गामुळे प्रवासाचा कालावधी मोठ्या प्रमाणामध्ये कमी झाला. नवीन महामार्गाची निर्मिती सुरू आहे. मुंबई गोवा महामार्ग, शक्तिपीठ महामार्ग, यासारखी अनेक प्रकल्प, भारतमाला परियोजना या योजनेत सीमा रस्ते, किनारी प्रदेश तसेच बंदरांना जोडणारी राष्ट्रीय महामार्ग नेटवर्क, ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे चा समावेश होतो. यामुळे दळणवळण क्षेत्रात प्रचंड बदल झाले. याचा फायदा पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी झाला.

**रेल्वे वाहतूक (Railway Transport):** रेल्वे प्रवास आरामदायी, सुरक्षित आणि किफायतशीर प्रवास म्हणून ओळखला जातो. पर्वतीय भागात दार्जीलिंग, माथेरान माथेरान येथे हेरिटेज रेल्वे ची सोय करण्यात आली. विस्टा डोम कोच या नवीन प्रकाराचा रेल्वे प्रवासामध्ये समावेश करण्यात आला. ऐतिहासिक रेल्वेगाड्या आणि स्थानिक रेल्वेसेवा 1980 च्या दशकात पर्यटन उत्पादन म्हणून लोकप्रिय झाल्या, जरी त्यांची सुरुवात 1870 च्या दशकात झाली, जेव्हा पर्यटकांनी डोंगराळ प्रदेशातील नैसर्गिक सौंदर्याचा अनुभव घेणाऱ्या प्रवासांना सुरुवात केली. ऐतिहासिक रेल्वेगाड्या विशेष कार्यक्रमांच्या निमित्ताने तसेच विशिष्ट पर्यटन अनुभवासाठी वापरल्या जातात. भारतातील पर्यटकांसाठी लक्झरी शाही रेल्वे. भारतातील उच्चभ्रू पर्यटक वर्गासाठी भारतीय रेल्वेने काही शाही रेल्वे आयोजित केल्या आहेत. या रेल्वेचा फायदा भारतीय तसेच विदेशी पर्यटक घेतात. पॅलेस ऑन व्हील्स राजस्थानी संस्कृती ची माहिती यामुळे होते. तत्कालीन शासकांच्या खाजगी कोचेस चा वापर यासाठी करण्यात आला. नवी दिल्ली पासून जयपुर, सवाई माधोपुर, चित्तोडगढ, उदयपूर, जैसलमेर, जोधपुर, आग्रा येथील ऐतिहासिक स्मारके , पर्यटकांना याद्वारे पाहायला मिळतात I.R.C.T.C. महाराजा एक्सप्रेस भारतातील सर्वात शाही रेल्वे आहे. यातील शाही पर्यटकांना 12 पर्यटन स्थळे ज्यात राजस्थान, मध्य प्रदेश येथील पर्यटन स्थळाचा अनुभव घेता येतो. The Golden Chariot या शाही रेल्वेद्वारे दक्षिण भारतातील कर्नाटक, गोवा, केरळ, तमिळनाडू आणि पांडिचेरी राज्यातील पर्यटन स्थळ पहावयास मिळतात. प्रवासादरम्यान घनदाट जंगले, धबधबे, या नैसर्गिक वातावरणाचा अनुभव घेता येतो. द डेक्कन ओडिसी पॅलेस ऑन व्हील्स च्या आधारावर महाराष्ट्रातील पर्यटन स्थळ पाहण्यासाठी या रेल्वेचे आयोजन केले आहे यात मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा, औरंगाबाद, अजंठा ,एलोरा, व पुणे येथील लोकप्रिय पर्यटन स्थळ पाहता येतात.

उच्चभ्रू लोकांसह लक्झरी गाड्यांसाठी एक आशादायक भविष्य पाहतात. तथापि, वाहतुकीचे साधन म्हणून, रेल्वेमध्ये पर्यटकांचे आकर्षण बनण्याची क्षमता आहे, विशेषतः लक्झरी वाहतूक सेवांच्या बाबतीत. पर्यटकांमध्ये या प्रकारच्या प्रवासाची वाढती मागणी लक्षात घेता, रेल्वे आणि पर्यटन उद्योग दोघांनाही फायदा होईल असे भविष्य घडवता येईल. उच्च दर्जाच्या सुविधा, उत्तम भोजन, आणि विशेष सजावट असलेली प्रवासव्यवस्था ही लक्झरी परिवहनाची वैशिष्ट्ये आहेत .

**हवाई वाहतूक:** विमान वाहतूक क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेतील सर्वात जलद वाढणाऱ्या क्षेत्रापैकी एक असून हवाई वाहतूक सेवा , व्यापार, दळणवळण यात महत्त्वाचे योगदान देत आहे .विमान वाहतूक भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देशांतर्गत विमान वाहतूक बाजार बनला आहे. देशांतर्गत विमानतळांची संख्या 2014 मध्ये 74 होती. 2025 मध्ये ती 163 झाली आहे. 2047 पर्यंत सरकारचे उद्दिष्ट 400 विमानतळ पर्यंत वाढवण्याचे आहे. 21 ऑक्टोबर 2016 रोजी उडान ही महत्त्वाकांक्षी योजना सरकारने सुरू केली. ही योजना विशेषता पर्यटन क्षेत्रासाठी वरदान ठरली. देशभरातील पर्यटन स्थळे ही हवाई प्रवासाने जोडल्या गेली. दुर्गम क्षेत्रातील पर्यटन क्षेत्राला उडान योजनेअंतर्गत मोठा फायदा झाला. नीती आयोगानुसार, 2019 मध्ये देशांतर्गत प्रवाशांनी एकूण पर्यटन खर्चाच्या 83 टक्के पेक्षा जास्त वाटा उचलला होता, जो 2018 पर्यंत जवळपास 89 टक्के वाढण्याची अपेक्षा आहे. उडान या उपक्रमामुळे पायाभूत सुविधातील अंतर भरून निघाले आणि सर्वसामान्य पर्यटकांना हवाई प्रवास परवडणारा सुलभ झाला. दुर्गम असणारी पर्यटन स्थळे कुल्लू, शिलॉंग, सेवन सिस्टर्स, पर्यटकांच्या आवाक्यात आले. उडान योजनेअंतर्गत 649 मार्ग कार्यान्वित करण्यात आले. यात 93 विमानतळ, 02 पाण्यावरचे विमानतळ आणि 15 हेलिपॅड जोडण्यात आले. यात बारा विमानतळ व हेलिपॅड हे ईशान्य भारतात आहेत. या योजनेचा लाभ अंदमान, निकोबार आणि लक्षद्वीप बेटाना झाला.

**जल वाहतूक :** आधुनिक युगासोबत मार्गक्रमण करत असताना जल परिवहन क्षेत्रात प्रवासाला चालना मिळाली आहे. पर्यटन क्षेत्रात या सेवेची मागणी वाढली आहे. भारतीय पर्यटन क्षेत्रात ही सेवा येत्या दशकात (१०) दहा पटीने वाढण्याची शक्यता आहे. भारतीय पर्यटन उद्योगात क्रूज सेवेला उज्वल भविष्यकाळ आहे. साडेसात हजार किलोमीटर सागरी सीमा तसेच गंगा यमुना, ब्रह्मपुत्रा यासारख्या विशाल नद्यामुळे ही संधी प्राप्त होऊ शकते. महासागर व नदी भ्रमण या दोन्ही क्षेत्रात आधुनिक पायाभूत सेवेसह क्रूज परिवहन सेवा मजबूत करण्यासाठी भारतीय पर्यटन मंत्रालयाने नियोजन केले आहे. सद्यस्थितीत क्रूज पर्यटक 0.4 मिलियन डॉलर पासून 4 मिलियन डॉलर वाढवण्याचा प्रयत्न आहे. येत्या काही वर्षात क्रूज पर्यटनाची आर्थिक उलाढाल दहा मिलियन यु एस डॉलर वरून 5.5 बिलियन यु

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

एस डॉलर वाढेल असे नियोजन आहे. यासाठी भारत सरकारने क्रूज पर्यटन विकासासाठी एक टास्क फोर्स ची निर्मिती केली आहे. सक्षम तंत्र बनवण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ञांना सामील करून सल्लागार समिती तयार करण्यात आली. कोस्टल डेस्टिनेशन सर्किट परिवहन सेवेसाठी चार विभाग तयार करून कोस्टल डेस्टिनेशन सर्किट विकसित करण्यात आले.

1) गुजरात तीर्थयात्रा
2) पश्चिमी तट सांस्कृतिक आणि निसर्ग पर्यटन
3) दक्षिणी तट आयुर्वेदिक पर्यटन
4) पूर्वी तट ऐतिहासिक वारसा

मुंबई ते कोस्टानिओ क्लासिका क्रूज- या क्रूज माध्यमातून भारताच्या पश्चिमीतटा ची सफर पर्यटक करू शकतात. याचा कालावधी तीन ते सात दिवस आहे. मुंबई, गोवा, कोचीन तसेच मालदीव इतकी याची व्याप्ती आहे. या प्रवासात पश्चिमी समुद्र तट, किनारपट्टीवरील प्राचीन मंदिरे, अभयारण्य व इतर पर्यटन स्थळांना भेटी देता येतात. या क्रूज वर कसीनो, स्पा, सिनेमा, हॉल या सेवा मिळतात. ही सेवा डिसेंबर पासून ते मार्च पर्यंत चालते. केरळमध्ये वेसल वृंदा क्रूज या नावाने पाण्यातील पंचतारांकित हॉटेल प्रमाणे सुविधा असलेली ही क्रूज अल्लपी ते वायनाड पर्यंत जलप्रवासासाठी पर्यटकांना सोयीस्कर आहे. इथे या क्रूजवर 'कथकली मोहिनीअट्टम' या नृत्याचा अनुभव, आनंद पर्यटकांना मिळतो. परमहंस विवाडा क्रूज या माध्यमातून चार दिवसीय जलप्रवासात सुंदरबन टायगर रिझर्व सोबत भगवंतपुर द्वीप व इकोसिस्टीम ची अनुभूती घेता येते. विविध पशुपक्षी तटीय मंगरूळ जंगल पर्यटकांना पाहता येते. आसाम महाबाहू क्रूज-उत्तर पूर्वी भारत दर्शनासाठी पर्यटकांना ही उत्तम संधी आहे. दोन ते सात दिवस हा प्रवास कालावधी आहे. यात पीकॉक आयलँड प्रसिद्ध काझीरंगा नॅशनल पार्क पाहता येते. गंगा विलास क्रूज-वाराणसी ते दिब्रुगड आसाम 3200 किलोमीटर चा नदी प्रवास या क्रूज मार्फत होतो शाही जलप्रवासाचा आनंद पर्यटक लुटू शकतात. प्रति दिवस वीस ते पन्नास हजार रुपये हा खर्च आहे. पटना साहेब गंज कलकत्ता धाका आसाम पर्यंत याचा पल्ला आहे. सोबतच राष्ट्रीय उद्यान व विश्व प्रसिद्ध स्थळांची अनुभूती या प्रवासामध्ये घेता येते.

**पर्यटनावर वाहतुकीचा प्रभाव:**

आधुनिक परिवहन व्यवस्थेमुळे पर्यटन स्थळापर्यंत पोहोचण्यासाठी सुलभता निर्माण झाली. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. रोजगार निर्मितीमध्ये वाढ झाली तसेच सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या देशाच्या एकात्मतेसाठी ती मदत पूर्ण ठरली.

**निष्कर्ष :**

पर्यटन उद्योगात वाहतुकीतील साधनांमध्ये प्रगत सुधारणा झाली. त्यामुळे पर्यटन क्षेत्राचा विकास झालेला दिसून येतो. पर्यटन उद्योगाचा पाया म्हणजे वाहतूक व्यवस्था. आधुनिक तंत्रज्ञानामुळे सुरक्षित वेगवान व स्वस्त वाहतूक व्यवस्था उपलब्ध झाली तर पर्यटकांचा यासाठी फायदा होतो. भविष्यात वाहतूक व्यवस्था अधिक सर्व समावेशक आणि प्रगत होण्याची शक्यता आहे.

**संदर्भसूची :**

1. राजेश कुमार व्यास, भारत मे पर्यटन, विद्या विहार नई दिल्ली, 2009.
2. Cooper C. tourism principles and practices, Pitman, London 1993.
3. लोकराज्य, पर्यटन विशेष, ऑक्टोबर, 2009. लोकप्रभा, पर्यटन, ऑगस्ट 2017.
4. पिसे. जी .एस. नानवटे एस .बी. पर्यटन शास्त्र एज्युकेशनल पब्लिशिंग हाऊस न्यू दिल्ली 2 2025.
5. घारपुरे विठ्ठल, पर्यटन भूगोल, पिंपळापुरे पब्लिकेशन कं. नागपूर. 2001.
6. बंसल सुरेशचंद्र, पर्यटन भूगोल एवम यात्रा प्रबंध, मीनाक्षी प्रकाशन मेरठ.
7. Final Report, Role of luxury Tourist Trains in promoting Tourism in India, Indian Institute of Tourism and Traval Management, Gwalior.
8. Report Ministry of Ports Shipping and Waterways in Government of India New Delhi
9. http://www..pib.gov.in/pressReleasePage.aspxprid2123537
10. Udaan Yojana Ministry of Civil Aviation ttps://www.civilaviation.gov.in
11. Sagermala pib.gov.in Ministry of ports, shiping and waterways.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# मराठवाडातील पर्यटन क्षेत्र - समोरील समस्या व आव्हाने- एक अभ्यास

**डॉ. राजाराम राय पिंपळपल्ले**
इतिहास विभाग प्रमुख आदर्श महाविद्यालय हिंगोली

**Manuscript ID:**
JRD -2026-180112
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 46-49
January 2026
**Submitted:** 11 Dec. 2025
**Revised:** 21 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*मराठवाड्यातील पर्यटन स्थळांच्या प्रचार व प्रसारा बरोबरच मराठ्यातील या पर्यटन स्थळांना विकसित करण्यासाठी शासनाकडून जशा उपाययोजना करणे गरजेचे आहे त्याचबरोबर विविध सेवाभावी संस्था NGO बरोबरच खाजगी व सार्वजनिक सेवांच्या मार्फत मराठवाड्यातील पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न व्हावा मराठवाड्यातील अनेक ऐतिहासिक सांस्कृतिक धार्मिक व कृषी पर्यटन केंद्र आहेत त्यांच्या समोरील आव्हाने व समस्या दर सोडवल्या तर इतर कोकण आणि इतर भारतातील पर्यटन स्थळाप्रमाणेच मराठवाड्यातील पर्यटन स्थळालाही मोठ्या प्रमाणात चालना होऊन येथे अनेक लघुउद्योगां बरोबर व्यवसायिकांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होतील व मराठवाडा एक भारतातील प्रमुख पर्यटन विभाग म्हणूनही ओळखला जाईल यासाठी सर्वच स्तरातील घटकांनी प्रयत्न करण्याचे अत्यंत आवश्यक आहे पर्यटनामुळे फक्त वाहतूक या व्यवसायाला चालना मिळतो असे नाही तर याबरोबरच इतरही व्यवसायाचे संधी प्राप्त होऊन येथील स्थानिकांच्या उदरनिर्वाचे स्थानिकांच्या व्यवसायांना चालना मिळवून उद्योग क्षेत्राला ही चालना मिळू शकते म्हणून यावरही सर्वच प्रयत्न करून मराठवाड्यातील पर्यटन हे एक जागतिक पर्यटन कसे कडे व जागतिक नकाशावर मराठवाड्याचे नाव कसे याविषयीचे सर्वच घटकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे*

**प्रस्तावना:**

प्राचीन कालखंडापासून भारत हा जगाच्या दृष्टीने आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे भारतामध्ये असलेल्या विविध जाती धर्म रूढीपरंपरा यांचे वास्तव्य त्याचबरोबर अनेक विविधता यांनी भारत जगाच्या पाठीवर प्रसिद्ध आहे भारताची प्राचीन सभ्यता जगातील पर्यटनाला आकर्षित करणाऱ्या प्राचीन भारतातील संस्कृती येथे असलेली हस्तकला कौशल्य विविध नैसर्गिक संसाधने व किल्ले स्मारके लेणी पुरातनस्थळे वास्तु व वस्तू तसेच इतर काही पर्यटन स्थळे यातून नवनवीन पर्यटनाची संधी जागतिक स्तरावर भारतामार्फत निर्माण झाली आहेभारतीय पर्यटन परंपरेचे प्रामुख्याने प्राचीन काळापासून औपचारिक रूपाने एक उद्योग म्हणून भारतात दिसून येतो पर्यटनात सर्व प्रकारच्या वर्गाचा समावेश त्यामध्ये असल्याचे दिसून होते. भारतात असलेली सामाजिक धार्मिक आर्थिक विषमता त्याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक ठेवून ही पर्यटकांना आकर्षित करणारी आहे भारतामध्ये प्राचीन कालखंडापासून अनेक पर्यटक येऊन भारतीय धर्म परंपरा व पर्यटन याविषयी अभ्यास करण्यासाठी आलेले आहेत ज्यामध्ये चीन मध्ये आशिया युरोप आफ्रिका या खंडातून अनेक प्रवासी भारतात येऊन भारतीय धर्म परंपरा व भारतीय संस्कृतीचा अभ्यासण्यासाठी येऊन त्यांनी पर्यटनाचा विकासाला चालना दिली आहे. भारतीय पर्यटनाबरोबरच महाराष्ट्रातही पर्यटन क्षेत्राला मूलभूत सुविधाच्या अभावामुळे या उद्योगाला विकसित करण्यात अनेक अडचणी निर्माण झाले आहेत भारतातील व विशेषता महाराष्ट्रातील विमानतळ वाहतूक सुविधा हॉटेल्स किंवा निवास व्यवस्था यांचा विकास पूर्णपणे झालेला दिसून येत नाही.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18477952
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
डॉ. राजाराम राय पिंपळपल्ले, इतिहास विभाग प्रमुख आदर्श महाविद्यालय हिंगोली

**How to cite this article:**
*पिंपळपल्ले, . राजाराम . राय . (2026). मराठवाडातील पर्यटन क्षेत्र - समोरील समस्या व आव्हाने- एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 46–49.* https://doi.org/10.5281/zenodo.18477952

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

भारतात व विशेषता महाराष्ट्रात पर्यटन क्षेत्राला जर चालना द्यायचे असेल तर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत विविध क्षेत्रात महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र कोकण विदर्भ मराठवाड्यात या सोयी सुविधांचा विकास करणे फार महत्त्वाची जबाबदारी आहे महाराष्ट्रातील पर्यटन विकासासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत मोठ्या प्रमाणात तसे उपाययोजना करणे आवश्यक आहे प्रस्तुत शोधनिबंधात मराठवाड्यातल्या पर्यटन विकासातील पर्यटन स्थळे समस्या व उपाय योजना या संदर्भाची मांडणी करण्याचा हेतू प्रस्तुत संशोधनाचा आहे.

**उद्दिष्टे:**

- मराठवाड्यातील पर्यटन यावर अभ्यास करून त्या स्थळांच्या संदर्भात ज्ञान अवगत करणे
- मराठवाड्यातील पर्यटन विकासाच्या समस्यांचा अभ्यास करून त्यावरील उपाययोजनांची माहिती संकलन करणे
- मराठवाड्यातील पर्यटन क्षेत्रासमोरील असलेले विविध आव्हाने यांचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार असून प्रस्तुत शोधनिबंधासाठी काही प्राथमिक व दुय्यम पुस्तके लेख व इतर साहित्यांचा वापर करून मांडणी केली जाणार आहे

**मराठवाड्यातील पर्यटन**

प्राचीन कालखंडापासून मराठवाड्यात वेगवेगळी ऐतिहासिक वारसा लाभलेला असून मराठवाड्यात असलेल्या सातवाहन राष्ट्रकूट वाकाटक यादव चालुक्य मराठा मोगल व ब्रिटिश कालखंडातील तसेच शीख धर्मातील प्रमुख असलेल्या अनेक स्थळामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना प्राप्त झाली आहे मराठवाड्यातील असलेल्या छत्रपती संभाजीनगर मधील वेरूळ अजिंठा दौलताबाद बीबी का मकबरा पानचक्की यासारख्या पर्यटन स्थळावरच तसेच नांदेड येथील शीख धर्माचे दहावे गुरु  गुरुगोविंद सिंग यांची समाधी ही पर्यटनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध अशा स्थळांपैकी आहेत त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगर मधील पैठण हे मध्ययुगीन कालखंडातील वारकरी संप्रदायाचे प्रमुख स्थळ असेल तरीही प्राचीन कालखंडापासून पैठणला व्यापारासाठी पैठणी साड्या चे माहेरघर म्हणून संबोधले जाते तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पितळखोरा लेणी ही एक महत्त्वपूर्ण स्थळ आहे याचबरोबर कन्नड येथीलच गौताळा अभयारण्य धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव लेणी तुळजापूर भवानी मातेचे मंदिर तसेच नांदेड जिल्ह्यातील नांदेड सचखंड गुरुद्वारा माहूरची साडेतीन शक्तीपीठापैकी रेणुका देवी मराठवाड्यात प्रामुख्याने जर विचार केला तर तीन ज्योतिर्लिंग वेरूळ येथील घृष्णेश्वर परळी येथील वैद्यनाथ व औंढा नागनाथ येथील नागनाथ या ज्योतिर्लिंगाने ही मराठवाड्यात पर्यटन क्षेत्र मोठ्या प्रमाणात व्यापलेले आहे. मराठवाडा महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण प्रदेश असून मराठवाड्याला असलेल्या नैसर्गिक संसाधनाच्या द्वारे मोठ्या प्रमाणात पर्यटनाला चालना देण्यासाठी प्राचीन काळातील असलेल्या राजकीय वारसाने विकसित करण्यास साहाय्य झाले आहे आधुनिक कालखंडातील मराठवाड्यात छत्रपतीसंभाजीनगर जालना बीड धाराशिव नांदेड लातूर परभणी हिंगोली या जिल्ह्यांचा प्रामुख्याने समावेश होतो त्यापैकी या मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर नांदेड ही प्रमुख शेरे असून या शहरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरचे पर्यटन प्रामुख्याने आढळून येते. मराठवाड्यात जरी मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळांची संख्या असेल व पर्यटनाला मोठ्या प्रमाणात व उद्योग क्षेत्राला वाव जरी असेल तरी अनेक समस्यांनी मराठवाडा हा व्यापलेला आहे मराठवाड्यातील असलेली पर्यटन स्थळांची यादी ही फार मोठी जरी असेल तरी अनेक समस्या या मराठवाड्यातील पर्यटन उद्योगाला विकसित करण्यासाठी अडथळे ठरत आहेत कारण मूलभूत सुविधा या पर्यटन विकासासाठी अत्यंत गरजेचे असतात त्या मोठ्या प्रमाणात सुविधांचा अभाव प्रामुख्याने असल्याकारणाने मराठवाड्यातील पर्यटनाला म्हणावे तेवढी चालना ही आढळून येत नाही छत्रपती संभाजीनगर हा जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांमध्ये पर्यटनाच्या समोर अनेक मोठमोठ्या समस्यांनी निर्माण झालेले आहेत त्या समस्यामुळे मराठवाड्यातील इतर जिल्ह्यातील पर्यटनाला पुरेशी चालना दिसून येत नाही.

**वाहतूक व्यवस्था**

पर्यटनासाठी असणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे वाहतूक होय मराठवाड्यात वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते ग्रामीण भागातील स्त्रियांच्या सोयी सुविधांच्या अभाव पर्यटनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे कारण मराठवाड्यात रेल्वे वाहतूक पूर्णपणे विकसित व आधुनिक दिसून येत नाही त्याचबरोबर रस्ते पर्यटन स्थळापर्यंत जाण्यासाठी सुसज्ज अशा प्रकारच्या इतर समस्या ही दिसून येतात त्याचबरोबर पर्यटनाला विकसित करण्यासाठी असलेली विमानसेवा अभावी विदेशी पर्यटकांसाठी आकर्षित करू शकत नाही याचबरोबर जैन धर्माचे प्रमुख केंद्र असलेल्या जिंतूर येथील जैन तीर्थकार पार्श्वनाथ शिल्पाला जाण्यासाठी असलेली अरुंद असा रस्ता आहे.

**निवास व्यवस्था**

वाहतूक व्यवस्थेबरोबरच निवास व्यवस्था देखील पर्यटनासाठी महत्त्वाचे असते पर्यटन स्थळे बघून आल्यानंतर पर्यटकाला रात्री निवासाची व्यवस्था अत्यंत आवश्यक असते ती मराठवाड्यातील प्रामुख्याने असलेल्या छत्रपती संभाजी नगर वगळता इतर असलेल्या पर्यटन स्थळी दिसून येत नाही आणि त्यामुळे प्रावेट खाजगी असलेल्या हॉटेल व्यवसायामध्येही पर्यटकांना पर्यटन दृष्टिकोनातून योग्य असे सेवा पुरविली जात नाही त्यातून पर्यटनाला म्हणावं तेवढी चालना मराठवाड्यात मिळत नाही

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**पर्यटन मार्गदर्शकाचा अभाव:**

मराठवाड्यातील विविध असलेल्या पर्यटन स्थळी देश विदेशातून येणाऱ्या पर्यटकांना त्यांच्या भाषेत तेथील असलेल्या पर्यटन स्थळांची माहिती देण्यासाठी मराठवाड्यात पुरेशी पर्यटन मार्गदर्शक नाहीत त्यातून पर्यटनाला चालना मिळण्यास मोठ्या प्रमाणात अडचण येऊ शकते कारण महाराष्ट्रामध्ये असलेल्या मराठी भाषेमुळे आणि त्या ठिकाणी असले येणाऱ्या विदेशी पर्यटकांना त्यांच्या भाषेत त्या स्थळांची माहिती सांगणाऱ्या मार्गदर्शकांचा अभाव ही प्रामुख्याने एक समस्या पर्यटन विकासासाठी ठरत आहे

**प्रदूषण समस्या**

मराठवाड्यातील पर्यटन स्थळाच्या प्रदर्शनामुळे फार मोठे नुकसान होत आहे उदाहरणात अजिंठा लेणी जसे हवा प्रदूषण जलपुरवठा ध्वनी प्रदूषण यामुळे मोठ्या प्रमाणात तिला धोका निर्माण होत आहे वेरूळ लेणीलाही किती असलेल्या इतर ब्लास्टिंग च्या प्रकरणामुळे आज मोठ्या प्रमाणात याचे नुकसान होत आहे विवेकानकबरावर प्रदूषणाचा प्रतिकूल परिणाम झाल्याचे ही दिसून येत आहे म्हणून मराठवाड्यातील पर्यटन स्थळातील असलेले अनेक किल्ले ही असलेल्या येथील प्रदर्शन समस्येमुळे तसे की प्लास्टिक वृक्षतोड व त्या ठिकाणी असलेल्या वस्तूला झालेली नुकसान यामुळे पर्यटन विकासाला चालना देणे ऐवजी पर्यटनाच्या ऱ्हास होत असल्याचा दिसून येतो

**पर्यटन स्थळांची संवर्धन व संरक्षणाची समस्या**

मराठवाड्यातील पर्यटन स्थळे ही नामशेष होण्याच्या मार्गावर काही अंशी दिसून येत आहेत यामध्ये कंधारचा किल्ला उदगीर किल्ला नंदगिरी किल्ला देवगिरी किल्ला माहूर किल्ला नळदुर्ग चा किल्ला यांची अवस्था म्हणावी तेवढे सुरक्षितता दिसून येत नाही त्या ठिकाणी होत असलेली त्यांची पडझड व त्यांच्या संवर्धनाचे अत्यंत गरज आहे तसेच इतरही पर्यटन स्थळे असलेल्या अनेक सोयी सुविधांच्या अभाव तिथे असलेल्या पर्यटकांचे संरक्षण त्यांची सुरक्षितता याही कारणामुळे मराठवाड्यातील पर्यटनाला चालना व प्रेरणा मिळवू शकत नाही

**मराठवाड्यातील पर्यटक ना समोरील आव्हाने**

आधुनिक काळातील पर्यटनाचे संकल्पना बदलत चाललेली असून पर्यटकाना अनेक समस्यांना तोंड द्यावा लागत आहे या समस्यांना प्रशासना समोरील मोठे आव्हान ठरत आहे मराठवाड्यातील पर्यटन प्रशासनासमोरील पुढील प्रमाणे आव्हाने दिसून येतात

**धार्मिक पर्यटन स्थळावरील पर्यटकांची वाढती संख्या**

मराठवाड्यातील असलेल्या तीन ज्योतिर्लिंग साडेतीन शक्तीपीठांपैकी तुळजापूर येथील भवानी मातेचे मंदिर माहूर येथील रेणुका देवीचे मंदिरतसेच इतर धार्मिक पर्यटन स्थळे मोठ्या प्रमाणात आहेत या पर्यटन स्थळे मोठ्या प्रमाणात धार्मिक पर्यटन करणारे पर्यटक येत असतात त्यांच्या वाढती संख्या हा स्थानिक प्रशासना समोरील फार मोठा जटिल प्रश्न बनत चाललेला आहे त्यामुळे त्या ठिकाणच्या वाढत्या गर्दीमुळे तिथे असलेले निवास व्यवस्था तिथे असलेली वाहतूक व्यवस्था व त्यांच्या इतर सोयी सुविधा पुरविणे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे

**वाहतूक व्यवस्थेची समस्या व आव्हाने**

ग्रामीण पर्यटन स्थळापर्यंत महाराष्ट्राचे परिवहन महामंडळ व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्यांची पूर्णपणे पर्यटकांच्या दृष्टिकोनातून सोयी सुविधा देणे अशक्य होत आहे अनेक धार्मिक पर्यटन स्थळे असतील किंवा इतर ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळ असतील या ठिकाणी वाहतूक नियोजन व वाहतूक व्यवस्थेचे मोठी समस्या दिसून येत आहे. प्रामुख्याने असलेल्या यात्रा श्रावणमास नवरात्र या काळात महामंडळाकडून होणाऱ्या बसेसचा पुरवठा तसेच खाजगी कंपन्याकडून असलेला अभाव यामुळे महाराष्ट्रातील इतर प्रांता पेक्षा मराठवाड्यातील पर्यटन स्थळी प्रवासी वाहतुकीची समस्या आपल्याला दिसून येते.

**पर्यटन स्थळावरील व्यवस्थापनाचा अभाव**

मराठवाड्यातील पर्यटन स्थळावर पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे पर्यटन प्रशासनाला व्यवस्थापनाला पर्यटन स्थळाच्या व्यवस्थापन करणे व त्यांचे नियोजन करणे हे फार मोठे आव्हान ठरत आहे कारण आधुनिक कालखंडात दिवसेंदिवस पर्यटन करणाऱ्यांची संख्या ही वाढत असल्यामुळे आणि विशेषतः असलेल्या धार्मिक पर्यटनामुळे मोठ्या प्रमाणात ही समस्या मराठवाड्यातल्या सर्वच पर्यटन स्थळे दिसून येत आहे त्यावर उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे

**पर्यटन वाढीसाठी प्रयत्न**

- मराठवाड्यातील पर्यटन विकासासाठी पर्यटन स्थळाचे रस्ते विकासासाठी स्वतंत्र निधी देण्यात यावा
- मराठवाड्यातील पर्यटनाच्या विकासासाठी रेल्वे, राज्य परिवहन महामंडळ यांनी विशेष सुविधा देणे गरजेचेआहे त्याचबरोबर खाजगी व महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ मार्फत तशा सोयी सुविधा पुरविणे प्रवासासाठी व आवश्यक आहेत
- पर्यटक व पर्यटन या संबंधित घटकावर नियंत्रण ठेवण्यासाठी ज्याप्रमाणे भारतीय पर्यटन विकास महामंडळ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या संस्था बरोबरच स्वतंत्र पर्यटन कायदा आहे त्या कायद्याच्या मार्फत पर्यटकाकडे होणारी फसवणूक व तेथील व्यवसायाकडून होणारे लूट हे थांबवण्यासाठी विशेष तरतूद करणे आवश्यक आहे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- महाराष्ट्रातील पर्यटक स्थळाबरोबरच मराठ्यातील असलेल्या पर्यटन स्थळाच्या माहिती संकेतस्थळाच्या मार्फत प्रकाशित करणे अत्यंत आवश्यक आहे व त्यासाठी त्याचा प्रचार प्रसार व सर्वसामान्य जनतेला त्याविषयीची माहिती पुरवणी अत्यंत गरजेचे आहे
- पर्यटन स्थळावर समाज घटकांचे हल्ले व तेथील स्थळांचे संवर्धन व संरक्षण करणे ही गरजेचे आहे व तेथे येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांच्या संरक्षणाची व त्या ठिकाणी होत असलेल्या आर्थिक लुटची प्रशासनाकडून नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे
- मराठवाड्यातील प्रत्येक पर्यटन स्थळे एक स्वतंत्र पोलीस चौकी ची उभारणी करण्यात यावी व विदेशी पर्यटक यांना होणारे फसवणूक किंवा त्रास याचा व नियंत्रण प्रशासनाकडून देण्यात यावे

**शिफारसी**

- पर्यटन स्थळाचा प्रचार व प्रसिद्धीसाठी मीडियाचा वापर करावा ( सोशल मीडिया इलेक्ट्रॉनिक मीडिया) या
- मराठवाड्यातील ऐतिहासिक धार्मिक नैसर्गिक स्वरूपाचे पर्यटन स्थळे आहेत त्यांची माहिती प्रकाशित करण्याबरोबरच त्या ठिकाणी असलेल्या व्यावसायिकांना व्यापारी संकुलं उभारून द्यावे सुयोग्य पद्धतीने त्यांचे नियोजन करावे व पर्यटकाचे होणारे आर्थिक शोषण थांबवण्यासाठी चा प्रयत्न प्रशासनाकडून वेळोवेळी करण्यात यावा
- मराठवाड्यातील ऐतिहासिक व धार्मिक सांस्कृतिक पर्यटनाबरोबरच मराठवाड्यात कृषी पर्यटनालाही चालना देण्याचा प्रयत्न केल्यास मराठवाड्यातील पर्यटनातून राज्य उत्पादनाला आणखीनही साहाय्य होण्यास मदत होईल

**संदर्भ सूची**

1. डॉ. विठल घारापुरे-पर्यटन भूगोल –पिंपळापुरे अँड पब्लिशर्ष नागपूर 2001
2. डॉ.कठारे.डॉ.साखरे डॉ.पाटील-पुरातत्त्वविद्या वास्तुसंग्रहालयशास्त्र आणि पर्यटन-विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद 2011
3. डॉ. अनिल कठारे डॉ. विजया साखरे- भारतीय कलेचा इतिहास- कल्पना प्रकाशन नांदेड 2008
4. डॉ.अनिल कठारे-मराठवाड्यातील लेणी कल्पना प्रकाशन नांदेड 2001
5. डॉ.उत्तम सावंत मराठवाड्यातील किल्ले- मराठा साहित्य प्रकाशन सहकारी संस्था नांदेड 2001
6. डॉ.विजयकुमार कपूर- पर्यटन भूगोल विश्वभारती पब्लिकेशन नवी दिल्ली 2012
7. डॉ. ओम शिवालिकडे डॉ. अरविंद कदम डॉ. संगमेश्वर साकोळे -पर्यटन शास्त्र अरुण प्रकाशन लातूर 2018

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# मराठवाड्यातील ज्योतिर्लिंगे: धार्मिक पर्यटनाचा ऐतिहासिक आढावा

**प्रा. डॉ. कऱ्हाळे उत्तम सीताराम**
(सहाय्यक - प्राध्यापक इतिहास विभाग) नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ. बाळापुर जि.हिंगोली
**E-mail:** uskarhale1998@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180113
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 50-53
January 2026
**Submitted:** 11 Dec. 2025
**Revised:** 21 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*मराठवाडा प्रदेशाला प्राचीन काळापासून समृद्ध असा धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव या राजवटींच्या काळात येथे कला, स्थापत्य व धर्मसंस्कृतीचा लक्षणीय विकास झाला. मराठवाड्यातील औंढा नागनाथ, परळी वैद्यनाथ व वेरूळ येथील घृष्णेश्वर ही तीन ज्योतिर्लिंगे भारतातील बारा प्रमुख ज्योतिर्लिंगांपैकी असून, ती हेमाडपंथीय स्थापत्यशैलीची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. या मंदिरांच्या निर्मिती, रचना, जिर्णोद्धार व धार्मिक महत्त्वाचा ऐतिहासिक आढावा घेणे हा या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश आहे. या ज्योतिर्लिंगांमुळे मराठवाड्याच्या धार्मिक पर्यटनाला चालना मिळाली असून, प्रदेशाच्या सांस्कृतिक ओळखीला राष्ट्रीय स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील ज्योतिर्लिंगे ही केवळ श्रद्धेची केंद्रे नसून ती धार्मिक पर्यटन व ऐतिहासिक अभ्यासाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची आहेत.*

***मुख्यशब्द:*** *मराठवाडा, ज्योतिर्लिंगे, औंढा नागनाथ, परळी वैद्यनाथ, घृष्णेश्वर, हेमाडपंथीय मंदिरे, धार्मिक पर्यटन, सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक परंपरा*

## प्रस्तावना:

मराठवाड्यातील प्राचीन काळापासून ते आजतागायत फार मोठा ऐतिहासिक धार्मिक, राजकीय व सांस्कृतीक वारसा लाभलेला आहे. या मराठवाड्यात सातवाहन, चालूक्य, राष्ट्कूट, यादव या प्रमुख राजसत्ता होवून गेल्यात त्यांनी मराठवाड्याला सर्वांगिण क्षेत्रात मौलिक कामगिरी बजावली. तसेच या मराठवाड्याला संताची भूमी म्हणून ओळखले जाते. या मराठवाड्यात हिंदू धर्म, बौध्द धर्म, जैन धर्म व सूफी संप्रदायाने या धर्मसहिष्णूतेचे वातावरण तयार केले. त्यामुळे मराठवाडा हा धार्मिक व सांस्कृतीक दृष्टीकोनात सदैव धर्म सहिष्णूच राहिला आहे. या मराठवाड्यात शैव पंथ, वैष्णव पंथ, शाक्त पंथ, सूफी पंथ, बौध्द धर्मातील हिनयान व महायान जैन धर्मातील श्वेतांबर व दिगांबर याशिवाय इस्लाम धर्मातील सूफी संप्रदाय हा अतिशय डौलाने नांदत होते. त्या सर्व धर्मांना अंतर्गत स्वायतत्ता ही असून त्यांना आपल्या धर्म प्रचाराचे स्वातंत्र्य सुध्दा होते. मराठवाड्यात 13 व्या शतकापासून वारकरी पंथचा व महानुभव संप्रदायाचा उदय व विकास मोठ्या झपाट्याने झाला होता. या काळात मराठवाड्यात यादवांची (देवगिरी सत्ता) होती. तसेच मराठवाडा ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. या काळात 13 व्या शतकापासून मराठवाड्यात संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामिळा, गोरा कुंभार, संत जनाबाई तसेच महानुभव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी या सर्व संतांनी मराठवाड्यात किर्तने भारूडे प्रवचने यांच्या माध्यमातून वारकरी चळवळीचा विकास केला होता.

**_Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)_**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
प्रा. डॉ. कऱ्हाळे उत्तम सीताराम, (सहाय्यक - प्राध्यापक इतिहास विभाग)नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ. बाळापुर जि.हिंगोली

**How to cite this article:**
*कऱ्हाळे, . उत्तम . सीताराम. (2026). मराठवाड्यातील ज्योतिर्लिंगे: धार्मिक पर्यटनाचा ऐतिहासिक आढावा. Journal of Research & Development, 18(1(V)), 50–53. https://doi.org/10.5281/zenodo.18477972*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18477972

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

त्यांनी बहुजन समाजाला धार्मिक रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, कर्मकांड, जादुटोना यांच्यातून बाहेर काढून पुरोहितशाहीला कडाडून विरोध केला तसेच या मराठवाड्यात प्राचीन काळातील राजसतांनी कला साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात मौलिक कामगिरी केली त्यांचाच एक भाग म्हणून भारतातील जी प्रमुख 12 ज्योतिर्लिंगे निर्माण झाली त्यापैकी मराठवाड्यात यादव काळात हेमाद्रीच्या तंत्रज्ञानाने हेमाडपंथीय मंदिरे निर्माण झालीत व ही मंदिरे औंढा नागनाथ, बेरूळचे घृष्णेश्वर मंदिर व परळी येथील वैद्यनाथ मंदिर ही तीन मंदीरे मराठवाड्यातील ज्योतिर्लिंगे म्हणून उदयास आली यामुळे मराठवाड्याच्या धार्मिक व सांस्कृतीक इतिहास हा कला स्थापत्याच्या माध्यमातून गौरवशाली बनला म्हणून ही ज्योतिर्लिंगे मराठवाड्याची सांस्कृतीक ज्ञान वाढविण्यास ही तीन ज्योतिर्लिंगे मराठवाड्याच्या धार्मिक पर्यटनाचा एक अभिभाज्य अंग बनत असल्याने त्यावर ऐतिहासिकदृष्टीने आढावा घेण्याचा प्रयत्न या संशोधन लेखातून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**मराठवाड्यातील ज्योतिर्लिंगे:**

**1) औंढा नागनाथ:**

हिंगोली जिल्ह्यातील ज्योतिलिंग हे मराठवाड्यातील एक प्रसिध्द असून ते भारतातील 12 ज्योतिलिंगापैकी एक म्हणून ओळखले जाते हे ज्योतिलिंग विद्यमान हिंगोली जिल्ह्यातील असून हिंगोली -परभणी राज्य रस्त्यावर हिंगोली पासून 24 कि.मी. अंतरावर आहे हे ज्योतिलिंग शिवाची उपासना करणारे शैवपंथीय म्हणून ओळखले जाते. "औंढा या गावाला प्राचीन ऐतिहासिक वारसा आहे. प्राचीन धर्म ग्रंथ यामध्ये औंढा गावाचा उल्लेख आमर्दकपूर असा केला आहे. औंढा या गावाला दारूकावन या नावानेही प्राचीन काळात ओळखले जाते प्राचीन काळात दक्षिणेकडील एक वैभवशाली व तिर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते हे मंदिर हेमाडपंथीय स्वरूपाचे आहे"[1] ऋषीमूर्नांना त्रस्त करणाऱ्या दारूका राक्षसाचा वध करून स्वयंम भगवान शंकराने येथेच लिंगरूपात वास्तव्य केले आहे. या मंदिराचा काळ इ.स. 11 ते 12 वे शतक असावा व हे मंदिरे यादव काळात निर्माण झाले हे मंदिरे मराठवाड्यातील नामवंत मंदिरे म्हणून ओळखले जाते. "या मंदिराची लांबी 289 फुट आणि रूंदी 190 फुट आहे. मुख्य मंदिर 126 फुट लांब तर 118 फुट रूंदीचे आहे. मंदिराच्या पदविन्यास अर्ध मंडप, अंतराळ व गर्भग्रह असा आहे. मंदिराची लांबी x रूंदी ही 40 फुट आहे. अंतराळ व गर्भगृहाची व्याप्ती 25 फुट लांब तर रूंदी 40 फुट आहे. मंडपात 08 कोरीव व नक्षीकाम केलेले स्तंभ आहेत. मंदिराच्या बाहेरील बाजूवर भरपूर शिल्पे असून त्यांची संख्या 03 हजार आहे त्यामध्ये पक्षी, घोडे, मल्ल प्रण्य क्रिडा रानी, सारथी योध्दा, स्त्री-पुरूष, लक्ष्मी शंकर व पार्वती नटराज श्रीकृष्ण विष्णू, अर्धनटनारीश्वर गणपती तपस्वी इत्यादी शिल्पांचा समावेश आहे"[2] शंकर पार्वती कैलास पर्वतावर बसलेले असून रावण तो पर्वत हलविण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच विष्णूच्या दशाव ताराचे शिल्प कोरलेले आहे. येथे अर्धनटनारीश्वर चित्रे कोरलेले असून नटराज तांडव नृत्य करीत आहे. या मंदिराची बांधनी ही हेमांडपंथीय असून हे मंदिर द्वादशकोनी आहे. या मंदिरात हत्ती, घोडे व कमळ इ. च्या आकृत्या कोरलेल्या आहेत. या मंदिरात शिवाची विविध रूपे कोरलेली आहेत व शेजारी पार्वती, रावण, यती व बुध्द इ. च्या मूर्ती आढळतात. औंढा हे मंदिरे मराठवाड्यातील नामवंत ज्योतिर्लिंग म्हणून ओळखले जाते.

**परळीचे वैद्यनाथ मंदिर:**

मराठवाड्यातील दुसरे प्रमुख ज्योतिर्लिंग म्हणजे परळी येथील वैद्यनाथ मंदिर होय. बीड जिल्ह्यातील परळी शहराला सांस्कृतीक व ऐतिहासिक प्राचीन वारसा लाभलेला आहे. परळीचे प्राचीन नाव पर्यली असे होते. राष्ट्रकूट काळात व यादव काळात परळी हे व्यापारी शहर होते. परळी येथील ज्योतिर्लिंग प्राचीन काळातील असावे असा अंदाज येतो पण हे ज्योतिर्लिंग 12 व्या शतकातील असावे असे अनेकांनी मान्य केले.

**1) वैद्यनाथ मंदिराची रचना:**

वैद्यानाथ मंदिराची रचना ही वैशिष्ट्यापूर्ण आहे. "हे मंदिर पूर्विभिमूख असून या मंदिराच्या दक्षिणेला व उत्तरेला एकूण दोन दरवाजे आहेत. तसेच या मंदिराच्या पश्चिमेला डोंगर असल्याने ती बाजू बंद आहे. मंदिरात जाण्यासाठी तिन्ही बाजूंनी पायऱ्या आहेत"[3] तसेच या मंदिरातील महाद्वारात प्रवेश करताच दोन्ही बाजूंनी प्रशस्त दगडी ओवरी लगतात.

**2) हेमाडपंथी मंदिर शैली:** परळी येथील या मंदिराची शैली ही हेमाडपंथीय स्वरूपाची आहे. "ही शैली हेमाद्री यांनी शोधून काढली. या मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगड व लहान चुन्यांचे केलेले आहे. या मंदिराचे गर्भगृह व सभामंडप हे दोन भाग असून सभामंडपाच्या मध्यभागी नंदीच्या तीन मूर्ती आहेत. पहिल्या नदीचे नाव वृषभ, दुसऱ्याचे चंडम तर तिसऱ्यांचे चैव असे आहे."[4]

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**3) वैद्यनाथ व पार्वतीची मूर्ती:**

या मंदिरातील मूर्ती ही शंकर पार्वतीची आहे. गर्भग्रहात व सभामंडपात जात असतांना शिवलिंगाचे दर्श्न घडते. या मंदिराचा घुमट पाषणानाचाच आहे. या मंदिराच्या परिसरात अनेक लहान-लहान शिवमंदिरे आहेत.

**4) वैद्यनाथ मंदिराचा जिर्णोध्दार:**

परळी येथील बैद्यनाथ मंदिराचा जिर्णोध्दार इंदोरची राणी अहिल्यादेवी होळकर यांनी इ.स. 1784 मध्ये केला असा एक इंदोरच्या राणीच्या अहिल्याबाई होळकर यांचा शिलालेख सापडून त्यावरून हे स्प्ष्ट होते. वेगवेगळया काळात या मंदिराचा जिर्णोध्दार होत गेल्यामुळे या मंदिराचे आयुष्य वाढले.

**5) धार्मिक महत्त्व:**

परळी येथील ज्योतिलिंगाचे भारतातील 12 ज्योतिलिंगामध्ये महत्त्वाचे समजले जाते. परळी येथील ज्योतिर्लिंगाला धार्मिक व सांस्कृतीकदृष्ट्या अनन्य साधारण महत्व आहे. कारण परळी हे धार्मिक पर्यटन म्हणून नावारूपाला आले असून हे ज्योतिर्लिंग मराठवाड्यातील व महाराष्ट्रातील एक नामांकित धार्मिक तिर्थस्थान ठरले.

**घृष्णेश्वर मंदिर (ज्योतीर्लिंग)**

मराठवाड्यातील एक नामांकित ज्योतिर्लिंग ते म्हणजे घृष्णेश्वर येथील ज्योतिर्लिंग होय हे ज्योतिर्लिंग वेरूळ येथे आहे.

**1) वेरूळचा प्राचीन इतिहास:**

वेरूळ या गावाला प्राचीन व सांस्कृतीक वारसा लाभलेला आहे. हे गांव औरंगाबाद जिल्ह्यातील खुल्ताबाद तालुक्यात औरंगाबाद पासून 28 कि.मी. अंतरावर आहे. वेरूळ हे राष्ट्रकुंटाच्या राजधानीचे प्रारंभीचे ठिकाण होते. वेरूळचे प्राचीन गांव येलापूर हे होते. वेरूळ या गावाजवळ बारागंगा तिरावर घृष्णेश्वराचे मंदिर वसलेले आहे. वेरूळ येथे हिंदू, बौध्द व जैन धर्मीय अशा 34 लेण्या आहेत. या लेण्यांची निर्मिती राष्ट्रकूट राजा कृष्ण पहिला यांच्या काळात झाल्या असे अनेक तज्ञांचे मत आहे.

**2) घृष्णेश्वर निर्मितीची कथा:**

"घृष्णेश्वर निर्मिती विषयी पद्मपुराणात कथा सांगितली आहे. या कथेतून तर सुधर्मा नावाचा ब्राम्हण् होता त्याची पत्नी सुदेहा हिला मूल होत नव्हते म्हणून तीने आपल्या पतीला आपल्या भावाच्या घृष्णा नावाच्या दुसऱ्या मुलीशी लग्न करायला लावले. सुधर्मा व घृष्णा यांच्या विवाहनंतर घृष्णेला पुत्र प्राप्त झाला."[5] घृष्णा ही शिवभक्त होती त्यामुळे सुदेहा ही घृष्णेचा मत्सर करू लागली. घृष्णा ही शिवाची उपासना करीत असतांना तिला तिच्या मुलाच्या हत्येची बातमी कळाली पण तीने विचलीत न होता तळयात जाऊन 101 शिवलिंगाचे विसर्जन केले व तेथून परतल्यानंतर तीचा पुत्र जिवंत झाला व त्यावेळी शिवशंकर तेथे प्रकट झाले. घृष्णाने शिवशंकरांना तेथे कायमचे वास्तवय् करण्याची विनंती केली तेंव्हापासून शिव तेथे ज्योतिर्लिंगाच्या रूपाने वास करू लागले आणि त्यांना घृष्णेश्वर हे नाव मिळाले.

**3) घृष्णेश्वर मंदिराची रचना:**

"घृष्णेश्वर या ज्योतिलिंगाची रचना ही अत्यंत वैशिष्ट्ये पूर्ण आहे." हे मंदिर दक्षिणाभिमूख आहे, हे मंदिर लालसर जांभळया घोटीव दगडांचे बांधलेले आहे. या मंदिरात गर्भगृह व सभामंडप असे दोन भाग आहेत. सभा मंडपात एकूण 16 स्तंभ आहेत. गाभाऱ्यात काळया पाषाणाचे शिवलिंग आहे. पिडींसमोरच पार्वतीची संगमरवरी दगडाची मूर्ती आहे. या मंदिराचे शिखर हे अत्यंत सुंदर असून त्यावर खेळणाऱ्या युवती, धनूर्धारी शिकारी इ. चित्रे आहेत."[6] तसेच या मंदिराच्या शिखरावर सोन्याचा कळस आहे. या मंदिराभोवती **विस्तीर्ण** प्रागण असून या मंदिरापासून जवळच एक मोठे तळे असून त्याला शिवालय तिर्थ म्हणतात.

**4) घृष्णेश्वर मंदिराची जिर्णोध्दार:**

"घृष्णेश्वर मंदिराच्या जिर्णोध्दार विविध काळात करण्यात आला. या मंदिराचे बांधकाम राष्ट्रकुट राजा कृष्ण् पहिला याने केले. वेरूळ गावचे पाटील मालोजी भोसले यांनी इ.स. 1599 मध्ये या मंदिराचा जिर्णोध्दार केला. पुढे औरंगजेबाने हे मंदिर पाडून उध्वस्त केले यानंतर मल्हाराव होळकर यांच्या पत्नी गौतमीबाई होळकर यांनी इ.स. 1730 मध्ये हे मंदिर बांधले. यानंतर इ.स. 1769 मध्ये अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा पुन्हा जिर्णोध्दार केला.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**5) घृष्णेश्वर मंदिराचे धार्मिक महत्त्व:**

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराला धार्मिकदृष्ट्या अनन्य साधारण महत्व आहे. कारण भारतातील एकूण 12 ज्योतिर्लिंगापैकी घृष्णेश्वर हे एक प्रमुख ज्योतिलिंग आहे. मराठवाड्यातील हजारो शिवभक्त या ठिकाणी दरवर्षी महाशिवरात्रीला घृष्णेश्वराच्या दर्शनाला येत असतात. हे ज्योतिलिंग भारतातील पवित्र हिंदू तिर्थ क्षेत्रापैकी एक स्थळ आहे. वेरूळया लेण्या पाहण्यासाठी हजारो लोक येत असतात. त्यावेळी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाला सुध्दा दर्शन घेण्यासाठी येत असतात. त्यामुळे हे मंदिर धार्मिक पर्यटनाचे व ऐतिहासिक महत्त्व पूर्ण केंद्र बनले आहे हे स्पष्ट होते.

**निष्कर्ष:**

मराठवाड्यात प्राचीन काळापासून ऐतिहासिक व सांस्कृतीक वारसा लाभलेला आहे. त्यामध्ये हिंदू, जैन व बौध्द या तीन धर्मातील अनेक वास्तू व स्थापत्य या प्राचीन राजवंशांनी निर्माण केलेल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे धार्मिक पर्यटनातील मराठवाड्यातील प्रमुख तीन ज्योतिर्लिंगे हे होते ही ज्योतिर्लिंगे मराठवाड्याची कला स्थापत्य व सांस्कृतीक क्षेत्राची एक आगळी वेगळी ओळख करून देतात. भारतातील एकूण 12 ज्योतिर्लिंगापैकी आपल्याला लाभलेली आहेत याबद्दल मराठवाड्यात 03 ज्योतिर्लिंगे आपल्याला लाभलेली आहेत. यावरून मराठवाडा हा कला व स्थापत्य व सांस्कृतीकदृष्ट्याने किती संपन्न् होता हे दिसून येते याचे सर्व श्रेय आपणांस त्या काळातील प्राचीन पासून ते 13 व्या शतकातील राजसत्तांना द्यावे लागेल त्यांनी राजसत्ता करीत असतांना कला, स्थापत्य, संस्कृती व साहित्य याकडे कधीही दुर्लक्ष होवू दिले नाही त्यामुळेच मराठवाड्याचा इतिहास हा वैभव संपन्न बनला व यामुळे धार्मिक पर्यटनाला सुध्दा मराठवाड्याला चालना मिळाली हे आपणांस दिसून येते.

**संदर्भ:**

1. डॉ. अनिल सिंगारे / डॉ. ओमशिवा लिगाडे - दक्षिण भारताचा इतिहास, अरूणा प्रकाशन, लातूर, 2023
2. शां.भा. देव - पुरातत्व् व वस्तू संग्रहालये, महाराष्ट्र शासन मुंबई
3. डॉ. ओमशिवा लिगाडे - पर्यटनशास्त्र, अरूणा प्रकाशन, लातूर 2015.
4. डॉ. अनिल कठारे / डॉ. विजया साखरे - भारतीय कलेचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड 2008.
5. डॉ. रोडे सोमनाथ - मराठवाड्यातील इतिहास, विद्या प्रकाशन औरंगाबाद 2011
6. डॉ. पी.व्ही. काटे, - मराठवाड्याचा इतिहास, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, 1998.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन स्थळांच्या विकासासाठी शासकीय यंत्रणांचे कार्य

**प्रा .डॉ .विलास कऱ्हाळे**
नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ.बाळापूर ता.कळमनुरी जि.हिंगोली
**Email:** vilas2002k@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180114
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 54-56
January 2026
**Submitted:** 11 Dec. 2025
**Revised:** 21 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन उद्योग हा देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती, परकीय चलनप्राप्ती व प्रादेशिक विकास साध्य होतो. भारतात पर्यटनाच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध यंत्रणा कार्यरत असून त्यामध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यटकांसाठी निवास व्यवस्था, उपहारगृहे, वाहतूक सुविधा, सांस्कृतिक कार्यक्रम, बाजारपेठांची उभारणी तसेच देश-विदेशात पर्यटनस्थळांची जाहिरात करणे ही या महामंडळाची प्रमुख कार्ये आहेत. या सर्व शासकीय उपक्रमांमुळे पर्यटन स्थळांचा सर्वांगीण विकास होत असून भारतीय पर्यटन उद्योगाला गती मिळाली आहे.*

***मुख्यशब्द :*** *पर्यटन विकास, शासकीय यंत्रणा, भारतीय पर्यटन विकास महामंडळ, पर्यटन सुविधा, वाहतूक व्यवस्था, सांस्कृतिक कार्यक्रम, परदेशी पर्यटक, आर्थिक विकास*

## प्रस्तावना:

आज संपूर्ण विकसनशील देशामध्ये पर्यटन उद्योगाचा विकास होत आहे. पर्यटन उद्योग हा महत्त्वाचा उद्योग असल्यामुळे आज प्रत्येक देश पर्यटन उद्योगाच्या विकासाकडे लक्ष देत आहे. पर्यटनामुळे देशाला परकीय चलन मिळते. तसेच देशाचे अर्थव्यवस्था सुधारते. याशिवाय बेरोजगारांना काम मिळते. यामुळे भारतामध्ये पर्यटन विकासाला चालना मिळाली. त्यामधूनच भारतीय पर्यटन विकास महामंडळ स्थापन झाले. पर्यटन उद्योगाच्या संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी इ स. १९६३ मध्ये झा समिती नेमण्यात आली. भारतात पर्यटनाचा विकास होण्यासाठी झा समितीने इ. स. 1965 मध्ये पर्यटन खात्यामध्ये हॉटेल महामंडळ, भारतीय पर्यटन महामंडळ आणि भारतीय पर्यटन वाहतूक महामंडळ अशी तीन मंडळी स्वतंत्रपणे निर्माण केली. हॉटेल बांधणे, त्याचे व्यवस्थापन करणे, पर्यटनाच्या जाहिरातीसाठी साहित्य निर्माण करणे आणि पर्यटकांना वाहतूक सुविधा प्रदान करणे ही कामे या मंडळाकडे सोपवली गेली. समितीच्या शिफारशीनुसार इ. स. 1965 मध्ये पर्यटन खात्यात हॉटेल महामंडळ, भारतीय पर्यटन महामंडळ व भारतीय पर्यटन वाहतूक महामंडळ अशी स्वातंत्र्य मंडळ स्थापन केली. या मंडळाकडे पर्यटनाशी संबंधित कामे देण्यात आली. परंतु त्यांच्या कार्यात एकसूत्रीपणा राहू शकला नाही. त्यामुळे कामात एकसूत्रीपणा असावा म्हणून सरकारने वरील तिनी मंडळी विकसित करून त्याचे एकच मंडळात विलीनीकरण करण्याचे निश्चित केले. त्यानुसार ऑक्टोंबर 1966 मध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना केली गेली. यानंतर अशोका हॉटेल व जनपथ हॉटेल याचे नियंत्रण पर्यटन मंत्र्यांकडे सोपविले. याशिवाय लोदी व रंजीत हॉटेलही पर्यटन मंत्रालयाशी जोडली गेली. भारतीय पर्यटन विकास महामंडळ हे एक स्वातंत्र्य महामंडळ आहे.

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

DOI: 10.5281/zenodo.18478000
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
प्रा. डॉ. विलास कऱ्हाळे, नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ.बाळापूर ता.कळमनुरी जि.हिंगोली

**How to cite this article:**
*कऱ्हाळे, . विलास . (2026). पर्यटन स्थळांच्या विकासासाठी शासकीय यंत्रणांचे कार्य. Journal of Research & Development, 18(1(V)), 54–56.* https://doi.org/10.5281/zenodo.18478000

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

या मंडळाला प्रामुख्याने पर्यटन उद्योगाचा विकास करण्यासाठी तसेच पर्यटकांना सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कामे करावी लागत असत. देशातील पर्यटन व्यवसायाचा विकास करण्यासाठी या मंडळाचे स्थापना करण्यात आलेली होती. या पार्श्वभूमीवर या महामंडळाला पुढील कामे करावी लागत होती. पर्यटकांना पर्यटन स्थळी गेल्यावर प्रामुख्याने निवासस्थानाची गरज असते. ही गरज पूर्ण करणे आवश्यक असते. निवासस्थान नसेल तर पर्यटनाला लोक येणार नाहीत. तसेच पर्यटनाचा विकासही होणार नाही. त्यासाठी भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पर्यटकांसाठी निवासस्थाने बांधली. हेच या मंडळाचे प्रमुख कर्तव्य ठरले. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पर्यटकांच्या सोयीसाठी पर्यटन स्थळी आणि त्याच्याजवळ असलेल्या नगरामध्ये हॉटेल, टुरिस्ट बंगले, अतिथी गृह, हॉटेलस आणि विश्रामलय बांधण्याचे काम केले. अनेक पर्यटक पर्यटनासाठी समुद्रकिनाऱ्यावर जात असतात. त्यामुळे त्या ठिकाणी सुद्धा व विश्रामगृह आणि हॉटेल्स बांधण्याची काम भारतीय पर्यटन विकास महामंडळाने केले. पर्यटकांसाठी ज्याप्रमाणे हॉटेल, अतिथीगृह, टूरिस्ट बंगले आणि हॉटेल्स यांची गरज असते. त्याप्रमाणे पर्यटकांसाठी रेस्टॉरंट्स म्हणजेच उपहारगृहाची आवश्यकता असते. पर्यटन स्थळी उपाहारगृह ठेवणे आवश्यक असते. पर्यटक पर्यटन करून आल्यानंतर त्याला थोडासा थकवा जाणवतो. तसेच त्याला थोड्याशा अन्नाची गरज भासते. त्यामुळे त्या ठिकाणी उपाहारगृह आवश्यक असते. म्हणूनच पर्यटन स्थळी उपहारगृहाची सोय करणे हे भारतीय पर्यटन विकास महामंडळाचा प्रमुख हेतू असतो. या महामंडळांनी पर्यटन स्थळी आलेल्या पर्यटकांचे सोय व्हावी म्हणून त्या त्या ठिकाणी उपहारगृह बांधण्याचे काम केले. पर्यटकांच्या अशा सुख सुविधांमुळे पर्यटन क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते.

निवासस्थानाचे व्यवस्थापन पाहणे हा भारतीय पर्यटन महामंडळाचे एक उद्देश आहे. पर्यटन स्थळी आणि पर्यटन स्थना जवळील नगरात पर्यटकांसाठी हॉटेल, टुरिस्ट बंगले, अतिथीगृह हॉटेल्स व विश्रामगृह बांधण्यात आले. त्याचप्रमाणे या हॉटेलचे व अतिथिगृहाचे म्हणजेच निवासस्थानाच्या व्यवस्थापनाचे कार्य करण्याचे कामही भारतीय पर्‍यटन विकास महामंडळाच करावे लागते. निवासस्थानाच्या व्यवस्थापनावरच पर्यटन व उद्योगाचे यश- अपयश अवलंबून आहे. इ स 1969 मध्ये पर्यटकांसाठी 129 खोल्या बांधण्यात आल्या होत्या. आज अशा खोल्यांची संख्या 5000 झाली आहे. निवासस्थानाप्रमाणेच रेस्टॉरंट म्हणजेच उपहारगृहाची सुद्धा व्यवस्थापन पाहण्याचे काम भारतीय पर्यटन विकास महामंडळाला करावे लागते. उपहारगृहामध्ये पर्यटकांसाठी हलका-फुलका आहार मिळविण्याचे सुविधा असते. असे असेल तरी उपाहारगृहांमध्ये भोजनालयाची ही सुविधा उपलब्ध करून दिली जाते. थोडक्यात उपहारगृहा ही पर्यटकांच्या अल्पोपहारासाठी बांधली जातात. हॉटेल्स प्रमाणेच उपहारगृहाचे सुद्धा व्यवस्थापन पाहणे गरजेचे असते. त्याच्या व्यवस्थापनावरच उपहारगृहाचा नफा तोटा अवलंबून असतो. त्यामुळे पर्यटकांच्या सोयीसाठी उभारलेल्या उपहारगृहाचे व्यवस्थापन पाहण्याचे काम भारतीय पर्यटन विकास महामंडळालाच करावे लागते. पर्यटनामध्ये वाहतुकीला महत्त्वाचे स्थान आहे. वाहतुकी शिवाय पर्यटन होऊ शकत नाही. त्यामुळे पर्यटकांसाठी वाहतुकीच्या साधनांची सोय करणे आवश्यक ठरते. भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पर्यटकांसाठी वाहतुकीची सोय उपलब्ध करून देण्याचे काम हाती घेतले. भारतीय पर्यटन विकास महामंडळाचे जे अनेक उद्देश आहेत त्यापैकी एक म्हणजे पर्यटकांसाठी वाहतुकीची सोय उपलब्ध करून देणे. भारतीय पर्यटन विकास महामंडळ आणि पर्यटकांच्या सोयीसाठी स्वातंत्र्य वाहतूक व्यवस्था केलेली आहे. त्याचे व्यवस्थापन भारतीय पर्यटन विकास महामंडळाकडे आहे. या मंडळांनी पर्यटकांच्या वाहतुकीच्या सोयीसाठी अनेक प्रकारच्या निमआराम बस सेवा सुरू केल्या. याशिवाय सरकारने खाजगी मालकांनाही प्रवासी अर्थात पर्यटक वाहतुकीची परवानगी दिली. आज देशांमध्ये बऱ्याच खाजगी निमआराम बस पर्यटकांसाठी वाहतुकीची सोय उपलब्ध करून देत आहेत. इसवी सन 1969 मध्ये पर्यटकांसाठी 50 लहान प्रवासी गाड्यांची सोय करण्यात आली. आज या गाड्यांची संख्या 5000 झाली आहे. पर्यटकांच्या मनोरंजनासाठी पर्यटनस्थळी वाहन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे काम भारतीय पर्यटन विकास महामंडळाकडे सोपविले गेले. पर्यटक दिवसभर पर्यटनासाठी जात असतो. पर्यटनामध्ये तो पर्यटन स्थळी असलेल्या ऐतिहासिक धार्मिक व नैसर्गिक ठिकाणाचे अवलोकन करीत असतो व त्याचा आनंदप्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी तो ज्या ठिकाणी थांबलेला आहे त्या हॉटेलमध्ये विश्रांती घेण्याचे काम करीत असतो. यावेळी पर्यटकांना सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्याची सुविधा निर्माण केली तर पर्यटक पुन्हा खुश व आनंदी होतील. त्यामुळे पर्यटन स्थळी सांस्कृतिक कार्यक्रम घडवू आणून पर्यटकांच्या मनोरंजन आली करमणूक महत्त्वाचे असते. त्यामुळे भारतीय पर्यटन विकास महामंडळाने पर्यटन स्थळी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे सुरू केले. अशा कार्यक्रमात संगीत रजनी आणि हलकेफुलके करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केलेल्या असतात. हे काम भारतीय पर्यटन विकास महामंडळाकडे सोपविले गेले. पर्यटकांसाठी वस्तूच्या खरेदीसाठी बाजारपेठे उपलब्ध करून देणे, हे भारतीय पर्यटन विकास महामंडळाचे महत्त्वाचे कार्य आहे. पर्यटक हा वस्तू खरेदीदार म्हणजेच एक ग्राहकही असतो. तो ज्या ठिकाणी पर्यटनासाठी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

जात असतो, त्या ठिकाणी असलेल्या काही कलापूर्ण वस्तू खरेदी करण्याचा त्याचा मानस असतो. त्यामुळे पर्यटन स्थळी बाजारपेठ असणे गरजेचे ठरते. अशा बाजारपेठेत त्या पर्यटन स्थळांच्या संदर्भातील ऐतिहासिक वस्तू, निसर्ग चित्रांचे पोस्टर्स, मूर्ती आणि हस्तकलेतून निर्माण केल्या गेलेल्या विविध प्रकारच्या वस्तू असतात. अशा वस्तू खरेदी करण्याचा पर्यटकांचा कल अधिक असतो. ज्या ज्या पर्यटनाच्या ठिकाणी पर्यटक पर्यटनासाठी जात असतो, त्या त्या ठिकाणी पर्यटक विविध प्रकारच्या वस्तू खरेदी करून आणण्याचा विचार करतो. त्यामुळे तेथे बाजारपेठेचे आवश्यकता निर्माण झाली. म्हणून भारतीय पर्यटन विकास महामंडळाने देशातील पर्यटनाच्या ठिकाणी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे महान कार्य केले आहे. पर्यटन विभागाने पर्यटकांसाठी दिल्ली येथे बाजारपेठ विभाग सुरू केला आहे.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाचे शेवटचा उद्देश म्हणजे परदेशीय पर्यटकांना भारतात पर्यटनासाठी आकृष्ट करणे होय. अनेक परदेशी पर्यटक दरवर्षी भारतामध्ये पर्यटन स्थळी येत असतात. अशा परदेशी पर्यटकामुळे देशाला परकीय चलन मिळत असते. त्यामुळे देशाचे अर्थव्यवस्था सुधारण्यास सहाय्य होते. पर्यटनाच्या विकासासाठी भारतीय पर्यटन विकास महामंडळाने परदेशातून पर्यटक आकृष्ट करण्यासाठी जाहिरात देण्याचे कार्य स्वीकारले. भारत हा पर्यटन स्थळांचा देश समजला जातो. देशात बरीच ऐतिहासिक, धार्मिक व नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत. या पर्यटन स्थळांची जाहिरात देऊन परदेशी पर्यटकांना भारताकडे पर्यटनासाठी येण्यासाठी आकर्षित करण्याचे काम भारतीय पर्यटन विकास महामंडळाने स्वीकारले. त्यामुळे या महामंडळांनी पर्यटन स्थळांच्या जाहिराती देण्याचे काम सुरू केले. परिणामी परदेशी पर्यटकांचा लोंढा भारताकडे येऊ लागला त्यामुळे भारतीय पर्यटन व्यवसायाच्या विकासाला चालना मिळाली. अशाप्रकारे भारतीय पर्यटन विकास महामंडळाच्या कार्यामुळे भारतात पर्यटनाचा मोठ्या प्रमाणात विकास होत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) महाराष्ट्र शासनाचे पर्यटन धोरण
2) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे अहवाल
3) महाराष्ट्र शासन पर्यटन नियमकीय आयोग
4) महाराष्ट्र पर्यटन स्थळाची अधिकृत वेबसाईट
5) पर्यटन संज्ञाचा शब्दकोश

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटनाचे विविध प्रकार

**प्रा. डॉ. विठ्ठल व्ही. घुले[1], गजानन विश्वनाथ गायकवाड[2]**
[1]प्राचार्य, संशोधन मार्गदर्शक, राजश्री शाहू महाविद्यालय, परभणी
[2]संशोधन विद्यार्थी M.A. SET HISTORY
**Email:** gajanang996@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180115
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 57-60
January 2026
**Submitted:** 11 Dec. 2025
**Revised:** 21 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन हा आधुनिक समाजातील एक महत्त्वाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटक असून औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाहतूक व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे पर्यटनाचे स्वरूप बहुआयामी झाले आहे. पूर्वी मर्यादित असलेले पर्यटन आज ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आरोग्य, औद्योगिक व ग्रामीण अशा विविध प्रकारांत विकसित झाले आहे. पर्यटनाचे शास्त्रीय व सुसंगत वर्गीकरण केल्यास पर्यटन अभ्यास, नियोजन व विकास प्रक्रियेला योग्य दिशा मिळते. भारतीय संदर्भात पर्यटनाच्या विविध प्रकारांचे विश्लेषण करून त्यांची उपयुक्तता स्पष्ट करणे हा या लेखाचा मुख्य उद्देश आहे.*

***मुख्यशब्द :*** *पर्यटन, पर्यटनाचे प्रकार, ऐतिहासिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, शैक्षणिक पर्यटन, आरोग्य पर्यटन, ग्रामीण पर्यटन, पर्यटन वर्गीकरण*

**प्रस्तावना:**

पर्यटन हा आधुनिक समाजातील एक महत्त्वाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटक बनला आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाहतूक व दळणवळणाच्या साधनांचा विकास, माहिती-तंत्रज्ञानातील प्रगती तसेच लोकांच्या जीवनशैलीतील बदल यांमुळे पर्यटनाच्या स्वरूपात लक्षणीय बदल झाले आहेत. पूर्वी पर्यटन हे केवळ धार्मिक किंवा मनोरंजनापुरते मर्यादित होते; परंतु आज पर्यटनाने बहुआयामी स्वरूप धारण केले आहे. परिणामी पर्यटनाचे विविध प्रकार निर्माण झाले असून त्यांचे शास्त्रीय वर्गीकरण करणे ही पर्यटन अभ्यासातील एक महत्त्वाची गरज बनली आहे.आजच्या या काळात पर्यटन हा व्यवसाय सर्वात जलद गतीने विकसित होत आहे. यामध्ये भांडवल गुंतवणूक कमी फायदा जास्त असल्याने विकसित व अविकसित देश यांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटन हा व्यवसाय ऐतिहासिक, सामाजिक ,सांस्कृतिक व भौगोलिक घटकांच्या आधारावर चालतो या बाबींमध्ये जितकी जास्त विविधता तेवढा या व्यवसायाचा विकास जास्त होतो. पर्यटनाचे वर्गीकरण केल्याने पर्यटनाच्या संकल्पना अधिक स्पष्ट होतात, पर्यटन विकासाचे नियोजन सुलभ होते आणि पर्यटनाच्या सामाजिक-आर्थिक परिणामांचे विश्लेषण प्रभावीपणे करता येते. तथापि, पर्यटनाच्या प्रकारांबाबत एकसंध, सुसंगत व सर्वमान्य असे वर्गीकरण आजही आढळत नाही. या पार्श्वभूमीवर पर्यटनाचे विविध प्रकारात वर्गीकरण करण्याचा सैद्धांतिक व विश्लेषणात्मक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18478036

**Address for correspondence:**
प्रा. डॉ. विठ्ठल व्ही. घुले, प्राचार्य, संशोधन मार्गदर्शक, राजश्री शाहू महाविद्यालय, परभणी

**How to cite this article:**
*घुले, . विठ्ठल . व्ही ., & गायकवाड, . गजानन . विश्वनाथ . (2026). पर्यटनाचे विविध प्रकार. Journal of Research & Development, 18(1(V)), 57–60. https://doi.org/10.5281/zenodo.18478036*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**संशोधनाची समस्या सूत्र**

पर्यटनाच्या वाढत्या विविधतेमुळे पारंपरिक पर्यटन वर्गीकरण अपुरे ठरत आहे. विविध अभ्यासकांनी पर्यटनाचे वर्गीकरण वेगवेगळया आधारांवर केले असले तरी त्यामध्ये सुसंगतीचा अभाव आढळतो. नव्याने उदयास आलेले पर्यटन प्रकार पारंपरिक वर्गीकरणात समाविष्ट करणे कठीण झाले आहे. विशेषतः भारतीय संदर्भात पर्यटनाचे स्वतंत्र व सुसंगत वर्गीकरण उपलब्ध नाही. त्यामुळे पर्यटन अभ्यास, नियोजन व धोरणनिर्मिती यामध्ये अडचणी निर्माण होतात. म्हणून पर्यटनाचे विविध प्रकार शास्त्रीय पद्धतीने वर्गीकृत करणे ही या संशोधनाची मुख्य समस्या आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

- पर्यटनाच्या प्रकाराची संकल्पना स्पष्ट करणे.
- पर्यटनाच्या प्रकाराचे ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करणे.
- पर्यटनाचे विविध प्रकार वर्गीकरण करणे
- भारतातील पर्यटन विकासाच्या दृष्टीने या प्रकाराची उपयुक्तता मांडणे.
- पर्यटनाच्या विविध प्रकारांचे शास्त्रीय, सुसंगत व सर्वसमावेशक वर्गीकरण अभ्यासणे.

**गृहीतके**

- पर्यटनाच्या प्रकारांनुसार सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय परिणाम वेगवेगळया स्वरूपाचे दिसून येतात.
- पर्यटनाच्या वाढत्या विविधतेमुळे पारंपरिक पर्यटन वर्गीकरण अपुरे ठरत आहे.
- आधुनिक पर्यटनात पारंपरिक पर्यटनापेक्षा विशेषीकृत (Specialized) पर्यटन प्रकारांचे महत्त्व वाढत आहे.
- भारतातील सांस्कृतिक विविधता पर्यटनाच्या विविध प्रकारांच्या विस्तारास कारणीभूत ठरते.
- नैसर्गिक, सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक व तांत्रिक घटकांचा एकत्रित प्रभाव पर्यटनाच्या स्वरूपावर आधारित वर्गीकरण ठरवतो.
- पर्यटनाचे स्वरूप हे पर्यटनाच्या विविध प्रकारांच्या वर्गीकरणावर महत्त्वपूर्ण परिणाम करते.

**पर्यटनाच्या व्याख्या**

पर्यटन हा शब्द लॅटिन भाषेतील Tornus या शब्दापासून आला आहे Tournus या शब्दाचा अर्थ प्रवास किंवा भटकंती करणे असा होतो. Tour म्हणजे प्रवास त्यापासून Tourism म्हणजेच प्रवासासाठी बाहेर पडणे होय. याचा अर्थ होतो पर्यटनाचा अर्थ समजून घ्यायचा असेल तर त्याच्या विविध व्याख्याद्वारे अभ्यास करता येईल, या व्याख्यातून पर्यटन म्हणजे काय? आणि पर्यटन कशासाठी केले जाते त्याचबरोबर पर्यटनाचे स्वरूप व विस्तार समजून येईल त्यापैकी काही व्याख्या या पुढील प्रमाणे आहेत.

- **ब्रिटन पर्यटन संस्था १९७६** – "पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील स्थानी अल्पकालीन केलेले स्थलांतर होय हे स्थलांतर संशोधन व्यवसाय मनोरंजन एस आराम यासाठी केलेले असते."
- **जागतिक पर्यटन संस्था** – "एखादी व्यक्ती आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या स्थळी कायमस्वरूपी वास्तव्य न करता एका वर्षाच्या आत उद्योग किंवा इतर कामासाठी सतत प्रवास करून पुन्हा परत येतो."
- **हरमन १९२०** – "एखाद्या अपरिचित देशात किंवा शहरात विदेशी व्यक्तीचे आगमन मुक्काम व आजूबाजूच्या स्थानांना भेटी देऊन पुन्हा स्वगृही परत जाणे म्हणजे पर्यटन होय."
- **हुंझीकेर व फ्रॅंक १९४८** – "कायमस्वरूपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेल्या अपरिचित व्यक्तींच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली संपूर्ण घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय."

**पर्यटनाचे विविध प्रकार सविस्तर स्वरूपात**

- **ऐतिहासिक पर्यटन :**

ऐतिहासिक पर्यटन म्हणजे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे ठिकाणे इमारती, किल्ले ,वस्तुसंग्रहालय इत्यादी पर्यटकांना आकर्षित करतात अशा ऐतिहासिक ठिकाणांना वास्तूंना भेट देण्यासाठी केलेल्या पर्यटनास ऐतिहासिक पर्यटन असे म्हणतात. कोणत्याही देशाच्या इतिहासामध्ये अनेक महत्त्वपूर्ण व स्मरणीय घटना घडून गेलेल्या असतात, त्यापैकी काही स्मारके, विजयस्तंभ,किल्ले, लेण्या,स्तूप,मंदिरे याचबरोबर वस्तू संग्रहालय इत्यादींचा यामध्ये समावेश होतो. भारताच्या संदर्भामध्ये आपण उदाहरण लक्षात घेतले तर जालींवाला बाग

परिसर,पानिपत, आग्रा किल्ला, शिवनेरी किल्ला, फतेपुर शिक्री,मैसूरचा राजवाडा, ताजमहल ,तंजावर आर्ट गॅलरी यासारख्या ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांना भेट देऊन आपला ऐतिहासिक वारसा जाणून घेणे याबाबत ऐतिहासिक पर्यटन लोकांनी आपल्या जीवनात केलेले आहे.

- **सांस्कृतिक पर्यटन :**

या प्रकारामध्ये सांस्कृतिक भागाचा समावेश आपल्याला करता येईल, जगातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारचे संस्कृती विकसित झालेली आढळते. या वेगवेगळ्या प्रकारच्या संस्कृतीच्या वास्तू,कला, संगीत ,साहित्य ,लोकनृत्य, चित्रकला, क्रीडा ,वास्तु इत्यादी मध्ये काही प्रमाणात साम्य विविध आढळते संस्कृतीमधील साधर्म्य व विविधतेमुळे लोकांमध्ये विविध संस्कृतीबद्दल कुतहूल व जिज्ञासा निर्माण होते. संस्कृती बद्दलच्या आकर्षण व कुतूहलणामुळे केले जाणाऱ्या पर्यटनास सांस्कृतिक पर्यटन असे म्हणतात. भारताच्या संदर्भामध्ये आपल्याला सांस्कृतिक पर्यटनामध्ये विशेष स्थान आहे, भारतामध्ये हजारो ऐतिहासिक व पुरातत्त्व स्मारके आहेत चित्राची इतिहास व संस्कृती याबद्दलचे ज्ञान मिळवण्याची संधी पर्यटकांना देतात. भारतातील एवढ्या मोठ्या भागावर विविध संस्कृती एकतेमध्ये टिकून आहे हे पाहण्यासाठी लोक विविध संस्कृतीला जवळून पाहण्यासाठी पर्यटन करतात.

- **धार्मिक पर्यटन :**

भारतामध्ये प्राचीन काळात धार्मिक पर्यटन हे केल्या जात असायचे. आणि आजही हे जगातील महत्त्वाचे पर्यटन समजले जाते. जगात विविध धर्माचे लोक राहतात व त्या प्रत्येक धर्माचे श्रद्धास्थाने वेगवेगळे आहेत अशा धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी लोक जातात यालाच धार्मिक पर्यटन म्हणतात. जगभरातील मुस्लिम धर्मियांसाठी मक्का व मदिना तीर्थक्षेत्र अत्यंत महत्त्वाचे आहेत. बौद्ध धर्म यांसाठी लिंबूनि ,बौद्धगया, सारनाथ यासारखी ठिकाणी महत्त्वाचे आहेत, शीख धर्मासाठी अमृतसर ,नांदेड ही महत्त्वाची धार्मिक ठिकाणे आहेत. हिंदू धर्मासाठी हरिद्वार, वाराणसी,मानसरोवर,रामेश्वर,अमरनाथ, औंढा, पंढरपूर, आळंदी, केदारनाथ इत्यादी सारखे अनेक पवित्र धार्मिक ठिकाणे आहेत .अशा ठिकाणी पवित्र धार्मिक स्थळी प्रत्येक वर्षी भारतातून मोठ्या संख्येने धार्मिक पर्यटन करण्यासाठी लोक उपस्थित होतात.

**शैक्षणिक पर्यटन :**

शैक्षणिक पर्यटनामध्ये आपण शैक्षणिक दृष्ट्या ज्ञान मिळवण्यासाठी पर्यटन करतो. या प्रकारच्या पर्यटनामध्ये पर्यटक इतर प्रदेशातील जमीन, लोक, भौगोलिक परिस्थिती, संस्कृती ,हवामान ,परिसंस्था अर्थव्यवस्था, लोकसंख्या,जीवनपद्धती इत्यादी विषयाचे ज्ञान मिळवण्यासाठी पर्यटन करतात. शैक्षणिक पर्यटन हे त्या देशातील विविध भागात त्याचबरोबर इतर देशातही केले जाते. त्या त्या प्रदेशातील शैक्षणिक अभ्यासक्रम कसा आहे याबाबत सविस्तर माहिती घेण्यात येते. त्याचबरोबर विद्यार्थी यामध्ये चर्चासत्र आयोजित करतात. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी शैक्षणिक सहली काढल्या जातात या चा समावेश या पर्यटनामध्ये आपल्याला करता येईल. या पर्यटनाच्या माध्यमातून ज्ञान मिळवण्यासाठी प्रयत्न केला जातो.

- **आरोग्य पर्यटन :**

आरोग्य किंवा वैद्यकीय पर्यटन असे या प्रकाराला म्हणता येईल. फार पूर्वीपासून रोमन कालखंडापासून आरोग्य पर्यटन हे जगामध्ये चालत आलेले आहे. युरोपियन लोक सूर्या स्नान करण्यासाठी भूमध्य सागरी प्रदेशांमध्ये सागर किनारी जात असत त्यामुळे त्या काळात रोममध्ये स्पा निर्माण झाला. यालाच स्वित्झर्लंडमध्ये सॅनिटोरिया म्हणतात. शरीर निरोगी व सुंदर राहण्यासाठी उपचार घेण्यासाठी जे पर्यटन केले जाते त्यास आपण आरोग्य पर्यटन असे म्हणतो. भारताच्या बाबतीत आरोग्याची काळजी घेण्यासाठी योग, मसाज,आयुर्वेद, युनानी इत्यादी सारख्या पारंपारिक पद्धतीचा वापर होतो. या पारंपारिक पद्धतीमुळे शरीर निरोगी व सुंदर राहण्यास मदत होते. तसेच या आरोग्य पद्धतीचापद्धतीचा शरीरावर कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची काळजी यामध्ये घेतली जाते .भारतामध्ये केरळ, कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्य आरोग्य पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. काही बाबतीत वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया खूप महाग असते यासंदर्भात आयुर्वेदिक उपचार यामध्ये केला जातो. याचबरोबर भारतामध्ये प्रसिद्ध अपोलो, टाटा, जसलोक,हिंदुजा इत्यादी हॉस्पिटल देखील आहेत यामध्ये देखील आरोग्य पर्यटना जबाबतीत काळजी घेतली जाते. वैद्यकीय पर्यटन म्हणजे वैद्यकीय उपचारांसाठी इतर ठिकाणी केलेले स्थलांतर होय या पर्यटनाचा मुख्य हेतू हा आरोग्य उपचार असतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- **औद्योगिक पर्यटन :**

औद्योगिक पर्यटनामध्ये आपण उद्योगधंद्यांशी संदर्भामध्ये घडामोडी करत असतो. औद्योगिक क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान आधुनिक प्रगती व नवीन उत्पादने यांची माहिती जगभरातील ग्राहकांना व उत्पादकांना व्हावी यासाठी जगभर अनेक औद्योगिक प्रदर्शने भरवली जातात. भारतामध्ये त्याचप्रमाणे कृषी तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान व मोठमोठाले उद्योगधंदे, कारखाने, आयटी कंपन्या याबाबतीत प्रदर्शन भरून जगभरातून उद्योजक ,अभ्यासक ,संशोधक, उत्पादक व ग्राहक यांना आकर्षित करतात. त्याचबरोबर इतरही नवीन उद्योजक त्यांना भेट देण्यासाठी आतुर असतात. उद्योग आणि व्यापाराशी संबंधित संमेलने आणि परिषदा ह्या आयोजित केल्या जातात पर्यटनासाठी उत्तम सुविधा उपलब्ध असाव्या म्हणून या पर्यटनामध्ये शॉपिंग ,मनोरंजन यावर पण जोर दिलेला असतो.

- **ग्रामीण पर्यटन :**

आजच्या या धावपळीच्या युगामध्ये व आधुनिक नागरी जीवनापासून दूर कुठेतरी एकांतात जाऊन ग्रामीण भागाशी जवळीकता निर्माण करणे व त्याचा अनुभव घेणे यासाठी ग्रामीण पर्यटन केले जाते. ग्रामीण पर्यटनाचा आधार स्थानिक पर्यावरणाशी संबंधित असतो. ग्रामीण भागात जाऊन तेथील स्थानिक उत्पादनांचा वापर व स्थानिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे, त्याचबरोबर ग्रामीण जीवनाचा अनुभव घेणे, अशा गोष्टीचा यामध्ये समावेश होतो. अनेक शहरी भागातील लोक धकाधकीच्या जीवनापासून काही काळ दूर जाऊ इच्छिता त्यांना नैसर्गिक वातावरणात निवांतपणा व शांतता हवी असते. त्यामुळे अशी लोक एखाद्या दुर्गम खेड्याच्या ठिकाणी राहून तेथील जीवन जगू इच्छितात असे पर्यटन करणे म्हणजेच ग्रामीण पर्यटन होय. या पर्यटनामध्ये पर्यटक ग्रामीण जीवनाबद्दल अधिक जिज्ञासू असतात, त्यामुळे असे पर्यटन घडून येते व या आजच्या युगात अशा पर्यटनाला जास्त वाव मिळत आहे.

**निष्कर्ष**

- पर्यटन हा आधुनिक काळातील एक महत्त्वाचा बहुआयामी घटक असून त्याचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत.
- पर्यटनाचे वर्गीकरण केल्याने पर्यटनाच्या विविध पैलूंचा सखोल अभ्यास करता येतो.
- वर्गीकरणामुळे पर्यटनाचे स्वरूप समजण्यास मदत होते व पर्यटन विकासाला योग्य दिशा मिळते.
- पर्यटनाचे शास्त्रीय व सुसंगत वर्गीकरण केल्यास पर्यटन अभ्यास अधिक परिणामकारक होऊ शकतो.
- भारतीय संदर्भात स्वतंत्र व सर्वसमावेशक पर्यटन वर्गीकरणाची आवश्यकता आहे.
- पर्यटन वर्गीकरणामुळे पर्यटन विकास, नियोजन व धोरणनिर्मितीला योग्य दिशा मिळू शकते

**संदर्भसूची**

१. प्रा. डॉ. जी. एस. पिसे , प्रा. डॉ. एस. बी. नानवटे (डोल्हारे) ‘ पर्यटनशास्त्र’ एज्युकेशनल पब्लिकेशन हाऊस ,न्यू दिल्ली.(२०२५)
२.डॉ. विठ्ठल घारापुरे ‘पर्यटन भूगोल’ पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर, नागपूर. (२००२)
३. प्रा. के. ए. खतीब ‘भारतातील पर्यटन’ मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर. (२००६)
४. दूर शिक्षण केंद्र ‘भारतातील पर्यटन’ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. (२०१७)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन के क्षेत्र में हिंदी भाषा का महत्व और रोजगार के अवसर

**प्रो. डॉ. शेषराव लिंबाजी राठोड**
प्रोफेसर, शोध निर्देशक एवंम हिंदी विभागाध्यक्ष, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
Email: shesharaolrathod298@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180116
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 61-63
January 2026
**Submitted:** 11 Dec. 2025
**Revised:** 21 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन का अर्थ है मनोरंजन, अवकाश, व्यवसाय या अन्य व्यक्तिगत उद्देश्यों के लिए अपने सामान्य परिवेश से बाहर किसी दूसरे स्थान की यात्रा करना जिसमें उस स्थान की संस्कृति, प्राकृतिक सुंदरता सौर स्थलों का अनुभव करना शामिल है | यह एक सामाजिक, सांस्कृतिक और आर्थिक गतिविधि है और विभिन्न सेवाओं और उद्योगों को बढावा देती है | पर्यटन का सरल अर्थ है- अपनी रोजमर्रा की जगह या निवास स्थान से बाहर किसी अन्य स्थान पर जाने, घूमने, वहाँ के प्राकृतिक सौंदर्य, ऐतिहासिक, सांस्कृतिक या मनोरंजन स्थलों का भ्रमण करने की प्रक्रिया | साधारणत पर्यटन वह गतिविधी है जिसमें व्यक्ति किसी कार्य, मनोरंजन, शिक्षा, अध्ययन, धर्म, व्यावसायिक अथवा अन्य किसी प्रयोजन के लिए अस्थायी रूप से अपनी स्थानिक सिमाओं से बहार यात्रा करता है |*

***मुख्य शब्द:*** *पर्यटन - भ्रमण करने योग्य क्षेत्र, किसी प्रसिद्ध या मनोरम स्थान की यात्रा, देशदर्शन और मनोरंजन के लिए किया जानेवाला भ्रमण, सैर-सपाटा, देशाटन |*

**प्रस्तावना:**

पर्यटन का स्वरूप बहुआयामी है, जिसमें लोग मनोरंजन व्यवसाय या अन्य उद्देश्यों के लिए आपने सामान्य निवासस्थान से दूर यात्रा करते हैं | आमतौर पर एक वर्ष से कम समय के लिए ठहरते हैं | जिसमें प्राकृतिक सौंदर्य, ऐतिहासिक स्थल, साहसिक गतिविधियाँ और सांस्कृतिक अनुभव शामिल है | पर्यटन घरेलू और आंतरराष्ट्रीय दोनों तरह के होते हैं, जो अर्थव्यवस्था और समाज को लाभ पहुँचाते हैं | पर्यटन से आर्थिक विकास (रोजगार, विदेशी मुद्रा) सांस्कृतिक आदान-प्रदान, शिक्षा, मनोरंजन, राष्ट्रीय एकता और पर्यावरण संरक्षण होता है | यह व्यक्ती और समाज दोनों के लिए फायदेमंद है, जिससे सामाजिक समरसता बढती है और जीवन में नया अनुभव मिलता है | यह स्थानीय व्यवसायों को बढावा देता है और साथ में देश की अर्थव्यवस्था को मजबूत करता है |

**पर्यटन के क्षेत्र में हिंदी भाषा का महत्व :**

हिंदी भाषा विशेषकर भारतीय पर्यटकों के लिए स्थानीय संस्कृती से जुडने, संचार को आसान बनाने और एक सहज अनुभव प्रदान करने में हैं | क्योंकि हिंदी भारत देश की राजभाषा, राष्ट्रभाषा और संपर्क भाषा है | हिंदी सभी भारतवासियों के लिए सांस्कृतिक आदान -प्रदान का माध्यम बनती है | हिंदी एक भाषा के रूप में न सिर्फ भारत की पहचान है बल्कि यह हमारे जीवन मूल्यों, संस्कृती एवं संस्कारो की सच्ची संवाहक संप्रेषक और परिचायक भी है |

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रो. डॉ. शेषराव लिंबाजी राठोड, प्रोफेसर, शोध निर्देशक एवंम हिंदी विभागाध्यक्ष, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*राठोड, . शेषराव . लिंबाजी . (2026). पर्यटन के क्षेत्र में हिंदी भाषा का महत्व और रोजगार के अवसर. Journal of Research & Development, 18(1(V)), 61–63. https://doi.org/10.5281/zenodo.18478070*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18478070
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

हिंदी बहुत सरल, सहज और सुगम भाषा है | हिंदी एक वैज्ञानिक भाषा है जिसे दुनिया भर में समझने, बोलणे और चाहनेवाले लोग बहुत बडी संख्या मे मौजूद है | यह विश्व में तिसरी सबसे ज्यादा बोली जानेवाली भाषा है, जो हमारे पारम्परिक ज्ञान, प्राचीन सभ्यता और आधुनिक प्रगती के बीच एक सेतू भी है | हिंदू भारत देश की राजभाषा होने के साथ ही ग्यारह राज्यों और तीन संघशासित क्षेत्रों की भी प्रमुख राजभाषा है | संविधान की आठवी अनुसूची में शामिल अन्य इक्कीस भाषाओं के साथ हिंदी का एक विशेष स्थान है | पर्यटन के क्षेत्र में हिंदी भाषा का महत्व बहुत अधिक है | हिंदी भाषा भारत के विशाल घरेलू और आंतरराष्ट्रीय पर्यटकों के लिये संचार को आसान बनाती है, साथ ही स्थानीय संस्कृती और विरासत को समझने में मदद करती है | यहा पर्यटकों को होटल, गाईड और स्थानीय लोगों से जुडकर एक सहज और समृद्ध अनुभव देती है, जिससे पर्यटन उद्योग को बढावा मिलता है और सांस्कृतिक आदान- प्रदान बढता है|

**पर्यटन मे हिंदी के लाभ:**

- **घरेलू पर्यटकों के लिए :** भारत मे हिंदी सबसे व्यापक रूप से बोली जानेवाली भाषाओं में से एक है | यह देश के विभिन्न हिस्सों से आने वाले पर्यटकों के लिए यात्रा को सरल बनाती है और उन्हे स्थानीय परिवेश से जुडने में मदद करती है |
- **आंतरराष्ट्रीय पर्यटकों के लिए :** कई विदेशी पर्यटक हिंदी भाषा सिखते हैं क्योंकि यह उन्हें स्थानीय जीवनशैली, रीतीरीवाजों और परंपराओ को बेहतर ढंग से समझने का अवसर देती है | इस कारण उनकी यात्रा अधिक सार्थक बनती है |
- **सांस्कृतिक सेतू :** हिंदी भारत की समृद्ध संस्कृती, इतिहास और विविधता को जोडने वाली भाषा है | यह पर्यटकों को विभिन्न क्षेत्रों की संस्कृतियों को समझने और देश की विरासत को जानने में मदद करती है |
- **संचार मे आसानी :** हिंदी जानने से पर्यटक होटल स्टाफ, गाईड, टॅक्सी ड्रायव्हरों और स्थानीय विक्रेताओं से आसानी से बातचीत कर पाते हैं, जिससे उनकी यात्रा की समस्याएँ कम होती है और उन्हें बेहतर सेवा मिलती है |
- **अर्थव्यवस्था को बढावा :** जब पर्यटक स्थानीय भाषा में संवाद कर पाते हैं, तो वे अधिक सहज महसूस करते हैं | इस कारण पर्यटन स्थलों पर खर्च बढता है और स्थानीय अर्थव्यवस्था को लाभ होता है |
- **सुरक्षा और आराम :** हिंदी में कुछ वाक्यांश जानने से पर्यटक अधिक सुरक्षित महसूस करते हैं | परिणामतः उनके लिए किसी भी आपात स्थिती में मदद मांगना आसान हो जाता है, जिसे यात्रा सुखद बनती है|
- **वैश्विक अपील :** हिंदी बॉलीवुड और मिडिया के माध्यम से पहले से ही वैश्विक स्थर पर लोकप्रिय है | इस कारण यह पर्यटकों को भारत की ओर आकर्षित करती है और भाषा के प्रति उनकी रूचि बढाती है |

संक्षेप में, पर्यटन क्षेत्र में हिंदी भाषा एक शक्तिशाली माध्यम है जो पर्यटकों को भारत के दिल और आत्मा से जोडती है, जिससे उन्हें एक गहरा और यादगार अनुभव मिलता है | पर्यटन मे हिंदी भाषा के माध्यम से गाईड, अनुवादक ,ग्राहक सेवा, कंटेंर क्रिएशन, और हॉस्पिअैलिटी जैसे क्षेत्रों में अपार रोजगार के अवसर है | भारत में हिंदी भाषी पर्यटकों की बढती संख्या और सांस्कृतिक आदान प्रदान के लिए हिंदी की जरूरत है | इसके अतिरिक्त डिजिटल मीडिया और शिक्षा में भी नई संभावनाएं खुल रही है, जिससे हिंदी जानने वालों के लिए करियर के कई रास्ते बनते हैं |

**हिंदी के माध्यम से पर्यटन में रोजगार के अवसर:**

- **पर्यटन गाईड और दुभाषीए :** i) हिंदी बोलने वाले पर्यटकों (घरेलू और विदेशी) को गाईड करने के लिए हिंदी भाषी गाइडों की भारी मांग है | ii) विदेशी पर्यटकों को स्थानीय संस्कृती और इतिहास समझाने के लिए हिंदी अनुवादकों की जरूरत होती है |
- **हॉस्पिटैलिटी और आतिथ्य :** i) होटल, रिसॉर्टस और गेस्ट हाऊस में हिंदी भाषी फ्रंटडेस्क स्टाफ, कस्टमर सर्विस एजंट और मॅनेजर की आवश्यकता होती है | ii) रेस्तरा और कॅफे में भी हिंदी भाषि कर्मचारीयों की मांग रहती है |
- **ट्रैवल एजेंसियां और टूर ऑपरेटर :** ट्रैवल एजेंट और टूर ऑपरेटर के रूप में, आप हिंदी मे टूर पैकेज तयार कर सकते हैं और ग्राहकों से संवाद कर सकते हैं |
- **सामग्री निर्माण और डिजिटल मार्केटिंग :** i) पर्यटन ब्लॉग, वेबसाईट, सोशल मीडिया के लिए हिंदी में आकर्षक लेख, वीडियों बनाने का अवसर | ii) पर्यटन स्थलों और उत्पादों का हिंदी में प्रचार करने वाले डिजिटल मार्केटर की मांग |
- **परिवहन सेवाएँ :** टैक्सी ड्राइवर, बस कंडक्टर और एअरलाइंस स्टाफ जो हिंदी में संवाद कर सकें |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- **सांस्कृतिक और कलाक्षेत्र :** स्थानीय कला, हस्तशिल्प और सांस्कृतिक कार्यक्रमों के आयोजकों के रूप में काम करना |
- **शिक्षा और प्रशिक्षण :** पर्यटन और हॉस्पिटैलिटी संस्थानों मे हिंदी भाषा और संस्कृती के प्रशिक्षक के रूप में
- **आंतरराष्ट्रीय और कुटनितिक संबंध :** दूतावासों और आंतरराष्ट्रीय संगठनों में हिंदी विशेषज्ञों की मांग बढ रही है |

**उपहार:**

पर्यटन और हिंदी भाषा का गहरा रिश्ता है | क्योंकि हिंदी भारत देश की संपर्क भाषा है | यह घरेलू और आंतरराष्ट्रीय पर्यटकों को जोडती है, जिससे यात्रा और संस्कृति का अनुभव आसान होता है | हिंदी भाषा पर्यटन को बढावा देने, स्थानीय अर्थव्यवस्था में योगदान करने, सांस्कृतिक आदान-प्रदान को सुविधाजनक बनाने और पर्यटकों को आवश्यक जानकारी प्रदान करने में महत्वपूर्ण भूमिका निभाती है |

**संदर्भ सूची:**

1) हिंदी भाषा का महत्व: डॉ. अनिता
2) प्रयोजनमूलक हिंदी अधुनातन आयाम: डॉ. अंबादास देशमुख
3) हिंदी भाषा के विविध आयाम: सं. डॉ. मिथिलेश दीक्षित डॉ. रवींद्र प्रभात

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026


Original Article

## राहुल सांकृत्यायन के यात्रा वर्णन 'मेरी यूरोप यात्रा' की मूल संवेदना


**प्रो. डॉ. संजय जाधव**

श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**Email:** drssjhindi@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2026-180117

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(V)

Pp. 64-69

January 2026

**Submitted:** 11 Dec. 2025

**Revised:** 21 Dec. 2025

**Accepted:** 11 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026



***सारांश***

*हिंदी यात्रा-साहित्य में महापंडित राहुल सांकृत्यायन का योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण है। उनकी यात्रा-वृत्तांत कृति 'मेरी यूरोप यात्रा' केवल भौगोलिक भ्रमण का विवरण न होकर यूरोप की सामाजिक, सांस्कृतिक, राजनीतिक और बौद्धिक संरचना का गहन एवं आलोचनात्मक मूल्यांकन प्रस्तुत करती है। इस कृति में लेखक एक जिज्ञासु यात्री, अनुशासित अध्येता और समाज-चिंतक के रूप में उभरते हैं। राहुल सांकृत्यायन यूरोपीय जीवन-पद्धति की अंधी प्रशंसा न करते हुए भारतीय दृष्टिकोण से उसके गुण-दोषों का वस्तुनिष्ठ विश्लेषण करते हैं। यात्रा के माध्यम से वे ज्ञान, अनुभव और चिंतन का समन्वय स्थापित करते हुए भारतीय समाज के सुधार की प्रेरणा देते हैं। इस प्रकार 'मेरी यूरोप यात्रा' हिंदी यात्रा-वृत्तांत साहित्य को वैचारिक गहराई, वैज्ञानिक दृष्टि और आलोचनात्मक चेतना प्रदान करने वाली एक महत्त्वपूर्ण कृति सिद्ध होती है।*



***मुख्यशब्द:*** *राहुल सांकृत्यायन, मेरी यूरोप यात्रा, यात्रा-वृत्तांत, हिंदी यात्रा-साहित्य, सामाजिक-सांस्कृतिक दृष्टि, आलोचनात्मक चेतना, यूरोप, भारतीय दृष्टिकोण*


**प्रस्तावना:**

यात्रा-वृत्तांत गद्य साहित्य की वह विधा है जिसमें लेखक अपनी यात्रा के दौरान देखे गए स्थानों, लोगों, प्रकृति, समाज, संस्कृति और अनुभवों का क्रमबद्ध, सजीव और आत्मीय वर्णन करता है। इसमें केवल स्थानों का विवरण ही नहीं होता, बल्कि लेखक की अनुभूतियाँ, भावनाएँ, विचार और दृष्टिकोण भी अभिव्यक्त होते हैं। यात्रा-वृत्तांत यथार्थ पर आधारित होते हैं, परंतु साहित्यिक शैली के कारण वे रोचक, संवेदनशील और प्रभावशाली बन जाते हैं। यात्रा-वृत्तांत में भौगोलिक जानकारी के साथ-साथ सामाजिक, सांस्कृतिक और ऐतिहासिक संदर्भ भी सम्मिलित रहते हैं। लेखक अपनी दृष्टि से समाज को देखता है और पाठक को उस अनुभव का सहभागी बना देता है। इस विधा में आत्मकथात्मक तत्व, वर्णनात्मक शैली और संवादात्मकता का सुंदर समन्वय दिखाई देता है। संसार में दर्शनीय स्थानों की इतनी विविधता और बहुलता है कि किसी भी व्यक्ति के लिए इन सबको देखना प्रायः असंभव है, लेकिन व्यक्ति जब इस प्रकार के स्थानों की यात्रा करता है तो वह न केवल प्रकृति के अकल्पनीय रूपों का साक्षात्कार करता है बल्कि मानव समाज की अंतहीन विविधता का भी।उसके ज्ञान कोश में तो वृद्धि होती ही है, समस्त जीवन के प्रति उसका दृष्टिकोण भी परिवर्तित हो जाता है। वह सच्चे अर्थ में विश्व मानव बन जाता है। यात्रा-साहित्य का ऐतिहासिक महत्व इस तथ्य में निहित है कि वे अपने समय की सामाजिक, सांस्कृतिक, राजनीतिक और भौगोलिक परिस्थितियों का प्रत्यक्ष और प्रामाणिक दस्तावेज प्रस्तुत करते हैं।


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*प्रो. डॉ. संजय जाधव, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*



**How to cite this article:**

*जाधव, . संजय. (2026). राहुल सांकृत्यायन के यात्रा वर्णन 'मेरी यूरोप यात्रा' की मूल संवेदना. Journal of Research & Development, 18(1(V)), 64–69.* https://doi.org/10.5281/zenodo.18478126

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18478126

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

इतिहास जहाँ प्रायः शासकों, युद्धों और तिथियों तक सीमित रह जाता है, वहीं यात्रा-वृत्तांत सामान्य जन-जीवन, रीति-रिवाजों, रहन-सहन, व्यापार, शिक्षा और धार्मिक आस्थाओं का जीवंत चित्र अंकित करते हैं। यात्रियों द्वारा देखी-सुनी घटनाएँ और अनुभव तत्कालीन समाज की वास्तविक स्थिति को उजागर करते हैं, जिससे इतिहास को मानवीय दृष्टि और व्यापक संदर्भ प्राप्त होता है। इस प्रकार यात्रा-साहित्य न केवल इतिहास की पूरक सामग्री प्रदान करते हैं, बल्कि कई बार उपेक्षित तथ्यों और संस्कृतियों को प्रकाश में लाकर ऐतिहासिक अध्ययन को अधिक समृद्ध और विश्वसनीय बनाते हैं। हिन्दी तथा भारतीय साहित्य के महान हस्ताक्षर राहुल सांकृत्यायन ने यात्रा साहित्य को एक नई ऊँचाई पर प्रतिष्ठित किया है। उनका यात्रा-साहित्य केवल भौगोलिक यात्राओं का विवरण नहीं है, बल्कि वह ऐतिहासिक, सामाजिक, दार्शनिक और सांस्कृतिक विमर्श का समन्वय है। उनके लेखन ने हिंदी साहित्य में यात्रा को एक समग्र, आलोचनात्मक और संवेदनशील विधा के रूप में स्थापित किया। इसीलिए वे न सिर्फ एक महान यात्री बल्कि यात्रा-वृत्तांत के वैज्ञानिक और साहित्यिक शिल्पकार के रूप में भी प्रतिष्ठित हैं।

**शोधालेख के मुख्य उद्देश्य**

- यात्रा वर्णन साहित्य का परिचय देना
- यात्रा वृत्तांत की विशेषताओं को स्पष्ट करना
- राहुल सांकृत्यान जी के व्यक्तित्व एवं कृतित्व का विवेचन करना
- राहुल सांकृत्यान जी द्वारा लिखित यात्रा वृत्तांत 'मेरी यूरोप यात्रा' के विविध आयामों का विवेचन करना

**यात्रा वर्णन अथवा यात्रा वृत्तांत**

'यात्रावृत्त' यह शब्द यात्रा के वृत्तांत को सूचित करता है। यात्रा-वृत्तांत में लेखक के द्वारा की गई यात्रा का अनुभव लेखक की दृष्टि तथा उसके व्यक्तित्व के अनुरूप प्रस्तुत किया जाता है। यात्रा वृत्तांत में कल्पना के लिए अधिक अवसर नहीं होता है। यात्रा वृत्तांत तथ्य और वस्तुनिष्ठता पर आधारित होता है। इसमें बीते हुए यथार्थ का वर्णन होता है। यात्रा में लेखक जिन स्थानों तथा व्यक्तियों से भेंट करता है उसका चित्रण करता है। सामान्यत: ऐसा कहा जाता है कि "एक जगह से दूसरी जगह जाना यात्रा कहलाता है। स्थान बदलने की क्रिया महत्त्वपूर्ण होती है। यों तो जीवन को भी एक यात्रा माना गया है। इसमें चलते रहने का क्रम बना रहता है।" यात्रा वृत्तांत का आशय स्पष्ट करते हुए डॉ. पद्मसिंह शर्मा  लिखते हैं, "यात्रा शब्द का अर्थ है, एक स्थान से दूसरे थान पर जाने की क्रिया और इसका प्रमुख लक्षण है संचरणशीलता, अर्थात् निरंतर स्थान परिवर्तन करना और एक स्थान से दूसरे स्थान को चलते जाना। कदाचित् इसीलिए रवींद्रनाथ ठाकुर ने मनुष्य को सनातन यात्री की संज्ञा दी है।"1 जीवन के बदलते हुए स्वरूप ने भी मनुष्य को यात्रा करने के लिए बढ़ावा दिया है। सांस्कृतिक आदान-प्रदान राजनीतिक कार्य और शिक्षा प्राप्ति के लिए भी मनुष्य को एक जगह से दूसरी जगह जाना पड़ा। समय के साथ-साथ यात्रावृत्त के स्वरूप में भी परिवर्तन और परिवर्धन हुआ। यात्रा-वृत्तांत पाठक को घर बैठे दूर-दराज़ के प्रदेशों, संस्कृतियों और जीवन-शैलियों से परिचित कराते हैं। लेखक के अनुभव पाठक के लिए प्रत्यक्ष अनुभूति बन जाते हैं। इस विधा के माध्यम से विभिन्न समाजों की परंपराएँ, रीति-रिवाज़, खान-पान, रहन-सहन और सोच उजागर होती है, जिससे सांस्कृतिक समझ और सहिष्णुता बढ़ती है। यात्रा-वृत्तांत इतिहास और भूगोल को शुष्क तथ्यों से निकालकर जीवंत बना देते हैं। स्थानों के साथ जुड़ी कथाएँ और अनुभव उन्हें स्मरणीय बना देते हैं।

**राहुल सांकृत्यायन: सामान्य परिचय**

महापंडित राहुल सांकृत्यायन हिंदी यात्रा-साहित्य के जनक माने जाते हैं। वे केवल लेखक ही नहीं, बल्कि इतिहासकार, बौद्ध विद्वान और अनेक भाषाओं के जानकार थे। राहुल सांकृत्यायन का जन्म 9 अप्रैल 1893 को उत्तर प्रदेश के आज़मगढ़ जिले के पन्दहा गाँव में हुआ। उनके पिता गोवर्धन पाण्डे और माता कुलवन्ती थीं। बचपन में उनका नाम केदारनाथ पाण्डे था। वे अपने भाइयों में सबसे बड़े थे। सन् 1930 में श्रीलंका में बौद्ध धर्म अपनाने के बाद उनका नाम 'राहुल' पड़ा और आगे चलकर उन्होंने अपने नाम के साथ 'सांकृत्यायन' जोड़ा। बौद्ध होने से पहले वे 'दामोदर स्वामी' नाम से भी जाने जाते थे। 'नवाजिन्दा-बाजिन्दा' का शेर

"सैर कर दुनिया की गाफिल ज़िन्दगानी फिर कहाँ,
ज़िन्दगी गर कुछ रही तो नौजवानी फिर कहाँ"

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

इस शेर ने उनके मन में घूमने-फिरने और दूर देशों को देखने की तीव्र इच्छा जगा दी।राहुल जी को दूर देश जाने के लिए प्रेरित करने लगा। यही इच्छा उन्हें घुमक्कड़ बना गई। उन्होंने इंग्लैंड और यूरोप की यात्रा की तथा लद्दाख, तिब्बत, जापान, कोरिया, ईरान और सोवियत रूस जैसे अनेक देशों की बार-बार यात्राएँ कीं। उनकी तिब्बत और सोवियत भूमि की यात्राएँ विशेष रूप से प्रसिद्ध हैं।

राहुल सांकृत्यायन का मानना था कि घुमक्कड़ी से मनुष्य का मन मुक्त होता है और उसका दृष्टिकोण व्यापक बनता है। वे यात्राओं को केवल घूमना नहीं, बल्कि सीखने और समझने का माध्यम मानते थे। इसी सोच के आधार पर उन्होंने 'घुमक्कड़ शास्त्र' जैसी महत्वपूर्ण पुस्तक लिखी। उनका प्रसिद्ध कथन है "कमर बाँध लो भावी घुमक्कड़ों..." यह कथन उनकी यात्रा-प्रेरक विचारधारा को स्पष्ट करता है। राहुलजी का व्यक्तित्व अत्यंत विशाल और प्रभावशाली था। उनका अध्ययन, ज्ञान और लेखन इतना व्यापक है कि उसे पूरी तरह समझना आसान नहीं है। उनकी भाषा सरल, प्रवाहपूर्ण और विचारपूर्ण है। अपने गहन अनुभव, तेज दृष्टि और सशक्त लेखनी के कारण राहुल सांकृत्यायन ने अपने जीवनकाल में ही अपार यश और प्रतिष्ठा प्राप्त की। वे वास्तव में हिंदी साहित्य में शब्द-शक्ति और सार्थक अभिव्यक्ति के अनुपम उदाहरण थे। उनके बहुआयामी योगदान के लिए उन्हें साहित्य अकादेमी पुरस्कार से सम्मानित किया गया।

**'मेरी यूरोप यात्रा' यात्रा-वृत्तांत का परिचय:**

राहुल सांकृत्यायन की 'मेरी यूरोप यात्रा' हिंदी यात्रा-साहित्य की ऐसी कृति है, जो केवल यात्रा का वृत्तांत न होकर एक सजग बुद्धिजीवी की दृष्टि से किया गया सांस्कृतिक, सामाजिक और बौद्धिक मूल्यांकन प्रस्तुत करती है। इसकी लोकप्रियता का कारण इसका बाह्य वर्णन नहीं, बल्कि उसका गहन पर्यवेक्षण, तर्कशीलता और आलोचनात्मक चेतना है। 'मेरी यूरोप यात्रा' के द्वितीय संस्करण की भूमिका में विख्यात लेखक बाबा नागार्जुन जी लिखते हैं, "राहुलजीकी पहलेकी यह किताब अपनी कई विशेषताओंके कारण आज भी वैसी ही रोचक है। भारतीय चिन्तनाओंमें ओत-प्रोत योरोपियन विद्वानोंके प्रति जो गंभीर श्रद्धा राहुलजीको खींचकर यूरोप ले गई थी उसीने अब उन्हें रूस पहुँचा दिया है। विदेशके व्यक्तियों और वस्तुओंका परिचय देते समय बात-बातमें अपने देशके व्यक्तियों और वस्तुओंकी तुलना मूलक आलोचना करते चलना वह कभी नहीं भूलते। इस दृष्टिसे भी यह यात्रा-वृत्तान्त अभी बहुत दिनों तक ताजा बना रहेगा।"2 इस कृति में राहुल जी एक जिज्ञासु यात्री, अनुशासित अध्येता और सामाजिक चिंतक - तीनों रूपों में उपस्थित हैं। भदन्त आनन्द कौसल्यायन के साथ आकस्मिक रूप से 05 जुलाई 1932 में आरंभ हुई यह यात्रा स्वयं में राहुल सांकृत्यायन के घुमक्कड़ स्वभाव और ज्ञान-पिपासा का प्रमाण है। लंबी समुद्र यात्रा का उनका वर्णन केवल रोमांच पैदा नहीं करता, बल्कि उस समय की समुद्री यातायात व्यवस्था, यात्रियों के जीवन और अंतरराष्ट्रीय संपर्कों की झलक भी देता है। यहाँ लेखक भावुकता में नहीं बहता, बल्कि तथ्यों और अनुभवों को संतुलित ढंग से प्रस्तुत करता है। यह संतुलन उनकी विद्वत्ता और वैज्ञानिक दृष्टि का परिचायक है।

लेखक जिस समय समुद्री जहाज से यात्रा कर रहे थे तब मानसुन माह चल रहा था। समुद्र उफान पर था। जिसके कारण जहाज लहरों के साथ उपर नीचे हो रहा था। अनुभवी यात्रियों ने तो यहां तक कहा कि पिछले अनेक वर्ष में ऐसा चञ्चल समुद्र कभी नहीं पाया। यह तो साफ था कि, लड़कों और नाविकों को छोड़कर यात्रियोंमें सभी बुरी अवस्थामें थे। राहुलजी ने यात्रा में आने वाली दिक्कतों का तथा परेशानियों का अत्यंत सजीव वर्णन किया है। महान बौद्ध प्रचारक भदंत आनंद कौसल्यायन जी को इस यात्रा में बडी कठिनाई का सामना करना पडा। राहुलजी लिखते हैं "दाँत की लेईसे दांतुन कर जब कुल्ला करने लगे, तब एक बार कैन्सी मालूम हुई। लेकिन अठारह घण्टे बाद पेटमें रखा ही क्या था ? आनन्दजी की हालत तो कुछ न पूछिये । सिरमें चक्कर आ रहा था, जी मिचला रहा था; किसी तरह मनपर जोर देकर उन्होंने हाथ-मुँह धोये। खुच के आने लगी। लेकिन पेटमें कुछ न था। शामको ही हमने स्टीवर्डसे कह दिया था कि, हमारा खाना केबिनमें आना चाहिये । तदनुसार हमारे मुँह धोनेसे पूर्व ही रोटियोंके आठ-दस टुकड़े, दो प्याला काफ़ी और मक्खन पहुँच गये। दोनों ने बैठकर किसी तरह उन्हें खतम किया। हम तो जाकर अपने बिस्तरेपर पड़ रहे और आनन्दजीको उठते-उठते के आ गयी; सब खाया निकल गया।"3 इस प्रकार हम देखते हैं कि यह यात्रा बहुत मुश्किलों से भरी थी। यूरोप की संस्कृति और रहन-सहन का विवरण देते समय राहुल सांकृत्यायन अंधी प्रशंसा के शिकार नहीं होते। वे वहाँ के अनुशासन, समयबद्धता, स्वच्छता और सार्वजनिक संस्थानों की सुव्यवस्था से प्रभावित अवश्य होते हैं, किंतु साथ ही उनकी यांत्रिक जीवन-शैली और भावनात्मक शुष्कता की ओर भी संकेत करते हैं। "मार्सेल्में आठ लाख आदमी बसते हैं और फ्रांसमें यह, पेरिसके बाद, दूसरे नम्बरका शहर है। समुद्र के किनारे होनेसे व्यापारका प्रधान केन्द्र है। "नोत्र-दाम् "से उतरकर हम घुड़दौड़, जादूघर, उद्यान आदि होते कुक् के कार्यालयमें पहुँचे। देखना खतम हो चुका था; इसलिये साथियों के संग आज ही हम लोगों की भी चलनेकी सलाह हो गयी। ७५० फ्रांक दे लन्दनके (तीसरे दरजे के) दो टिकट लिये गये। थोड़ी ही देरमें हम लोग

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

स्टेशनपर जा पहुँचे। हम दोनोंके विचित्र पीले कपड़ोंको देखने के लिये भोड़ लग गयी! गाड़ी में देर थी। प्रोफेसर ल्युने होटलमें (रेस्तोराँ) लेमोनेड पीनेके लिये चलनेको कहा। वहाँ बैठे सैकड़ों आदमी भी हमारी ओर घूर घूरकर देखने लगे। ल्यु महाशय पेशावखाने में गये। लोटते वक्त उन्हें तीन फ्रांककी (प्रायः छः आने) पुर्जी थमा दी गयी। बड़ा कह-कहा मचा. जब उन्होंने आकर कहा- "कनः, यह तो पेशावका भी नोन फ्रांक चार्ज करते हैं"4 लेखक की यह दृष्टि उन्हें एक सजग आलोचक सिद्ध करती है, न कि मात्र पर्यटन लेखक। 'लंदन में साढ़े तीन मास' आलेख विशेष रूप से लेखक की आलोचनात्मक चेतना को उजागर करता है। लंदन म्यूजियम और उसके पुस्तकालय की प्रशंसा करते हुए वे केवल विवरण तक सीमित नहीं रहते, बल्कि भारतीय संदर्भ में उसकी तुलना करते हैं। अपने यहाँ अध्ययन-मनन का वैसा वातावरण और वैसी स्वच्छता न होने की पीड़ा व्यक्त करके वे परोक्ष रूप से भारतीय समाज और व्यवस्था की कमियों पर तीखा, किंतु संयमित प्रहार करते हैं। यह आलोचना निराशावादी नहीं, बल्कि सुधारवादी चेतना से प्रेरित है। राहुलजी को लंदन के गरीबों को देखने की इच्छा थी। ग्रेट ब्रिटन ऐसा देश जिस देश के साम्राज्य का सूरज कभी नहीं ढलता ऐसे देश में गरीब है या नहीं, हैं तो कैसे रहते हैं यह देखने की जिज्ञासा उनमें थी। "लन्दन के गरीबोंके मुहल्लेको देखनेकी बड़ी इच्छा थी। ३० अगस्तको हम लोग लन्दनके पूर्व-अन्तको (East end) देखने गये। लन्दनका पश्चिम-अन्त (West end) धनियोंका और फैशनेबुल स्त्री-पुरुषोंका मुहल्ला है और पूर्व-अन्त गरीबों-का। द्वितीय राउण्ड टेबुल कान्फ्रेंसके समय जाकर महात्मा गांधी यहीं कुमारी लिस्टरके किङ सुले हालमें ठहरे थे। हम सीधे वहाँ न जाकर, पहले ट्वाइन बी हाल (Toynbee Hall) देखने गये। यहाँपर समाज-सेवाका काम होता है और इसके लिए विश्वविद्यालयोंके छात्र और छात्राएँ भी सेवाके कामकी क्रियात्मक शिक्षाके लिए यहाँ आती हैं। शिक्षा, संगीत, चिकित्सा आदि किन-किन तरीक़ोंसे गरीबोंकी सेवा की जा सकती है, इसकी यहाँ क्रियात्मक शिक्षा मिलती है।" 5 अपनी यात्रा में राहुल सांकृत्यायन लंदन के सामाजिक वर्ग-विभाजन और गरीबों के जीवन को प्रत्यक्ष रूप से देखने की अपनी जिज्ञासा व्यक्त करते हैं। वे बताते हैं कि लंदन का पश्चिमी भाग अमीर और फैशनेबल लोगों का क्षेत्र है, जबकि पूर्वी भाग गरीबों का निवास-स्थान है। पूर्वी लंदन को देखने का उनका उद्देश्य केवल भ्रमण नहीं, बल्कि वहाँ के सामाजिक यथार्थ को समझना है। इसी क्रम में वे ट्वाइनबी हॉल का उल्लेख करते हैं, जो गरीबों की सेवा और समाज-कल्याण का केंद्र है। वहाँ विश्वविद्यालयों के छात्र-छात्राएँ शिक्षा, संगीत और चिकित्सा जैसे माध्यमों से समाज-सेवा की व्यावहारिक प्रशिक्षण प्राप्त करते हैं। इस कथन का आशय यह है कि समाज की वास्तविक स्थिति को समझने और सुधारने के लिए संगठित, शिक्षित और व्यावहारिक समाज-सेवा अत्यंत आवश्यक है, तथा विकसित समाज वही है जो अपने कमजोर वर्गों के उत्थान के लिए ठोस प्रयास करता है। ऑक्सफोर्ड और केम्ब्रिज विश्वविद्यालयों के प्रसंगों में राहुल सांकृत्यायन यूरोप की शैक्षणिक परंपरा, शोध-संस्कृति और बौद्धिक स्वतंत्रता की सराहना करते हैं। "केम्ब्रिज यूनियन सोसाइटी" केम्ब्रिजके विद्यार्थियोंकी बड़ा सभा है, जहाँ वह हर तरहका वाद-विवाद किया करते हैं। यहीं इंगलैंडके कितने हैं। भावी मन्त्री तैयार किये जाते हैं। संग्रहालयोंको देखना हो, तो डानिङ स्ट्रीटमें चलिये। यहाँ आमने-सामने दो इमारतोंकी कतारें हैं! एक ओर आयुर्वेदका संग्रहालय है, दूसरी ओर रसायनका इनके पीछे प्राणि-विद्या और खनिज-विद्याके संग्रहालय हैं। भूगर्भशास्त्र, पुरातत्त्व और मानवतत्त्वके संग्रहालय भी यहीं, पासमें ही हैं। वैज्ञानिक प्रयोगशालाओंके लिये केम्ब्रिज संसार भर में प्रसिद्ध है।"6 राहुलजी लिखते हैं कि केम्ब्रिजका पूरा वर्णन छोटे से लेख में नहीं किया जा सकता है। केम्ब्रिज विश्वविद्यालय इतना विशाल है कि वह एक दिन में नहीं देखा जा सकता है। यहाँ भी उनका दृष्टिकोण व्यावहारिक है-वे भारतीय शिक्षा-प्रणाली के लिए प्रेरक तत्वों की खोज करते हैं, न कि केवल तुलना का प्रदर्शन। पेरिस और जर्मनी के संस्मरणों में यूरोप की कला-संस्कृति, सामाजिक अनुशासन और औद्योगिक प्रगति का विवेचन मिलता है, जो पाठक की दृष्टि को व्यापक बनाता है। आलोचनात्मक दृष्टि से देखा जाए तो 'मेरी यूरोप यात्रा' की सबसे बड़ी शक्ति उसकी तथ्यनिष्ठता और वैचारिक स्पष्टता है। हालांकि कहीं-कहीं वर्णन अधिक बौद्धिक और विश्लेषणात्मक हो जाता है, जिससे साधारण पाठक को थोड़ी कठिनाई हो सकती है, फिर भी यही गुण इसे सामान्य यात्रा-वृत्तांतों से अलग और विशिष्ट बनाता है। 'मेरी यूरोप यात्रा' एक ऐसी कृति है जिसमें यात्रा, अध्ययन और चिंतन का त्रिवेणी-संगम दिखाई देता है। राहुल सांकृत्यायन ने यूरोप को देखने के बहाने भारत को समझने और सुधारने की दृष्टि विकसित की है। यही कारण है कि यह यात्रा-वृत्तांत आज भी प्रासंगिक, लोकप्रिय और हिंदी साहित्य में एक आलोचनात्मक मानदंड के रूप में स्वीकार्य है।

**राहुल सांकृत्यायन कृत 'मेरी यूरोप यात्रा': यात्रा-वृत्तांत की विशेषताएँ**

'मेरी यूरोप यात्रा' महापंडित राहुल सांकृत्यायन का एक अत्यंत महत्त्वपूर्ण यात्रा-वृत्तांत है। यह कृति केवल यूरोप भ्रमण का विवरण नहीं, बल्कि वहाँ के समाज, राजनीति, अर्थव्यवस्था, संस्कृति और बौद्धिक जीवन का गहन विश्लेषण प्रस्तुत करती है। इसमें लेखक

की घुमक्कड़ी-चेतना, वैज्ञानिक दृष्टि और समाजवादी विचारधारा स्पष्ट रूप से दिखाई देती है। इस यात्रा-वृत्तांत की प्रमुख विशेषताएँ निम्नलिखित हैं -

**1. ज्ञानात्मक और शोधपरक यात्रा-वृत्तांत**

'मेरी यूरोप यात्रा' साधारण भ्रमण-वर्णन न होकर ज्ञान-यात्रा है। राहुल सांकृत्यायन यूरोप के विभिन्न देशों की सामाजिक संरचना, औद्योगिक विकास, शिक्षा-प्रणाली और श्रमिक जीवन का सूक्ष्म अध्ययन प्रस्तुत करते हैं। उनका उद्देश्य केवल देखना नहीं, बल्कि समझना और विश्लेषण करना है।

**2. सामाजिक और राजनीतिक चेतना**

इस यात्रा-वृत्तांत में यूरोप की राजनीतिक व्यवस्थाओं, पूँजीवाद, समाजवाद और साम्यवाद का तुलनात्मक विवेचन मिलता है। लेखक यूरोप की सामाजिक समानता, श्रमिक आंदोलनों और वर्ग-संघर्ष पर विशेष दृष्टि डालते हैं। भारतीय समाज की पिछड़ी स्थितियों से तुलना कर वे पाठक को चिंतन के लिए प्रेरित करते हैं।

**3. भारतीय दृष्टिकोण से यूरोप का मूल्यांकन**

राहुल सांकृत्यायन यूरोप को अंधी प्रशंसा की दृष्टि से नहीं देखते। वे भारतीय दृष्टि से यूरोप की अच्छाइयों और कमजोरियों—दोनों का निष्पक्ष मूल्यांकन करते हैं। जहाँ वे यूरोप की वैज्ञानिक सोच और अनुशासन की प्रशंसा करते हैं, वहीं उसकी यांत्रिक जीवन-शैली और भावनात्मक शुष्कता की आलोचना भी करते हैं।

**4. यथार्थवादी और वस्तुनिष्ठ शैली**

'मेरी यूरोप यात्रा' की भाषा सरल, स्पष्ट और प्रभावशाली है। वर्णन में भावुकता की अपेक्षा तर्क, तथ्य और यथार्थ का अधिक महत्व है। लेखक स्थानों, लोगों और घटनाओं का वस्तुनिष्ठ चित्रण करता है, जिससे वृत्तांत विश्वसनीय बनता है।

**5. सांस्कृतिक तुलनात्मक दृष्टि**

इस यात्रा-वृत्तांत में यूरोपीय संस्कृति, रहन-सहन, खान-पान, पारिवारिक व्यवस्था और सामाजिक व्यवहार का भारतीय संस्कृति से तुलनात्मक अध्ययन किया गया है। यह तुलना पाठक के सांस्कृतिक दृष्टिकोण को व्यापक बनाती है।

**6. लेखक का व्यक्तित्व और विचारधारा**

इस कृति में राहुल सांकृत्यायन का व्यक्तित्व स्पष्ट रूप से उभरकर आता है—एक जिज्ञासु यात्री, समाज-चिंतक और बौद्धिक विद्वान के रूप में। उनकी तर्कशीलता, स्वतंत्र चिंतन और मानवतावादी दृष्टि यात्रा-वृत्तांत को वैचारिक गहराई प्रदान करती है।

**7. यात्रा-वृत्तांत विधा का विस्तार**

'मेरी यूरोप यात्रा' ने हिंदी यात्रा-साहित्य को नई दिशा दी। इसमें यात्रा को केवल वर्णनात्मक न रखकर सामाजिक-दार्शनिक अध्ययन का माध्यम बनाया गया। इसी कारण यह कृति हिंदी यात्रा-वृत्तांत परंपरा में मील का पत्थर मानी जाती है। 'मेरी यूरोप यात्रा' राहुल सांकृत्यायन की बौद्धिक यात्राओं का उत्कृष्ट उदाहरण है। यह कृति यूरोप के बाहरी स्वरूप के साथ-साथ उसके वैचारिक और सामाजिक ढाँचे को भी उजागर करती है। ज्ञान, विवेक, आलोचना और अनुभव का समन्वय इस यात्रा-वृत्तांत को साहित्यिक और वैचारिक दृष्टि से अत्यंत महत्वपूर्ण बनाता है।

**राहुल सांकृत्यान जी की 'मेरी यूरोप यात्रा' यात्रा-वृत्तांत का साहित्यिक महत्व**

राहुल सांकृत्यायन का यात्रा-साहित्य केवल भौगोलिक यात्राओं का विवरण नहीं है, बल्कि वह ऐतिहासिक, सामाजिक, दार्शनिक और सांस्कृतिक विमर्श का समन्वय है। 'मेरी यूरोप यात्रा' राहुल सांकृत्यायन की बौद्धिक यात्राओं का उत्कृष्ट उदाहरण है। इस संदर्भ में सेतेंग कोनगाडी लिखते हैं, "राहुलजी की यात्राओं में वस्तु एवं व्यक्ति वर्णन का भी महत्त्वपूर्ण स्थान है। उनके व्यक्ति-वर्णन में कहीं अतिरंजकता एवं अतिशयोक्ति नहीं वरन् सर्वत्र सत्य एवं यथार्थ है। यात्रा-पथ में मिलनेवाले नर-नारी, बच्चे-बूढ़े सभी व्यक्तित्व संपन्न होकर उनकी यात्राओं में आए हैं। मार्ग में पड़नेवाले मंदिर, मसजिद, मीनार, विजय स्तंभ, स्मारक, किले, पुराने महल, ये सभी उनकी यात्राओं में मुखरित होते रहे हैं। अपनी यात्रा में राहुलजी जिन व्यक्तियों से मिले हैं, जिनसे प्रभावित हुए हैं, उनका रेखांकन वे अवश्य करते हैं।"7 उनके लेखन ने हिंदी साहित्य में यात्रा को एक समग्र, आलोचनात्मक और संवेदनशील विधा के रूप में स्थापित किया।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

इसीलिए वे न सिर्फ एक महान यात्री बल्कि यात्रा-वृत्तांत के वैज्ञानिक और साहित्यिक शिल्पकार के रूप में भी प्रतिष्ठित हैं। राहुल सांकृत्यान जी की 'मेरी यूरोप यात्रा' यात्रा-वृत्तांत का साहित्यिक महत्व अनन्य साधारण हैं-

**1.अनुभवों का सजीव चित्रण**

राहुल सांकृत्यायन द्वारा लिखित यात्रा-वृत्तांत 'मेरी यूरोप यात्रा' के माध्यम से वे पाठक को घर बैठे दूर-दराज़ के प्रदेशों, संस्कृतियों और जीवन-शैलियों से परिचित कराते हैं। राहुल सांकृत्यायन जी के अनुभव पाठक के लिए प्रत्यक्ष अनुभूति बन जाते हैं।

**2. सांस्कृतिक एवं सामाजिक परिचय**

राहुल सांकृत्यायन द्वारा लिखित यात्रा-वृत्तांत 'मेरी यूरोप यात्रा' के माध्यम से यूरोप के विभिन्न समाजों की परंपराएँ, रीति-रिवाज़, खान-पान, रहन-सहन और सोच उजागर होती है, जिससे सांस्कृतिक समझ और सहिष्णुता बढ़ती है।

**3. इतिहास और भूगोल का जीवंत रूप**

राहुल सांकृत्यायन द्वारा लिखित 'मेरी यूरोप यात्रा' यह यात्रा-वृत्तांत इतिहास और भूगोल को शुष्क तथ्यों से निकालकर जीवंत बना देते हैं। स्थानों के साथ जुड़ी कथाएँ और अनुभव उन्हें स्मरणीय बना देते हैं।

**4. लेखक के व्यक्तित्व की अभिव्यक्ति**

राहुल सांकृत्यायन द्वारा लिखित 'मेरी यूरोप यात्रा' यह यात्रा-वृत्तांत में लेखक का स्वभाव, दृष्टिकोण, संवेदनशीलता और विचारधारा स्पष्ट रूप से प्रकट होती है। इससे पाठक लेखक से भावनात्मक रूप से जुड़ता है।

**5. भाषा और शैली की समृद्धि**

राहुल सांकृत्यायन द्वारा लिखित 'मेरी यूरोप यात्रा' यह यात्रा-वृत्तांत में वर्णनात्मक, चित्रात्मक और भावात्मक भाषा का प्रयोग होता है, जिससे साहित्यिक सौंदर्य बढ़ता है और भाषा अधिक प्रभावशाली बनती है।

**6. मनोरंजन और ज्ञान का समन्वय**

राहुल सांकृत्यायन द्वारा लिखित 'मेरी यूरोप यात्रा' यह यात्रा-वृत्तांत न केवल ज्ञानवर्धक होते हैं, बल्कि रोचक भी होते हैं। इस कारण यह विधा पाठकों में विशेष लोकप्रिय है।

**निष्कर्ष**

इस प्रकार हम देखते हैं कि राहुल सांकृत्यायनजी महापंडित थे।वे कई भाषाओं के ज्ञाता थे; हिंदी, संस्कृत, पाली, भोजपुरी, तिब्बती आदि भाषाओं पर उनकी पकड़ थी, जिससे वे विभिन्न संस्कृतियों के साक्ष्य-संग्रहकर्ता बनकर उभरे। यह बहुभाषावाद उन्हें अलग दृष्टिकोण देता है। 'मेरी यूरोप यात्रा' इस रचना में वे केवल दृश्य-दृष्टि का वर्णन ही नहीं करते बल्कि यूरोप की सामाजिक, ऐतिहासिक और दार्शनिक अनुसंधान भी करते दिखाई देते हैं। उनके यात्रा-लेखन में सामाजिक संरचनाओं, आर्थिक स्थितियों, इतिहास और राजनीतिक सत्ता के प्रभावों का विश्लेषण स्पष्ट होता है। यात्रा-वृत्तांत साहित्य की एक महत्त्वपूर्ण और सशक्त विधा है, जो व्यक्ति, समाज और संस्कृति को जोड़ने का कार्य करती है। यह पाठक के दृष्टिकोण का विस्तार करती है और उसे व्यापक मानव-अनुभव से जोड़ती है। हिंदी साहित्य में यात्रा-वृत्तांतों का स्थान अत्यंत महत्वपूर्ण है, क्योंकि ये जीवन की विविधताओं को सहज और संवेदनशील रूप में प्रस्तुत करते हैं।

**संदर्भ सूची:**

1. राहुल सांकृत्यायन, राहुल वाङ्मय, मेरी जीवन यात्रा पृष्ठ 89
2. राहुल सांकृत्यायन, मेरी यूरोप यात्रा, पृष्ठ- भूमिका
3. राहुल सांकृत्यायन, मेरी यूरोप यात्रा, पृष्ठ 05
4. राहुल सांकृत्यायन, मेरी यूरोप यात्रा, पृष्ठ 15-16
5. राहुल सांकृत्यायन, मेरी यूरोप यात्रा, पृष्ठ 73
6. राहुल सांकृत्यायन, मेरी यूरोप यात्रा, पृष्ठ 47
7. सेतेंग कोनगाडी, हिन्दी यात्रा साहित्य को राहुल सांकृत्यायन की देन, पृष्ठ 176

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026


Original Article

# भारतातील धार्मिक पर्यटन : एक संधी


**प्रा. गणेश तुकाराम मोकासरे**

सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

**Emaiil:** gtmokasare@gmail.com



**Manuscript ID**:

JRD -2026-180118

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(V)

Pp. 70-72

January 2026

**Submitted:** 11 Dec. 2025

**Revised:** 21 Dec. 2025

**Accepted:** 11 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026



***सारांश***

*भातासाठी धार्मिक पर्यटन ही एक सुवर्ण संधी आहे. कारण भारत हा जगातील सर्वाधिक धार्मिक स्थळे असलेला देश आहे. भारतात जवळपास ५००० पेक्षा अधिक धार्मिक पर्यटन स्थळे आहे. देशातील एकूण पर्यटनाच्या उत्पन्न पैकी ६०% उत्पन्न केवळ धार्मिक पर्यटनातून मिळते. भारतीय पर्यटनाचा जीडीपी मधील वाट ५% असून तो अलीकडल्या काळात वाढलेला आहे. पर्यटन मंत्रालयाने ४ फेब्रु.२०२४ (PIB) रोजी दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ७.६ कोटी नोकऱ्याची निर्मिती भारतात पर्यटनाच्या माध्यमातून झाली व परकीय चलन २८ अब्ज अमेरिकन डॉलरइतके होते. यासर्व बाबी लक्षात घेतल्यास असे दिसून येते की, भारतात धार्मिक पर्यटन ही आर्थिक विकासासाठी खूप मोठी संधी आहे. परंतू भारताला धार्मिक पर्यटनात अनेक महत्वपूर्ण पावले उचलण्याची गरज आहे ती म्हणजे धार्मिक स्थळांची स्वच्छता, त्यांची कनेक्टीव्हिटी, पर्यावरण पुरक वातावरण व पर्यटकांना लुटण्याची मानसिकता सोडून अतिथी देवो भव ही मानसिकता रुजवणे गरजेचे आहे. अन्यथा ही संधी एक दिवा स्वप्नच राहील.*

***मुख्य शब्द:*** *पर्यटन, धार्मिक पर्यटन*


**प्रस्तावना:**

मानव हा समाजशील प्राणी असून, तो प्राचीन कालपासूनच भटकंती करत आला आहे. मग ही भटकंती अन्नासाठी होती, कधी व्यापारासाठी, कधी ज्ञानासाठी तर कधी पर्यटनासाठी. प्राचीन कालपासूनच भारतात अनेक पर्यटक व्यापारासाठी, तर कधी अभ्यासासाठी आले होते. थोडक्यात पर्यटन हि मानवाची प्राचीन कला पासून चालत आलेली क्रिया आहे. पर्यटन म्हणजे जेव्हा मानव आपल्या नेहमीच्या निवसाहून मनोरंजनासाठी, विश्रांतीसाठी, आनंदासाठी किंवा ज्ञानासाठी दुसऱ्या ठिकाणी प्रवास करून जातो, ज्यात मुक्कामाचाही समावेश असतो त्याला पर्यटन असे म्हणतात. जागतिक पर्यटन संस्थाच्या मते, “पर्यटन महणजे जे लोक मनोरंजन, व्यवसाय,किंवा इतर कारणांसाठी त्यांच्या नेहमीच्या परिसरा बाहेर प्रवास करतात आणि एका वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी राहतात”. टयूरीझम सोसायटी ऑफ ब्रिटनच्या मते, “पर्यटन म्हणजे लोक ज्या ठिकाणी नेहमी राहतात व काम करतात त्या ठिकाण बाहेर असलेल्या गंतव्यस्थळी तात्पुरत्या व आल्पकालीन कालावधीसाठी केलेला प्रवास किंवा क्रीया होय”. पर्यटनाचे अनेक प्रकार पडतात त्यात निसर्ग पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, साहसी पर्यटन, धार्मिक पर्यटन, मनोरंजन पर्यटन इ. निसर्ग पर्यटन म्हणजे डोंगर, समुद्र, निसर्गाचे सौंदर्य हे पाहण्यासाठी केलेला प्रवास होय. कला, परंपरा, संस्कृती अनुभवण्या साठी केलेला प्रवास म्हणजे सांस्कृतिक पर्यटन होय, ट्रेकिंग पर्वतारोहन करणे म्हणजे साहसी पर्यटन होय. फक्त मनोरंजन मजा आराम करण्यासाठी केलेला पर्यटन म्हणजे मनोरंजन पर्यटन होय. तर तीर्थयात्रा व धार्मिक स्थळांना भेटी देणे म्हणजे धार्मिक पर्यटन होय.


Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*प्रा. गणेश तुकाराम मोकासरे, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव*



**How to cite this article:**

*मोकासरे, . गणेश . तुकाराम . (2026). भारतातील धार्मिक पर्यटन : एक संधी. Journal of Research & Development, 1(V), 70–72. https://doi.org/10.5281/zenodo.18478149*

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18478149

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

यापैकी धार्मिक पर्यटन हे भारतासाठी एक सुवर्ण संधी आहे. त्याचे जर व्यवस्थीत नियोजन केले तर ते भारतातील आर्थिक विकासाला खूप मोठ्या प्रमाणात मदत करू शकते.

**उद्येश:**

- भारतातील धार्मिक पर्यटनाचा आढावा घेणे.
- भारतातील धार्मिक पर्यटनाच्या संधी जाणून घेणे.

**अध्ययनपध्दती:**

सदरील पेपरसाठी प्रामुख्याने दुय्यम तथ्य संकलन स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी प्रामुख्याने संदर्भग्रंथ, साप्ताहिके, मासिके, इंटरनेट वरील माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. वर्णनात्मक संशोधन पध्दतीच्या आधारे माहितीचे आशय विश्लेषन करून वर्णनात्मक मांडणी करण्यात आलेली आहे.

**गृहित कृत्य:**

- जगात सर्वात जास्त सर्व धर्माचे धार्मिक स्थळे भारतात आहे.
- भारतात धार्मिक पर्यटनाला उत्तम संधी आहे.

**भारतातील धार्मिक पर्यटन:**

भारत हा बहुधार्मिक देश आहे. येथे जगातील प्रमुख सातही धर्माचे लोक एकत्र गुण्यागोविंदाने राहताना दिसून येतात. प्रत्येक धर्माचे तत्वज्ञ वेगवेगळे आहेत. त्यामुळे प्रत्येक धर्माचे तीर्थक्षेत्रही वेगवेगळी आहेत. प्रत्येक धर्माच्या लोकांसाठी त्याची त्यांची तीर्थक्षेत्र पूज्यनीय आहेत. हिंदू, बौद्ध, जैन, शिख हे चार धर्म तर भारतातच उदय झालेले आहेत. त्यामुळे त्यांची मूळ उगम भूमी भारतच आहे. याशिवाय इस्लाम व ख्रिश्चन हे परकीय धर्म असून त्यांचेही धार्मिक स्थळही येथे आहेत. त्यामुळे प्रत्येक धर्माचे यात्रेकरू भारतभर तीर्थयात्रे साठी वर्षभर फिरत असतात. २०११च्या जनगणनेनुसार भारतात हिंदू धर्माचे एकूण ७९.८ % लोक राहतात. हिंदू धर्मानुसार तीर्थयात्रा हि पुण्यप्राप्ती व मोक्ष प्राप्तीसाठी महत्वाची मानली जाते. भारतात हिंदू धर्माचे प्रमुख चार तीर्थक्षेत्र आहेत. ज्यांना चारधाम असे म्हणले जाते. जे देशाच्या वेगवेगळया चार दिशेला आहेत. यामध्ये बद्रीनाथ, द्वारका, पुरी, रामेश्वरम या तीर्थक्षेत्रचा समावेश होतो. हे चारही धाम पूर्ण केल्याशिवाय मानवाला मोक्ष नाही असे मानले जाते. त्यामुळे हिंदू धर्मातील लोक चार धाम यात्रा आवश्य पूर्ण करतात. यामुळे देशातील केवळ पर्यटनालाच चालना मिळत नाही तर देशातील चारही दिशांच्या लोकांमध्ये सांस्कृतिक व वैचारिक देवाणघेवाण होते व देश एकसंघ राहतो. तसेच काशी हे भगवान शिवाचे एक प्रमुख स्थान आहे, अयोध्या ही श्रीराम जन्म भूमी आहे. मथुरा-वृदावन ही श्रीकृष्णाशी संबंधित पवित्र स्थळे आहेत. तिरुपती बालाजी, शिर्डीचे साईबाबा, सोमनाथ, केदारनाथ, वैष्णोदेवी पंढरपूर हीसुद्धा खूप पवित्र धार्मिक स्थळ आहेत. याशिवाय नाशिक, उज्जैन, हरिद्वार, प्रयागराज ही कुंभ मेळयाची पवित्र स्थळे आहेत. जेथे दर चार वर्षांनी कुंभमेळा भरत असतो. भारतातील बौद्ध धर्माचा विचार केला असता, भारतात बौद्ध धर्माचेही खूप धार्मिक स्थळ आहेत. ज्यामध्ये भगवान बुद्धाच्या जीवनाशी संबंधित चार महत्वाचे स्थळे महणजे, लुंबिनी नेपाल सीमेलगत जे भगवान बुद्धाचे जन्मस्थळ आहे. दुसरे म्हणजे बोधगया बिहार येथे, जेथे बुद्धांना ज्ञान प्राप्ती झाली. सारनाथ येथे बुद्धांनी प्रथम धर्म उपदेश केला आणि चौथे कुशीनगर जेथे बुद्धांना महानिर्वाण प्राप्त झाले. याशिवाय भारतातील महत्वाची बौद्ध स्थळे महणजे श्रावस्ती, राजगृह, नालंदा, वैशाली, सांची, अजंठा, वेरूळ लेणी इ. बौद्ध धर्माच्या संबंधित पर्यटनामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटनला चालना मिळते. श्रीलंका, जपान, थायलंड, चीन इ देशातून बौद्ध भिक्खू मोठ्याप्रमाणात भारतात या पवित्र स्थळांना भेट द्याला येतात. त्यामुळे स्थानिक रोजगार व आर्थिक व्यवस्थेला खूप मदत होते.

भारतातील जैन धर्माचे पहिले तीर्थंकर हे ऋषभदेव तर २४ वे तीर्थंकर म्हणजे भगवान महावीर होय. भारतातील प्रमुख जैन तीर्थक्षेत्र जे पर्यटन क्षेत्र आहेत, ती म्हणजे श्रवणबेळगाव जेथे भगवान बाहुबलीची ५७ फूट एकसंघ मुर्ती आहे . जेथे १२ वर्षांनी एकदा महामास्तकाभिषेक होतो. यावेळी देश विदेशातील लोक हा सोहळा बघण्यासाठी येतात. याशिवाय दिलवाडा माउंटअबू येथील संगमरवरी कोरीवकामातील मंदिर वास्तूकलेच्या दृष्टीने अप्रतिम मंदिर आहे. पालीताना, गिरनार पर्वत, रानकापूर, सोनगिरी, एलोरा जैन लेणी इ.हे सुद्धा जैन धर्मातील महत्वाचे तीर्थस्थळ आहेत. भारतातील शीख धर्मानेही पर्यटनाला चांगलीच चालना दिलेली दिसून येते. शीख धर्मातील सर्वात पवित्र तीर्थस्थळ म्हणजे सुवर्ण मंदिर अमृतसर हे होय. भारतातील केवळ शिखच नव्हे तर इतर धर्मातील लोकही थेथे दर्शनासाठी जातात. याशिवाय अकाल तख्त साहेब अमृतसर, तख्त श्री आनंदपूर साहिब, पंजाब येथे खालसा पंथाची स्थापना झाली होती. तख्त श्री दमदामा साहिबा पंजाब, गुरुगोविन्दसिन्ह्जी यांचे कार्यस्थळ, तख्त श्री हुजूर साहेब, नांदेड इ. शीख धर्मातील पर्यटनातील महत्वपूर्ण बाबी म्हणजे लंगर सेवा, सेवा परंपरा होय व धार्मिक सहिष्णुता होय. सर्व धर्मातील लोकांसाठी लंगर व मंदिर सदा खुले असते. याशिवाय भारतात इस्लाम धर्मातील विविध मस्जिद व दर्गा जसे की जमा मस्जिद, मक्का मस्जिद , हाजी आली दर्गा, अजमेर आली दर्गा इ. दर्गाच्या धार्मिक स्थळांना केवळ मुस्लिमच नाही तर सर्व धर्मातील लोक भेटी देतात व सर्वधर्मसमभाव दाखवतात. तसेच गोवा, बेंगलुरू , चेन्नई इ ठिकाणच्या चर्च बघण्यासाठी सुध्दा सर्व धर्मातील लोक जातात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**धार्मिक पर्यटन : एक संधी**

जागतिक प्रवास आणि पर्यटन परीषद(WTTC) नुसार भारतात २०२५ मध्ये (जीडीपी योगदानात) ८ व्या क्रमांकाची पर्यटन अर्थव्यवस्था बनली आहे. तर प्रवास आणि पर्यटन विकास निर्देशांक नुसार (२०२४) भारताचा ३९ वा क्रमांक लागतो. THE INDIAN EXPRESS 11JULY, 2025. 2023 –मध्ये भारतीय पर्यटनाचा जीडीपी मध्ये ५% होता, जो अलीकडच्या काळात वाढलेला आहे. PBI ने दिलेल्या माहितीनुसार (२६सप्टे -२०२५), भारतामध्ये ऑगस्ट २०२५पर्यंत जवळपास ५६ लाख विदेशी पर्यटकांचे आगमन )FTAs) नोदावले गेले तर ३०३.५९ कोटी भारतीय पर्यटकांनी वेगवेगळ्या ठिकाणी भेटी दिल्या. २०२४-२५ या आर्थिक वर्षात Sustainable and Responsible Tourism अंतर्गत २३ राज्यामध्ये ४० प्रकल्प सुरु करण्यात आले. पर्यटन हे केवळ मनोरंजनचे साधन नसून, ते रोजगार निर्मितीचे महत्वाचे साधन आहे. तसेच देशाच्या आर्थिक विकासाला ते खूप हातभार लावते. पी. आय. बी. २०२४ च्या आकडेवारीनूसार ७.६ कोटी नोकऱ्याची निर्मिती भारतात पर्यटनाच्या माध्यमातून झाली. भारताला पर्यटनातून२८ अब्ज अमेरिकन डॉलर एवढे परकीय चलन मिळाले. तसेच पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.पायाभूत सुविधांचा विकास होऊन लोकांचे जीवनमान उंचावते. भारत हा जगातील सर्वाधिक धार्मिक स्थळे असलेला देश आहे. भारतात ५००० पेक्षा अधिक धार्मिक पर्यटन स्थळे आहे. त्यामुळे येथे धार्मिक पर्यटनाला खूप संधी आहे. देशातील एकूण पर्यटनाच्या उत्पन्न पैकी ६०% उत्पन्न केवळ धार्मिक पर्यटनातून मिळते. धार्मिक पर्यटणासाठी सरकारने अनेक योजना ही सुरु केल्या आहेत. त्यात ५३ धार्मिक स्थळांचा प्राधान्याने विकास करण्यात येणार आहे. नंतर ८९ ठिकाणी विकास कामे केली जाणार आहे. तसेच ०७ नवीन पर्यटन सर्किटमध्ये विभागणी करण्यात आली आहे. हे सर्किट सर्व धर्मातील स्थळांसाठी करण्यात येणार आहे.

भारतात धार्मिक पर्यटन ही एक मोठी संधी असली तरी, त्यात काही महत्वाच्या अडचणी सुद्धा आहेत. जसे की , अनेक धार्मिक स्थळांच्या स्वच्छता नाही. काही धार्मिक स्थळांची विमान, रेल्वे, बसेस या संदर्भातील कनेक्टीव्हिटी खूप कमी आहे. पार्किंग व निवास व्यवस्था आधुनिक नाही. भोजन व्यवस्थेत विविधता नाही आणि महत्वाचे म्हणजे धार्मिकतेच्या नावाखाली पर्यटकाची लुट.याबाबी लवकर बदलणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

१. https:/www.pib.gov.in dated-26 Sep,2025, retrieved on 31/12/2025
२. https:/www.pib.gov.in dated-04Feb,2024, retrieved on 31/12/2025
३. http://www.business –standard.com. retrieved on 31/12/2025
४. शिंदे, विजय. *पर्यटन: संकल्पना, संघटन आणि नियोजन*. पिंच प्रकाशन, २०१५.
५. देशपांडे, सुनील. *पर्यटन आणि समाज: भारतीय दृष्टिकोन*. वैशाली पब्लिकेशन, २०१८.
६. कुलकर्णी, आर. डी. *पर्यटन व्यवस्थापन*. हिमालय प्रकाशन, २०१२.
७. देशमुख, भारती. *पर्यावरण आणि पर्यटन*. पश्चिम महाराष्ट्र प्रचार मंडळ, २०१९.
८. गायकवाड, माधव. *भारतीय संस्कृति आणि पर्यटन*. आदर्श प्रकाशन, २०१७.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# आधुनिक पर्यटन उद्योगाचे घटक

**डॉ. सुभाष रा. रगडे**
सहाय्यक प्राध्यापक, पदवी, पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र, श्री शिवाजी कॉलेज, कंधार, ता. कंधार, जि. नांदेड
**Email:** subhashragade@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180119
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 73-76
January 2026
**Submitted:** 11 Dec. 2025
**Revised:** 21 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*आधुनिक काळात पर्यटन हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता एक महत्त्वपूर्ण सेवा उद्योग म्हणून विकसित झाले आहे. वाहतूक, निवास, भोजन, पर्यटन संघटना, पर्यटन प्रतिनिधी, बाजारपेठा, जाहिरात, हस्तउद्योग व स्थानिक वाहतूक असे अनेक घटक पर्यटन उद्योगाशी निगडित आहेत. या घटकांमुळे पर्यटन उद्योगाची रचना व्यापक व गुंतागुंतीची झाली आहे. पर्यटन उद्योगामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत असून आर्थिक विकासाला चालना मिळते. तसेच सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय देवाण-घेवाणीसही पर्यटन महत्त्वाची भूमिका बजावते. शासकीय व खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे पर्यटन स्थळांचा विकास होत असून देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटनाला गती मिळत आहे. त्यामुळे पर्यटन उद्योग हा आधुनिक काळातील आर्थिक प्रगतीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरला आहे.*

***मुख्यशब्द***: *आधुनिक पर्यटन, पर्यटन उद्योग, सेवा उद्योग, वाहतूक व्यवस्था, निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, पर्यटन संघटना, रोजगारनिर्मिती, आर्थिक विकास*

## प्रस्तावना:

आधुनिक काळात वाहतुकीच्या साधनांत प्रगती झाल्यामुळे पर्यटन सुलभ आणि आनंददायी झाले आहे. म्हणून पर्यटनाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटनाचे स्वरूप हे भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक झाले आहे. तसेच पर्यटनाची व्याप्ती खूप विस्तृत आहे. यामध्ये अनेक गोष्टींचा समावेश करण्यात येतो. मनोरंजन, अभ्यास किंवा व्यवसाय यासाठी केलेल्या प्रवासाचा समावेश होतो. यात नैसर्गिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक स्थळे, साहसी, ग्रामीण, आरोग्य, वन्यजीव पर्यटन अशा विविध घटकांच्या पर्यटनाचा समावेश होतो. त्यामुळे पर्यटनाची व्याप्ती खूप व्यापक बनली आहे. सुरुवातीच्या काळात पर्यटन साध्या पद्धतीने होत होते. सद्यस्थितीत पर्यटनात आधुनिक पद्धतीने बदल होत आहेत. आधुनिक काळात पर्यटनाकडे एक उद्योग म्हणून बघितले जात आहे. आधुनिक उत्पादन, आधुनिक मागणी आणि त्यानुसार पर्यटनसुद्धा आधुनिक बनत चालले आहे. या उद्योगापासून सरकारला महसूल, सामान्य लोकांना रोजगार, तसेच अनेक पूरक व्यवसायांना चालना मिळते. पर्यटन हा आधुनिक काळातील एक उद्योग मानला जातो. या सेवा उद्योगातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल व विकास होतो.

## पर्यटन उद्योगाचे घटक

वर्तमान काळात पर्यटन उद्योग हा जगातील सर्वात मोठा उद्योग झाला आहे. पर्यटनात सरळ सरळ वस्तूंचे उत्पादन केले जात नाही. यात विविध सेवा प्रदान करण्यात येतात. पर्यटनास सेवा उद्योग मानले जाते.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*
Quick Response Code:

**Address for correspondence:**
*डॉ. सुभाष रा. रगडे, सहाय्यक प्राध्यापक, पदवी, पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र, श्री शिवाजी कॉलेज, कंधार, ता. कंधार, जि. नांदेड*

**How to cite this article:**
*रगडे, . सुभाष . रा . (2026). आधुनिक पर्यटन उद्योगाचे घटक. Journal of Research & Development, 18(1(V)), 73–76. https://doi.org/10.5281/zenodo.18478175*
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18478175

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटनामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे पर्यटन हा उद्योग आहे. ही उद्योग प्रक्रिया अनेक लोकांशी संबंधित आहे. पर्यटनामुळे पर्यटकांसाठी हॉटेल, लॉज, उपाहार गृह, वाहतूक संस्था, परिवहन आणि त्यासाठी लागणारे कामगार यांची आवश्यकता असते. यातून हॉटेल, लॉज, उपाहार गृहे व प्रवास एजन्सी इ. उद्योग निर्माण झाले. हे सर्व उद्योग पर्यटनास पूरक आहेत. पर्यटन उद्योगात खाजगी कंपन्या, धर्मादाय संस्था आणि स्वयंसेवी संस्था असे अनेक पर्यटन व्यवसायात कार्यरत आहेत. म्हणून पर्यटन उद्योगाची रचना खूप गुंतागुंतीची आहे. यामध्ये पर्‌यटन उद्योगाचे अनेक अविभाज्य घटक आहेत. पर्यटन उद्योगाचे अ) प्राथमिक घटक, ब) दुय्यम घटक अशा दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. या घटकांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे.

**अ) पर्यटन उद्योगाचे प्राथमिक घटक**

पर्यटन उद्योगातील प्राथमिक घटक पुढील प्रमाणे आहेत.

**१) वाहतूक व्यवस्था**

वाहतूक (Transportation) व्यवस्थेत रस्ते (बस, टॅक्सी, कार), रेल्वे, जल (क्रूझ, बोटी), हवाई (देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमान) या वाहतूकीचा समावेश होतो. ही वाहतूक सरकारी व खाजगी अशा दोन घटकांद्वारे पुरविली जाते. वाहतूक व्यवस्थातून चालक, वाहक, व्यवस्थापक, तिकीट आरक्षण करणारे, रोखपाल, हिशोबनीस, वाहन बनविणारे कारागीर व वाहन दुरुस्त करणारे मेकॅनिक, वाहतूक व्यवस्थेशी संबंधित कामगार, हमाल, वाहतूक व्यवस्थेला हाताळणाऱ्या घटकांना रोजगार उपलब्ध होतो. यामुळे पर्यटन उद्योगात वाहतूक व्यवस्था महत्त्वाचा घटक आहे.

**२) निवास व्यवस्था**

पर्यटन उद्योगात निवास (Accommodation) व्यवस्थेला प्राधान्य दिले जात असल्याने हा घटक महत्वाचा आहे. निवास व्यवस्थेतील उद्योग म्हणजे हॉटेल. यात हॉटेल्स (लक्झरी ते बजेट) लॉज, गेस्ट हाऊस, धर्मशाळा होमस्टे आणि रिसॉर्ट्स इ. चा समावेश होतो. यामध्ये निवास, भोजन व इतर सेवा-सुविधा उपलब्ध असतात. आर्थिक परिस्थितीनुसार पर्यटक निवास व्यवस्थेची मागणी करतात. या उद्योगात निवासी अतिथीगृह, शासकीय निवासगृहे, धर्मशाळा, कॅप्सूल, तरंगणारे, रिसार्ट, युथ, मोटेल, तंबू, हॉलीडे व्हिलेज इ. विविध प्रकारची निवास व्यवस्था पुरवितात. या उद्योगातून व्यवस्थापक, कॅशियर, हिशोबनिस, आचारी, सफाई कामगार, वेटर्स, माळी, गायक, कलाकार, डेकोरेटर अशा घटकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळतो.

**३) भोजन व्यवस्था**

पर्यटन उद्योगात अन्नपुरवठा करणाऱ्या भोजन व्यवस्थेच्या उद्योगाला महत्व आहे. पर्यटक पर्यटनासाठी बाहेर जातात तेव्हा त्या भागातील प्रसिद्ध खाद्य पदार्थांची मागणी करतात. उदा. दक्षिण भारतातील इडली, डोसा, सांबार हे प्रसिद्ध आहेत. समुद्र किनारी माश्यांची खाद्य पदार्थ प्रसिद्ध असतात. राजस्थानची दाल-बाटी, रामरोटा प्रसिद्ध आहे. हैदराबादची बिर्याणी, आग्र्याचा पेठा, मथुरेचे पेढे, कोल्हापूरचा तांबडा व पांढरा रस्सा पर्यटक आवडीने खातात. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी खाद्य पदार्थ तयार करणारे उद्योग तयार झाले आहेत. यासाठी लागणारे साहित्य पूरवठा करणाऱ्या उद्योगांना मोठ्या प्रमाणात आर्थिक स्त्रोत मिळून रोजगार निर्मिती होते.

**४) पर्यटन संघटन**

पर्यटन संघटनांचे १) केंद्रीय, २) विकेंद्रित पर्यटन संघटन, असे प्रमुख दोन प्रकार आहेत. याबरोबरच १) शासकीय, २) खाजगी पर्यटन संघटन असेही प्रकार आहेत. भारतात शासकीय असणारी 'राष्ट्रीय पर्यटन संघटना' (NTO) पर्यटन उद्योग वाढीचे कार्य करते. स्वदेश व विदेशात पर्यटन उद्योगाचा विकास व्हावा म्हणून पर्यटन माहिती कार्यालये उघडले आहेत. भारतात केंद्रीय स्तरावर 'भारतीय पर्यटन विकास महामंडळ' (I.T.D.C.) व राज्य स्तरावर 'महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ' (M.T.D.C.) या संघटना कार्य करीत आहेत. पर्यटन उद्योगामुळे आर्थिक क्षेत्रात होणारी प्रगती पाहता पर्यटन संघटनेला जास्त महत्व प्राप्त झाले आहे.

**५) पर्यटन प्रतिनिधी**

पर्यटन व्यवसायात पर्यटकांना पुरवल्या जाणाऱ्या अनेक प्रकारच्या सेवा-सुविधांची सुरुवात पर्यटन प्रतिनिधी (Agents) यांच्या पासून होते. आधुनिक पर्यटन उद्योगात पर्यटन प्रतिनिधीना अतिशय महत्वाचे स्थान आहे. कारण प्रतिनिधी हे पर्यटक व पर्यटन व्यवसाय यांच्यातील दुवा आहेत. पर्यटक पयर्टन स्थळापर्यतचा प्रवास, निवास, भोजन व इतर संबंधीत घटकांचे नियोजन पर्यटन प्रतिनिधीवर सोपवितात. यामुळे पर्यटन उद्योगाला चालना मिळाली आहे. पर्यटन प्रतिनिधीचे अ) सरकारी प्रतिनिधी, ब) खाजगी प्रतिनिधी असे दोन प्रकार पडतात. पर्यटन व्यवसायात पर्यटन प्रतिनिधीद्वारे पुढीलप्रमाणे सेवा पुरविल्या जातात. १) पर्यटन नियोजन व खर्च यांची माहिती देणे, ४) प्रवास तिकिटांचे आरक्षण करणे, ३) पर्यटन स्थळांची सर्व माहिती देणे, ४) पर्यटन स्थळांच्या प्रवासाची माहिती देणे, ५) पर्यटकांना आवश्यक सहाय्यभूत सेवा व सुविधा पुरविणे, ६) विविध चलनांची अदलाबदली करणे, ७) पर्यटकांचा विमा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

उतरविणे. इ. विविध पुरक सेवा देण्यासाठी पर्यटन प्रतिनिधिस इतर अनेक सहाय्यभूत घटकांची मदत घ्यावी लागते. केवळ प्रतिनिधी एकट्या सर्व सेवा देऊ शकत नाही. त्यामुळे इतर अनेक लोकांना यातून रोजगार निर्मिती होते.

**ब) पर्यटन उद्योगाचे दुय्यम घटक**

पर्यटन उद्योगाचे दुय्यम घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**१) हस्त उद्योग**

भारताच्या अनेक ग्रामीण भागातील हस्त उद्योगाचे लघु उद्योगासारखे स्वरूप आहे. यामध्ये हस्तकला, काष्टकला, चर्मोद्योग, शिल्पकला, चित्रकला, इ. चा समावेश होतो. पर्यटकांना हस्तकलेच्या वस्तूंची आवड असते. भारताच्या प्रत्येक भागात वैशिष्टयपूर्ण हस्त व्यवसाय विकसित झालेला आहे. पर्यटक त्या भागात गेल्यानंतर त्या वस्तूला पसंती देतात. त्या ठिकाणांच्या भौगोलिक वैशिष्टयानुसार हस्त व्यवसायाचा विकास झाला आहे. उदा. पैठणची पैठणी शालू, काश्मीरची काश्मीरी शॉल, कोल्हापूरी चप्पल, राजस्थानी पोशाख, बनारसी साडी, आदिवासी चित्रकला इ. यामुळे ग्रामीण भागातील हस्त व्यवसायाला चालना मिळत आहे.

**२) स्थानिक वाहतूक**

पर्यटकांना स्थानिक वाहतूक व्यवस्था गरज असते. यात सायकल, रिक्षा, टॅक्सी, घोडा गाडी, सिटी बस, लोकल रेल्वे, बोट इ. चा समावेश होतो. पर्यटन स्थळी असणाऱ्या मनोरंजक वाहतूक व्यवस्थेचा वापर पर्यटक वापर करतात. उदा. उंट, हत्ती, घोडा, खेचर, बोट यांच्यावर फेरफटका मारतात. स्थानिक वाहतूक व्यवस्था पर्यटन उद्योगाला अधिक बळकटी देण्याचे काम करतात. स्थानिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध नसल्यास पर्यटकांना समस्या निर्माण होते. त्यामुळे स्थानिक वाहतूक व्यवस्थाही पर्यटन उद्योगात महत्वाचा घटक आहे.

**३) बाजारपेठा**

सर्व प्रकारच्या पर्यटन स्थळी विविध प्रकारची दुकाने व बाजारपेठ तयार होत आहेत. या बाजारपेठा नियमित बाजारपेठांपेक्षा वेगळया असतात. पर्यटक पर्यटन स्थळांची पाहाणी झाल्यानंतर थोडावेळ परिसरातील बाजारात फेरफटका मारून सुंदर, आकर्षक व नाविण्यपूर्ण वस्तू विकत घेतात. त्यामुळे पर्यटन स्थळे ही बाजारपेठांचा मुख्य आधार आहेत.

**४) प्रसिध्दी व जाहिरात उद्योग**

आधुनिक काळात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेक माध्यमांतून जाहिरात करून प्रसिद्धी दिली जाते. यातून पर्यटन स्थळे, तेथील सोयी-सुविधा, वेगळेपणाची माहिती दिली जाते. प्रसिद्धी व जाहिरातीच्या उद्योगातून अनेक लोकांना रोजगार उपलब्ध होतो. पर्यटन स्थळांची माहिती लिहिणारे लेखक, पत्रकार, छायाचित्रण करणारे फोटोग्राफर, मॉडेलिंगचे कलाकार, जाहिरात करणारे छापणारे मुद्रक, वितरक इ. अनेकांना पर्यटन उद्योगातून रोजगार उपलब्ध होतो.

**५) पर्यटक मार्गदर्शक**

पर्यटनामध्ये पर्यटक मार्गदर्शकास महत्वाचे स्थान आहे. त्यांना पर्यटन स्थळाचा दूत म्हंटले जाते. पर्यटकांना पर्यटन स्थळाची संपूर्ण माहिती असतेच असे नाही. भारतातील अनेक ठिकाणांच्या पर्यटनस्थळी असंख्य पर्यटक मार्गदर्शक कार्यरत आहेत. यातून त्यांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे.

**६) हमाल व फेरीवाले**

पर्यटनास निघाल्यापासून ते पुन्हा घरापर्यंत येईपर्यत बस स्टँड, रेल्वे स्टेशन, एअर पोर्ट, बंदरे इ. ठिकाणी साहित्यासाठी हमालांची आवश्यकता असते. यातून अकुशल क्षेत्रात काम करणाऱ्या हमाल लोकांना रोजगार उपलब्ध होतो. काही पर्यटन स्थळे हे उंचावर असल्याने वयस्कर, आजारी पर्यटकांना चढणे शक्य नसते. अशा ठिकाणी हमालांचा उपयोग होतो. पर्यटन स्थळी पर्यटक लहान-लहान वस्तूंची खरेदी रस्त्यावर करतात. उदा. भेल-मिसळ, वडापाव, बर्फाचे गोळे, आइस्क्रिम, फुगे, मिठाई, खाद्य पदार्थ, भुट्टा, नारळ पाणी, सरबत, खारमुरे इ. रस्त्यावर विक्रिस उपलब्ध असतात. यातून फेरीवाल्यांना रोजगार निर्मिती होते.

**निष्कर्ष**

पर्यटनाचे आज विकेंद्रीकरण झाले आहे. पर्यटन क्षेत्रात नवीन अनेक क्षेत्र विकसित होत आहेत. आज पर्यटनामध्ये केवळ मौजमजा करणे व आनंद लुटणे या कल्पना मागे पडल्या आहेत. या कल्पनांशिवाय सध्याच्या पर्यटकांची भूमिका वेगळी बनली आहे. मनोरंजनाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि पर्यावरणीय दृष्टीने महत्त्वाचे आहे. विदेशी पर्यटकांमुळे परकीय चलन उत्पन्न करण्यास मदत मिळते. पर्यटनाद्वारे देशातील सौंदर्य, कला, स्थापत्य, इतिहास आणि संस्कृती दर्शविण्यासाठी मदत होते. एखाद्या ठिकाणाला पर्यटन स्थळ घोषित केल्यानंतर त्या ठिकाणाचे लक्षणीय परिवर्तन होते. यामुळे रस्ते, दळणवळणाची साधने, कनेक्टिव्हिटी, विमानतळ यात सुधारणा होते. विविध पर्यटन स्थळांमुळे पर्यटक भारताकडे आकर्षित होतात. हे आपल्या देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये मदत करते. रोजगार निर्मिती होते. सामाजिक, सांस्कृतिक देवाण-घेवाणीचा एक उत्तम मार्ग आहे. म्हणून पर्यटनाला प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. पर्यटन हे सार्वजनिक व खाजगी उत्पन्नाचा निरंतर चालणारा आर्थिक स्त्रोत आहे. पर्यटन हा आधुनिक काळातील एक उद्योग मानला जातो. पर्यटनात वस्तूंचे उत्पादन केले जात नाही. परंतु प्रामुख्याने विविध सेवा प्रदान करण्यामुळे पर्यटनास सेवा उद्योग मानता

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

येते. पर्यटनामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध होतो. पर्यटनामुळे पर्यटकांसाठी हॉटेल, लॉज, उपाहारगृह, वाहतूक व्यवस्था आणि त्यासाठी लागणारे कामगार यांची आवश्यकता निर्माण होते. यातून हॉटेल, लॉज, उपाहारगृहे व प्रवास एजन्सी इ. उद्योग निर्माण झाले. हे सर्व उद्योग पर्यटनास पूरक उद्योग आहेत. या सेवा उद्योगातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल व विकास होतो. पर्यटनाच्या माध्यमातून अब्जावधी रूपयांची उलाढाल होत आहे. जगातील अनेक देश देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटनाचा विकास करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आज आर्थिक दृष्टया मागास देशांना पर्यटनामुळेच मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवित आहेत. पर्यटन हा उद्योग मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देणारा उद्योग ठरला आहे. म्हणून पर्यटन स्थळांचा विकास झाल्याशिवाय पर्यटकांची संख्या वाढत नाही. पर्यटन स्थळी वाहतूक, निवास व्यवस्था, बाजारपेठ, उपाहारगृह आणि अन्य सुविधा असणे आवश्यक असतात. या सुविधा उपलब्ध असतील तरच पर्यटक त्या पर्यटनस्थळाला जाण्यास उत्सुक असतात. पर्यटकांना आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य सरकार करते. तसेच खाजगी संस्था व संघटनांचाही सहभाग महत्त्वाचा आहे.

**संदर्भ सूची**

1. Seth Pran Nath, (2011), Successful Tourism Management Fundamental of Tourism, Sterling Publishers Private Ltd, Vol. 5, New Delhi.
2. Patil P. B., (2006), Tourism Development: Problems and Prospects, Current Publications, Agra.
3. Bhatia A. K., (2020), Tourism Development: Principles and Practice. Fourth Edition, Sterling Publishers, New Delhi.
4. Jayapalan, (2001), An Introduction to Tourism, Atlantic Publishers, New Delhi.
5. Sinha, P. C., (1998), Tourism Management, Anmol Publications, New Delhi.
6. Kamra K. K. & Chand M. (2004), Basics of Tourism: Theory, Operation & Practice, Kanishika Publishers, New Delhi.
7. Thompson Neil, (2011), Regional Tourism, Discovery Publishing House Pvt. Ltd, Delhi.
8. साखरे विजया, (२०१२), ऐतिहासिक पर्यटन, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर.
9. गोयल राजेश, (२०११), भारतीय पर्यटन उद्योग, वंदना पब्लीकेशन, नवी दिल्ली.
10. भोसले यशोधरा, (२००५), प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे.
11. अग्रवाल विनोद, (२०१२) भारतीय पर्यटन, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली.
12. खतीब के. ए., (२००६), पर्यटन भूगोल, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.
13. पांडे अनुपम, (२००७), पर्यटन का स्वरूप, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस, दिल्ली.
14. भागवत अ. वि., मेघा जोशी (१९९५), पर्यटन भूगोल, (भाग १ व २), अश्वमेध प्रकाशन, डोंबिवली (पू) मुंबई.
15. शुक्ला राजेश, रश्मी शुक्ला, (२००९), पर्यटन भूगोल, अर्जुन पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली.
16. सांगळे शैलजा, (२०१५), पर्यटन भूगोल, डायमंड पब्लिकेशनस्, पुणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# गडांचा राजा आणि राजांचा गड

**प्रा. डॉ. अविनाश कोंडीबा खोकले**
इतिहास विभाग, कै सौ शेषाबाई सीताराम मुंढे महाविद्यालय गंगाखेड
**Email:** khokleavinash@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180120
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 77-80
January 2026
**Submitted:** 11 Dec. 2025
**Revised:** 21 Dec. 2025
**Accepted:** 11 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*रायगड किल्ला हा सह्याद्री पर्वतरांगेतील दुर्गम, नैसर्गिक संरक्षण लाभलेला आणि ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा किल्ला आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे २७०० फूट उंचीवर वसलेला हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी म्हणून ओळखला जातो. शिलाहार, यादव, बहामनी व आदिलशाही काळानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड जिंकून त्याचा भव्य विस्तार केला. हिरोजी इंदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली किल्ल्यावरील वास्तू, तटबंदी, दरवाजे, राजवाडे, तलाव व मंदिरांची उभारणी करण्यात आली. आज रायगडावर अनेक वास्तूंचे अवशेष दिसून येतात; मात्र काळाच्या ओघात मोठ्या प्रमाणावर त्यांची पडझड झालेली आहे. रायगड हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नसून स्वराज्य, न्याय, शौर्य व प्रेरणेचे प्रतीक आहे. या किल्ल्याचे संवर्धन व जतन करणे ही वर्तमान आणि भावी पिढ्यांची ऐतिहासिक जबाबदारी आहे.*

***मुख्यशब्द:*** *रायगड किल्ला, छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्य, दुर्ग स्थापत्य, सह्याद्री, ऐतिहासिक वारसा, किल्ले संवर्धन, शिवकालीन वास्तू*

## प्रस्तावना:

समुद्रसपाटीपासून 2700 फुट म्हणजेच 820 मीटर उंचीवर एकदम खड्या पहाडावर रायगड किल्ला विराजमान आहे. सह्याद्री पर्वतांच्या रांगेवर गर्द झाडीच्या खाईत वन-उपवनांच्या जंगलात उंच उंच गोपूरांच्या - मनोऱ्यांच्या पहाडांमध्ये एका मध्यभागी असलेल्या विस्तीर्ण आणि अतीशय उंच अशा कड्यावर नैसर्गिक संरक्षण लाभलेला हा गडांचा राजा आणि राजांचा गड मोठ्या थाटामाटात आजही अवशेष रूपाने वैभवशाली इतिहासाची परंपरा सांगत साक्ष म्हणुन उभाच आहे. ज्या डोंगराच्या कड्यावर हा किल्ला विराजमान आहे त्या कड्याच्या पायथ्याशी उभ राहून वर डोके करून जरी पाहिले तरी हा किल्ला कोणाच्याही निदर्शनास येत नाही ही त्याची खासियत आहे. अतिशय तर्कनिष्ठ बुद्धिमान किंवा शूर वीरांना नुसता डोंगर पाहायचा म्हटलं तरी खालून वर डोके करून पाहिले तर डोक्याची टोपी अर्थातच विद्वत्तेचा अहंकार किंवा फेटा शक्तीचा आणि युक्तीचा अहंकार सुद्धा गळून पडल्याशिवाय राहणार नाही. एवढा उंच आणि उभा कडा आहे. त्याच्या माथ्यावरील काळया कभीन्न बेसाल्ट पाषाणात बांधलेला किल्ला दिसणे तर दुरापास्तच गोष्ट होय. पाचाड मार्गे किल्ल्याकडे जात असताना किल्ल्याच्या उत्तर दिशेला फक्त दिसते एक "टकमक टोक" ज्या ठिकाणी गुन्हेगारांच्या उरात धडकी भरवणारा प्रसंग घडत असे. तो म्हणजे राजाचा अंतिम न्यायालयीन निर्णय झाल्यावर गुन्हेगाराचा कडेलोट होत असे. मृत्युदंडाची शिक्षा दिली जात असे. गडावर जाण्यासाठी पाचाड मार्गे पुढे आल्यानंतर नैऋत्य दिशेकडून पायऱ्या सुरू होतात. आणि त्या पायऱ्या पश्चिमेकडे सरकत सरकत वर जातात. या मार्गे जाताना महादरवाजा, हिरकणी बुरुज, बाजार पेठेचे अवशेष दिसतात. या चिरेबंदी पायऱ्यांची संख्या साधारणता दीड हजारांच्या आसपास सांगितली जाते. एवढ्या पायऱ्या चढून जाणे म्हणजे साधारण माणसाचे काम नाही.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. अविनाश कोंडीबा खोकले, इतिहास विभाग, कै सौ शेषाबाई सीताराम मुंढे महाविद्यालय गंगाखेड*

**How to cite this article:**
*खोकले, . अविनाश . कोंडीबा. (2026). गडांचा राजा आणि राजांचा गड. Journal of Research & Development, 18(1(V)), 77–80.* https://doi.org/10.5281/zenodo.18478207

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18478207
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

साठ वर्षापुढील आणि अशक्त माणसं तर जाऊ शकत नाहीत. त्यासाठी ध्येयवेडे आणि साहसी पर्यटकच हा गड सर करू शकतात. म्हणून वेळेची बचत व्हावी आणि कोणालाही गडावर जाता याव यासाठी गडाच्या दक्षिण बाजूने गडावर जाण्यासाठी रोपवेची व्यवस्था केलेली आहे. रोपवे म्हणजे लोखंडी पाळणा होय. ज्यामध्ये बसून 2700 फूट उंच कडा अवघ्या पाच मिनिटात सर करता येतो. आणि खाली पण उतरता येतो.रोपवे मधून धाडसी पर्यटकांच्या सुद्धा हृदया मध्ये धडधड वाढून अंगावर रोम-रोम उभे राहिल्या शिवाय रहात नाही.एकदा का रोपवे गडावर पोहचला तेव्हाच जीव भांड्यात पडतो.म्हणजे हायसे वाटते. रोपवेने गडावर चढाई करणे म्हणजे वैभवशाली इतिहासाचे आणि भारताच्या रोमहर्षक वैज्ञानिक प्रगतीचे सुंदर मिलाफाचे दर्शन झाल्या शिवाय रहात नाही.

माझ्या आई- वडीलांची बऱ्याच वर्षांपासून ची इच्छा होती की रायगड डोळे भरून पहावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचं नतमस्तक होऊन दर्शन घ्यावं. वडिलांचं वय ७४ वर्ष आणि आईचे पण ७० वर्षा च्या आसपास पण त्यांची गड पाहण्याची इच्छा शक्ती मात्र दांडगी होती. गडावर रोपवेने गेल्या नंतर त्यांनी मुख्य राजवाड्या पासून शिवबाच्या समाधी पर्यन्तचा जाणे आणि येण्याचा दोन किलो मीटर पायी प्रवास उल्हासाने पुर्ण केला. सोबतच माझा मुलगा आणि पुतणी माझे सासरे आणि मेव्हणा होतें. योगायोग पहा शिवबाच्या समाधी स्थळी आम्ही सायंकाळच्या पाच वाजता पोहचलो. अगोदर पूर्वाभिमुख आणि अजूनही सुस्थितीत असलेल्या जगदीश्वराचे निवांत बसून दर्शन घेतले आणि लगेच महाराजांच्या समाधीचे दर्शन घेत असताना मात्र सात -आठ दिवस थांबलेला पाउस असताना सुद्धा अचानक फक्त एक मिनिटासाठीच आकाशातून भुरभुर अशा थेंबाचा वर्षाव झाला आणि सवेचच तो बंद ही झाला.आम्हाला खुप - खुप आनंद झाला. आणि मनोमन उगाच असे वाटून गेले की, आपल्या येण्याचा महाराजांनाही अद्वितीय आनंद झाला असावा ! अशा तळमळीच्या आणि निष्ठेच्या शिवभक्तांची ते वाट वर्षांनुवर्षे पाहत असावेत. म्हणून त्यांनी आशीर्वाद रुपी कौलच दिला असावा. खरंच आम्ही धन्य झालो! रायगड आजही ऊन वारा पावसाची तमा न बाळगता या संकटांचा सामना करत तसाच उभा आहे. गडावर वास्तुशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास केल्यास अनेक वास्तूंची अवशेष आहेत. गड तसा प्राचीनच आहे. शिलाहार आणि यादवांचे राज्य या रायगड परिसरावर होते. पुढे हा गड बहामनी आणि दिलशाहीच्या ताब्यात गेला.

आदिलशहाचा सरदार चंद्रराव मोरे यांच्या प्रभावक्षेत्राखाली येणारा जावळी परिसर आणि रायरी किल्ला होता. 1656 ला छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी जिंकली आणि रायरी सुद्धा जिंकली. चंद्रराव मोरे यांना ठार करण्यात आले. रायरी किल्ल्याचे नाव बदलून रायगड ठेवण्यात आले. नैसर्गिक सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आणि स्वराज्याचा कारभार पाहण्यासाठी छत्रपती शिवरायांनी रायगडालाच राजधानीचे केंद्र बनवले आणि रायगडावर पूर्वीपेक्षा नवीन अनेक वास्तूंचे निर्माण केले. शिवरायांच्याच काळात रायगडाचा बांधकामाच्या दृष्टिकोनातून विस्तार करण्यात आला. त्यांचा बांधकाम प्रमुख "हिरोजी इंदुरकर"हा एक उत्कृष्ट वास्तुविशारद होता. यानेच 1656 ते 1670 या 14 वर्षाच्या कालखंडात रायगडाचे बांधकाम अत्यंत मजबूत पद्धतीने पूर्ण केले. याचा पुरावा म्हणून शिवरायांच्या समाधी पुढील आणि जगदीश्वराच्या मंदिरा समोरील प्रवेशद्वाराच्या पायरीवर एक शिलालेख आहे. यात त्याचा उल्लेख आलेला आहे.

आज मात्र रायगडाच्या चिरेबंदी पायऱ्या, मेना दरवाजा, राणीवसा, महादरवाजा, हत्ती तलाव, गंगासागर तलाव, बाजारपेठेचे अवशेष, राज दरबाराचे अवशेष, राजवाड्याचे अवशेष, जगदीश्वराचे मंदिर, मंदिरासमोरील थोडासा भग्न झालेला पण बलदंड असा नंदी, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, समाधी च्या आग्नेय दिशेची वाघ्या कुत्र्याची समाधी, बाजूला असलेली धर्मशाळा,

किल्ल्याच्या उत्तरेकडील टकमक टोक, हिरकणी बुरुज, काही प्रमाणात अस्तित्वात असलेली तटबंदी अशा साधारणता साडेतीनशे वास्तु किल्ल्यावर होत्या. पण आज मात्र वरील उल्लेख केलेल्या वास्तुच सुस्थितीमध्ये दिसून येतात.1818 साली हा किल्ला ब्रिटिशांच्या ताब्यात गेला तेव्हाच्या नतदृष्ट लोकांनी किल्याची जी नासधुस केली त्या बाबतीत बोलायचे झाले तर इतिहास यांना कधीच माफ करणार नाही. आजही भारतात आणि महाराष्ट्रात सुद्धा अनेक असे प्राचीन काळातील गड - किल्ले चांगल्या स्थितीत आहेत. राष्ट्रकूट, चालुक्य, यादव ,बहामनी आदी काळातील किल्ले त्यांच्या इतिहासाची साक्ष देतात. पण शिवबाची राजधानी असलेला हा रायगड किल्ला 200 वर्षांपूर्वी अतीशय चांगला होता.आज त्याची अवस्था पाहायला गेली तर अतिशय दयनीय झालेली दिसून येते. याच गडाचा एवढा हेवा का वाटला असावा? हे मात्र प्रश्नचिन्हच आहे.

ज्या गडावर दिल्लीच्या तक्ताला हलविण्याची ताकद होती, ज्या गडावर रयतेचे राज्य स्थापन झाले, ज्या गडावरून याच रयतेचा जाणता राजा शिवबा आपल्या कृष्णा नावाच्या प्रिय घोडीवर स्वार होऊन डौलाने या उभ्या महाराष्ट्राची टेहळणी करायचा, ज्या गडावर 32 मन सोन्याच्या सिंहासनावर आपला राजा 6 जुन 1674 ला मोठया दिमाखात आणि अभिमानाने राज्याभिषेक होऊन आरूढ झाला, जिथे अखंड हिंदुस्तान च्या हिंदवी स्वराज्याचे आणि हिंदू पदपादशाहीचे स्वप्न साकार होऊन सामान्य जणांच्या आशा आणि महत्वकांशेचे सनई चौघडे वाजले,ज्या गडावर गनिमांना सळो की पळो करून सोडण्याचे तसेच पळता भुई थोडी करुन सोडण्याचे खलबत्त ठरली, आणि जो गड शिवबांच्या शेवटच्या श्वासाचा साक्षी ठरला आणि ज्या गडावर अखंड हिंदुस्तानच्या दैवताचे पवित्र समाधी स्थळ आहे. जे आजही सर्वांचे प्रेरणास्थान आणि ऊर्जा स्त्रोत आहे आणि हाच गड आज तत्कालीन इतिहासाचे राहिले साहीले अवशेष स्वतःच्या उदरात जपून ठेऊन आहे. तेच अवशेष चिरंतर जपून ठेवणे आपले सर्वांचे सौभाग्य राहील. अन्यथा पुढील पिढी आपणाला माफ करणार नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

या दुर्गम गडाच्या बाबतीत आणि तेथील वास्तूंच्या बाबतीत बोलायचे झाले तर आजच्या घडीला टक्केवारीत सांगायचे म्हटले तर गडावर फक्त पंचवीस टक्केच वास्तूंचे अवशेष शिल्लक आहेत. गडावरील पडझडीची पुनर्बांधणी झाली पाहिजे, भिंतीवरील आणि वास्तूंच्या आतील सर्व गवत बाहेर काढले पाहिजे, गडाच्या सर्व वास्तूंच्या बेसाल्ट खडकाची झीज होत आहे. ती कशी थांबवता येईल याचा विचार झाला पाहिजे, पाचाडला असलेल्या जिजाऊंच्या समाधी स्थळाचा विकास झाला पाहिजे, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण इतिहासाला न्याय देऊ असे वाटते. एक इतिहासाचा अभ्यासक असल्याने आणि साहित्यात आवड असल्याने गडावर एक ऐतिहासिक अभंग कविता लिहिण्याचा मोह सुद्धा आवरला
नाही. आणि मुखातून आपोआप शब्द बाहेर पडत गेले...........

धन्य धन्य रायगड ।
शिवरायांच्या अजोड ॥ १ ॥
काय वर्णावी महती ।

गड किल्ल्यांचा भूपती ॥ २ ॥
वनराजी हिरवीगार ।

दिव्य औषधी कोठार ॥ ३ ॥
गिरी कंदर शिखरे ।

झोंबे सह्याद्रीचे वारे ॥ ४ ॥
उंच भोवती गोपुरे ।

दुर्ग मध्य स्थानी शिरे ॥ ५ ॥
नैऋत्यहून सोपान ।
चढू जाता हाले प्राण ॥ ६ ॥
महादरवाजा समोर ।

हिरकणीचा शेजार ॥ ७ ॥
दक्षिण मुखी मेनाद्वार ।

पुढें राणीवसा घरं ॥ ८ ॥
तया जवळी राजवाडा ।

होता तटबंदी गराडा ॥ ९ ॥
मध्य भागी दरबार ।

अष्ट प्रधान समोर ॥ १० ॥
बत्तीस मण सोनियाचे ।

सिंहासन शोभे साचे ॥ ११ ॥
सन्मुखची नगारखाना ।

वाद्य वाजली दनाना ॥ १२ ॥
बाहेर बाजाराची पेठ ।

भरतसे घनदाट ॥ १३ ॥
नित्य उलाढाल चाले ।

धान्य, कापड, मसाले ॥ १४ ॥
वाम ठायी तीर्थ सार ।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

गंगा सागर पवित्र ॥ १५ ॥
तया उत्तरेस एक।

आहे टकमक टोक ॥ १६ ॥
पूर्व दिशेचे राऊळ।

जगदीश्वराचे देऊळ ॥ १७ ॥
तया पुढें समाधिस्थ।

भारत भूमीचे दैवत ॥ १८ ॥
ऐसा राजा होणे नाही।

न्यायी धर्मात्मा कोठेही ॥ १९ ॥
अवि आला लोटांगणी।
शिवबा रायाच्या चरणी ॥ २० ॥

संदर्भ:

१) आप्पा परब, किल्ले रायगड स्थल दर्शन,२०१२.
२) गजानन आर्ते, दुर्गराज रायगड,१९७५.
३) बळवंत पुरंदरे, माझे नाव रायगड, १९६१.
४) अविनाश खोकले, किल्ले रायगड स्थल दर्शन,१५ ऑक्टो.२०२५.
५) गोपाळ चांदोरकर, रायगड एक अभ्यास: शोध शिवसमाधीचा .२०००.
६) अंताजी ल. जोशी, रायगड किल्याची जुनी माहिती,१८८५.
७) के. सी. ठाकरे, रायगड यात्रा दर्शन माहिती,१९५१.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटकभिमुख पर्यटन

**डॉ. भालेराव जी. पी.**
तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव

**Manuscript ID:**
JRD -2026-180121
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 81-83
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*काळानुरूप पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत असून पर्यटन हे केवळ विरंगुळ्याचे साधन न राहता एक व्यापक सेवा उद्योग म्हणून उदयास आले आहे. पर्यटनाचे स्वरूप भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, ग्रामीण, कृषी, वैद्यकीय, साहसी व खाद्य पर्यटन अशा विविध प्रकारांत विस्तारले आहे. विविध देशांनी आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण नैसर्गिक साधनसंपत्ती, सांस्कृतिक वारसा व सेवा सुविधा विकसित करून पर्यटन उद्योगातून आर्थिक बळकटी साधण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिकीकरणामुळे पर्यटन क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झाली असून काही देशांनी परकीय चलन प्राप्तीसाठी देहव्यावसायिक (सेक्स) पर्यटनास कायदेशीर मान्यता दिली आहे. मात्र या प्रकारच्या पर्यटनामुळे सामाजिक, नैतिक व आरोग्यविषयक गंभीर समस्या उद्भवत असल्याचेही आढळते. भारतासारख्या सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध देशात देहव्यवसायीक पर्यटनास कायदेशीर मान्यता नसून नैतिकता व मानवी हक्कांच्या संरक्षणावर भर देण्यात आला आहे. सदर शोधनिबंधात पर्यटनाचे विविध प्रकार, विविध देशांची पर्यटनधोरणे, देहव्यवसायीक पर्यटनाचे स्वरूप, कायदेविषयक भूमिका व त्याचे सकारात्मक-नकारात्मक परिणाम यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द :*** *पर्यटन उद्योग, पर्यटकाभिमुख पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, कृषी पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, साहसी पर्यटन, खाद्य पर्यटन, देहव्यवसायीक पर्यटन, जागतिकीकरण, पर्यटन धोरण*

**प्रस्तावना:**

पर्यटनात काळानुरूप होत असलेले बदल पाहता पर्यटन उद्योगाचा विस्तार मोठा आहे. विस्तारीत रूपावरून पर्यटनाचे वर्गीकरण करण्यात आले असून पर्यटनाची आवडनिवड, प्रवास, काळा, प्रवास अंतर, पर्यटनांची संख्या, हंगामा, पर्यटन स्थळाचे आकर्षण, वाहतुक इत्यादी मुलाधार पर्यटन वर्गीकरणास महत्वपूर्ण ठरतात. अनेक सुख सुविधामुळे आज पर्यटन क्षेत्र वाढले असून त्याचे स्वरूप एका उद्योगाने घेतले आहे. सेवा उद्योगाची व्यापकता मोठी असून आता पर्यटन उद्योग ही एक नवीन संकल्पना उदयास आली आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टेः**

- पर्यटनाचे विविध प्रकार अभ्यासणे.
- जगातील विविध देशाने पर्यटनाविषयी घेतलेली भूमिका तपासणे.
- पर्यटनाने देशाची आर्थीक बाजु भक्कम होते यांचा सखोल अभ्यास करणे.
- देह व्यावसायिक पर्यटनाबद्दल विविध देशाची असलेली कायदेविषयक भूमिका जाणून घेणे.

**गृहीतकेः**

- जगातील विविध देशानी आपल्या देशात उपलब्ध असलेली गोष्ट प्रकाशझोतात आणल्या उदा. स्थापत्य, नैसर्गिक सौंदर्य, वैद्यकीय उपचार आदी.
- प्रत्येक देशाने आपले पर्यटन उद्योग धोरण ग्राहकांभिमुख बनविले.
- आर्थिक बाजु मजबुती करणासाठी देहव्यवसायीक पर्यटन धोरण अंगीकाले जाते.

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. भालेराव जी. पी., तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगांव*

DOI:
10.5281/zenodo.18478233

**How to cite this article:**
*भालेराव, . जी . पी . (2026). पर्यटकभिमुख पर्यटन. Journal of Research & Development, 18(1(V)), 81–83. https://doi.org/10.5281/zenodo.18478233*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

जागतीक स्तरावर पर्यटनाचे विविध प्रकार पाहावयास मिळतात. भौगोलीक पर्यटनांव्दारे निसर्ग बदलाचे अदभूत नमुने पाहणे हा मुळ हेतु असतो. समुद्र किनारे, धबधबे, बर्फाच्छीदीत क्षेत्रे, अभयारण्य, थंड हवेची ठिकाणे, गिरी शिखरे इ. पर्यटकांसाठी पसंतीचे ठिकाण असते. प्राचीन काळापासून अनेक ठिकाणचा इतिहास वैशिष्टयेपूर्ण आहे त्या ठीकाणी राजवटी नांदलेल्या दिसून येतात. त्या काळातील ऐतिहासीक अवशेष, गडकिल्ले, लेणी, चैत्य, मंदीर, स्तुप, विहार, स्मारके, मूर्ती, कलात्मक बारव इ. निर्माण केलेले आहेत. जागतीक वारसा स्थळांच्या यादीत नोंद झालेल्या अनेक वास्तु भारतभर पसरल्या आहेत. त्या अनुशंगाने पर्यटक भारत भेटीस येतात.

सामाजिक प्रश्नावर सर्वेक्षण करण्यासाठी सामाजिक पर्यटन केले जाते. आदिवासी, अपंग, निराधार, एड्सग्रस्त, मुकबधीर, पिडित महिलांसाठी झटणारे हजारो हात आहेत. त्याचे काम सर्वापर्यंत पोहोचणे गरजेचे असून त्यासाठी सामाजिक पर्यटन फलदायी ठरते. आपली संस्कृती ही प्रत्येक देशाची ओळख असते. आपली संस्कृती इतरांनाही माहित व्हावी या दृष्टीने पर्यटन क्षेत्रात सांस्कृतीक पर्यटनाला महत्व आहे. भाषा, खादयपदार्थ, रितीरिवाज, लोक संस्कृती गीत, नृत्य, नाटय कला, हस्तकला असे वैशिष्टयेपूर्ण संस्कृतीचे कला दालन पर्यटकांना पाहण्यासाठी खुणावत असतात. ग्रामीण पातळीवर रोजगार निर्मितीचे महत्वाचे साधन दुवा म्हणजे कृषी पर्यटन होय. ग्रामीण भागातील एकंदरीत जीवन पर्यटकांना पाहावयास मिळते. कुकुटपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, मत्स्य व्यवसाय इत्यादी मळे कृषी उत्पन्नाला चालना मिळते. शेतात निवासासाठी खोल्यांचे बांधकाम करून राहण्याची व्यवस्था ग्रामीण सभामंडप, बहरलेली शेती, पिके, म्हैस, गाय, शेळी यांचे दुध पारंपारीक पध्दतीने काढणे, चुलीवरचा स्वयंपाक, महाराष्ट्र लोककलांची ओळख शेतकरी पर्यटकांना करून देतात. शरीर पूर्णपणे सुदृढ राहण्यासाठी वैद्यकीय पर्यटनाला महत्व आहे. भारतासारख्या काही राष्ट्रात हेच वैद्यकीय पर्यटनाला महत्व आहे. भारतासारख्या काही राष्ट्रात हेच वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया तुलनात्मक दृष्टया कमी खर्चात केल्या जातात. त्यामुळे अनेक परदेशी रूग्ण उपचारासाठी भारतातील प्रसिध्द रूग्णालयात दाखल होतात. ट्रेकींग (पायी सफारी), स्कीइंग (बर्फावरून पट्टीच्या साहयाने घसरत जाणे), राफटींग (वेगवान नदी प्रवाह, धबधबे यामधुन छोटया बोटीतून प्रवास करणे), माऊटनिअरींग (पर्वतारोही), व्हॅली क्रॉसींग पराग्लायडींग इ. साहसी पर्यटन प्रकार आहे. पर्यटनाची आर्थिक क्षमता प्रशिक्षण, मानसिकता, शारिरीक क्षमता, मनोधैर्य, योग्य ठिकाणचे नियोजन इ. महत्वपूर्ण ठरते. निसर्गाच्या जवळ जाऊन केलेले पर्यटन, जंगल सफारी होय, घनदाट अरण्य, नागमोडी रानवाटी नदी, खळवळणारे झरे, प्राणी, पक्षी इ. जैव विविधतेने नटलेली जंगल सफारी करावयाची असेल तर पर्यटनांसाठी लाईफटाईम अनुभव असतो. भारत देशाला खादयसंस्कृतीचा प्राचीन वारसा आहे. सध्या जंक-फुड खाण्याच्या सवयीमुळे आहारातून पौष्टीक तृणधाण्यांचा वापर कमी कमी होत चालला आहे. गहु, भात, मका, राय, ओट, सातू, ज्वारी, आणि ज्वारी वर्गातील पिके बाजरी, नाचणी, वरी, राळा, सावा, कोद्रा व बंटी याचा तृणधाण्यात समावेश होतो. तृणधाण्याचा उपयोग मनुष्याच्या पोषणासाठी, जनावराच्या खादयात आणि औद्योगीक उत्पादनात वापरल्या जाणाचा स्टार्चसाठी केला जातो. संतुलीत आहाराला महत्व न देता जसा आवडेल तसा आहार व चालता फिरता जे मिळेल ते खाणे अशा नव्या संस्कृतीमुळे रोजच्या आहारातून पौष्टिक तृणधाण्यापासून बनवलेले विविध खादयपदार्थ पर्यटन क्षेत्रात महत्वाची आकर्षण होऊ शकतात त्यामुळे भारत सरकारने 2023 हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पोष्टिक तृणधाण्य वर्ष 2023' साजरे केले. हा खादय पर्यटनांचाच भाग असून त्यादृष्टीने अनेक देश वरील प्रमाणे उत्सव साजरे करत पर्यटकांना आकर्षीत करतात.

जागतीकीकरणामुळे पर्यटनक्षेत्रात प्रचंड स्पर्धा सुरू झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र स्वतःची वेगळी ओळख निर्माण करून या क्षेत्रात दबदबा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असून त्यात यशस्वी देखील झालेले आहे. देह व्यवसायीक पर्यटन हा आगळा वेगळा प्रकार असून अनेक राष्ट्र यामध्ये सहभागी झाले आहेत त्याचा आढावा येथे घेणार आहोत. अनेक देशात उपरोक्त व्यवसायाला कायदेशीर मान्यता, अंशतः कायदेशीर मान्यता व कुठे बंदी देखील आहे.

“As per world Tourism organizer, tourism riches its primary purpose the effecting of a commercial sexual relationship.” Sex Tourism is the practice of travelling to foreign countries, often in the global south with the intention of engaging in paid sexual activity or relationships, prostitution man sexual services, commercial Sex/ colloquially, hooking.

विविध देशांनी अनैतीक व्यवसायाला कायदेशीर मान्यता दिली आहे. विविध कायद्याच्या कलमातुन संरक्षण देवून महसूल वसुलीसाठी कृतीशील दल उभारला. युरोपमधील अनेक देश व्यवसायाप्रती बांधील असलेले आढळतात. जसे की जर्मनी मध्ये देह व्यवसायीक आपले काम करण्यास स्वतंत्र असून कोणीही हस्तक्षेप करत नाही. व्यवसाय करणारे पंजीकृत असून नियीमत आरोग्य तपासणी देखील प्राधान्याने कली जाते. इंग्लंडमध्ये उपरोक्त बाब खाजगी मामला मानला जातो. व्यवसाय गैरकानुनी नसून त्या अनुशंगाने कोणास प्रवृत्त करणे, छेडछाड करणे, अश्लील हावभाव करणे गैरकानुनी मानले जाते. कॅनडामध्ये इ.स.1800 मध्येपासून व्यवसायास कायदेशीर मान्यता प्रदान केली आहे. युनान हा देश देखील कडक कायदयाचे पालन करावयास भाग पाडून व्यवसायास मान्यता दिली आहे. आठवडयातुन दोन वेळा वैद्यकीय तपासणी केली जाते. जपानने मनोरंजक उद्योग रूपात व्यवसायाला स्विकारले. हॉलंड मध्ये उपरोक्त बाब गुपीत ठेवत व्यवसायास पूर्ण मान्यता प्रदान केली. थायलंड मध्ये ब्युटी पार्लर, आईस्क्रीम पार्लर, देह विक्रय व मसाज पार्लर साठी हे प्रसिध्द आहे. कायद्याचे पूर्णपालन करत व्यवसायास मान्यता दिली आहे. अमेरीका देह व्यवसायीका संबंधी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

सकारात्मक असून टुर आयोजित केले जातात. त्या संबंधीच्या जाहीराती वर्तमानपत्रात प्रकाशित करतात. न्युयॉर्क टाईम्स या सारख्या नावलौकीक वर्तमानातून सुध्दा त्याच्या विस्तृत प्रसिध्दी दिली जाते. भारत देश संस्कृतीप्रीय असून जगातील सर्वात प्राचीन सनातनी धर्माचा उदम याच भूमीमध्ये झालेला आहे. नैतिकतेचे पालन पूर्वापार या देशात केले जाते. देह विक्री धर्मशास्त्रानुसार देखील निषिध्द मानले जाते त्याच पध्दतीने भारतीय राज्य घटनेच्या विविध कलमा अंतर्गत गुन्हेगारीचे कृत्य मानले जाते. भारतीय कलमांचा अभ्यास करताना अनेक बाबी समोर येतात की जसे, अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षः या कक्षा अंतर्गत देह व्यावसायीकसाठी होणारी मानवी तस्करी रोखणे, कुंटनखाणे, ब्युटी पार्लर, मसाज पार्लर, एस्कॉर्ट पध्दती या व्दारे देह व्यावसायीक होत असल्यास अनैतीक व्यापार प्रतिबंध कायद्या 1956 अन्वये कारवाई केली जाते. कोणतीही व्यक्ती देह व्यवसायीक उद्देशाने एखादया स्त्रीला, मुलीला तिच्या संमती नसतानां मिळवते, मिळविण्याचा प्रयत्न करते किंवा एखादया स्त्रीला, मुलीला कोणत्याही ठिकाणाहून जाण्यास प्रवृत्त करते या उद्देशाने की तो वेश्या व्यवसायच्या उद्देशाने वेश्यालयात कैदी बनू शकेल, वारंवार येउ शकेल ही बाब देखील बेकायदेशीर मानली जाते. विशेष पोलीस अधिकारी आणि सल्लागार कार्यरत आहेत की ज्यानुसार प्रत्येक क्षेत्रात राज्य सरकारने या संदर्भात निर्देशीत केले पाहीजे की त्या क्षेत्रात या कायदयाअंतर्गत होणा-या गुन्हयाचा सामना करण्यासाठी त्या सरकारव्दारे, त्याच्या वतीने नियुक्त केलेला एक विशेष पोलीस अधिकारी काम करीत असे.

जागतिक स्तरावर अनेक देशाना उपरोक्त व्यवसायाच्या नकारात्मक बाजु मोठया प्रमाणात आढळून आल्या त्याचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते जसे की, संसर्गजन्य आढळलेले एड्स झपाटयाने वाढत आहे. युवक व युवती व्यवसायात अधिक रूची दाखवीत आहेत की जे सदृढ देहासाठी अयोग्य आहे. रचनाशिल शक्तीचा -हास, युवकांमधील व्यसनाधिनता, व्यवसाय वृध्दीसाठी मुलीना पळवून आणून व्यवसायात ढकलणे, मानवी हक्काचे उल्लंघन, जागतीक स्तरावर देशाची प्रतीमा डागाळणे आदी अनेक बाबी उपरोक्त व्यवसायातुन घडतात. त्यामुळे आर्थिक बाजूचा विचार करता देशाचे योग्य दिशेने मार्गक्रमण व्हावे हीच त्याची भूमीका होय. अरब देश याबाबत कठोर आहेत. जागतिक पर्यटन संघटने मार्फत देह व्यावसायिक संबधी पहीला कायदा 2000 मध्ये केला की, जो Code of Lip-Ishter या नावाने ओळखला जातो. संघटनेने केलेली आचारसंहीता बहुतांश देश पायदळी तुडविताना आढळतात. मोठया प्रमाणात गंगाजळी निर्माण करणे हाच त्या मागचा मुळ हेतु आहे.

**निष्कर्षः**

- विविध देशांनी आपल्या देशातील आगळया वेगळया बाबी प्रकाशात आणून पर्यटनक्षेत्र भरभराटीस आणून परकीय चलन वृध्दीगंत करत अर्थव्यवस्था मजबुत बनविली उदा गड, किल्ले, स्मारक, अभयारण्य, नैसर्गीक सौंदर्य आदी.
- परकीय चलन प्राप्त करण्यासाठी अनेक अयोग्य गोष्टीचा स्विकार केला. नैतीकता, धर्म याला मुठमाती दिली.
- पर्यटकाची मागणी ज्या पध्दतीची आहे ते क्षेत्र विकसीत झाले उदा. सेक्स पर्यटन

**संदर्भः**

1. Praveen Setui Development and Imprecation of Sex Tourism- Rajat Pub. Deli 1999
2. ताज रावत- पर्यटन का प्रभाव एवं प्रबंधक, तक्षशिला प्रकाशन दिल्ली 2004
3. Website

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन आणि संगीत महोत्सव

**प्रा.एस.के.कोकाटे**
संगीत विभाग प्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
**Email:** kokatesk21@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180122
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 84-88
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*एकविसावे शतक हे पर्यटनाचे शतक म्हणून ओळखले जाते. पर्यटन केवळ विरंगुळयाचे साधन न राहता सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनले आहे. भारतीय पर्यटन क्षेत्रात सांस्कृतिक वारसा, कला, संगीत व उत्सव यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतीय संगीत महोत्सव हे पर्यटन व सांस्कृतिक चळवळीचे महत्त्वाचे अंग असून त्यातून शास्त्रीय संगीत, लोकसंगीत व नृत्यकला यांचे संवर्धन होते. वेरूळ–अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव, सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव, बाणगंगा महोत्सव व दत्तजयंती संगीत महोत्सव हे महाराष्ट्रातील प्रमुख संगीत महोत्सव पर्यटनाला चालना देणारे आहेत. या महोत्सवांमुळे ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे महत्त्व अधोरेखित होऊन देशी-विदेशी पर्यटक आकर्षित होतात. संगीत महोत्सवांद्वारे सांस्कृतिक ओळख बळकट होते, नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळते तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला गती मिळते. त्यामुळे भारतीय पर्यटन व संगीत महोत्सव यांचा परस्परपूरक संबंध असून तो सांस्कृतिक जतन व पर्यटन विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.*

***मुख्यशब्द :*** *भारतीय पर्यटन, संगीत महोत्सव, सांस्कृतिक पर्यटन, शास्त्रीय संगीत, सांस्कृतिक वारसा, वेरूळ-अजिंठा महोत्सव, सवाई गंधर्व महोत्सव, बाणगंगा महोत्सव, दत्तजयंती संगीत महोत्सव*

### प्रस्तावना:

विसाव्या शतकाच्या शेवटी खाजगीकरण व उदारीकरण यामुळे समाज जीवनाच्या सर्वच बाबींमध्ये बदल झालेले आहेत. एकविसावे शतक हे पर्यटनाचे शतक म्हणून ओळखले जाते म्हणूनच आजच्या या धावपळीच्या जीवनामध्ये पर्यटनाला महत्त्व प्राप्त झाले आहे व्यक्ती समाज व कुटुंबाचा दृष्टिकोनातून पर्यटन महत्त्वाचे मानले गेले आहे, परंतु बदलत्या परिस्थितीमध्ये पर्यटन हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील महत्त्वाचे मानले गेले आहे. मानवी मनामध्ये प्रेरणा उत्साह चैतन्य निर्माण करावयाचे पर्यटन हे एक महत्त्वाचे माध्यम समजले जाते. व्यक्ती आणि समाजामध्ये जाणीवपूर्वक स्थायी व सकारात्मक बदल करण्याचे प्रभावी साधन म्हणजे पर्यटन होय. या पर्यटनातूनच सांस्कृतिक स्थळ निर्माण झाले आणि त्यातून विविध कलांना महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊन सांस्कृतिक चळवळ निर्माण झाली आणि विविध कलांना जीवनदान देण्यासाठी सांस्कृतिक व संगीत महोत्सव होऊ लागली.

### भारतीय पर्यटनाचे आकर्षक कारण :

भारत हा एक असा देश आहे, जो विविधतेने नटलेला आहे. भारताची संस्कृती सण परंपरा आणि अनेक प्रेक्षणीय स्थळे यांचा आनंद घेण्यासाठी जगभरातील लाखो विदेशी पर्यटक भारत देशाला भेट देतात समृद्ध संस्कृती परंपरा सण उत्सव कला इतिहास ही भारतीय पर्यटनाचे ठळक वैशिष्ट्य आहेत.

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18478265
OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा.एस.के.कोकाटे, संगीत विभाग प्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*कोकाटे, . एस . के . (2026). भारतीय पर्यटन आणि संगीत महोत्सव. Journal of Research & Development, 18(1(V)), 84–88.* https://doi.org/10.5281/zenodo.18478265

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

भारतीय संस्कृती विविधता भारत देशातील संस्कृती भाषा कला संगीत नृत्य धर्म आणि परंपरा यांचा अभ्यास करण्यासाठी प्रतिवर्षी भारताच्या विविध भागांमध्ये पर्यटक गर्दी करतात सांस्कृतिक विविधता आहे. पर्यटकांसाठी एक महत्त्वपूर्ण आकर्षण आहे, तिथला समाज चालीरीती रुढी परंपरा सण उत्सव आणि जीवनाचा विविध अंगाने विचार करता भारतीय लोकांचे खानपान जीवनशैली यांची विस्तृत माहिती मिळण्याचे एकमेव ठिकाण भारत होय. भारतीय सांस्कृतिक चळवळ ही याच माध्यमातून प्रकल्प करण्यासाठी भारत सरकार विविध धार्मिक ऐतिहासिक स्थळांच्या माध्यमातून सांस्कृतिक महोत्सव संगीत महोत्सव अशा विविध महोत्सवातून वेगवेगळया राज्यातील कलांना जीवदान देण्याचे कार्य करत आहे. भारतातील आध्यात्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळांवरील महाराष्ट्रातील काही संगीत महोत्सवाचा आपण येथे आढावा घेणार आहोत. त्यामध्ये

- वेरूळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव
- सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सव
- बाणगंगा महोत्सव
- दत्त जयंती संगीत महोत्सव
- औंध संगीत महोत्सव

**1.वेरूळ-अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव :**

हा महोत्सव पर्यटन विकास महामंडळ आयोजित करतो. वेरूळ येथे घृष्णेश्वर मंदिर हे एक प्राचीन शंकराचे मंदिर आहे. वेरूळ पासून अवघ्या दीड किलोमीटरवर असलेले घृष्णेश्वर हे शंकर मंदिर भारतातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. तसेच बारा ज्योतिर्लिंगातील हे शेवटचे ज्योतिर्लिंग आहे. शिवपुराण, स्कंदपुराण, रामायण, महाभारत या ग्रंथात या मंदिराचा उल्लेख दिसून येतो. म्हणुन वेरूळ या गावाला अत्यंत पवित्र बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक शेवटचे शिवलिंग असल्याने महत्त्व प्राप्त झाले आहे. आणि छत्रपती संभाजी नगर शहरापासून ३० कि.मी. अंतरावरील वेरूळ गावातील जगप्रसिद्ध लेणी आहेत. ही सह्याद्रीच्या सातमाळा पर्वत रांगेतील डोंगरकड्यात साधारणतः पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरलेल्या एकूण ३४ लेणी आहेत. यामध्ये १२ बौद्ध (लेणे क्र. १ – १२), १७ हिंदू (लेणे क्र. १३ – २९) आणि ५ जैन (लेणे क्र. ३० – ३४) लेणी आहेत. इ.स. १९५१ साली भारत सरकारने या लेण्याला 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून घोषित केले आणि त्यानंतर ती भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडे सोपवण्यात आली. युनेस्कोने इ.स. १९८३ मध्ये वेरूळ लेणीचा समावेश जागतिक वारसास्थळांच्या यादीत केला. कैलास मंदिर या जगातील त्याच्या स्थापत्यशास्त्रात अदभुत आहे, जे राष्ट्रकूट राजवंश नरेश कृष्णा (प्रथम) (७५७-७८३) मध्ये बांधण्यात आले होते. संपूर्ण पर्वत बाहेरून मूर्तीसारखे कोरलेला आहे. ते द्रविडी शैलीचे मंदिर म्हणून आकारले गेले आहे. एकूणच २७६ फूट लांब, १५४ फूट रुंद, हे मंदिर केवळ एक खडक कापून बांधले आहे. ते वरपासून खालपर्यंत तयार केले गेले आहे. ते बांधण्यासाठी, खडकातून सुमारे ४० हजार टन दगड काढला गेला. पहिला भाग त्याच्या बांधकामासाठी वेगळे करण्यात आला आणि नंतर हा पर्वत भाग आतून कापला गेला आणि ९० फूट उंच मंदिर बांधण्यात आले. मंदिर बाहेरील बाजूने मूर्तींनी भरलेले आहे. या मंदिराची महल तीन बाजूंच्या वर होती, जी मंदिराच्या वरच्या भागाला जोडलेली होती. आता हे पुल पडले आहे. खुल्या मंडपात समोर नंदी आणि विशाल हत्ती आणि स्तंभ आहेत. हे काम भारतीय स्थापत्यशास्त्र-कौशल्यांचा एक अद्भुत नमुना आहे. या दोन्ही ऐतिहासिक स्थळांच्या नावाने हा महोत्सव साजरा करण्यात येतो. वेरूळ -अजिंठा आंतरराष्ट्रीय महोत्सव हा एक सांस्कृतिक आणि संगीत महोत्सव आहे. जो महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आणि परिसरात आयोजन केला जातो. याचे उद्दिष्ट म्हणजे जगभरातील सर्वोत्तम चित्रपट व कला-सांस्कृतिक कार्यक्रम स्थानिक रसिकांपर्यंत पोहोचवणे आणि मराठवाड्याला एक सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देणे हा आहे. मराठवाड्यातील घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आणि वेरूळ अजिंठा लेणी जगातील सर्व पर्यटकांसाठी आश्चर्य कारक पर्यटन स्थळ आहे. जे की अद्भुत आहे. या दोन्ही स्थळांचे महत्व लक्षात घेऊन ह्या भव्य दिव्य महोत्सवाचे आयोजन केले जाते. या महोत्सवामध्ये जगप्रसिद्ध गायक, वादक, नर्तक यांनी आपली कला सादर केली आहे. त्यामध्ये पं.जसराज,पं.हरिप्रसाद चौरसिया, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी, शंकर महादेवन, पद्श्री सुरेश वाडकर, बेगम परवीन सुलताना, गानसरस्वती किशोरी आमोणकर, अश्विनी भिडे राहुल देशपांडे, पं.अजय पवनकर प्रसिद्ध ड्रम वादक शिवमणी, पंडित जाकीर हुसेन, विदुषी आरती अंकलीकर, प्रसिद्ध नृत्यांगना सोनल मानसिंह, हेमामालिनी, डॉ. संध्या पुरेच्या, जगजित सिंग,सोनु निगम, कलापीनी कोमकली, इत्यादी जगप्रसिद्ध कलाकारांनी आपली कला सादर केली आहे. वेरूळ अजिंठा महोत्सव ही छत्रपती संभाजी नगर मधील एक जुनी परंपरा आहे, जी जिल्ह्यातील संस्कृती तसेच वास्तुकला आणि स्मारकांचे मूल्यांकन आणि कौतुक करण्यावर लक्ष केंद्रित करते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**2. सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव :**

सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव (पूर्वी सवाई गंधर्व संगीत महोत्सव म्हणून ओळखला जाणारा आणि फक्त सवाई म्हणून ओळखला जाणारा) हा १९५३ पासून पुण्यात आयोजित होणारा वार्षिक भारतीय शास्त्रीय संगीत महोत्सव आहे. हा महोत्सव आर्य संगीत प्रसारक मंडळ (ASPM) द्वारे आयोजित केला जातो, आणि भीमसेन जोशी यांनी जोशींचे गुरू , सवाई गंधर्व , यांच्या जीवनाचे आणि कार्याचे स्मरण करण्यासाठी एक स्मृति संगीत संमेलन म्हणून सुरू केले आहे. जोशी महोत्सवाच्या आयोजनाचे नेतृत्व करत असताना, त्यांच्याकडून कलाकारांना सादरीकरणासाठी वैयक्तिक आमंत्रणे येत होती. हिंदुस्थानी शास्त्रीय खयाल संगीतावर भर देऊन, वाद्यवादक, नर्तक, ध्रुपदी, भक्ती संगीतकार, गझल संगीतकार, कव्वाल आणि कर्नाटक संगीतकार हे संगीत कार्यक्रमात वारंवार येत असत. महोत्सवात एका तरुण कलाकाराचा पहिलाच सादरीकरण भारतातील शास्त्रीय संगीत क्षेत्रात (अलीकडे राहुल देशपांडे, कौशिकी चक्रवर्ती आणि महेश काळे यांचा समावेश आहे.) त्यांचे "आगमन" आणि वचनबद्धता दर्शवते.सुरुवातीपासूनच, हा महोत्सव पुण्यातील संगीत रसिकांसाठी एक प्रमुख सांस्कृतिक सोहळा बनला आहे. ज्यामध्ये पारंपारिक भारतीय संगीत प्रकारातील आघाडीचे संगीतकार सहभागी होतात. दरवर्षी डिसेंबरच्या पहिल्या दोन आठवड्यात तीन दिवस सवाई गंधर्व संगीत महोत्सव आयोजित केला जातो. पूर्वी हा महोत्सव संपूर्ण रात्रभर चालायचा आणि दिवस सकाळी संपायचे. नंतर, पुणे महानगरपालिकेने रात्री १० वाजण्यापूर्वी कार्यक्रम संपवण्याचा नियम लावला ज्यामुळे कार्यक्रमाच्या वेळापत्रकात बदल झाला. पारंपारिकपणे, प्रत्येक महोत्सवाचे उद्घाटन सवाई गंधर्वांना श्रद्धांजली अर्पण करून केले जाते, ज्यामध्ये एक शहनाई संगीतकार प्रथम सकाळी सादरीकरण करतो. पहिल्या दोन दिवसांत, कार्यक्रम दुपारी उशिरा सुरू होतात आणि रात्री १० वाजेपर्यंत अधिकृतपणे संपतात. तिसऱ्या आणि शेवटच्या दिवशी (पूर्वी शनिवार, आता सहसा रविवार), कार्यक्रम दोन सत्रांमध्ये आयोजित केला जातो. पहिला सत्र सकाळी लवकर सुरू होतो आणि दुपारपर्यंत चालू राहतो. दुसरा सत्र संध्याकाळी लवकर सुरू होतो आणि रात्री १० वाजता संपतो. या महोत्सवामध्ये अनेक पुस्तके,सिडी कॅसेट पाहायला मिळतात. जगभरातील पर्यटक संगीत प्रेमी साठी ही मेजवानी म्हणावी लागेल.

**3. बाणगंगा महोत्सव:**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) आणि इंडियन हेरिटेज सोसायटी मुंबई यांच्या संयुक्त प्रयत्नातून दरवर्षी जानेवारी महिन्यात बाणगंगा हा दोन दिवसांचा महोत्सव साजरा केला जातो. हा एक संगीत महोत्सव आहे, जो मलबार हिल्समधील वाळकेश्वर मंदिराच्या प्रांगणात आयोजित केला जातो. १९९२ मध्ये, पहिला बाणगंगा महोत्सव अनेक लोकप्रिय गायक आणि संगीतकारांच्या संगीतमय सादरीकरणासह आयोजित करण्यात आला होता जे देशभर प्रसिद्ध होते. बाणगंगा महोत्सव हा मुळात एक लाईव्ह शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम आहे आणि शास्त्रीय संगीताची आवड असलेले सर्वजण वर्षभर या महोत्सवाची आतुरतेने वाट पाहतात. बस, ट्रेन आणि टॅक्सीने सोयीस्करपणे पोहोचता येते. म्हणून तुम्ही या महोत्सवात सहज पोहोचू शकता. बाणगंगा महोत्सवाचे खरे आकर्षण म्हणजे अज्ञात प्रतिभावान कवींनी रचलेल्या संगीतमय सादरीकरणादरम्यान घंटा वाजवणे. संपूर्ण लयबद्ध घंटा वाजवणे म्हणजे जुन्या आठवणी आणि अध्यात्माचा आस्वाद घेते. जरी हा महोत्सव तुलनेने नवीन असला तरी, तो प्रत्यक्षात स्थानिक आणि पर्यटकांमध्ये खूप लोकप्रिय झाला आहे. सांस्कृतिकदृष्ट्या समग्र संगीताचा अनुभव पाहण्यासाठी आणि आनंद घेण्यासाठी उत्साही संगीत प्रेमींचे कळप मलबार हिल्सभोवती जमतात. बाणगंगा महोत्सवाचे उद्दिष्ट केवळ विद्यमान समृद्ध सांस्कृतिक वारशाचे साजरे करणे आहे. हा महोत्सव मुंबई संस्कृती संगीत महोत्सव म्हणून सुद्धा ओळखला जातो.

मलबार हिल्समधील वाळकेश्वर मंदिराच्या संकुलात असलेल्या बाणगंगा टाकी हे मुंबईतील सर्वात महत्त्वाचे पर्यटन आकर्षण आहे. "Live Music To Save Heritage" या संकल्पनेच्या आधारित महोत्सवाचे आयोजन बाणगंगा तलावाकाठी केले जात असे. इ.स. १९९२ मध्ये पहिल्यांदा आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात भारतातील नामवंत कलाकार हरिप्रसाद चौरसिया, झाकिर हुसेन हेमामालिनी, माधुरी दीक्षित, सोनु निगम, महेश काळे, राहुल देशपांडे, शंभर महादेवन, कौशीकी चक्रवर्ती यांच्या मैफिली आणि संगीत सादरीकरणाचा साक्षीदार आहे. त्यांच्या सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतो. तथापि इ.स. २००८ पासून ध्वनिप्रदूषणाच्या कारणाने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने या महोत्सवचे ठिकाण बदलून एशियाटिक सोसायटी, टाउन हॉल , मुंबई येथे हलवण्यात आले. सोबतच महोत्सवचे 'बाणगंगा फेस्टिव्हल' या नावात बदल करून 'मुंबई संस्कृती' असे ठेवण्यात आले.

**आकर्षणाचा इतिहास :**

इ.स. ९ व्या ते १३ व्या शतकाच्या दरम्यान सिलहारा राजवंशाच्या शासकांनी बांधलेल्या वाळकेश्वर मंदिराच्या शेजारीच बाणगंगा तलाव आहे, जो या उत्सवाचे नाव आहे. शासकांनी पाणी साठवण्यासाठी तो बांधला होता. दुर्दैवाने, पोर्तुगीजांनी मंदिर आणि तलाव दोन्ही नष्ट केले आणि १७१५ मध्ये त्यांचे पूर्वीचे वैभव पुनर्संचयित करावे लागले. वर्षांच्या प्रगतीसह, वेगवेगळया लोकांनी तलावाच्या पलीकडे असंख्य देवतांना समर्पित अनेक मंदिरे बांधली आणि स्थापन केली. महोत्सवाचा कालावधी दरवर्षी जानेवारी महिन्यात, या उत्सवासाठी मुंबई शहर उजळून निघालेले तुम्हाला दिसेल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**महोत्सवाचा उद्देश :**

- वाळकेश्वर मंदिर आणि बाणगंगा तलावाच्या वारसा स्थळाचे संवर्धन आणि प्रचार करण्यासाठी बाणगंगा महोत्सव आयोजित केला जातो.
- बाणगंगा महोत्सवात प्रमुख आणि प्रख्यात शास्त्रीय संगीतकारांचे सादरीकरण असते.
- या उत्सवाच्या दोन दिवसांत, मलबार हिल्सला रोषणाई करून वधूसारखे सजवले जाते.
- हा महोत्सव सांस्कृतिक वारसा आणि शास्त्रीय संगीताचे ज्ञान जपण्यासाठी आणि जतन करण्यासाठी आयोजित केला जातो.

**4. दत्तजयंती संगीत महोत्सव :**

मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात हा महोत्सव गायनाचार्य पं. गोविंदराव जळगावकर यांनी पहिल्यांदा सुरू केला. शंभर वर्षांपूर्वी त्रिंबकराव जळगावकर यांनी सोहळा सुरू केला. त्यावेळी आसपासच्या भजणी मंडळात संगीत, भजन, संप्रदायीक गायन करायचे. जुन्या काळी बैलगाडी भरून लोक येत होती. त्यावेळी कोणताही सोहळा, कार्यक्रम घेण्यासाठी वेळ मर्यादा नव्हती तेव्हा रात्रभर संगीत मेजवानी असायची आणि रात्रभर कार्यक्रम झाल्यावर पहाटे लोक परत जायाचे. शास्त्रीय संगीताची गोडी वाढवण्यासाठी प्रयत्न म्हणून या सोहळ्याला सुरुवात करण्यात आली. हा देशात दुसरा महोत्सव आहे ज्याने शंभर वर्ष पूर्ण केली आहेत.

**'तुम्हीही माझ्याकडे या!'**

गोविंदराव जळगावकर यांनी सुरू केलेल्या या महोत्सवामध्ये मोठमोठे कलाकार सहभागी होत असले, तरीही ते विनामानधनच या महोत्सवामध्ये सहभागी होत असत. गोविंदराव जळगावकर स्वतः आग्रा घराण्याचे गायक होते. त्यांना संपूर्ण देशभरातून निमंत्रणे यायची. मात्र, या कार्यक्रमांसाठी त्यांनीही कधी कुणाकडून मानधन घेतले नाही. त्यांची अट एकच असायची, ते म्हणत 'तुम्हीही माझ्याकडे या!' ही सारी कलावंत मंडळी गोविंदराव जळगावकर यांच्या प्रेमाखातर विनामानधन सहभागी होत असत.

या संगीत महोत्सवामध्ये अनेक दिग्गज कलावंत सहभागी झाली आहेत. पंडित राजन-सजन मिश्र, शंकरबापू अपेगावकर, उस्ताद सैदोद्दिन डागर, उस्ताद उस्मानखां, विमलाराजे देशपांडे, पंडित भाऊसाहेब दीक्षित, आरती अंकलीकर, उस्ताद सुल्तानखा, पंडित रोणू मुजुमदार, शौनक अभिषेकी, पंडित अजय पोहणकर, श्रुती सडोलीकर, डॉ. अश्विनी भिडे, पंडित राजा काळे, पंडित रूपक कुलकर्णी, पंडित मुकेश जाधव, पंडित प्रभाकर कारेकर, पंडित रामनारायण, उस्ताद शाहिद परवेझ, पंडित नाथराव नेरळकर, पंडित शिवदास देगलूरकर, पंडित राम बोरगावकर, हेमा उपासनी यांचा यामध्ये समावेश आहे.

**महोत्सवाचे उद्देश :**

- मराठवाड्यातील तळागाळातील लोकांपर्यंत शास्त्रीय संगीत पोहचविणे.
- शास्त्रीय संगीत रूजवणे आणि विद्यार्थी घडविण्याचे कार्य करणे.
- संगीत शिकण्याची आवड निर्माण करणे त्यातुन दिग्गज कलाकार निर्माण होतील ही अपेक्षा.
- सर्वसामाण्यांपर्यंत शास्त्रीय संगीताचा प्रसार करणे.

संगीत महोत्सव आयोजनाचे अनेक सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक फायदे होतात. ते पुढीलप्रमाणे आहेत:

**सांस्कृतिक फायदे :**

- भारतीय व स्थानिक संगीत परंपरेचे जतन व संवर्धन होते.
- नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळते.
- शास्त्रीय, लोकसंगीत व आधुनिक संगीताचा प्रसार होतो.
- विविध प्रांतांतील संस्कृती एकत्र येतात.

**सामाजिक फायदे :**

- समाजात ऐक्य, सौहार्द व आनंदाचे वातावरण निर्माण होते.
- युवकांना सकारात्मक व सर्जनशील दिशा मिळते.
- कुटुंब व समाज एकत्र येण्याची संधी मिळते.
- सांस्कृतिक ओळख बळकट होते.

**आर्थिक फायदे :**

- पर्यटनाला चालना मिळते.
- स्थानिक व्यवसाय (हॉटेल, वाहतूक, हस्तकला, खाद्यपदार्थ) वाढतात.
- रोजगारनिर्मिती (तांत्रिक, व्यवस्थापन, कलाकार) होते.
- शहर/गावाची ओळख वाढते

**शैक्षणिक व प्रेरणादायी फायदे :**

- विद्यार्थ्यांना संगीताचे ज्ञान व गोडी लागते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- गुरु-शिष्य परंपरेला प्रोत्साहन मिळते.
- सर्जनशीलता व शिस्त विकसित होते.
- कलाकारांकडून प्रेरणा मिळते.

**पर्यटन व जागतिक फायदे :**

- आंतरराष्ट्रीय कलाकार व प्रेक्षक आकर्षित होतात.
- भारताची सांस्कृतिक प्रतिमा जागतिक स्तरावर उजळते.
- सांस्कृतिक देवाणघेवाण घडते.

**मानसिक व भावनिक फायदे :**

- तणाव कमी होतो व मनःशांती मिळते.
- सकारात्मक ऊर्जा व आनंद मिळतो.

**संदर्भ ग्रंथ:**

1. कलाविहार -2013

2. भारत प्रवास आणि पर्यटन लेखक – डॉ. निशांत शेंडे

3. योजना- ऑगस्ट, 1996

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन आणि व्यक्तिमत्व विकास

**पल्लवी सर्वोत्तमराव कुलकर्णी**
परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180123
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 89-91
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*आधुनिक धावपळीच्या जीवनशैलीमुळे मानसिक व शारीरिक तणाव वाढत असून पर्यटन हे विश्रांती व नवऊर्जेचे प्रभावी माध्यम बनले आहे. पर्यटनामुळे व्यक्तीला रोजच्या एकसुरी जीवनातून बाहेर पडण्याची संधी मिळून मन: शांती, आनंद व आत्मिक समाधान प्राप्त होते. विविध पर्यटनस्थळांना भेटी देताना व्यक्तीला इतिहास, संस्कृती, निसर्ग व समाजजीवनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. या अनुभवांमुळे सर्जनशीलता, ज्ञान, संशोधनवृत्ती, सामाजिक जाणीव, आत्मविश्वास व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होते. ग्रामीण, कृषी, क्रीडा व निसर्ग पर्यटनामुळे निसर्गाशी जवळीक वाढून तणाव कमी होतो तसेच स्थानिक समुदायांच्या आर्थिक व सामाजिक विकासास चालना मिळते. त्यामुळे पर्यटन व व्यक्तिमत्त्व विकास यांचा घनिष्ठ संबंध असून पर्यटन हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त व प्रभावी साधन ठरते.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन, व्यक्तिमत्त्व विकास, मानसिक आरोग्य, सांस्कृतिक अनुभव, निसर्ग पर्यटन, ग्रामीण पर्यटन, आत्मविश्वास, सर्जनशीलता, सामाजिक कौशल्ये*

## प्रस्तावना:

आजचं युग हे धावपळीचे युग आहे.प्रत्येक जण आपल्या कामात, व्यापात इतका गुंतलेला आहे की, स्वत:साठी थोडा वेळ काढणं म्हणजे हल्ली दुरापास्त झालं आहे.सतत मनावर, शरीरावर कामाचं ओझं असल्याने शरीरासोबत मन देखील थकून जाते. त्यामुळे आजकाल वीकेंडला आवर्जून मोठ्या शहरातील लोक कुठेतरी निसर्ग स्थळी अथवा शहरापासून दूर असलेल्या एखाद्या निवांत स्थळी कुटुंबासोबत पर्यटनाला जात असतात. प्रत्येक व्यक्तीला एका विसाव्याची, विश्रांतीची गरज असते.मनाला ताजतवान ठेवण्यासाठी आपल्या दैनंदिन कामातून थोडा वेळ काढून पुन्हा आठवडाभर काम करण्याची ऊर्जा या पर्यटनाच्या माध्यमातून मिळते. बऱ्याच मंडळींना फिरण्याची आवड असते.नवनवीन स्थळांना भेट देणे, तेथील माहिती घेणे, निसर्ग स्थळी असाल तर तेथील निसर्गाचा आनंद घेणे इत्यादी गोष्टी त्यांना आवडत असतात आणि त्यामुळे त्यांचा विरंगुळा तर होतोच पण त्याचबरोबर एक आत्मिक समाधान व आनंद देखील मिळतो. महत्त्वाचे म्हणजे आपल्या परिवाराबरोबर वेळ देखील घालवता येतो. हे पर्यटन मग कधी धार्मिक ठिकाणी, कधी ऐतिहासिक ठिकाणी तर कधी निसर्गस्थळी सुद्धा असते. रोजच्या धकाधकीच्या जीवनापासून स्वतःला व परिवाराला आनंद मिळण्यासाठी केलेले हे पर्यटन म्हणजे व्यक्तीच्या मनाला मिळणारा विरंगुळा तर ठरतेच पण त्याचबरोबर प्रत्येक स्थळाविषयी नवीन माहिती देणारे सुद्धा ठरते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*पल्लवी सर्वोत्तमराव कुलकर्णी, परभणी*

**How to cite this article:**
*कुलकर्णी, . पल्लवी . सर्वोत्तमराव . (2026). पर्यटन आणि व्यक्तिमत्व विकास. Journal of Research & Development, 18(1(V)), 89–91.* *https://doi.org/10.5281/zenodo.18478300*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18478300

**व्यक्तिमत्व विकास:**

पर्यटन आणि व्यक्तिमत्व विकास यांचा जवळचा संबंध आहे.पर्यटनामुळे नवीन ठिकाणे पाहणे,विविध संस्कृती अनुभवणे, एकटे किंवा समूहाने प्रवास करणे यातून आत्मविश्वास, सर्जनशीलता,समस्या सोडवण्याची क्षमता आणि सामाजिक कौशल्ये वाढतात.ज्यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो.पर्यटनाचा व्यक्तिमत्व विकासासाठी फार मोठा हातभार लागतो.पर्यटनामुळे होणाऱ्या व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी खालील घटक महत्वपूर्ण ठरतात.

**1. सर्जनशीलता आणि ज्ञान:**

नवीन स्थळे, नवीन लोक आणि नवीन कल्पनांमुळे विचार करण्याची पद्धत बदलते. वेगवेगळया ठिकाणी भ्रमण केल्याने त्या स्थळाविषयी माहिती मिळते. विविध ज्ञात नसलेल्या गोष्टींचे ज्ञान मिळाल्याने सर्जनशीलता वाढते व जगा विषयीच्या ज्ञानात भर पडते.

**2. इतिहास समजावून घेता येतो:**

पर्यटनामुळे वेगवेगळया ठिकाणांचा म्हणजेच धार्मिक ऐतिहासिक ठिकाणांचा इतिहास आपल्याला समजतो.प्रत्यक्ष त्या स्थानांना भेट दिल्याने त्या स्थळाविषयीची ऐतिहासिक पार्श्वभूमी आपल्याला समजते.ज्याचा आपल्याला स्वतःला व पर्यायाने या माहितीचा इतरांनाही फायदा होतो.

**3. संस्कृतीची ओळख होते:**

पर्यटनानिमित्त केलेल्या विविध भागातील, राज्यातील किंवा परदेशातील प्रवासामुळे त्या त्या भागातील संस्कृती, परंपरा यांची ओळख होते. नवीन भाषा, नवीन माणसं, त्यांच्या भागात असणाऱ्या प्रथा, परंपरा, चालीरीती यांची ओळख होण्यास मदत होते. त्यामुळे ज्ञानाचा विस्तार वाढतो.

**4.मनोरंजन होते:**

पर्यटनामुळे माणसाला एक नवीन ऊर्जा मिळते रोजच्या धकाधकीच्या जीवनातून थोडा वेळ स्वतःसाठी देता येतो त्यामुळे मनाला आनंद मिळतो. कामाच्या उजव्या खाली सतत धडकून गेलेल्या मनाला वेगवेगळया ठिकाणांना भेट दिल्यामुळे एक दिलासा मिळतो. मन आनंदित होते. त्यामुळे शरीरही निरोगी राहण्यास मदत होते.

**5. संशोधन वृत्ती वाढते:**

वेगवेगळया ठिकाणांना भेटी दिल्यामुळे व्यक्तीमधील संशोधन वृत्ती वाढीला लागते आणि प्रश्नांची उत्तरेही त्या स्थानांना स्वतः जाऊन भेट दिल्याने सहज मिळण्यास मदत होते. उदा- एखाद्या ऐतिहासिक ठिकाणी मंदिर किंवा किल्ल्याला जर आपण भेट दिली तर त्या स्थळाचा इतिहास जाणून घेण्यासाठी आपली जिज्ञासा वाढते.त्यातून मिळणारी माहिती ही संशोधकास उपयुक्त ठरते.

**6. विषयाचा सखोल अभ्यास:**

पर्यटन केल्याने एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास होतो. कारण ते आपल्याला प्रत्यक्ष अनुभव विविध संस्कृती,इतिहास,भूगोल आणि स्थानिक लोकांचे संवाद साधण्याची संधी देते.ज्यामुळे केवळ पुस्तकी ज्ञानाऐवजी ठोस माहिती मिळते.जसे की ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन इतिहासाचा अभ्यास करणे किंवा कृषी पर्यटन करून शेतीच्या पद्धती समजावून घेणे हे सर्व विषयाचे सखोल ज्ञान देते.

**7. निसर्गाशी सहवास:**

शेती आणि ग्रामीण जीवनाचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक शेती किंवा शेती आधारित ठिकाणी येतात. तिथे शेतीची कामे शिकतात, स्थानिक संस्कृती अनुभवतात आणि निसर्गाच्या जवळ राहतात. हे शहरी लोकांना तणाव मुक्त होऊन निसर्गाशी जोडले जाण्याचा एक उत्तम मार्ग आहे.जो शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा स्त्रोत देखील आहे. यामुळे शहरातील लोकांना निसर्गाचा सहवास मिळतो.

**8. क्रीडा पर्यटनाचे फायदे:**

क्रीडा पर्यटनाच्या अनेक फायदे आहेत ज्या आर्थिक विकास (नोकऱ्या, स्थानिक व्यवसायांना चालना) पायाभूत सुविधांचा विकास (स्टेडियम, रस्ते, हॉटेल) सामाजिक आणि सांस्कृतिक लाभ (समुदाय भावना,सांस्कृतिक देवाण-घेवाण स्थानिक अभिमान) आणि पर्यावरणीय फायदे (नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन) इत्यादींचा समावेश होतो.यामुळे स्थानिक समुदायाला रोजगार मिळतो,शहराची प्रतिमा सुधारते आणि लोकांना एकत्र आणून एकोपा वाढतो.

**9. ग्राम पर्यटन:**

शहरातील पर्यटकांना ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव देण्यासाठी गावांमध्ये आयोजित केलेला हा पर्यटन प्रकार आहे.जिथे निसर्ग शेती स्थानिक संस्कृती आणि साधे जीवन जवळून पाहता येते.यातून स्थानिक लोकांचा आर्थिक सामाजिक विकास होतो आणि पर्यावरणाचे रक्षण होते.या पर्यटनामुळे गावाकऱ्यांना रोजगार मिळून त्यांचे उत्पन्न वाढते. या पर्यटनामुळे शहरी पर्यटकांना शांत प्रदूषण मुक्त वातावरणाचा अनुभव घेता येतो.

**10. आत्मविश्वास वाढतो:**

पर्यटनामुळे आत्मविश्वास वाढतो. कारण नवीन ठिकाणी संस्कृती आणि लोकांना भेटण्यामुळे अनुभव वाढतात. आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होते. एकटे प्रवास केल्याने माणूस स्वावलंबी बनतो. स्वतःची ताकद व क्षमता त्याला समजते. ज्यामुळे मानसिक आरोग्य सुधारते आणि एकूणच आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

**निष्कर्ष:**

पर्यटनाच्या विविध प्रकारांमधून देशातील राज्यातील संस्कृतीची ओळख होते.त्याचबरोबर पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागतो. तसेच वेगवेगळ्या ठिकाणी फिरल्यामुळे ज्ञानात भर पडते त्याचबरोबर मनोरंजनही होते.

**संदर्भग्रंथ:**

1] परभणी जिल्हा प्राचीन ऐतिहासीक वारसा: जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

2] पर्यटन: डॉ.जी.एस.पीसे / डॉ.नानवटे

3] दक्षिण भारताचा इतिहास: डॉ.अनिल शिंगारे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# परभणी जिल्ह्यातील हतनूर येथील श्री नागनाथ मंदिर स्थापत्याचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास

**प्रविण लक्ष्मणराव कदम**
संशोधक विद्यार्थी

**Manuscript ID:**
JRD -2026-180124
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 92-94
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*महाराष्ट्र राज्याला समृद्ध धार्मिक व ऐतिहासिक परंपरा लाभलेली असून परभणी जिल्ह्यातील हतनूर येथील श्री नागनाथ मंदिर हे त्याचे एक महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. सदर मंदिर चालुक्य–यादव काळातील भुमिज शैलीतील असून काळ्या पाषाणातील त्रिदल पद्धतीची रचना, गर्भगृह, उपगर्भगृह, मुखमंडप, सभामंडप, शिखर व बारव ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. सूर्योदयाच्या वेळी सूर्यकिरण थेट शिवलिंगावर पडण्याची रचना ही स्थापत्यकलेची अद्वितीय वैशिष्ट्य ठरते. मंदिराशी संबंधित धार्मिक उत्सव, पालखी सोहळा, दीपोत्सव व श्रावण महिन्यातील उपक्रम यांमुळे हे स्थळ भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. स्थापत्य, ऐतिहासिक व धार्मिक मूल्यांमुळे श्री नागनाथ मंदिर धार्मिक, ऐतिहासिक व स्थापत्य पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते तसेच स्थानिक आर्थिक व सामाजिक विकासास चालना देते. त्यामुळे हतनूर येथील श्री नागनाथ मंदिर हे पर्यटन विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण वारसास्थळ आहे.*

## प्रस्तावना:

महाराष्ट्र हे भारतातील एक विकसित राज्य असून येथे उद्योगधंद्यांचा विकास झाला आहे. त्याबरोबरच महाराष्ट्राला फार मोठी धार्मिक परंपरा लाभलेली आहे. अनेक धर्म आणि पंथांची पवित्र ठिकाणे येथे आहेत. त्यात हिंदु, जैन, ख्रिश्चन, शिख, मुसलीम धर्म आणि वारकारी संप्रदायाची प्रमुख स्थळे आहेत. निरनिराळया देवी देवितांची शेकडो धार्मिक स्थळे महाराष्ट्रात वसलेली आहेत. यात गणपती, शिव, विष्णु मंदिरे, दत्त संप्रदायाची मंदिरे, ज्योतिर्लिंग मंदिरे, अष्टविनायक मंदिरे, साधु संतांची जन्मस्थळे, आळंदी, देहु, शेगाव, शिर्डी इत्यादीचा समावेश होतो. मंदिर स्थापत्य म्हणजे देवाचे घर बनविण्याची कला ज्यात धार्मिक श्रध्दा, सांस्कृतिक मुल्य आणि भौमितीक तत्वे यांचा संगम असतो. यात गर्भगृह, मंडप, शिखर यासारखे मुख्य भाग तसेच नागर, द्रवीड, वेसर आणि भुमीज यासारख्या शैलींचा अभ्यास केला जातो. ज्यात भारतीय संस्कृती, इतिहास आणि कला यांचा सखोल वेध घेता येतो. जो अध्यात्मिक आणि सामाजिक जिवनाचा केंद्रबिंदु असतो. भारतीय मंदिर स्थापत्य हा केवळ इमारतींचा अभ्यास नसून तो मानवी अध्यात्मिक प्रवासाचा आणि संस्कृतीचा आरसा आहे. प्राचीन काळापासून मंदिरांनी पुजा अर्चा आणि सामाजिक जिवनाचे केंद्र म्हणून महत्वपुर्ण भुमिका बजावली आहे. विविध राजवटी आणि प्रादेशिक भिन्नतेमुळे स्थापत्य शैलीत विविधता आढळते. ज्यातून प्राचीन भारताची कलात्मक आणि तांत्रिक प्रगती दिसून येते.

## भौगोलिक स्थान :

हतनूर हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील परभणी जिल्ह्यामध्ये सेलू तालुक्याच्या ठिकाणी वसलेले एक गाव आहे.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रविण लक्ष्मणराव कदम, संशोधक विद्यार्थी*

**How to cite this article:**
*कदम, . प्रविण . लक्ष्मणराव. (2026). परभणी जिल्ह्यातील हतनूर येथील श्री नागनाथ मंदिर स्थापत्याचा पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 92–94.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18478342*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18478342

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

सुमारे 3000 लोकसंख्या असलेले हे गाव एक खेडेगाव आहे. या ठिकाणी बस, खाजगी वाहने किंवा रेल्वने सेलू, परभणी येथून या गावी जाता येते. या ठिकाणी सर्व जाती धर्माचे लोक आनंदाने राहतात. परभणी पासून 50 किमी अंतरावर हे गाव असून येथील गावकऱ्यांच्या आगळयावेगळया संकल्पामुळे विशेष उल्लेखनीय ठरते.

**श्री नागनाथ मंदिर हतनूर:**

हतनूर या गावाला समृध्द असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. याचे कारण म्हणजे या ठिकाणी असलेले श्री नागनाथ मंदिर हे होय. या मंदिराची विशेष उल्लेखनीय स्थापत्य कला म्हणजे हे मंदिर त्रिदल पध्दतीचे आहे. यामध्ये एक मुख्य गर्भगृह आणि दोन उपगर्भगृह असलेले असून तिनही गर्भगृहात दिवे लावण्याची विशेष योजना दगडातच कोरलेली आहे. दुसरे आणि अत्यंत महत्वाची बाब म्हणजे सकाळी सुर्योदयाच्या वेळी सुर्याची पहिली किरणे मुख्य गर्भगृहातील शिवपिंडावर पडतात. श्री नागनाथ मंदिर हे पुर्वाभिमुख असून भुमिज पध्दतीचे आहे. हे मंदिर चालुक्य कालीन असून याचे काम यादव काळामध्ये पुर्ण झाले आहे.

**मुखमंडप रचना:**

मुखमंडप हे 10 फुट x 07 फुट 08 इंच आकाराचे आहे. हे दोन स्तंभावर आधारलेले आहे. या स्तंभाची उंची 06 फुट 05 इंच आहे. या स्तंभावर उलटे नाग कोरलेले आहेत. मुख मंडपाची रचना अष्टकोनी शिलावर तीन कमी कमी होत जाणारी वतुळे व मध्यभागी पद्म या प्रकारातील आहे. येथून पुढे गेल्यावर मंदिराच्या संभामंडपाचे प्रवेशद्वार लागते.

**सभामंडप प्रवेशद्वार:**

या संभामंडपाचे द्वार 04 फुट 10 इंच उंच व 02 फुट 05 इंच रुंद आहे. यावर दोन द्वारशाखा कोरलेल्या आहेत. या सभामंडपात सर्वत्र आधुनिक टाईल्स बसविलेल्या आहेत. या ठिकाणी एक रंगशिळा आहे. ही रंगशिळा स्तंभविरहीत असून 9 फुट x 9 फुट अशा चौरस आकाराची आहे. अशा प्रकारचे सभामंडपाचे प्रवेशद्वार असल्याचे दिसुन येते.

**उपगर्भगृह:**

सभामंडपाच्या उत्तर दिशेला उपगर्भगृहात बदल झालेला दिसतो. कारण हे मुर्ती विरहीत आहे.

**मुख्य गर्भगृह:**

गर्भगृहातील अंतराळात प्रवेश केल्यानंतर अंतराळ हे दक्षिणोत्तर 7 फुट 4 इंच आणि पुर्व पश्चिम 6 फुट 3 इंच या आकाराचे आहे. अंतराळ हे अष्टकोनी आहे. गर्भगृहात मध्यभागी पाषाणाचे शिवलिंग स्थापित केलेले आहे.

**शिखर:**

या मंदिराची सुरुवातीला एकावर एक थर अशी कळसापर्यंत रचना होती. परंतू नंतर कालौघात हे कोसळल्यामुळे अर्धवट शिखर राहिले. यालाच ग्ा्रमस्थांनी विटा सिमेंट यांच्या सहाय्याने पुर्ण केले.

**बारव:**

या मंदिराच्या पुर्वेला एक बारव आहे. तिला नागनाथ तिर्थ असे म्हणतात. या बारवेत उतरण्यासाठी चारही बाजुने चार प्रवेशद्वार आहेत.

**सण / उत्सव:**

हतनूर या ठिकाणी श्री नागनाथ मंदिरात महाशिवरात्रीला खुप मोठा गावकऱ्यांच्या वतीने पालखी सोहळा आयोजित केला जातो. तसेच या पालखी सोहळया निमित्त या ठिकाणी भव्यदिव्य असा दिपोत्सव मोठया उत्सहात साजरा केला जातो. याशिवाय या ठिकाणी श्रावण महिन्यात खुप मोठया प्रमाणावर पंचक्रोशीतील भकत् मंडळी जमा होऊन अभिषेक करतात. तसेच श्रावण महिन्यात दर सोमवारी महाप्रसादाचे आयोजन केल्या जाते. तसेच या गावातील ग्रामस्थ आपल्या उत्पन्नातील एक टक्का उत्पन्न या मंदिरासाठी दान करतात. अशा प्रकारे या मंदिराचे जतन आणि संवर्धन करण्याचा नाविन्यपुर्ण उपक्रम येथील गावकरी राबवतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**पर्यटनाचे महत्व:**

हतनूर येथील श्री नागनाथ मंदिर पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपुर्ण आहे कारण ते प्राचीन हेमाडपंथी स्थापत्यशास्त्र, काळया दगडातील बांधकाम, या ठिकाणी असलेले आकर्षक सभामंडप आणि बारव यासाठी ओळखले जाते. जे धार्मिक पर्यटनासोबतच ऐतिहासिक आणि स्थापत्य शास्त्रीय पर्यटनाला चालना देते.

**1] धार्मिक महत्व:**

हे प्राचीन नागनानाथ मंदिर असून भाविकांसाठी एक पवित्र स्थळ मानले जाते. या बरोबरच भाविकांची भक्ती पाहता हे जागृत असे देवस्थान आहे, असे आपणाला समजते. महाशिवरात्रीला या ठिकाणी फार मोठा यात्रा भरते.

**2] ऐतिहासिक महत्व:**

हे मंदिर भुमिज शैलीचे असून इ.सन 1301 मध्ये बांधलेले आहे. हे मंदिर हेमाडपंथी असून काळया पाषण दगडातील बांधकाम हे एक याचे मुख्य वैशिष्टय पर्यटकांना आकर्षित करते.

**3] आर्थिक महत्व:**

धार्मिक स्थळे आर्थिक व्यवस्थेला बळ देतात. हे मंदिर देखील स्थानिक रोजगार निर्मितीस मदत करते.

अशा प्रकारे हतनूर मंदिर हे ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असून भाविकांना एकत्रित आणते.

**संदर्भग्रंथ:**

1. वारसा शिल्पसंपदेचा: जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
2. परभणी जिल्हा प्राचीन ऐतिहासीक वारसा: जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
3. पर्यटन: डॉ.आर.एस.कोंडेकर
4. पर्यटन: डॉ.जी.एस.पीसे / डॉ.नानवटे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटनातील ऐतिहासिक स्थळे : एक वर्णनात्मक अभ्यास(Historical Sites in Indian Tourism: A Descriptive Study)

**डॉ. प्रमोद एस. मेश्राम**

प्राध्यापक / प्र. प्राचार्य, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल ता राजापूर जिल्हा रत्नागिरी

**Email:** pramodmeshra@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180125
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(V)
Pp. 95-100
January 2026

**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*भारत हा जगातील सर्वात प्राचीन आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध देशांपैकी एक आहे. हजारो वर्षांचा इतिहास विविध राजवंश, संस्कृती, धर्म, कला आणि स्थापत्यशैलींमधून आकाराला आला आहे. या इतिहासाचे मूर्त स्वरूप म्हणजे भारतातील ऐतिहासिक स्थळे. ही स्थळे केवळ भूतकाळाची साक्ष नसून आजच्या पर्यटन उद्योगाचा एक महत्त्वाचा घटक बनली आहेत. या संशोधन पेपरमध्ये भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांचे स्वरूप, त्यांचे प्रकार, भौगोलिक वितरण, पर्यटनातील भूमिका, सामाजिक-सांस्कृतिक महत्त्व, आर्थिक योगदान आणि वारसा संवर्धनाची गरज यांचे वर्णनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. हा अभ्यास दुय्यम स्रोतांवर आधारित असून वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.*

***कीवर्ड्स:*** *भारतीय पर्यटन, ऐतिहासिक स्थळे, वारसा पर्यटन, सांस्कृतिक वारसा, वर्णनात्मक अभ्यास*

**प्रस्तावना:**

पर्यटन हा आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा सेवा उद्योग आहे. भारतात पर्यटनाचे महत्त्व केवळ आर्थिक उत्पन्नापुरते मर्यादित नसून ते सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाशी निगडित आहे. भारतातील पर्यटनाचे विविध प्रकार आहेत. नैसर्गिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, साहसी पर्यटन आणि ऐतिहासिक पर्यटन. यांपैकी ऐतिहासिक पर्यटन हे भारतीय पर्यटनाचे प्रमुख आकर्षण आहे. भारतातील ऐतिहासिक स्थळे म्हणजे हजारो वर्षांच्या संस्कृतीचे जिवंत दस्तऐवज आहेत. सिंधू संस्कृतीपासून ते आधुनिक काळापर्यंत विविध राजवटी, धर्म आणि संस्कृती यांनी भारताच्या भूभागावर आपले ठसे उमटवले आहेत. त्यामुळे भारतातील ऐतिहासिक स्थळे केवळ वास्तू नसून त्या राष्ट्राच्या ओळखीचा महत्वपूर्ण भाग आहेत. भारत हा जगातील सर्वात प्राचीन, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि ऐतिहासिक वारशाने नटलेला देश आहे. हजारो वर्षांच्या कालखंडात विविध संस्कृती, धर्म, राजवंश आणि परंपरा भारताच्या भूमीवर विकसित झाल्या आहेत. या सर्वांचा ठसा आजही भारतातील ऐतिहासिक स्थळांमधून स्पष्टपणे दिसून येतो. किल्ले, राजवाडे, मंदिरे, स्तूप, लेणी, प्राचीन शहरे आणि स्मारके ही केवळ दगड-मातीची रचना नसून ती भारताच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासाची जिवंत साक्ष आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

**Address for correspondence:**

*डॉ. प्रमोद एस. मेश्राम, प्राध्यापक / प्र. प्राचार्य, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल ता राजापूर जिल्हा रत्नागिरी*

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18478373

OPEN ACCESS

**How to cite this article:**

*मेश्राम, . प्रमोद . एस. (2026). भारतीय पर्यटनातील ऐतिहासिक स्थळे : एक वर्णनात्मक अभ्यास(Historical Sites in Indian Tourism: A Descriptive Study). Journal of Research & Development, 18(1(V)), 95–100. https://doi.org/10.5281/zenodo.18478373*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

भारतातील ऐतिहासिक स्थळे विविध कालखंडांचे प्रतिबिंब आहेत. सिंधू संस्कृतीच्या अवशेषांपासून ते मौर्य, गुप्त, चालुक्य, चोळ, मुघल, मराठा आणि ब्रिटिश काळातील वास्तूंपर्यंतचा प्रदीर्घ इतिहास या स्थळांमध्ये सामावलेला आहे. प्रत्येक स्थळ त्या काळातील स्थापत्यकला, तंत्रज्ञान, धार्मिक श्रद्धा, सामाजिक रचना आणि राजकीय सत्तेचे दर्शन घडवते. त्यामुळे ऐतिहासिक स्थळांना भेट देणे म्हणजे केवळ प्रवास करणे नव्हे, तर इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे होय. आजच्या पिढीला इतिहास प्रामुख्याने पुस्तकांमधून किंवा शैक्षणिक अभ्यासक्रमांमधून समजतो. मात्र ऐतिहासिक स्थळांना भेट दिल्यास तो इतिहास प्रत्यक्ष पाहता, अनुभवता आणि समजून घेता येतो. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटनाला शैक्षणिक महत्त्वही प्राप्त होते. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी जाणीव निर्माण करणे, सांस्कृतिक मूल्यांची कदर वाढवणे आणि राष्ट्रीय अस्मिता बळकट करणे या दृष्टीने ऐतिहासिक पर्यटनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. याचबरोबर हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा, स्थानिक मार्गदर्शक, हस्तकला, खाद्यसंस्कृती आणि किरकोळ उद्योग यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत अभ्यासामध्ये भारतीय पर्यटनातील ऐतिहासिक स्थळांचे स्वरूप, महत्त्व आणि भूमिका वर्णनात्मक पद्धतीने समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा अभ्यास ऐतिहासिक पर्यटनाकडे केवळ आकर्षण म्हणून न पाहता ते एक सांस्कृतिक जबाबदारी आणि राष्ट्रीय संपत्ती म्हणून समजून घेण्याची आवश्यकता अधोरेखित करतो.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

- ऐतिहासिक पर्यटनाची संकल्पना स्पष्ट करणे.
- भारतातील ऐतिहासिक स्थळांचे प्रकार व स्वरूप वर्णन करणे.
- ऐतिहासिक पर्यटनाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व समजावून सांगणे.
- वारसा संवर्धनाची गरज अधोरेखित करणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

हा अभ्यास पूर्णतः वर्णनात्मक स्वरूपाचा आहे. प्राथमिक सर्वेक्षण किंवा सांख्यिकीय विश्लेषण न करता दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये पुस्तके, शैक्षणिक जर्नल्स, पर्यटन मंत्रालयाचे अहवाल, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) ची प्रकाशने आणि युनेस्कोचे दस्तऐवज यांचा आधार घेण्यात आला आहे.

**ऐतिहासिक पर्यटनाची संकल्पना**

ऐतिहासिक पर्यटन म्हणजे भूतकाळाशी संबंधित स्थळांना भेट देऊन त्या समाजाचा, संस्कृतीचा आणि इतिहासाचा अभ्यास करणे. यामध्ये किल्ले, राजवाडे, लेणी, मंदिरे, स्तूप, युद्धस्थळे, प्राचीन शहरे आणि स्मारके यांचा समावेश होतो. हे पर्यटन लोकांना इतिहासाशी भावनिकरित्या जोडते.

**ऐतिहासिक पर्यटनाची संकल्पना**

या पर्यटनामध्ये किल्ले, राजवाडे, प्राचीन मंदिरे, स्तूप, लेणी, युद्धस्थळे, प्राचीन शहरे, स्मारके आणि संग्रहालये यांचा समावेश होतो. ही स्थळे त्या त्या काळातील स्थापत्यकला, तंत्रज्ञान, धार्मिक श्रद्धा, सामाजिक रचना आणि राजकीय सत्तेचे प्रतिनिधित्व करतात.

ऐतिहासिक पर्यटनाची संकल्पना तीन मुख्य घटकांवर आधारित आहे. वारसा (heritage), अनुभव (experience) आणि शिक्षण (education). पर्यटक एखाद्या ऐतिहासिक स्थळाला भेट देताना त्या ठिकाणाशी संबंधित कथा, घटना आणि परंपरा जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे इतिहास केवळ पुस्तकांपुरता मर्यादित राहत नाही तर तो प्रत्यक्ष अनुभवात रूपांतरित होतो. या प्रक्रियेमुळे व्यक्तीमध्ये सांस्कृतिक जाणीव, सहिष्णुता आणि आदरभाव वाढतो. थोडक्यात, ऐतिहासिक पर्यटन म्हणजे भूतकाळाचा अभ्यास करण्यासाठी केलेला प्रवास होय. तो व्यक्तीला स्वतःच्या संस्कृतीची ओळख करून देतो, समाजाच्या जडणघडणीचा अभ्यास करण्यास मदत करतो आणि इतिहासाच्या संवर्धनाची जाणीव निर्माण करतो. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटन हे केवळ करमणुकीचे साधन नसून सांस्कृतिक शिक्षण आणि राष्ट्रीय जाणीव निर्माण करणारे माध्यम आहे.

**भारतातील ऐतिहासिक स्थळांचे प्रकार**

**प्राचीन नागरी संस्कृती स्थळे**

प्राचीन नागरी संस्कृती स्थळे ही भारतातील सर्वात जुन्या नागरी जीवनाची साक्ष देणारी स्थळे आहेत. या स्थळांमधून मानवाने गावपातळीवरून संघटित नागरी जीवनाकडे केलेली वाटचाल स्पष्टपणे दिसून येते. मोहेन्जोदडो आणि हडप्पा ही या संस्कृतीची प्रमुख केंद्रे होती. येथे सापडलेली आखीव-रेखीव रस्तेव्यवस्था, नियोजित घरे, सार्वजनिक स्नानगृह, धान्य कोठारे आणि निचरा व्यवस्था ही त्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

काळातील प्रगत नागरी व्यवस्थेची उदाहरणे आहेत. भारतामधील इतर प्राचीन नागरी स्थळांमध्ये लोथल (गुजरात), धोलावीरा (कच्छ), राखीगढी (हरियाणा) यांचा समावेश होतो. ही स्थळे आज ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बनली आहेत. पर्यटकांना येथे केवळ अवशेष पाहायला मिळत नाहीत, शैक्षणिक दृष्टिकोनातून ही स्थळे विद्यार्थ्यांसाठी जिवंत इतिहासाचे वर्ग बनतात.

**धार्मिक ऐतिहासिक स्थळे**

काशी, अयोध्या, बोधगया, अमृतसर, रामेश्वरम ही स्थळे धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्वाची आहेत. धार्मिक ऐतिहासिक स्थळे ही भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेची महत्त्वाची प्रतीके आहेत. भारतात  हिंदू, बौद्ध, जैन, शीख, इस्लाम आणि ख्रिश्चन या धर्मांचे ऐतिहासिक वारसा येथे मोठ्या प्रमाणावर आढळतात. त्यामुळे भारतातील धार्मिक स्थळे ही केवळ उपासनेची केंद्रे नसून ती त्या त्या काळातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीची साक्ष देणारी ऐतिहासिक स्थळेही आहेत. बोधगया, सारनाथ आणि कुशीनगर ही बौद्ध धर्माशी संबंधित स्थळे बुद्धांच्या जीवनप्रवासाशी निगडित असून जगभरातील बौद्ध पर्यटकांसाठी ती श्रद्धेची केंद्रे आहेत. धार्मिक ऐतिहासिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांचा उद्देश केवळ दर्शन घेणे नसून त्या परंपरेचा अनुभव घेणे, त्या संस्कृतीशी जोडले जाणे हा असतो. त्यामुळे धार्मिक पर्यटन हे भावनिक आणि आध्यात्मिक स्वरूपाचे असते. त्यातून सांस्कृतिक सहिष्णुता वाढते आणि विविधतेतील एकतेचा अनुभव मिळतो. मात्र, वाढत्या गर्दीमुळे या स्थळांवर ताण निर्माण होतो. त्यामुळे स्वच्छता, वाहतूक, व्यवस्थापन आणि संवर्धन या बाबींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**किल्ले व राजवाडे**

रायगड किल्ला हा महाराष्ट्रातील मराठा साम्राज्याचा केंद्रबिंदू होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी येथे राज्याभिषेक केला आणि स्वराज्याची राजधानी म्हणून रायगड विकसित केला. रायगड हा मराठा प्रशासन, लष्करी नियोजन आणि स्वातंत्र्याची प्रेरणा यांचे प्रतीक आहे. ग्वाल्हेर किल्ला मध्य भारतातील एक अत्यंत प्राचीन आणि मजबूत किल्ला आहे. विविध राजवंशांनी त्यावर सत्ता गाजवली आहे. तो स्थापत्यदृष्ट्या भव्य असून त्याची भिंत, प्रवेशद्वारे आणि राजवाडे त्या काळातील संरक्षण तंत्रज्ञानाची साक्ष देतात. जयपूर सिटी पॅलेस हा राजस्थानमधील राजेशाही जीवनशैलीचा प्रतिनिधी आहे. गुलाबी शहराच्या मध्यभागी असलेला हा राजवाडा मुघल आणि राजपूत स्थापत्यशैलींचे सुंदर मिश्रण दर्शवतो. आजही हा राजवाडा राजघराण्याच्या वास्तव्याचे आणि संग्रहालयाचे केंद्र आहे, ज्यामुळे पर्यटकांना ऐतिहासिक वारसा आणि आधुनिक वापर यांचा संगम अनुभवता येतो. ही स्थळे भारताच्या राजकीय, सांस्कृतिक आणि स्थापत्य परंपरेचे विविध पैलू दर्शवतात. त्यामुळे ती केवळ पर्यटन स्थळे नसून भारताच्या ऐतिहासिक स्मृतींची जपणूक करणारी प्रतीके आहेत.

**लेणी व शिल्पस्थळे**

अजिंठा-वेरूळ, एलिफंटा, कार्ले-भाजा लेणी ही स्थापत्य व चित्रकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. भारताच्या स्थापत्य व शिल्पकलेच्या इतिहासात लेणी परंपरेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अजिंठा-वेरूळ, एलिफंटा आणि कार्ले-भाजा ही लेणी भारतातील प्राचीन धार्मिक, कलात्मक आणि तांत्रिक प्रगतीची साक्ष देतात आणि आज महत्त्वाची ऐतिहासिक पर्यटन स्थळे बनली आहेत. अजिंठा लेणी या महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यात वाघूर नदीच्या कडेला आहेत. या लेणी प्रामुख्याने बौद्ध धर्माशी संबंधित असून त्या भित्तिचित्रांसाठी जगप्रसिद्ध आहेत. बुद्धाच्या जीवनकथांवर आधारित चित्रे ही रंग, रेषा आणि भावभावनांच्या उत्कृष्ट अभिव्यक्तीचे उदाहरण आहेत. अजिंठा लेणी भारतीय चित्रकलेचा सर्वोच्च टप्पा मानल्या जातात. वेरूळ (एलोरा) लेणी या अजिंठ्याजवळच असून येथे बौद्ध, हिंदू आणि जैन अशा तिन्ही धर्मांची लेणी आढळतात. येथील कैलास मंदिर हे अखंड एकाच खडकातून कोरलेले असून स्थापत्यकलेतील अद्वितीय कामगिरी मानले जाते. वेरूळ लेणी धार्मिक सहअस्तित्वाचे आणि कलात्मक उत्कर्षाचे प्रतीक आहेत. एलिफंटा लेणी या मुंबईजवळ समुद्रातील बेटावर आहेत. या लेणी प्रामुख्याने शैव परंपरेशी संबंधित असून येथील त्रिमूर्ती शिल्प हे भारतीय शिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या लेण्यांमधून गुप्तोत्तर काळातील धार्मिक श्रद्धा आणि स्थापत्यकलेची प्रगती दिसून येते.

कार्ले आणि भाजा लेणी या पुणे जिल्ह्यातील प्राचीन बौद्ध लेणी आहेत. या लेणी स्तूप, विहार आणि चैत्यगृह यांसाठी प्रसिद्ध आहेत. येथे भिक्षूंच्या निवासाची आणि ध्यानसाधनेची व्यवस्था दिसून येते. या लेणी साधेपणा, शिस्त आणि आध्यात्मिक जीवनशैलीचे प्रतिनिधित्व करतात.  ही सर्व लेणी केवळ धार्मिक स्थळे नसून त्या त्या काळातील समाज, तंत्रज्ञान, श्रद्धा आणि कलात्मक दृष्टिकोनाची साक्ष देणारी सांस्कृतिक वारसा आहेत. त्यामुळे त्यांचे संवर्धन आणि संरक्षण हे राष्ट्रीय जबाबदारीचे कार्य मानले जाते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**वसाहतकालीन वारसा**

व्हिक्टोरिया मेमोरियल हे कोलकाता शहरातील एक भव्य स्मारक आहे. हे स्मारक ब्रिटिश सम्राज्ञी राणी व्हिक्टोरियाच्या स्मरणार्थ उभारण्यात आले आहे. पांढऱ्या संगमरवरी दगडातून बांधलेले हे स्मारक युरोपीय आणि भारतीय स्थापत्यशैलींचे मिश्रण दर्शवते. आज येथे संग्रहालय कार्यरत असून त्यामध्ये ब्रिटिश काळातील चित्रे, दस्तऐवज आणि ऐतिहासिक वस्तू संग्रहित आहेत. त्यामुळे व्हिक्टोरिया मेमोरियल हे शिक्षण आणि पर्यटन यांचा संगम दर्शवणारे स्थळ बनले आहे. गेटवे ऑफ इंडिया हे मुंबईतील एक महत्त्वाचे ऐतिहासिक स्मारक आहे. ब्रिटिश युवराजाच्या भारतभेटीच्या स्मरणार्थ हे स्मारक उभारण्यात आले. स्थापत्यदृष्ट्या इंडो-सारासेनिक शैलीतील हे प्रवेशद्वार ब्रिटिश सत्तेचे प्रतीक मानले जाते. विशेष म्हणजे, भारताच्या स्वातंत्र्यानंतर ब्रिटिश सैन्याचे अंतिम प्रस्थान याच ठिकाणावरून झाले, ज्यामुळे या स्मारकाला ऐतिहासिक दृष्ट्या वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. इंडिया गेट हे नवी दिल्लीतील एक महत्त्वाचे राष्ट्रीय स्मारक आहे. हे स्मारक पहिल्या महायुद्धात आणि इतर युद्धांमध्ये शहीद झालेल्या भारतीय सैनिकांच्या स्मरणार्थ बांधण्यात आले आहे. येथे कोरलेली शहीद सैनिकांची नावे त्याग आणि बलिदानाची आठवण करून देतात. इंडिया गेट हे राष्ट्रभक्तीचे आणि सामूहिक स्मृतीचे प्रतीक बनले आहे. ही स्मारके भारताच्या वसाहतकालीन इतिहासाचे विविध पैलू दर्शवतात.

**भौगोलिक वितरण**

उत्तर भारतात मुघल स्थापत्य, दक्षिण भारतात द्रविड स्थापत्य, पश्चिम भारतात मराठा व राजपूत किल्ले, तर पूर्व भारतात बौद्ध वारसा मोठ्या प्रमाणावर आढळतो. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटन संपूर्ण भारतभर पसरलेले आहे. भारतातील स्थापत्यकला ही देशाच्या सांस्कृतिक विविधतेचे जिवंत प्रतिबिंब आहे. विविध राजवंश, धर्म आणि भौगोलिक परिस्थितीनुसार स्थापत्यशैली विकसित झाल्या असून त्या आज ऐतिहासिक पर्यटनाची प्रमुख आकर्षणे बनल्या आहेत. दक्षिण भारतात द्रविड स्थापत्यशैली विकसित झाली. या शैलीचे वैशिष्ट्य म्हणजे उंच गोपुरे (प्रवेशद्वार), विशाल प्रांगणे, दगडी स्तंभ आणि तपशीलवार शिल्पकला. मीनाक्षी मंदिर (मदुराई), बृहदेश्वर मंदिर (तंजावर), रंगनाथस्वामी मंदिर ही द्रविड स्थापत्याची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. ही मंदिरे केवळ धार्मिक केंद्रे नसून सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचीही केंद्रे होती. पश्चिम भारतात राजपूत आणि मराठा स्थापत्य परंपरा अधिक आढळतात. राजस्थानमध्ये मजबूत किल्ले, राजवाडे आणि हवेल्या आढळतात, जसे की चितोडगड, मेहरानगड, जयपूर सिटी पॅलेस. महाराष्ट्रात डोंगरकिल्ले, तटबंदी आणि पाण्याच्या व्यवस्था असलेले किल्ले आढळतात, जसे रायगड, प्रतापगड, सिंहगड. ही स्थापत्ये संरक्षण, प्रशासन आणि स्थानिक भूगोलाशी सुसंगत नियोजन यांचे उदाहरण आहेत. या विविध स्थापत्यशैली भारताच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैविध्याचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे स्थापत्य पर्यटन हे भारताच्या पर्यटनाचे एक महत्त्वाचे अंग बनले आहे.

**ऐतिहासिक पर्यटनाचे महत्त्व**

**शैक्षणिक महत्त्व**

ऐतिहासिक पर्यटनाचे शैक्षणिक महत्त्व अत्यंत व्यापक आणि बहुआयामी आहे. ऐतिहासिक स्थळे ही केवळ भूतकाळाची अवशेष नसून ती जिवंत शिक्षणकेंद्रे आहेत. पुस्तके आणि वर्गखोल्यांमध्ये शिकवला जाणारा इतिहास या स्थळांवर प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून समजतो. ऐतिहासिक स्थळांना भेट दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणशक्ती, विश्लेषण क्षमता आणि चिकित्सक विचार करण्याची वृत्ती विकसित होते. उदाहरणार्थ, एखाद्या किल्ल्याची तटबंदी, प्रवेशद्वार आणि पाण्याची व्यवस्था पाहून त्या काळातील संरक्षणतंत्र आणि नियोजन समजते. लेणी, मंदिरे किंवा स्मारके पाहताना स्थापत्यशैली, कलात्मक अभिव्यक्ती आणि धार्मिक प्रतीक यांचा अभ्यास करता येतो. त्यामुळे इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, कला आणि पर्यावरण अभ्यास यांचा परस्परसंबंध विद्यार्थ्यांना समजतो. आज डिजिटल गाईड, ऑडिओ टूर आणि माहिती फलक यांच्या साहाय्याने ऐतिहासिक स्थळे अधिक माहितीपूर्ण बनली आहेत. त्यामुळे स्व-अध्ययनाची संधी मिळते आणि शिक्षण अधिक आकर्षक होते. म्हणूनच ऐतिहासिक पर्यटन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते अनुभवाधारित शिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे, जे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, जाणीव आणि जबाबदारीची भावना विकसित करते.

**सांस्कृतिक महत्त्व**

ऐतिहासिक पर्यटनाचे सांस्कृतिक महत्त्व अत्यंत खोल आणि व्यापक आहे. ऐतिहासिक स्थळे ही एखाद्या समाजाची सांस्कृतिक ओळख जपणारी स्मृतिचिन्हे असतात. त्यामधून त्या समाजाच्या परंपरा, श्रद्धा, जीवनपद्धती, कला आणि मूल्यव्यवस्था यांचे प्रतिबिंब दिसून येते. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटन हे केवळ भूतकाळ पाहण्याचे साधन नसून संस्कृती समजून घेण्याचे माध्यम आहे.

भारतातील ऐतिहासिक स्थळे विविध धर्म, भाषा आणि परंपरांचे प्रतिनिधित्व करतात. मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे, स्तूप आणि लेणी ही धार्मिक सहअस्तित्वाची साक्ष देतात. त्यामुळे या स्थळांना भेट देताना पर्यटकांना भारताच्या "विविधतेतील एकता" या संकल्पनेचा अनुभव येतो. हे अनुभव सामाजिक सलोखा आणि सहिष्णुता वाढवण्यास मदत करतात. ऐतिहासिक पर्यटनामुळे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पिढ्यान्पिढ्यांचा सांस्कृतिक संवाद घडतो. वृद्ध लोकांकडून कथा, परंपरा आणि आठवणी तरुण पिढीकडे हस्तांतरित होतात. यामुळे सांस्कृतिक सातत्य टिकून राहते. म्हणूनच ऐतिहासिक पर्यटन हे सांस्कृतिक जतनाचे प्रभावी साधन आहे. ते लोकांमध्ये आपल्या वारशाबद्दल अभिमान निर्माण करते आणि त्या वारशाचे संरक्षण करण्याची जबाबदारीची भावना जागवते.

**आर्थिक महत्त्व**

ऐतिहासिक पर्यटनाचे आर्थिक महत्त्व अत्यंत लक्षणीय आहे. पर्यटन उद्योग हा सेवा क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक असून तो राष्ट्रीय उत्पन्नात, रोजगारनिर्मितीत आणि प्रादेशिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतो. पर्यटकांच्या आगमनामुळे हॉटेल, लॉजिंग, रेस्टॉरंट, वाहतूक सेवा, मार्गदर्शक सेवा, हस्तकला विक्री, स्मृतिचिन्हे आणि स्थानिक बाजारपेठ यांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळते. ऐतिहासिक पर्यटनामुळे परकीय चलनही मिळते. परदेशी पर्यटक भारतीय इतिहास, स्थापत्य आणि संस्कृती अनुभवण्यासाठी भारतात येतात, ज्यामुळे देशाच्या परकीय चलन साठ्यात भर पडते. यामुळे देशाच्या आर्थिक स्थैर्याला हातभार लागतो.

**राष्ट्रीय अस्मिता**

ऐतिहासिक पर्यटन हे राष्ट्रीय अस्मिता निर्माण करण्याचे आणि ती बळकट करण्याचे प्रभावी माध्यम आहे. ऐतिहासिक स्थळे ही राष्ट्राच्या सामूहिक स्मृतीची प्रतीके असतात. त्यामधून देशाच्या संघर्षांची, यशांची, बलिदानांची आणि सांस्कृतिक प्रवासाची कथा समोर येते. त्यामुळे नागरिकांमध्ये आपल्या राष्ट्राबद्दल अभिमान आणि आपुलकी निर्माण होते. किल्ले, युद्धस्थळे, स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित स्मारके आणि प्राचीन शहरे ही स्थळे देशाच्या इतिहासातील निर्णायक क्षणांची साक्ष देतात. रायगड, चितोडगड, इंडिया गेट, जलियांवाला बाग यांसारखी स्थळे पाहताना केवळ भूतकाळ आठवत नाही तर राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया समजते. यामुळे तरुण पिढीमध्ये देशाबद्दल जबाबदारीची भावना निर्माण होते. राष्ट्रीय अस्मिता ही केवळ भावनिक संकल्पना नसून ती नागरिकांना एकत्र बांधणारी शक्ती आहे. विविध भाषा, धर्म आणि संस्कृती असलेल्या भारतासारख्या देशात ऐतिहासिक स्थळे ही सामायिक ओळखीची केंद्रे ठरतात. ती "आपण सर्व एकाच इतिहासाचे वारसदार आहोत" ही भावना बळकट करतात.

**वारसा संवर्धनाची गरज**

ऐतिहासिक स्थळे ही राष्ट्राची सांस्कृतिक संपत्ती असतात. ती केवळ भूतकाळाची आठवण नसून वर्तमान आणि भविष्याला जोडणारे दुवे आहेत. मात्र नैसर्गिक झीज, हवामान बदल, प्रदूषण, अति पर्यटन आणि मानवी निष्काळजीपणा यांमुळे या स्थळांना गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वारसा संवर्धनाची गरज आज अत्यंत तीव्रतेने जाणवते. वारसा संवर्धनामुळे भावी पिढ्यांना इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळते. हे शिक्षण, संशोधन आणि सांस्कृतिक जाणीव यासाठी आवश्यक आहे. याशिवाय संवर्धन केल्यामुळे पर्यटनाचा दर्जाही टिकून राहतो आणि दीर्घकालीन आर्थिक लाभ मिळतो.

**सरकार व संस्थांची भूमिका**

ऐतिहासिक वारशाचे संरक्षण, संवर्धन आणि विकास यामध्ये सरकार व विविध संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ऐतिहासिक स्थळे ही राष्ट्राची मालमत्ता असल्यामुळे त्यांचे जतन करणे ही मुख्यतः शासनाची जबाबदारी आहे. भारत सरकारच्या अधिपत्याखालील भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) ही संस्था ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण, संशोधन आणि देखभाल करते. ती स्थळांची नोंद, दुरुस्ती, वैज्ञानिक संवर्धन आणि कायदेशीर संरक्षण यांचे कार्य करते.

राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था रस्ते, वाहतूक, पाणीपुरवठा, सुरक्षा आणि स्थानिक रोजगार यामध्ये भूमिका बजावतात. स्थानिक समुदायांचा सहभाग संवर्धनासाठी अत्यंत आवश्यक आहे, कारण तेच त्या वारशाचे प्रत्यक्ष रक्षक असतात.

**निष्कर्ष (Conclusion)**

भारतीय पर्यटनातील ऐतिहासिक स्थळे ही केवळ भूतकाळाची आठवण नसून ती राष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि बौद्धिक जीवनाची मूलभूत आधारस्तंभ आहेत. या स्थळांमधून भारताच्या विविधतेतील एकतेचे दर्शन घडते आणि देशाच्या ऐतिहासिक प्रवासाची जाणीव होते. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटन हे केवळ करमणुकीचे साधन नसून ते शिक्षण, संस्कृती आणि राष्ट्रीय अस्मिता निर्माण करणारे माध्यम आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की ऐतिहासिक स्थळांचे शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राष्ट्रीय महत्त्व अत्यंत व्यापक आहे. ती विद्यार्थ्यांसाठी जिवंत वर्गखोल्या आहेत, स्थानिक समाजासाठी उपजीविकेची साधने आहेत आणि राष्ट्रासाठी सांस्कृतिक ओळखीची केंद्रे आहेत. त्यामुळे त्यांचे जतन आणि योग्य वापर करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. तथापि, अति पर्यटन, प्रदूषण, हवामान बदल आणि मानवी निष्काळजीपणा यांमुळे या स्थळांवर वाढता ताण निर्माण झाला आहे. जर वेळेवर संवर्धन झाले नाही तर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

काही वारसा कायमचा नष्ट होण्याचा धोका आहे. त्यामुळे शाश्वत आणि जबाबदार पर्यटन धोरणांची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे.

भारतीय पर्यटनातील ऐतिहासिक स्थळे ही देशाच्या सांस्कृतिक संपत्तीचे अमूल्य भांडार आहेत. योग्य नियोजन, संवर्धन आणि लोकसहभाग यांच्या साहाय्याने पर्यटन विकास आणि सांस्कृतिक जतन यांचा समतोल साधता येईल. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटन हे आर्थिक लाभासोबत सांस्कृतिक जबाबदारीचेही क्षेत्र आहे.

**संदर्भ (References)**

1. भारत सरकार, पर्यटन मंत्रालय – India Tourism Statistics at a Glance.
2. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) – वार्षिक अहवाल.
3. UNESCO World Heritage Centre – India Reports.
4. शर्मा, आर. एस. – भारतीय इतिहासाचा अभ्यास.
5. भाटिया, ए. के. – Tourism Development: Principles and Practices
6. Chhabra, D. – Sustainable Tourism and Cultural Heritage.
7. Singh, S. – Tourism in India: Policy and Development.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# जागतिक क्रीडा पर्यटनाची आर्थिक वाढ,आर्थिक परिणाम आणि रोजगाराच्या संधी : भारताची भूमिका(२०१३-२०२३)

**डॉ. संतोष बाबुराव कोकिळ[1], डॉ. खाजा अब्दुल खदीर[2]**
[1]क्रीडा संचालक, क्रीडा विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
[2]संहाय्यक प्राध्यापक, शारीरिक शिक्षण विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180126
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 101-105
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*२०१३ ते २०२३ हा दशक जागतिक क्रीडा पर्यटनासाठी एक परिवर्तनाचा काळ होता, ज्यामध्ये क्रीडा, प्रवास आणि वाणिज्य यांच्या वाढत्या अभिसरणामुळे वेगाने आर्थिक वाढ झाली. हे पेपर एक्सप्लोर करतो विकसित होत आहे च्या लँडस्केप खेळ पर्यटन द्वारे तपासणी करणे की जागतिक ट्रेंड, गुंतवणुकीचे नमुने आणि आर्थिक परिणाम ज्यांनी या क्षेत्राच्या मजबूत विस्ताराला हातभार लावला आहे - २०२३ पर्यंत ६०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. मेगा-स्पोर्टिंग इव्हेंट्स, वेलनेस आणि साहसी प्रवास आणि डिजिटल सहभागासह या क्षेत्राच्या व्याप्तीची पुनर्परिभाषा करून, क्रीडा पर्यटन हे राष्ट्रीय आणि प्रादेशिक विकासाचा एक धोरणात्मक घटक बनले आहे. भारताच्या उदयोन्मुख भूमिकेवर लक्ष केंद्रित करून, हे पेपर सरकारी उपक्रम, पायाभूत सुविधा विकास, आणि उदय च्या देशांतर्गत खेळ लीग स्थान दिले आहे देश वाढत्या प्रमाणात गंतव्यस्थान साठी येणारे आणि जाणारे क्रीडा पर्यटक. दुय्यम डेटा विश्लेषण, केस स्टडीज आणि आंतरराष्ट्रीय बेंचमार्कच्या मिश्रणाद्वारे, हा अभ्यास क्रीडा पर्यटनाचे आर्थिक परिणाम आणि या उच्च-वाढीच्या उद्योगात जागतिक खेळाडू बनण्याच्या भारताच्या क्षमतेचे मूल्यांकन करतो. हे निष्कर्ष धोरणकर्ते, गुंतवणूकदार आणि पर्यटन व्यावसायिकांना अंतर्दृष्टी प्रदान करतात जे क्रीडा पर्यटनाच्या सामाजिक-आर्थिक फायद्यांचा फायदा घेण्याचे उद्दिष्ट ठेवतात. या विकसित होत असलेल्या क्षेत्राला.*

***कीवर्ड:*** *भारत क्रीडा पर्यटन, आर्थिक परिणाम, आर्थिक वाढ, मेगा क्रीडा स्पर्धा*

**प्रस्तावना:**

गेल्या दशकात, क्रीडा पर्यटन हे जागतिक प्रवास आणि पर्यटन उद्योगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. क्रीडाची गतिशीलता आणि पर्यटनाच्या आर्थिक क्षमतेचे मिश्रण करून, ते अब्जावधी डॉलर्सच्या उद्योगात विकसित झाले आहे ज्याने जागतिक जीडीपी, रोजगार आणि पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. २०१३ ते २०२३ दरम्यानजगाने देशांतर्गत , .आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढ पाहिली प्रवास प्रेरित द्वारे क्रीडा विविध प्रकारच्या घटना मेगा-इव्हेंट्समधून ऑलिंपिक, फिफा वर्ल्ड कप आणि फॉर्म्युला १ ग्रांप्री सारख्या स्पर्धांपासून ते साहसी क्रीडा, फिटनेस पर्यटन आणि क्रीडा तीर्थयात्रा यासारख्या विशिष्ट उपक्रमांपर्यंत. जागतिक क्रीडा पर्यटनाचे आर्थिक स्वरूप अनेक प्रमुख ट्रेंड्सने आकारले आहे, ज्यामध्ये क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये वाढलेली गुंतवणूक, क्रीडा स्पर्धांचे व्यापारीकरण, डिजिटायझेशन आणि वेलनेस आणि साहसी पर्यटनाची वाढती लोकप्रियता यांचा समावेश आहे. UNWTO आणि Statista च्या अहवालांनुसार, २०२३ पर्यंत जागतिक क्रीडा पर्यटन बाजारपेठेचे मूल्य ६०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होते, ज्याचा अंदाज सतत वाढ दर्शवितो.

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18478410
OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. संतोष बाबुराव कोकिळ, क्रीडा संचालक, क्रीडा विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*कोकिळ, . संतोष . बाबुराव ., & खदीर, . खाजा . अब्दुल . (2026). जागतिक क्रीडा पर्यटनाची आर्थिक वाढ,आर्थिक परिणाम आणि रोजगाराच्या संधी : भारताची भूमिका(२०१३-२०२३). Journal of Research & Development, 18(1(V)), 101–105.* https://doi.org/10.5281/zenodo.18478410


Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

हा कालावधी तसेच पाहिले विविधीकरण च्या पर्यटन अर्पण आणि बळकटीकरण स्थानिक अर्थव्यवस्था रोजगार निर्मिती, आतिथ्य विकास आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीद्वारे. *खेलो इंडिया* सारख्या सरकारी समर्थित उपक्रमांसह , मेगा-स्पोर्ट्स पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि इंडियन प्रीमियर लीग )आयपीएल(, प्रो कबड्डी लीग )पीकेएल( आणि इंडियन सुपर लीग )आयएसएल( सारख्या फ्रँचायझी- आधारित लीगच्या उदयासह, भारत क्रीडा पर्यटनाच्या जागतिक नकाशावर धोरणात्मकरित्या स्वतःचे स्थान निर्माण करत आहे. शिवाय, पारंपारिक भारतीय खेळ, योग-आधारित पर्यटन आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा सहकार्य आकर्षित करत आहेत. आधुनिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध अनुभव शोधणाऱ्या येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे. या पेपरचा उद्देश २०१३ ते २०२३ पर्यंत जागतिक क्रीडा पर्यटनाच्या आर्थिक वाढीच्या मार्गाचे विश्लेषण करणे, त्यातील अंतर्निहित ट्रेंड आणि आर्थिक परिणाम ओळखणे आणि या गतिमान परिसंस्थेत भारताची विकसित होत असलेली भूमिका एक्सप्लोर करणे आहे. अनुभवजन्य डेटा, उद्योग अहवाल आणि तज्ञांच्या विश्लेषणाद्वारे, हा अभ्यास क्रीडा पर्यटन कसे कमी झाले आहे यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो. फक्त फुरसतीचा उपक्रम पण जागतिक पातळी वरील एक शक्तिशाली चालक आर्थिक एकात्मता आणि राष्ट्रीय विकास.

**महत्त्व मध्ये द जागतिक अर्थव्यवस्था**

**आलेख क्रमांक**

२०१३ ते २०२३ दरम्यान क्रीडा पर्यटनाची आर्थिक वाढ जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक म्हणून त्याचे वाढते महत्त्व




दर्शवते. प्रवास आणि पर्यटन उद्योगातील सर्वात गतिमान विभागांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे, क्रीडा पर्यटनाने अनेक देशांमध्ये केवळ जीडीपी वाढीला हातभार लावला नाही तर गुंतवणूक, रोजगार आणि शहरी विकासासाठी एक शक्तिशाली उत्प्रेरक देखील बनले आहे. UNWTO आणि स्टॅटिस्टिकनुसार, जागतिक पर्यटन खर्चात क्रीडा पर्यटनाचा वाटा अंदाजे १०होता % २०२३ मध्ये, ६०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम . ऑलिंपिक खेळ, फिफा विश्वचषक आणि फॉर्म्युला १ सर्किट्स सारख्या मेगा-इव्हेंट्सनी स्थानिक आदरातिथ्याला चालना देऊन आर्थिक उत्तेजक म्हणून काम केले आहे. क्षेत्रे, निर्मिती हजारो च्या थेट आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या, आणि प्रोत्साहन देणारा पायाभूत सुविधांशी संबंधित अपग्रेड, अनेकदा यजमान शहरांचे दीर्घकालीन पर्यटन आणि व्यवसाय केंद्रांमध्ये रूपांतर करणे. त्याच्या समष्टिगत आर्थिक परिणामाव्यतिरिक्त, क्रीडा पर्यटनाने पर्यटन पोर्टफोलिओमध्ये विविधता आणण्यात, ऑफ-सीझन प्रवासाला प्रोत्साहन देण्यात आणि ग्रामीण किंवा अविकसित भागात साहसी खेळ, वेलनेस रिट्रीट आणि स्थानिक क्रीडा महोत्सवांद्वारे महसूल निर्माण करणे. क्रीडा आणि डिजिटल माध्यमांच्या एकत्रीकरणामुळे जागतिक सहभाग आणखी वाढला आहे, प्रसारण हक्क, प्रायोजकत्व, तिकीट विक्री, व्यापार आणि अनुभवात्मक प्रवास याद्वारे महसूलाचे स्रोत खुले झाले आहेत. कतार, जपान आणि ब्राझील सारख्या देशांनी राष्ट्रीय ब्रँडिंग आणि परदेशी गुंतवणुकीसाठी क्रीडा पर्यटनाचा धोरणात्मक वापर केला आहे, ते त्यांच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या अजेंड्यात समाविष्ट केले आहे. या काळात ई-स्पोर्ट्स पर्यटन आणि फिटनेस-आधारित प्रवास यासारख्या नवीन स्थळांचा आणि स्वरूपांचा उदय झाला ज्यामुळे जागतिक आर्थिक मॅट्रिक्समध्ये आणखी मूल्य वाढले.

थोडक्यात, या दशकात जागतिक क्रीडा पर्यटनाची आर्थिक वाढ सर्वसमावेशक वाढ, सीमापार सहकार्याला चालना आणि लवचिक, शाश्वत आर्थिक परिसंस्था निर्माण करण्यात त्याचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित करते.

टेबल १ - महसूल च्या जागतिक क्रीडा पर्यटन द्वारे प्रदेश (२०१३) विरुद्ध (२०२३)

| **प्रदेश** | **२०१३ महसूल )अब्ज अमेरिकन डॉलर्स(** | **२०२३ महसूल )अब्ज अमेरिकन डॉलर्स(** |
|---|---|---|
| उत्तर अमेरिका | १२० | १६० |
| युरोप | ११० | १८० |
| आशिया-पॅसिफिक | ८० | १५० |
| लॅटिन अमेरिका | ३५ | ७० |
| मध्य पूर्व | २० | ४० |

- **उत्तर अमेरिका** : महसूल वाढले पासून $१२० अब्जावधी मध्ये २०१३ ते १६० अब्ज डॉलर्स २०२३ मध्ये .
- **युरोप** : महसूल वाढले $११० पासून अब्जावधी मध्ये २०१३ ते $१८० अब्जावधी मध्ये २०२३.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- **आशिया-पॅसिफिक** : वाढले $८० पासून अब्जावधी मध्ये २०१३ ते $१५० अब्जावधी २०२३ मध्ये .
- **लॅटिन अमेरिका** : महसूल वाढला पासून $३५ अब्जावधी मध्ये २०१३ ते $७० अब्जावधी २०२३ मध्ये .
- **मध्य पूर्व** : वाढले २० डॉलर पासून अब्जावधी मध्ये २०१३ ते $४० अब्जावधी मध्ये २०२३.

**की घटक साठी जीडीपी योगदान:**

- **पर्यटन महसूल** : क्रीडा पर्यटक हे समाविष्ट आहे पैसे खर्च केला द्वारे चालू राहण्याची सोय, प्रवास, अन्न, आणि स्मृतिचिन्हे.
- **क्रीडा पायाभूत सुविधा** : गुंतवणूक मध्ये खेळ ठिकाणे आणि सुविधा ते आकर्षित करणे आंतरराष्ट्रीय कार्यक्रम.
- **मीडिया आणि प्रायोजकत्व करार** : आंतरराष्ट्रीय मीडिया हक्क आणि प्रायोजकत्व करार क्रीडा पर्यटनाच्या आर्थिक योगदानाला चालना देतात.
- **वारसा कार्यक्रम** : मोठ्या प्रमाणात ऑलिंपिक किंवा विश्वकप तयार करतात दीर्घकालीन पर्यटन, पायाभूत सुविधा विकास आणि आंतरराष्ट्रीय ब्रँडिंगद्वारे आर्थिक परिणाम.

क्रीडा पर्यटन हे अनेक प्रदेशांमध्ये आर्थिक वाढीचा एक महत्त्वाचा चालक आहे, देशानुसार आणि कार्यक्रमांच्या प्रमाणात जीडीपीमध्ये त्याचे योगदान बदलते. अमेरिका, युके, फ्रान्स आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशांमध्ये सुस्थापित क्रीडा पर्यटन उद्योग आहेत, तर कतार आणि दुबई सारख्या उदयोन्मुख बाजारपेठा प्रमुख ठिकाणे बनण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत.

भारताचे भूमिका मध्ये ग्लोबल स्पोर्ट्स पर्यटन

**1. उदयोन्मुख क्रीडा हब्स**

प्रादेशिक केंद्रांच्या उदयामुळे भारत वेगाने एक प्रमुख जागतिक क्रीडा पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत आहे

- **गुजरात** – नरेंद्र मोदी स्टेडियम )मोटेरा(, जगाचे सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम, हाय-प्रोफाइल आंतरराष्ट्रीय सामने यजमान करण्याकारीसाठी.
- **ओडिशा** – भारताचे हॉकी भांडवल, घर ते द एफआयएच हॉकी जग कप आणि राज्य-समर्थित तळागाळातील उपक्रम.
- **गोवा** - इंडियन सुपर लीग (ISL) द्वारे फुटबॉल पर्यटनासाठी लोकप्रिय, आकर्षित करणारे देशभरातील चाहते .
- **चेन्नई** - मोटारस्पोर्ट्समधील इतिहासासह, ज्यामध्ये फॉर्म्युला रेसिंगचे आयोजन समाविष्ट आहे , ते एक महत्त्वाचे स्थान आहे. ऑटो-स्पोर्ट इव्हेंटसाठी शहर.
- **हिमाचल प्रदेश )एचपी(** – उदयोन्मुख खेळ व क्रिकेट आणि साहसी खेळ पर्यटन, सह स्टेडियम धर्मशाळेतील चित्तथरारक दृश्ये.

**2.** मेगा क्रीडा कार्यक्रम आयोजनाचे यजमानपद

भारत हे सध्यस्थित एक विश्वासू यजमान साठी जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा जगतात वर चष्मा:

- **२०२३ आयसीसी पुरुषांचे क्रिकेट विश्व कप** – मजबूत केले भारताचे ब्रँड म्हणून अ क्रिकेट खेळणे आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांना आणि माध्यमांना आकर्षित करणारे पॉवरहाऊस.
- **एफआयएच हॉकी विश्व कप** )ओडिशा, )२०२३( – वाढवलेले पर्यटन आणि पायाभूत सुविधा मध्ये पूर्वेकडील भारत.
- **खेलो इंडिया तरुणाई खेळ** – युवा प्रतिभा आणि पालनपोषण करते घरगुती खेळ पर्यटन, दरवर्षी हजारो खेळाडू प्रोत्साहन देणे आणि आकर्षित करतात

**3. घरगुती लीग ड्रायव्हिंग पर्यटन**

भारताचे घरगुती खेळ लीग लक्षणीय योगदान ते आंतरराज्यीय पर्यटन आणि स्टेडियम उपस्थिती:

- **भारतीय प्रीमियर लीग )आयपीएल(** – अ जागतिक क्रिकेट खेळणे कार्यक्रम ते ड्राइव्हस् प्रवास ओलांडून यजमान शहरे.
- **प्रो कबड्डी लीग** – मध्ये स्वदेशी खेळ, योगदान देणे ते प्रादेशिक पर्यटन टियर-२ आणि टियर.शहरांमध्ये ३-
- **इंडियन सुपर लीग (ISL)** - फुटबॉल-आधारित पर्यटनाला चालना मिळाली, विशेषतः गोवा, केरळ आणि ईशान्य भारतात.

**4. सरकार पुढाकार नव चैतन्य भरणे वाढ**

भारतीय सरकार आहे सक्रियपणे समर्थित खेळ पर्यटन माध्यमातून राष्ट्रीय मोहिमा आणि पायाभूत सुविधा:

- **"देखो" अपना देश"** – ओळखले खेळ म्हणून अ की पर्यटन व्याज, प्रोत्साहन देणारा प्रवास बांधलेले क्रीडा स्पर्धांना.
- **खेलो भारत मिशन** – अपग्रेड स्थानिक खेळ सुविधा आणि स्टेडियम, तयार करणे प्रादेशिक खेळ केंद्रे.
- **फिट भारत हालचाल** – प्रोत्साहन देते सक्रिय जीवनशैली आणि सार्वजनिक प्रतिबद्धता सह फिटनेस आणि खेळ.

भारताचे आंतरराष्ट्रीय क्रीडा कार्यक्रम आणि त्यांचे अंदाजे पर्यटन महसूल पर्यटन-आधारित आर्थिक क्रियाकलापांना चालना देतात , ज्यामुळे अनेक हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते

- प्रवास आणि राहण्याची सोय
- कार्यक्रम पायाभूत सुविधा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- अन्न, किरकोळ, आणि व्यापार
- स्थानिक रोजगार आणि सेवा

**एकत्रित अंदाजे पर्यटन महसूल )निवडलेले कार्यक्रम(**

| कार्यक्रम | अंदाजे पर्यटन महसूल |
|---|---|
| आयसीसी क्रिकेट विश्व कप २०२३ | ₹२,५०० - ₹४,००० कोटी |
| आयपीएल (वार्षिक) | ₹१,७५० – ₹२,७०० कोटी |
| एफआयएच हॉकी २०२३ | ₹५०० - ₹८०० कोटी |
| राष्ट्रकुल खेळ २०१० | ₹४,५०० - ₹५,००० कोटी |
| खेलो भारत खेळ | ₹१५० - ₹३०० कोटी |
| मोटोजीपी भारत | ₹३०० - ₹५०० कोटी |
| फिफा १७ वर्षांखालील विश्व कप | ₹४०० - ₹६०० कोटी |
| एकूण (संचयी कार्यक्रम) | ₹१०,००० – ₹१४,९००+ कोटी |

**निष्कर्ष**

जागतिक क्रीडा पर्यटन क्षेत्रात गतिमान वाढ झाली आहे, जी अब्जावधी डॉलर्सच्या उद्योगात विकसित होत आहे. मिसळते आवड, मनोरंजन, आणि आर्थिक संधी. सह अ प्रवाह मूल्यांकन अंदाजे दरम्यान $७००-७५० अब्ज डॉलर्सच्या या गुंतवणूकीमुळे, क्रीडा पर्यटन आता प्रवास, आदरातिथ्य, पायाभूत सुविधा विकास आणि रोजगार निर्मितीद्वारे यजमान राष्ट्रांच्या जीडीपीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देते. फिफा विश्वचषक, ऑलिंपिक आणि इंग्लिश प्रीमियर लीग आणि फॉर्म्युला वन सारख्या आंतरराष्ट्रीय लीग सारख्या कार्यक्रमांमुळे पर्यटनातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळत राहतो, जो विकासासाठी उत्प्रेरक म्हणून खेळाची आर्थिक शक्ती दर्शवितो.

या जागतिक परिदृश्यात, भारत एक आशादायक क्रीडा पर्यटन स्थळ म्हणून उदयास येत आहे , ज्याला आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक, आयपीएल आणि खेलो इंडिया आणि फिट इंडिया चळवळीसारख्या सरकार-समर्थित उपक्रमांमुळे चालना मिळत आहे . जागतिक क्रीडा पर्यटन महसुलात भारताचा सध्याचा वाटा ०.५% इतका माफक राहिला आहे, तरी देशाचा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश, क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक आणि २०३६ च्या ऑलिंपिकसारख्या जागतिक कार्यक्रमांसाठी धोरणात्मक बोली हे प्रचंड अप्रयुक्त क्षमतेचे संकेत आहेत.

या गतीचा पूर्णपणे फायदा घेण्यासाठी, धोरणात्मक हस्तक्षेप आणि खाजगी क्षेत्राचे सहकार्य अत्यावश्यक आहे:

धोरणात्मक पातळीवर, भारताने राष्ट्रीय क्रीडा पर्यटन धोरण तयार केले पाहिजे, एकात्मिक क्रीडा-पर्यटन क्षेत्रे, आणि क्रीडा चाहते आणि खेळाडूंसाठी व्हिसा आणि प्रवास प्रक्रिया सुलभ करणे.

- गुंतवणूक मध्ये हुशार पायाभूत सुविधा, डिजिटल तिकीट काढणे, आणि एआय-आधारित पंखा अनुभव पाहिजे गती वाढवा.
- त्याचबरोबर, खाजगी क्षेत्राने आभासी आणि जमिनीवरील सहभाग वाढविण्यासाठी आतिथ्य भागीदारी निर्माण करण्यासाठी, चाहत्यांसाठी प्रवास पॅकेजेस विकसित करण्यासाठी आणि क्रीडा-तंत्रज्ञान स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

थोडक्यात, क्रिकेट-केंद्रित पर्यटन मॉडेलपासून वैविध्यपूर्ण जागतिक क्रीडा पर्यटन केंद्रापर्यंतचा भारताचा प्रवास व्यवहार्य आणि आशादायक आहे. धोरणात्मक रोडमॅप, सुसंगत प्रशासन आणि नवोन्मेष-चालित अंमलबजावणीसह, भारत लक्षणीयरीत्या मध्ये जागतिक आर्थिक पाऊलखुणा वाढवणे खेळ पर्यटनाला चालना देताना, एक चैतन्यशील आणि समावेशक क्रीडा राष्ट्र म्हणून आंतरराष्ट्रीय प्रतिमा मजबूत करत आहे.

**संदर्भ:**

1. UNWTO. (२०२०). मार्गदर्शक तत्त्वे साठी क्रीडा विकास पर्यटन. संयुक्त राष्ट्रे जग पर्यटन संघटना.

2. मित्र राष्ट्र बाजार संशोधन. (२०२३). जागतिक क्रीडा पर्यटन बाजार अंदाज, २०२१-२०३०.

3. फिक्की आणि टर्फ स्पोर्ट्स. (२०१९). भारतातील क्रीडा विकास: अंतर भरून काढणे. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री.

4. पर्यटन मंत्रालय, भारत सरकार. (२०२२). वार्षिक अहवाल २०२१-२२. https://tourism.gov.in वरून घेतले.

5. भारत सरकारचे वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय. (२०२३). भारतीय क्रीडा वस्तू क्षेत्राची निर्यात कामगिरी. https://commerce.gov.in वरून घेतले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

6. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय). (२०२३). वार्षिक आर्थिक आणि ऑपरेशन्स अहवाल. https://www.bcci.tv वरून घेतले.
7. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (ICC). (२०२३). ICC कार्यक्रमांवरील आर्थिक परिणाम अहवाल. https://www.icc-cricket.com वरून घेतले.
8. भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI). (२०२३). खेलो इंडिया आणि फिट इंडिया उपक्रम. https://sportsauthorityofindia.gov.in वरून घेतले. https://sportsauthorityofindia.nic.in/sai_new/annual-reports
9. मेरठ स्पोर्ट्स गुड्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन. (२०२२). स्पोर्ट्स गुड्स निर्यात कामगिरीवरील वार्षिक अहवाल.
10. भारतीय आर्थिक सर्वेक्षण (IES). (२०२३). पर्यटन आणि आर्थिक विकासावरील प्रकरण. अर्थ मंत्रालय, भारत सरकार. https://www.indiabudget.gov.in वरून घेतले.
11. मेरठ जिल्हा प्रशासन. (२०२२). मेरठ हे जागतिक क्रीडा वस्तूंचे केंद्र म्हणून. https://meerut.nic.in वरून घेतले.
12. एसपीएए इंडिया. कॉपी उजवीकडे भारत सरकारकडून क्रीडा व्यवस्थापन शिक्षण आणि बी.टेक क्रीडा तंत्रज्ञानातील बीबीए आणि एमबीए पदवीचे मालक. क्रीडा अकादमी. असोसिएशन ऑफ इंडिया (एसपीएए). www.spaaindia.in
13. हिघम, जे., आणि हिंच, टी. (२००९). खेळ आणि पर्यटन: जागतिकीकरण, गतिशीलता आणि ओळख.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे

**डॉ. संजीवनी चंद्रशेखर बारहाते**
इतिहास विभाग प्रमुख, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180127
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 106-112
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*प्राचीन काळापासून पर्यटन हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग राहिले असून आज ते एक महत्त्वपूर्ण सेवा उद्योग म्हणून विकसित झाले आहे. भारत हा समृद्ध इतिहास, संस्कृती व स्थापत्य परंपरेने नटलेला देश असून येथे विविध कालखंडातील असंख्य ऐतिहासिक पर्यटन स्थळे आढळतात. ताजमहाल, बीबी का मकबरा, गोलघुमट, अजिंठा-वेरूळ लेणी, आगाखान पॅलेस, कुतुबमिनार, हंपी इत्यादी स्थळे भारतीय वास्तुकला, कला व ऐतिहासिक परंपरेचे प्रतीक आहेत. ही स्थळे मुघल, चालुक्य, राष्ट्रकूट, आदिलशाही, बौद्ध व हिंदू संस्कृतीचे दर्शन घडवितात तसेच देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करतात. ऐतिहासिक पर्यटनामुळे सांस्कृतिक जतन, राष्ट्रीय ओळख दृढीकरण, रोजगारनिर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळते. मात्र, विकासाच्या प्रक्रियेत ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. युनेस्कोच्या माध्यमातून जागतिक वारसा स्थळांचे संरक्षण व संवर्धनाचे कार्य सुरू असून भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे पर्यटन उद्योगाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरतात.*

***मुख्यशब्द:*** *ऐतिहासिक पर्यटन, भारतीय वारसा स्थळे, स्थापत्यकला, सांस्कृतिक वारसा, युनेस्को जागतिक वारसा, पर्यटन उद्योग, रोजगारनिर्मिती*

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासूनच मानवाला प्रवास म्हणजेच पर्यटन करण्याची आवड निर्माण झालेली आहे. औज वाहतुकीच्या क्षेत्रात फार मोठी प्रगती झाल्यामुळे पर्यटन सुव्यवस्थित, सुलभ आणि आनंददायी झाले आहे. त्यामुळे आज जगात पर्यटनाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटनाचे स्वरूप भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक आहे. त्याची व्याप्तीही मोठी आहे. मौजमजा करणे, आनंद मिळविणे, अभ्यास व संशोधन करणे इत्यादी कारणांसाठी पर्यटन केले जाते.) पर्यटन हा एक उद्योग आहे. या उद्योगापासून सरकारला बराच फायदा मिळू शकतो. या उद्योगामुळे अनेक लोकांना रोजगार मिळतो तसेच या उद्योगावर आधारित अनेक पूरक व्यवसायही चालतात. उदा. हॉटेल, लॉज, उपाहारगृहे, पुस्तके व छायाचित्र प्रकाशन, मार्गदर्शक, बाजारपेठ, जाहिरात, प्रवास एजन्सी.प्रवास व पर्यटन हा जगातील अग्रेसर व्यवसाय असला तरी तो सेवाउद्योग आहे. भारतामध्ये अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत, ज्यात ताजमहाल, आग्रा किल्ला, लाल किल्ला, कुतुबमिनार, अजिंठा-वेरूळ लेणी, हंपी, जयपूरचे जंतरमंतर, आणि अमरनाथ गुहा यांसारख्या जगप्रसिद्ध वास्तूंचा समावेश होतो, ज्या भारतीय इतिहास, संस्कृती आणि वास्तुकलेची समृद्ध परंपरा दर्शवतात ही स्थळे विविध राज्यांमध्ये पसरलेली असून, मुघल, राजपूत, बौद्ध आणि हिंदू संस्कृतीचे दर्शन घडवतात.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*
Quick Response Code:

**Address for correspondence:**
*डॉ. संजीवनी चंद्रशेखर बारहाते, इतिहास विभाग प्रमुख, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*बारहाते, . संजीवनी . चंद्रशेखर. (2026). भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे. Journal of Research & Development, 18(1(V)), 106–112.* https://doi.org/10.5281/zenodo.18478464

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18478464
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

या ऐतिहासिक ठिकाणापैकी काही निवडक स्थळे पुढील प्रमाणे

**१, ताजमहाल-**

मोगल सम्राट शहाजहानने आगरा येथे यमुना नदीच्या काठावर बांधलेला ब्याजमहाल प्रसिद्ध असून तो जगात असलेल्या नऊ आश्चर्यांपैकी एक आहे. मोगल चे सम्राट शहाजहानने आपली बेगम अरजूमद बानू ऊर्फ मुमताजमहल हिच्या कबरीवर तिच्या स्मरणार्थ उत्तर भारतात यमुना नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या आगरा येथे एक भव्य वास्तू बांधली. हीच वास्तू 'ताजमहाल' या नावाने प्रसिद्ध आहे.

**१. मुमताजमहलचे स्मारक**

शहाजहानला बेगम आरजूमंद बानू ऊर्फ मुमताजमहल नावाची पत्नी होती. तिने ७ झाल्यामुळे ती लगेच मरण पावली. शहाजहानने आगरा येथे यमुना नदीच्या काठी मुमताजच्या जून १६३१ रोजी एका मुलीला जन्म दिला. बाळंतपणामुळे झालेला त्रास सहन न मतदेहाचे दफन एका रिकाम्या जागेत केले होते. ही जागा राजा मानसिंग यांच्या मालकीची होती. शहाजहानने मानसिंग राजा नातू जयसिंग यांच्याकडून ती अगदी कमी किमतीत विकत घेतली आणि त्याच जागेवर एक कबर बांधली. ती कबर म्हणजेच ताजमहाल ही वास्तू होय. थोडक्यात, ताजमहाल ही मुमताजमहलच्या स्मरणार्थ बांधलेली वास्तू आहे.

**२. ताजमहालचे शिल्पकार व कारागीर**

ताजमहालाचे बांधकाम इ. स. १६३२ मध्ये सुरू केले. यानंतर ते २२ वर्षांनी पूर्ण झाले. म्हणजेच इ. स. १६५४मध्ये ताजमहालचे बांधकाम पूर्ण झाले. शहाजहानने या बांधकामासाठी संपूर्ण खर्च केला. ताजमहालाच्या बांधकामासाठी २० हजार मजूर सतत कार्यरत होते. यामध्ये हिंदूधर्मीय कारागीरसुद्धा होते. उस्ताद इशाखान, उस्ताद अहमद लाहोरी, मीर मकरमखान व मीर अब्दुल करीम या वास्तूविशारदांनी ताजमालची निर्मिती केली. इस्माईलखान रूमी याने घुमटाच्या बांधकामात मार्गदर्शन केले. इमानतखान सिराझीने भिंतीवरील कोरीव काम केले. उस्ताद पीरा यांनी लाकडी कोरीव काम केले तर जाटमल, बानुहर व राममल या हिंदू कारागिरांनी ताजमहालाचे नौंदर्य वाढविण्याचे काम केले.

ताजमहाल बांधण्यासाठी ३ कोटी रुपये खर्च झाल्याचे मानले जाते. तत्कालीन लेखक अब्दुल हमीद लाहोरी यांनी मात्र ताजमहालच्या बांधकामासाठी ५० लाख रुपये खर्च झाल्याचे वर्णन केले आहे. ताजमहालाचे बांधकाम पांढऱ्याशुभ्र संगमरवरी दगडांनी केले आहे. ताजमहालाच्या बांधकामासाठी लागलेले सर्व साहित्य आशियातील कंदाहार, पर्शिया, श्रीलंका व येमेन या देशांतून आणले.

**४. ताजमहालाचा आकार व स्वरूप**

ताजमहालाचे बांधकाम ५८००३०५ मीटर एवढ्या आयताकार भागात करण्यात आले आहे. या भागात सभोवती एक संरक्षक भिंत आहे. त्यामध्ये दक्षिण बाजूला लाल वालुकाश्मात एक सुंदर प्रवेशद्वार बांधलेले आहे. यमुना नदीच्या बाजूकडे उत्तरेकडील तटाला लागून कमी उंचीच्या इमारती आहेत. त्यात पश्चिमेकडे एक मस्जिद व पूर्वेला मेहमानखाना आहे. त्याचा उपयोग सभा-संमेलनांसाठी (मजलीसखाना) केला जात असे. आवाराच्या मध्यभागी १८ फूट उंचीचा व ३१३ चौरस फूट क्षेत्राचा एक चबुतरा आहे. या चबुतऱ्यावर ताजमहालची वास्तू उभी आहे. तिचे बांधकाम पांढऱ्याशुभ्र संगमरवरी दगडांनी केले आहे.

**५. ताजमहालची मुख्य वास्तू व मिनार**

संरक्षक भिंतीच्या आतील आवारात मध्यभागी १८ फूट उंचीचा व ३१३ चौरस फूट क्षेत्राचा एक चबुतरा बांधण्यात आला आहे. या चबुतऱ्यावर बांधण्यात आलेली वास्तू म्हणजेच ताजमहाल होय. हीच मुख्य वास्तू आहे. या वास्तूचे बांधकाम पांढऱ्याशुभ्र संगमरवरी दगडांनी केलेले असून, या वास्तूच्या चार कोपऱ्यांवर एक-एक यानुसार चार मिनार आहेत. या प्रत्येकी मिनारची उंची १३३ फूट असून, ते प्रमाणबद्ध व नाजूक आहेत. या मिनारमुळेच ताजमहाल अत्यंत शोभून दिसतो. मुख्य वास्तूला शोभून दिसणारे हे चारही मिनार छत्रीयुक्त आहेत. त्याच्यावर जाण्यासाठी आतून गोलाकार पायऱ्या आहेत. या चारही मिनारला बाह्य मध्यभागी एक-एक व वरच्या टोकास छत्रीखाली एक-एक सज्जे आहेत.

**ताजमहलचे सौदर्य**

ताजमहाल हा आपल्या सौंदर्यासाठी जगप्रसिद्ध आहे. त्यामध्ये नाजूकपणा व डौलदारपणा आलेला दिसतो. त्याच्या बांधकामासाठी कोरलेले साहित्य, छायाप्रकाशाचे नियंत्रण, मुक्त संकल्प व विरोधी घटकांच्या विशाल संकल्पनात त्याची प्रतिष्ठापना या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

चार घटकांमुळे ताजमहालात नाजूकपणा आणि डौलदारपणा आलेला आहे. यामुळेच दोन्ही दगडाच्या बाजूस लाल दगडाच्या इमारती व पुढे एक प्रशस्त उद्यान आहे. भोवतालची हिरवळ, फुलांचे ताटवे, कारंजी, पाण्याचे प्रवाह, कमलपुष्पांनी बहरलेले तलाव आणि त्यांच्या पाण्यात ताजमहालाचे पडलेले स्पष्ट प्रतिबिंब यामुळे ताजमहालची प्रतिमा वाढते. वृक्षांचा हिरवा रंग व ताजमहालच्या मागील सौंदर्य खुलून दिसते. तांबडा रंग या पार्श्वभूमीवर ताजमहालचे सौंदर्य खुलून दिसते. म्हणून ताजमहाल जगातील नऊ आश्चर्यांपैकी एक ठरतो.

**२. बीबी का मकबरा**

मोगल सम्राट औरंगजेब याने आपली चौथी राणी बेगम दिलरस बानो (राबिया दुर्राणी) हिची कबर औरंगाबाद येथे बांधली. राबिया दुर्राणी ही इराणची राजकन्या होती. औरंगजेबाने जेंव्हा दक्षिणेवर स्वारी केली होती त्याचवेळी राबिया दुर्राणीचा मृत्यू झाला होता. औरंगजेबाचा पुत्र (राबिया दुर्राणीचा पुत्र) राजपूत्र आजमशहा याने औरंगजेबाने बांधलेल्या कबरीवर आपल्या आईच्या स्मरणार्थ इ.स. १६७९ मध्ये मकबरा बांधला. हा मकबरा एक ऐतिहासिक वास्तू असून ती मोगल सम्राट शहाजहानने यमुना नदीच्या तीरावर आग्रा येथे मुमताजमहल हिच्या स्मरणार्थ बांधलेल्या ताजमहालची प्रतिकृती आहे. त्यामुळे या बीबी का मकबऱ्यास दक्षिणेचा ताजमहाल म्हणून ओळखले जाते. याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे पाहवयास मिळेल.

१) ठिकाण -महाराष्ट्रातील औद्योगिक शहर म्हणून व मराठवाडयाची राजधानी म्हणून ओळख असलेल्या औरंगाबाद या शहरात हा मकबरा बांधलेला आहे.

२) ताजमहालची प्रतिकृती- बीबी का मकबरा ही वास्तू सम्राट शहाजहान याने बांधलेल्या आग्रा येथील ताजमहालची प्रतिकृती आहे. त्यामुळे बीबी का मकबरा दक्षिणेचा ताजमहाल म्हणून ओळखला जातो.

३) ताजमहाल व मकबऱ्यातील फरक - आग्राचा ताजमहाल संगमरवरी दगडापासून बनविलेला आहे तर औरंगाबाद येथील हा मकबरा पांढऱ्या प्लास्टरचा बनविलेला आहे. या मकबऱ्याची भव्यता व सुंदरता आगळी वेगळीच आहे.

४) मकबऱ्याची तटबंदी- मकबऱ्याच्या सभोवती चारही बाजूस दगडाने बांधलेली उंच भिंत अर्थात तटबंदी आहे.

५) प्रवेशद्वार- तटबंदीच्या मध्यभागी एक भव्य दरवाजा आहे. ते मुख्य प्रवेशद्वार आहे. मुख्य प्रवेशद्वारापासून पाण्याने भरलेला हौद आहे. त्यामध्ये कारंजे आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूस झाडे असून दोन्ही बाजूस प्रवेशद्वारापासून मकबऱ्यापर्यंत लहान भिंत बांधलेली आहे.

६) मुख्य इमारत- मकबऱ्याची मुख्य इमारत एका मोठया ओटयावर बांधली गेली आहे. त्याचा खालचा भाग जयपूरी संगमरवरी दगडाने आणि वरचा भाग चुन्याने बनविलेला आहे. मकबऱ्याच्या आत संगमरवरी दगडापासून तयार केलेली एक गॅलरी आहे येथून कबर पाहता येते.

७) कबर (समाधी)- ओट्यावर गेल्यानंतर खालच्या भागाकडे पायऱ्या उतरून सरळ कबरीजवळ जाता येते. ही कबर (समाधी) अत्यंत साधी असून तिच्या चारही बाजूस संगमरवरी जाळया बसविलेल्या आहेत.

८) चारमिनार- मकबऱ्याचा जो भव्य ओटा आहे त्या ओटयाच्या चारही कोपऱ्यावर चार मिनार आहेत. हे चारही मिनार दोनमजली आहेत. मकबऱ्याच्या चारही बाजूंच्या भिंती तटबंदीचे काम करतात.

९) संग्रहालय- मकबऱ्याच्या पाठीमागे भारतीय पुराण वास्तू सर्वेक्षणाचे संग्रहालय आहे. या संग्रहालयात मोगल काळातील दैनंदिन वापरातील काही वस्तू ठेवलेल्या आहेत त्यामध्ये चटई, भांडे, वस्त्र व लाकडी फर्निचर या वस्तू आहेत.

१०) उद्यान- बीबी का मकबऱ्याचे उद्यान हे मोगलकालीन उद्यानापैकी एकमेवाद्वितीय आहे. उद्यानशास्त्राचा दुर्मिळ नमुना आहे. मात्र आज मकबऱ्याचे हे उद्यान सरकारी अनास्थामुळे आणि औदासिन्याचा बळी ठरले आहे.

११) मकबऱ्याचा आकार- बीबी का मकबरा आकाराने ताजमहालच्या जवळपास निम्मा असून तो ५०० यार्ड लांब व ३०० यार्ड रूंद एवढया विस्तीर्ण परिसरात मध्यभागी उभा आहे.

आग्रा येथील ताजमहालची कारागीरी अजोड आणि अतुलनीय असली तरी दख्खनच्या ताजमहाल म्हणून मान्यता पावलेल्या औरंगाबाद येथील बीबी का मकबराची निर्मितीही कौतुकास्पद मानली जाते. वास्तूशास्त्र, कलाकुसर आणि भव्यतेच्या बाबतीत ताजमहालच्या तुलनेत बीबी का मकबरा हा मात्र तो सरस आहे. ती बाब म्हणजे येथील उद्यान होय.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**३. गोलघुमट**

स्थापत्यशास्त्रातील एक अद्‌भुत चमत्कार म्हणजे कर्नाटकातील विजापूरचा गोल घुमट होय. सन १६२७ ते १६५५ या काळात महंमद आदिलशाह यांनी हा घुमट बांधला. त्यासाठी त्याकाळात त्याने इराणी इंजिनियरला बोलावून घेतले. पुढे सन १६५६ मध्ये महंमद आदिलशहाचा मृत्यू झाला तेंव्हा त्याच्या अस्थि गोलघुमटाखाली कबर बांधून त्यात ठेवण्यात आल्या. विजापूरचा सुलतान महंमद आदिलशहा याने विजापूर येथे बांधलेली गोलघुमट ही वास्तू स्मारक आहे. या वास्तूची स्थापत्य शास्त्रीय रचना खालील प्रमाणे आपणास पाहता येईल.

१) ठिकाण- कर्नाटकातील विजापूर हे एक जिल्हयाचे ठिकाण असून ते सोलापूर बागलकोट रोडवर आहे. सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर विजापूर आहे. विजापूर बस स्टॉप वरून राष्ट्रीय महामार्ग क्र. ३४ ने जाताना डाव्या बाजूला असलेल्या गोलघुमट या वास्तूपर्यंत जाण्यासाठी २० मिनीट लागतात.

२) जाण्यासाठीची सोय- विजापूरच्या गोलघुमटाला जाण्यासाठी लातूर, सोलापूर वरून मोठया प्रमाणात बसेसची सोय आहे. तसेच सोलापूर वरून विजापूरला जाण्यासाठी भारतीय रेल्वेची सोलापूर ते म्हैसूर दरम्यान चालवली जाणारी एक प्रवासी रेल्वे गाडी आहे. ही दररोज धावते. या गाडीला गोलघुमट या प्रसिध्द वास्तूवरून नाव दिले गेले आहे.

३) गोलघुमटचे क्षेत्रफळ- या वास्तूचा आराखडा चौकोनी असून त्याचे आतील क्षेत्रफळ १७०३.०५ चौ.मी. आहे. त्याच्या प्रत्येक बाजूची रूंदी वास्तूच्या घुमटासहित एकूण उंची इतकीच म्हणजे ६०.९६ मीटर आहे.

४) कबर- या गोल घुमटाचे बांधकाम इ.स. १६२७ साली महंमद आदिलशहाने सुरू केले होते आणि ते इ.स. १६५५ साली पूर्ण झाले. महंमद आदिलशहाचा मृत्यू १६५६ साली झाल्यानंतर त्याच्या अस्थि गोलघुमटाच्या तळघरात दफन करण्यात आल्या आणि त्यावर एक कबर (समाधी) बांधण्यात आली. यामुळे या गोलघुमटाला आदिलशहाची कबर (समाधी) म्हणून पण ओळखले जाते.

५) महिरप (कमानी)- विजापूर येथील गोलघुमट स्थापत्यशास्त्रीय रचनेप्रमाणे बांधण्यात आलेले दिसून येते. तसेच या वास्तूवर इराणी शैलीचा मोठा परिणाम दिसून येतो. या इमारतीला अनेक महिरप (कमानी) असलेल्या दिसून येतात. कबरीच्या पश्चिम बाजूकडील भिंतीत अर्धअष्ट कोनाकृती महिरप (कमानी) आहे. तिच्यायोगे मक्केकडे तोंड करून कुराणाचे वाचन करता येते अशी रचना या कमानीची आहे.

६) मिनार- या वास्तूच्या चारही कोपऱ्यांवर असलेल्या मिनारास आठ मजले आहेत. मिनाऱ्याच्या प्रत्येक मजल्याला दरवाजा व सज्जे असलेले आपणास दिसून येतात.

७) रचनेवरील प्रभाव- गोलघुमटाच्या बांधकाम शैलीवर विजयनगर शैलीचा अलंकरणाच्या दृष्टीने प्रभाव पडलेला आहे. तर कमानरचनेवर मात्र पर्शियन वास्तूशैलीचा प्रभाव जाणवतो.

अनेक वैशिष्ट्यांसाठी विजापूरचा गोल घुमट जगात प्रसिध्द आहे. एकाही खांबाचा आधार नसलेली जगातील ही एकमेव प्रचंड इमारत आहे. गोलघुमटाच्या अर्ध्याहून अधिक अंतरावर चढून जाण्यासाठी पायऱ्या आहेत. तिथे एक गोलाकार गॅलरी आहे. या गॅलरीतून एक टाळी वाजवली तर त्याचे अनेकदा प्रतिध्वनी ऐकू येतात. गोलघुमट आवाजासाठी प्रसिध्द असल्यामुळे याला बोलणारा घुमट म्हणून ओळखले जाते.

**४. अजिंठा लेणी**

औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात 'अजिंठा' हे गाव आहे. अजिंठ्याच्या डोंगरात हीनयान आणि महायानपंथीय बौद्ध धर्माच्या एकूण तीस लेणी आहेत. औरंगाबादपासून अजिंठा ११० किलोमीटर तर जळगावपासून ६० कि.मी. अंतरावर ात ओळखली जाणारी मराठवाड्याच्या उत्तर सरहद्दीवरील सहयाद्रीची जी रांग आहे हे आहे. अजिंठा लेणी जगप्रसिद्ध आहेत. विंध्याद्री किंवा अजिंठ्याचे डोंगर या नावाने तिच्या अजिंठा लेणीच्या परिसरातील शाखेला 'मंदागिरी' हे नाव होते. या नावाचा उल्लेख अजिंठा लेणी क्र. १६ मध्ये असलेल्या वाकाटककालीन शिलालेखात आहे. थोडक्यात, अजिंठ्याच्या डोंगराचे प्राचीन नाव 'मंदागिरी होते' अजिंठा या गावाचे प्राचीन नाव 'अचिंत' असे होते. बौद्ध साहित्यात 'अचिंत विहार' असा उल्लेख आढळतो. तेथील लेणी क्रमांक १७ मधील शिलालेखात तेथील चैत्य 'अचिंत' या नावाच्या मंत्र्याने कोरल्याचा उल्लेख आहे. या नावावरूनच 'अचिंत विहार' हे नाव रूढ झाले असावे. इसवीसनाच्या सातव्या शतकात अचिंत विहार हे दक्षिण भारतातील एक प्रमुख बौद्धपीठ गणले जात होते. बुद्धभद्र, अचिंत्य स्थविर अचल, धर्मदत्त व भद्रबंधू हे हे बौद्ध पंडित या ठिकाणी राहत होते. बुद्धभद्र हे एका बौद्ध आम्नायाचे संस्थापक होते तर स्थविर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

अचलचा उल्लेख यूएनत्संगाच्या प्रवासवर्णनात करण्यात आला आहे. असंग व वसुबंधू हे सख्खे भाऊ होते.अजिंठा लेणींचा शोध इ. स. १८१९ मध्ये लागला. मद्रास सेनेतील ब्रिटिश सैनिक शिकार करण्यासाठी अजिंठा परिसरातील अरण्यात आले, तेव्हा त्यांना तेथील लेणी दृष्टीस पडल्या. या लेणी पाहण्याचा जो केंद्रबिंदू आहे, त्यास 'व्हयू पॉइंट' म्हणतात. येथून सर्व लेणी सहजपणे दिसतात. अजिंठ्याच्या ज्या डोंगरात या लेणी कोरल्या आहेत तो डोंगर घोड्याच्या नालेच्या आकाराचा असून, तो दोनशे पत्रास फूट उंचीचा अर्धवर्तुळाकार डोंगर आहे. येथूनच 'वघोरा' नदी वाहते. सर जेम्स अलेक्झांडर यांनी जंगलात प्रवेश करून या लेणी प्रसिद्धीस आणल्या. इ.स. १९५१ मध्ये अजिंठा व वेरूळ लेणींना राष्ट्रीय स्मारक म्हणून भारत सरकारने घेषित केले. यानंतर दोन वर्षांनी या लेणी भारतीय पुरातत्व विभागाकडे सोपविण्यात आल्या. अजिंठा येथील वीस लेणींपेकी लेणी क्र. ९, १०, १९, २६ व २९ ही चैत्यगृह (हीनयान) आणि बाकीचे पंचवीस विहार (महायान) आहेत. चैत्यगृहात बौद्ध भिक्खूंच्या निवासासाठी केला जातो. बौद्ध धर्मात हीनयान व महायान हे दोन स्तूप कोरलेला असतो. त्या ठिकाणी सामुदायिक पूजा केली जाते. विहाराचा उपयोग पंथ आहेत. हीनयान पंथाला मूर्तिपूजा मान्य नाही तर महायानपंथीय लोक मूर्तिपूजक आहेत. हीनयानपंथीय लोकांनी स्तूपाची पूजा करण्यास प्रारंभ केला तर महायानपंथीय लोकांनी मूर्तिपूजा सुरू केली. हा या दोन पंथांतील फरक आहे. अजिंठा येथे हीनयान व महायान या दोन्ही पंथांच्या लेणी आहेत.

**५. वेरूळ लेणी**

औरंगाबाद जिल्ह्यात खुलताबाद तालुक्यात 'वेरूळ' हे एक गाव आहे. औरंगाबाद पासून हे ठिकाण २८ कि.मी. अंतरावर आहे. येथील डोंगरात खोदलेल्या लेणी जगात प्रसिद्ध आहेत. येथील लेणी 'चरनाद्री' पहाडाच्या खोऱ्यात कोरलेल्या असून त्या उत्तर-दक्षिण दिशेत दोन कि.मी. अंतरावर पसरलेल्या आहेत. अजिंठा लेणीच्या खोदकामानंतर वेरूळच्या लेणींचे खोदकाम झाले. या लेणीच्या खोदकामाचा काळ इ.स. सहावे शतक ते नववे शतक लेणी असा आहे. बदामीचे चालुक्य आणि राष्ट्रकूट घराण्यातील राजांनी येथील लेणीच्या खोदकामास आर्थिक सहकार्य केले.चरनाद्री पहाडाला इंध्याद्री पर्वताच्या टेकड्या या नावानेही ओळखले जाते. इंध्याद्री टेकड्या या सह्याद्री पर्वताच्या रांगांशी संबंधित आहेत. 'वेरूळचे प्राचीन नाव 'एलापूर' असून या नावाचा पहिला उल्लेख राष्ट्रकूट राजा कर्क दुसरा याने दान दिलेल्या बडोदा ताम्रपटात आढळतो." वेरूळलाच एलोरा असेही नाव आहे. डॉ. फ्लिट यांच्या मते वेरूळ हे नाव वेलुरा (Vellura) या शब्दापासून पुढे बनले आहे. अरब भूगोळाशास्त्रज्ञ 'अल-मास उदी (Al-mas-udi) याने इ. सनाच्या दहाव्या शतकात वेरूळ येथे लेणी असल्याचा सर्वप्रथम उल्लेख केला. महमूद कसिम फरिस्ता या मुस्लिम इतिहासकारानेही वेरूळ लेणींची माहिती दिली. वेरूळ या ठिकाणी हिंदू, बौद्ध व जैन धर्माच्या एकूण साठ ते पासष्ट लेणी आहेत; परंतु त्यापैकी केवळ ३४ लेणींना क्रमांक दिले आहेत.
वेरूळ येथील लेण्या या बौध्द, जैन व हिंदू धर्मिय आहेत. बौध्द लेणीत गौतम बुध्दाच्या जीवनावर आधारीत शिल्प कोरण्यात आलेले आहेत. हिंदू धर्मीय लेण्यामध्ये रामायण, महाभारत तसेच महादेवाचे शिल्प कोरण्यात आलेले आहेत. तर जैन धर्मिय लेण्यात भगवान महावीर यांच्या जीवनातील प्रसंगाचे चित्रण करण्यात आले आहे. तसेच भगवान पार्श्वनाथ यांचे हे शिल्प कोरण्यात आलेले दिसून येते.

**६. पुण्यातील आगाखान पॉलेस-**

आगाखान पॅलेस (Aga Khan Palace) हे एक ऐतिहासिक स्थळ आहे, जे सुलतान मोहम्मद शाह आगा खान यांनी १८९२ मध्ये बांधले. या पॅलेसला विशेष महत्त्व आहे कारण १९४२ ते १९४४ या काळात महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी आणि महादेव देसाई यांना ब्रिटिशांनी येथे कैद केले होते. कस्तुरबा गांधी आणि महादेव देसाई यांचे निधन येथेच झाले, त्यांच्या समाधीही इथे आहेत. हे स्थळ आता गांधीजींच्या स्मृती जतन करण्यासाठी संग्रहालय म्हणून वापरले जाते, ज्यात गांधीजींच्या आठवणी, वस्तू आणि त्यांच्या कार्याशी संबंधित अनेक गोष्टी आहेत, जे भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचा भाग आहे.

**मुख्य वैशिष्ट्ये:**

- **ऐतिहासिक महत्त्व:** 'छोडो भारत' आंदोलनादरम्यान गांधीजींच्या वास्तव्यामुळे हे ठिकाण राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळवून आहे.
- **वास्तुकला:** इटालियन आर्च (कमानी) आणि भव्य लॉन असलेले हे ठिकाण सुंदर वास्तुकलेसाठी ओळखले जाते.
- **संग्रहालय:** येथे महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी आणि महादेव देसाई यांच्याशी संबंधित वस्तू, फोटो आणि माहितीचे प्रदर्शन आहे.
- **समाधी:** कस्तुरबा गांधी आणि महादेव देसाई यांच्या संगमरवरी समाधी येथे आहेत.
- **दान:** आगा खान यांनी १९६९ मध्ये हा पॅलेस भारतीय लोकांना दान केला. ठिकाण:-पुण्यातील येरवडा (Yerawada) भागात, पुणे-नगर रोडवर हा पॅलेस आहे. भारतातील इतर काही ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा थोडक्यात आढावा घेता येतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- **आग्रा किल्ला (Agra):** मोगल साम्राज्याच्या वैभवाचे प्रतीक असलेला हा किल्ला युनेस्को जागतिक वारसा स्थळ आहे.
- **फतेहपूर सिक्री:** अकबरने राजधानी म्हणून वसवलेले हे शहर मोगल वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे.
- **कुतुबमिनार (दिल्ली):** दिल्लीतील हे उंच मिनार, इंडो-इस्लामिक वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. महाराष्ट्र:
- **एलिफंटा लेणी:** मुंबईजवळ असलेली ही लेणी युनेस्को जागतिक वारसा स्थळ असून, प्राचीन रॉक-कट मंदिरांसाठी प्रसिद्ध आहेत.

संपूर्ण भारतामध्ये अनेक ऐतिहासिक स्थळे असून त्यापैकी काही निवडक स्थळांचा आढावा घेतलेला आहे. भारतातील ऐतिहासिक ठिकाणे ही राष्ट्राची वैशिष्ठ्ये असलेल्या सर्व प्रकारच्या समृद्ध विविधतेचे वर्णन करण्याचे व्यासपीठ आहे. प्राचीन काळापासून समृद्ध करणारे सांस्कृतिक आणि पारंपारिक डायस्पोरा आणि त्यांची उत्क्रांती समजू शकते.

**सारांश/ निष्कर्ष**

मानवी जीवनाच्या अनुशंगाने भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यावरणाला महत्व आहे. पृथ्वीवरील भौगोलिक पर्यावरणातील जागतिक वारसा स्थळे ही ऐतिहासिक, सांस्कृतिक, पर्यटन व रोजगार या दृष्टीनेही महत्वाची आहेत. पण विकासाच्या नावाखाली नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणामध्ये मानवाने केलेले बदल व हस्तक्षेप जैवविविधतेबरोबरच ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकांनासुध्दा धोकादायक ठरत आहेत त्यांचे जतन व संवर्धन होणे व त्यांच्याबद्दल जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्रे शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संस्था अथवा युनेस्को च्या रूपाने जागतिक वारसा स्थळांचे जतन करण्याचे काम सुरू आहे. जागतिक वारसा स्थळांचे जे काही हॉट स्पाॅट निर्माण झालेले आहेत त्यावर विशेष लक्ष देऊन त्यांचे संवर्धन करण्याचे काम सुरू आहे. युनोस्कोने जगभरातील वारसा स्थळाची यादी तयार केली आहे. या वारसा स्थळाचे जतन, संवर्धन, देखभाल व अनुदान ही त्यांचेकडून दिले जाते. जगभरात 1121 जागतिक वारसा स्थळे आहेत. त्यामध्ये नैसर्गिक (213), सांस्कृतिक (869) व मिश्र स्वरूपाची (39) अशी आहेत. जगभरात लॅटिन अमेरिका व कॅरिबियन (142), युरोप व उत्तर अमेरिका (529), आशिया व पॅसिफिक (268), अरब (86) आणि आफ्रिका (96) अश्या भौगोलिक विभागात त्यांची विभागणी केली आहे. जगात सगळयात जास्त वारसा स्थळे ही इटली आणि चीन (55) या दोन्ही देशांमध्ये आहेत. त्यानंतर अनुक्रमे स्पेन (४८), जर्मनी (४६), फ्रान्स (४५) आणि भारत (38) हे देश आहेत. भारतामध्ये विविध राज्यांमध्ये जागतिक वारसा स्थळे आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने दिल्ली मधील कुतुब मिनार, हुमायूनचा मकबरा व लाल किल्ला हे जागतिक वारसा स्थळ यादीत आहेत. मध्य प्रदेशातील भीमबेटकाच्या अश्मकालीन गुंफा, सांचीचा स्तूप व खजुराहोची मंदिरे यांचा समावेश वारसा स्थळामध्ये आहे. राजस्थानातील जयपूर शहर, हिल फोर्ट, जंतरमंतर खगोल प्रयोगशाळा व केवलदेओ राष्ट्रीय उद्यान यांचा समावेश आहे. उत्तर प्रदेशातील आग्रा किल्ला, फत्तेपूर सिक्री व ताजमहाल हे सुध्दा या यादीत आहेत. आसाम मधील काझीरंगा व मानस ही अभयारण्ये, गुजरातमधील रानी की वाव व चंपानेर-पावागड, अहमदाबाद शहर हे ही समाविष्ट आहेत. कर्नाटक मधील विजयनगर साम्राज्याची राजधानी हम्पी व पट्टडकल येथील चालुक्यांची मंदिरे यादीत समाविष्ट आहेत. तामिळनाडूतील चोल राजाची मंदिरे, महाबलीपुरम यादीत आहे. बिहार मधील महाबोधी मंदिर, बोध गया, नालंदा विद्यापीठ (महाविहार) यांचा समावेश आहे. सुंदरबन राष्ट्रीय उद्यान, पश्चिम बंगाल, भारतातील पर्वतीय रेल्वे (दार्जिलिंग रेल्वे, कालका-शिमला रेल्वे व नीलगिरी पर्वतीय रेल्वे), नंदादेवी राष्ट्रीय उद्यान व व्हॅली ऑफ फ्लॉवर्स राष्ट्रीय उद्यान, उत्तरांचल त्याचबरोबर सिक्किम मधील खांगचेंडझोंगा राष्ट्रीय अभयारण्य, चंडीगड़ येथील कैपिटल इमारत संकुल, हे ठिकाणे जागतिक वारसा स्थळामध्ये समाविष्ठ आहेत. देशात महाराष्ट्रामध्ये सगळयात जास्त पाच जागतिक वारसा स्थळे आहेत. अजंठा व वेरुळची लेणी, एलेफंटा/घारापुरीची लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई, तसेच दक्षिण मुंबईतील व्हिक्टोरियन निओ गॉथिक आणि आर्ट डेको इमारत, पश्चिम घाट यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्याला ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा आहे व ती जपणे गरजेचे आहे. राज्याच्या पर्यटन उद्योगाच्या दृष्टीने ही वारसा स्थळे महत्वाची आहेत त्यांचे जतन व संवर्धन झाले तर पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल. पर्यटनांमुळे स्थानिक विकास साधण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. विठ्ठल घारापुरे - पर्यटन भूगोल, पिंपळापूरे अँण्ड पब्लिशर्स नागपूर २००१
२. प्रा.शां.भा.देव - तेर, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई
३. डॉ. अमर सुतार व प्रा. सोमनाथ रोडे - धाराशिव जैन लेणी शोध निबंध प्रथम आवृत्ती १९८६

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

४. डॉ. कठारे, डॉ. साखरे, डॉ. पाटील - पुरातत्व विद्या वस्तुसंग्रहालय शास्त्र आणि पर्यटन, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद २०११

५. डॉ. अनिल सिंगारे व डॉ. ओमशिवा लिगाडे - दक्षिण भारताचा इतिहास (सातवाहन ते यादव), अरूणा प्रकाशन, लातूर २०१३

६. शां.भा.देव - पुरातत्व विद्या, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २००८

७. डॉ. म.श्री. माटे - मराठवाडयाचे शिल्पवैभव, बोरा अॅण्ड कंपनी प्रायव्हेट लि.मुंबई १९६४

८. डॉ. अनिल कठारे व डॉ. विजया साखरे - भारतीय कलेचा इतिहास, कल्पना प्रकाशन नांदेड २००८

९. डॉ. बितलकुमार कपूर - पर्यटन भूगोल, विश्वभारती पब्लिकेशन्स नवी दिल्ली २०१२

१०. डॉ. विजया साखरे, ऐतिहासिक पर्यटन, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर, प्रथम आवृत्ती २३ जुलै २०१२.

११. डॉ. ओमशिवा लिगाडे, डॉ. कदम, प्रा. साकोळे, अरुणा प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती २२ ऑगस्ट २०१८.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन एक ऐतिहासिक वारसा

**प्रा डॉ.लक्ष्मीकांत मारुतीराव जिरेवाड**
असोसिएट प्राध्यापक, इतिहास विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी ता. जि. परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180128
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 113-115
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन हे मानवाच्या जीवनाचा अविभाज्य भाग असून प्राचीन काळापासून मनोरंजन, ज्ञानवर्धन, धार्मिक, सांस्कृतिक व व्यावसायिक उद्देशाने मानव पर्यटनाकडे आकर्षित झाला आहे. काळानुरूप पर्यटनाचे स्वरूप बदलत गेले असून आज ते एक वेगाने विकसित होणारा उद्योग बनला आहे. भारत हा समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक व स्थापत्य वारशाने नटलेला देश असून येथे विविध कालखंडांतील कला व स्थापत्य कलेची परंपरा आढळते. मौर्य, गुप्त, राष्ट्रकूट, पल्लव तसेच मध्ययुगीन इस्लामी काळातील स्थापत्य कलेतून स्तूप, मंदिरे, गुंफा, स्तंभ, मीनारे व मकबरे यांची निर्मिती झाली. अजिंठा-वेरूळ, सारनाथ, महाबलीपुरम, कुतुबमिनार, ताजमहल इत्यादी ऐतिहासिक स्थळे भारतीय पर्यटनाची ओळख बनली आहेत. या स्थापत्य वारशामुळे देशी-विदेशी पर्यटक आकर्षित होतात तसेच सांस्कृतिक जतन, राष्ट्रीय अस्मिता दृढीकरण व रोजगारनिर्मितीस चालना मिळते. त्यामुळे भारतीय पर्यटन हे केवळ आर्थिक साधन नसून एक अमूल्य ऐतिहासिक वारसा म्हणून महत्त्वाचे ठरते.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय पर्यटन, ऐतिहासिक वारसा, स्थापत्यकला, सांस्कृतिक पर्यटन, प्राचीन भारत, मध्ययुगीन स्थापत्य, वारसा जतन*

**प्रस्तावना:**

मानवाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणजे पर्यटन होय. मानव शतकानू शतके मनोरंजन,ज्ञानवर्धन, धार्मिक, सांस्कृतिक व व्यावसायिक दृष्टिकोनातून पर्यटनाकडे आकर्षिला गेला आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये पर्यटनाचे स्वरूपात बदल होत जाऊन भ्रमण,मनोरंजन व फेरफटका इत्यादी मुळे अल्पावधीत विकसित होणारा उद्योग म्हणून पर्यटनाकडे पाहिले जाते. पर्यटन व पर्यावरण प्राचीन काळापासून आज पर्यंत मनुष्याच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. पर्यटन व्यवसायाने 19 व्या शतकात फार मोठी झेप घेतली आहे.राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यटनाला अत्यंत उच्च स्थान प्राप्त झाले आहे. पर्यटनामुळे जगातील विविध देशात सांस्कृतिक परिवर्तन घडवून आले आहे. पर्यटना मधून फार मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाली आहे.

टुरिझम हा शब्द टूर या शब्दापासून बनला आहे. सांस्कृतिक साहित्यात पर्यटनासाठी तीन शब्द वापरले आहेत. पर्यटन:- म्हणजे काय

१)पर्यटन:- आरामासाठी किंवा ज्ञानप्राप्तीसाठी प्रवास करून जाणे.

२) देशाटन:- आर्थिक लाभासाठी किंवा उपजीविकेसाठी विदेशात जाणे.

३) धर्माटन:- धार्मिक उद्देशाने अध्यात्मप्राप्तीसाठी प्रवास करून जाणे.वरील विधानावरून पर्यटन म्हणजे काय हे लक्षात येते.

गुहेत राहणारा मानव अजाणतेपणाने प्रवास करीत असे,व्यावसायिकांचा व्यवसाय नाणे,सुवर्ण मुद्रा, मोहोर इत्यादीच्या साह्याने वस्तूची देवाण-घेवाण करणाऱ्या व्यवसायिकांचा शोध लागल्यानंतर मानव व्यापारात वाहतुकीसाठी व निवासासाठी पैसा मोजून सेवा विकत घेणे सुखकर झाले.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18478502
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रा डॉ.लक्ष्मीकांत मारुतीराव जिरेवाड, असोसिएट प्राध्यापक, इतिहास विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी ता. जि. परभणी*

**How to cite this article:**
*जिरेवाड, . लक्ष्मीकांत . मारुतीराव . (2026). भारतीय पर्यटन एक ऐतिहासिक वारसा. Journal of Research & Development, 18(1(V)), 113–115.* https://doi.org/10.5281/zenodo.18478502

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

प्रवास ही एक अतिशय प्राचीन गोष्ट आहे. अगदी सुरुवातीपासून मानवाला प्रवासाविषयी आकर्षण आहे.सुरुवातीच्या काळात मानव साधेपणाने प्रवास करत होता, बहुतांश प्रवासी,यात्रेकरू,नवीन प्रदेशाचा शोध घेणारे खलाशी, नवीन प्रदेशाविषयी कुतूहल असणारे अभ्यासक, शास्त्रज्ञ, स्थानिक,यात्रेकरूचा मुख्य उद्देश संस्कृती व सांस्कृतिक जीवनाचा आनंद लुटणे,चित्रकला व शिल्पकला इत्यादी अभिरुची साठी भारत प्रसिद्ध आहे. वेरूळ, अजंठा, खजुराहो, कोणार्क, एलिफंटा अनेक गुंफा व मंदिरांमधील शिल्पकला, चित्रकला इत्यादी विषयी भारताच्या समृद्ध शिल्पकलेचे दर्शन पर्यटकांना होत असल्याकारणाने देशी विदेशी पर्यटक,पर्यटन स्थळी दरवर्षी हजारो पर्यटक नित्य नेमाने येतात.

**मौर्यकालीन स्थापत्य कला:**

मौर्यकाळात कलाकुसरीचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. स्थापत्य कलेसाठी वीट,लाकूड,दगडाचा वापर प्रारंभापासून केला जात असे.

**स्तूप :**

बुद्धाच्या अस्थिरक्षणावरील बांधकाम म्हणजे स्तूप होय.स्तूप अर्ध गोलाकार आंतरिक भाग, कच्च्या विटांचा,बाह्य भाग पक्क्या विटांनी बांधलेला,त्यावर प्लास्टर,वर लाकडी किंवा दगडी छप्पर असून प्रदक्षिणेसाठी चारही बाजूला मार्ग.सम्राट अशोकाने पाचशे विहार बांधले आहेत. 84 हजार स्तूप, सम्राट अशोकाने 40 स्तंभ बांधले आहेत.सारनाथ येथील धर्मचक्र परिवर्तन स्मरणार्थ बांधलेला स्तंभ जगप्रसिद्ध आहे.सारनाथ येथील स्तंभावर चार सिंह ते परस्पर विरोधी दिशेला अंकित आहेत.

**गुप्तकालीन स्थापत्य कला :**

गुप्तकाळातील कलेची वैशिष्ट्ये म्हणजे अभिव्यक्ती व अध्यात्माचे स्पष्ट रूप होय.गुप्त काळातील कला केंद्र मथुरा, बनारस,पाटणा होय. मूर्तीकलेत नग्नता गुप्त काळामध्ये दिसून येत नाही.मूर्ती निर्मितीत वस्त्राचा वापर केलेला आहे. गुप्तकालीन प्रसिद्ध मंदिरे विष्णू मंदिर जबलपूर,पार्वती मंदिर अजगरराज्य,बौद्ध मंदिर बौद्ध गया,दशावतार मंदिर देवगड असे गुप्तकाळ कलेसाठी प्रसिद्ध आहे.मेहरोली येथील लोहस्तंभ सुद्धा उत्कृष्ट धातूचा एक नमुना होय.गुप्तकालीन मुख्य गुंफा अजिंठा येथील असून अजिंठा गुंफेत साहित्य आणि विहार असून अजिंठा विहारात 13 आणि 17 तर चैत्यगृहात 19 नंबर गुंफा महत्त्वाची आहे.

**राष्ट्रकूट कालीन स्थापत्य कला:**

वेरूळ येथील कैलास मंदिर राष्ट्रकूट कालीन श्रेष्ठ मंदिर होईल.वेरूळ आणि एलिफंटा ही राष्ट्रकूट कालीन स्थापत्य निर्मिती आहे.कृष्ण पहिला यांनी ही निर्मिती केलेली आहे.

**पल्लवकालीन स्थापत्य कला:**

पल्लव राजे महाजांनी पाषाण करून आणि दगडाचा वापर करून दोन दोन प्रकारच्या मंदिरे बांधली आहेत. मंडपाची मंदिरे व एकाच दगडाला करून स्तंभयुक्त बांधलेले मंदिरे. मंदिराचे दोन प्रकार आहेत.प्रथम प्रकारचे मंडप मंदिरे तर दुसऱ्या प्रकारचे रथ मंदिरे म्हणून ओळखले जातात. महेंद्र वर्मणांनी कठीण पाषाण करून दक्षिण भारतात मूर्ती निर्मितीचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबलीपुरमला कीर्ती मिळवून दिली महामंडप मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे मंडपाचे स्तंभ अष्टाकार आहेत.नरसिंह वर्मा पहिल्याने पाषाण करून सुंदर मंदिरे पाषाणापासून विमाने, रथ, पूजाग्रह बनवली आहेत.नरसिंह वर्मा दुसऱ्याच्या काळात दगड ऐवजी वीट व लाकडाचा वापर स्थापत्य कलेमध्ये करण्यास सुरुवात झाली. नरसिंह वर्मा दुसऱ्याने प्रसिद्ध असे कैलास नाथ मंदिर वैकुंठ पैरुमल मंदिर महाबलीपुरम मंदिर असे पल्लवकालीन स्थापत्य कला विकसित झालेली होती.

**कुतूबमिनार:**

कुतुबुद्दीन एबकने इस्लामी जनतेच्या प्रार्थनेसाठी दिल्ली पासून 12 मैल अंतरावर मेहरोली या ठिकाणी सुंदर असे कुतुबमिनार बांधण्यात आले.

**आढे दिन की झोपडी :**

कुतूबदिन एबकणे अजमेर येथे इसवी सन 1200 मध्ये अडीच दिवसात बांधलेली झोपडी मध्येयुगीन स्थापत्य कलेचा हा एक नजराणा म्हणावा लागेल.

**ताजमहल :**

शाहाजहानने आग्रा येथील यमुना नदीच्या उजव्या किनाऱ्यावर प्रिय पत्नी अर्जुनमंदबानू बेगम उर्फ मुमताज महल यांच्या स्मरणार्थ मकबऱ्याची निर्मिती करण्यात आली.

**मयूरासन :**

मध्ये कालीन स्थापत्य कलेचा एक नमुना म्हणून मयूरासनकडे पाहिल्या जाते.मयुरासन पूर्णतः सुवर्ण व रत्नजडित बनवण्यात आले आहे. तक्त-ए- ताऊसलाच मयुरासन असे म्हणतात. एकंदरीत सांगायचे म्हटलं तर भारतातील पर्यटन एक ऐतिहासिक वारसा असून,प्राचीन काळापासून येथील ऋषी, महारुसी,राजे,महाराजे याने मोठ्या प्रमाणात वैशिष्ट्यपूर्ण कला व स्थापत्य कलेचा विकास घडवून आणून ती आज पर्यटनाची व पर्यावरणाची नांदी बनलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1) पर्यटन भूगोल- भागवत अ. वी., सौ. जोशी मेधा.

2) भारतीय पुरातत्त्व शास्त्र- उत्तम सावंत.

3) कंधार एक ऐतिहासिक शहर- प्रभाकर देव.

4) टुरिझम इन इंडिया गुप्ता व्ही एन

5) टुरिझम प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट इशूज -डोनाल्ड ई.एन.

6) टुरिझम डेव्हलपमेंट -भाटिया ए.के.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण

**डॉ. राजाभाऊ व्यंकटराव नवगणकर**
समाजशास्त्र विभाग, तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगाव. जि. हिंगोली
**Email:** rajanavgankar55@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180129
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 116-119
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन ही आधुनिक समाजातील एक महत्त्वाची सामाजिक-आर्थिक क्रिया असून ती विविध समाजांमधील सांस्कृतिक देवाणघेवाणीचे प्रभावी माध्यम ठरते. जागतिकीकरण, वाहतूक व माहिती-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे पर्यटनाचा विस्तार वेगाने झाला असून त्याचा प्रभाव स्थानिक समाजाच्या संस्कृती, परंपरा, जीवनशैली व मूल्यांवर स्पष्टपणे दिसून येतो. पर्यटनामुळे विविध संस्कृतींचा परस्पर संपर्क वाढून सांस्कृतिक समज, सहिष्णुता व जागतिक दृष्टिकोन विकसित होतो तसेच लोककला, हस्तकला, सण-उत्सव आणि सांस्कृतिक वारशाला चालना मिळते. मात्र, पर्यटनाच्या व्यापारीकरणामुळे सांस्कृतिक वस्तूकरण, पारंपरिक मूल्यांचा ऱ्हास व जीवनशैलीत बदल घडून येण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे पर्यटनाचे सांस्कृतिक परिणाम द्वैध स्वरूपाचे—सकारात्मक व नकारात्मक—असून संतुलित, शाश्वत व समाजाभिमुख पर्यटन धोरणांद्वारे सांस्कृतिक संवर्धन व विकास साधता येऊ शकतो.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन, सांस्कृतिक देवाणघेवाण, सांस्कृतिक परिवर्तन, सांस्कृतिक वस्तूकरण, शाश्वत पर्यटन, स्थानिक समाज, जागतिकीकरण*

## प्रस्तावना:

पर्यटन ही आधुनिक समाजातील एक महत्त्वाची सामाजिक-आर्थिक क्रिया आहे. सामान्यतः पर्यटन म्हणजे व्यक्तीने आपल्या दैनंदिन वास्तवस्थानाबाहेर विश्रांती, मनोरंजन, धार्मिक, शैक्षणिक किंवा व्यावसायिक उद्देशाने केलेला तात्पुरता प्रवास होय. आलीकडे हा प्रवास लैंगिक इच्छापूर्तीसाठी देखील केला जात आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात वाहतूक, माहिती-तंत्रज्ञान आणि दळणवळणाच्या साधनांमुळे पर्यटन क्षेत्र झपाट्याने विस्तारले आहे. परिणामी, पर्यटनाचा प्रभाव केवळ आर्थिक विकासापुरता मर्यादित न राहता सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांवरही मोठ्या प्रमाणात दिसून येतो. सांस्कृतिक देवाणघेवाण म्हणजे विविध समाजांमधील भाषा, परंपरा, कला, सण-उत्सव, धार्मिक श्रद्धा, जीवनशैली आणि मूल्ये यांचे परस्पर आदान-प्रदान होय. पर्यटनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या संस्कृतींचा प्रत्यक्ष संपर्क येतो आणि त्या एकमेकांवर प्रभाव टाकतात. पर्यटक आणि स्थानिक लोकांमधील संवादातून सांस्कृतिक समज, सहिष्णुता आणि परस्पर आदरभाव वाढीस लागतो. पर्यटन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण हा विषय समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण तो सामाजिक नातेसंबंध, सांस्कृतिक ओळख आणि परंपरांतील बदल समजून घेण्यास मदत करतो. पर्यटनामुळे एकीकडे सांस्कृतिक वारशाचे संवर्धन होते, तर दुसरीकडे सांस्कृतिक वस्तूकरण आणि ऱ्हासाचा धोका निर्माण होतो. म्हणूनच पर्यटनामुळे घडणाऱ्या सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करणे, त्याचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम समजून घेणे आणि शाश्वत पर्यटन विकासासाठी योग्य धोरणे सुचविण्याची गरज आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. राजाभाऊ व्यंकटराव नवगणकर, समाजशास्त्र विभाग, तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सेनगाव. जि. हिंगोली*

**How to cite this article:**
*नवगणकर, . राजाभाऊ . व्यंकटराव . (2026). पर्यटन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण. Journal of Research & Development, 18(1(V)), 116–119.* https://doi.org/10.5281/zenodo.18478528

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18478528

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**संशोधन पद्धती**

सदर संशोधन हे दुय्यम माहिती संकलनावर आधारित वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचे आहे. पर्यटनाचा स्थानिक समाजावर होणारा सांस्कृतिक प्रभाव अभ्यासण्यासाठी समाजशास्त्र व पर्यटन विषयक पुस्तके, संशोधन लेख, शासकीय अहवाल व धोरणे तसेच विविध नियतकालिके व विश्वासार्ह संकेतस्थळे यांचा वापर करण्यात आला आहे. समाजशास्त्रीय पुस्तकांच्या आधारे संस्कृती, सामाजिक परिवर्तन, सांस्कृतिक देवाणघेवाण व वस्तूकरण यांसारख्या संकल्पनांचा सैद्धांतिक अभ्यास करण्यात आला आहे, तर पर्यटन विषयक संशोधन लेखांमधून विविध प्रदेशांतील अनुभवजन्य निष्कर्ष व सांस्कृतिक बदलांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

याशिवाय, केंद्र व राज्य सरकारांच्या पर्यटन विभागांचे अहवाल व धोरणांमधून पर्यटन विकासाची दिशा, सांस्कृतिक वारसा संवर्धनासाठीच्या योजना आणि शाश्वत पर्यटनाच्या संकल्पनेचा अभ्यास करण्यात आला आहे. सामाजिक विज्ञान व पर्यटनाशी संबंधित नियतकालिके आणि संकेतस्थळांच्या माध्यमातून अद्ययावत माहिती व समकालीन घडामोडींचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व दुय्यम स्रोतांच्या आधारे पर्यटनाचा स्थानिक समाजावर होणारा सांस्कृतिक प्रभाव संतुलित व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून अभ्यासण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives)**

- पर्यटनाचा स्थानिक समाजाच्या संस्कृतीवर होणारा प्रभाव अभ्यासणे.
- पर्यटनामुळे होणाऱ्या सांस्कृतिक देवाणघेवाणीचे स्वरूप समजून घेणे.
- सांस्कृतिक संवर्धन व वस्तूकरण यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
- पर्यटनामुळे पारंपरिक मूल्ये व जीवनशैलीत होणारे बदल विश्लेषित करणे.
- पर्यटनाच्या सकारात्मक व नकारात्मक सांस्कृतिक परिणामांचा आढावा घेणे.

## माहितीचे विश्लेषण व चर्चा

**पर्यटनाचा स्थानिक समाजाच्या संस्कृतीवर पडणारा प्रभाव**

पर्यटनामुळे स्थानिक संस्कृतीच्या विविध घटकांवर द्वैध स्वरूपाचा प्रभाव पडतो. लोककला व लोकसंगीताला पर्यटनामुळे आर्थिक पाठबळ व व्यापक प्रेक्षकवर्ग मिळतो, परिणामी या कला लोप पावण्याऐवजी जतन होतात. मात्र, पर्यटकांच्या अपेक्षांनुसार सादरीकरण करण्यात येत असल्याने त्यामध्ये कृत्रिमता निर्माण होते आणि मूळ भावनिक व सांस्कृतिक आशय कमी होण्याचा धोका वाढतो. सण-उत्सव व धार्मिक परंपरांबाबतही हेच चित्र दिसून येते. पर्यटनामुळे या परंपरांना जागतिक ओळख मिळते; परंतु त्याच वेळी त्यांचे व्यापारीकरण होऊन पवित्रतेवर परिणाम होतो. हस्तकलांच्या बाबतीत रोजगारनिर्मिती झाली असली तरी दर्जा व पारंपरिक तंत्रांपेक्षा विक्रीक्षमतेला अधिक महत्त्व दिले जात असल्याचे आढळते.

**सांस्कृतिक देवाणघेवाण**

पर्यटनामुळे स्थानिक समाज व पर्यटकांमध्ये होणाऱ्या सांस्कृतिक देवाणघेवाणीचे स्वरूप स्पष्ट होते. परकीय भाषांचा वापर वाढल्याने संवादक्षमता व जागतिक दृष्टिकोन विकसित होतो; तथापि, स्थानिक भाषेचा वापर कमी होण्याची शक्यता निर्माण होते. आधुनिक पेहराव, आहार व सामाजिक सवयी स्वीकारल्यामुळे समाज अधिक खुले व सहिष्णु बनतो, परंतु पारंपरिक जीवनशैलीवर त्याचा विपरीत परिणाम होतो. विशेषतः तरुण पिढीमध्ये पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव अधिक प्रमाणात दिसून येतो, ज्यामुळे पिढ्यांमधील सांस्कृतिक दरी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**संस्कृती संवर्धन व वस्तूकरण**

सांस्कृतिक संवर्धन व सांस्कृतिक वस्तूकरण यांतील मूलभूत फरक स्पष्ट केला आहे. पर्यटनाच्या माध्यमातून सांस्कृतिक संवर्धन झाल्यास परंपरा जतन होऊन समाजात सांस्कृतिक अभिमान वाढतो. याउलट, जेव्हा संस्कृती केवळ आर्थिक लाभाच्या दृष्टीने वापरली जाते, तेव्हा ती वस्तूकरणाच्या प्रक्रियेत अडकते. या प्रक्रियेत संस्कृतीचा नैसर्गिक व भावनिक आशय कमी होतो आणि ती केवळ प्रदर्शनाची वस्तू बनते. त्यामुळे पर्यटन विकास करताना संवर्धन व वस्तूकरण यांच्यातील समतोल राखणे अत्यंत आवश्यक ठरते.

**पारंपरिक मूल्ये व जीवनशैलीत होणारे बदल**

पर्यटनामुळे स्थानिक समाजाच्या जीवनशैलीत झालेल्या बदलांकडे लक्ष वेधते. संयुक्त कुटुंबपद्धतीऐवजी विभक्त कुटुंबपद्धतीकडे झुकाव वाढत असून सामूहिक मूल्यांऐवजी व्यक्तिवादाचा प्रभाव वाढत आहे. साध्या व परंपरागत जीवनशैलीची जागा आधुनिक व उपभोगवादी जीवनशैली घेत असल्याचे दिसून येते. या बदलांमुळे जीवनमान उंचावले असले तरी सामाजिक संबंध अधिक औपचारिक होऊन सामाजिक एकात्मतेवर परिणाम होण्याची शक्यता वाढते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**पर्यटनाचे सांस्कृतिक परिणाम**

पर्यटनामुळे होणाऱ्या सांस्कृतिक परिणामांचा समग्र आढावा घेतला असता असे दिसून येते की, पर्यटनामुळे सांस्कृतिक देवाणघेवाण, परंपरांचे संवर्धन आणि जागतिक ओळख निर्माण होते हे सकारात्मक पैलू आहेत; तर सांस्कृतिक वस्तूकरण, मूल्यांचा ऱ्हास व सांस्कृतिक संघर्ष हे नकारात्मक पैलू आहेत. या दोन्हींच्या परस्परसंवादातून स्थानिक समाजात सांस्कृतिक परिवर्तन घडून येते. त्यामुळे शाश्वत, समाजाभिमुख व सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील पर्यटन धोरणांची गरज अधोरेखित होते.

**एकत्रित चर्चा**

वरील सर्व तक्त्यांचे विश्लेषण करता असे निष्कर्ष काढता येतो की पर्यटनाचा स्थानिक समाजावर होणारा सांस्कृतिक प्रभाव सरळ सकारात्मक किंवा नकारात्मक नसून तो परिस्थितीनुसार बदलणारा आणि बहुआयामी आहे. योग्य नियोजन, स्थानिक समाजाचा सहभाग आणि सांस्कृतिक जतनाला प्राधान्य दिल्यास पर्यटन हे सांस्कृतिक विकासाचे प्रभावी साधन ठरू शकते; अन्यथा, ते सांस्कृतिक अस्मितेला धोका निर्माण करू शकते.

**निष्कर्ष**

दुय्यम स्रोतांतील अभ्यासांनुसार पर्यटनामुळे विविध संस्कृतींमधील परस्पर संवाद वाढतो. पर्यटक स्थानिक भाषा, अन्नसंस्कृती, पोशाख, कला, सण-उत्सव आणि परंपरांशी परिचित होतात, तर स्थानिक समाजाला बाह्य संस्कृतींचे अनुभव मिळतात. संशोधन लेख व जर्नल्समध्ये नमूद केल्याप्रमाणे पर्यटनामुळे सांस्कृतिक समज, सहिष्णुता आणि जागतिक दृष्टिकोन विकसित होतो. विशेषतः आंतरराष्ट्रीय पर्यटनामुळे बहुसांस्कृतिक मूल्यांची देवाणघेवाण सुलभ होते. शासकीय अहवाल व पर्यटन विभागाच्या आकडेवारीनुसार पर्यटनामुळे स्थानिक समाजाच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर मोठा प्रभाव पडतो. रोजगारनिर्मिती, उत्पन्नवाढ आणि पायाभूत सुविधांचा विकास हे पर्यटनाचे सकारात्मक परिणाम आहेत. मात्र, संशोधन लेखांमध्ये असेही निदर्शनास आले आहे की पर्यटनामुळे स्थानिक जीवनशैलीत बदल, पारंपरिक मूल्यांवर ताण आणि सामाजिक असमतोल निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे पर्यटनाचे परिणाम द्वैतीय स्वरूपाचे सकारात्मक तसेच नकारात्मक आहेत, असे निष्कर्ष अनेक अभ्यासांतून पुढे येतात. दुय्यम माहितीतील समाजशास्त्रीय अभ्यासांमध्ये सांस्कृतिक वस्तूकरण ही पर्यटनाशी निगडित महत्त्वाची संकल्पना म्हणून मांडली आहे. पर्यटनाच्या वाढीमुळे स्थानिक कला, हस्तकला, लोकनृत्य, धार्मिक विधी व परंपरा या पर्यटकांसाठी विक्रीयोग्य वस्तू बनतात. यामुळे एका बाजूला सांस्कृतिक वारशाचे जतन व आर्थिक लाभ मिळतो, तर दुसऱ्या बाजूला संस्कृतीची मौलिकता कमी होण्याचा धोका निर्माण होतो. जर्नल्स व मासिकांतील विश्लेषणानुसार अति-व्यापारीकरणामुळे संस्कृतीचे सुलभीकरण (simplification) होते, जे सांस्कृतिक अस्मितेसाठी आव्हान ठरते.

**सूचना व शिफारसी**

**१) शाश्वत पर्यटन धोरणे**

पर्यटन विकास करताना केवळ आर्थिक लाभावर भर न देता शाश्वत पर्यटन धोरणांचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. पर्यटनस्थळांची वहनक्षमता (carrying capacity) लक्षात घेऊन पर्यटकांची संख्या नियंत्रित करणे, पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा विकसित करणे आणि स्थानिक सांस्कृतिक संवेदनशीलतेचा विचार करणारी धोरणे राबविणे गरजेचे आहे. शाश्वत पर्यटनामुळे पर्यटनाचा दीर्घकालीन लाभ मिळून सांस्कृतिक वस्तूकरण व सामाजिक असमतोल कमी करता येऊ शकतो.

**२) स्थानिक समाजाचा सहभाग**

पर्यटन नियोजन व अंमलबजावणी प्रक्रियेत स्थानिक समाजाचा सक्रिय व निर्णायक सहभाग असणे आवश्यक आहे. स्थानिक लोकांना पर्यटनाशी संबंधित प्रशिक्षण, रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून दिल्यास त्यांना त्यांच्या संस्कृतीचे जतन करण्याची जबाबदारी व प्रेरणा मिळते. स्थानिक मार्गदर्शक, कलाकार, कारागीर आणि स्वयंसेवी संस्था यांच्या सहभागामुळे पर्यटन अधिक समाजाभिमुख व समावेशक बनू शकते.

**३) सांस्कृतिक वारसा जतन**

पर्यटन विकासाच्या प्रक्रियेत सांस्कृतिक वारशाचे संरक्षण व संवर्धन हे केंद्रस्थानी असले पाहिजे. ऐतिहासिक स्थळे, धार्मिक परंपरा, लोककला व सण-उत्सव यांचे जतन करण्यासाठी ठोस कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजना आवश्यक आहेत. तसेच, सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करताना त्यांच्या मूळ स्वरूपाचा सन्मान राखला गेला पाहिजे. यामुळे संस्कृतीचा केवळ आर्थिक वापर न होता तिचे सामाजिक व भावनिक मूल्य टिकून राहील.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**संदर्भ सूची**

1. राजेश, गोयल. २०११. भारतीय पर्यटन उद्योग. वंदना पुब्लिकेशन्स नई देल्ली ११००२
2. प्रतिभा. २०१०. भारत मी पर्यटन उत्पाद एवं सांस्कृतिक ऐतिहासिक विरासत. एबिडी पब्लिशर्स जयपूर.
3. ताज रावत. २००४. पर्यटन का प्रभाव एवं प्रबंधन. तक्षशीला प्रकाशन नई देल्ली ११००२
4. रजनीश पाण्डेय. – पर्यटन और मानव संसाधन विकास. मोहित बुक्स इंटरनेशनल नई देल्ली ११००२

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन व्यवसाय आणि पर्यावरण संतुलन

**प्रा. डॉ.परिमल अरविंद सुतवणे**
इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**Manuscript ID**:
JRD -2026-180130
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 120-123
January 2026
**Submitted:** 12 Dec. 2025
**Revised:** 22 Dec. 2025
**Accepted:** 12 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*भारतामध्ये पर्यटन व्यवसाय हा वेगाने विकसित होत असून तो राष्ट्रीय उत्पन्न, रोजगारनिर्मिती आणि सांस्कृतिक ओळख यांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे वाहतूक, निवास, व्यापार व सेवा क्षेत्रांचा विस्तार होतो तसेच स्थानिक आर्थिक विकासाला चालना मिळते. मात्र पर्यटन स्थळांच्या विकासासोबत पर्यावरण संतुलन राखणे अत्यंत आवश्यक आहे. पर्यटन स्थळांवरील बांधकाम, वाहतूक व्यवस्था, निवास सुविधा, औद्योगिक क्रिया आणि पर्यटकांची वाढती संख्या यांचा नैसर्गिक साधनसंपत्ती, जलस्रोत, जैवविविधता व भौगोलिक रचनेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे ऐतिहासिक, नैसर्गिक व धार्मिक पर्यटन स्थळांचे जतन, नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण, जल व स्थल परिसंस्थांचे संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत पायाभूत सुविधा विकास आवश्यक ठरतो. पर्यावरणपूरक, नियोजनबद्ध व शाश्वत पर्यटन धोरणांच्या अंमलबजावणीद्वारे पर्यटन व्यवसायाचा विकास आणि पर्यावरण संतुलन यांच्यात समन्वय साधता येतो. अशा संतुलित दृष्टिकोनातून पर्यटन स्थळे, स्थानिक समाज आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो.*

***मुख्यशब्द :*** *पर्यटन व्यवसाय, पर्यावरण संतुलन, शाश्वत पर्यटन, जैवविविधता, नैसर्गिक संसाधने, पर्यटन स्थळांचे जतन, पायाभूत सुविधा*

**प्रस्तावना:**

भारतामध्ये पर्यटन व्यवसाय हा सतत विकसित होत चाललेला व्यवसाय आहे. पर्यटन व्यवसायातून मोठ्या प्रमाणावर भारत देशाला आर्थिक उत्पन्न मिळत आहे. पर्यटन व्यवसायाच्या विकासासाठी शासकीय पातळीवरही प्रभावीपणे उपाययोजना प्रत्यक्षात आणल्या जात आहेत. पर्यटन व्यवसायामुळे इतर अनेक पूरक व्यवसायही विकसित होत आहेत. पर्यटन व्यवसायामुळे भारताची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख जगभरामध्ये निर्माण होत आहे. पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे स्थानिक पातळीवरील जनजीवन विकसित होत आहे. प्रादेशिक पातळीवरील पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे दळणवळणाचा विकास होत आहे. भारतातील धार्मिक स्थळांच्या आणि पर्यटन स्थळांच्या विकासासाठी प्रभावी उपाययोजना प्रत्यक्षात आणल्या जात आहेत. भारताला प्राचीन ऐतिहासिक संपन्न वारसा लाभलेला आहे. यामुळे ऐतिहासिक पर्यटनही मोठ्या प्रमाणावर विकसित होत आहे. पर्यटन व्यवसायाच्या विकासाच्या गतीमुळे लोकजीवनही संपन्न होत आहे. पर्यटन व्यवसायाच्या विकासाबरोबरच पर्यावरणाचे संतुलन साधने आवश्यक आहे. पर्यावरण संतुलनासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. जागरूकपणे विकासाच्या योजना प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे, जेणेकरून पर्यावरण संतुलन टिकून राहील. पर्यटन व्यवसायाच्या विकासाबरोबरच पर्यावरणाचे महत्त्व लोकांना समजून सांगणे आवश्यक आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18478560

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ.परिमल अरविंद सुतवणे, इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*सुतवणे, . परिमल . अरविंद . (2026). पर्यटन व्यवसाय आणि पर्यावरण संतुलन. Journal of Research & Development, 18(1(V)), 120–123.* https://doi.org/10.5281/zenodo.18478560

**महत्वपूर्ण संकल्पना :**

प्रस्तुत शोधनिबंध लिहीत असताना भारतीय पर्यटन, पर्यटनाचा विकास, पर्यावरण संतुलन, पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्त्व,पर्यावरणाचे घटक,जैवविविधता, पायाभूत सुविधा,भौगोलिक घटक, नैसर्गिक घटक, पर्यटन आणि पर्यावरणाची परस्पर पूरकता, पर्यटन स्थळांचे जतन इत्यादी महत्त्वपूर्ण संकल्पनांचा विचार विस्तृतपणे केलेला आहे.

**भारतीय पर्यटनाचे स्वरूप :**

भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर ऐतिहासिक स्थळे वसलेली आहेत. या ऐतिहासिक स्थळांच्या संदर्भाने जर आपण विचार केला तर मंदिरे, धार्मिक स्थळे,लेणी, किल्ले,स्मारके, प्राचीन वास्तू ,ऐतिहासिक गुहा, शिल्पकलेचे ठिकाण, चित्रकलेचे ठिकाण आणि मोठ्या प्रमाणावर असलेली उत्खनन स्थळे यांचा समावेश होतो. दरवर्षी असंख्य पर्यटक हे उपरोक्त विविध स्थळांना भेटी देतात, काही काळ त्या ठिकाणी वास्तव्य करतात आणि आपल्या मूळ ठिकाणी परत जातात. या सर्व प्रक्रियेमध्ये वाहतूकव्यवस्था, निवासव्यवस्था, पर्यटकांचे पर्यटन स्थळाच्या ठिकाणचे वास्तव्य,पर्यटकांच्या गरजांची पूर्तता, पर्यटकांना मिळणाऱ्या सोयी या सर्व घटकांचा जर आपण विचार केला तर पर्यटन स्थळ हे सर्व सुविधांनी युक्त असणे गरजेचे आहे. पर्यटन स्थळांच्या विकासाच्या संदर्भाने होणारे बांधकाम, रस्ते निर्मिती, पाणीपुरवठ्याच्या सोयी, निवासव्यवस्थांची निर्मिती, धर्मशाळांची निर्मिती,ऐतिहासिक स्थळाचे विस्तारीकरण आणि पर्यटन स्थळाचे विस्तारीकरण या सर्व विकासाच्या प्रक्रिया प्रत्यक्षात येत असतात. पर्यटन स्थळाचा विकास करीत असताना आपल्याला पर्यावरणाचे संतुलन साधने आवश्यक आहे ,कारण पर्यटन स्थळाच्या ठिकाणचे पर्यावरण जर अनुकूल राहिले तर पर्यटकांची संख्या ही दिवसेंदिवस वाढेल. पर्यटन व्यवसाय आणि पर्यटन स्थळांचा विकास होईल. पर्यटन विकास आणि पर्यावरणाचे संतुलन या संदर्भाने पुढील मुद्द्यांचा आपल्याला विस्तृतपणे विचार करावा लागतो.

**1) पर्यटन स्थळे आणि पर्यावरण:**

पर्यटन स्थळे ही प्राचीन काळापासून इतिहासाचा, संस्कृतीचा आणि लोकजीवनाचा वारसा दर्शवीत असतात. या पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांच्या माध्यमातून आपल्याला सांस्कृतिक ठेवा समजावून घेता येतो. पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळे ही दीर्घकाळ भौगोलिक आणि नैसर्गिक स्त्रोतांच्या सानिध्यात अस्तित्वात असतात. या स्त्रोतांचा पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांवर परिणाम होत असतो. या परिणामातून ऐतिहासिक स्थळांचे नुकसान होऊ नये म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करणे, पर्यटन स्थळांच्या ठिकाणी संरक्षक भिंती बांधणे, ऐतिहासिक आणि पर्यटन स्थळांचे प्रत्यक्ष पावसापासून संरक्षण करणे यासारखे उपाय योजले जातात. हे उपाय प्रत्यक्षात येत असताना पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांच्या सभोवती असलेले वातावरण नष्ट न होऊ देण्याची काळजी घेणे आवश्यक आहे. तेथील नैसर्गिक व्यवस्था , पर्यटन ठिकाणची भूरूपे,ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती ही बदलू न देण्यासाठी आवश्यक ते उपाय योजावेत. यातून पर्यावरण संतुलन योग्य ठेवले जाते.

**2) नैसर्गिक संपदा आणि स्त्रोत जपणे:**

अभयारण्य, राष्ट्रीय उद्याने या ठिकाणी पर्यटक हे मोठ्या संख्येने येत असतात. अभयारण्यात आणि राष्ट्रीय उद्यानात असलेल्या प्राण्यांना पाहणे,त्या प्राण्यांची माहिती मिळविणे यासाठी पर्यटक दिवसभर या ठिकाणी वास्तव्याला असतात. अशावेळी पर्यटकांच्या अंतर्गत प्रवासाची व्यवस्था सुरक्षित वाहनांमध्ये केलेली असते. त्यासाठी बांधण्यात येणारे रस्ते,पूल यामुळे नैसर्गिक संपदेचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अभयारण्य आणि राष्ट्रीय उद्यानामध्ये राहत असलेल्या वन्यजीवांचे नैसर्गिक वास्तव्य सुरक्षित राखणे गरजेचे आहे. झाडे, झुडुपे, जंगले,वने, वेली आणि जलस्त्रोत यांची पण काळजी पर्यटकांनी आणि सुरक्षाकर्मींनी घेणे आवश्यक आहे. यामुळे सजीवांच्या नैसर्गिक व्यवस्थेचे संतुलन राखले जाते.

**3) जलस्त्रोतांची घ्यावयाची काळजी:**

पर्यटन व्यवसायामध्ये नदी मार्गाने आणि तलावांमध्ये बोटिंग करणे , होडी चालविणे आणि पोहणे अशा प्रकारचे मनोरंजनात्मक पर्यटन प्रत्यक्षात आणले जाते. अशावेळी नदी आणि त्या तलावाची स्वच्छता टिकून राहील याची काळजी घ्यावी . पर्यटकांकडून प्लास्टिकच्या वस्तू आणि इतर प्रकारचा कचरा नदीमध्ये तलावामध्ये टाकण्यात येऊ नयेत याची काळजी घेतली गेली पाहिजे. या जलस्त्रोतांमध्ये नैसर्गिकरित्या अस्तित्वात असलेले प्राणी, मासे आणि वनस्पती यांचेही संरक्षण केले गेले पाहिजे. प्रत्येक जलस्त्रोतांमध्ये परस्परांवर अवलंबून असलेले सजीव आणि वनस्पती या नैसर्गिकरित्या अस्तित्वात असतात. या परस्परावर अवलंबून असलेल्या व्यवस्थेचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

**४) परिसर संवर्धन :**

नैसर्गिकदृष्टीने संपन्न असलेले भौगोलिक प्रदेश हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतात. लाल मातीचा प्रदेश, बारीक वाळूचा प्रदेश, उताराचा प्रदेश,हिरवळीचा प्रदेश आणि डोंगरमाथ्याचा प्रदेश असे अनेक प्रदेश पर्यटनाच्या दृष्टीने पर्यटकांना आकर्षित करतात. पर्यटकांनी आणि संबंधित घटकांनी या सर्व प्रदेशांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. पर्यटकांच्या वावरण्यामुळे आणि राहण्यामुळे तसेच

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

वाहनाच्या येण्या जाण्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान प्रस्तुत प्रदेशांना आणि तेथील वातावरणाच्या व्यवस्थेला होऊ नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. या नैसर्गिक प्रदेशांमध्ये पर्यटकांनी कशाप्रकारे पाहणी करावी यासाठी नियम तयार करणे आवश्यक आहे. यामुळे आपला हा संपन्न नैसर्गिक आणि भौगोलिक ठेवा सुरक्षित ठेवला जातो .

**5) दूर्ग पर्यटनाच्या वेळी घ्यावयाची काळजी:**

दूर्ग म्हणजेच किल्ला आणि हे किल्ले आपल्या संपन्न आणि वैभवशाली इतिहासाचा वारसा सांगणारे साक्षीदार आहेत. दूर्ग पर्यटन हा एक ऐतिहासिक पर्यटनाचा भाग आहे. दूर्ग पर्यटनाच्या वेळी पर्यटक हे इतिहास समजावून घेतात. भौगोलिक वैशिष्ट्यांचाही अभ्यास करतात. दूर्ग पर्यटन करीत असताना माती ढासळू न देणे ,वनस्पतींचे जतन करणे,

दूर्ग पर्यटनाच्या मार्गातील कड्यांना क्षिती पोहोंचवू नये , भौगोलिकरित्या तयार झालेल्या मार्गाचे संरक्षण करावे , दूर्ग पर्यटन करीत असताना स्वच्छता राखावी , दूर्ग पर्यटन करीत असताना तेथील नैसर्गिक साधन संपत्ती जतन करणे,अशा प्रकारची काळजी पर्यटकांनी आणि संबंधित घटकांनी घेणे आवश्यक आहे. दूर्ग पर्यटन करीत असताना त्या किल्ल्यावरील ऐतिहासिक घटकांचे घटकांचे आणि स्मारकांचेही जतन करणे आवश्यक आहे.

**6) समुद्र पर्यटनाच्या वेळी घ्यावयाची काळजी:**

समुद्र पर्यटन करीत असताना प्लॅस्टिकच्या वस्तू , बॉटल्स,कॅरी बॅग आणि अनावश्यक कचरा समुद्रात टाकू नये. समुद्र पर्यटन करीत असताना समुद्रातील सजीवांना इजा होऊ नये याची काळजी घ्यावी. समुद्र पर्यटन करीत असताना समुद्रातील नैसर्गिक वनस्पतीना आणि सूक्ष्मजीवांना क्षती पोहोंचवू नये याची काळजी घ्यावी. समुद्र पर्यटनाच्या वेळी किनाऱ्यावरील सजीवांचे संरक्षण करावे. किनारपट्टीवरील वाळू , माती, झाडे, झुडपे आणि वेली यांचे संरक्षण करावे.नैसर्गिकरित्या अस्तित्वात असलेला मासे आणि इतर जलचर प्राण्यांचा अधिवास समुद्रकिनाऱ्यावर आणि समुद्रामध्ये टिकून राहील याची काळजी घ्यावी. समुद्रातील पर्यटनाच्या वेळी पर्यटक आणि संबंधित घटकांनी पाण्याच्या आणि समुद्रकिनाऱ्याच्या स्वच्छतेची काळजी घेणे आवश्यक आहे.

**7) पर्यटन स्थळाच्या ठिकाणी वाहतूक व्यवस्था आणि निवास व्यवस्थेची निर्मिती:**

पर्यटन स्थळाच्या विकासाच्या संदर्भाने कार्य करीत असताना वाहतूकव्यवस्थेची आणि निवास व्यवस्थेची ची निर्मिती केली जाते. वाहतूक व्यवस्था निर्माण करीत असताना रस्ते बांधणी आणि आणि पूल बांधणी हे घटक महत्त्वपूर्ण असतात. हे सर्व कार्य मूळ भौगोलिक रचनेला अनुसरून करावे. वाहतूक व्यवस्था निर्माण करीत असताना रेल्वेमार्ग आणि रस्ते तयार करणे आवश्यक असते. काही पर्यटन स्थळांच्या ठिकाणी हवाई वाहतूकही उपलब्ध करून दिली जाते. यासाठी विमानतळे आणि विमानतळांपासून पर्यटन स्थळांपर्यंतचे रस्ते बांधले जातात. हे कार्य करीत असताना जमिनीचे आवश्यक तिथेच खणन करावे. शक्यतो नैसर्गिक दृष्टीने निर्माण झालेली भूरूपे नष्ट करू नयेत. यातून पर्यटन स्थळांच्या ठिकाणांची पर्यावरण संतुलन साधले जाते.

**8) पर्यावरण संतुलन आणि पशू, पक्षी, सूक्ष्मजीव आणि वनस्पती यांची विविधता :**

पर्यटन स्थळांच्या विकासाच्या योजना पूर्ण करीत असताना त्या ठिकाणच्या सर्व प्रकारच्या सजीवांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. पशू ,पक्षी, सूक्ष्मजीव आणि वनस्पती यांचे संरक्षण केल्यामुळे आपल्या पारंपारिक अधिवासाचा विकास होतो. सजीवांच्या सुरक्षिततेमुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होते. पर्यटन स्थळाच्या ठिकाणचे पशू,पक्षी, सूक्ष्मजीव आणि वनस्पती यांचे जतन केल्यामुळे आपल्याला महत्त्वपूर्ण आरोग्य विषयक फायदे होतात. स्थानिक नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण केल्यामुळे स्थानिक वनस्पती आणि प्राणी यांच्या विविध प्रजाती विकसित होतात. पर्यटन स्थळाचा विकास करीत असताना पर्यावरण संतुलनाची काळजी घेणे आवश्यक आहे.

**9) पर्यावरण संतुलन आणि मूलभूत विकास:**

पर्यटन स्थळाच्या ठिकाणी दिवसेंदिवस पर्यटकांची गर्दी वाढत असते त्यामुळे पायाभूत सुविधांचा विकास करावा लागतो. हा पायाभूत सुविधांचा विकास करीत असताना नैसर्गिक घटकांचे नुकसान करू नये. नैसर्गिकरित्या अनुकूल अशा जागेवरूनच रस्ते बांधावेत. पूल बांधण्यासाठी शक्यतो नैसर्गिक जागा निवडावी. रस्ते,पूल, इमारती,वीज केंद्रे, पाणी साठवण्याचे ठिकाण आणि धरणे इत्यादींचे बांधकाम करीत असताना जास्त नैसर्गिक हानी होऊ देऊ नये. पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी लागणारे सर्व साहित्य हे पर्याप्त स्वरूपातच उपलब्ध करून घ्यावे. पायाभूत सुविधांची निर्मिती करीत असताना नैसर्गिक वने, पाणवठे ,कुरणे, जंगले, वन्यजीवांचा अधिवास,विशिष्ट वनस्पतींचा प्रदेश यांचे नुकसान करू नये. हे सर्व घटक सुरक्षित ठेवल्यास पर्यावरण संतुलन चांगल्या प्रकारे राखले जाते.

**10) औद्योगिक विकास:**

पर्यटन स्थळांच्या विकासाबरोबरच स्थानिक उद्योगांचा आणि लघुउद्योगांचा विकास होत असतो. हा औद्योगिक विकास होत असताना पर्यटन स्थळाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. औद्योगिक वसाहतीतून निघणारे सांडपाणी,कचरा, टाकाऊ पदार्थ, घातक वायू,धूर, धुलीकण आणि टाकाऊ प्लास्टिक हे पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असलेल्या वास्तूंना क्षती पोहोंचवू शकतात. म्हणून औद्योगिक क्षेत्र हे पर्यटन वस्थळापासून विशिष्ट अंतरावर असावे. पर्यटन स्थळाच्या जवळ असलेल्या बाजारपेठांमध्ये

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटकांची वर्दळ असते. या ठिकाणी स्थानिक उद्योगांमध्ये तयार झालेल्या वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या असतात. पर्यटन स्थळ हे औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी अनुकूल असते. पर्यटन स्थळाच्या सुरक्षिततेसाठी आणि संवर्धनासाठी औद्योगिक क्षेत्र हे पर्यटन स्थळापासून विशिष्ट अंतरावर निर्माण करावे आणि त्याच ठिकाणी सर्व पायाभूत सुविधाही निर्माण कराव्यात.

**11) विविध विकास योजना:**

पर्यटन स्थळाच्या विकासासाठी विविध विकास योजना प्रत्यक्षात आणल्या जातात. पाणीपुरवठ्याची सोय करण्यासाठी खोदकाम पाईपलाईन जोडणे, धरण बांधणे, पाण्याची टाकी उभारणे आणि पंप हाऊस उभारणे अशा प्रकारच्या विकास कामांसाठी विशिष्ट जागा निश्चित करणे आवश्यक आहे.पर्यटन स्थळाच्या ठिकाणी नवीन निवासव्यवस्था आणि हॉटेल्स बांधले जातात, त्यांचे सांडपाणी ड्रेनेज सिस्टीमद्वारे दूरपर्यंत नेऊन सोडणे आवश्यक आहे. पर्यटन स्थळाच्या जवळ बाग,बगीचे, रमणीय देखावे, प्रसिद्धी फलक आणि होर्डिंग उभारले जातात, यामुळे पर्यटन स्थळाचे सौंदर्य बाधित होऊ नये याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पर्यटन स्थळाच्या ठिकाणी जीर्णोद्धार कार्य आणि पुनरुत्थान कार्य चालू असेल तर त्यातून निर्माण होणारे टाकाऊ पदार्थ, कचरा आणि टाकाऊ बांधकाम साहित्य हे दूरपर्यंत नेणे आवश्यक आहे. या सर्व बाबींची काळजी घेऊन पर्यटन स्थळाच्या जवळचे पर्यावरण संतुलन राखणे आवश्यक आहे.

**पर्यावरण संतुलनासाठी च्या उपायोजना :**

- पर्यटन स्थळाच्या विकासाचा कृती आराखडा तयार करूनच विकास कामे पूर्ण करावीत.
- पर्यटन स्थळाच्या ठिकाणी पर्यावरण संतुलन राखण्यासाठी पर्यावरण तज्ञांची मदत घेणे आवश्यक आहे.
- पर्यटन स्थळाच्या ठिकाणी असलेला नैसर्गिक अधिवास आणि भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास संबंधित घटकांनी करावा.
- पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी पर्यटन स्थळाच्या परिसरातील प्रशस्त जागा आणि जमीन शासकीय पातळीवर योग्य पद्धतीने अधिग्रहित करणे आवश्यक आहे.
- पर्यटन मार्गदर्शकांनी पर्यटकांना पर्यटन स्थळाच्या पर्यावरणीय सुरक्षिततेसाठी सतत सांगावे.
- पर्यटन ठिकाणच्या स्थानिक लोकांनी पर्यटन स्थळाच्या ठिकाणचे पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे.
- पुरातत्व खाते आणि संबंधित विभागांनी पर्यटन स्थळाच्या ठिकाणी शासकीय नियमानुसार पर्यावरण संवर्धनाची व्यवस्था निर्माण करावी.
- स्थानिक प्रशासनाने पर्यटन स्थळाच्या भोवती होणारे अतिक्रमण थांबवावे आणि पर्यटन स्थळ हे अतिक्रमणमुक्त करून प्रशस्त असे ठेवावे.
- पर्यटन स्थळाच्या ठिकाणी मानवी गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच पर्यटकांना पर्यटन स्थळाच्या ठिकाणी संचार करण्यासाठी योग्य अशा प्रकारची व्यवस्था संबंधित घटकांनी निर्माण करावी.
- पर्यटन स्थळाच्या संबंधित घटकांनी ठिकाणी पर्यावरणाचे नुकसान होत असेल तर तात्काळ उपाय योजना करून पर्यावरण संतुलन चांगल्या प्रकारे राखावे.

उपरोक्त सर्व चर्चेतून असे दिसून येते की पर्यटन स्थळे ही राष्ट्राची संसाधने आहेत. पर्यटन स्थळांच्या माध्यमातून राष्ट्राला मोठे उत्पन्न मिळते. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असलेल्या उद्योगांना पर्यटकांच्या वास्तव्यामुळे चालना मिळते.पर्यटन स्थळाच्या ठिकाणाचे पर्यावरण संतुलन योग्य अशा प्रकारे जतन केल्यास पर्यटक हे मोठ्या संख्येने पर्यटन स्थळाकडे येतात. पर्यटक जेव्हा पर्यटन स्थळाच्या ठिकाणी येतात, वास्तव्य करतात, स्थानिक वस्तूंची खरेदी करतात, पर्यटकांमुळे स्थानिक मनोरंजन साधनांचे उत्पन्न वाढते, पर्यटन मार्गदर्शकांनाही आर्थिक लाभ होतो. खाजगी वाहतूकदारांना उत्पन्न मिळते, स्थानिक हॉटेल व्यवसायिक आणि निवासव्यवस्था निर्माण करणाऱ्यांनाही उत्पन्न मिळते. भोजनालय चालविणाऱ्या स्थानिकांनाही उत्पन्न मिळतेआणि स्थानिक बाजारपेठेमध्ये खरेदी विक्री वाढते. यातून मोठ्या प्रमाणावरती स्थानिकांना रोजगारही प्राप्त होतो. पर्यटन स्थळाच्या ठिकाणी जे पर्यावरण संतुलन योग्य प्रकारे राखल्यास पर्यटन स्थळांचा आणि स्थानिक लोकांचा सर्वांगीण विकास होतो.

**संदर्भ ग्रंथ:**

1) डॉ.विठ्ठल घारपुरे -- पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स , नागपूर, 2001

2) प्रा. सु. प्र.दाते , प्रा.सौ. संजीवनी दाते-- प्राकृतिक भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर,1995

3) प्रा. डॉ.जी. एस. पिसे, प्रा. डॉ.एस. बी. नानवटे (डोल्हारे) -- पर्यटनशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशिंग हाऊस, न्यू दिल्ली 2 , 2025

4) डॉ. विठ्ठल घारपुरे -- आर्थिक भूगोल, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर, 2013

5) डॉ. व्ही.जे.पाटील, प्रा.एस. व्ही. ढाके --पर्यावरणशास्त्र,प्रशांत पब्लिकेशन्स,जळगाव,2010

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026


Original Article

# कृषी पर्यटनातून ग्रामविकास


**प्रा.डॉ. प्रल्हाद भोपे**
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख म.शि.प्र. मंडळाचे श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
**Email:** pralhadbhope@gmail.com



**Manuscript ID**:
JRD -2026-180131
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 124-127
January 2026
**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026



***सारांश***

*स्वातंत्र्योत्तर काळातील औद्योगिकरण व शहरीकरणामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढले. परिणामी शेतीपासून दुरावलेली नवी पिढी पुन्हा ग्रामीण जीवन, शेती व निसर्गाकडे आकर्षित होऊ लागली. याच पार्श्वभूमीवर कृषी पर्यटन ही संकल्पना उदयास आली. कृषी पर्यटन म्हणजे शेती आणि पर्यटन यांची सांगड घालून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळवून देणारा व पर्यटकांना ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव देणारा उपक्रम होय. या शोधनिबंधात कृषी पर्यटनाची संकल्पना, उगम, उद्देश, प्रकार, भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील स्थिती, तसेच ग्रामीण विकासातील त्याचे महत्त्व यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा, रोजगारनिर्मिती, स्थानिक संस्कृतीचे जतन, पर्यावरणपूरक व शाश्वत विकास साध्य होऊ शकतो. तसेच शहरी लोकांना ग्रामीण जीवनशैलीचा अस्सल अनुभव मिळतो. शासन, स्थानिक समाज व शेतकरी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून कृषी पर्यटन ग्रामीण विकासाचा प्रभावी मार्ग ठरू शकतो, असा निष्कर्ष या अभ्यासातून काढण्यात आला आहे.*



***मुख्यशब्द;*** *कृषी पर्यटन, ग्रामीण विकास, शेतकरी उत्पन्न, शाश्वत विकास, ग्राम पर्यटन, ग्रामीण अर्थव्यवस्था, रोजगारनिर्मिती, पर्यावरणपूरक विकास, स्थानिक संस्कृती, शेती व पर्यटन.*


## प्रस्तावना

स्वातंत्रोत्तर काळातील वाढत्या औद्योगिकरणामुळे ग्रामीण भारतातील लोकांनी शिक्षण-नौकरी – व्यवसाय-रोजगारासाठी शहरी भागाकडे धाव घेतली त्याचा परिणाम म्हणजे महाराष्ट्रातील अनेक शहरांचा जागतिक स्तरावर विकास झाला. परंतु मूळ शेतीपासून अनेक लोकदूर गेले व नव्या पिढीला सर्व शहरी गोष्टींचा उपभोग घेतल्यानंतर मात्र वडिलोपार्जित शेती खुणावू लागली आणि विसाव्या शतकाच्या अखेरीस कृषी पर्यटनाने जोर धरला. शेती म्हणजे काय? ती कशी असते? शेतकरी कसा काम करतो? यासारख्या गोष्टींनी शहरी पर्यटकांना आकर्षित करायला सुरुवात केली. कृषी पर्यटन उद्योग हा जगातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या उद्योगापैकी एक आहे. स्थानिक जैवविविधता, नैसर्गिक परीसंस्थांचे संवर्धन या संदर्भात पर्यटन उद्योग महत्वाची कामगिरी बजावू शकेल. धोरणकर्ते, शासन विकास संस्था, समाजातील सर्व घटक व पर्यटन क्षेत्रात काम करणारे खाजगी कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नाने पर्यटन उद्योग ग्रामीण भागाच्या दिर्घकालीन विकासातील मार्ग ठरू शकतो. कृषी पर्यटन ही आधुनिक काळात उदयास आलेली महत्वाची संकल्पना आकार घेत आहे. यातून बहुसंख्य खेड्याचा असलेल्या कृषिप्रधान भारताचा या संकल्पनेच्या विकासातून शाश्वत विकास साधेल. त्यासाठी कृषी पर्यटन संकल्पना,कृषी पर्यटनाचा उद्देश, उगम, कृषी पर्यटनाचे प्रकार, महत्व, निष्कर्ष व शिफारसी प्रस्तुत शोधनिबंधातून मांडलेले आहेत.

## शोधनिबंधाची गृहीतके

१. कृषी पर्यटनामुळे स्थानिक ग्रामीण विकास होत आहे.
२. कृषी उत्पादनास ग्राहक प्राप्त होत आहेत.
३. ग्रामीण जीवनाची नव्याने ओळख होत आहे.


Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18478588
OPEN ACCESS



**Address for correspondence:**
*प्रा.डॉ. प्रल्हाद भोपे, प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख म.शि.प्र. मंडळाचे श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*



**How to cite this article:**
*भोपे, . प्रल्हाद. (2026). कृषी पर्यटनातून ग्रामविकास. Journal of Research & Development, 18(1(V)), 124–127. https://doi.org/10.5281/zenodo.18478588*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**संशोधन पद्धती**

संशोधनाच्या अभ्यासाठी पूर्णपणे प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. कृषी पर्यटन उद्योग करणाऱ्या शेतकऱ्याची मुलाखत व दैनिके, मासिके, महाजालावरील माहितीचा वापर केलेला आहे.

**पर्यटन - संकल्पना**

पर्यटन हा शब्द आपल्या सर्वांच्या ओळखीचा आहे. पण पर्यटन म्हणजे केवळ प्रवास करणे एवढचं मर्यादित अर्थ नाही. तर तो एक अनुभव, एक आनंद, ज्ञानप्राप्ती आणि विश्रांती यांचा संगम आहे. पर्यटन ही संज्ञा प्रवास (Tour) या शब्दाशी संबधित आहे आणि प्रवास हा शब्द लॉटिन भाषेतील Tornos या शब्दापासून आलेला आहे. Tornos शब्दाचा मूळ अर्थ वर्तुळ किंवा वर्तुळाकार असा आहे. याच शब्दापासून पुढे वर्तुळाकार प्रवास किंवा Package Tour हा शब्द रूढ झाला. आजच्या आधुनिक जीवनशैलीत पर्यटनाला एक वेगळीच सामाजिक, आर्थिक व मानसिक गरज निर्माण झाली आहे. एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.

world Tourism Organization म्हणजेच जागतिक पर्यटन संस्थेने पर्यटनाची व्याख्या "जे लोकं प्रवास करून आपल्या परिसराबाहेरील जागी जाऊन सलग एक वर्षापेक्षा कमी काळ मनोरंजन, काम व इतर कारणांसाठी राहतात" अशी केलेली आहे. ग्राम पर्यटन म्हणजे ग्रामीण भागातील नैसर्गिक सौंदर्य, शेतीसंस्कृती, लोकजीवन, परंपरा, लोककला, सण-उत्सव, स्थानिक खाद्यसंस्कृती यांचा अनुभव पर्यटकांना प्रत्यक्ष देणारी पर्यटन संकल्पना होय.

**पर्यटनाचे प्रकार**

पर्यटनाचे कृषी, क्रीडा, साहसी, धार्मिक, आरोग्य, स्थानिक, व्यवसाय, वन्यजीव, नैमित्यिक, भौगोलिक, सांस्कृतिक, आंतरराष्ट्रीय, ऐतिहासिक, आंतरराज्यीय पर्यटन आदी प्रकार पडतात. त्यापैकी याठिकाणी कृषी पर्यटनाचा विचार आपण करणार आहोत.

**कृषी पर्यटन संकल्पना**

कृषी पर्यटन ही संकल्पना मुळची ब्राझील, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या देशामधील आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात ही संकल्पना सध्या मोठ्या प्रमाणात रुजू लागलेली आहे. जागतिक पर्यटन आणि प्रवास परिषदेच्या (WTC) अहवालानुसार पर्यटन व्यवसायाने भारतात २२.३ दशलक्ष रोजगार उपलब्ध करून दिले आहेत. भारतासारख्या कृषिप्रधान देशात या व्यवसायाला चांगला वाव आहे. ही संकल्पना काहींसाठी नवीन असली तरी, ग्रामीण जीवनातील शांततापूर्ण सौंदर्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याबाबत आहे. फुलांनी बहरलेली शेती, वाऱ्याची झुळूक आली की हळूवार डोलणारी झाडांवर लटकलेली फळे, पाटातून झुळूझुळू वाहणारे पाणी, वा-याबरोबर डोलणारे हिरवेगार गवत, पक्षांची किलबिल आणि फुलपाखरांची लगबग पहायला मिळते ती शेतावरच.

शेतामध्ये फिरताना आपल्याला आकाशात उंच उडणा-या पक्ष्यांसह तेजस्वी सूर्य, शेतात काम करणारे शेतकरी, शेतात चरणारी गुरे, पारंपारिक खेळ खेळणारी मुलं दिसतात. आपण सर्वांनी आपल्या आयुष्यात एकदातरी या दृश्याचा आनंद घेतला, परंतु तुम्हाला वाटते की हे आता पुन्हा शक्य आहे का? होय, हे शक्य आहे. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून प्रत्येकजण हे स्वप्न अनुभवू शकतो. कृषी पर्यटनामुळे निसर्गाने दिलेल्या भेटींचा आनंद घेण्याचा, मन प्रसन्न करण्याचा आणि शरीराला आराम देण्याचा मार्ग प्राप्त होतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, कृषी पर्यटनाचा विचार पर्यटन आणि शेतीचा क्रॉसरोड म्हणून केला जाऊ शकतो. अधिक तांत्रिकदृष्ट्या सांगितल्यास, कृषी पर्यटन हे व्यावसायिक उपक्रमाचे स्वरुप म्हणून परिभाषित केले जाऊ शकते जे कृषी उत्पादन आणि प्रक्रियेला पर्यटनाशी जोडते. अभ्यागतांना शेत, किंवा इतर कृषी व्यवसायाकडे आकर्षित करण्यासाठी किंवा अभ्यागतांचे मनोरंजन करण्याच्या हेतूने किंवा लोकांना शेतीबाबत शिक्षित केले जावे. शेत, कुरण किंवा व्यवसाय मालकासाठी उत्पन्न. अचूक व्याख्या किंवा शब्दावली काहीही असली तरी, कृषी पर्यटनाच्या कोणत्याही व्याख्येमध्ये खालील चार घटकांचा समावेश होतो.

१. पर्यटन आणि कृषी उद्योगांचे आवश्यक घटक एकत्र करते.
२. सार्वजनिक सदस्यांना कृषी कार्यांना भेट देण्यासाठी आकर्षित करते.
३. शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी डिझाइन केलेले आहे.
४. अभ्यागतांना मनोरंजन आणि शैक्षणिक अनुभव प्रदान करते.

जागतिक कृषी परिषद व वाहतूक परिषद ही एक महत्वाची आंतरराष्ट्रीय परिषद आहे. जी कृषी पर्यटन आणि वाहतूक क्षेत्रातील तज्ञांना एकत्र आणते. या परिषदेत कृषी परिषद आणि वाहतूक क्षेत्रातील नवीन ट्रेंड, समस्या आणि संधीवर चर्चा करत असते. या परिषदेने कृषी पर्यटनासंदर्भात काही तत्वे सांगितलेली आहेत.ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. कृषी पर्यटन हे पर्यटकांना प्राणी, पक्षी, शेती व निसर्ग या सारख्या काही गोष्टी पाहण्यासाठी संधी देते. याशिवाय संस्कृती, तेथील लोकांचे पेहराव, सण उत्सव व ग्रामीण खेळ यामुळे कृषी पर्यटकांचा आनंद द्विगुणीत होतो.

२. शेती विषयक कार्यातही पर्यटकांना सहभागी होता येते. त्याचबरोबर पोहणे, बैलगाडी चालविणे, हुर्डा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पार्टी, उंटावर व म्हशीवर बसून प्रवास करणे, शेतात न्याहारी करणे यासारख्या गोष्टीमध्ये पर्यटक सहभागी होवून प्रयत्नाचा आनंद घेतात.

३. ग्रामीण हस्तव्यवसातील, ड्रेस मटेरियल्स, शेतातील ताजी उत्पादने इ.ची पर्यटक एक आठवण म्हणून खरेदी करू शकतात.

थोडक्यात, सहभाग युक्त पर्यटन ही संकल्पना कृषी पर्यटनाद्वारे पर्यटकांना आनंद देवू शकते. अर्थातच कृषी पर्यटन हि एक नाविन्य संशोधित संकल्पना आहे त्यात पर्यटकासाठी नवनवीन बदल करून आकर्षित केले जाते. आपल्या शेती व्यवसायातून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी व पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करण्याच्या हेतूने शेतकरी आणि ग्रामीण जनता यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधा व सेवा स्वरूपाच्या अनेक नवनवीन कृती म्हणजे कृषी पर्यटन होय.

**कृषी पर्यटनाचा उद्देश**

कृषी पर्यटन ही एक अभिनव संकल्पना आहे जी कृषी आणि पर्यटन एकत्र करते. कृषी पर्यटनामध्ये शेत भेटी, शैक्षणिक कार्यक्रम, शेतीविषयक क्रिया आणि बरेच काही यांसारख्या विस्तृत उपक्रमांचा समावेश आहे, ज्याचा उद्देश शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, ग्रामीण जीवनाचा आणि शेतीचा आनंद आणि मनोरंजनाने भरलेला अनुभव देणे हा आहे.

**कृषी पर्यटनाचा उगम**

१८०० च्या उत्तरार्धात कृषी पर्यटनाचा शोध लागला जाऊ शकतो, जेव्हा कुटुंबे शहरातील उन्हाळयाच्या उष्णतेपासून बचाव करण्याच्या प्रयत्नात शेती करणाऱ्या नातेवाईकांना भेट देत असत. १९२० च्या दशकात मोबाईलच्या व्यापक वापरामुळे देशातील ग्रामीण जीवनाचा आनंद लुटणे अधिक लोकप्रिय झाले.

**भारतातील कृषी पर्यटन**

भारतातील सुमारे ७० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेती आणि शतीशी संबंधीत व्यवसायांवर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे, भारताच्या जीडीपी मध्ये शेतीचा वाटा २६ टक्के आहे. यावरुन भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. अलीकडच्या काळात शेतकरी त्यांच्या शेतमालाला योग्य बाजारभाव मिळावा यासाठी संघर्ष करत आहेत. भारतात महाराष्ट्र राज्याने सर्वप्रथम कृषी पर्यटनाची संकल्पना मांडली. कृषी पर्यटनाला चालना देणारे धोरण आणले. आज आपण पाहतोय तोट्याच्या शेतीमुळे शेतकऱ्यामध्ये प्रचंड उदासीनता आहे. शेतीत पैसा आणि प्रतिष्ठा उरलेली नाही. त्यामुळे शेती सोडून शहरात काहीतरी रोजगार मिळेल त्यामुळे खेड्यातून शहराकडे स्थलांतराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. तर शेतीत टिकून असणारे दुसऱ्या व्यवसायाकडे वळतांना दिसतात. अशा सर्व शेतकऱ्यांना आपल्या गावातच कृषी पर्यटनाच्या माध्यमातून एक चांगला व्यवसाय उभा करता येऊ शकतो.भारतातील कृषी पर्यटनाची सुरुवात करणाऱ्या अनेक राज्यांमध्ये महाराष्ट्र, केरळ, गुजरात, कर्नाटक, पंजाब, हरियाणा आणि नागालँड यांचा समावेश होतो. या समस्येवर कृषी पर्यटन हा एक चांगला परिणामकारक उपाय आहे. भारतातील कृषी पर्यटन बाजारपेठेने सुमारे २० टक्यांच्या दरम्यान उल्लेखनीय वाढीचा दर प्रदर्शित केला आहे.

शेतकऱ्यांना त्यांच्या पिढीजात मालकीच्या शेती बरोबरच पर्यटकांना सोयीची व पर्यटकाच्या दृष्टीने प्रसिध्द असलेली अनेक स्थळे कृषी पर्यटन केंद्र म्हणून विकसित करता येतील. १६ मे हा जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा केला जातो. सद्यास्थित महाराष्ट्रात पाचशेहून कृषी पर्यटनाची ठिकाणे आहेत.

**कृषी पर्यटनातील उपक्रमांचे प्रकार -** कृषी पर्यटन हे हंगामी आधारावर कार्य करणाऱ्या छोट्या ऑपरेशन्सपासून ते वर्षभर चालणाऱ्या मोठ्या ऑपरेशन्सपर्यंत ग्राहक सेवा देतात. गावाचे पर्यटन स्थळात रुपांतर करुन अर्थव्यवस्थेला हातभार लावण्याचे काम करत आहे. यामध्ये खालील उदाहरणे समाविष्ट आहेत.

- थेट विपणन
- आदरातिथ्य आणि फार्म स्टे
- प्राणीसंग्रहालय पाळीव प्राणी आणि आहार
- मनोरंजन उपक्रम
- फार्म टूर
- कृषी संग्रहालये
- कार्यक्रम आणि उत्सव
- परस्परसंवादी शिक्षण
- डेमो आणि शोकेस

**कृषी पर्यटनाचे महत्व**

पर्यटक, उत्पादक आणि समुदायांना अनेक आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक लाभ देण्यासाठी पर्यटन आणि कृषी उद्योगांचे पैलू एकत्र करण्याची एक अनोखी संधी कृषी पर्यटन सादर करते. कृषी पर्यटन उत्पादकांना अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याची संधी देते

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

आणि ग्राहकांना थेट विपणनासाठी एक मार्ग देते. एखाद्या भागात येणाऱ्या पर्यटकांची संख्या आणि त्यांच्या मुक्कामाचा कालावधी वाढवून हे पर्यटन उद्योग वाढवते.

कृषी पर्यटन समुदायांना त्यांचे स्थानिक कर बेस आणि नवीन रोजगार संधी वाढवण्याची क्षमता देखील प्रदान करते. याव्यतिरिक्त, कृषी पर्यटन लोकांना शैक्षणिक संधी प्रदान करते, शेतजमिनी जतन करण्यास मदत करते आणि राज्यांना व्यवसाय उपक्रम विकसित करण्यास अनुमती देते. कृषी पर्यटनामुळे नवीन संभाव्य महसूल प्रवाह निर्माण होऊ शकतो, परंतु ते शेतकरी आणि जमीन मालकांसाठी नवीन कायदेशीर समस्या देखील सादर करते.

सारांश, अशाप्रकारे कृषी पर्यटनामुळे शेतातील शैक्षणिक किंवा मनोरंजक उपक्रम, यू-पिक ऑपरेशन्स, लग्नाच्या सुविधा आणि इतर कार्यक्रम हे शेतकरी, ग्राहक आणि समुदाय यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याचा अद्भुत मार्ग आहे. कृषी पर्यटन उपक्रम खरेदीदारांची निष्ठा वाढवू शकतात, विक्री वाढवू शकतात आणि त्यांचे अन्न कोठून येते याविषयी लोकांची समज वाढवू शकतात. हे सर्व लोकांना शाश्वत शेती का महत्त्वाची आहे हे समजण्यास मदत करते! इतर सर्व कृषी उपक्रमांप्रमाणेच, कृषी पर्यटन उपक्रमांनाही जोखीम असते. चांगल्या जोखीम व्यवस्थापनामुळे उपक्रमाचे कोणतेही कायदेशीर धोके कमी करताना शेतातील घटनांचे मूल्य वाढविण्यात मदत होऊ शकते.

**निष्कर्ष**

१. कृषी पर्यटनातून ग्रामीण भागातील शेतकऱ्याचा आर्थिक विकास व रोजगार क्षमता वाढेल.
२. कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी सरकारची भूमिका महत्वपूर्ण आहे.
३. कृषी पर्यटन व वाहतूक क्षेत्रातील स्थिरता यामुळे पर्यावरण पूरक विकास होऊन शाश्वत विकासाकडे वाटचाल होईल.
४. कृषी पर्यटनासाठी मुलभूत व्यवस्थेत गुंतवणूक वाढविण्याची आवश्यकता आहे.
५. शहरी लोकांना ग्रामीण जीवनाचा अस्सल अनुभव मिळतो.
६. कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढेल.
७. स्थानिक परंपरा व संस्कृतीचे जतन होईल.
८. नैसर्गिक जीवनशैलीमुळे लोकांचे आयुर्मान वाढून हैप्पीनेस इंडेक्स वाढेल.

**शिफारशी**

१. कृषी पर्यटनासाठी योग्य जागेची निवड करावी.
२. शेती आणि पर्यटनाची सांगड घातली जावी.
३. स्थानिक कलावंतांना सहभागी करून घ्यावे.
४. कृषी पर्यटनाची स्वच्छता व सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष दक्षता घ्यावी.
५. शासनाने कृषी पर्यटनास शेतकऱ्यास अनुदान स्वरुपात प्रोत्साहन द्यावे.

**संदर्भग्रंथ व साधने**

१.https://mr.wikipedia.org/s/527
२.समजून घेऊया कृषी पर्यटन, ऑनलाईन लोकमत updated: August, 11, 2025 13: 12 IST
३.प्रभाकर काटेकर, कृषी पर्यटनाची आवश्यकता, डिसेंबर २००७
४.परभणी येथील सरदेशपांडे हुरडा पार्टी अग्रो टुरिझम मालकाची मुलाखत

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# मेडिकल टुरिजम: भारतातील वाढती संधी

**Dr. Priyanka Dolhare**
M.S. Assistant Professor Dept. Of obstetrics and gynaecology Sant Gajanan Maharaj Ayu. Medical College, Gadhinglaj, Kolhapur

**Manuscript ID:**
JRD -2026-180132
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 128-132
January 2026
**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*जागतिकीकरणाच्या काळात आरोग्यसेवा आणि पर्यटन यांचा संगम म्हणजे वैद्यकीय पर्यटन (Medical Tourism) होय. कमी खर्चात, दर्जेदार उपचार, तज्ज्ञ डॉक्टर, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि कमी प्रतीक्षा कालावधी यांमुळे भारत वैद्यकीय पर्यटनासाठी जागतिक पातळीवर एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत आहे. या लेखात वैद्यकीय पर्यटनाची संकल्पना, भारतातील वाढती संधी, आकर्षणाची कारणे, लोकप्रिय उपचार प्रकार तसेच आयुर्वेद, योग व वेलनेस आधारित पर्यटनाचे महत्त्व यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राबरोबरच आयुर्वेद, पंचकर्म, योग, ध्यान आणि होलिस्टिक हेल्थ या पारंपरिक उपचार पद्धतींचा समन्वय भारताला वैद्यकीय पर्यटनात विशेष स्थान देतो. केरळ, गोवा, ऋषिकेश, महाराष्ट्र यांसारखी राज्ये व ठिकाणे वैद्यकीय व वेलनेस पर्यटनासाठी प्रसिद्ध होत आहेत. वैद्यकीय पर्यटनामुळे रुग्णांना परवडणाऱ्या खर्चात उच्च दर्जाचे उपचार मिळतात, तर देशासाठी परकीय चलनवाढ, रोजगारनिर्मिती आणि आरोग्य क्षेत्राचा विकास साध्य होतो. त्यामुळे वैद्यकीय पर्यटन ही भारतासाठी केवळ आर्थिक संधी नसून भारतीय वैद्यकीय परंपरेचा जागतिक स्तरावरील विस्तार ठरतो, असा निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *वैद्यकीय पर्यटन, भारतातील वैद्यकीय पर्यटन, आयुर्वेद आधारित पर्यटन, वेलनेस टुरिझम, योग व ध्यान, पंचकर्म, आरोग्य सेवा, कमी खर्चातील उपचार, शाश्वत आरोग्य विकास, रोजगारनिर्मिती.*

**प्रस्तावना**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात आरोग्यसेवा केवळ उपचारांपुरती मर्यादित न राहता पर्यटनाशी जोडली गेली आहे. कमी खर्चात, दर्जेदार व तज्ञ वैद्यकीय सेवा मिळवण्यासाठी अनेक देशांतील रुग्ण परदेशात उपचार घेण्यासाठी येतात. या संकल्पनेला वैद्यकीय पर्यटन (Medical Tourism) असे म्हटले जाते. भारत हा वैद्यकीय पर्यटनासाठी जगातील एक महत्त्वाचा केंद्रबिंदू म्हणून उदयास येत आहे. जागतिक आरोग्स व्यवस्थेमध्ये गेल्या दोन दशकांत वैद्यकीय पर्यटन (Medical Tourism) हा एक वेगाने वाढणारा आरोग्य उद्योग म्हणून उदयास आला आहे. कमी खर्चात गुणवत्तापूर्ण उपचार, तज्ञ डॉक्टर, अत्याधुनिक उपकरणे व सुरक्षित प्रोटोकॉल मिळण्यासाठी रुग्ण परदेशात उपचार घेण्यासाठी प्रवास करतात [1]. भारत हा या क्षेत्रात जगातील एक अग्रगण्य देश म्हणून वेगाने पुढे येत आहे [2]

**वैद्यकीय पर्यटनसंकल्पना :**

Medical Tourism म्हणजे एखाद्या रुग्णाने आपल्या देशाबाहेर जाऊन नियोजनबद्ध वैद्यकीय उपचार घेणे आणि त्याचवेळी पर्यटनाचा अनुभव घेणे [3].

वैद्यकीय पर्यटनामध्ये diagnostics, surgery, IVF, dental, rehabilitation, Ayurveda, Yoga, Panchakarma आणि wellness उपचारांचा समावेश होतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*Dr. Priyanka Dolhare, M.S. Assistant Professor Dept. Of obstetrics and gynaecology Sant Gajanan Maharaj Ayu. Medical College, Gadhinglaj, Kolhapur*

**How to cite this article:**
*Dolhare, P. (2026). मेडिकल टुरिजम: भारतातील वाढती संधी. Journal of Research & Development, 18(1(V)), 128–132. https://doi.org/10.5281/zenodo.18478620*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18478620
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

2023 मध्ये हा उद्योग $100+ billion झाला असून 2030 पर्यंत मोठी वाढ अपेक्षित आहे [4].

**भारत Medical Tourism साठी आकर्षण असण्याची कारणे:**

**1. Low Cost + High Quality**

भारतामध्ये उपचार खर्च USA पेक्षा 60-90% कमी आहेत [1]. उदा., CABG Uमध्ये~$120,000 तर भारतात ~$10,000-$15,000 आहे.

**2. Internationally Trained Doctors**

भारतातील अनेक डॉक्टर foreign-trained व अनुभवसंपन्न आहेत. [2]

**3. Advanced Infrastructure**

NABH व JCI प्रमाणित रुग्णालये, robotic surgery, oncology units, IVF labs उपलब्ध आहेत. [3]

**4. Short Waiting Time**

कॅनडा/UK मध्ये elective surgery साठी 4-6 महिने वाट पहावी लागते तर भारतात त्वरित उपचार होतो [4].

**5. English-speaking workforce**

परदेशी रुग्णांसाठी संवाद सुलभता आहे.[5].

**6. Ayurveda + Yoga + Modern Medicine** यांचा सुंदर समन्वय आहे.

भारताचा unique integrated healthcare model [6].

**भारतातील लोकप्रिय उपचार:**

•Cardiac Surgery (CABG, Valve) [1]
•Orthopedic Surgery (Knee/Hip) [2]
•Neurosurgery [3]
•Oncology [3]
•IVF & Reproductive Medicine [2]
•Cosmetic & Plastic Surgery [1]
•Dental Procedures [7]
•Ayurveda & Panchakarma [6]

**Ayurveda आधारित Medical Tourism भारताची जागतिक ओळख:**

आयुर्वेद, भारतातील एक प्राचीन स्वदेशी चिकित्सा आणि औषध प्रणाली, 5,000 वर्षांहून अधिक जुनी आहे. [8]. ती अथर्ववेदाचा उपवेद मानली जाते. जगातील सर्वात जुने लिखित साहित्य असलेल्या ऋग्वेदात औषधी उद्देशांसाठी औषधी वनस्पतींचा वापर उल्लेख आहे. शब्दशः, आयुर्वेद हा शब्द दोन शब्दांचे संयोजन आहे. आयुवेद. आयु म्हणजे जीवन आणि वेद म्हणजे विज्ञान. अशाप्रकारे, आयुर्वेद हे जीवनाचे विज्ञान आहे, केवळ रोगांचे विज्ञान नाही. आयुर्वेदाचे ब्रीदवाक्य आहे,

"स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम्, अतुरस्य विकार प्रशमन," म्हणजे "आरोग्याला प्रोत्साहन देणे आणि रोग रोखणे." [9] त्याच्या तत्त्वांच्या शक्तीवरील विश्वास भारतीय संस्कृतीत आहे. भारतात औषधी वनस्पतींच्या प्रचंड उपलब्धतेने नेहमीच या वैज्ञानिक औषध प्रणालीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भारतीय संस्कृतीने भूमिका बजावली आहे.

आयुर्वेद हे प्राचीन वैदिक ज्ञान आरोग्याचे विज्ञान आहे. जे मन आणि शरीर यांच्यातील वैश्विक तत्त्वे आणि संबंध जाणून जीवनातील सर्व प्रगती घडवणारे निसर्गाचे नियम यांच्या सखोल आकलनावर आधारित आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत दीर्घकालीन आजार, मानसिक ताण, जीवनशैली विकार आणि प्रतिकारशक्ती कमी होणे या समस्या जागतिक स्तरावर वाढत आहेत. आधुनिक वैद्यकशास्त्र आजारावर तात्काळ उपचार देते, मात्र संपूर्ण आरोग्य (Holistic Health) ही संकल्पना आयुर्वेदात हजारो वर्षांपासून अस्तित्वात आहे. याच कारणामुळे आयुर्वेद आधारित वैद्यकीय पर्यटन (Ayurveda-based Medical Tourism) ही संकल्पना आज जगभर वेगाने लोकप्रिय होत आहे.

**1. Panchakarma Therapies**

Vamana, Virechana, Basti, Nasya, Raktamokshana arthritis, skin disease, PCOS, obesity भारतात असे प्रभावी आयुर्वेदिक उपचार केले जातात. [10]

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**2. Lifestyle Disease Management**

अस्वास्थ्यकर जीवनशैलीमुळे होणारे दीर्घकालीन आजार,मधुमेह (Diabetes),उच्च रक्तदाब(Hypertension),हृदयविकार,स्थूलपणा (Obesity), थायरॉईड विकार, PCOS, तणाव, नैराश्य, हाय कोलेस्टेरॉल अशा पेशंटची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या सर्वांवर भारतातील परिणामकारक उपचार पद्धती लोकप्रिय ठरत आहे. [9].

Lifestyle Disease Management चे फायदे:

•आजारांचे नियंत्रण व प्रतिबंध,

•औषधांवरील अवलंबित्व कमी,

•जीवनमान व कार्यक्षमता वाढते,

•दीर्घायुष्य व मानसिक शांती लाभते.

**3. Women's Health & Infertility**

PCOS, Dysmenorrhea, Infertility मध्ये प्रोटोकॉल [10].

**4. Mental Wellness**

Yoga + Dhyan = Stress, Anxiety, Depression मध्ये चांगले परिणाम (11)

**Wellness Destinations in India**

1. Kerala & Goa Panchakarma Resorts [6]

केरल आणि गोआ मधील प्रमुख Panchakarma / आयुर्वेदिक वेलनेस रिट्रीट / रिसॉर्ट्स् हे वैद्यकीय पर्यटनासाठी पंचकर्म, डिटॉक्सिफिकेशन, रेज्युएनरेशन आणि होलिस्टिक वेलनेसचा अनुभव देतात .

**2. Rishikesh & Himalaya Yoga & Spiritual Tourism (11) Hatha Yoga Rishikesh**

ऋषिकेश हे जगातील Yoga Capital of the World म्हणून ओळखले जाते आणि ते योग, ध्यान, अध्यात्मिक शोध आणि हिमालयाच्या पवित्रतेचा अनुभव घेण्यासाठी एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र आहे. हे गंगेशी जोडलेले, शांत हिरवे पर्वतराजीमधले शहर आहे जिथे लोक आपल्या अंतर्मुखी प्रवासासाठी वर्षभर येतात.

**3. Pune Iyengar Yoga Institute (12)**

Ramamani Iyengar Memorial Yoga Institute हे जगातील सर्वात प्रतिष्ठित Iyengar Yoga केंद्र मानले जाते आणि योग शिक्षक, अभ्यासक किंवा आरोग्य-मनाच्या शोधासाठी योग जाणून घेणाऱ्यांसाठी हे एक आकर्षित करणारे पर्यटन स्थळ आहे.

**4. Igatpuri Vipassana Centre [12]**

इगतपुरीमधील प्रमुख Vipassana Meditation केंद्र जे योग, ध्यान व अध्यात्मिक पर्यटनासाठी भारतात प्रसिद्ध आहेत .

**5. Mount Abu Rajyoga Spiritual University [12]**

मानसिक शांती , तणाव मुक्त जीवन आणि आत्मउन्नतीसाठी राजस्थान येथील माउंट आबू येथे राजयोग साधनेचे आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त विश्वविद्यालय आहे. १४० पेक्षा जास्त देशांमध्ये राजयोगाचा प्रचार आणि प्रसारासाठी केंद्र निर्माण झाले आहेत. मोठ्या संख्येने देश विदेशातील लोक राजयोग करण्यासाठी माउंट आबू येथे जातात. याशिवाय वेगवेगळ्या रोगांवर उपचार करण्यासाठी विशेष उपचार पद्धतीचे रुग्णालय तेथे निर्माण केलेली आहेत. माउंट अबू हे राजस्थान राज्यातील एकमेव हिल स्टेशन अरवली पर्वत रांगेत आहे. वर्षभर येथे पर्यटक येत असतात.

**महाराष्ट्रातील वैद्यकीय पर्यटन:**

महाराष्ट्र हा वैद्यकीय पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र असून महाराष्ट्र मध्ये आरोग्य सेवा याचबरोबर पर्यटन अनुभव याचा एकत्रित अनुभव उपलब्ध करून देण्यावर भर वाढत आहे. येथे उच्च दर्जाच्या हेल्थकेअर सुविधा, तज्ञ डॉक्टर आणि परवडणाऱ्या खर्चामुळे राज्य वैद्यकीय पर्यटनासाठी प्रमुख ठिकाण बनत आहे.

**1. Wellness Destinations in Maharashtra:**

**(प्रमुख रुग्णालये आणि हेल्थकेअर केंद्रे)**

**मुंबई**

Kokilaben Dhirubhai Ambani Hospital
Nanavati Max Super Specialty Hospital
अनेक सुपर-स्पेशालिटी व ट्रॉमा केंद्रे पुणे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Jehangir Hospital (गायिनीकॉलॉजी, कॅर्डियाक, नेफ्रोलॉजी इ.)

**नाशिक**

Shree Saibaba Heart Institute

कार्डियाक आणि इमरजन्सी केअर .

विविध मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल्स (कर्करोग, नेत्ररोग, यूरोलॉजी, आदि)

**इतर शहरांमध्ये**

Aurangabad, Nandurbar, Latur यांसारख्या ठिकाणी नवनिर्मित सरकार व खाजगी मेडिकल कॉलेज्स आणि हॉस्पिटल्स आहेत.

**2. महाराष्ट्र सरकार चे वैद्यकीय पर्यटन धोरण:**

महाराष्ट्र सरकार Medical & Wellness Tourism धोरणांतर्गत, योग केंद्र,आयुर्वेद सेंटर,Destination Spas,वेलनेस सेंटर ची जाहिर संकल्पना ठेवून टुरिझमला वैद्यकीय अनुभवासोबत जोडण्याचा प्रयत्न करत आहे.

Maharashtra Tourism या अंतर्गत पर्यटकांना पॅचकर्मा, आयुर्वेदिक उपचार, योग व ध्यान, पर्यटन स्थळांचा अनुभव, संपूर्ण “आरोग्य + सुट्टी” एकत्र अनुभवता येतो. सरकारच्या महाराष्ट्र पर्यटन धोरण 2024–28 मध्ये वैद्यकीय पर्यटन व वेलनेस टुरिझम यांना प्राधान्य दिले आहे. नवीन धोरणानुसार उच्च-गुणवत्तेची वैद्यकीय सेवा, हॉटेल/हॉस्पिटल नेटवर्क आणि सुविधा सुधारण्याच्या प्रकल्प राबवले जातात.

3. MTDC ने Hospitals + Hotels + Travel + insurance यांच्यात समन्यय साधणारी योजना केली आहे [13]

**भारतामध्ये वैद्यकीय पर्यटनाचे फायदे आणि आर्थिक महत्त्व:**

- रुग्णांसाठी कमी खर्च येतो [11],
- उपचार पद्धतीच्या उच्च प्रक्रिया आहेत [2],
- कमी प्रतीक्षा ,परवडणाऱ्या खर्चात लवकर उपचार मिळतात[4],
- wellness recovery सकारात्मक परिणाम होत आहेत[6],
- देशासाठी: foreign exchange वाढत आहे [3], •मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत आहे [13],
- मोठ्या प्रमाणावरआरोग्य क्षेत्राचा विकास होत आहे [13],
- औषधी वनस्पती उद्योगात वाढ होत आहे [8].
- कुशल डॉक्टर आणि जागतिक-मानक सुविधा
- Medical + Wellness एकाच ट्रिप मध्ये
- परदेशातून आणि देशभरातून रुग्णांचे आगमन वाढत आहे.
- स्थानिक अर्थव्यवस्थेला फायदा (हॉस्पिटल, हॉटेल, सेवा, वाहतूक)

**आयुर्वेद, योग आणि पर्यटन एक परिपूर्ण संकल्पना :**

आयुर्वेदिक वैद्यकीय पर्यटन हे केवळ औषधांपुरते मर्यादित नसून योग,ध्यान,सात्त्विक आहार,निसर्गसंपन्न वास्तव्य यांचा समन्वय असतो. परदेशी रुग्णांसाठी हा Healing Retreat Experience असतो.वैद्यकीय पर्यटनाला आपल्या देशात आयुर्वेद व योगशास्त्राची भरभक्कम साथ पूर्वीपासून आहे.हजारो वर्षाची परंपरा लाभलेल्या आयुर्वेद व योगाची प्रचिती आल्याने त्याचा लाभ घेण्यासाठी भारतात गरजूंनी येण्याची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे. वैद्यकीय पर्यटनात योग, विपश्यना, आयुर्वेद, होमिओपॅथी, पंचकर्म, युनानी सिद्धपचार, निसर्गोपचार आदी उपचार घेतले जातात. भारतामध्ये केरळ आणि गोवा येथे आयुर्वेद पर्यटन विशेष प्रसिद्ध आहे. येथे आयुर्वेदामध्ये उपचार पद्धतीत वेगवेगळे प्रयोग केले जातात.

**महत्व** :

वैद्यकीय पर्यटन ही भारतासाठी केवळ आर्थिक संधी नसून भारतीय वैद्यकीय परंपरेचा जागतिक विजय आहे. आरोग्य क्षेत्रात भारताचे स्थान अधिक मजबूत करण्याचे माध्यम आहे.आधुनिक वैद्यकशास्त्र व पारंपरिक आयुर्वेद यांचा संगम भारताला वैद्यकीय पर्यटनात अग्रगण्य बनवू शकतो.

शास्त्रशुद्ध आयुर्वेद, अनुभवी वैद्य आणि निसर्गसंपन्न वातावरण यांच्या बळावर भारत आयुर्वेदिक वैद्यकीय पर्यटनात जागतिक नेतृत्व करू शकतो.वैद्यकीय पर्यटनाचे फायदे रुग्णांसाठी कमी खर्च,दर्जेदार उपचार,जलद उपचार,मानसिक व शारीरिक आराम

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

मिळतो.देशासाठी परकीय चलन मिळते,रोजगार निर्मिती होते,आरोग्य सेवा क्षेत्राचा विकास होण्यास मोठा वाव आहे.आयुर्वेदिक वैद्यकीय पर्यटनाचे आर्थिक व सामाजिक फायदे पाहता आयुर्वेद हॉस्पिटल्स व रिसॉर्ट्सची मागणीत वाढ होत आहे.डॉक्टर, थेरपिस्ट, नर्सेस यांना रोजगार संधी उपलब्ध आहेत.स्थानिक औषधी वनस्पती उद्योगाला चालना मिळत आहे.

**Reference List:**

1. Medical Tourism Association, Global Medical Tourism Report, 2023
2. Pathak S, Mishra R., Medical Tourism in India, 2019
3. Connell J., Medical Tourism: Sea, Sun, Surgery, 2015
4. WHO Global Observatory on Medical Tourism, WHO Report 2023
5. Ministry of External Affairs, Healthcare Tourism Report, 2022
6. Ministry of AYUSH, Govt of India, Annual Report 2022
7. Dental Tourism Council of India, Outcome Data, 2021
8. Sharma P.V., History of Ayurveda, Chaukhamba, 1992
9. Charaka Samhita, Sutrasthana 30/26
10. Panchakarma Guidelines, Ministry of AYUSH, 2021
11. United Nations Yoga & Wellness Report, 2021
12. Incredible India Tourism, Govt of India, 2022
13. MTDC Medical Tourism Plan, 2021

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन क्षेत्रात मार्गदर्शकाची भूमिका

**डॉ. सीमा बाबाराव नानवटे**
ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180133
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 133-138
January 2026
**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन क्षेत्राचा वेगाने होत असलेला विस्तार पाहता पर्यटन मार्गदर्शकाची (टूर गाईड) भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. मार्गदर्शक हा केवळ माहिती देणारा व्यक्ती नसून तो पर्यटक आणि पर्यटनस्थळ यांच्यातील प्रभावी दुवा, सांस्कृतिक प्रतिनिधी व विश्वासू सहकारी असतो. पर्यटनस्थळांचा इतिहास, संस्कृती, परंपरा, कला, वास्तुकला व भूगोल यांची अचूक व रंजक माहिती देऊन मार्गदर्शक पर्यटकांचा अनुभव समृद्ध करतो. प्रवासाचे योग्य नियोजन, वेळ व्यवस्थापन, सुरक्षिततेची काळजी, आपत्कालीन परिस्थितीत मदत आणि संवाद सुलभता यांमुळे पर्यटन अधिक सुरक्षित व संस्मरणीय बनते. या अभ्यासात पर्यटन मार्गदर्शकाची संकल्पना, पात्रता, आवश्यक कौशल्ये, आचारसंहिता, विविध प्रकारचे मार्गदर्शक तसेच पर्यटनातील त्यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. पर्यटन मार्गदर्शक जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देतो, पर्यावरण व सांस्कृतिक वारशाचे संरक्षण घडवून आणतो आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतो. त्यामुळे पर्यटनाच्या दर्जोन्नतीसाठी, देशाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यासाठी व शाश्वत पर्यटन विकासासाठी मार्गदर्शकाची भूमिका अनन्यसाधारण आहे, असा निष्कर्ष या लेखातून मांडण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन मार्गदर्शक, टूर गाईड, पर्यटन विकास, सांस्कृतिक वारसा, जबाबदार पर्यटन, पर्यटक अनुभव, पर्यटन व्यवस्थापन, पर्यटन उद्योग, शाश्वत पर्यटन.*

**प्रस्तावना**

पर्यटन क्षेत्राचा विस्तार सध्या अधिक तीव्रतेने होत आहे. पर्यटनात मोठी विविधता आहे. भारतात तिन्ही ऋतूमध्ये पर्यटन करण्यासाठी अनुकूल वातावरण आहे. पर्यटक हा आपल्या आवडीनिवडीप्रमाणे पर्यटन स्थळाला भेट देत असतो यात गडकिल्ले, लेणी, स्तूप, चैत्य, विहार,मंदिर, ऐतिहासिक ठिकाण, स्मारक, थंड हवेची ठिकाणे, समुद्रकिनारे, साहसी पर्यटकांसाठी अशी अनेक ठिकाण आहेत. पर्यटन स्थळाची माहिती सांगणारा मार्गदर्शक सोबत असेल तर पर्यटनाचा परिपूर्ण आनंद घेता येतो.पर्यटन क्षेत्रात मार्गदर्शक (टूर गाईड) हा पर्यटक आणि पर्यटनस्थळ यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतो. प्रवास अधिक माहितीपूर्ण, सुरक्षित आणि संस्मरणीय बनवण्यात मार्गदर्शकाची भूमिका अत्यंत मोलाची असते. पर्यटन हा केवळ प्रवास व मनोरंजनाचा विषय नसून तो देशाच्या आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा कणा आहे. भारतासह अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे योगदान मोठ्या प्रमाणावर दिसून येते.पर्यटन हे रोजगारनिर्मिती, परकीय चलन, प्रादेशिक विकास व राष्ट्रीय उत्पन्न वाढ यासाठी अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. त्यामुळे कोणत्याही देशाच्या शाश्वत आर्थिक विकासात पर्यटनाचा वाटा अनन्यसाधारण आहे.

पर्यटन क्षेत्रात पर्यटन उद्योगाने शतकानुशतके मोठा प्रवास केला आहे. 2021 मध्ये प्रवास आणि पर्यटन क्षेत्राने जागतिक जीडीपीमध्ये 10.3% (सुमारे 9 ट्रिलियन डॉलर्स) इतके योगदान दिले.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. सीमा बाबाराव नानवटे, ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी.*

**How to cite this article:**
*नानवटे, . सीमा . बाबाराव . (2026). पर्यटन क्षेत्रात मार्गदर्शकाची भूमिका. Journal of Research & Development, 18(1(V)), 133–138.* https://doi.org/10.5281/zenodo.18479462

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18479462
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

त्या वर्षी जपान, स्पेन आणि अमेरिका हे ट्रॅव्हल अँड टुरिझम डेव्हलपमेंट इंडेक्स (TTDI) मध्ये अव्वल तीन देश होते, आणि सध्या केवळ अमेरिकेतच सुमारे 47,000 पर्यटनातील मार्गदर्शक(टूर गाईड) कार्यरत आहेत.पर्यटनातील मार्गदर्शक हा केवळ माहिती देणारा नसून तो शिक्षक, मित्र, व्यवस्थापक आणि सांस्कृतिक प्रतिनिधी असतो. संस्कृतीचा वाहक असतो. पर्यटनाचा दर्जा उंचावण्यात आणि देशाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यात मार्गदर्शकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.पर्यटक गाईड म्हणून करिअरच्या अनेक आकर्षक व विविध संधी उपलब्ध आहेत. भारतात पर्यटन क्षेत्र झपाट्याने वाढत असल्याने प्रशिक्षित व अनुभवी गाईड्सना मोठी मागणी आहे.

**व्याख्या**

आजच्या काळात पर्यटन मार्गदर्शकाचे काम जगभरातील प्रेक्षणीय स्थळांइतकेच विविध आहे. त्यामुळे या व्यवसायाची अचूक व्याख्या करणे कठीण ठरते. एक प्रचलित म्हण लक्षात घेऊन, मेरियम-वेबस्टर शब्दकोश टूर गाईडची सोप्या शब्दांत अशी व्याख्या करतो, "जो व्यक्ती लोकांना एखाद्या प्रदेशात फिरवतो आणि त्या ठिकाणाविषयी रंजक माहिती देतो."

**पर्यटन मार्गदर्शक पात्रता :**

एक चांगला पर्यटक मार्गदर्शक (टूर गाइड) होण्यासाठी शैक्षणिक पात्रता (उदा. १२ वी उत्तीर्ण किंवा पदवी), पर्यटन/इतिहास/संस्कृतीचे ज्ञान, तसेच प्रभावी संवादकौशल्य, कथा सांगण्याची कला आणि समस्या-निराकरण क्षमता आवश्यक असते. यासोबतच प्राथमिक उपचारांचे (फर्स्ट-एड) प्रशिक्षण आणि वैध परवाना असणे गरजेचे आहे. मात्र औपचारिक पदवी अनिवार्य नसून अनुभव आणि कौशल्ये अधिक महत्त्वाची मानली जातात.

**शैक्षणिक पात्रता :**

कोणत्याही शाखेत १०+२ (१२ वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. कला, इतिहास, पुरातत्त्वशास्त्र किंवा पर्यटन विषयातील पदवी अतिरिक्त लाभ देऊ शकते.

**विशिष्ट अभ्यासक्रम :**

पर्यटन विषयातील डिप्लोमा, प्रमाणपत्र अभ्यासक्रम किंवा बॅचलर ऑफ व्होकेशन (B.Voc.) असे अभ्यासक्रम करता येतात.

**शासकीय नियुक्ती :**

केंद्र किंवा प्रांतीय सरकार त्यांच्या केंद्रांवर राजनैतिक संचालकांची नियुक्ती करतात. सरकार अशा नियुक्त्यांसाठी जाहिरात करते. निवडलेल्या व्यक्तींना स्थानिक संस्कृती, भाषा आणि विविध उपक्रमांमध्ये विविध प्रशिक्षण दिले जाते. जेणेकरून ते पर्यटकांना कार्यक्षमतेने सेवा देऊ शकतील.
पर्यटन मंत्रालयाने मान्य केलेला पर्यटक मार्गदर्शक परवाना (लायसन्स) मिळवणे अनिवार्य आहे.

**प्राथमिक उपचार :**

प्राथमिक उपचार आणि सीपीआर (CPR) चे प्रशिक्षण आवश्यक आहे.

**पर्यटन मार्गदर्शकाची आवश्यक कौशल्ये :**

एक उत्तम पर्यटन मार्गदर्शक होण्यासाठी काही विशिष्ट कौशल्ये आवश्यक असतात. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे,

**1) पारस्परिक कौशल्ये**

या व्यवसायात लोकांशी उत्तम वर्तन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. संवादकौशल्य, लोकांच्या गटाला अधिकारपूर्वक मार्गदर्शन करण्याची क्षमता आणि सदैव हसतमुख स्वभाव हे यशासाठी आवश्यक घटक आहेत.

**2) गहन ज्ञान आणि तज्ज्ञता**

पर्यटन मार्गदर्शक हे त्यांच्या क्षेत्रातील तज्ज्ञ असतात. त्यांना गंतव्यस्थान, त्याचा इतिहास, संस्कृती आणि महत्त्वाच्या स्थळांविषयी सखोल व व्यापक ज्ञान असते. ते प्रवाशांना असा संदर्भ व सविस्तर माहिती देतात, जी मार्गदर्शक पुस्तके किंवा स्वतःहून केलेल्या प्रवासातून सहज मिळत नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**3) वेळ व्यवस्थापन (Time Management)**

पर्यटन मार्गदर्शक ठरावीक वेळेत होणारे मार्गदर्शन परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करतात, ज्यामध्ये दौऱ्याचे सर्व पैलू समाविष्ट असतात आणि सर्व काही वेळेत पार पडते याची खात्री केली जाते.

**4) सुरक्षा प्रशिक्षण (Safety Training)**

दौऱ्याच्या ठिकाणानुसार विशेष सुरक्षा प्रशिक्षणाची गरज भासू शकते. गटातील कोणाला वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती उद्भवली किंवा दुखापत झाली तर सीपीआर देणे किंवा प्राथमिक उपचार करता येणे आवश्यक ठरू शकते. असे प्रशिक्षण पर्यटन मार्गदर्शकाला आवश्यक असते.

**5) समस्या-निराकरण कौशल्ये** (Problem-Solving Skills) सामान हरवण्यापासून ते वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीपर्यंत, पर्यटन मार्गदर्शकालाअनपेक्षित समस्यांना कुशलतेने आणि प्रभावीपणे हाताळता आले पाहिजे. ते साधनसंपन्न असावेत आणि तात्काळ उपाय शोधण्यात सक्षम असावेत.

**6) अनेक भाषांचे ज्ञान**

पर्यटन मार्गदर्शकालाअनेक भाषा येणे आवश्यक आहे .पर्यटन मार्गदर्शक जगभरातील लोकांसोबत काम करतात आणि अनेकदा एका दिवसात विविध भाषांचा सामना करतात. त्यामुळे यशस्वी होण्यासाठी टूर गाईडला अनेक भाषा येणे आवश्यक आहे का, असा प्रश्न पडू शकतो. आधुनिक तंत्रज्ञानामुळे तसे असणे अनिवार्य नाही. कम्युनिकेशन हेडसेटसारख्या साधनांच्या मदतीने टूर गाईड सहजपणे दुभाष्याशी संपर्क साधू शकतात, ज्यामुळे माहिती त्वरित सर्वांपर्यंत पोहोचवता येते.

**पर्यटक गाईडची आचारसंहिता :**

**1) प्रामाणिकपणा व सचोटी**

पर्यटकांना खरी, अचूक व प्रमाणित माहिती द्यावी

चुकीची, अतिशयोक्त किंवा दिशाभूल करणारी माहिती देऊ नये.ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक बाबींमध्ये तथ्यांचे भान ठेवावे

**2) शिष्टाचार व वर्तन**

पर्यटकांशी सभ्य, नम्र व आदरपूर्वक वागावे

कोणताही भेदभाव (धर्म, भाषा, देश, लिंग इ.) करू नये.असभ्य भाषा, उद्धटपणा किंवा आक्रमक वर्तन टाळावे

**3) वेळेचे व शिस्तीचे पालन**

ठरलेल्या वेळेला उपस्थित राहणे
टूर कार्यक्रमाचे काटेकोर पालन करणे
उशीर किंवा बदल असल्यास पर्यटकांना आधीच कळवणे

**4) पोशाख व व्यक्तिमत्त्व**

स्वच्छ, नीटनेटका व परिस्थितीनुसार पोशाख

अधिकृत ओळखपत्र / लायसन्स जवळ ठेवणे
स्वतःचे वर्तन देशाची प्रतिमा दर्शवते याची जाणीव ठेवणे

**5) पर्यटकांची सुरक्षितता**

पर्यटकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य
आपत्कालीन परिस्थितीत योग्य मार्गदर्शन करणे
प्राथमिक उपचारांचे मूलभूत ज्ञान वापरणे
धोकादायक ठिकाणी खबरदारी घेणे इत्यादी कौशल्य महत्त्वाचे आहे.

**6) आर्थिक पारदर्शकता**

शुल्क, तिकीट, देणग्या इ. बाबतीत स्पष्ट माहिती देणे

अनधिकृत कमिशन, लाच किंवा फसवणूक टाळणे

पर्यटकांना जबरदस्तीने खरेदीस प्रवृत्त करू नये.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

7) **कायदे व नियमांचे पालन**

स्थानिक, राज्य व राष्ट्रीय कायद्यांचे पालन

पुरातत्त्वीय स्थळांवरील नियम (ASI नियम) काटेकोरपणे पाळणे.

संरक्षित स्थळांवर नुकसान होईल असे वर्तन टाळणे.

8) **पर्यावरण व वारसा संवर्धन**

पर्यटकांना स्वच्छता व पर्यावरण रक्षणाचे महत्त्व सांगणे.कचरा न टाकणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे.ऐतिहासिक व नैसर्गिक वारशाचा आदर करणे

धार्मिक वारसाच्या ठिकाणाची कोणत्याही प्रकारे शांतीभंग होऊ नये याची गांभीर्याने दक्षता घेता यावी.

ऐतिहासिक पर्यटन करताना कोणताही वाद निर्माण होणार नाही अशी चर्चा करू नये.

9) **गोपनीयता व व्यावसायिक मर्यादा**

पर्यटकांची वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवणे

वैयक्तिक, राजकीय किंवा धार्मिक मत लादू नये

व्यावसायिक मर्यादा ओलांडू नयेत.

10) **सतत अद्ययावत राहणे**

इतिहास, संस्कृती, पर्यटन नियम यांची माहिती सतत अपडेट ठेवणे नवीन कौशल्ये व भाषा शिकण्याचा प्रयत्न करणे

पर्यटक गाईड हा देशाचा सांस्कृतिक दूत असतो. योग्य आचारसंहिता पाळल्यास पर्यटकांचा विश्वास वाढतो.वैयक्तिक प्रतिष्ठा व करिअरमध्ये प्रगती होते.भारताची सकारात्मक प्रतिमा जागतिक स्तरावर पोहोचते .

**अधिकृत पर्यटन मार्गदर्शक**
**प्रकार**

भारतात अधिकृतपणे पर्यटन मार्गदर्शक (टूर गाईड) म्हणून काम करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाकडून मान्यता प्राप्त परवाना (लायसन्स) असणे अनिवार्य आहे. सरकार प्रादेशिक स्तरावरील पर्यटन मार्गदर्शकांना परवाने देते तसेच प्रादेशिक स्तर मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यक्रम (RLGTP) राबवते. हे कार्यक्रम आणि प्रशिक्षण सत्रे भारतीय पर्यटन व प्रवास व्यवस्थापन संस्था (IITTM) किंवा इतर सरकारमान्य संस्थांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली जातात.

**साहसीपर्यटन गाईड**

साहसी पर्यटन करताना ते केंद्रित (विशेष) टूरचे नेतृत्व करतात. त्यांच्याकडे संबंधित उपक्रमांचे आवश्यक कौशल्य आणि ज्ञान असते, ज्याच्या आधारे ते मार्गदर्शन व सूचना देतात आणि सहभागींच्या सुरक्षिततेची खात्री करतात. साहसी (ॲडव्हेंचर) गाइड पर्यटकांना दूरस्थ व आव्हानात्मक ठिकाणी घेऊन जाऊ शकतात, आवश्यक व्यवस्थेचा समन्वय साधू शकतात आणि रोमांचक अनुभव देऊ शकतात।

**ऐतिहासिक पर्यटन मार्गदर्शक (हिस्टॉरिकल टूर गाइड):**

ऐतिहासिक पर्यटन मार्गदर्शक कोणत्याही पर्यटनस्थळाच्या इतिहासाची सविस्तर माहिती देण्यात तज्ज्ञ असतात. त्यांना विशिष्ट ऐतिहासिक कालखंड, घटना आणि महत्त्वाच्या स्थळांचे सखोल ज्ञान असते. असे गाइड प्रामुख्याने ऐतिहासिक स्थळे, स्मारके किंवा पुरातत्त्वीय स्थळांवर कार्यरत असतात. ते पर्यटकांना ऐतिहासिक संदर्भ व कथा सांगून भूतकाळ जिवंत करून दाखवतात.

**तज्ज्ञ पर्यटन मार्गदर्शक(स्पेशालिस्ट टूर गाइड):**

तज्ज्ञ टूर गाइड विशिष्ट आवडी किंवा खास प्रकारच्या टूरसाठी सेवा देतात. उदाहरणार्थ, खाद्यपर्यटन मार्गदर्शक जे पाककला व खाद्यअनुभवांवर लक्ष केंद्रित करतात, वाइन टूर गाइड जे द्राक्षबागा व वाइन चाखण्याबाबत तज्ज्ञ माहिती देतात, किंवा कला टूर गाइड जे संग्रहालये व कला दालनांमध्ये टूरचे नेतृत्व करून कलाकृतींचे अर्थस्पष्टीकरण करतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**पर्यटनात मार्गदर्शकाची उपयुक्तता :**

1) **कमी वेळात अधिक माहिती:**

एक मार्गदर्शक कमी वेळात एखाद्या ठिकाणाबद्दल जास्तीत जास्त माहिती प्रदान करतो. अनावश्यक माहितीवर वेळ वाया घालवण्याऐवजी, तो पर्यटकांना त्या विषयाबद्दल आणि त्या ठिकाणाचे महत्त्व याबद्दल संपूर्ण, प्रामाणिक माहिती प्रदान करतो, जी बहुतेकदा मार्गदर्शक पुस्तकांमध्ये सहज दिसून येत नाही.

बऱ्याचदा, पर्यटकांना प्रादेशिक भाषेची माहिती नसते. त्यांना स्थानिक बोली किंवा त्यांच्या लिपीत लिहिलेले साहित्य समजत नाही. म्हणूनच, अशी व्यक्ती असणे आवश्यक आहे जी त्यांना समजणाऱ्या भाषेत माहिती देऊ शकेल आणि त्यांची उत्सुकता पूर्ण करू शकेल, मग ती त्यांची मातृभाषा असो, आंतरराष्ट्रीय असो किंवा राष्ट्रीय भाषा असो.

काही पर्यटक निरक्षर किंवा कमी ज्ञानी असतात. व्यवसाय या श्रेणीतील पर्यटकांसाठी शिक्षणाला महत्त्व देतात. म्हणून, पर्यटन केंद्रांवर लेखी साहित्याद्वारे मिळवलेली या श्रेणीबद्दलची माहिती निरुपयोगी आहे. त्यांना थेट, जागेवरच समज आणि संवाद आवश्यक आहे.

2) **संस्मरणीय अनुभव**

एक जाणकार टूर गाईड कोणतेही ठिकाण जिवंत करून दाखवतो. तो संदर्भ, अंतर्दृष्टी आणि अशा कथा सांगतो ज्या तुम्हाला स्वतःहून शोधणे शक्य नसते. तुम्ही भेट देत असलेल्या स्थळांचा इतिहास, संस्कृती आणि महत्त्व याविषयीची तुमची समज तो अधिक सखोल करतो, ज्यामुळे तुमचा अनुभव अधिक अर्थपूर्ण आणि संस्मरणीय ठरतो. व्यावसायिक वातावरणात, योग्य टूर गाईड ही खात्री करतो की सर्व महत्त्वाची माहिती ज्यांना तिची गरज आहे त्यांच्यापर्यंत पोहोचेल, जेणेकरून व्यापक कल्याणासाठी खरे आणि परिणामकारक बदल घडू शकतील.

3) **कार्यक्षमता आणि संघटन**

एखाद्या ठिकाणी जास्त वेळ न घालवता सर्व महत्त्वाची स्थळे पाहायची असतील, तर टूर गाईड तुम्हाला योग्य मार्गावर ठेवण्यात अत्यंत उपयुक्त ठरतो. टूर गाईडने दिलेली नियोजित रचना (structure) तुमच्या उर्वरित प्रवासाची किंवा कार्यक्रमाची आखणी करण्यातही मदत करते, ज्यामुळे अनिश्चितता कमी होते.

4) **योग्य साधने**

योग्य गाईड असण्याइतकेच योग्य साधने असणेही महत्त्वाचे आहे. सुसज्ज गाईड सुरक्षितता आणि सहभागींसाठी उत्तम अनुभव दोन्ही सुनिश्चित करतो. गोंगाटाच्या वातावरणातही पाहुण्यांना स्पष्टपणे ऐकू येण्यासाठी मदत करणाऱ्या हेडसेटसारख्या संवाद साधनांपासून ते प्राथमिक उपचार पेटी आणि संरक्षण साधनांसारख्या आवश्यक सुरक्षा उपकरणांपर्यंत योग्य साधनेच सर्व फरक घडवून आणतात.

5) **मार्गदर्शक पुस्तिकेतील अपूर्णता पर्यटन मार्गदर्शक पूर्ण करतो**

पर्यटक त्यांच्या प्रवासासाठी स्थानिक मार्गदर्शक पुस्तके खरेदी करतात. ते ठिकाणे चिन्हांकित करतात, ज्यांचे महत्त्व काहीसे अपूर्ण आहे. तथापि, लोकांना वारंवार विचारल्याशिवाय कमी वेळात त्यांच्यापर्यंत पोहोचणे अशक्य आहे. शिवाय, नकाशावर चिन्हांकित नसलेली इतर लहान खुणा देखील माहितीच्या अभावामुळे पाहणे अशक्य आहे. मार्गदर्शक या सर्व अडथळ्यांना सहजपणे दूर करतो, ज्यामुळे प्रवास सोपा होतो.

जवळपास काय आहे? अशी इतर मनोरंजक ठिकाणे असू शकतात जी मार्गदर्शक पुस्तकांमध्ये सूचीबद्ध नाहीत. स्थानिकांना विचारणे नेहमीच योग्य नसते, कारण ते पर्यटकांच्या आवडींशी परिचित नसतील आणि त्यांना आवश्यक ते महत्त्व देत नसतील. हे फक्त एक मार्गदर्शकच करू शकतो.

6) **वैयक्तिक अनुभव**

एक चांगला पर्यटन मार्गदर्शक समूहाच्या आवडी आणि गरजांनुसार प्रवासाचे नियोजन सानुकूलित करतो. इतिहास, कला, भोजन किंवा साहस कोणताही विषय असो, गाईड प्रवासाचा कार्यक्रम व तपशील त्यानुसार बदलून प्रवाशांना अधिक आकर्षक आणि उपयुक्त अनुभव देतो.

7) **सुरक्षा आणि सोय**

नवीन ठिकाणी फिरणे अनेकदा आव्हानात्मक ठरू शकते, विशेषतः अपरिचित वातावरणात किंवा भाषेच्या अडचणी असलेल्या भागांत. टूर गाईड समूहाची सुरक्षितता सुनिश्चित करतात, पर्यटकांकडून होणाऱ्या सामान्य चुका टाळण्यास मदत करतात आणि वाहतूक, तिकीट व्यवस्था तसेच पर्यटनस्थळांवरील प्रवेश यांसारख्या गोष्टी सोप्या व तणावमुक्त करतात.

**पर्यटनात मार्गदर्शकाचे महत्त्व :**

पर्यटनात मार्गदर्शक पर्यटनस्थळाचा इतिहास, संस्कृती, परंपरा, कला, वास्तुकला व भूगोल यांची अचूक आणि रंजक माहिती देतो. त्यामुळे पर्यटकांचा अनुभव समृद्ध होतो.स्थानिक लोकजीवन, भाषा, चालीरीती, सण-उत्सव यांची ओळख करून देऊन मार्गदर्शक संस्कृतींचे आदान-प्रदान घडवून आणतो.

पर्यटन कार्यक्रम, वेळापत्रक, मार्ग, वाहतूक, भोजन व विश्रांती यांचे योग्य नियोजन करून प्रवास सुरळीत पार पाडतो.आपत्कालीन परिस्थितीत (आजारी पडणे, हरवणे, अपघात इ.) मार्गदर्शक पर्यटकांना तत्काळ मदत करतो व सुरक्षिततेची काळजी घेतो. पर्यटन मार्गदर्शक हा पर्यटनस्थळांची स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, स्थानिक नियमांचे पालन याबाबत पर्यटकांना मार्गदर्शन करून जबाबदार पर्यटन घडवतो.स्थानिक हस्तकला, बाजारपेठा, हॉटेल्स व सेवा यांची माहिती देऊन मार्गदर्शक स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन देतो.रंजक कथा, किस्से, लोककथा सांगून प्रवास आनंददायी आणि जिवंत बनवतो.

**संदर्भ**:

1. A. K. Bhatia, Tourism development : principles and practices, Sterling New Delhi, 1982
2. Guide Training Manual (Ministry of Tourism, Govt. of India)
3. Tourism Ministry Official Publication
4. राजशेखर मिश्र,करियर गाईड, डायमंड पाकीट बुक्स, नई दिल्ली,2002
5. शिवस्वरूप सहाय,पर्यटन सिद्धांत और प्रबंधन तथा भारत मे पर्यटन, गुगल बुक्स, मोतीलाल बनारसीदास पब्लिशिंग हाऊस 2006
6. J. R. Brent Ritchie & Charles R. Goeldne, Tourism: Principles, Practices & Philosophie, John Wiley & Sons Inc,2011
7. डॉ.अनु तोमर, दिव्या शर्मा, जय शंकर शुक्ला, कौशल कुमार,पर्यटन एवम यात्रा प्रबंधन, ठाकूर पब्लिकेशन लखनऊ, 2023
8. Incredible India Tourism, Govt of India, 2022
9. Tourism Policy of Maharashtra, 2024

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026


Original Article

# परभणी जिल्ह्यातील पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळे


**काळदाते वैजनाथ विश्वनाथ**

संशोधक विद्यार्थी इतिहास विभाग ज्ञानोपासक महाविद्यालय,परभणी

**Email:** vaijnath.kaldate94@gmail



**Manuscript ID**:

JRD -2026-180134

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(V)

Pp. 139-142

January 2026

**Submitted:** 13 Dec. 2025

**Revised:** 23 Dec. 2025

**Accepted:** 13 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026



***सारांश***

*पर्यटन हे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासाचे महत्त्वपूर्ण माध्यम असून धार्मिक व ऐतिहासिक पर्यटनाला भारतात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मराठवाडा विभागातील परभणी जिल्हा हा प्राचीन धार्मिक परंपरा व समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा आहे. या लेखात परभणी जिल्ह्यातील पर्यटन व ऐतिहासिक-धार्मिक वारसा स्थळांचा अभ्यास करण्यात आला आहे. जिल्ह्यातील धारासूर, जांब, चारठाणा, लोहार (श्री तपेश्वर महादेव) तसेच इतर धार्मिक स्थळे ही स्थापत्य, शिल्पकला व धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहेत. या वारसा स्थळांमुळे धार्मिक व ऐतिहासिक पर्यटनाला मोठा वाव असून त्यातून स्थानिक रोजगारनिर्मिती, आर्थिक विकास व सांस्कृतिक जतन साध्य होऊ शकते. मात्र अनेक स्थळांकडे दुर्लक्ष, पडझड व अपुऱ्या सुविधा आढळून येतात. त्यामुळे वारसा संरक्षण कायदे, जनजागृती, योग्य पायाभूत सुविधा, मार्गदर्शक व माहिती फलकांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. योग्य संवर्धन व व्यवस्थापन झाल्यास परभणी जिल्ह्यातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळे पर्यटनाच्या दृष्टीने अधिक विकसित होऊन सांस्कृतिक वारसा टिकवून ठेवण्यास मोलाची भूमिका बजावतील, असा निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *परभणी जिल्हा, पर्यटन, धार्मिक पर्यटन, ऐतिहासिक वारसा, मंदिर स्थापत्य, सांस्कृतिक वारसा, वारसा संवर्धन, मराठवाडा, पर्यटन विकास.*


**प्रस्तावना:**

धार्मिक पर्यटन हा एक महत्त्वाचा प्राचीन प्रकार आहे. श्रद्धा, भक्ती, अध्यात्मिक समाधान,धार्मिक कर्तव्य यांनी प्रेरित होऊन केलेला प्रवास केलेला प्रवास म्हणजे धार्मिक पर्यटन होय. भारत हा विविध धर्म संस्कृती व परंपरेचा देश असून इथे धार्मिक पर्यटनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. यातूनच परदेशातील नागरिक भारतीय धार्मिक गोष्टीकडे आकर्षित झाल्याचे प्राचीन भारतीय साहित्यातून दिसून येते. तीर्थयात्रा व्रते व उत्सव यामुळे धार्मिक पर्यटन सतत गतिमान राहिले आहे. महाराष्ट्रातील परभणी जिल्हा हा मराठवाडा विभागातील जिल्हा असून येथे असंख्य धार्मिक पर्यटन स्थळे आढळून येतात. परभणी जिल्हा धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अभ्यास महत्त्वाचा ठरतो म्हणून परभणीजिल्ह्यातील विविध धार्मिक स्थळाचा अभ्यास केलेला आहे.

**पर्यटनाची व्याख्या: राष्ट्रसंघाने**

इसवी सन १९३७ मध्ये पर्यटनावर प्रकाश टाकताना " पर्यटन ही एक अशी सामाजिक गति विधी आहे की ज्यामध्ये एक व्यक्ती कोणत्याही देशात आपल्या निर्धारित कार्यक्रमाशिवाय २४ तास किंवा त्यापेक्षा अधिक काळ थांबू शकते असे म्हटले आहे.[१]

इसवी सन १९९४ मध्ये विश्व पर्यटन संघटना आणि संयुक्त राष्ट्र संघटनेने संयुक्तपणे पर्यटनाच्या विचारांचे नवीन रूप प्रकाशात आणले यावरून पर्यटनाची व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल"[२]


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18479523

OPEN ACCESS



**Address for correspondence:**

*काळदाते वैजनाथ विश्वनाथ, संशोधक विद्यार्थी इतिहास विभाग ज्ञानोपासक महाविद्यालय,परभणी*



**How to cite this article:**

*काळदाते, . वैजनाथ . विश्वनाथ . (2026). परभणी जिल्ह्यातील पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळे. Journal of Research & Development, 18(1(V)), 139–142. https://doi.org/10.5281/zenodo.18479523*

पर्यटन अशा व्यक्तींच्या प्रवासास म्हटले जाऊ शकते की, जो आपल्या परिचित वातावरणाच्या बाहेर प्रवास करतो किंवा मुक्काम करतो एका वर्षापेक्षा कमी कालावधीचा हा मुक्काम आराम व्यापार किंवा इतर उद्देशासाठी असू शकतो. थोडक्यात प्रवास किंवा पर्यटन म्हणजे एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणे अर्थात प्रवासी हा आपल्या हेतू साध्य करण्यासाठी एखाद्या ठिकाणी जातो व परत आपल्या मूळ ठिकाणी येतो.थोडक्यात प्रवास किंवा पर्यटन म्हणजे एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणे अर्थात प्रवासी हा आपल्या हेतू साध्य करण्यासाठी एखाद्या ठिकाणी जातो व परत आपल्या मूळ ठिकाणी येतो

**संशोधनाचा उद्देश:**

१) परभणी जिल्ह्यात पर्यटनाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार

२) स्थानिक लोकांना परभणी जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा स्थळांबद्दल माहिती मिळेल.

३) ऐतिहासिक वारसा स्थळांची जतन आणि संवर्धन करण्यासाठी समाजामध्ये प्राचीन ऐतिहासिक वारसा स्थळांची जतन आणि संवर्धन होण्यासाठी जनजागृती करणे.

**परभणी जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा स्थळे:**

मराठवाड्यातील उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक वारसा स्थळांच्या नोंदीवरून तेर, भोकरदन, वेरूळ आणि अजंठा येथील लेणी, कंधार येथील किल्ला या वरून परभणी जिल्ह्यातील स्थळे तितकेच प्राचीन असावे असे दिसते.[४] परभणी जिल्ह्यामध्ये ऐतिहासिक वारसा स्थळे १३० पेक्षा अधिक आहेत.[३] ज्यामध्ये प्राचीन ऐतिहासिक मंदिरे, बारव स्थापत्य, ऐतिहासिक वाडे बुरुज, आणि काही तटबंदी आहेत. प्राचीन भारतीय स्थापत्यशास्त्र आणि मूर्तीकला यांचे दर्शन घडवून येते.

धारासूर येथील : परभणी जिल्ह्यातील काही ऐतिहासिक स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टीने विचार केला तर धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल ज्यामध्ये परभणीच्या दक्षिणेस ३२ कि.मी. अंतरावर गोदावरीच्या काठी वसलेले परभणी-गंगाखेड मार्गावर दैठणा गावाच्या पुढे गेल्यास धारासुर फाटा लागतो या फाट्यापासून सात कि.मी. अंतरावर आत गेल्यावर धारासुर येथील गुप्तेश्वर महादेव मंदिर हे उत्तरी चालुक्यकालीन प्राचीन मंदिर असून प्राचीन शिखर अस्तित्वात असणारे मराठवाड्यातील एकमेव शिखर असलेले मंदिर आहे.[५] या ठिकाणी मोठ्या प्रमाणात धार्मिक पर्यटनासाठी वाव आहे कारण येथील मूर्ती स्थापत्य अत्यंत सुंदर आहे.

जांब : परभणी शहरापासून पश्चिमेला सुमारे दहा किलोमीटर अंतरावर शिल्प समृद्ध असलेले गाव म्हणजे जांब होय. यामध्ये आईचे मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे त्या मंदिराचा बराचसा भाग नष्ट झाला आहे. ज्यामध्ये शिल्लक असलेले मंदिराचे उपपीठ अधिष्ठान अंतराळ गाभारा मूर्तीपीठ आधी बाबी शिल्लक आहेत यावरून मंदिराची भव्यता लक्षात येते. मुखमंडप, अर्धमंडप, सभामंडप, अंतराळ, आणि गर्भग्रह असे विधान आहे चौरसाकृती असलेल्या या मंदिरावर विविध मूर्ती शिल्प उत्तीर्ण केलेले आहेत ज्यामध्ये भैरवी, भुजघोषा, अग्नी, प्रल्हाद, श्रीधर, वराह, निवृत्ती, ऋषिकेश, पुरुषोत्तम आदी मूर्तींची अंकन केलेल्या आढळून येते तर या मंदिराला लागूनच असलेले श्री सावळेश्वर मंदिर आहे. देवीच्या मंदिराच्या बाजूला शिवाचे मंदिर ही संकल्पना शक्ती युक्त शिव या तत्त्वज्ञानाशी संवाद आहे.[६] या मंदिरावर योगविष्णू, वराह,चामुंडा, श्री गणेश या प्रतिमा आहेत. एकंदरीत या मंदिरावर गोष्टीवर मोठ्या प्रमाणात धार्मिक बाबीवर लक्ष केंद्रित केलेले आढळते सदरील मंदिर हे परभणी पासून जवळच असल्यामुळे धार्मिक पर्यटनासाठी अत्यंत सोयीचे व व ऐतिहासिक पर्यटनासाठी ही उपयुक्त ठरते.

चारठाणा : चारठाणा जिंतूर पासून पूर्वेस सुमारे हवीस किमी अंतरावर याची स्थल महात्म्यातून चारूक्षेत्र असे नाव आढळते. राजा चारुदत्त व त्याची धर्मशील पत्नी चारुमती हेमाद्री पंत या यादवाच्या मुख्य अमत्याची बहीण असल्याचे म्हटले आहे त्या संदर्भात काही कथानक आले आहेत. हे स्थान पाहताना काहीसे नैसर्गिक संरक्षण लाभलेले ठिकाणी निवास करण्यात आले आहे. खोलगटघाळीत हे स्थान असून संरक्षण करपुरा नदीच्या तीरावर मिळते येथे राज्य पुरातत्व विभागाच्या वतीने सुरक्षित करण्यात आलेली काही यादवकालीन मंदिर आहेत, यामध्ये नृसिंहतिर्थ, गोकुळेश्वर मंदिरव येथील बारव, खंकंडेश्वर मंदिर, काशी विश्वेश्वर मंदिर, खुराचीदेवी मंदिर, जोडमहादेव मंदिर, जैन मानास्तंभ, जैन मंदिर अवशेष,कसबा भागातील गणेश मंदिर व त्या लगत असलेले महादेव मंदिर या प्रमुख स्थानाची नोंद करावी लागते.[७] या गावाला पूर्वी प्राकार होता प्रामुख्याने गावाच्या पूर्व पश्चिम भागात तटबंदी बांधलेली असून काही विशेष आजही पाहायला मिळतात निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की एक मोठ्या वर्तुळाकार आगारात हे शहर वसले असून परस्पर काटकोनात छेद देणार असते आहेत प्रमुख जनपद आणि गावातील मुख्य चार मंदिर यांचा विचार करायचा झाल्यास गोकुळेश्वर, नरसिंह तीर्थ, ऋतू विहार गणेश मंदिर, उकंडेश्वर खुराची देवी हे मुख्य ऐतिहासिक वारसा असलेल्या आपल्याला पाहायला मिळते तसेच येथील जैन मानस्तंभ मोठ्या दिमाखात उभा असलेला आजही आपणास पाहावयास मिळतो परभणी जिल्ह्यातील चारठाणा हे एक असे ऐतिहासिक व प्राचीन वारसा असलेले आणि हिंदू व जैन धर्माशी संबंधित पवित्र तीर्थक्षेत्र आहे तसेच तत्कालीन समाजामध्ये धार्मिक सलोखा होता असे दिसून येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**लोहार येथील श्री तपेश्वर महादेव मंदिर:**

मानवत तालुक्यातील आणि परभणी पासून ३७ कि.मी. अंतरावर असलेले लोहरा हे गाव आहे. या गावातून दोन किमी अंतरावर एका नदीच्या काठी श्री तपेश्वर मंदिर असून हे मंदिर उत्तर चालूक्यकालीन कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. विविध सुरसुंदरी,विशाल शिवप्रतिमा, श्रीविष्णूचे दुर्मिळ द्विभुजशिल्प, ब्रह्मा, विष्णू, महेश, सूर्य, भैरव, भैरवी, उमामहेश्वर आदी शिल्पांचा अनमोल खजिना यामुळे हे मंदिर ऐतिहासिक तसेच धार्मिक दृष्टीने परभणी जिल्ह्याचा समृद्ध वारसा आहे या मंदिराविषयी सदरील गावामध्ये अनेक दंतकथा आढळून येतात. त्यातील एक अशी दंतकथा आहे की गावामध्ये कोणत्याही पाहुणा मुक्कामी राहिला तर त्याचा मृत्यू त्याच गावात होतो गावातील लोकांनी गाव बदलण्याचा निर्णय घेतला आणि तपेश्वर मंदिरापासून दूर आजचे गाव आहे तिथे जाऊन राहिले अशी आख्यायिका आहे तसेच दुसरी दंतकथा अशी आहे की या या मंदिरातील नंदी काही कारणास्तव रुसून शेजारील गाव मांडेवडगाव येथे गेला त्यामुळे गावकऱ्यांनी मंदिरात जोड जोडनंदी स्थापन केला असे सांगितले जाते या दंतकथा जरी असल्या तरीही त्यातून काही होत अर्थबोध होत असेल या दंतकथा निर्माण झाल्या असाव्यात या मंदिराची शिल्प अत्यंत देखणे आहे अत्यंत श्रद्धेने व भक्ती भावाने दर्शनाला येतात. या मंदिरावर दुर्मिळ शिल्प आहेत विशाल शिवमूर्ती या इतरत्र कुठेही पाहायला मिळत नाहीत काही साधक, उमामहेश्वर,शैव प्रतिमा, चामुंडा, श्रीकृष्ण, गोवर्धनधारी श्रीकृष्ण, पंचाग्नी साधना करणाररी पार्वती, विवाह प्रसंग, प्रल्हाद आणि अत्यंत दुर्मिळ सूर्यमुर्ती,बासरी वादिका,वसनभ्रमरा इत्यादी सुरसुंदरीआहेत. श्री तपेश्वर महादेव पंचक्रोशीतील भाविकांच्या श्रद्धेचा आणि परम आदराचा विषय आहे. तपेश्वर मंदिरात अनेक उत्सव व सण साजरे केले जातात. यात प्रामुख्याने चैत्र शुद्ध द्वादशीला साजरी केली जाणारी आमलकी द्वादशी महत्त्वपूर्ण आहे या कालावधीत सात दिवस मंदिरात कार्यक्रम आयोजित केले जातात श्रावण महिना म्हणजे शिवभक्तीचा महिनाभर होणारा उत्सव या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होत असते महाशिवरात्रीला सुद्धा उत्सव साजरा केला जातो रात्रभर भाविक भक्त ग्रंथाचे पारायण करतात हा सोहळा पाहण्यासारखा असतो लोह्याचे निसर्ग रमणीय वातावरण व येथील धार्मिक कार्यक्रम पाहण्यासारखे व यामध्ये सहभाग नोंदवण्यासारखे असतात लोहराचे श्री तपेश्वर मंदिर ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून आज घडीला लोक त्याकडे बघत आहेत.

**परभणी जिल्ह्यातील इतर धार्मिक स्थळे**

-गंगाखेड येथील गोदाघाट व मंदिरे
-नेमगिरी
-मुदगल
-राणीसावरगाव
-एरंडेश्वर
-महातपुरी
-वालूर
-पुंगळा
-पिंगळी
-भोगावं
-रामपुरी(बु.)
-रत्नेश्वर रामपुरी
-बोरी
-माणकेश्वर
-ढेंगळी पिंपळगाव
-पोखर्णी(नृसिंह)
-वझूर
-हतनूर

एकंदरीत परभणी जिल्ह्यात प्राचीन वारसा आणि ऐतिहासिक धार्मिक स्थळेमोठ्या प्रमाणात आहेत परंतु त्याची पडझड आणि राजकीय किंवा धार्मिक अनस्थापोटी दुर्लक्ष होऊ नये यासाठी नागरिकांना काही कायद्याचे ज्ञान असायला पाहिजे जे त्याची हेळसांड होणार नाही. या वारसा स्थळाचे जतन आणि संवर्धन व्हावे यासाठी काही कायदे व नियम केलेले आहेत. वारसा संरक्षण कायदे म्हणजे ऐतिहासिक, सांस्कृतिक, पुरातत्त्वीय, धार्मिक व नैसर्गिक वारसा संरक्षित ठेवण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे. भारतात तसेच महाराष्ट्रात वारसा संरक्षणासाठी अनेक महत्त्वाचे कायदे लागू आहेत.

वारसा संरक्षण कायदे[८] :-

१) प्राचीन स्मारक तथा पुरातत्वीय स्थळ आणि अवशेष अधिनियम, १९५८.

- राष्ट्रीय महत्त्वाच्या स्मारकांचे संरक्षण
- १०० मीटर 'प्रतिबंधित' आणि ३०० मीटर 'नियंत्रित' क्षेत्रनियम,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

२) पुरातन वस्तू आणि कला खजिना कायदा १९७२.
- प्राचीन वस्तूंची बेकायदेशीर विक्री/ तस्करी प्रतिबंध
महाराष्ट्र प्राचीन वास्तू आणि पुरातत्त्व स्थळे आणि अवशेष णनयम १९६२.
४) महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवास्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६०.
संविधानातील तरतुदीमुळे फायदे९:-
१. कायदेशीर संरक्षण.
२. आराखड्यानुसार संवर्धन
३. निधी संशोधन तांत्रिक सहाय्य
४. नार्रकांच्या सहभागात वाढ.
५. पर्यटन विकास आणि सांस्कृतिक प्रसार

**निष्कर्ष:**

१) परभणी जिल्ह्यात प्राचीन वारसा आणि ऐतिहासिक धार्मिक स्थळे मोठ्या प्रमाणात आहे .

२)चारठाणा येतील मंदिर समूहातील ऐतिहासिक वारसा स्थळच्या यादीत असल्याने त्यांना विषेश धार्मिक व सांस्कृतिक महत्व आहे व हि स्थळेपर्यटनाच्या द्रुस्ठीने प्रसिद्ध आहेत.

३) जांब, लोहारा आणि धारासूर येथील मंदिरे शिल्पसमृद्ध असून त्यांना विशेष धर्मिक महत्व आहे.

४) पर्यटन स्थळांना जाण्यासाठी व पर्यटकांना सोयीचे व्हावे यासाठी रस्ते उत्तम असायला हवे, धार्मिक स्थळी मार्गदर्शक किंवा माहिती फलक असायला हवे जेणे करून पर्यटकांना त्या ठिकाणाची माहिती महत्व आणि तेथील धार्मिक स्थळाचे नियम माहित होऊन त्यांची गैरसोय होणार नाही .

**संदर्भसूची:**

1. पिसे जी.एस. पर्यटनशास्त्र, एज्युकेशनल पब्लिसिंग हाऊस, दिल्ली, २०२५
2. उपरोक्त
3. परभणी जिल्हा ऐतिहासिक प्राचीन वारसा, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी, २०२३
4. पाठक अरुणचंद्र, मराठवाडा: एक सांस्कृतिक मागोवा, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
5. जाधव कांचन,परभणी व हिंगोली जिल्ह्यातील मंदिर कला स्थापत्य : एक अभ्यास (इ. सं. ११ वे ते १४ वे शतक ) अप्रकाशित शोध प्रबंध,
6. परभणी जिल्हा ऐतिहासिक प्राचीन वारसा, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी, २०२३
7. पाठक अरुणचंद्र, मराठवाडा: एक सांस्कृतिक मागोवा, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
8. कायदे व सरकारी अहवाल.
9. उपरोक्त
10. संशोधकाचे प्रत्यक्ष सर्वेक्षण.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# मातृतिर्थ माहूर: धार्मीक पर्यटनत्मक अभ्यास

**डॉ. प्रविण ज.नादरे**
इतिहास विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**Manuscript ID**:
JRD -2026-180135
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 143-146
January 2026
**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*मातृतीर्थ माहूर हे महाराष्ट्रातील एक अत्यंत प्राचीन व पवित्र धार्मिक तीर्थक्षेत्र असून नांदेड जिल्ह्यात स्थित आहे. माहूर येथे विराजमान असलेली श्री रेणुका माता ही भारतातील ५१ शक्तीपीठांपैकी एक तसेच महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक मानली जाते. पुराणकथा, आख्यायिका व धार्मिक परंपरांमुळे माहूरला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. भगवान परशुराम, दत्तात्रेय व माता अनसूया यांच्याशी संबंधित स्थाने, तीर्थकुंडे, मंदिरे व माहूरगड हा प्राचीन किल्ला यांमुळे हे क्षेत्र धार्मिक व ऐतिहासिक दृष्टीने समृद्ध आहे. या लेखात माहूरच्या धार्मिक परंपरा, आख्यायिका, रेणुकादेवीचे मंदिर, मूर्तीस्वरूप, तसेच माहूरगडाचा ऐतिहासिक विकास यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येथे येतात, त्यामुळे धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने माहूरचे स्थान महत्त्वाचे ठरते. धार्मिक पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते; मात्र वारसा स्थळांचे संवर्धन, पायाभूत सुविधा, स्वच्छता व व्यवस्थापन या बाबींकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. योग्य नियोजन व संवर्धनाच्या माध्यमातून मातृतीर्थ माहूर हे धार्मिक पर्यटनाचे एक प्रमुख केंद्र म्हणून अधिक विकसित होऊ शकते, असा निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *मातृतीर्थ माहूर, रेणुका देवी, शक्तीपीठ, धार्मिक पर्यटन, माहूरगड, पुराणकथा, ऐतिहासिक वारसा, मंदिरे, धार्मिक परंपरा, नांदेड जिल्हा.*

**प्रस्तावना:-**

!! श्री रेणुका देवयै नम:!!
मूलस्थाने नरानार्य: प्रत्यक्षं रामातरम!
पश्येयुस्ते विपाप्मान: प्रात्रुयंस्ते हरे: पदम!!

अर्थ: मूलस्थानात प्रत्यक्ष राममातेच्या म्हणजे रेणुकेच्या दर्शनाने नर आणि नारी विष्णू पदाला जातात.
नांदेड जिल्ह्यातील श्री क्षेत्र माहुरगड येथील कुलस्वामिनी माता रेणुकेची महती वर्णन करणारा श्री रेणुका महात्म्यातील हा श्लोक अगदी यथार्थ आहे. यानुसार माता रेणुका भगवान परशुरामांच्या प्रार्थनेला अनुमोदन देऊन जगाच्या कल्याणासाठी अनादी काळापासुन मातापुर क्षेत्री म्हणजेच माहूर येथे विराजमान आहे.

श्री रेणुकादेवी हे भारतातरल प्रमुख ५१ शक्तीपीठापैकी एक पीठ आणि माहाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठापैकी एक पीठ आहे. यामध्ये साडेतीन शक्तिपीठामध्ये महालक्ष्मी जि. कोल्हापूर, तुळजापूरची भवानी जि. धाराशिव, माहूर जि.नांदेड ची रेणुका देवी आणि वणी जि.नाशिक येथील सप्तशृंगी माता यांचा समावेश होतो. या शक्तीपिठांना धार्मीकदृष्ट्या खूप महत्व आहे. ही साडे तीन शक्तिपीठे जागृत देवस्थाने मानली जातात. या तीर्थक्षेत्रांवर दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. प्रविण ज.नादरे, इतिहास विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*नादरे, . प्रविण . ज . (2026). मातृतिर्थ माहूर: धार्मीक पर्यटनत्मक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 143–146.* https://doi.org/10.5281/zenodo.18479562

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18479562
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

माहुर येथील रेणुका देवीचे मंदिर १३ व्या शतकात देवगिरीच्या यादव राजाने बांधले असल्याचे मानले जाते. माहूर देवीच्या मंदिरासह इतर देवांचे देखील मंदिर आहे. यामध्ये परशुराम मंदिर, दत्तात्रय मंदिर, अनासूया मंदिर, कालिकामाता मंदिर इ. श्री दत्तात्रयांचा जन्म माहुर गडावर झाला अशी भाविकांची श्रद्धा आहे. या देवीला 'एकवीरा', 'यमाई', 'येल्लुआई' तसेच 'येल्लम्मा' अशा विविध नावाने विविध प्रांतात संबोधले जाते. ही देवी आदिशक्तीचे प्रकट रूप महाकाली म्हणून पूजली जाते. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, छत्तीसगढ, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू व काश्मीर ह्या राज्यात रेणुका देवीचे उपासक प्रामुख्याने आढळतात.

**अख्यायिका**

माहूर येथील रेणुका देवीच्या अवतारासंबधी एक कथा सांगीतली जाते. त्यानुसार, पार्वतीने कुब्ज देशाच्या राजाच्या पोटी जन्म घेतला. तिचे नाव रेणू असे ठेवण्यात आले. शंकराचा अवतार मानल्या गेलेल्या जमदग्नी ऋषीबरोबर रेणुचा विवाह झाला. जमदग्नीच्या आश्रमात अनेक शिष्य शिकत असत. सर्वांच्या मनोकामना पूर्ण करणारी कामधेनू गाय जमदग्नी ऋषीकडे होती. राजा सहस्त्रार्जुनाला या कामधेनूचा मोह झाला. एक ऋषीकडे कामधेनू कशाला पाहिजे? ती माझ्यासारख्या पराक्रमी राजाकडेच अधिक शोभून दिसेल, असे म्हणून सहस्त्रार्जनाने जमदग्नीकडे कामधेनूची मागणी घातली. ऋषीने राजाची मागणी अमान्य केली. तेव्हा सहस्त्रार्जुनाने आश्रमावर हल्ला करून आश्रम उद्ध्वस्त केला आणि जमदग्नींना ठार मारले व कामधेनू हिरावून नेली. काही वेळाने जमादग्नी ऋषीचा पुत्र परशुराम तिथे आला. सर्व प्रकार बघून परशुरामाने क्षत्रियांचा विध्वंस करण्याची प्रतिज्ञा केली. पित्याला अग्नी देण्यासाठी कोरी भूमी हवी म्हणून त्याने कावडीच्या एका पारड्यात जमदग्नींचे पार्थिव व दुसऱ्या पारड्यात माता रेणुकेला बसवले. रानोमाळ भटकत शेवटी तो माहूरगडावर आला. तिथे वास्तव्यास असलेल्या दत्तात्रेयाने त्याला कोरी भूमी दाखवली व इथेच पित्यावर अग्नीसंस्कार कर असे सांगितले. परशुरामाने प्रथम बाण मारून मातृतीर्थ व सर्वतीर्थ निर्माण केले. या पाण्याने स्नान घालून जमदग्नीवर अंत्यसंस्कार केले. यावेळी माता रेणुका सती गेली. या सर्व विधींचे पौरोहित्य दत्तात्रेयांनी केले. त्यानंतर परशुरामाला माता रेणुकेची खूप आठवण येऊ लागली. तो दु:खी होऊन शोक करत होता, तोच आकाशवाणी झाली. तुझी आई जमिनीतून वर येऊन तुला दर्शन देईल. फक्त तू मागे पाहू नकोस. परंतु परशुरामाची उत्सुकता चाळवली गेल्याने त्याने मागे वळून बघितले अणि त्यावेळी रेणुकामातेचे केवळ मुखच जमिनीतून वर आले होते. तेवढेच परशुरामाला दिसले. या तांदळारूपातल्या मुखाचीच माहूरला पूजा होते. परशुरामाला या डोंगरावर मातेचे दर्शन झाले म्हणून याला “मातापूर” म्हणून ओळखले जावू लागले. शेजारीच असेलेल्या आंध्रप्रदेशात “ऊर” म्हणजे गाव ते “माऊर” आणि पुढे “माहूर” झाले. रा.चिं.ढेरे यांनी लज्जगौरी या त्यांच्या ग्रंथात असा उल्लेख केला आहे की, आंध्रप्रदेशातील जोगुळांबा म्हणजेच माहूरची रेणुका होय.

**मंदीर:-**

प्राचीन काळात माहूर येथे असलेल्या वनाला “अमलीवन” म्हणून ओळखले जात असे. या परिसरात रेणुकामाता, दत्तात्रेय आणि अनसूया यांची मंदीरे आणि अमृतकुंड, सर्वतीर्थ, कमलतीर्थ, शिखर ही स्थाने महत्त्वाची मानली जातात. दत्तात्रेयाचे मंदिर माहूरपासून सहा मैलांवर एका शिखरावर आहे. महंत मुकुंदभारती या नावाच्या महंतांनी हे मंदिर सन १२९७ मध्ये बांधले. मूळ मंदिर फक्त १०X१२ आकाराचे आहे. त्यानंतर भोवतींच्या ओवऱ्या व प्राकार यांची बांधणी झालेली आहे.

आदिवासी गोंडराजाचा पराभव करून अहमदशहाने माहूरगड जिंकून घेतला. तेव्हा या परिसरातली मंदिरे, तीर्थस्थाने उद्ध्वस्त करण्यात केली. पुढे किल्लेदार जयसिंग ठाकूर याने रेणुकादेवीचा सभामंडप बांधला. रेणुकेचे मंदिर लहानसे असून प्रवेशाचा दरवाजा दक्षिणाभिमुख आहे. दरवाजावर नगारखाना आहे. प्रवेशद्वार चांदीच्या पत्र्याने मढवलेले आहे. अलीकडे दर्शनाच्या सोयीसाठी या वास्तूत काही बदल करण्यात आले आहेत. या सभामंडपाच्या परिसरात महाकाली आणि महालक्ष्मी यांच्या मूर्ती आहेत.

**मुर्ती:-**

रा.चिं.ढेरे यांनी लज्जगौरी या त्यांच्या ग्रंथात असे म्हटले आहे की, रेणुकेचे सर्वाधिक ख्यातीचे ठाणे माहूर जि. नांदेड येथे आहे. येथील रेणुकामातेचे आजचे रूप हे तांदळ्याचे असेल तरी, ही रेणुका देवी उत्तानपाद, शिरोहीन, नग्न देवी असल्याची स्पष्ट पारंपारीक नोंद श्रद्धेच्या पातळीवरून झालेली आहे. या विषीयीच्या अनेक पुराणकथा प्रचलित आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

सभामंडपवजा मंदिरात ५ फूट उंच व ४ फूट रुंद असा रेणुकादेवीचा तांदळा आहे. देवीच्या बैठकीवर सिंहासन कोरलेले आहे. पुराणात हे श्री दत्ताचे शयनस्थान असल्याचे सांगण्यात आले आहे. १२ व्या शतकातील श्री दत्तभक्त चांगदेव राऊळ यांना येथेंच दत्त साक्षात्कार झाला. चांगदेव राऊळांच्याही पूर्वी हे स्थान प्रसिद्ध होते. श्री गुरुचरित्र या गंथातील अध्याय ३० मध्ये या स्थानाचे उल्लेख आहेत. महानुभाव संप्रदायात माहूर स्थानाला धार्मीक दृष्टीकोनातून विशेष महत्व आहे. महानुभाव पंथातील नागदेवाचार्य यांनी स्थानांचे पहिले टिपण असलेला मराठीतील पहिला भुगोल ग्रंथ 'स्थानपोथी' हा बाईदेवव्यास यांच्याकडून लिहून घेतला. यामध्ये प्रत्येक स्थानाचे संशोधन करून मगच नोंद केली गेली. या ग्रंथात १३ व्या शतकातील माहूरविषयी विस्तृत वर्णन आले आहे.डॉ.वि.भी. कोलते यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. यामधील प्रस्तावनेत त्यांनी असे म्हटले आहे की, विदर्भातील नागपुर,भंडारा अमरावती, अकोला आणि बुलढाणा हे जिल्हे तर तत्कालीन निजाम संस्थानातील वरंगळ तसेच मराठवाड्यातील संभाजीनगर, नांदेड आणि बीड या प्रदेशासह १९७ गावंची नोंद या ग्रंथात आढळते.

**किल्ला:-**

माहूर येथे असलेला किल्ला हा "रामगड" या नावाने ओळाखला जातो. या किल्ल्याचे बांधकाम फार जुने असल्याचे दिसून येते. या किल्ल्याला "गिरीदुर्ग" या नावाने सुद्धा ओळखले जाते. हा किल्ला यादवकालीन असल्याचे पुरावे इतिहासात आढळतात. या किल्ल्यात दोन तट असून पैकी एक तट राष्ट्रकुट राजाने तर दुसरा तट हा देवगिरीचा यादव राजा रामदेवराय यांनी बांधला असल्याचे उल्लेख मिळतात. किल्ल्याची उंची २६ फूट असुन हा किल्ला ९ कि.मी. च्या परिसरात स्थित आहे. प्रवेशद्वाराजवळ एक वर्तूळाकार भिंत बांधलेली आहे. मुख्य प्रवेशद्वार १३ फूट उंच आणि १० फूट रूंद आहे. किल्ल्याच्या चोहोबाजूंनी चिरेबंदी बांधकाम आहे. चिनी महालाच्या पश्चिमेस असलेल्या निशान बुरूजाजवळ दोन मशिदी आहेत. जलव्यवस्थेसाठी बारव, तलाव आढळून येतात. माहुर येथील किल्ल्याला तटबंदी असून ती सहा मैलांचा घेर व्यापते. ब्रह्मतीर्थ नावाच्या टेकड्यांमध्ये एक टाकी बांधलेली आहे. किल्ल्याचे प्रवेशद्वार हाती दरवाजा (हत्ती दरवाजा) म्हणून ओळखले जाते. किल्ल्यात मोडकळीस आलेल्या इमारती, चिनी महाल, धान्याचे कोठार, पाण्याचे टाके आणि भव्य बुरुज आहेत. एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक वास्तू, सहा मैलाचा परिसर व्यापणारी तटबंदी आज मात्र उपेक्षित राहिली आहे. आजही "हत्तीदरवाजा", किल्ल्यावरचे प्रचंड तळे (ब्रह्माकुंड), कारंजी, हौद यांचे अवशेष असलेला "चिनी महाल" मध्ययुगीन वैभवाची साक्ष देतो.

येथील किल्ला हा गोंड राजाच्या वर्चस्वाखाली होता. सन 1358 मध्ये हा किल्ला मुहम्मद शाह बहामनीच्या अधिपत्याखाली आला. सन 1398 मध्ये बेरार येथील गोंड राजाने माहूर काबीज केला. सन 1428 मध्ये अहमदशहा बहामनीने माहूरगड जिंकला. अहमदनगरच्या बुरहान निजामशाहने सन 1527 मध्ये बेरारच्या अलाउद्दीन इमादशाहचा पराभव करून माहूर प्रांत ताब्यात घेतला. सन 1617 मध्ये मुघल सम्राट शहाजहानने अहमदनगरच्या शासकांचा पराभव करून किल्ल्याचा ताबा मिळवला. पंडिता सावित्रीबाई देशमुख या वऱ्हाडच्या अधिपती होत्या, ज्यांनी मुघल साम्राज्याच्या काळात माहूरची जहागीर प्राप्त धारण केली होती. हरचंद्रायाचा पराभव केल्यावर मुघल सम्राट औरंगजेबाने तिला रायबागन ही पदवी दिली. मोगलांच्या काळात माहुर हे महसूलाचे केंद्र होते. सन 1724 मध्ये हैदराबादच्या निजाम-उल-मुल्कने बाळापूरच्या लढाईत मुघल सैन्यातील आलम अली खान आणि दिलावर खान यांचा पराभव केला. तेव्हापासुन ते 1948 मध्ये हैदराबाद संस्थान मुक्त होई पर्यंत माहूरगड हैदराबादच्या निजामाच्या ताब्यात राहिला.





**रेणुका माता मंदीर जलकुंड**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026




अनुसया माता शिखर माहूरगड

**संदर्भ साधने:-**


1. www.maharashtratourism.gov.in. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ. २०२०.
2. लज्जागौरी - रा.चि.ढेरे, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
3. स्थानपोथी - संपा. डॉ.वि.भी.कोलते.अरूण प्रकाशन मलकापूर, आवृत्ती २, १९७६.
4. इतिहास आणि माहुर - अरुणचंद्र पाठक
5. नांदेड जिल्ह्यातील कला स्थापत्याचा चिकीत्सक अभ्यास – Ph.D.Thesis, आरती भगत, २०१९.

Development-of-Mahurgarh-from-tourism-perspective.html

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# धार्मिक पर्यटन : मुदगल येथील प्राचीन इतर मंदिरे

**प्रा. डॉ. जी. एस. पिसे**

इतिहास विभाग प्रमुख ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

**Email:** gspise3620@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180136
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 147-150
January 2026

**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात वसलेले मुदगल हे गाव धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. गोदावरी नदीच्या पात्रात वसलेल्या या क्षेत्रात हेमाडपंथी मंदिर स्थापत्यशैलीतील प्राचीन मंदिरे आढळतात. या संशोधन लेखामध्ये मुदगल येथील त्र्यंबकेश्वर–रामेश्वर मंदिर, ओंकारेश्वर मंदिर, खंडेश्वर मंदिर तसेच भारती गोसाव्याचा मठ यांचा ऐतिहासिक, स्थापत्यात्मक व धार्मिक अभ्यास करण्यात आलेला आहे. मुदगल येथील मंदिरे प्रामुख्याने शिवोपासनेशी निगडित असून त्यांतील शिल्पकला, नक्षीकाम, स्तंभरचना व गर्भगृह रचना या यादवकालीन हेमाडपंथी परंपरेचे दर्शन घडवितात. भारती गोसाव्याच्या मठातील समाध्या, शिवलिंगे, नंदी व विविध देवतांची शिल्पे ही त्या काळातील धार्मिक श्रद्धा व कलात्मक परंपरेचे उत्कृष्ट नमुने आहेत. तसेच मुदगल ऋषींच्या वास्तव्यामुळे या क्षेत्राला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले असून नागवाळी, पुत्रप्राप्ती विधी यांसारख्या धार्मिक विधींसाठी हे स्थान प्रसिद्ध आहे. या लेखातून मुदगल येथील प्राचीन मंदिरांचा वारसा, त्यांचे स्थापत्य सौंदर्य व धार्मिक महात्म्य स्पष्ट होते. मात्र अनेक वास्तू व शिल्पे दुर्लक्षित अवस्थेत असल्याचेही आढळून येते. त्यामुळे या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाच्या जतन व संवर्धनाची गरज अधोरेखित होते.*

***मुख्यशब्द:*** *मुदगल, धार्मिक पर्यटन, हेमाडपंथी मंदिर शैली, शिवमंदिरे, भारती गोसाव्याचा मठ, शिल्पकला, गोदावरी नदी, अष्टतीर्थ, नागवाळी विधी, मंदिर स्थापत्य.*

**प्रस्तावना :-**

भारत या देशात अनेक प्राचीन मंदिरे आपणास पहावयास मिळतात. मंदिराची निर्मिती ही प्रतिके म्हणून झाली. व्यक्तीचा आत्मा त्याप्रमाणे मंदिरातील देवतांना महत्व देण्यात येवून देवतांना अंतर आत्म्याचे स्वरूप देण्यात आले. म्हणून मंदिरांना देवालय, शिवालय, देवतायने असे म्हणतात. मंदिर स्थापत्याचा मूळ उद्देश हा धार्मिक होय. यादवाचा नायक हेमाद्री याने बांधलेल्या मंदिर प्रकारावरून हेमाडपंथी मंदिर शैलीचा उदय झाला. ही शैली महाराष्ट्रात पहावयास मिळते. परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात मुदगल हे गाव आहे. या गावी या शैलीचा तीन मंदिरे पहावयास मिळतात. प्राचीन मंदिराचा वारसा मुद्गल या गावाला मिळाला. येथे तीन प्राचीन वास्तू मंदिराबरोबर भारती गोसाव्याचा मठ या प्राचीन वस्तू आहेत. त्यापैकी खंडेश्वर व भारती गोसाव्याचा मठ या वस्तूविषयी असे सांगता येईल कि, मुदगल मधील लक्ष वेधून घेणाऱ्या दोन बाबी आहेत. त्यातील पहिले म्हणजे तेथील मंदिरे व भारती गोसाव्याचा मठ हि होय.

**1) श्री त्र्यंबकेश्वर, श्री रामेश्वर मंदिर:-**

गोदाकाठावरील मुदगलेश्वर मंदिराशेजारीच त्र्यंबकेश्वर व रामेश्वर ही दोन शिवलिंगे असणारे एक मंदिर आहे. सात पायऱ्या वर चढून गेल्यानंतर केवळ गर्भग्रह अशी या मंदिराची रचना आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. जी. एस. पिसे, इतिहास विभाग प्रमुख ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*पिसे, . जी . एस . (2026). धार्मिक पर्यटन : मुदगल येथील प्राचीन इतर मंदिरे. Journal of Research & Development, 18(1(V)), 147–150.* https://doi.org/10.5281/zenodo.18479670

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18479670
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

या मंदिराचे प्रवेशदवार 5 फूट उंचीचे आहे. या मंदिरात चार स्तंभ असून तीन स्तंभ अर्धस्तंभ आहेत. तर केवळ एक स्तंभ पूर्णस्तंभ आहे. हे स्तंभ साधारणतः 6 फूट उंचीचे आहेत. या मंदिराचे गर्भग्रह अतिशय छोटे आहे. या मंदिराचे वितान नक्षीयुक्त पाषाणाचे आहे.

येथील एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यात दोनच त्र्यंबकेश्वर शिवलिंगे आहेत. त्यामध्ये एक नाशिक येथे आहे. तर दुसरे मुदगलेश्वर येथे या मंदिरामध्ये पहावयास मिळतात. रामेश्वर व त्र्यंबकेश्वर ही दोन्ही शिवलिंगे या मंदिरामध्ये एकमेकांच्या एकदम जवळ आहेत.

**2) ओंकारेश्वर मंदिर:-**

त्र्यंबकेश्वर श्री रामेश्वर मंदिराच्या उत्तरेस श्री ओंकारेश्वर मंदिर आहे. पूर्वाभिमुख असलेले हे मंदिर उंच चौथऱ्यावर आहे. मंदिराच्या समोर शिवाचे वाहन नंदी आहे. मुदगल मधील गोदापात्रातील मंदिरापैकी केवळ याच मंदिरचे कळस सुस्थितीत आहे. मंदिराचे प्रवेशद्वार साधारणतः 3 फूट उंचीचे असून ललाटबिम्बावर गणपती आहे. मंदिराच्या गर्भाहात ओंकारेश्वर शिवलिंग असून समोरील देवकोष्टकात पाषाणाची जीर्ण अवस्थेतील मूर्ती आहे. मंदिराचे वितान नक्षीयुक्त आहे.

**3) खंडेश्वर मंदिर:-**

मुदगल गावच्या मध्यभागी खंडेश्वरचे मंदिर आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराच्या बांधणीत दगड आणि विटांचा वापर करण्यात आला आहे. या मंदिरातील काल आणि शैली गोदापात्रातील मुदगलेश्वाराच्या मंदिराशी मिळते जुळते आहे. यावरून हि मंदिरे समकालीन असावे. खंडेश्वर मंदिराची सभामंडप व गर्भग्रह अशी रचना आहे. सभामंडपाला व गर्भगृहाला एक-एकाच प्रवेशद्वार आहे. सभामंडपात 8 अर्धस्तंभ व 2 पूर्णस्तंभ आहेत.

तसेच काही भारवाहकाने एक हात कमरेवर व दुसरा हात स्तंभास लावलेला आहे. तर काही स्तंभातील भारवाहकने दोन्ही हात स्तंभावर आहेत. खंडेश्वर मंदिराच्या द्वारशाखा नक्षीयुक्त आहेत. तसेच द्वारशाखेवर साखळीप्रमाणे नक्षीकाम केलेले आहे. ललाटबिम्बावर गणपती आहे. दोन पायऱ्या उतरून गर्भग्रहात प्रवेश करता येतो. गर्भग्रहात शिवलिंग आहे. तसेच गर्भग्रहामध्ये समोर असलेल्या देव्कोष्टकात आधुनिक काळातील विठ्ठल रुक्मिणी प्रतिमा आहेत. खंडेश्वर मंदिराच्या समोर काही अंतरावर एका ओट्यावर नंदी आहे. हा नंदी आकाराने लहान असून नंदीच्या गळयात घुंगरमाळ आहे.

मंदिराच्या कळसाचा भाग विटाने बांधलेला व वरती निमुळता होत जाणारा आहे. खंडेश्वरचे मंदीर उपेक्षित आहे. त्यामागची कारणंमिमासा अशी कि एका पुजाऱ्याकडून गर्भवती गाईची हत्या घडल्याने परमेश्वरची कोप झाला. मात्र सद्यस्थितीत हे मंदिर चांगल्या स्थितीत आहे. केवळ सभामंडपाच्या भिंती काही प्रमाणात खराब झाल्या होत्या.

आता काही काळापूर्वी सिमेंट व विटानी बांधून घेतले आहे. बाकी हे मंदिर सुस्थितीत आहे.

**4) भारती गोसाव्याचा मठ:-**

हा मठ मुदगल गावच्या कडेलगत पूर्वदिशेस आहे. या वस्तू बाहेर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यावरून याचे सास्कृतिक महत्व स्थानिक जनतेला समजले नाही. याची कल्पना येते. हा मठ पशिमाभिमुख आहे. हा मठ अतिशय दुर्लक्षित अवस्थेत असून केवळ एक प्रवेशद्वार आहे. तेही अतिशय पडक्या स्थितीत आहे. या मठाच्या समोरील उजव्या भिंतीवर गणेश शिल्प आहे. गणेश चतुर्भुज आहे. एका हातात आयुध तर उजव्या मांडीवर व डाव्या हातात मोदक आहे.

तसेच गणपतीजवळ त्याचे वाहन उंदीर असतात त्याप्रमाणे या शिल्पाजवळ दोन मंदिर आहे. उजव्या भिंतीवर शंकराचे शिल्प आहे. शंकर हा चतुर्भुज आहे. हे शिल्प उभ्या (स्थानक) अवस्थेत आहे. शंकराच्या हातात डमरू, शंख, त्रिशूल हे आयुधे आहेत. शंकराचा एक हात रिकामा असून सरळ आहे. शंकराच्या कानात कुंडले गळयात अलंकार आहे. याच प्रकारचे शिल्प या मठात आतमध्ये एक आहे.

भारती गोसाव्याचा मठ हा 300 वर्षापूर्वीचा आहे. यामध्ये सहा समाध्या आहेत, या समाध्या वास्तुशिल्पाचे उत्तम नमुने आहेत. हा मठ भारती गोसाव्याचा असल्याचा भिंतीवरील चक्रे व साखळीवरून सिद्ध होते. मात्र या समाध्या अतिशय दुर्लक्षित अवस्थेत आहे. या समाध्या ओट्यावर अशा स्वरुपात आहे. तसेच ओट्यावर आत जाण्यासाठी पायऱ्या असून या ओट्याच्या खालच्या भागात समाधीची प्रतिकृती आहे. अशा प्रतिकृती प्रत्येक समाधीच्या ओट्याखाली आहेत.

या मठात दोन शिवलिंग व एक अतिशय सुंदर नंदी आहे. तसेच या मठात अनेक विविध प्रकारचे शिल्प आहेत. या शिल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे सांगता येईल..

**5) भारती गोसाव्याच्या मठातील शिल्पे:-**

भारती गोसाव्याच्या मठात सहा समाध्या असून इतर पाषाणाचे शिल्प आहे. हि शिल्प अतिशय सुंदर असून मात्र दुर्लक्षित अवस्थेत आहेत. या शिल्पाची अजिबात सुव्यस्था नसून हे शिल्प ऊन, वारा, पाऊस यांचा मारा सोसात पडलेले आहेत.

**हत्ती :-**

भारती गोसाव्याच्या मठात अनेक शिल्प दुर्लक्षित अवस्थेत पडलेले आहे. या शिल्पात हत्ती चे दोन शिल्प आहेत. हे हत्ती आकाराने लहान आहेत. हे अतिशय विलोभनीय आहेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**शिव शिल्प :-**

या मठात 9 शिल्पे आहेत. शिव हा स्थानक अवस्थेत असून चतुर्भुज आहे. त्रिशूल, शशंख, डमरू हि आयुधे आहेत. शिवाच्या डोक्यावर मुकुट आहे. तसेच चौथा हात मोकळा आहे. असेच शिल्प या मठाच्या उजव्या भिंतीवर आहे.

**गणेश शिल्प :-**

भारती गोसाव्याच्या मठात गणेशाचे दोन लहान मोठ्या आकाराचे शिल्प आहेत. हि शिल्प एकमेकाची प्रतिकृती भासतात. लहान गणेश शिल्प हे जीर्ण झालेले आहे. लहान गणेश शिल्प हे चतुर्भुज असून हातात आयुधे आहेत. गळयात अलंकार आहेत. हे गणेश शिल्प बऱ्याच प्रमाणत जीर्ण असल्यामुळे गणेशचे आसन व वाहन ओळखायला येत नाही.

दुसरे गणेश शिल्प आकाराने मोठे व सुस्थितीत आहे. गणेश हा चतुर्भुज असून केवळ एका हातात आयुधे आहेत. उजवा हात समोर ठेवलेला व डावा हात गणेशच्या मांडीवर आहे. गळयात अलंकार आहेत. तसेच गणेश हा उंदीरावरती बसलेला आहे.

**इतर शिल्प :-**

या मठात एकूण 9 शिल्प आहेत. त्यापैकी 5 शिल्प सुस्थितीत आहेत व बाकीचे शिल्प नीर्ण झालेले आहेत. या जीर्ण झालेल्या शिल्पापैकी एक शिवलिंग आहे. दोन मनुष्याची शिल्प आहेत. हि मनुष्याची शिल्प काही प्रमाणात समान तर एक प्रमाणात भिन्न आहे तसेच या शिल्पात एक समाधी आहे. व समाधीवर चंद्र व त्रिशूल कोरलेले आहे.

**6) भारती गोसाव्याच्या मठातील शिवलिंग व नंदी:-**

या मठात समाध्या आहेत. तसेच या मठात इतर शिल्प आहेत. याच मठात एक आकाराने मोठे व एक लहान, शिवलिंग व नंदी आहे. हे शिवलिंग मठात प्रवेश करताच डाव्या बाजूस शेत व मातीने सारवलेल्या जागेवर आहे. या ठिकाणी छोटे शिवलिंग याच गावातील वैष्णव मारुतिच्या मंदिराच्या सभामंडपात पहावयास मिळतात. या मोठ्या शिवलिंगा समोर नंदी असतोच नंदी हा शिवाचा वाहन आहे. त्यामुळे शिव व नंदी यांचा संबंध प्राचीन काळापासून दिसतो. नंदी नसलेल्या शिवपिंडाची पूजा साधारणपणे व्जर्य मानली असल्याने शिवमंदिरात किंवा शिवलिंगासमोर नंदी अव्याश्क असतो.

भारती गोसाव्याच्या मठात असलेल्या शिवलिंगसमोर नंदी आहे. या नंदीच्या गळयात मोठ्या घुंगराची तसेच लहान घुंगराची अशी माळा आहे. नंदी अतिशय आकर्षक आहे. मठातील या लिंगाची आजही पूजा करतात हे तेथील शेणाने सावरलेल्या जागा शिवलिंगास लावलेला भस्म व तेथील परिसरावरून समजते.

अशा प्रकारे विविध शिल्प व समाध्या या मठात पहावयास मिळतात. व या मठाची स्थिती अतिशय खराब असून या मठाकडे स्थानिक जनतेने दुर्लक्ष केल्याने तेथील स्थितीवरून समजते.

**7) मुदगल येथील धार्मिक महत्व:-**

मुदगल ऋषीच्या वास्तव्याने मुदगल क्षेत्र पावन झाले. या ऋषीमुळे मुदगल गावाचे धार्मिक महत्व वाढले. शांती विधी अशा विविध धार्मिक विधी करण्याचे एकमेव ठिकाण मुदगल हे होय. तसेच या ठिकाणचे महात्म्य म्हणजे भारतात फक्त दोनच ठिकाणी "नागवाळी" विधी होते. एक म्हणजे श्री क्षेत्र नाशिक त्र्यंबकेश्वर (महाराष्ट्र) व दुसरे म्हणजे श्री क्षेत्र मुदगल ता. पाथरी जि. परभणी. हे महत्व होय.

**अष्टतीर्थ :-**

1. पुत्र तीर्थ
2. तारा तीर्थ.
3. दुवोस तीर्थ.
4. लक्ष्मी तीर्थ,
5. विधी तीर्थ.
6. विष्णु तीर्थ.
7. नसिंह चक्र तीर्थ.
8. मुदगल तीर्थ.

ही अष्टतीर्थं गोदावरी पात्रात आहेत. मात्र पुत्र तीर्थ आज पहावयास मिळते.

**तारा तीर्थ :-**

भगवान विष्णूने जेव्हा त्रिविक्रम वामन अवतार घेतला व त्यांची पूजा करण्यासाठी विधीने जे सरोवर जल नेले तेव्हा त्यास ब्रह्मकुंड म्हणत असत. नंतर तेच "तारा तीर्थ" म्हणून प्रसिद्ध झाले. हे तारा तीर्थ मुदगल येथे आहे. याची माहिती पुराणग्रंथात तसेच भविष्योयात्तर पुराण या प्राचीन ग्रंथात उल्लेख आलेला आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**पुत्र तीर्थ :-**

मुदगल ऋषीवर प्रसन्न होऊन दुर्वासा ऋषींनी त्यांना असा वर दिला कि, या ठिकाणी पुत्रेश्वर तीर्थ असेन जो कोणी भक्त सात दिवस यथाविधी सेवा करील त्यास पुत्र प्राप्त होईल. त्यानंतर तेहतीस कोटी देवता व अतिथी दुर्वासा ऋषी अंतधार्ण पावले.

रावणाचा वध करून श्रीराम अयोध्येकडे परत जाताना त्यांना श्री क्षेत्र मुदगल दिसले येथे त्यांनी सात दिवस वास्तव्य केले. व याठिकाणी त्यांनी समरेषां केली. व नंतर त्यांनी अयोध्येकडे प्रस्थान केले.

तसेच नारदमुनीसह भगवान श्रीकृष्ण व रुख्मिणी यांनीही पावन भूमीवर काही दिवस वास्तव्य केल्याची माहिती अख्यायीकेतून मिळते. हे तीर्थ गोदावरी नदीपात्रात आहे. विष्णू तीर्थाच्या पूर्व दिशेस लक्ष्मी तीर्थाच्या पश्चिमेस तारा तीर्थाच्या दक्षिणेस आहे. याठिकाणी आजही अनेक धर्मिक विधी केल्या जातात.

**निष्कर्ष:**

1) हेमाडपंथी मंदिर शैलीचा अप्रतिम नमूना म्हणून या मंदिराकडे पाहता येते.

2) श्रीराम रावधवध करून परत आयोध्येकडे जात असताना येथे थांबले होते अशी अख्यायिका आहे.

3) महाराष्ट्रातील श्रीक्षेत्र नासिक त्र्यंबकेश्वर सारखे नागवाळी विधी करणारे दुसरे स्थान महात्म्य आहे.

4) नारदमुनी, भगवान श्रीकृष्ण व रुख्मिणी यांनी ही पावन भूमीवर काही दिवस वास्तव्य केल्याची अख्यायिकेतून मिळते.

5) मुदगल येथील मंदिर स्थापत्य निर्मितीचे धार्मिक कारण दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. आपला परभणी जिल्हा - रमेश बालवाड
2. आपला परभणी जिल्हा - रा.नि.देशमुख
3. राष्ट्रकुटाची राजधानी कंधार - अनिल कठारे, अरुण दळवी
4. समग्र श्री मुदगल महात्म्य - वै.शा.स.के. पंडितशास्त्री खाणोरी मुदगलकर
5. श्री मुदगल पुराण - प्रा.डॉ.सी.ग. देसाई (भाग 2रा)
6. श्री गुरुलीलामृत - वै.शा.स.के. पंडितशास्त्री खाणोरी
7. इतिहास लेखनशास्त्र - प्रभाकर देव
8. महाराष्ट्र राज्य ग्याझेटीअर - कि.का. चौधरी

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटनाच्या विकासातील लोकप्रशासनाची भूमिका

**प्रा. डॉ. मधुकर फकीरा राऊतराहे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180137
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 151-155
January 2026
**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*भारतीय पर्यटन हा देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. भारतातील वैविध्यपूर्ण भौगोलिक रचना, समृद्ध इतिहास, सांस्कृतिक परंपरा, धार्मिक स्थळे आणि नैसर्गिक सौंदर्य यांमुळे पर्यटन क्षेत्राला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटनाचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी लोकप्रशासनाची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. लोकप्रशासन हे पर्यटनविषयक धोरणांची निर्मिती, अंमलबजावणी, नियंत्रण व मूल्यमापन करते. केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या समन्वयातून पर्यटन विकासासाठी विविध योजना, धोरणे व प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असतात. या संशोधन लेखामध्ये भारतीय पर्यटनाच्या विकासामध्ये लोकप्रशासनाची भूमिका, पर्यटन व सामाजिक विकास यांतील परस्परसंबंध, पर्यटनाचे आर्थिक व सांस्कृतिक महत्त्व तसेच पर्यटन विकासासमोरील प्रशासकीय अडचणी यांचा अभ्यास करण्यात आला आहे. पायाभूत सुविधांचा विकास, पर्यटन स्थळांचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन, रोजगारनिर्मिती, ग्रामीण व वैद्यकीय पर्यटनाचा विकास, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक लोकांचा सहभाग या माध्यमातून लोकप्रशासन पर्यटनाला चालना देते. तथापि, अपुरी पायाभूत सुविधा, प्रशासकीय समन्वयाचा अभाव व पर्यावरणीय ऱ्हास या अडचणी पर्यटन विकासात अडथळा ठरतात. त्यामुळे शाश्वत पर्यटन धोरण, विकेंद्रीकरण आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक आहे. प्रभावी लोकप्रशासनामुळे भारतीय पर्यटनाचा शाश्वत व सर्वसमावेशक विकास साध्य होऊन भारताची जागतिक पर्यटन नकाशावर सशक्त ओळख निर्माण होऊ शकते.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय पर्यटन, लोकप्रशासन, पर्यटन धोरण, शाश्वत पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास, रोजगारनिर्मिती, सांस्कृतिक वारसा, पर्यटन व्यवस्थापन.*

## प्रस्तावना

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे प्राचीन इतिहास, समृद्ध संस्कृती, धार्मिक परंपरा, निसर्गसौंदर्य आणि आधुनिक प्रगती यांचा अद्वितीय संगम आढळतो. या सर्व घटकांमुळे भारत पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा देश ठरतो. पर्यटन हे केवळ प्रवास किंवा मनोरंजनाचे साधन नसून ते आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रशासकीय विकासाचे प्रभावी माध्यम आहे. भारतीय पर्यटनाच्या विकासामध्ये लोकप्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण व निर्णायक स्वरूपाची आहे. पर्यटन म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या नेहमीच्या वास्तव्याच्या ठिकाणाहून विश्रांती, शिक्षण, व्यवसाय, धार्मिक किंवा मनोरंजनाच्या उद्देशाने केलेला प्रवास होय. भारतात धार्मिक पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, निसर्ग पर्यटन आणि वैद्यकीय पर्यटन असे विविध प्रकार आढळतात. या सर्व पर्यटन प्रकारांचा विकास योग्य नियोजनाशिवाय शक्य नाही आणि हे नियोजन लोकप्रशासनाच्या माध्यमातूनच केले जाते.

लोकप्रशासन म्हणजे सार्वजनिक धोरणांची निर्मिती, अंमलबजावणी आणि नियंत्रण करणारी प्रशासकीय यंत्रणा होय.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. मधुकर फकीरा राऊतराहे , लोकप्रशासन विभाग प्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय परभणी*

**How to cite this article:**
*राऊतराहे, . मधुकर . फकीरा . (2026). भारतीय पर्यटनाच्या विकासातील लोकप्रशासनाची भूमिका. Journal of Research & Development, 18(1(V)), 151–155.* https://doi.org/10.5281/zenodo.18479727

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18479727
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटनाच्या विकासासाठी केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था परस्पर समन्वयाने कार्य करतात. केंद्र सरकार पर्यटनविषयक धोरणे तयार करते, जसे की राष्ट्रीय पर्यटन धोरण, स्वदेश दर्शन योजना, प्रसाद योजना इत्यादी. या धोरणांद्वारे पर्यटन स्थळांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. पर्यटनाच्या विकासात लोकप्रशासनाची एक महत्त्वाची भूमिका म्हणजे पायाभूत सुविधांचा विकास. रस्ते, रेल्वे, विमानतळ, निवास व्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा, वीज आणि दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असते. पर्यटन स्थळांपर्यंत पोहोचण्यासाठी सुलभ वाहतूक व्यवस्था उपलब्ध झाल्यास पर्यटकांची संख्या वाढते. त्यामुळे पर्यटन क्षेत्राला चालना मिळते.

पर्यटन स्थळांचे संरक्षण व संवर्धन करणे हीसुद्धा लोकप्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. ऐतिहासिक वास्तू, धार्मिक स्थळे आणि नैसर्गिक संसाधने यांचे जतन न झाल्यास पर्यटनाचा विकास टिकाऊ राहू शकत नाही. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, वनविभाग आणि स्थानिक प्रशासन यांच्या माध्यमातून या स्थळांचे संरक्षण केले जाते. यामुळे सांस्कृतिक वारसा जपला जातो. पर्यटनाच्या विकासामुळे रोजगार निर्मिती होते. हॉटेल उद्योग, वाहतूक, मार्गदर्शक सेवा, हस्तकला, स्थानिक व्यवसाय यांना चालना मिळते. लोकप्रशासन योग्य धोरणे राबवून स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देते. त्यामुळे ग्रामीण आणि मागास भागांचा विकास होतो व स्थलांतराला आळा बसतो.

पर्यटन आणि सामाजिक विकास यांचा घनिष्ठ संबंध आहे. पर्यटनामुळे विविध संस्कृतींमधील देवाणघेवाण होते. लोकांमध्ये सहिष्णुता, समजूतदारपणा आणि राष्ट्रीय एकात्मता वाढते. "अतिथी देवो भव:" या संकल्पनेद्वारे लोकप्रशासन पर्यटकांमध्ये सकारात्मक अनुभव निर्माण करण्याचा प्रयत्न करते. तसेच महिला सक्षमीकरण, युवक सहभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवून सामाजिक विकास साधला जातो. तथापि, पर्यटन विकासासमोर काही अडचणीही आहेत. अपुरी पायाभूत सुविधा, प्रशासकीय समन्वयाचा अभाव, पर्यावरणीय ऱ्हास आणि स्थानिक लोकांचा मर्यादित सहभाग या समस्या पर्यटन विकासात अडथळा ठरतात. या अडचणी दूर करण्यासाठी लोकप्रशासनाने शाश्वत पर्यटन धोरण अवलंबणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण, स्थानिक लोकांचा सहभाग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यावर भर देणे गरजेचे आहे.

भारतीय पर्यटनाच्या विकासात लोकप्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यटन हे आर्थिक उत्पन्नाचे साधन असण्यासोबतच सामाजिक व सांस्कृतिक विकासाचे प्रभावी माध्यम आहे. प्रभावी लोकप्रशासन, योग्य नियोजन आणि सर्वसमावेशक धोरणांमुळे पर्यटनाचा शाश्वत विकास साध्य होऊ शकतो. त्यामुळे भारताची जागतिक पर्यटन नकाशावर एक सक्षम व आकर्षक राष्ट्र म्हणून ओळख निर्माण होईल. पर्यटन हा आधुनिक काळातील एक महत्त्वाचा सेवा उद्योग असून तो केवळ आर्थिक उत्पन्नाचे साधन नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रशासकीय विकासाचा एक महत्त्वाचा घटक आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश असून येथे ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक, सांस्कृतिक आणि वैद्यकीय पर्यटनाची समृद्ध परंपरा आहे. "अतिथी देवो भव:" ही भारतीय संस्कृती पर्यटनाला अनुकूल वातावरण निर्माण करते.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी विविध धोरणे, योजना व प्रशासकीय यंत्रणा उभारल्या. पर्यटनाच्या नियोजन, अंमलबजावणी, नियंत्रण व मूल्यमापनामध्ये लोकप्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था पर्यटन विकासासाठी परस्पर समन्वयाने कार्य करतात. त्यामुळे पर्यटनाचा शाश्वत व सर्वसमावेशक विकास साध्य होतो. या संशोधन पेपरमध्ये भारतीय पर्यटनाच्या विकासामध्ये लोकप्रशासनाची भूमिका, पर्यटन व सामाजिक विकासातील परस्परसंबंध, पर्यटनाचे महत्त्व आणि भविष्यातील दिशा यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाचा उद्देश**

1.भारतीय पर्यटन क्षेत्राची संकल्पना व स्वरूप समजून घेणे.

2.पर्यटनाच्या विकासात लोकप्रशासनाची भूमिका अभ्यासणे.

3.केंद्र व राज्य सरकारांच्या पर्यटनविषयक धोरणांचा अभ्यास करणे.

4.पर्यटन आणि सामाजिक विकास यांतील संबंध स्पष्ट करणे.

5.भारतीय पर्यटनाचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करणे.

6.पर्यटन विकासातील प्रशासकीय अडचणी व उपाययोजना सूचविणे.

**संशोधनाची गृहीत कृत्य**

1.भारतीय पर्यटनाच्या विकासात लोकप्रशासनाची भूमिका निर्णायक स्वरूपाची आहे.

2.प्रभावी प्रशासकीय नियोजनामुळे पर्यटनातून आर्थिक व सामाजिक विकास साध्य होतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

3.केंद्र व राज्य सरकारांच्या धोरणांमुळे पर्यटन क्षेत्राला चालना मिळते.

4.पर्यटन विकासामुळे स्थानिक लोकांच्या जीवनमानात सुधारणा होते.

**भारतीय पर्यटन:**

पर्यटन म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या नेहमीच्या वास्तव्याच्या ठिकाणाहून विश्रांती, मनोरंजन, शिक्षण, व्यवसाय किंवा धार्मिक कारणांसाठी केलेला प्रवास. भारतात पर्यटनाचे विविध प्रकार आढळतात.

-धार्मिक पर्यटन – वाराणसी, तिरुपती, पंढरपूर, अमृतसर

-ऐतिहासिक पर्यटन – ताजमहाल, अजिंठा-वेरूळ, किल्ले

-नैसर्गिक पर्यटन – काश्मीर, केरळ, कोकण

-वैद्यकीय पर्यटन – आयुर्वेद, योग, आधुनिक उपचार

-सांस्कृतिक पर्यटन – उत्सव, लोककला, परंपरा

-या सर्व पर्यटन प्रकारांच्या विकासासाठी प्रभावी लोकप्रशासन आवश्यक आहे.

**भारतीय पर्यटन विकासातील लोकप्रशासनाची भूमिका**

1. पर्यटन धोरणांची निर्मिती

लोकप्रशासन केंद्र व राज्य पातळीवर पर्यटनविषयक धोरणे तयार करते. या धोरणांमुळे पर्यटन विकासाची दिशा निश्चित होते.

2. पर्यटन मंत्रालयाची स्थापना

केंद्र सरकारने स्वतंत्र पर्यटन मंत्रालय स्थापन करून पर्यटनाला प्रशासकीय महत्त्व दिले आहे.

3. राष्ट्रीय पर्यटन धोरणाची अंमलबजावणी

राष्ट्रीय पर्यटन धोरणाद्वारे शाश्वत व सर्वसमावेशक पर्यटन विकासावर भर दिला जातो.

4. राज्य पर्यटन विकास महामंडळांची भूमिका

राज्य स्तरावर महामंडळांद्वारे पर्यटन स्थळांचा प्रचार, विकास व व्यवस्थापन केले जाते.

5. पायाभूत सुविधांचा विकास

रस्ते, रेल्वे, विमानतळ, निवास व्यवस्था व स्वच्छता सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

6. पर्यटन स्थळांचे संरक्षण

ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांचे जतन करण्यासाठी प्रशासन विशेष कायदे व यंत्रणा वापरते.

7. पर्यावरण संरक्षण

पर्यटनामुळे होणारा पर्यावरणीय ऱ्हास टाळण्यासाठी लोकप्रशासन नियमावली तयार करते.

8. शाश्वत पर्यटनाचा प्रसार

भविष्यातील पिढ्यांसाठी संसाधने जपण्याच्या दृष्टीने शाश्वत पर्यटनावर भर दिला जातो.

9. रोजगार निर्मिती

पर्यटन उद्योगातून स्थानिक लोकांना थेट व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होतो.

10. ग्रामीण पर्यटनाचा विकास

ग्रामीण भागातील पर्यटनाला चालना देऊन संतुलित प्रादेशिक विकास साधला जातो.

11. महिला सक्षमीकरण

हस्तकला, स्वयंसहायता गट व पर्यटन सेवा क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवला जातो.

12. स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग

ग्रामपंचायत व नगरपालिका पर्यटन विकासात सक्रिय भूमिका बजावतात.

13. पर्यटनासाठी निधीची तरतूद

अर्थसंकल्पातून पर्यटनासाठी विशेष तरतुदी केल्या जातात.

14. प्रचार व प्रसिद्धी

"अतिथी देवो भव:" सारख्या मोहिमांद्वारे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रचार केला जातो.

15. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर

ऑनलाइन बुकिंग, माहिती पोर्टल्स व ई-पर्यटन सुविधा विकसित केल्या जातात.

16. पर्यटकांची सुरक्षितता

पर्यटक पोलिस, हेल्पलाईन व सुरक्षा उपाय प्रशासनाद्वारे राबवले जातात.

17. आंतरराष्ट्रीय सहकार्य

पर्यटन क्षेत्रात परदेशी गुंतवणूक व सहकार्य वाढवण्यासाठी धोरणे आखली जातात.

18. सांस्कृतिक वारशाचे जतन

उत्सव, कला व परंपरांचे संवर्धन करून सांस्कृतिक पर्यटनाला चालना दिली जाते.

19. प्रशासकीय समन्वय

केंद्र, राज्य व स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय साधला जातो.

20. कायदे व नियमावली

पर्यटन उद्योगासाठी आवश्यक कायदे तयार करून त्यांची अंमलबजावणी केली जाते.

21. प्रशिक्षण व कौशल्य विकास

मार्गदर्शक, हॉटेल कर्मचारी व पर्यटन व्यावसायिकांना प्रशिक्षण दिले जाते.

22. वैद्यकीय पर्यटनाचा विकास

आरोग्य व पर्यटन विभागाच्या समन्वयातून वैद्यकीय पर्यटनाला चालना दिली जाते.

23. संकट व्यवस्थापन

नैसर्गिक आपत्ती किंवा महामारीसारख्या संकटांत पर्यटकांचे संरक्षण केले जाते.

24. सामाजिक समावेशन

मागास व आदिवासी भागातील पर्यटन विकासातून सामाजिक समावेशन साधले जाते.

25. भारताची जागतिक प्रतिमा उंचावणे

पर्यटनाच्या माध्यमातून भारताची सांस्कृतिक व आर्थिक ओळख जागतिक पातळीवर बळकट होते.

वरील सर्व मुद्द्यांवरून स्पष्ट होते की भारतीय पर्यटनाच्या विकासात लोकप्रशासन ही कणा आहे. प्रभावी धोरणे, योग्य नियोजन व शाश्वत दृष्टिकोन यांच्या माध्यमातून पर्यटनाचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो.

**भारतीय पर्यटन विषयक महत्त्व**

1. आर्थिक महत्त्व

पर्यटनामुळे परकीय चलन मिळते, GDP वाढतो व रोजगारनिर्मिती होते.

2. सांस्कृतिक महत्त्व

भारतीय परंपरा, कला व संस्कृती जागतिक पातळीवर पोहोचते.

3. राजकीय महत्त्व

आंतरराष्ट्रीय संबंध दृढ होतात.

4. पर्यावरणीय महत्त्व

1.शाश्वत पर्यटनामुळे पर्यावरण संरक्षणास चालना मिळते.

2.पर्यटन विकासातील अडचणी

3.अपुरी पायाभूत सुविधा

4.प्रशासकीय समन्वयाचा अभाव

5.पर्यावरणीय ऱ्हास

6.स्थानिक लोकांचा मर्यादित सहभाग

**उपाययोजना**

1.प्रभावी लोकप्रशासन व विकेंद्रीकरण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

2.स्थानिक स्वराज्य संस्थांचा सक्रिय सहभाग

3.शाश्वत पर्यटन धोरण

4.डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर

**सारांश**

भारतीय पर्यटनाच्या विकासात लोकप्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यटन हे केवळ आर्थिक उत्पन्नाचे साधन नसून सामाजिक, सांस्कृतिक व प्रशासकीय विकासाचे प्रभावी माध्यम आहे. केंद्र, राज्य व स्थानिक पातळीवरील प्रशासनाने समन्वयाने कार्य केल्यास पर्यटनाचा शाश्वत विकास साध्य होऊ शकतो. त्यामुळे भारताची जागतिक पर्यटन नकाशावर मजबूत ओळख निर्माण होईल.

**संदर्भ ग्रंथ**

1.अवारी, बी.एल. – भारतीय लोकप्रशासन

2.सप्रे, वि.ग. – लोकप्रशासन: सिद्धांत व व्यवहार

3.भारत सरकार – राष्ट्रीय पर्यटन धोरण

4.महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ – वार्षिक अहवाल

5.देसाई, एन.आर. – पर्यटन व्यवस्थापन

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन आणि सामाजिक विकास

**प्रा. डॉ. विश्वनाथ माधवराव सूर्यवंशी**
समाजशास्त्र विभाग श्री शिवाजी महाविद्यालय परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180138
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 156-159
January 2026
**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*भारतीय पर्यटन उद्योग आणि सामाजिक विकास हे परस्पर संबंधित आहेत. पर्यटनामुळे नवनवीन रोजगार संधी निर्माण होतात, स्थानिक संस्कृती आणि जीवनशैलीला जागतिक ओळख मिळते, तसेच पर्यावरणीय आणि सांस्कृतिक संवर्धन होण्याची शक्यता निर्माण होते. पर्यटन हे भारताच्या समाजाचा एक महत्त्वाचा घटक बनले आहे. यामुळे सरकारने विविध धोरणे आणि योजना राबवली आहेत ज्यामुळे पर्यटन उद्योगाची वृद्धी झाली आहे आणि समाजात जागरूकता निर्माण झाली आहे. या संशोधन लेखामध्ये भारतीय पर्यटनाचा सामाजिक विकासावर होणारा प्रभाव, सांस्कृतिक संवर्धनातील त्याची भूमिका, सामाजिक एकात्मता, पायाभूत सुविधांचा विकास तसेच पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या संधी व आव्हानांचा अभ्यास करण्यात आला आहे. पर्यटनामुळे लोककला, हस्तकला, सण-उत्सव आणि परंपरांचे जतन होते तसेच विविध संस्कृतींमधील आदान-प्रदान वाढून सहिष्णुता व राष्ट्रीय एकात्मता बळकट होते. तथापि, अति-पर्यटनामुळे पर्यावरणीय ऱ्हास व सामाजिक असमतोल निर्माण होण्याची शक्यता असल्याने शाश्वत पर्यटन विकासाची आवश्यकता अधोरेखित होते. योग्य नियोजन, स्थानिक सहभाग आणि शाश्वत धोरणांच्या माध्यमातून पर्यटनाचा वापर केल्यास भारतीय समाजाचा सर्वांगीण व दीर्घकालीन सामाजिक विकास साध्य होऊ शकतो.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय पर्यटन, सामाजिक विकास, रोजगारनिर्मिती, सांस्कृतिक संवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, शाश्वत पर्यटन, सामाजिक एकात्मता, पायाभूत सुविधा.*

## प्रस्तावना

भारतीय पर्यटन आणि सामाजिक विकास यांचा परस्परांशी अतिशय घनिष्ठ संबंध आहे. भारत हा प्राचीन संस्कृती, ऐतिहासिक वारसा, नैसर्गिक सौंदर्य आणि विविधतेने नटलेला देश असल्यामुळे जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतो. पर्यटन हा केवळ आर्थिक उत्पन्नाचा स्रोत नसून तो समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एक प्रभावी माध्यम ठरला आहे. भारतीय पर्यटनामुळे सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिवर्तन घडून आले आहे. भारतीय पर्यटनामुळे स्थानिक समाजाच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा झालेली दिसून येते. पर्यटन उद्योगामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होते. हॉटेल व्यवसाय, प्रवास सेवा, मार्गदर्शक, हस्तकला, स्थानिक खाद्यसंस्कृती, वाहतूक व्यवस्था अशा विविध क्षेत्रांतून स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागात पर्यटनामुळे आर्थिक स्वावलंबन वाढण्यास मदत झाली आहे. यामुळे स्थलांतर कमी होऊन स्थानिक विकासाला चालना मिळते.

पर्यटनामुळे सामाजिक विकासासोबतच सांस्कृतिक संवर्धनालाही प्रोत्साहन मिळते. भारतातील मंदिरे, किल्ले, लेणी, स्मारके, उत्सव, लोककला आणि परंपरा यांना पर्यटनामुळे जागतिक ओळख मिळते. पर्यटकांच्या वाढत्या आवडीमुळे स्थानिक कला, नृत्य, संगीत, हस्तकला आणि पारंपरिक व्यवसाय टिकून राहण्यास मदत होते. यामुळे सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन होते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. विश्वनाथ माधवराव सूर्यवंशी, समाजशास्त्र विभाग श्री शिवाजी महाविद्यालय परभणी*

**How to cite this article:**
*सूर्यवंशी, . विश्वनाथ . माधवराव . (2026). भारतीय पर्यटन आणि सामाजिक विकास. Journal of Research & Development, 18(1(V)), 156–159.* https://doi.org/10.5281/zenodo.18479796

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18479796

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

भारतीय पर्यटनामुळे सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक आदान-प्रदान घडून येते. देश-विदेशातील पर्यटक एकमेकांच्या संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली समजून घेतात. यामुळे सहिष्णुता, परस्पर सन्मान आणि राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. विविध धर्म, भाषा आणि जातींच्या लोकांमध्ये समजूतदारपणा वाढण्यास पर्यटन महत्त्वाची भूमिका बजावते.

पर्यटन विकासामुळे पायाभूत सुविधांचा विकासही वेगाने झाला आहे. रस्ते, वाहतूक, दळणवळण, आरोग्य सेवा, स्वच्छता आणि निवास व्यवस्था यामध्ये सुधारणा झाल्यामुळे स्थानिक नागरिकांनाही त्याचा लाभ होतो. सरकारच्या 'स्वदेश दर्शन', 'देखो अपना देश' यांसारख्या योजनांमुळे पर्यटनस्थळांचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, पर्यटनाच्या वाढीसोबत काही सामाजिक व पर्यावरणीय आव्हानेही निर्माण झाली आहेत. अति-पर्यटनामुळे पर्यावरणाचा ऱ्हास, स्थानिक संस्कृतीवर विपरीत परिणाम आणि सामाजिक असमतोल निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे शाश्वत पर्यटन विकासावर भर देणे अत्यावश्यक आहे.

भारतीय पर्यटन हे सामाजिक विकासाचे प्रभावी साधन आहे. योग्य नियोजन, स्थानिक सहभाग आणि शाश्वत धोरणांच्या माध्यमातून पर्यटनाचा वापर केल्यास समाजाचा सर्वांगीण विकास साधता येऊ शकतो. पर्यटनामुळे भारताची सांस्कृतिक ओळख जागतिक स्तरावर दृढ होत असून सामाजिक प्रगतीला नवी दिशा मिळत आहे. भारत हा एक ऐतिहासिक, सांस्कृतिक, आणि भौगोलिक दृष्ट्या विविधतांनी परिपूर्ण देश आहे. या विविधतेमुळे भारतातील पर्यटनाला वैश्विक स्तरावर महत्त्व आहे. भारतीय पर्यटन उद्योगाच्या विकासाने देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना दिली आहे आणि त्याचप्रमाणे सामाजिक आणि सांस्कृतिक विकासातही मोठा हातभार लावला आहे. भारतीय पर्यटन केवळ पर्यटकांसाठी असलेली एक आर्थिक क्रिया नाही, तर हे देशाच्या समाज आणि संस्कृतीच्या प्रगतीसाठी एक महत्त्वपूर्ण माध्यम बनले आहे.

भारतीय पर्यटन आणि सामाजिक विकास याबद्दल विचार करताना, या दोन्ही घटकांचा एकमेकांवर होणारा प्रभाव महत्त्वाचा ठरतो. पर्यटनामुळे सामाजिक संरचनांमध्ये बदल घडवले जातात. तसेच, पर्यटन उद्योगाने भारताच्या ग्रामीण आणि शहरी भागातील जीवनशैली, संस्कृती, शाळा, रोजगार, इत्यादी गोष्टींवर प्रभाव पडला आहे.

**संशोधनाचा उद्देश:**

-भारतीय पर्यटन उद्योगाचे विकासाचे तंत्र आणि त्याचे सामाजिक प्रभाव तपासणे.

-पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करणे.

-पर्यटनामुळे रोजगार निर्माण होणारी संभाव्यता आणि त्या प्रभावाचा विश्लेषण करणे.

-भारतातील पर्यटन क्षेत्रातील धोरणांची आणि योजनांची कार्यक्षमता मूल्यांकन करणे.

-ग्रामीण आणि शहरी भागातील पर्यटन विकासावर होणारा परिणाम तपासणे.

**संशोधनाची गृहीत कृत्य:**

-धोरण आणि योजनाचा प्रभाव आहे

-आर्थिक विकास आणि रोजगार निर्माण होतो

-पर्यटन आणि पर्यावरण संबंध आहे

**भारतीय पर्यटन आणि सामाजिक विकास**

**१. रोजगारनिर्मिती**

भारतीय पर्यटन उद्योगातून थेट व अप्रत्यक्ष स्वरूपात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतो. हॉटेल, वाहतूक, मार्गदर्शक, हस्तकला, अन्नसेवा इत्यादी क्षेत्रांत स्थानिकांना काम मिळते, त्यामुळे सामाजिक आर्थिक स्थिती सुधारते.

**२. ग्रामीण विकासाला चालना**

ग्रामीण पर्यटनामुळे खेड्यांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होतात. यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होते आणि स्थानिक विकास घडतो.

**३. स्थानिक संस्कृतीचे संवर्धन**

पर्यटनामुळे लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत, सण-उत्सव आणि परंपरा जतन केल्या जातात. पर्यटकांच्या मागणीमुळे सांस्कृतिक ओळख टिकून राहते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**४. सामाजिक समावेशन**

पर्यटन क्षेत्रात महिला, युवक, आदिवासी व दुर्बल घटकांचा सहभाग वाढतो. स्वयंरोजगाराच्या संधी मिळाल्यामुळे सामाजिक समावेशकता वाढते.

**५. महिला सक्षमीकरण**

हस्तकला, होमस्टे, स्थानिक खाद्यव्यवसाय यांमधून महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळते, ज्यामुळे सामाजिक सशक्तीकरण होते.

**६. शैक्षणिक जागरूकता**

पर्यटनामुळे लोकांमध्ये इतिहास, भूगोल, संस्कृती आणि पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढते. स्थानिक समाजही आपल्या वारशाचे महत्त्व ओळखू लागतो.

**७. सांस्कृतिक आदान-प्रदान**

देश-विदेशातील पर्यटकांमुळे विविध संस्कृतींचा संपर्क होतो. त्यामुळे सहिष्णुता, परस्पर सन्मान आणि सामाजिक सलोखा वाढतो.

**८. पायाभूत सुविधांचा विकास**

रस्ते, वाहतूक, वीज, पाणी, आरोग्य व स्वच्छता सुविधा पर्यटनामुळे विकसित होतात, ज्याचा लाभ स्थानिक समाजालाही होतो.

**९. आर्थिक स्वावलंबन**

पर्यटनामुळे स्थानिक व्यवसायांना चालना मिळते. हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय आणि सेवा उद्योगांमुळे समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम होतो.

**१०. सामाजिक जीवनमानात सुधारणा**

वाढते उत्पन्न, चांगल्या सुविधा आणि रोजगारामुळे लोकांचे जीवनमान उंचावते व सामाजिक विकास घडतो.

**११. वारसा संवर्धन**

ऐतिहासिक स्मारके, किल्ले, मंदिरे यांचे जतन पर्यटनामुळे शक्य होते. सरकार आणि स्थानिक समाज संवर्धनासाठी पुढाकार घेतात.

**१२. पर्यावरणीय जागरूकता**

इको-टुरिझममुळे पर्यावरण रक्षणाबाबत समाजात जागरूकता वाढते आणि शाश्वत विकासाची जाणीव होते.

**१३. सामाजिक एकात्मता**

पर्यटनामुळे विविध भाषा, धर्म व जातीतील लोक एकत्र येतात. यामुळे राष्ट्रीय एकात्मता बळकट होते.

**१४. युवकांसाठी संधी**

पर्यटन क्षेत्रात प्रशिक्षण, उद्योजकता आणि कौशल्य विकासाच्या संधी युवकांना मिळतात, ज्यामुळे बेरोजगारी कमी होते.

**१५. पारंपरिक व्यवसायांचे पुनरुज्जीवन**

हस्तकला, विणकाम, मातीची भांडी यांसारखे पारंपरिक व्यवसाय पर्यटनामुळे पुन्हा फुलू लागतात.

**१६. स्थानिक प्रशासन मजबूत होणे**

पर्यटन वाढल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास होतो आणि प्रशासन अधिक कार्यक्षम बनते.

**१७. सामाजिक जबाबदारीची भावना**

पर्यटन उद्योग सामाजिक जबाबदारी (CSR) उपक्रमांद्वारे शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छतेस हातभार लावतो.

**१८. आरोग्य व कल्याण पर्यटन**

योग, आयुर्वेद आणि वैद्यकीय पर्यटनामुळे आरोग्याबाबत जागरूकता वाढते व समाजाचा सर्वांगीण विकास होतो.

**१९. रोजगाराचे विविधीकरण**

पर्यटनामुळे शेतीवर अवलंबित्व कमी होऊन विविध व्यवसायांची निर्मिती होते, त्यामुळे आर्थिक स्थैर्य मिळते.

**२०. शहरांचा नियोजित विकास**

पर्यटनामुळे शहरांचे सौंदर्यीकरण, स्वच्छता आणि व्यवस्थापन सुधारते, ज्याचा सामाजिक जीवनावर सकारात्मक परिणाम होतो.

**२१. स्थानिक सहभाग**

पर्यटन नियोजनात स्थानिक समाजाचा सहभाग वाढल्यामुळे विकास अधिक शाश्वत आणि लोकाभिमुख होतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**२२. सामाजिक प्रतिष्ठा वाढणे**

पर्यटनस्थळ म्हणून ओळख मिळाल्यामुळे स्थानिक समाजाची सामाजिक प्रतिष्ठा वाढते.

**२३. सामाजिक बदल स्वीकारण्याची क्षमता**

पर्यटनामुळे समाज आधुनिकतेशी जुळवून घेण्यास शिकतो आणि सकारात्मक सामाजिक बदल स्वीकारतो.

**२४. दारिद्र्य निर्मूलन**

पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे गरीब व दुर्बल घटकांच्या जीवनात सुधारणा होते.

**२५. शाश्वत सामाजिक विकास**

योग्य नियोजन व नियंत्रणाखाली पर्यटन विकास झाल्यास पर्यावरण, संस्कृती व समाज यांचा समतोल राखून दीर्घकालीन सामाजिक विकास साधता येतो.

भारतीय पर्यटनाची सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वता हे केवळ देशाच्या अर्थव्यवस्थेशी संबंधित नाही, तर या क्षेत्राचे समाजाच्या विविध स्तरावर थेट प्रभाव पडतो. पर्यटनामुळे समाजामध्ये विविधता, समृद्धी, आणि समजुतींचे योगदान वाढते. पर्यटनामुळे भारतीय स्थानिक संस्कृतीला जागतिक स्तरावर ओळख मिळवते. उदाहरणार्थ, राजस्थानातील किल्ले, वाराणसीतील गंगा घाट, किंवा कश्मीरातील डल लेक अशा स्थळांचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व असतो. यामुळे स्थानिक नागरिकांची संस्कृती आणि शिल्पकला सांभाळली जाते. पर्यटनामुळे लोकजीवनाच्या अनेक पैलूंमध्ये सुधारणा होऊ शकते. ग्रामीण भागात पर्यटनाने रोजगार निर्माण केला आहे. स्थानिक हस्तकला, अन्नसंस्कृती, पारंपारिक शिल्पकला या सर्व गोष्टींना पर्यटनामुळे प्रोत्साहन मिळाले आहे. मोठ्या शहरांमध्ये पर्यटनाच्या उद्योगामुळे शहरीकरण आणि धंद्यांची वाढ झाली आहे. पर्यटनामुळे शहरातील प्रमुख ठिकाणांची इन्फ्रास्ट्रक्चर सुधारणे, वाहतूक व्यवस्थेची सुधारणा आणि सार्वजनिक सुविधा सुधारल्या आहेत.

**भारतीय पर्यटन विषयक महत्त्व:**

भारतातील पर्यटनाचे महत्व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही स्तरावर आहे. भारतीय पर्यटन क्षेत्राच्या वैशिष्ट्यांसाठी काही प्रमुख मुद्दे हे आहेत.

**आर्थिक विकास:**

पर्यटन भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचे स्त्रोत आहे. त्यात रोजगार निर्माण, कच्च्या मालाचा वापर, स्थानिक उद्योगांना मदत, इत्यादी बाबी सामील आहेत.

**सांस्कृतिक आदान-प्रदान:**

भारतीय पर्यटन वैश्विक स्तरावर विविध संस्कृतींमध्ये आदान-प्रदान साधतो. भारतीय परंपरा, कला, साहित्य, संगीत, आणि नृत्य यांचा प्रसार होतो.

**सांस्कृतिक संवर्धन:**

पर्यटनामुळे भारतीय सांस्कृतिक ठिकाणांची देखभाल, संवर्धन, आणि पुनर्निर्माण कार्य पुढे जात आहे. यामुळे ऐतिहासिक स्मारकांचे रक्षण केले जात आहे.

**शहरी व ग्रामीण विकास:**

पर्यटनामुळे ग्रामीण भागात विकासाच्या संधी निर्माण होतात. तसेच, शहरी भागांमध्ये हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मॉल्स, इत्यादींचा विकास होतो.

**संदर्भ ग्रंथ:**

1. Bhatia, A. K. (2006). Tourism Development: Principles and Practices. Sterling Publishers.
2. Sharma, S. P. (2010). Tourism in India: A Study of Development and Impact. Kanishka Publishers.
3. Dey, S. (2015). Tourism and Social Development: A Sociological Perspective. Abhijeet Publications.
4. Jain, R. K. (2004). Tourism in India: Its Impact and Prospects. New Century Publications.
5. Chakrabarty, N. (2013). Tourism Management in India. Global Vision Publishing House.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक ठिकाण : राष्ट्रकूटांची राजधानी कंधार

**प्रा. किशोर जळबा सुर्यवाड**
सहाय्यक प्राध्यापक वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नांदेड (MS)

**Manuscript ID**:
JRD -2026-180139
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 160-163
January 2026

**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*दख्खनच्या इतिहासात राष्ट्रकूट राजवटीने राजकीय, लष्करी, सांस्कृतिक व स्थापत्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कंधार ही राष्ट्रकूटांची एक प्रमुख राजधानी असून ती ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध ठिकाण मानली जाते. कंधार किल्ला, जगत्तुंग समुद्र (तलाव), सुफी परंपरेतील दर्गाह, आधुनिक काळातील मानार प्रकल्प तसेच राष्ट्रकूट भवन वस्तुसंग्रहालय या घटकांमुळे कंधारचा इतिहास बहुआयामी स्वरूपात समोर येतो. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये कंधारच्या ऐतिहासिक वारशाचा अभ्यास करताना राष्ट्रकूटकालीन स्थापत्यकला, जलव्यवस्था, धार्मिक सहअस्तित्व आणि पर्यटन विकासाच्या शक्यता यांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. कंधार हे केवळ भूतकाळाचे अवशेष नसून भविष्यातील शाश्वत पर्यटन विकासासाठी एक सक्षम केंद्र ठरू शकते, हे या अभ्यासातून स्पष्ट होते.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन, सांस्कृतिक देवाणघेवाण, सांस्कृतिक संवर्धन, सांस्कृतिक वस्तूकरण, सामाजिक परिवर्तन, स्थानिक समाज, परंपरा व जीवनशैली, शाश्वत पर्यटन, सामाजिक एकात्मता, जागतिकीकरण.*

## प्रस्तावना

भारतीय पर्यटन परंपरेत ऐतिहासिक स्थळांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतातील प्राचीन राजधान्या, किल्ले, मंदिरे, दर्गाह, जलाशय व वस्तुसंग्रहालये ही केवळ भूतकाळाची साक्ष देणारी साधने नसून त्या समाजाच्या सांस्कृतिक स्मृती, राजकीय परंपरा आणि स्थापत्य कौशल्याचे मूर्त स्वरूप आहेत. ऐतिहासिक पर्यटनाच्या माध्यमातून वारशाचे संवर्धन, आर्थिक विकास आणि सांस्कृतिक जागरूकता यांना चालना मिळते. त्यामुळे ऐतिहासिक स्थळांचा शास्त्रीय अभ्यास पर्यटन अभ्यासाचा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. दख्खनच्या इतिहासात राष्ट्रकूट राजवंशाने इ.स. आठव्या ते दहाव्या शतकात व्यापक व प्रभावी सत्ता प्रस्थापित केली. राष्ट्रकूट काळात प्रशासकीय संघटन, लष्करी व्यवस्था, स्थापत्यकला आणि जलव्यवस्थापन या क्षेत्रांत लक्षणीय प्रगती झाली. या राजवटीच्या काळात कंधार हे केवळ लष्करी दुर्ग नसून एक महत्त्वाचे प्रशासकीय, आर्थिक व सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. कंधार किल्ला हा राष्ट्रकूटकालीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असून त्याची तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वारे आणि जलव्यवस्था ही त्या काळातील तांत्रिक प्रगततेची साक्ष देतात. कंधारचा इतिहास केवळ प्राचीन काळापुरता मर्यादित न राहता मध्ययुगीन व आधुनिक काळाशी सलग जोडलेला आहे. मध्ययुगीन काळात येथे सुफी संतांचे वास्तव्य झाले, ज्यामुळे कंधारमध्ये धार्मिक सहअस्तित्व, सामाजिक सलोखा आणि सांस्कृतिक एकात्मतेची परंपरा निर्माण झाली. पुढील काळात मानार प्रकल्पासारख्या आधुनिक जलसंपदा विकास योजनांमुळे कंधारच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर सकारात्मक परिणाम झाला. तसेच राष्ट्रकूट भवन वस्तुसंग्रहालयामुळे या समृद्ध ऐतिहासिक वारशाचे जतन व संशोधन शक्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये कंधारचा अभ्यास इतिहास, पुरातत्त्व आणि पर्यटन या बहुआयामी दृष्टिकोनातून करण्यात आला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the [Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International](https://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/) Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. किशोर जळबा सुर्यवाड, सहाय्यक प्राध्यापक वसंतराव नाईक महाविद्यालय, वसरणी, नांदेड (MS)*

**How to cite this article:**
*सुर्यवाड, . किशोर . जळबा . (2026). भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक ठिकाण : राष्ट्रकूटांची राजधानी कंधार. Journal of Research & Development, 18(1(V)), 160–163. https://doi.org/10.5281/zenodo.18479846*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18479846
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

राष्ट्रकूटकालीन वारशाचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करताना, कंधारला शाश्वत ऐतिहासिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या शक्यता आणि आव्हाने यांचा सखोल विचार करणे हा या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

**भुईकोट किल्ला, कंधार**

कंधार किल्ला हा महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील एक महत्त्वाचा भुईकोट किल्ला असून त्याचे ऐतिहासिक महत्त्व राष्ट्रकूट काळाशी निगडित आहे. दख्खनच्या राजकीय, लष्करी व सांस्कृतिक इतिहासात कंधार किल्ल्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. या किल्ल्याची उभारणी, विस्तार व विकास विविध राजवटींमध्ये झाला असला, तरी त्याचा मूलभूत पाया राष्ट्रकूट राजवटीत घातला गेला, हे शिलालेखीय व स्थापत्य पुराव्यांवरून स्पष्ट होते. राष्ट्रकूट सम्राट कृष्ण पहिला याने इ.स. आठव्या शतकात कंधार नगराची स्थापना केली. नगर स्थापनेच्या वेळीच त्याने येथे मातीचा गढीसारखा किल्ला उभारल्याचा उल्लेख आढळतो. हा किल्ला सुरुवातीस संरक्षणात्मक दृष्टीने साध्या स्वरूपाचा असावा. पुढील काळात राष्ट्रकूट सम्राट अमोघवर्ष पहिला व कृष्ण तिसरा यांनी किल्ल्याचा विस्तार करून त्यास भक्कम तटबंदी, उंच बुरुज व संरक्षक खंदक दिला. आज जो कंधार किल्ला आपल्याला दिसतो, तो मुख्यत्वे कृष्ण तिसरा यांच्या कारकीर्दीत विकसित झाला असून इ.स. ९४१ मध्ये किल्ल्याचे बांधकाम पूर्ण झाल्याचा उल्लेख येथील शिलालेखात आढळतो. त्यामुळे कंधार किल्ल्याचे प्रमुख शिल्पकार राष्ट्रकूटच होते, हे निश्चितपणे म्हणता येते. कंधार किल्ल्याचे एकूण भूक्षेत्रफळ सुमारे चोवीस एकर असून त्याची रचना अत्यंत नियोजनबद्ध आहे. किल्ल्यास दोन तटबंदी असून बाहेरील व आतील तटबंदीवर प्रत्येकी सोळा असे एकूण बत्तीस बुरुज उभारण्यात आले आहेत. हे बुरुज सुमारे दीडशे ते दोनशे फूट उंच असून किल्ल्याच्या संरक्षणक्षमतेत मोलाची भर घालतात. किल्ल्याभोवती सुमारे शंभर फूट रुंद व पंचवीस फूट खोल असा खंदक खोदण्यात आला आहे. या खंदकात नैसर्गिक झरे असून जगत्तुंग समुद्र या जलाशयातून भूमिगत मार्गाने पाणी सोडण्याची व्यवस्था केली होती. त्यामुळे खंदकात वर्षभर पाणी राहात असे. किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार उत्तराभिमुख असून त्याची रचना शत्रूला गोंधळात टाकणारी आहे. प्रवेशद्वाराच्या समोर बांधलेली भक्कम भिंत ही संरक्षणात्मक स्थापत्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. महाकाली दरवाजा हे किल्ल्याचे प्रमुख प्रवेशद्वार असून त्याला दोन विशाल बुरुजांनी मजबुती दिलेली आहे. या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर किल्ल्यातील अंतर्गत वास्तूंची रचना स्पष्टपणे दिसून येते. किल्ल्यातील राणी महाल, बारादरी महाल, लाल महाल, दरबार महाल व शीश महाल या वास्तू तत्कालीन राजेशाही जीवनशैलीचे दर्शन घडवतात. राणी महालात तांब्याच्या पाईपद्वारे पाणीपुरवठा, स्वतंत्र स्नानगृह व शौचालयाची व्यवस्था होती, यावरून राष्ट्रकूटकालीन जलव्यवस्थेची प्रगत पातळी लक्षात येते. बारादरी महाल व शीश महालातील भित्तीचित्रे, कमानी व प्लास्टरवरील कोरीव काम तत्कालीन कलावैभवाचे प्रतीक आहेत. किल्ल्यातील जलव्यवस्था विशेष उल्लेखनीय आहे. बारव, जलमहाल, हौद, नाल्या व पाईपलाईन यांचा एकात्मिक वापर करून किल्ल्यातील नागरिक, बागा व कारंजी यांना पाणीपुरवठा केला जात असे. बारवेतील पाणी कधीही न आटणे, ही आजही लोकस्मृतीत जपली गेलेली बाब आहे. जलमहालासारखी वास्तू ही हवामानाशी सुसंगत स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना आहे. किल्ल्यातील कैदखाना, पागा व बारुदखाना या वास्तू किल्ल्याच्या लष्करी महत्त्वावर प्रकाश टाकतात. कैदखान्याची रचना अत्यंत कठोर असून निजाम काळातील नासिरजंगास येथे कैदेत ठेवण्यात आल्याचा उल्लेख आढळतो. बारुदखान्यातील अर्धगोलाकार छतांच्या खोल्या व दगडी तोफगोळे किल्ल्याच्या युद्धसज्जतेचे द्योतक आहेत. किल्ल्यातील चित्रकला ही राष्ट्रकूटकालीन सांस्कृतिक परंपरेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. वनस्पतीजन्य रंग, डिंकाचा वापर व वेलपत्तींची नक्षी ही या चित्रकलेची वैशिष्ट्ये होती. मध्ययुगीन इस्लामी काळात अनेक ठिकाणी पुनः प्लास्टर करण्यात आल्याने ही चित्रे नष्ट झाली असली, तरी काही ठिकाणी त्यांचे अवशेष आजही आढळतात. किल्ल्यातील शिवमंदिराचे मशीदीत रूपांतर हे राजकीय सत्तांतराचे प्रतीक मानता येते. आजही मूळ हिंदू मंदिराचा प्रवेशद्वार व शिल्पे अस्तित्वात असून ती तत्कालीन धार्मिक स्थापत्याची साक्ष देतात. एकूणच कंधार किल्ला हा केवळ लष्करी दुर्ग नसून तो राष्ट्रकूटकालीन स्थापत्य, जलव्यवस्था, कला व राजकीय इतिहास यांचा एक समृद्ध संगम आहे. दख्खनच्या इतिहासाच्या अभ्यासात कंधार किल्ल्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असून भविष्यात सखोल पुरातत्त्वीय संशोधनाची येथे मोठी संधी आहे.

**जगत्तुंग समुद्र (तलाव)**

भारतात प्राचीन काळापासून जलसंधारण व जलव्यवस्थापनाला अत्यंत महत्त्व देण्यात आले आहे. अनियमित पर्जन्यमान, कृषीप्रधान अर्थव्यवस्था आणि वाढती लोकसंख्या यांमुळे पाण्याचा साठा व त्याचे नियोजनपूर्वक वितरण करणे ही काळाची गरज होती. त्यामुळेच विविध राजवटींच्या काळात तलाव, बंधारे, कुंडे व जलाशय यांची निर्मिती करण्यात आली. या पार्श्वभूमीवर राष्ट्रकूट काळातील जगत्तुंग तलाव हा प्राचीन भारतीय जलस्थापत्य परंपरेचा एक महत्त्वपूर्ण आणि टिकाऊ नमुना मानला जातो. राष्ट्रकूट सम्राट कृष्ण तिसरा यांच्या कारकिर्दीत कंधार हे एक महत्त्वाचे राजकीय व प्रशासकीय केंद्र होते. राजधानीच्या दैनंदिन गरजा, नगराचा पाणीपुरवठा तसेच शेतीच्या सिंचनासाठी पुरेशा जलसाठ्याची आवश्यकता होती. याच गरजेतून कंधार परिसरात असलेल्या जलाशयांच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्यात आले. इतिहाससाधनांवरून असे दिसून येते की जगत्तुंग तलावाची मूळ निर्मिती राष्ट्रकूट सम्राट कृष्ण पहिला याने केली होती. पुढे कृष्ण तिसरा याने या जलाशयाची पुनर्बांधणी करून त्यास अधिक सुदृढ आणि व्यापक स्वरूप दिले. कृष्ण दुसरा यास जगत्तुंगदेव नावाचा पुत्र होता, जो अल्पवयात मरण पावला. या पुत्राच्या स्मरणार्थ कृष्ण तिसरा याने या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

जलाशयाला 'जगत्तुंग समुद्र' असे नाव दिले. त्यामुळे हा जलाशय केवळ पाणी साठवण्याचे साधन न राहता, राजकीय, सांस्कृतिक आणि भावनिक आशय असलेले स्मारक ठरतो. तत्कालीन राजसत्तेने सार्वजनिक हितासाठी उभारलेल्या स्थापत्यांना व्यक्तीगत स्मृतीशी जोडण्याची परंपरा येथे दिसून येते. जगत्तुंग तलावाचे बांधकाम हे राष्ट्रकूटकालीन जलस्थापत्यशास्त्रातील प्रगत तंत्रज्ञानाचे द्योतक आहे. भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडवणे, साठवलेल्या पाण्याचे दीर्घकाळ संरक्षण करणे आणि अतिरिक्त पाण्याचा योग्य निचरा होईल अशी रचना करणे या बाबींत तत्कालीन स्थापत्यकारांचे कौशल्य स्पष्टपणे दिसून येते. याच कारणामुळे आज एक हजार वर्षांहून अधिक काळ लोटूनही हा जलाशय सुस्थितीत असून कार्यक्षमतेने वापरात आहे. या तलावाचा उपयोग प्राचीन काळापासून शेतीसाठी सिंचन, नगराच्या पाणीपुरवठ्यासाठी तसेच जनावरांच्या पाण्याच्या गरजा भागवण्यासाठी होत आहे. पाण्याच्या उपलब्धतेमुळे परिसरातील कृषी उत्पादनात सातत्य राखले गेले असून स्थानिक अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त झाले आहे. आजही जगत्तुंग तलावाचा उपयोग सुरू असणे हे प्राचीन जलव्यवस्थापनाच्या दूरदृष्टीचे आणि शाश्वत नियोजनाचे ठळक उदाहरण मानले जाते. अशा प्रकारे जगत्तुंग तलाव हा राष्ट्रकूट काळातील प्रशासन, स्थापत्यकौशल्य आणि पर्यावरणीय जाणिवेचा संगम दर्शवितो. प्राचीन भारतीय समाजाने निसर्गाशी सुसंगत राहून निर्माण केलेल्या जलरचनांची उपयुक्तता आणि टिकाऊपणा या जलाशयाच्या माध्यमातून आजही अनुभवता येतो. त्यामुळे जगत्तुंग तलावाचे ऐतिहासिक व स्थापत्यदृष्ट्या महत्त्व केवळ स्थानिक पातळीपुरते मर्यादित न राहता, भारतीय जलसंस्कृतीच्या व्यापक अभ्यासासाठी अत्यंत मोलाचे ठरते.

**कंधारचा दर्गाह**

कंधार शहराचा मध्ययुगीन इतिहास पाहता येथे सुफी परंपरेचा खोलवर प्रभाव आढळतो. या काळात अनेक सुफी संतांनी कंधार परिसरात वास्तव्यास येऊन धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध केले. त्यांपैकी सैयदुद्दीन रफाई उर्फ हाजी सरवरे मखदूम सैय्या आणि सांगडे सुलतान हे दोन प्रमुख सुफी संत मानले जातात. या संतांच्या कार्यामुळे कंधार हे केवळ राजकीय व लष्करी केंद्र न राहता आध्यात्मिक केंद्र म्हणूनही विकसित झाले. जगतुंग तलावाच्या काठावर स्थित सैयदुद्दीन रफाई उर्फ हाजी सरवरे मखदूम सैय्या यांच्या दर्गाहिला विशेष महत्त्व प्राप्त आहे. ही दर्गाह बडी दर्गाह या नावाने ओळखली जाते. स्थापत्यदृष्ट्या साधी असली तरी श्रद्धेच्या दृष्टीने ती अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. याच जगतुंग तलावाच्या दक्षिण किनाऱ्यावर सांगडे सुलतान या अवलियांची दर्गाह आहे. या दोन्ही दर्गाहांचे अस्तित्व मध्ययुगीन काळात निर्माण झाले असून त्या आजही अखंडपणे धार्मिक आस्थेचे केंद्र राहिल्या आहेत. कंधार येथील दर्गाहांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्या केवळ मुस्लिम समाजापुरत्या मर्यादित न राहता हिंदू-मुस्लिम समाजाच्या सामूहिक श्रद्धेचे केंद्र बनल्या आहेत. या दर्गाहांवर विविध धर्मीय भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे या स्थळांमधून धार्मिक सहअस्तित्व, सामाजिक सलोखा आणि सांस्कृतिक एकात्मतेचे दर्शन घडते. मध्ययुगीन काळात सुफी संतांनी दिलेला मानवतावादी संदेश आजही या दर्गाहांच्या परंपरेतून प्रकट होताना दिसतो. दरवर्षी कंधार शहरात बडी दर्गाहचा भव्य उरूस भरविण्यात येतो. हा उरूस कंधारचा उरूस या नावाने प्रसिद्ध आहे. या उरुसात हजारो भाविक सहभागी होतात. धार्मिक विधींसोबतच सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमही या काळात आयोजित केले जातात. उरुसाच्या दिवशी शासनाकडून स्थानिक सुट्टी जाहीर केली जाते, यावरून या उत्सवाचे सामाजिक व प्रशासकीय महत्त्व स्पष्ट होते. पर्यटनाच्या दृष्टीनेही कंधार येथील या दर्गाहांचे स्थान महत्त्वाचे आहे. ऐतिहासिक वारसा, धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक सलोखा यांचा संगम या स्थळांवर आढळतो. त्यामुळे दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक कंधार शहराला भेट देतात. या दर्गाहांमुळे कंधारच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक ओळखीला एक वेगळे अधिष्ठान प्राप्त झाले आहे.

**मनार प्रकल्प, कंधार**

कंधार तालुक्याच्या पूर्वेस सुमारे १८ कि.मी. अंतरावर बारुळ हे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेले गाव वसलेले आहे. या गावात प्राचीन आणि देखणे शिवमंदिर असून वर्षभर भाविकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. धार्मिकतेसोबतच बारुळ गावाची ओळख जलसंपदा विकासाच्या दृष्टीनेही महत्त्वाची ठरते. बारुळ गावाजवळून वाहणाऱ्या मन्याड नदीवर सन १९६४ मध्ये एक महत्त्वाकांक्षी जलसिंचन प्रकल्प उभारण्यात आला असून तो मानार प्रकल्प या नावाने ओळखला जातो. या प्रकल्पाचे भूमिपूजन सन १९६० मध्ये करण्यात आले होते. चार वर्षांच्या कालावधीत प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. दि. १५ जानेवारी १९६४ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांच्या शुभहस्ते मानार प्रकल्पाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. मन्याड नदीवर बांधण्यात आलेला मानार प्रकल्प हा कंधार तालुक्यातील एक महत्त्वाचा मध्यम सिंचन प्रकल्प मानला जातो. या प्रकल्पामुळे परिसरातील शेतीला पाणीपुरवठा होऊन कृषी उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. विशेषतः खरीप व रब्बी हंगामात पिकांच्या उत्पादनासाठी मानार प्रकल्प उपयुक्त ठरला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे. मानार प्रकल्पाचे दृश्य अत्यंत विहंगम आहे. डोंगरदऱ्यांतून वाहत येणारे पाणी प्रकल्पाच्या जलाशयात साठून विशाल स्वरूप धारण करते. प्रकल्पातील निळेशार पाणी डोळे दिपवून टाकणारे असून आजूबाजूचा निसर्ग मन मोहून टाकतो. विविध जातींचे स्थलांतरित व स्थानिक पक्षी येथे आढळतात. त्यांच्या किलबिलाटामुळे परिसरात नैसर्गिक सजीवता जाणवते. निसर्गसौंदर्य, शांत वातावरण आणि जलाशयाचे भव्य रूप यामुळे मानार प्रकल्प हे एक आकर्षक पर्यटनस्थळ म्हणूनही उदयास येत आहे. पर्यटक, निसर्गप्रेमी आणि छायाचित्रकारांसाठी हे ठिकाण विशेष आकर्षण ठरते. त्यामुळे मानार प्रकल्प केवळ सिंचन प्रकल्प न राहता कंधार तालुक्याच्या सामाजिक, आर्थिक व पर्यटन विकासात महत्त्वाची भूमिका बजावणारा घटक ठरला आहे.

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**राष्ट्रकूट भवन वस्तुसंग्रहालय, बहाद्दरपूरा**

बहाद्दरपूरा व त्यालगतचा कंधार परिसर हा प्राचीन दख्खनच्या राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. या परिसरात मान्यखेट व कंधार येथील राष्ट्रकूट राजवंश, वत्सगुल्मचे वाकाटक, बदामी व कल्याणीचे चालुक्य, देवगिरीचे यादव, वरंगळचे काकतीय तसेच हैदराबादच्या आसफिया घराण्याच्या कालखंडाशी संबंधित विविध पुरातत्त्वीय अवशेष प्राप्त झाले आहेत. या अवशेषांमध्ये शिलालेख, मूर्तिशिल्प तसेच मंदिर स्थापत्याचे भग्न अवशेष यांचा समावेश असून, ते या प्रदेशातील दीर्घकालीन ऐतिहासिक सातत्य अधोरेखित करतात. कंधार हे राष्ट्रकूट सत्तेच्या काळात एक महत्त्वाचे प्रशासकीय व राजधानीचे केंद्र होते. पुढील यादव कालखंडातही कंधार हे देशविभागाचे केंद्र म्हणून कार्यरत होते. त्यामुळे या परिसरात प्रामुख्याने राष्ट्रकूट व यादव काळाशी संबंधित पुरातत्त्वीय पुरावे अधिक प्रमाणात आढळतात. या पुराव्यांमधून त्या काळातील प्रशासन व्यवस्था, धार्मिक परंपरा व स्थापत्यकलेचे स्वरूप स्पष्ट होते. या ऐतिहासिक वारशाचे संरक्षण, संवर्धन व शास्त्रीय अभ्यास करण्याच्या उद्देशाने कंधार येथे महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. हा विभाग बहाद्दरपूरा–कंधार परिसरातील पुरातत्त्वीय अवशेषांचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण व जतन करण्याचे कार्य करीत असून, लोकसहभागाच्या माध्यमातूनही अवशेष संरक्षणाची चळवळ राबविली जाते. स्थानिक पातळीवर प्राप्त झालेल्या मूर्तिशिल्प, शिलालेख व मंदिर स्थापत्याच्या भग्न अवशेषांचे संकलन करून त्यांचे जतन करणे ही या प्रक्रियेतील महत्त्वाची बाब ठरली आहे. या प्रयत्नांचा परिपाक म्हणून बहाद्दरपूरा येथे वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याची आवश्यकता प्रकर्षाने पुढे आली. शासकीय पातळीवरील प्रयत्नांमधून मन्याड नदीच्या उत्तर तीरावर, पाटबंधारे विभागाच्या इमारतीत १४ नोव्हेंबर १९९२ रोजी वस्तुसंग्रहालयाची अधिकृत स्थापना करण्यात आली. या संग्रहालयास 'राष्ट्रकूट भवन वस्तुसंग्रहालय' असे नामकरण करण्यात आले. राष्ट्रकूट भवन वस्तुसंग्रहालय हे महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असून, येथे प्रामुख्याने राष्ट्रकूट काळातील शिलालेख, हिंदू, बौद्ध व जैन परंपरेशी निगडित मूर्तिशिल्प, मंदिर स्थापत्याचे अवशेष तसेच मध्ययुगीन कालखंडातील काही निवडक पुरातत्त्वीय वस्तू सुरक्षितरीत्या जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. स्वतंत्र इमारतीत कार्यरत असलेले हे वस्तुसंग्रहालय केवळ अवशेषांचे जतन करणारे केंद्र नसून, दख्खनच्या प्रादेशिक इतिहासाच्या संशोधनासाठी एक महत्त्वपूर्ण स्रोत म्हणूनही त्याचे स्थान अधोरेखित होते.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की कंधार हे राष्ट्रकूट काळातील एक महत्त्वाचे राजकीय, सांस्कृतिक व स्थापत्य केंद्र होते. कंधार किल्ला व जगत्तुंग समुद्र ही राष्ट्रकूटकालीन स्थापत्यकला व जलव्यवस्थेची उत्कृष्ट उदाहरणे असून त्या काळातील तांत्रिक प्रगततेचे द्योतक आहेत. कंधारमधील सुफी दर्गाह परंपरा ही धार्मिक सहिष्णुता व सामाजिक सलोख्याचे प्रतीक ठरते, तर मानार प्रकल्पामुळे आधुनिक काळात कृषी, अर्थव्यवस्था व पर्यटन विकासाला चालना मिळाली आहे. राष्ट्रकूट भवन वस्तुसंग्रहालयामुळे या ऐतिहासिक वारशाचे जतन व संशोधन शक्य झाले आहे. एकूणच कंधार हे केवळ राष्ट्रकूटांची राजधानी नसून भारतीय ऐतिहासिक पर्यटनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे आणि संभाव्य केंद्र आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१. कुलकर्णी, अ. र. दख्खनचा मध्ययुगीन इतिहास, पुणे : देशमुख प्रकाशन, १९९८.
२. देशपांडे, श. ग. राष्ट्रकूटकालीन महाराष्ट्र, मुंबई : लोकप्रिय प्रकाशन, २००३.
३. देव प्रभाकर, कंधार एक ऐतिहासिक शहर, मुंबई, संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय विभाग, महाराष्ट्र शासन. १९८५
४. शिरवाडकर, द. ग. महाराष्ट्रातील किल्ले, पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९९५.
५. गायकवाड, स. म. भारतीय जलसंस्कृतीचा इतिहास, औरंगाबाद : मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, २००१.
६. जोशी, म. ग. – महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, मुंबई: ग्रंथाली, २००७.
७. भोसले, के. डी. भारतीय पर्यटन : इतिहास आणि शक्यता, औरंगाबाद : कैलास प्रकाशन, २०१५.
८. इनामदार, एन. आर. मध्ययुगीन भारतातील सुफी परंपरा, पुणे : साकेत प्रकाशन, २००५.
९. महाराष्ट्र शासन, पुरातत्त्व विभाग, नांदेड जिल्हा पुरातत्त्व सर्वेक्षण अहवाल, मुंबई, २०१०.
१०. Kulkarni, R. N. – Ancient Indian Water Management. New Delhi : Oxford University Press, 1994.
११. Fleet, J. F. – Dynasties of the Kanarese Districts. New Delhi : Archaeological Survey of India, 1982.

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# हिंदी का यात्रा-साहित्य

**प्रोफे.डॉ.अनिल ढवळे**
हिन्दी विभागाध्यक्ष, जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे – महाराष्ट्र
**Email:** anildhawale@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180140
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(V)
Pp. 164-167
January 2026

**Submitted:** 13 Dec. 2025
**Revised:** 23 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*प्रस्तुत शोध आलेख में हिन्दी के यात्रा साहित्य की परंपरा, विकास और उसकी साहित्यिक विशेषताओं का अध्ययन किया गया है। यात्रा साहित्य हिन्दी गद्य की एक महत्वपूर्ण विधा है, जिसमें लेखक अपने यात्रा-अनुभवों के माध्यम से विभिन्न स्थानों, संस्कृतियों, समाजों और जीवन-शैलियों का सजीव चित्रण प्रस्तुत करता है। इस अध्ययन में हिन्दी यात्रा साहित्य की ऐतिहासिक पृष्ठभूमि, उसके विकास क्रम तथा उसकी प्रमुख प्रवृत्तियों का विश्लेषण किया गया है। शोध में यह स्पष्ट किया गया है कि यात्रा साहित्य केवल भौगोलिक स्थानों के वर्णन तक सीमित नहीं रहता, बल्कि उसमें सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक और मानवीय अनुभवों का भी समावेश होता है। हिन्दी यात्रा साहित्य में अनेक साहित्यकारों ने अपने अनुभवों के माध्यम से समाज, संस्कृति और प्रकृति के विविध रूपों को अभिव्यक्त किया है। हिन्दी के लेखकों ने अपनी यात्राओं के माध्यम से विभिन्न देशों और संस्कृतियों का विस्तृत और रोचक चित्रण किया है। इस शोध आलेख का उद्देश्य हिन्दी यात्रा साहित्य की प्रकृति, उसके साहित्यिक महत्व तथा उसकी विशिष्टताओं को स्पष्ट करना है। यात्रा साहित्य केवल मनोरंजन का साधन नहीं, बल्कि ज्ञानवर्धन, सांस्कृतिक आदान-प्रदान को विकसित करने का भी महत्वपूर्ण माध्यम है।*

***बीज शब्द :*** *हिन्दी यात्रा साहित्य, यात्रा-वृत्तांत, यात्रा अनुभव, संस्कृति, समाज, प्रकृति।*

**प्रस्तावना**

जब कोई साहित्यकार या संवेदनशील मनुष्य यात्रा के दौरान प्राप्त अनुभवों को अपनी सृजनात्मक दृष्टि और अनुभूति के माध्यम से कलात्मक रूप प्रदान करता है, तब वही अभिव्यक्ति यात्रा-साहित्य के रूप में प्रतिष्ठित होती है। यात्रा साहित्य मानव जीवन को व्यापक दृष्टि, अनुभव की गहराई और संवेदनशीलता प्रदान करने वाला साहित्यिक रूप है। यात्राओं के माध्यम से लेखक भिन्न-भिन्न भौगोलिक क्षेत्रों, संस्कृतियों, समाजों और जीवन-शैलियों से साक्षात्कार करता है और अपने अनुभवों को साहित्यिक रूप देकर पाठक तक पहुँचाता है। इससे पाठक के ज्ञान का विस्तार होता है और उसकी सोच संकीर्ण सीमाओं से बाहर निकलकर व्यापक होती है। यात्रा साहित्य मनुष्य में जिज्ञासा, साहस और आत्मविश्वास का विकास करता है। यह पाठक को नए स्थानों, लोगों और परिस्थितियों से परिचित कराकर उसमें यात्रा की भावना जाग्रत करता है। साथ ही, विभिन्न संस्कृतियों और जीवन-मूल्यों का परिचय देकर सहिष्णुता, सह-अस्तित्व और मानवीय संवेदना को मजबूत करता है। इसके अतिरिक्त, यात्रा साहित्य आत्मचिंतन और आत्मानुभूति का भी माध्यम है। यात्राओं के दौरान लेखक स्वयं को नए परिवेश में देखता है, जिससे जीवन के प्रति उसकी दृष्टि परिपक्व होती है। सामाजिक, आर्थिक और सांस्कृतिक विषमताओं का सजीव चित्रण पाठक को यथार्थ से जोड़ता है और सामाजिक चेतना को जाग्रत करता है।

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रोफे.डॉ.अनिल ढवळे, हिन्दी विभागाध्यक्ष, जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे – महाराष्ट्र*

**How to cite this article:**
*ढवळे, . अनिल . (2026). हिंदी का यात्रा-साहित्य. Journal of Research & Development, 18(1(V)), 164–167. https://doi.org/10.5281/zenodo.18479899*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18479899
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

यात्रा साहित्य न केवल मनोरंजन करता है, बल्कि मानव जीवन को समृद्ध, उदार और विवेकशील बनाकर उसके व्यक्तित्व के सर्वांगीण विकास में महत्वपूर्ण भूमिका निभाता है। भारतीय भाषाओं का विशेषत: हिन्दी का यात्रा साहित्य अत्यंत समृद्ध हैं। भारत में यात्रा की परंपरा अत्यंत प्राचीन रही है, किंतु यात्रा के लिखित विवरण हमें भारतेन्दु-युग से पूर्व प्रायः हस्तलिखित ग्रंथों के रूप में ही प्राप्त होते हैं।

**शोधालेख के उद्देश्य -**

1. यात्रा-साहित्य अवधारणा का विवेचन करना।
2. यात्रा-साहित्य विधा की विशेषताओं को स्पष्ट करन करना।
3. यात्रा-साहित्य के प्रमुख रचनाकारों का परिचय देना।
4. यात्रा-साहित्य में अभिव्यक्त विविध बिंदुओं का विवेचन करना।

**यात्रा-साहित्य -**

यात्रा-साहित्य साहित्य की वह सशक्त विधा है जिसमें लेखक अपनी यात्राओं के अनुभवों को आत्मानुभूति, पर्यवेक्षण और संवेदना के साथ अभिव्यक्त करता है। यह केवल स्थानों का वर्णन नहीं होता, बल्कि भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक और मानवीय अनुभवों का समन्वित चित्र प्रस्तुत करता है। यात्रा-साहित्य की मूल अवधारणा 'गमन' से अधिक 'अनुभव' पर आधारित होती है, जहाँ बाहरी यात्रा के साथ-साथ लेखक की आंतरिक यात्रा भी सम्पन्न होती है। यात्रा-साहित्य का आधार प्रत्यक्ष अनुभव है। लेखक जिन स्थलों, लोगों और परिस्थितियों से साक्षात्कार करता है, वही उसके लेखन का मूल स्रोत बनते हैं। इस विधा में यथार्थ का विशेष महत्त्व होता है, परंतु वह नीरस तथ्यात्मक विवरण न होकर साहित्यिक संवेदना से युक्त होता है। लेखक अपने दृष्टिकोण, भावनाओं और विचारों को यात्रा के अनुभवों के साथ इस प्रकार पिरोता है कि पाठक भी उस यात्रा का सहभागी बन जाता है।

**यात्रा-साहित्य-विधा विशेष की विशेषताएँ:**

यात्रा–साहित्य की एक स्वतंत्र और महत्त्वपूर्ण विधा है, जिसमें लेखक अपनी यात्राओं के प्रत्यक्ष अनुभवों को कलात्मक और भावनात्मक रूप में प्रस्तुत करता है। इस विधा की कुछ प्रमुख विशेषताएँ निम्नलिखिताओं के संबंध में विचार करने पर स्पष्ट होता है कि यात्रा–साहित्य लेखक के स्वयं देखे, भोगे और अनुभूत अनुभवों पर आधारित होता है, जिससे उसमें प्रामाणिकता और विश्वसनीयता होती है। इसमें तथ्यात्मक यथार्थ के साथ लेखक की भावनाएँ, विचार और दृष्टिकोण भी जुड़े होते हैं। स्थानों, प्रकृति, समाज, संस्कृति और जीवन–शैली का सजीव और चित्रात्मक वर्णन यात्रा–साहित्य की प्रमुख विशेषता हैं । यात्रा–साहित्य विभिन्न देशों, समाजों और संस्कृतियों का परिचय कराता है, जिससे पाठक की दृष्टि व्यापक होती है। बाहरी यात्रा के साथ-साथ लेखक की आंतरिक यात्रा भी इसमें व्यक्त होती है। इतिहास, भूगोल, समाजशास्त्र और मानव-विज्ञान से जुड़ी जानकारी सहज रूप में मिलती है। यात्रा–साहित्य की भाषा सरल, सरस और प्रवाहमयी होती है, जिससे पाठक की रुचि बनी रहती है। "यात्रा-साहित्य की भाषा शैली में विविधतापूर्ण विशेषताओं का मिश्रण मिलता है। यात्रा-साहित्य में बाह्य रूप से निबंध, वर्णनात्मक, संस्मरण, डायरी, पत्र, काव्यात्मक, औपन्यासिक, आत्मकथा एंव रेखाचित्र आदि व आंतरिक रूप से-भावुकतापूर्ण, संवेदनात्मक, दार्शनिक, लाक्षणिक, आलंकारिक, चित्रात्मक एंव काल्पनिक आदि शैलियों का प्रयोग मिलता है। यात्रा-साहित्य भाषा सरल, सहज, स्वाभाविक एवं रूचि पूर्ण है। लेखकों की विचार प्रधानता और संस्कृतनिष्ठ शब्दावली के कारण कहीं-कहीं पर भाषा में क्लिष्टता एंव गंभीरता के दर्शन भी होते है।"1 यात्रा–साहित्य यह विधा सहिष्णुता, सह-अस्तित्व और मानवीय एकता की भावना को सुदृढ़ करती है।

यात्रा–साहित्य एक ऐसी विधा है, जो अनुभव, ज्ञान और संवेदना का सुंदर समन्वय प्रस्तुत कर पाठक को न केवल यात्रा कराती है, बल्कि जीवन को समझने की नई दृष्टि भी प्रदान करती है।

यात्रा-साहित्य का एक महत्त्वपूर्ण पक्ष सांस्कृतिक संवाद है। भिन्न-भिन्न देशों, समाजों और सभ्यताओं का परिचय देकर यह साहित्य मानवता की एकता और विविधता दोनों को उजागर करता है।हिन्दी में यात्रा-साहित्य को यात्रावृत्त या यात्रावृत्तांत भी कहा जाता है। "'यात्रावृत्त' शब्द का अर्थ है यात्रा का वृत्तांत। यात्रा-वृत्तांत में मनुष्य के द्वारा की गई यात्रा का अनुभव कलात्मकता के साथ प्रस्तुत किया जाता है। यहाँ कल्पना के लिए अधिक गुंजाइश नहीं है। इसमें बीते हुए यथार्थ का वर्णन होता है। यात्रा के दौरान जिन व्यक्तियों से भेंट होती है, उनका स्वाभाविक चित्रण होता है।"2 यात्रावृत्त को पढने से पाठक की दृष्टि व्यापक होती है और उसमें

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

सहिष्णुता, जिज्ञासा तथा वैश्विक चेतना का विकास होता है। भारतीय यात्रा-साहित्य में राहुल सांकृत्यायन जैसे रचनाकारों ने यात्रा को ज्ञान, इतिहास और संस्कृति के अध्ययन का माध्यम बनाया।

इसके अतिरिक्त, यात्रा-साहित्य आत्मचिंतन और जीवन-दर्शन का भी वाहक है। यात्रा के दौरान लेखक स्वयं को नए परिवेश में परखता है, जिससे उसके विचारों में परिपक्वता आती है। सामाजिक विषमताएँ, आर्थिक स्थितियाँ और मानवीय संघर्ष यात्रा-वृत्तांतों के माध्यम से उजागर होते हैं, जिससे यह विधा सामाजिक चेतना को भी जाग्रत करती है। डॉ. माजदा असद के अनुसार, "यों तो साहित्य की किसी विधा को वैधे-वैधाए साँचे में नहीं बाँधा जा सकता। एक विधा में दूसरी विधा के तत्त्व अवश्य मिलते हैं। यात्रावृत्त में तथ्यों और स्थान का विशेष महत्व होता है आत्मीयता व्यक्ति का आदि इस विधा की विशेषताएं हैं।"3 यात्रा-साहित्य की अवधारणा केवल घूमने-फिरने के वर्णन तक सीमित नहीं है, बल्कि यह अनुभव, संवेदना, ज्ञान और आत्मविकास का साहित्यिक रूप है। यह पाठक को नई दृष्टि प्रदान करता है और मानव जीवन को अधिक उदार, जागरूक और विवेकशील बनाने में महत्वपूर्ण भूमिका निभाता है।

**यात्रा-साहित्य के प्रमुख रचनाकार**

भारतेन्दु-युग से लेकर स्वतंत्रता-प्राप्ति तक का काल यात्रा-साहित्य के विकास की दृष्टि से अत्यंत महत्वपूर्ण रहा है। इस युग में सत्यदेव परिव्राजक और राहुल सांकृत्यायन यात्रा-वृत्त लेखन के सर्वाधिक प्रमुख रचनाकार के रूप में उभरे तथा यात्रा-साहित्य के दो सुदृढ़ आधार-स्तंभ माने गए। इन दोनों साहित्यकारों ने मात्रात्मक और गुणात्मक दोनों ही दृष्टियों से यात्रा-साहित्य को समृद्ध किया। इसी कालखंड में डॉ. गदाधर सिंह, माधव प्रसाद मिश्र, बेणीशुक्ल, पं. सूर्यनारायण व्यास, धीरेन्द्र वर्मा, लक्ष्मीनारायण टण्डन, सत्येन्द्र नारायण, गोपालराम गहमरी, केदाररूप राय, गंगलानन्द पुरी, कृपानाथ मिश्र आदि अनेक महत्वपूर्ण यात्रा-वृत्तकार सक्रिय रहे। स्वतंत्रता-पूर्व यात्रा-साहित्य सामान्यतः स्थूल वर्णनात्मक रहा तथा उस पर धार्मिक भावना का प्रभाव स्पष्ट दिखाई देता है, किंतु इस युग के उत्तरार्ध तक पहुँचते-पहुंचते यात्रा-साहित्य में शैलीगत विविधता, सूक्ष्म वर्णन, भाषा की लाक्षणिकता, संवेदनशीलता और आत्मीयता जैसे गुण क्रमशः विकसित होने लगे।

स्वातंत्र्योत्तर काल में यात्रा-साहित्य का अभूतपूर्व विस्तार हुआ। इस युग में यात्राओं की संख्या और अनुभवों की विविधता के साथ-साथ लेखकों की संख्या में भी उल्लेखनीय वृद्धि हुई। विभिन्न विधाओं और क्षेत्रों से जुड़े रचनाकारों के कारण यात्रा-साहित्य में विषयवस्तु, शैली और शिल्प के नवीन प्रयोग दृष्टिगोचर होते हैं। इस काल के प्रमुख यात्रा-साहित्यकारों में भगवतशरण उपाध्याय, मोहन राकेश, रामवृक्ष बेनीपुरी, यशपाल, विष्णु प्रभाकर, सेठ गोविन्द दास, अज्ञेय, दिनकर, निर्मल वर्मा, काका कालेलकर, रामकुमार वर्मा, नगेन्द्र, राजेन्द्र अवस्थी, शंकर दयाल सिंह, प्रभाकर द्विवेदी, रामदरश मिश्र, लल्लन प्रसाद व्यास, कृष्णनाथ, राज बुद्धिराजा, अजित कुमार आदि के नाम विशेष रूप से उल्लेखनीय हैं। इस प्रकार स्वातंत्र्योत्तर यात्रा-साहित्य न केवल अनुभवों की व्यापकता प्रस्तुत करता है, बल्कि मानवीय संवेदना और साहित्यिक प्रयोगशीलता का सशक्त दस्तावेज भी बनकर उभरता है। रामस्वरूप चतुर्वेदी यात्रा साहित्य की विकास यात्रा पर प्रकाश डालते हुए लिखते हैं, "आरंभिक रूप में यात्रावृत्त स्वभावतः परिचयात्मक और स्थूल वर्णन प्रधान थे।.. उनके वर्णन में प्रायः एक बाल सुलभ उल्लास और उत्साह रहता था। फलस्वरूप उनकी दृष्टि आकारों पर इतनी अधिक थी कि अंतरंग प्रायः उपेक्षित और विस्मृत होता था। आधुनिक यात्रावृत्त या कहिये यात्रा संस्मरण आकारों, आकृतियों और अंतरंग का एक उत्तरोत्तर बेहतर अनुपात खोजने में संलग्न रहा है, भाषा को सृजनात्मक और संवेदना को सूक्ष्मतर बनाते हुए।"4 यातायात साधनों की सुलभता के संदर्भ में मानव जीवन की गतिशीलता को रेखांकित करना समकालीन यथार्थ से जुड़ा हुआ है। हालांकि, इस खंड में भावात्मक प्रवाह अपेक्षाकृत अधिक है और कुछ स्थलों पर वैचारिक पुनरुक्ति दिखाई देती है, जिससे तर्कात्मक कसाव थोड़ा शिथिल पड़ता है।

**यात्रा-साहित्य के प्रमुख रचनाकार तथा रचनाएँ**

भारतेन्दु (सरयू पार की यात्रा, मेंहदा वल की यात्रा, लखनऊ की यात्रा), प्रताप नारायण मिश्र (विलायत यात्रा) राहुल सांकृत्यायन (मेरी तिब्बत यात्रा, मेरी लद्दाख यात्रा, किन्नर देश में, रूस में पच्चीस मास, घुमक्कड़ शास्त्र, यात्रा के पन्ने, एशिया के दुर्गम भूखंड, चीन में कम्यून, चीन में क्या देखा, राहुल यात्रावली), रामबृक्ष बेनीपुरी (पैरों में पंख बांधकर उड़ते चलो -उड़ते चलो) यशपाल (लोहे की दीवार के दोनों ओर, राह बीती) काका कलेलकर (हिमालय की यात्रा, सूर्योदय का देश) अज्ञेय (अरे यायावर रहेगा याद?, एक बूँद सहसा उछली, बहता निर्मल पानी), भगवतशरण उपाध्याय (कलकत्ता से पोलिंग , सागर की लहरों पर) रामधारी सिंह 'दिनकर' (देश-विदेश, मेरी यात्राएं) प्रभाकर माचवे (गोरी नज़रों में हम) मोहन राकेश (आखिरी चट्टान तक) , रघुवंश (हरी घाटी), निर्मल वर्मा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

(चीड़ों पर चाँदनी, हँसती घाटी दहकते निर्जन) धर्मवीर भारती (यादें यूरोप की यात्रा चक्र ठेले पर हिमालय) , विष्णु प्रभाकर (हँसते निर्झर: दहकती भट्टी ज्योतिपुंज हिमालय, हमसफर मिलते रहे), अमृता प्रीतम (इक्कीस पत्तियों का गुलाब), नगेन्द्र (तंत्रलोक से यंत्र लोक तक, अप्रवासी की यात्राएं), श्रीकान्त शर्मा (अपोलो का रथ) गोविन्द मिश्र (धुन्ध भरी सुर्खी), कमलेश्वर (खण्डित यात्राएं, कश्मीर रात के बाद, आँखों देखा पाकिस्तान) बलराज साहनी (रुसी सफरनामा) कर्णसिंह चौहान (यूरोप में अंतर्यात्राऐं), रामदरश मिश्र (तना हुआ इन्द्र धनुष, भोर का सपना पड़ोरा की खुशबू) नासिरा शर्मा (जहाँ फव्वारे लहू रोते हैं), मनोहर श्याम जोशी (क्या हाल है चीन क, पश्चिमी जर्मनी पर उड़ती नज़र), निर्मला जैन (दिल्ली : शहर-दर-शहर) असगर वजाहत (चलते तो अच्छा था रास्ते की तलाश में, पाकिस्तान का मतलब क्या) आदि।

हिंदी यात्रा-साहित्य भारतेन्दु युग की सरल आत्मकथात्मक शैली से विकसित होकर आज समकालीन वैश्विक चेतना तक पहुँचा है। प्रत्येक कालखंड ने यात्रा-साहित्य को नई दृष्टि, नई संवेदना और नई वैचारिक दिशा प्रदान की है। राहुल सांकृत्यायन के बाद हिंदी यात्रा-साहित्य को समृद्ध करने वाले लेखकों में अज्ञेय का नाम बहुत सम्मान के साथ लिया जाता है। वे कवि, कथाकार और विचारक थे, इसलिए उनके यात्रा-लेखन में गहराई और विविधता दिखाई देती है। अज्ञेय अपने यात्रा-लेखन को यात्रा-वृत्तांत नहीं, बल्कि यात्रा-संस्मरण कहना पसंद करते थे। उनका मानना था कि यात्रा केवल स्थानों की नहीं होती, बल्कि मन और अनुभवों की भी होती है। उनकी प्रसिद्ध कृतियाँ 'अरे यायावर रहेगा याद' और 'एक बूँद सहसा उछली' इसी विचार को स्पष्ट करती हैं। पहली रचना में भारत भ्रमण का और दूसरी में विदेश यात्राओं का वर्णन मिलता है। अज्ञेय की भाषा सहज, संवेदनशील और आधुनिक गद्य की दिशा में एक नया स्तर प्रस्तुत करती है।

अंत में कहा जा सकता है कि कोई भी लेखक तभी श्रेष्ठ लेखन कर पाता है, जब वह जीवन को निकट से देखता और अनुभव करता है। यात्रा जीवन को समझने का सबसे सरल और प्रभावी माध्यम है। इसलिए लगभग हर रचनात्मक लेखक के साहित्य में किसी न किसी रूप में यात्रा-तत्व अवश्य मिलता है। हिंदी साहित्य में यात्रा-साहित्य ने गद्य के साथ-साथ निरंतर विकास किया है और अनेक लेखकों ने इसे अपनी अनुभूतियों की अभिव्यक्ति का सशक्त माध्यम बनाया है। राहुल सांकृत्यायन ने यात्रा-साहित्य को केवल एक विधा के रूप में विकसित नहीं किया, बल्कि उसे ज्ञान, संस्कृति और इतिहास से जोड़कर हिंदी साहित्य की एक समर्थ और प्रतिष्ठित धारा बना दिया। उनके बिना हिंदी यात्रा-साहित्य की कल्पना अधूरी और अपूर्ण प्रतीत होती है। हिंदी के प्रमुख यात्रा-वृत्तांत केवल भ्रमण का विवरण नहीं हैं, बल्कि वे समाज, संस्कृति, इतिहास और मानव मन की गहरी पड़ताल करते हैं। राहुल सांकृत्यायन ने इसे बौद्धिक ऊँचाई दी, अज्ञेय और निर्मल वर्मा ने आत्मानुभूति से जोड़ा, जबकि परसाई ने इसे सामाजिक व्यंग्य का सशक्त माध्यम बनाया। इस प्रकार हिंदी यात्रा-वृत्तांत साहित्य को व्यापक दृष्टि और समृद्ध अनुभव प्रदान करते हैं।

**संदर्भ संकेत -**

1. सुधांशु डॉ. अरिरूद्ध कुमार, तथा अन्य, हिन्दी यात्रा साहित्य, पृष्ठ 39
2. कोनगाडी डॉ.सेतेंग, हिन्दी यात्रा साहित्य को राहुल सांकृत्यायन की देन, पृष्ठ 18
3. राहुल सांकृत्यायन, मेरी यूरोप यात्रा, पृष्ठ 15
4. रामस्वरूप चतुर्वेदी, हिन्दी साहित्य और संवेदना का विकास, पृ. 196

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026


Original Article

# ब्रिटिश वसाहतवादी कालखंडातील धाराशिव जिल्ह्याचे पर्यटनातील महत्त्व : बदलते स्वरूप आणि वर्तमान


**युवराज कोंडीबा नळे[1], प्रा डॉ विष्णू बब्रुवान वाघमारे[2]**

[1]समता कॉलनी भाग्य नगर परिसर, धाराशिव मोबाईल

[2]प्रोफेसर व विभागप्रमुख पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी जि.सोलापूर

**Email:** yuwarajnale@gmail.com



**Manuscript ID:**
JRD -2026-180141
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 168-172
January 2026

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026



***गोषवारा***

*ब्रिटिशांनी भारतावर तब्बल १५० वर्ष ब्रिटिश राजवट चालवली. त्या कालखंडात अनेक ब्रिटिश अधिकारी त्या निमित्ताने भारतात आले, त्यांचे कर्तव्य त्यांनी पार पाडले, त्यांची जी सेवा होती ती पार पडली. मात्र त्यात काही अधिकारी असेही होते ज्यांनी त्यांच्या सेवेव्यतिरिक्त त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अतिरिक्त वेळेचा त्यांची आवड छंद जपण्यासाठी अथवा आणखी इतर काही नवनिर्माणाच्या बाबी करण्यासाठी त्यांनी तो वेळ वापरला आणि त्यातून काही छानसं निष्पन्न ही झालं. धाराशिव जिल्ह्याच्या अनुषंगानेही असे काही ब्रिटिश वसाहतवादातील पर्यटनाच्या अनुषंगाने झालेले उत्तम कार्य दिसून येते, त्या कार्याचा अभ्यास या संशोधन पत्रिकेच्या माध्यमातून करण्यात आला आहे.*



***महत्त्वाचे शब्द:*** *वसाहत, वखार, दंडकारण्य, चिंकारा, हिवर, धावडा, घाणा, घाणेरी, मित्रा, करवंद, मोह, कवायती.*


## प्रस्तावना

ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून व्यापाराच्या निमित्ताने ब्रिटिशांचा भारतात प्रवेश झाला आणि त्यांच्याजवळ असणारे शिस्तबद्ध कवायती सैन्य, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे व अचूक योग्य नियोजन या बळावर हळूहळू त्यांनी जवळपास बहुतांश भारतावर कब्जा करून इंग्रज राजवट लादली आणि येथील राज्यकर्ते झाले. ब्रिटिशांचे वसाहतवादी साम्राज्य विस्तारीकरणाचे जे जगभरात वापरलेले धोरण होते त्याच धोरणांतर्गत त्यांनी भारतावरही इंग्लंडच्या महाराणीच्या कायद्याचा अंमल बसवला. आणि त्यांच्या कायद्याच्या आधारे ब्रिटिश इंडियाचे प्रशासन चालवण्यासाठी इंग्लंड मधून अनेक ब्रिटिश अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या त्यांच्या सेवेनुरूप भारतात पाठवले जाऊ लागले. या दीडशे वर्षांच्या कालखंडात अशा अनेक अधिकाऱ्यांचा राबता भारतात राहिला आणि त्यांच्यापैकी काही अधिकाऱ्यांनी सेवेव्यतिरिक्तही आपल्या कल्पनाशक्तीला व सृजनशक्तीला वाव देत काही भरीव कार्य ही केल्याचे आपणाला दिसून येते. ज्याचा पुढे चालून भारतातील पर्यटन वृद्धीसाठी अत्यंत मोलाचा उपयोग होऊ शकला.

ब्रिटिश लोकांना त्यांच्या आवडीनिवडी जपणे, त्यांची जीवनशैली अगदी उच्चभ्रू पद्धतीने व्यतित करणे हे त्यांच्या रक्तात भिनलेले आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कला, क्रीडा, संशोधन, प्रशासन अशा अनेक गोष्टी बरोबर पर्यटन हा सुद्धा ब्रिटिशांचा आवडीचा विषय होता आणि धाराशिव जिल्ह्यामध्ये सुद्धा ब्रिटिश वसाहतवाद्यांच्या या कल्पकतेचा अनुभव आपण आजही दुर्गादेवी रेस्ट हाऊस, बार्शी लाईट रेल्वे, रामलिंग स्टेशन, नळदुर्ग किल्ला, ट्रेलर नगर अशा काही उदाहरणांच्या माध्यमातून पाहू शकतो.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**
*युवराज कोंडीबा नळे, समता कॉलनी भाग्य नगर परिसर, धाराशिव मोबाईल*



**How to cite this article:**
*नळे, . युवराज . कोंडीबा ., & वाघमारे, . विष्णू . बब्रुवान . (2026). ब्रिटिश वसाहतवादी कालखंडातील धाराशिव जिल्ह्याचे पर्यटनातील महत्त्व : बदलते स्वरूप आणि वर्तमान. Journal of Research & Development, 18(1(V)), 168–172. https://doi.org/10.5281/zenodo.18479943*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18479943

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

ब्रिटिश वसाहतवादी कालखंडातील धाराशिव जिल्ह्याच्या अनुषंगाने त्यांचा असलेला पर्यटन विषयक दृष्टिकोनाचा व त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या सकारात्मक गोष्टींचा अभ्यास या संशोधन पत्रिकेच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे:-**

- ब्रिटिश वसाहतवादी कालखंडातील ब्रिटिशांचा धाराशिव जिल्ह्याशी असलेल्या अनुबंधाचा अभ्यास करणे.
- ब्रिटिश वसाहतवादी कालखंडात धाराशिव जिल्ह्याच्या संबंधात पर्यटनाच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेल्या कार्याचा अभ्यास करणे.
- ब्रिटिश वसाहतवादी कालखंडात निर्माण झालेल्या पर्यटन संबंधी संरचनांचा आजच्या बदलत्या काळाशी तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहितके:-**

- ब्रिटिश वसाहतवादी कालखंडात रचनात्मक दृष्टी असलेले अधिकारी होते.
- ब्रिटिश वसाहतवादी कालखंडात पर्यटनाच्या अनुषंगाने संरचनात्मक कार्य झालेले आहे.
- ब्रिटिश वसाहतवादी कालखंडात निर्माण झालेल्या पर्यटन संबंधी धोरण व संरचनांचा आजच्या बदलत्या काळात ही धाराशिव जिल्हातील नागरिकांना उपयोग होत आहे.

**संशोधन पद्धती:-**

'ब्रिटिश वसाहतवादी कालखंडातील धाराशिव जिल्ह्याचे पर्यटनातील महत्त्व, बदलते स्वरूप आणि वर्तमान' या विषयाच्या अनुषंगाने संशोधन कार्य करून संशोधन पत्रिका तयार करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुर्जन स्त्रोत अशा दोन्ही पद्धतींचा वापर करून ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

ब्रिटिशांच्या साम्राज्यावरचा सूर्य कधीही मावळत नव्हता असं म्हटलं जायचं. त्यांच्या साम्राज्य विस्ताराचे धोरण पाहतात ते सत्यही होतं. इसवी सन १६०० साली ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाल्यानंतर कंपनीने पूर्वेकडील आशियाई देशांशी व्यापार करण्याचा परवाना मिळवल्या नंतर १६०८ साली सुरत येथे पहिली वखार सुरू केली, आणि इंग्रजांचा भारतातील वावर वाढायला सुरू झाले. त्या संपूर्ण शतकात व्यापारी म्हणून काम करत करत नफा कमवत हळूहळू भारतातील अंतर्गत बाबींमध्ये ही लक्ष घालायला ब्रिटिशांनी सुरुवात केली. आणि आपल्या शिस्तबद्ध कवायती सैन्याच्या व अत्याधुनिक शास्त्रांच्या बळावर मग प्लासीच्या २३ जून १७५७ च्या लढाईत रॉबर्ट क्लाइव्हने बंगालचा नवाब शिराजुद्दौलाचा पराभव करून राजकीय हस्तक्षेप केला व कंपनी राज स्थापन केले. पुढे चालून १८५७ चा उठाव झाल्यानंतर इंग्लंडच्या राणीने ईस्ट इंडिया कंपनीचे अस्तित्व संपवून भारतावर ब्रिटिश राज सत्तेचा अंमल सुरू केला तो चालला थेट १९४७ पर्यंत म्हणजेच भारत स्वतंत्र होईपर्यंत.

या दरम्यानच्या कालखंडात अनेक वेगवेगळे ब्रिटिश अधिकारी वेगवेगळ्या जबाबदाऱ्यांच्या माध्यमातून भारतात आले आणि गेले. पैकी काही अधिकाऱ्यांनी आपली सेवा तर पार पाडलीच परंतु सेवे व्यतिरिक्त मिळालेल्या फावल्या वेळात त्यांच्या आवडीचे इतरही काही उपक्रम राबवून भारतातल्या साधन संपत्ती व निसर्गाचाही योग्य रीतीने वापर करून घेत काही उत्तम संरचना निर्माण करून आपल्या कार्याची छाप पाडल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ सैन्यात कॅप्टन असलेल्या जॉन स्मित याला शिकारीचा ही छंद होता आणि त्या छंदापायी डोंगरात जंगलात भटकंती करत असताना त्याला २८ एप्रिल १८१९ रोजी अजिंठा येथील जगप्रसिद्ध लेण्यांचा शोध लागला, ज्या हजारो वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात होत्या मात्र ज्ञात नव्हत्या. तसे त्याने एका लेणीतील भिंतीवर त्याचे नाव व तारीख करून ठेवली आहे. त्या लेण्याला आता युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून देखील मान्यता दिली असून तेथे मोठ्या संख्येने पर्यटक जात आहेत. त्याचप्रमाणे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर हडप्पा परिसरात रेल्वेचे रूळ टाकण्याच्या कामात जुन्या पक्क्या विटा वापरल्या जात आहेत ही बाब ब्रिटिश अधिकारी अलेक्झांडर कलिंगहमच्या लक्षात आली व मग त्याने लक्षपूर्वक सर्वेक्षण केले आणि हडप्पा इथले काही प्राचीन अवशेष सर्वप्रथम उजेडात आणले, ज्या माहितीच्या आधारे १९२१ साली दयाराम सहानी यांनी हडप्पा येथे व १९२२ साली आर डी बॅनर्जी यांनी मोहेंजोदडो येथे उत्खनन करून सिंधू संस्कृती प्रकाशात आणली आणि सर जॉन मार्शल या इंग्रज अधिकाऱ्याने १९२४ साली सिंधू संस्कृती ही मेसोपोटेमिया आणि इजिप्त संस्कृतीशी समकालीन असल्याबाबतची घोषणा करून सिंधू संस्कृतीचे महत्त्व जगाच्या नकाशावर आणले.

ब्रिटिशांची जीवनशैली अधिकाधिक भौतिक सुखाचा आस्वाद घेणारी अशी होती. कला, क्रीडा, संगीत, शिकार, चित्रकला, पर्यटन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात उच्च अभिरूची जपण्याकडे त्यांचा कल असे. त्याचाच एक भाग म्हणून धाराशिव तालुक्यातील येडशी अभयारण्यातील दुर्गादेवी हिल स्टेशन कडे हे पाहता येईल. खरे तर धाराशिव जिल्हा ब्रिटिश राजवटी बाहेर निजामशाही असलेल्या हैदराबाद संस्थानात होता, मात्र सीमावर्ती भागातील कसबे तडवळे, येडशी, आंबेजवळगे इत्यादी अशी
काही गावे सोलापूर जिल्ह्यात म्हणजेच ब्रिटिश साम्राज्यात होती.

येडशी अभयारण्य, जे पौराणिक काळापासून दंडकारण्य परिसराचा भाग म्हणून ओळखले जाते. नैसर्गिक सुंदरतेने व्यापलेले हे येडशी अभयारण्य असून रामलिंग मंदिरापासून जवळच दुर्गादेवी हिल स्टेशन म्हणून उंचीवर वसलेली एक अत्यंत सुंदर इमारत आहे जी ब्रिटिश

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

काळात थंड हवेचे ठिकाण म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सुट्यांचा आनंद उपभोगण्यासाठी याचा वापर केलेला आहे. ब्रिटिशांकडे विलक्षण अशी सौंदर्यदृष्टी असल्याचे अनेक उदाहरणावरून दिसून येते. जीवनाचा पुरेपूर आनंद घेण्याची त्यांची मानसिकता होती. त्यांचे निसर्गवेड आणि सौंदर्यदृष्टीचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणून या दुर्गा देवी हिल स्टेशन कडे आपण पाहू शकतो. येडशी या गावाजवळील २२.३७ चौरस किलोमीटर परिसरात व्यापलेल्या या अभयारण्यात एकीकडे खोल दरीत पुरातन रामलिंग मंदिर आहे तर दुसरीकडे समुद्रसपाटीपासून अंदाजे पाच हजार फूट उंचीवर ब्रिटिश कालखंडात बांधलेले दुर्गादेवी हिल स्टेशन आहे. बालाघाट डोंगररांगांच्या उंच माथ्यावर दुर्गा देवीचे एक टुमदार मंदिर आहे आणि त्यामुळेच या ठिकाणाला दुर्गादेवी हिल स्टेशन म्हणून ओळखले जाऊ लागले अशी माहिती स्थानिक लोकांकडून मिळते. निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी व जवळपास शंभर पेक्षा जास्त पशू पक्षांच्या व वृक्षराजींच्या प्रजातींचे दर्शन व निरीक्षण करता यावे तसेच उन्हाळयाच्या दिवसात थंड हवेचे ठिकाण म्हणून उपभोग घेता यावा यासाठी ब्रिटिशांनी इसवी सन १९०७ साली म्हणजेच तब्बल ११८ वर्षांपूर्वी दुर्गादेवी हिल स्टेशनचे बांधकाम केले असून, झाडे वेलींनी व्यापलेले हे हेल स्टेशन अत्यंत नियोजनबद्ध बांधले आहे. त्यातील त्यावेळचे जुने फर्निचर इंग्रजांच्या उच्च अभिरुची चे प्रतीक दर्शवते. तिथे एक लाकडी पंखा सुद्धा अलीकडे पर्यंत चालू होता ज्याचा हँडल रूमच्या बाहेरील बाजूस असून बाहेरून व्यक्ती ते चालवत असे आणि रूम मधील इंग्रजांना थंड वारा लागत असे. तसं तर हे ठिकाणच इतक्या गर्द वृक्षराजींनी आणि वेली फुलांनी वेढलेले उंचीवरचे ठिकाण आहे की येथे कायमस्वरूपी वातावरण थंड जाणवते. मात्र कडक उन्हाळयाच्या दिवसात सुद्धा सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आलेल्या ब्रिटिशांना उन्हाचा व उखाड्याचा कसलाही त्रास जाणवू नये यासाठी हा सगळा प्रपंच असल्याची माहिती तेथील लोकांकडून समजते. इतक्या घनदाट अभयारण्यात जिथे शेकडो पशु पक्षी वृक्षवेलींच्या प्रजाती आहेत आणि जिथून मैलोनमैल दूरपर्यंत निरीक्षण करता येणे सहज शक्य आहे अशा उंच ठिकाणी हे थंड हवेचे ठिकाण म्हणून अत्यंत कल्पकतेने बांधकाम केलेले आहे. त्याचा निसर्ग सुखासह उपभोग व आनंद लुटण्याची विलासी जीवन जगण्याची दृष्टी असलेले ब्रिटिश हे सर्व पाहून थक्क व्हायला होतं. या घनदाट अभयारण्यात असलेल्या या रेस्ट हाऊसचा पत्ता, 7 WWR +V7, Near old Ramling station, Maharashtra, 413404 असा नोंदवलेला आहे.

या दुर्गा देवी हिल स्टेशनची कथाही मोठी रंजक अशी आहे. सुरुवातीला याची ओळख रामलिंग रेस्ट हाऊस अशी होती, मात्र या ठिकाणी दुर्गा देवीचे छोटेच परंतु फार जुने मंदिर असल्यामुळे कालांतराने हे ठिकाण दुर्गादेवी हिल स्टेशन म्हणून ओळखले जाऊ लागले, जे मिनी महाबळेश्वर म्हणूनही ओळखले जाते.

बार्शी लाईट रेल्वेच्या ब्रिटन मधील संचालक मंडळाने बार्शी लाईट रेल्वेच्या एजंट व जनरल मॅनेजर पदावर १९०६ साली मिस्टर अलेक्झांडर यांची निवड केल्यानंतर ते कुर्डूवाडी ला आले व एजंट अँड जनरल मॅनेजर म्हणून बार्शी लाईट रेल्वेचा पदभार स्वीकारला. एक मार्च १८९७ मध्ये सुरू झालेली ही बार्शी लाईट रेल्वे अगोदर फक्त कुरूडवाडी ते बार्शी या मार्गावर धावत होती व कुसळंब पर्यंत चे काम सुरू होते. मिस्टर अलेक्झांडर यांनी हा रेल्वे मार्ग बार्शीहून पुढे कळम रोड पर्यंत विस्तार करण्याचे ठरवले व त्याप्रमाणे त्यांनी येडशीच्या घाट सेक्शन सह या भागाचा सर्वे केला. या सर्वेदरम्यान त्यांची नजर येडशी अभयारण्यातील एका उंच टेकडीवर गेली. ते त्या टेकडीवर गेले असता ती जागा त्यांना खूप आवडली आणि या जागेवर एक सुंदर विश्रामगृह असायला हवे असा विचार त्यांच्या मनात आला. आणि त्यानंतर लागलीच त्यांनी कंपनीच्या नावाने ती टेकडी रीतसर खरेदी केली. आणि मग विस्तारित रेल्वे व त्या टेकडीवर विश्रामगृह बांधण्याचा प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी ते इंग्लंडला बार्शी लाईट रेल्वेच्या संचालक मंडळाकडे गेले.

इंग्लंडमधील संचालक मंडळासमोर मिस्टर अलेक्झांडर यांनी सदरचा प्रस्ताव ठेवला, मात्र व्यवहार्यतेच्या दृष्टिकोनातून हा प्रस्ताव तितकासा योग्य न वाटल्यामुळे संचालक मंडळाने तो प्रस्ताव फेटाळून लावला. योगायोगाचा भाग हा होता की त्या संचालक मंडळातील एक संचालक मिस्टर अलेक्झांडर यांचे मोठे बंधू होते. मिस्टर अलेक्झांडर यांना तो प्रकल्प व्हावा असे मनोमन वाटत होते म्हणून त्यांनी त्या प्रकल्पासाठी लागणाऱ्या एकूण गुंतवणुकीच्या ५०% गुंतवणूक स्वतः करण्याचा फेर प्रस्ताव संचालक मंडळासमोर सादर केला. आणि मग ए. जी. एम. असलेल्या तरुण मिस्टर अलेक्झांडर यांचा उत्साह लक्षात घेऊन संचालक मंडळाने सदरील प्रस्तावाला मंजुरी दिली व मिस्टर अलेक्झांडर त्या खुशीत भारतात आले व कामाला सुरुवात केली.

रामलिंग मंदिर हे या उंच टेकडीच्या जवळपासच आहे, तसेच गुरुकुल ही जवळपास आहे. मात्र ही दोन्ही ठिकाणे खोलगट भागात आहेत तर आता जिथे हे विश्रामगृह बांधायचे ठरवले ते एकदम उंच ठिकाण आहे. डोंगरदऱ्यांनी व विविध पशुपक्षी प्राणी व वनराजी यांनी समृद्ध असा हा परिसर आहे, ज्यामध्ये हरिण, चिंकारा, जंगली अस्वल, कोल्हा, काळा बदक, सशा सारखा दिसणारा परंतु लांब असा प्राणी, मोर, लकड बग्घा, चीता, लांडोर अशा विविध प्राण्यांचा समावेश या अभयारण्यात होता. तर बाभूळ, हिवर, धावडा, साल, सिताफळ, बोर, खैर, करवंद, घाणेरी (टणटणी), चंदन, सागवान, डिकमळ, मोह, आपटा व अशा विविध वृक्षराजींनी हे अभयारण्य व्यापलेले आहे. इतके सुंदर निसर्गसुंदर्याने परिपूर्ण असे ठिकाण मिस्टर अलेक्झांडर यांनी विश्रामगृह बांधण्यासाठी निवडले होते व स्वतः निम्मी गुंतवणूक करून काम सुरू केले होते. उंच टेकडीच्या पायथ्याशी बांधकामासाठी लागणारा मसाला तयार करून वरती नेण्यात येत होता. खडी, रेती, बेलफळ, चिकन माती, गुळ, मेंदी, चुना व इतर काही आवश्यक नैसर्गिक वस्तू घाण्यात टाकून बैलाच्या साह्याने गोल गोल फिरवून बांधकामासाठी आवश्यक व उपयुक्त असे मिश्रण तयार करण्यात येत होते, ज्यामुळे बांधकामाचा दर्जा अत्यंत गुणवत्तापूर्ण व मजबूत राहू शकत होता. त्या घाण्यातून तयार केलेल्या मिश्रणाचा वापर करून या विश्रामगृहाचे बांधकाम करण्यात आले आहे.

टेकडीच्या पायथ्याशी १९५१ पर्यंत हा घाना चालू स्थितीत होता, मात्र एक जानेवारी १९५४ साली भारतीय रेल्वे मंत्रालयाने बार्शी लाईट रेल्वे ही कंपनी विकत घेतली व मध्य रेल्वे मध्ये विसर्जित केल्यानंतर हा चक्राकार आकाराचा घाणा नष्ट करण्यात आला.

विश्रामगृहाचे बांधकाम सुरू होण्यापूर्वी बार्शी लाईट रेल्वे १५ जून १९०५ रोजी कुसळंब पर्यंत सुरू झाली होती. पुढे रामलिंग रेस्ट हाऊसचे काम सुरू झाल्यावर बार्शी लाईट रेल्वेचे हे काम कुसळंबच्या पुढे कसबे तडवळे पर्यंतचे काम सुरू झाले होते जे १ मे १९०६ रोजी पूर्ण झाले होते. हीच रेल्वे पुढे लातूरपर्यंत १ मे १९११ रोजी गेली, आणि इकडे पंढरपूर ते मिरज पर्यंत ३ नोव्हेंबर १९२७ रोजी गेली. आणि अशा प्रकारे हे २०२ मैल लांबीचा नॅरोगेज १८९७ ते १९२७ यादरम्यान पूर्ण झाला असल्याचे रेल्वे आर्काइव्ह वरून लक्षात येते. कुसळंब ते कसबे तडवळे दरम्यानचे काम सुरू असतानाच या विश्रामगृहाला जाणे सोयीचे व्हावे म्हणून टेकडीच्या पायथ्याशी रामलिंग रेल्वे स्टेशन तयार केले. असे सर्व प्रकारे योग्य नियोजन करण्यात आले होते. व काही काळातच समुद्रसपाटीपासून अंदाजे पाच हजार फुट उंचीवरील टेकडीच्या माथ्यावर १५ डिसेंबर २००७ रोजी या दुर्गादेवी रेस्ट हाऊस ची अत्यंत सुंदर अशी वास्तू अस्तित्वात आली होती जी पुढे थंड हवेचे ठिकाण म्हणून दुर्गादेवी हिल स्टेशन नावाने ओळखले जाऊ लागली. स्वतः मिस्टर अलेक्झांडर, जे एजीएम होते, रेल्वे इंजिनियर, ट्रॅफिक सुपरिटेंडेंट, वर्क्स मॅनेजर असे मोठमोठे अधिकारी सुट्टीच्या काळात सहकुटुंब या विश्रामगृहावर वास्तव्याला येत असत. टेकडीच्या पायथ्याला रामलिंग स्टेशनची निर्मितीच खास यासाठी केलेली दिसून येते. नॅरोगेज वरून धावणारी बार्शी लाईट रेल्वे १९२९ पर्यंत धावत होती. घाटातून मागे व पुढे दोन्ही बाजूने इंजिन लावावे लागत असे. अत्यंत सावकाश धावायची की माणूस उतरून पुन्हा चढू शकत होता. १९२९ ते १९३१ दरम्यान या बार्शीलाईट रेल्वेचे रूपांतर मीटर गेज मध्ये झाले आणि २००७-०८ मध्ये याचे रूपांतर ब्रॉडगेज मध्ये करण्यात आले. थोडक्यात १९०६-०७ ते २००७-०८ असा शंभर वर्षाचा कालखंड या रामलिंग स्टेशनने पाहिलेला आहे.

हे दुर्गा देवी स्टेशन हे निसर्गसंपदा, जीवसृष्टी, स्वच्छ वातावरण यामुळे थंड हवेचे ठिकाण म्हणून पर्यटकांच्या पसंतीस उतरलेले आहे. याची ख्याती इतकी पसरली होती की सुप्रसिद्ध कादंबरीकार बाबा कदम यांनी आपल्या अनेक कादंबऱ्यांना इथे जन्म दिला आहे. इतक्या स्वच्छ सुंदर ठिकाणी निसर्ग उपचारासाठी सुद्धा लोक इथे येत असत. शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई उद्धवराव दादा पाटील जेंव्हा पोटाच्या विकाराने त्रस्त झाले होते तेंव्हा पंढरपूर येथील रामबाग इथले आयुर्वेदाचार्य श्री स्वामी पुरुषोत्तमाचार्य यांनी दादांना दुर्गादेवी हिल स्टेशन येथे काही काळ राहून निसर्गोपचार घेण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार भाई उद्धवराव दादा पाटील यांनी काही काळ दुर्गादेवी रेस्ट हाऊस येथे राहून निसर्गोपचार घेतला होता. त्यात येडशी येथील श्री झुंबरलाल तापडिया यांनी दादांना निसर्गोपचारात खूप मदत केली होती आणि त्यामुळे दादांचा तो पोटाचा विकार बरा होऊन ठणठणीत होऊन दादा तिथून गेले होते अशी आठवण दादांचे चिरंजीव भाई धनंजय पाटील यांनी चर्चेदरम्यान सांगितली होती.

असे हे दुर्गादेवी हिल स्टेशन एक अत्यंत सुंदर असे पर्यटन स्थळ आहे. टेकडीच्या पायथ्यापासून अरुंद रस्त्याने वरती जात असताना झाडे वेली फुलांनी रस्त्यावर महिरप केली आहे असा भास होतो. वरती गेल्यावर हे दुमजली नितांत सुंदर विश्रामगृह दिसून येते. वरच्या मजल्यावर पायऱ्या चढून जातानाच एका पायरीवर '१९०७' हे स्थापना वर्ष कोरलेले आहे. वरच्या मजल्यावरील डाव्या बाजूच्या रूममध्ये लायब्ररी असून चार्ली डिकन्स, अलेक्झांडर ड्यूमस अशा नामवंत लेखकांची पुस्तके तिथे ठेवलेली आहेत. पाय-या चढून वरती गेल्यानंतर सिरॅमिक चे विविध रंगांमध्ये केलेली फ्लोरिंग व त्यात पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण अशा दिशा कोणत्या बाजूला आहेत हे दर्शविलेले दिसून येते. बेडरूम मधील शिसम व सागवानापासून बनवलेले तेंव्हाचे फर्निचर आजही मन प्रसन्न करते. दिवान, खुर्च्या, टीपॉय, ड्रेसिंग टेबल अत्यंत सुंदर व आजही सुस्थितीमध्ये दिसून येतात.

ब्रिटिशांची राजवट संपुष्टात आल्यानंतर १९४७ पासून देखील ही वस्तू भारतीय असलेल्या रेल्वे अधिकाऱ्यांच्या ताब्यात राहिली आहे. मात्र वसाहतवादी कालखंडात ज्या पद्धतीने हे दुर्गादेवी रेस्ट हाऊस जपले जात होते, त्याच्या देखभाल दुरुस्तीवर लक्ष दिले जात होते, त्याचा अभाव पुढे चालून दिसून येऊ लागला. प्रशासकीय व राजकीय इच्छाशक्ती या ठिकाणाच्या बाबतीत पाहिजे तशी दिसून आली नाही व परिणामस्वरूप या वास्तूचे वैभव अंधारात जाते की काय ! अशी शंका निर्माण झाली. इथे येणाऱ्या पर्यटकांना वास्तू पाहण्यासाठी सुद्धा गैरसोयीचे होऊ लागले आणि हे हिल स्टेशन फक्त नावापुरतेच राहते की काय असे वाटणे इतपत भावना तयार झाली, इतके वातावरण बदलत गेले !

मात्र आता पुन्हा एकदा पर्यटनाशी संबंधित पर्यटन विकास समिती मार्फत याबाबत प्रशासनाला व लोकप्रतिनिधींना अवगत केले आहे. आमदार राणा जगजितसिंह पाटील जे महाराष्ट्र शासनाच्या 'मित्रा' या संस्थेचे उपाध्यक्ष आहेत त्यांनी यावर लक्ष देऊन या रेस्ट हाऊस वरच रेल्वे, फॉरेस्ट, महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांची व पर्यटन समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन याला पूर्व वैभव प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न चालू केले आहेत. या अभयारण्यातील विविध पशुपक्षी वनराजीचे दर्शन घेता यावे यासाठी जंगल सफारी ट्रॅक तयार करण्याचे ही नियोजन सुरू केले आहे. तसेच टेकडीच्या पायथ्याशी जसे पूर्वी दुर्गादेवी स्टेशन होते, विठ्ठलवाडी नावाची काही वस्ती होती, तसेच स्टेशन व वस्ती पुन्हा एकदा पर्यटकांना पाहण्यासाठी अस्तित्वात आणण्याचेही नियोजन करण्यात येत आहे. महत्त्वाचे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

म्हणजे येणाऱ्या पर्यटकांना हे हिल स्टेशन पाहण्यासाठी सहजासहजी उपलब्ध व्हावे यासाठीची रचना तयार करण्यावरही त्यांनी लक्ष दिले आहे ही एक समाधानाची बाब आहे.

एकंदरीत बदलत्या काळासोबत या दुर्गादेवी हिल स्टेशनने ही कात टाकून पुन्हा एकदा बदलत्या स्वरूपात सुसज्ज राहण्यासाठी प्रशासकीय व राजकीय प्रयत्न सुरू झालेले दिसून येत आहेत. मराठवाड्याचे मिनी महाबळेश्वर ही जुनी ख्याती अबाधित राहण्यासाठी सार्वत्रिक व सामूहिक प्रयत्न महत्त्वाचे ठरतील असे वाटते.

**निष्कर्ष:-**

वसाहतवादी कालखंडात भारताची व भारतीयांची लूट करताना व अन्याय करताना ब्रिटिशांचा एकीकडे जसा कपटी, निर्दयी, धूर्त चेहरा समोर येतो तसाच दुसरीकडे बार्शी लाईट रेल्वे, दुर्गादेवी रेस्ट हाऊस, रामलिंग स्टेशन निर्मितीच्या माध्यमातून सुधारणावादी, पर्यटनवादी व प्रशासकीय चेहराही दिसून येतो. मिस्टर अलेक्झांडरचा प्रस्ताव इंग्लंड मधील संचालक मंडळांनी फेटाळून लावला तरी कामावरील आपल्या श्रद्धेमुळे व महत्त्वाकांक्षेमुळे त्याने एकूण गुंतवणुकीच्या निम्मी गुंतवणूक स्वतः करण्याचे धाडस दाखवले मात्र प्रस्तावाला मंजुरी घेऊनच भारतात परतला, ही त्याची त्याच्या कामाप्रती निष्ठा अधोरेखित करते. काम करत असताना जीवनाप्रती सौंदर्यदृष्टी बाळगत निसर्गाच्या सानिध्यात राहणे म्हणजेच पर्यटन करणे सुद्धा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे हे यावरून लक्षात येते.

**संदर्भग्रंथ सूची:-**

१) Diary of Hue Fitz Herald: AGM; Barsi Light Railway
२) रेल्वे आर्काइव्हज
३) सोलापूर जिल्हा गॅझेटियर
४) धाराशिव जिल्हा गॅझेटियर
५) आंतरजाल
६) Heritage stations & buildings; Railway companies, Aug 2025

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# वझुर ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळ

**श्री प्रल्हाद भगवानराव पवार**
मार्गदर्शक , पर्यटन संचनालय क्षेत्रिय कार्यालय छत्रपती संभाजीनगर

**Manuscript ID**:
JRD -2026-180142
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(V)
Pp. 173-177
January 2026

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*वझूर हे परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यात वसलेले एक महत्त्वाचे ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळ आहे. गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या या गावाला नैसर्गिक सौंदर्य, प्राचीन स्थापत्य आणि धार्मिक परंपरांचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. वझूर गावात श्री. रामेश्वर महादेव मंदिर हे मुख्य आराध्य दैवत असून त्याची स्थापना प्रभू श्रीरामचंद्रांनी केल्याची आख्यायिका प्रचलित आहे. या मंदिरासह भवानी मंदिर, श्री गणेश मठ, श्री राम मंदिर, मारोती मंदिरे, खंडोबा देवस्थान, गोदावरी घाट, खडकी नदी संगम, विविध संतांच्या समाध्या, वीरगळ व सतीशिळा अशी अनेक ऐतिहासिक व धार्मिक स्थळे येथे आढळतात. या लेखामध्ये वझूर गावाच्या ऐतिहासिक, धार्मिक व स्थापत्य वारशाचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. येथील हेमाडपंथी व भूमिज स्थापत्यशैलीतील मंदिरे, शिलालेख, मूर्तीकला, शिल्पकला आणि लोककलेच्या परंपरा (गोंधळ, डहाक वाद्य, नाट्य परंपरा) या गावाच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देतात. तसेच पेबल आर्टसारखी प्राचीन हस्तकला आजही वझूरमध्ये जतन केली जाते. धार्मिक विधी, पालखी महोत्सव, अखंड हरीनाम सप्ताह यांमुळे वझूर हे पंचक्रोशीतील भाविकांसाठी श्रद्धेचे केंद्र बनले आहे. या सर्व घटकांमुळे वझूर गावात ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनाच्या विकासासाठी मोठी संधी उपलब्ध असून या वारशाच्या संवर्धनाची आवश्यकता अधोरेखित होते.*

***मुख्यशब्द:*** *वझूर गाव, ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, श्री रामेश्वर महादेव मंदिर, गोदावरी नदी, मंदिर स्थापत्य, शिल्पकला, वीरगळ व सतीशिळा, संत परंपरा, पेबल आर्ट हस्तकला.*

**प्रस्तावना**

वझूर पूर्णा तालुक्यातील हे गाव परभणी जिल्ह्याच्या ठिकाणापासून २५ कि.मी. अंतरावर आहे. व पिंगळीमार्गे या रस्त्यावर 4 ऐतिहासिक प्राचीन वारसा स्थळ आहेत, पिंगळी येथिल श्रीनाथ महादेव मंदिर , दस्तापूर येथिल श्री पद्मावती मंदिर , वझुर गावचे श्री रामेश्वर मंदिर व देवठाणा येथिल श्री मृगेश्वर मंदिर असे एकाच मार्गावर हे ठिकाण पर्यटकासाठी सोयीस्कर दौरा होऊ शकतो .वझुर भौगोलिक दृष्ट्या हे गाव गोदाकाठी असल्यामुळे निसर्गरम्य ठिकाण आहे. या गावात प्राचीन मंदिरे, शिलालेख, बैलगाडीचे पुरातन चाक, मठ, पुरातन वाडे, लादण्या, धर्मशाळा, गोदावरी नदी घाट, खडकी नदी संगम, पवित्र कुंड, दुरडी विहिरा, विविध संतांच्या समाध्या आणि जहांगीर निजामाचे कार्यालय असा स्थापत्याचा वारसा असून या गावात वीरगळ आणि सतीशिळा अनेक ठिकाणी आहेत. पैकी एक वीरगळ एका योध्या स्त्रीची अर्थात वीरांगनेची आहे. या शिवाय या गावास श्री. दत्त उपासनेतील आणि वारकरी पंथा अंतर्गत अनेक संत महंत तसेच राष्ट्रीय संत यांनी भेटी दिल्या आहेत. लोककलेची गोंधळी परंपरा, डहाक वाद्याची परंपरा आणि नाट्य परंपरा असा लोककलेचा तसेच , पेबल आर्ट प्राचीन हस्तकला वारसा वझुर या गावाने जपला आहे. येथे गेल्या 4 महिन्यापासून युवकांनी विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये गावचे माहितीपत्रक तयार करणे, सदर माहितीचा QR कोड ज्यामध्ये (ऑडिओ व PDF माहिती मिळते )तयार करणे, दररोज श्री रामेश्वर मंदिरातील लाईव्ह आरती करणे, नुकतेच जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखी व ऐतिहासिक वारसा समितीच्या सहकार्याने आदी उपक्रम सुरु आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्री प्रल्हाद भगवानराव पवार , मार्गदर्शक , पर्यटन संचनालय क्षेत्रिय कार्यालय छत्रपती संभाजीनगर*

**How to cite this article:**
*पवार, . प्रल्हाद . भगवानराव. (2026). वझुर ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनस्थळ. Journal of Research & Development, 18(1(V)), 173–177. https://doi.org/10.5281/zenodo.18479991*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18479991

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

आज श्रींची आरती झाल्यावर प्रल्हाद पवार हे मंदिर निरक्षण करत असतांना व मंकाळा खेळ निदर्शनास आला. मंकाळा खेळविषयीं माहिती अशी की, मंकला हा बैठा खेळ असून दगडामध्ये समांतर गोल खड्डे करून तो पूर्वी खेळला जात असे.

वझूर ह्या गावी प्रभू श्रीरामचंद्र यांच्या अधिवासाच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेत. गावातील आख्यायिका अशी आहे की सदर भाग हा दंडकारण्यामध्ये असल्यामुळे श्री. राम प्रभूचे मार्गक्रमण होत असताना त्यांना तहान लागली आणि या ठिकाणी त्यांनी बाण मारून एका जलाशयाची निर्मिती केली. "दुल्डी विहिरा" म्हणून प्रचलित असणारा हा विहिरा खडकी नदी पात्राच्या काठावर आहे. तसेच श्रीरामांनी येथे शिवलिंग स्थापन केले अशी श्रद्धा येथील भक्तांमध्ये आहे. कालौघात या शिवलिंगावर मंदिर स्थापन झाले. हे मंदिर आज "श्री. रामेश्वर महादेव मंदिर" या नावाने प्रचलित आहे.

**शिलालेख** : **१ ओळ** स्वस्ति स्त्री माधवबा सुतारचा लेंकु हेमो :। तयाचा सांघेडी सोंगैआ.
**२ ओळ** दोघी मेलौनी । सामीग्री षांभा घंडिऐला। ऐवं या षांभेयासि गद्द १० :।
**व्यक्तिंनामे** १ मधवबा २ हेमो ३ सोंगैआ.
**अर्थ :** माधव बाबा सुताराचा मुलगा हेमो व त्यांचा मित्र सोंगैआ या दोघांनी मिळून सामुग्री साधन घडवून त्यासाठी १० गद्यांषा खर्च केला आहे.
वरील स्तंभ लेख स्पष्ट असून त्याचे वाचन सहज करता येईल एवढा सुस्थितीत आहे. मंदिराच्या सभामंडपातील एका स्तंभावर हा शिलालेख आहे. यामध्ये स्थापत्य निर्मिती वर प्रकाश टाकलेला असून शिल्पकारांनी मंदिरासाठी केलेल्या खर्चाचा उल्लेख यात केलेला आहे.

**संदर्भ 1**

वझुर गावाची महती सांगणारा उल्लेख श्री १००८ जगद्गुरू पलसिद्ध महास्वामीजी यांचे शिष्य श्री लक्ष्मण महाराज यांनी असा केला आहे.

गोदेतीरी रामेश्वर । लिंग अनादी ईश्वर ।।१।।
ग्रामा नाम ते वझर । फार पवित्र ते पूर ।।२।।
पूजन करिती लिंगाचे होय कल्याण तयांचे ।।३।।
फार उद्धरिले दोषी । पावन करितो भक्तांशी ।।४।।
अती दयाळू शंकर । आहे कल्याणाचे ।।५।।
लक्ष्मण म्हणे तात । भक्तापाशी सदोदित ।।६।।
वझर वसे गंगेतीरी। गंगा सदा परोपकारी ।।१।।
परोपकार आहे थोर। सकळ साधनांचे सार ।।२।।
ऐसे व्यासाचे वचन । सकळ शास्त्रांचे प्रमाण ।।३।।
म्हणूनि माता परोपकार । करीतसे जगाव ।।४।।
लक्ष्मण म्हणे भक्ती । फार प्रिय मातेप्रती ।।५।।

**संदर्भ 2**

**श्री. रामेश्वर महादेव मंदिर**

श्री. रामेश्वर मंदिर वझुर गावचे मुख्य आराध्य दैवत आहे. एका मोठ्या आणि भव्य प्रवेशद्वारातून मंदिर पटांगणात प्रवेश होतो. पटांगणात वेशी, नगारखाना, वाहन मंडप आणि बारव स्थापत्याचे जोते अवशेष पाहता या मंदिराच्या गतकालीन वैभवाची कल्पना करता येते. पटांगणात सतीशिळा, वीरगळ, गद्देगळ आणि नंदी इत्यादी शिल्पावशेष ठेवलेले पाहावयास मिळतात. हे शिवालय भूमिज पद्धतीचे आहे. काही पायऱ्या चढून प्रदक्षिणापथालगत असलेल्या ओट्यावर आल्यास या ओट्यावर एक नंदी ठेवलेला आहे. या नंदी समोर पूर्वाभिमुख प्रवेशद्वार असून सरळ सभामंडपात प्रवेश होतो. याशिवाय भाविक भक्तांना पूर्व, दक्षिण आणि उत्तरेकडून सभामंडपात प्रवेश करता येतो. मंदिराची भव्य दिव्यता तीन बाजूंनी असलेल्या प्रवेशद्वारावरून लक्षात येते. सभा मंडपात प्रवेश करताच समोर १० फूट ३ इंच लांबी रुंदीची चौरसाकृती रंगशिळा दिसते. सभामंडपातील स्तंभ, शिलालेख, देवकोष्ट, मूर्तिकला, द्वारशाखा आणि अलंकृत वितान सभामंडपाची शोभा वाढवितात. रंगशिळेवर उभे राहिल्यास या सर्व कलावैभवाचे दर्शन होते. रंगशिळेवर मुख्य चार स्तंभ आहेत तर कक्षासनास सोळा स्तंभ आहेत. स्तंभांची पूर्ण उंची ७फूट असून स्तंभ नक्षीकाम आणि अलंकरणाने सुशोभित आहेत. या मंदिर स्थापत्य निर्मितीवर प्रकाश टाकणारा लेख एका स्तंभावर कोरला आहे. मंदिराच्या सभामंडपात दक्षिण द्वारातून येणाऱ्या कक्षासनाजवळ व रंगशिळेच्या पूर्ण पूर्णाकृती आग्रेय स्तंभावर हा दोन ओळींचा शिलालेख दिसून येतो. वितान कमलपुष्पाने अलंकृत केलेले आहे. एकमेकांना छेदणारे दोन चौकोन असून त्याचे मध्यात दोन कमळवर्तुळ व त्यामध्ये परत अर्धकमळ रचना अर्थात पद्म प्रकारातील हे वितान असून त्याचे अलंकरण पाहणाऱ्याचे लक्ष वेधून घेते. मंदिराच्या अंतराळात प्रवेश करण्यापूर्वी उजवीकडे आणि डावीकडे दोन देवकोष्टक आहेत. यांची उंची २ फूट ७ इंच आणि रुंदी १ फूट ७ इंच अशी आहे. यामध्ये डावीकडील देवकोष्टात नागशिल्प आहे तर उजवीकडे देवकोष्टात नृसिंह हिरण्यकश्यपूचे शिल्प आहे. नागशिल्प २ फूट ८ इंच लांब आणि १ फूट ४ इंच रुंद आहे. उजवीकडील देव कोष्टात २ फूट ५ इंच उंच व १ फूट ४ इंच रुंद असलेले नरसिंहशिल्प आहे. देवतेच्या डोक्यावर करंडक मुकुट असून जीभ बाहेर आलेली आहे. मूर्ती चतुर्भुज आहे त्यांचा उजवा व डावा खालील हात हिरण्यकश्यपाचे पोट फाडत आहे. उजव्या वरील हातातील आयुध सुरा असून डाव्या वरील हाती

शंख आहे. देवतेने हिरण्यकश्यपूस आपल्या मांडीवर आडवे पकडलेले आहे. या असूराने खालील हाती ढाल वरील हाती सुरा पकडलेला आहे.

**अंतराळ आणि द्वारशाखा**

अंतराळाची लांबी दक्षिण-उत्तर ७ फूट ७ इंच आणि पूर्व-पश्चिम ६ फूट ७ इंच रुंदी आहे. मंदिराच्या अंतराळात प्रवेश केल्यावर दोन फूट जागेची चिंचोळी पट्टी आहे. अंतराळात आधारासाठी दोन स्तंभ असून त्यातून प्रवेश होतो. स्थापत्यविषयक आकर्षित करणारा येथील महत्त्वाचा मुख्य भाग म्हणजे गर्भगृह द्वारशाखा, समोर असलेली चंद्रशिळा, मंडारकावरील कीर्तीमुख आणि वितान होय. नंदिनी प्रकारातील पंचद्वार शाखा आहेत. गर्भगृहात प्रवेश करण्यापूर्वी या द्वारशाखा भक्तांना येथेच खिळवून ठेवतील इतक्या सुंदर आहेत. द्वारशाखेवर लतापुष्प, गंधर्व (वादक), स्तंभ, सिंह, व्याल आणि कमलकलिकेचे नक्षीकाम आहे. उजवीकडे आणि डावीकडे द्वारपाल असून त्यांची आयुधे भग्न झालेली आहेत. द्वारशाखांवर पाच शिल्प आहेत. यापैकी उजव्या बाजूकडील पहिले शिल्प चवरीधारी स्त्रिचे आहे. दुसरे शिल्प हातात कमलकलिका आणि पाश पकडलेल्या स्त्रीचे आहे. तिसरे शिल्प द्वारपालाचे आहे, चौथे शिल्प मुकुटविरहित स्त्री आहे. तिच्या हाती बीजपूरक आहे पाचवे शिल्प मुंगूस पिशवी धरलेला पुरुष आहे. डाव्या बाजूचे पहिले आणि दुसरे शिल्प स्त्री सेविकांचे आहे. त्यांच्याखाली व हंस ही वाहने दिसत आहेत. तिसऱ्या क्रमांकावर द्वारपाल तसेच चौथे शिल्प चवरीधारी स्त्रीचे आहे. पाचवे शिल्प एका मुंगूस पिशवीधारी पुरुष आणि त्यांच्या पायाजवळ कलश आहे. ललाटपट्टीवर श्रीगणेशाचे अंकन आहे. उत्तरांगावर योगी, भौमितीक रचना, मध्यभागात नृत्यशिव परत भौमितीक रचना आणि योगी शिल्पांकीत आहे. अंतराळातील वितान दोन चौरस आणि कमलपुष्पाने सुशोभित आहे. गर्भगृहात दोन पायऱ्या उतरून आत जावे लागते. गर्भगृहातील श्री. रामेश्वर शिवलिंग वालुकामय असून पिंडीभोवती रुद्राक्ष माळा दिसतात. शिवपिंडीची लांबी ४ फूट १० इंच, रुंदी ३ फूट, घेरा २ फूट ४ इंच आणि उंची ६ इंच अशी आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदा या दिवशी सूर्यकिरण पिंडीवर पडतात. शिवलिंगासमोर एक आधुनिक ओटा बांधलेला आहे. त्यावर पंचधातूची श्री रामेश्वराची मूर्ती आहे. त्या मूर्तीवर शेषनाग फडा वेटोळा केलेला असून जटेमधून गंगा वाहते. दोन्ही कानात सर्प कुंडल असलेली सुंदर मूर्ती आहे. छतावर दोन चौरस असलेले वितान कमल पुष्पांनी सुशोभित आहे. गर्भगृह दक्षिण उत्तर ८ फूट ५ इंच व पूर्व पश्चिम ८ फूट १ इंच आहे, गर्भगृहाची उंची ९ फूट ३ इंच अशी आहे. येथील स्तंभ८ फूट उंचीचे आहेत.

श्री. रामेश्वर मंदिरांच्या बाह्यभिंती या सपाट शिळांच्या आहेत. दक्षिणेकडून गर्भगृहात पाणी सोडण्याची रचना आहे. पूर्वी गर्भगृहात नांद होती आता सभामंडपाच्या दक्षिण कोपऱ्यात ठेवलेली आहे. मंदिरास ४ फूट ८ इंचाचा प्रदक्षिणा पथ आहे. येथील मकरप्रणाल भग्न झालेली आहे. पूर्वाभिमूख मुख्य प्रवेशद्वाराच्या पुढे ३ फूट उंचीचे व ४ फूट लांबीचे नंदीचे शिल्प ठेवलेले आहे. नंदी विविध अलंकारांनी नटलेला आहे. गळयामध्ये साखळ माळ, घुंगरूमाळ यामध्ये मोठी घंटी अडकवलेली असून त्याच्या खाली शिवपिंड आहे. त्यांचे पाठीवर झूल शोभत आहे. मंदिर प्रांगणात उत्तरेकडील प्रवेशद्वाराजवळ सतीशिळा ठेवलेली आहे एखाद्या युद्धात धारातीर्थी पडलेल्या वीर योद्ध्या बरोबर सहगमन करणाऱ्या सतीच्या स्मरणार्थ ही सती

**नंदी आणि शिवपिंड**

शिल्पांकित केलेली आहे. शिळा तीन भागात विभागलेली असून खालील भागात सतीचे चित्रण आहे ती मृत्यूशय्येवर पतीसोबत अर्थात युद्धातील धारातीर्थी झालेल्या वीर योद्ध्या बरोबर आहे. दुसऱ्या टप्प्यात ती दोघे घोड्यावर बसून स्वर्गात जाताना शिल्पांकित आहेत. त्यावरील तिसऱ्या टप्प्यात ते दोघे कैलासास गेलेले दाखवले असून शिवलिंगाची पूजा करताना शिल्पांकित आहेत. या पूर्ण शिळेवर एक हात कोरलेला आहे. सतीशिळेच्या बाजूस द्वार शाखेचे तुटलेले अवशेष आहेत. त्यावर तीन अस्पष्ट शिल्प आहेत. त्यापैकी दोन स्त्री प्रतिमा आणि एक पुरुष प्रतिमा आहे. त्यावर स्तंभ शाखा व्याल शाखा आहेत. मंदिराच्या उजवीकडील प्रांगणात ठेवलेली गद्देगळ शिळा आहे. मंदिराची कोणी तोडफोड किंवा मंदिरास इजा पोहोचू नये असे करणाऱ्यास शापवचन म्हणून गद्देगळ शिळेचे प्रयोजन केलेले आहे. या शिळेवर एक गाढव आणि एक स्त्री कामस्थितीत दाखवलेले आहेत. एक प्रकारे दुष्कृत्य करणाऱ्या व्यक्तीस ह्या शिल्प रूपातून शिवीगाळ केलेली आहे. अशा शिल्पांकनांचा मुख्य हेतू म्हणजे मंदिराचे जतन आणि संवर्धन व्हावे ही शुद्ध भावना यामागे आहे. ही शिळा २ फूट ५ इंच उंच आणि १ फूट ३ इंच रुंद आहे.

**भवानी आईचे मंदिर**

वझुर गावात भवानी आईचे मंदिर आहे. सध्या या मंदिराचे नव्याने नूतनीकरण झालेले आहे. परिसरात काही पुरातन अवशेष पडलेले आहेत. पैकी बरेच पुरातन अवशेष जमिनीखाली गेले आहेत. मंदिराचे तीन स्तंभ तेवढे सद्य स्थितीत पाहायला मिळतात. अलंकृत असलेले हे तीन स्तंभ अवशेष प्राचीन मंदिराच्या भव्यतेची साक्ष देतात. एका स्तंभावरील दर्शनी भागात उमा महेश्वर आणि माकड व स्त्री दिसते. दुसऱ्या स्तंभावर गणेश आणि भैरव आहे तर तिसऱ्या स्तंभावर भैरवीचे शिल्प आहे. हे स्तंभ ५ फूट २ इंच लांबीचे आणि १ फूट ७ इंच रुंदीचे आहेत. मंदिराजवळ एक २ फूट ६ इंच उंच व १ फूट २ इंच असलेली दुर्मिळ वीरांगना शिल्प आहे. एका युद्धात मृत्यूला सामोरे गेलेली ही स्त्री युद्धात धारातीर्थी झाल्यावर तिच्या स्मृतीप्रित्यर्थ ही स्मारकशिळा आहे. यावर चार भागात प्रसंग कोरलेले आहेत. एका प्रसंगात हातात ढाल आणि तलवार घेऊन ही स्त्री युद्ध करण्यासाठी तयार आहे, दुसऱ्या प्रसंगात युद्ध दाखवले आहे, तिसरा प्रसंग ही स्त्री धारातीर्थी झाल्यावर स्वर्गात जाताना, तर चौथ्या प्रसंगात शिवलिंग दाखवले आहे. अशा प्रकारे हे दुर्मिळ शिल्प म्हणता येईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

जवळच एक खंडित झालेली सतीशिळा आहे. त्यावर हाताचा पंजा आणि कैलासात बसलेले पती-पत्नी असून वरती सूर्य-चंद्र दाखवले आहेत. खाली नंदी आहे. परिसरात आणखी एक सतीशिळा गावाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर पडलेली असून त्याची उंची २ फूट ८ इंच आणि रुंदी १ फूट ६ इंच अशी आहे. त्यावर एक हात बांगडी घातलेला आहे. वरती सूर्य आणि चंद्र शिल्पांकित आहेत.
संदर्भ 3

**श्री. गणेश मंदिर (मठ)**

श्री. रामेश्वर मंदिराच्या उत्तरेस श्री. गणेश मंदिर असून सदर मंदिर हे दत्त परंपरेतील महान विभूती श्री. दामोदर तीर्थ यांच्या सहवासाने पावन झालेले आहे. त्यांनी येथे श्री गणेश मूर्तीची स्थापना केली. गोदास्नान करायला जात असताना तिच्या पात्रातील थोडे थोडे शेवाळे जमा करून त्यांनी श्रीगणेशाची सुंदर मूर्ती साकारली. तो श्रीगणेश आजही येथील मंदिरात विराजमान असून पंचक्रोशीत सर्वदूर परिचित आहे. या मंदिराचे स्वरूप एखाद्या लादणीसारखे आहे परंतु हा मुळात मठ आहे.
संदर्भ 4

**श्री. राम मंदिर**

वझूर गावात श्रीराम मंदिर असून या मंदिर संस्थानचे मठाधिपती श्री. हरि महाराज (हरी शास्त्री महाराज) होते. या श्री. राम मंदिरास अनेक वर्षाची परंपरा आहे. या मंदिराची परंपरा पहात असताना, श्री. सिताराम महाराज, श्री. सखाराम महाराज, श्री. रामचंद्र महाराज, नारायण महाराज, शेषाद्री दादा महाराज, श्री. रामशास्त्री महाराज आणि श्री. हरीमहाराज (हरिशास्त्री महाराज) असे साक्षात्कारी व अनुभवी थोर संत होवून गेले.

**मारोती मंदिर**

वझुर या गावात एकूण पाच मारोती मंदिर आहेत. त्यापैकी बालाजी मंदिराच्या बाजूस असलेले श्री मारोती मंदिर गावाचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. या ठिकाणी प्राचीन दोन शिल्पे ठेवलेली आहेत. त्यापैकी एक नृसिंह व दुसरे गणपतीचे शिल्प आहे.
श्री. बालाजी मंदिर श्री. बालाजी मंदिर हे चारशे वर्षे इतके जुने असून या ठिकाणी राम लक्ष्मण व सीता यांच्या संगमरवरी दगडातील व तांब्याच्या काही मूर्ती आहेत. या मंदिराचा संबंध श्री. राम बालाजी मंदिर देवस्थान सुभाष रोड परभणी या मंदिराशी आहे.

**खंडोबा देवस्थान:**

खंडोबा देवस्थान व म्हातारबाबा हे गोदावरी गंगेच्या उत्तरेस पूर्वाभिमुख असे मंदिर आहे या मंदिरात म्हाळसा, बाणू व खंडोबाची मूर्ती आहे. तसेच म्हातार बाबा यांची समाधी आहे. वझुर गावाचे कुलदैवत खंडोबा देवस्थान आहे.

**गोदावरी घाट**

गोदावरी घाट भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहे. वझूर गावाला एकूण तीन नद्यांचा वारसा लाभलेला आहे. गोदावरी नदी मुख्य नदी असून या नदीच्या दोन उपनद्या आहेत. खडकी आणि मिरगी अशी या नद्यांची नाव आहेत. त्यामुळे गोदावरी नदीला मोठा घाट लाभलेला असून या पवित्र नदी घाटावर विविध विधी व कर्मकांड केली जातात. हे विधी करण्यासाठी पूर्वापार बांधण्यात आलेला एक स्वतंत्र ओटा आहे. त्यावर सर्प योग, नारायण, नागबळी असे विधी केले जातात. घाटाच्या खाली एक महादेव लिंग होते या ठिकाणी अस्थी विसर्जन केले जाते. खडकी नदीवर सुंदर असा धबधबा आहे. त्याच्या खालोखाल एक मोठा प्राचीन कुंड आहे आणि जवळ गोड पाण्याचा झरा आहे. कनकेश्वर महादेव लिंग काही अंतरावर गोदावरी व खडकी नदीचा संगम पाहावयास मिळतो. या संगमाच्या व नदीच्या मधोमध कनकेश्वर महादेव लिंग एका मोठ्या विशाल शिळेवर स्थापन केलेले आहे. श्री. कनकेश्वर लिंगाचे वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही बाजूस असलेल्या पाण्याच्या प्रवाहामध्ये हे लिंग आजपर्यंत स्थिर आहे, ते पाण्याच्या प्रवाहाने वाहून गेले नाही. पूर्वी येथे मंदिर होते असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. श्री. कनकेश्वर लिंगाच्या दक्षिणेस काही अंतरावर नदीच्या संगमामुळे छोटे बेट तयार झालेले दिसते. तसेच गोदा घाटावरील संत समाधी अनेक संतांच्या समाध्या गोदावरी घाटावर असून त्या अनेक भाविक भक्तांसाठी श्रद्धास्थान आहेत.

**हस्तकला पेबल आर्ट गॅलरी**

पेबल आर्ट हा एक प्रकारचा मोज़ेक वर्क आहे ज्यामध्ये सजावटीच्या किंवा सचित्र नमुन्यांची रचना करण्यासाठी नैसर्गिक खडे वापरतात. हे फक्त फुटपाथसाठी वापरले जात होते आणि पूर्व भूमध्य समुद्राच्या सर्व भागात सर्वात जुने प्रकारचे मोज़ेक होते, जे आशिया मायनरमध्ये 8 व्या आणि 7 व्या शतकापासून उत्खनन केलेल्या मजल्यांमध्ये दिसून आले आहेत. सदर हस्तकला ही वझुर गावात जोपासली जाते. ही वझुर हस्तकला पेबल आर्ट नावाने प्रसिद्ध आहे.
संदर्भ 5 ,6

**निष्कर्ष :**

वझुर ग्राम पर्यटन करताना विविध दर्शनीय विषय येथे पाहायला मिळतात हे एक पुरातन गाव असल्याचे संकेत सापडतात... प्रभू श्रीरामचंद्र यांच्या पाऊलांनी पुनीत झालेली ही भूमी पंचक्रोशीतील लोक माणसांसाठी श्रद्धेचा विषय आहे वझुर गावात श्रीरामप्रभू , श्री लक्ष्मण , व सीतामाता यांच्या पदस्पर्शाने हि पावन भूमी असुन येथे स्वतः श्रीरामप्रभूच्या स्वहस्ते श्री रामेश्वर महादेव शिवलिंगाची वालुकामय शिवलिंगाची स्थापना झाली असुन. येथे प्राचीन मंदिर स्थापत्यकला, शिल्पकला ,मूर्तीकला , आहेत .तसेच धार्मिक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटनामध्येन येथे दक्षिण गोदावरी नदी असुन विविध मंदिरे आहेत.संतांनी येथे येऊन साधना केली असुन येथेच ते समाधिस्त झाले आहेत. त्यासर्व संताची पुण्यतिथीनिमित्त निमित्त अखंड हरीनाम साप्ताह होतो . तसेच वर्षातून 2 वेळा श्रींचा पालखी महोत्सव असतो . त्यामुळे येथे ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनाला भरपूर वाव आहे.

**संदर्भ :**

1 ) शोधमुद्रा खंड 4 था ,श्री ब्रम्हानंद देशपांडे
2 ) श्री लक्ष्मण गाथा ,श्री सिद्धेश्वर प्रकाशन आष्टी ता.परतूर जि.जालना
3 ) परभणी जिल्हा प्राचीन ऐतिहासिक वारसा ग्रंथ , जिल्हाधिकारी कार्यालय परभणी
4 ) श्रीमत सद्गुरू उपेंद्रनानंदतीर्थ यांचे चरित्र , रचीयता कवी डॉ भालचंद्र झेंडे , आयुर्वेद विशारद ,पुणे
5 ) स्वनिरीक्षण
6) अस्तित्वाच्या पाऊलखुणा ,हस्तकला सप्ताह निमित ,आकाशवाणी परभणी केंद्र येथे मुलाखत

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन स्थळांच्या माध्यमातून भारताच्या इतिहासाचे दर्शन

**डॉ. अशोक गंगाराम अंभोरे**
सह. प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव जि. हिंगोली
**Email:** ashokambhore29@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180143
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 178-179
January 2026
**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*भारताची ऐतिहासिक वाटचाल प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशा विविध टप्प्यांतून घडलेली असून तिचे मूर्त प्रतिबिंब देशातील असंख्य पर्यटन स्थळांमध्ये आढळते. किल्ले, मंदिरे, लेणी, राजवाडे, धार्मिक वास्तू, ऐतिहासिक शहरे व स्मारके ही केवळ पर्यटकांची आकर्षणे नसून ती भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक इतिहासाची प्रत्यक्ष साक्ष देतात. प्रस्तुत संशोधन लेखाचा उद्देश पर्यटन स्थळांच्या आधारे भारताच्या इतिहासातील विविध कालखंडांचे विश्लेषण करणे हा आहे. दुय्यम माहितीच्या आधारे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक भारतातील निवडक पर्यटन स्थळांचा अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून येते की ऐतिहासिक पर्यटनामुळे इतिहाससंवर्धन, सांस्कृतिक जाणीव, राष्ट्रीय ऐक्य आणि आर्थिक उपक्रमांना चालना मिळते. त्यामुळे पर्यटन स्थळे ही इतिहास जतन व प्रसाराची प्रभावी माध्यमे ठरतात.*

***कीवर्ड्स:*** *पर्यटन, भारतीय इतिहास, ऐतिहासिक पर्यटन, सांस्कृतिक वारसा, भारत.*

## प्रस्तावना (Introduction)

पर्यटन हे आधुनिक काळातील एक महत्त्वाचे सामाजिक-आर्थिक कार्य असले तरी त्याचे महत्त्व केवळ उत्पन्ननिर्मितीपुरते मर्यादित नाही. पर्यटनाच्या माध्यमातून एखाद्या देशाचा इतिहास, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक जीवन यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येतो. भारताच्या संदर्भात पाहता, पर्यटन आणि इतिहास यांचा अतिशय निकटचा संबंध दिसून येतो. हजारो वर्षांचा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या भारतात विविध राजवटी, धर्मपरंपरा, कला व स्थापत्यशैली यांचे दर्शन घडविणारी असंख्य पर्यटन स्थळे आढळतात. सिंधू संस्कृतीपासून स्वातंत्र्यलढ्यापर्यंतचा इतिहास अनेक स्मारकांमध्ये साकारलेला आहे. ही स्थळे इतिहासाची माहिती देणारी साधनेच नव्हे, तर भूतकाळ समजून घेण्याची जिवंत प्रयोगशाळा ठरतात. त्यामुळे पर्यटन स्थळांच्या माध्यमातून भारताच्या इतिहासाचे अध्ययन करणे शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरते.

## पर्यटन व इतिहास : संकल्पनात्मक चौकट

इतिहास म्हणजे मानवी समाजाच्या भूतकाळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रक्रियांचा शास्त्रीय अभ्यास होय. पर्यटन ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्ती विविध स्थळांना भेट देऊन त्या ठिकाणच्या वैशिष्ट्यांचा अनुभव घेतात. ऐतिहासिक पर्यटन या संकल्पनेत इतिहासाशी संबंधित स्थळांना भेट देणे, त्यांचे महत्त्व समजून घेणे आणि त्या माध्यमातून सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करणे यांचा समावेश होतो. भारतामध्ये ऐतिहासिक पर्यटन हे सांस्कृतिक पर्यटनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. पर्यटन स्थळे ही इतिहासाची दृश्य साधने असल्यामुळे इतिहासाचे आकलन अधिक प्रभावी व सजीव पद्धतीने होते.

## प्राचीन भारताच्या इतिहासाचे पर्यटन स्थळांमधील प्रतिबिंब

प्राचीन भारताचा इतिहास विविध पुरातत्त्वीय स्थळांमधून स्पष्टपणे दिसून येतो.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. अशोक गंगाराम अंभोरे, सह. प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव जि. हिंगोली*

**How to cite this article:**
*अंभोरे, . अशोक . गंगाराम. (2026). पर्यटन स्थळांच्या माध्यमातून भारताच्या इतिहासाचे दर्शन. Journal of Research & Development, 18(1(V)), 178–179. https://doi.org/10.5281/zenodo.18480027*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18480027
OPEN ACCESS

हडप्पा आणि मोहेंजो-दडो ही सिंधू संस्कृतीची प्रमुख केंद्रे प्रगत नागरी जीवन, नगररचना व आर्थिक संघटनाचे पुरावे देतात. तक्षशिला व नालंदा यांसारखी शिक्षणकेंद्रे प्राचीन भारताच्या ज्ञानपरंपरेचे द्योतक आहेत. अजिंठा, एलोरा, कार्ला आणि भाजी येथील लेणी बौद्ध, जैन व हिंदू धर्मांच्या विकासाबरोबरच प्राचीन भारतीय कला व स्थापत्यकलेची उंची दर्शवितात. सांची स्तूप, भरहुत आणि बोधगया ही बौद्ध धर्माच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची केंद्रे मानली जातात. ही सर्व स्थळे प्राचीन भारतातील धार्मिक सहिष्णुता व सांस्कृतिक समृद्धीचे सजीव उदाहरण आहेत.

### मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे पर्यटन स्थळांमधील दर्शन

मध्ययुगीन भारताचा इतिहास विविध राजवंश, सुलतानशाही व मुघल साम्राज्याच्या स्थापत्य वारशातून प्रकट होतो. या काळातील किल्ले, राजवाडे, मशिदी व मकबरे हे राजकीय सत्ता, स्थापत्यकौशल्य आणि सांस्कृतिक समन्वयाचे प्रतीक आहेत. दिल्लीतील कुतुबमिनार, लाल किल्ला व हुमायूनचा मकबरा तसेच आग्र्याचा ताजमहाल ही मुघल स्थापत्यशैलीची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. राजस्थानातील चित्तोडगड, कुम्भलगड व आमेर किल्ला हे राजपूत शौर्य व स्वाभिमानाचे प्रतीक मानले जातात. महाराष्ट्रातील रायगड, शिवनेरी व प्रतापगड हे किल्ले मराठा साम्राज्याच्या इतिहासाचे महत्त्वपूर्ण साक्षीदार आहेत.

### आधुनिक भारताच्या इतिहासाचे पर्यटन स्थळांमधील प्रतिबिंब

आधुनिक भारताचा इतिहास प्रामुख्याने वसाहतवाद, स्वातंत्र्यलढा व राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेशी निगडित आहे. मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया, कोलकात्याचे व्हिक्टोरिया मेमोरियल आणि चेन्नईतील फोर्ट सेंट जॉर्ज ही ब्रिटिश कालीन स्थापत्याची उदाहरणे आहेत. स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित साबरमती आश्रम, जालियनवाला बाग, दांडी आणि काकोरी स्मारक ही स्थळे राष्ट्रीय चळवळीची प्रेरणास्थाने आहेत. ही स्मारके देशभक्ती, त्याग आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करतात.

### पर्यटन स्थळांचे ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व

पर्यटन स्थळांमुळे इतिहासाचे जतन व संवर्धन होते. ही स्थळे विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित शिक्षणाचे प्रभावी माध्यम ठरतात. तसेच राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक ओळख आणि ऐतिहासिक जाणीव वृद्धिंगत करण्यास मदत करतात. आर्थिक दृष्टिकोनातून पाहता, ऐतिहासिक पर्यटनामुळे रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्थेचा विकास आणि सांस्कृतिक उद्योगांना चालना मिळते. त्यामुळे पर्यटन हे इतिहास व विकास यांमधील दुवा म्हणून कार्य करते.

### आव्हाने व संवर्धनाची गरज

अनेक ऐतिहासिक पर्यटन स्थळांना देखभाल अभाव, पर्यावरणीय प्रदूषण, अति-पर्यटन आणि अतिक्रमण यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर शाश्वत पर्यटन धोरणे, स्थानिक समुदायाचा सहभाग आणि व्यापक जनजागृती अत्यावश्यक ठरते.

### निष्कर्ष (Conclusion)

पर्यटन स्थळांच्या माध्यमातून भारताचा इतिहास समजून घेणे ही एक प्रभावी व सजीव प्रक्रिया आहे. प्राचीन ते आधुनिक काळातील विविध ऐतिहासिक टप्पे भारतातील पर्यटन स्थळांमध्ये मूर्त स्वरूपात जतन झालेले आहेत. ही स्थळे केवळ भूतकाळाची आठवण करून देत नाहीत, तर वर्तमान व भविष्यकालीन पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरतात. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटनाचा विकास करताना इतिहाससंवर्धन, सांस्कृतिक जाणीव आणि शाश्वत विकास यांचा संतुलित समन्वय साधणे अत्यावश्यक आहे.

### संदर्भ सूची (References)

1. Bharatiya Itihas Anusandhan Parishad. (2015). *Bharatatil aitihasik smarake ani sanskrutik vasa*. New Delhi: Government of India.
2. Chakrabarti, D. K. (2006). *The archaeology of ancient Indian cities*. Oxford University Press.
3. Government of India. (2021). *India tourism statistics at a glance*. Ministry of Tourism.
4. IGNCA. (2018). *Cultural heritage of India*. Indira Gandhi National Centre for the Arts.
5. Majumdar, R. C. (2010). *Ancient India*. Motilal Banarsidass Publishers.
6. Mishra, S. K., & Rout, H. B. (2019). Historical tourism and cultural heritage in India. *International Journal of Heritage Studies, 25*(4), 412–428. https://doi.org/10.1080/13527258.2018.1451012
7. NCERT. (2020). *Themes in Indian history* (Vols. I–III). New Delhi: National Council of Educational Research and Training.
8. Singh, R. (2017). Heritage tourism in India: Challenges and opportunities. *Journal of Tourism and Cultural Change, 15*(2), 99–115. https://doi.org/10.1080/14766825.2016.1176591
9. Upadhyay, R. (2018). Tourism as a tool for historical awareness in India. *Indian Journal of Historical Studies, 53*(1), 87–102.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन आणि स्थानिक विकास

**अनिल मनोहरराव देशमुख**
संशोधक विद्यार्थी ज्ञानोपासक महाविद्यालय संशोधन केंद्र परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180144
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 180-183
January 2026
**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन हा आधुनिक काळातील वेगाने विकसित होणारा उद्योग असून तो स्थानिक विकासाशी घनिष्ठपणे जोडलेला आहे. पर्यटनामुळे केवळ आर्थिक उत्पन्नात वाढ होत नाही तर स्थानिक समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व पायाभूत विकासालाही चालना मिळते. भारतासारख्या विकसनशील देशात नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, धार्मिक स्थळे व सांस्कृतिक विविधता यांमुळे पर्यटन उद्योगाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या संशोधन लेखामध्ये पर्यटन आणि स्थानिक विकास यांतील परस्परसंबंधांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. पर्यटनामुळे रोजगारनिर्मिती, स्थानिक उत्पन्नात वाढ, पायाभूत सुविधांचा विकास, ग्रामीण व दुर्गम भागांचा विकास, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास तसेच सांस्कृतिक जतन व संवर्धन यासारखे सकारात्मक परिणाम दिसून येतात. त्याचबरोबर अति-पर्यटन, पर्यावरणीय ऱ्हास, आर्थिक असमानता, स्थानिक संस्कृतीवरील नकारात्मक परिणाम आणि पायाभूत सुविधांवरील ताण यांसारख्या समस्याही उद्भवतात. म्हणूनच पर्यटन विकासासाठी शाश्वत दृष्टिकोन, योग्य नियोजन, पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक लोकांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. शाश्वत पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक विकास साध्य करून आर्थिक समृद्धी, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक संवर्धन यांचा समतोल राखता येऊ शकतो, असा निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन, स्थानिक विकास, रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा, शाश्वत पर्यटन, ग्रामीण विकास, सांस्कृतिक संवर्धन, पर्यावरण संरक्षण, महिला सक्षमीकरण.*

**प्रस्तावना:-**

पर्यटन हा आधुनिक जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. जगभरात पर्यटन उद्योगाने आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पर्यटन म्हणजे केवळ प्रवास किंवा मनोरंजन नसून, तो स्थानिक समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाशी थेट जोडलेला घटक आहे. भारतासारख्या विकसनशील देशात पर्यटन उद्योगाला विशेष महत्त्व आहे. कारण भारतात नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, धार्मिक स्थळे, विविध संस्कृती व परंपरा यांचे मोठे वैविध्य आढळते. पर्यटनामुळे ग्रामीण व शहरी भागांमध्ये स्थानिक विकासाला चालना मिळते.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. पर्यटनाचा स्थानिक विकासावर होणारा आर्थिक परिणाम अभ्यासणे.
२. पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या रोजगार संधींचे विश्लेषण करणे.
३. स्थानिक समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर पर्यटनाचा प्रभाव समजून घेणे.
४. पर्यटन विकासातील आव्हाने व समस्या ओळखणे.
५. शाश्वत पर्यटनासाठी उपाययोजना सुचवणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*अनिल मनोहरराव देशमुख, संशोधक विद्यार्थी ज्ञानोपासक महाविद्यालय संशोधन केंद्र परभणी*

**How to cite this article:**
*देशमुख, . अनिल . मनोहरराव . (2026). पर्यटन आणि स्थानिक विकास. Journal of Research & Development, 18(1(V)), 180–183. https://doi.org/10.5281/zenodo.18480080*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18480080
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**पर्यटनाची संकल्पना व स्वरूप**

पर्यटन म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या नेहमीच्या निवासस्थानाबाहेर विश्रांती, शिक्षण, व्यवसाय, धार्मिक किंवा मनोरंजनाच्या उद्देशाने केलेला प्रवास.

पर्यटनाचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत :

१. धार्मिक पर्यटन
२. ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन
३. निसर्ग व पर्यावरण पर्यटन
४. ग्रामीण पर्यटन
५. साहसी पर्यटन
६. वैद्यकीय पर्यटन

या सर्व प्रकारच्या पर्यटनाचा स्थानिक विकासाशी घनिष्ठ संबंध आहे.

**स्थानिक विकास : अर्थ व व्याप्ती**

स्थानिक विकास म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांच्या जीवनमानात होणारी सर्वांगीण सुधारणा. यामध्ये आर्थिक प्रगती, सामाजिक बदल, पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सांस्कृतिक उन्नती यांचा समावेश होतो. स्थानिक विकासात स्थानिक संसाधनांचा योग्य वापर आणि स्थानिक लोकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो.

**पर्यटन आणि स्थानिक विकास यांचा संबंध**

पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. हॉटेल, वाहतूक, हस्तकला, मार्गदर्शक सेवा, स्थानिक बाजारपेठा यांमधून उत्पन्न वाढते. ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये पर्यटन पोहोचल्यास तेथील लोकांना रोजगार मिळतो व स्थलांतर कमी होते. तसेच रस्ते, वीज, पाणी, दळणवळण यांसारख्या पायाभूत सुविधांचा विकास होतो.

**पर्यटनामुळे होणारे स्थानिक विकासाचे फायदे**

**रोजगारनिर्मिती**

पर्यटनामुळे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होते. हॉटेल,लॉज, रिसॉर्ट, रेस्टॉरंट, प्रवास संस्था, पर्यटन मार्गदर्शक, वाहनचालक, सुरक्षारक्षक, स्वच्छता कर्मचारी अशा विविध क्षेत्रांत थेट रोजगार उपलब्ध होतो तसेच हस्तकला, शेती उत्पादन, फळेभाज्या, दूध व दुग्धजन्य पदार्थ पुरवठा करणाऱ्या लोकांना अप्रत्यक्ष रोजगार मिळतो यामुळे बेरोजगारी कमी होऊन स्थानिक लोकांचे आर्थिक स्थैर्य वाढते.

**स्थानिक उत्पन्नात वाढ**

पर्यटक स्थानिक वस्तू, सेवा व खाद्यपदार्थांवर खर्च करतात त्यामुळे स्थानिक बाजारापेठेत पैशाची उलाढाल होते. लघुव्यापारी, दुकानदार, शेतकरी, कारागीर व सेवा पुरवठादारांचे उत्पन्न वाढते. वाढलेले उत्पन्न स्थानिक विकासासाठी वापरले जाते. ज्यामुळे संपूर्ण भागाची आर्थिक स्थिती सुधारते.

**पायाभूत सुविधांचा विकास**

पर्यटन विकासासाठी चांगले रस्ते, वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, वीज, स्वच्छता, इंटरनेट व आरोग्य सुविधा आवश्यक असतात. त्यामुळे सरकार व खाजगी संस्था या सुविधा विकसीत करतात. या सुविधा केवळ पर्यटकांसाठी नव्हे तर स्थानिक नागरिकांसाठीही उपयुक्त ठरतात आणि त्यांच्या दैनंदिन जीवनाची गुणवत्ता सुधारते.

**ग्रामीण व दुर्गम भागांचा विकास**

ग्रामीण व दुर्गम भागात पर्यटन विकसित झाल्यास तेथील लोकांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळतोत्यामुळे शहरांकडे होणारे . स्थलांतर कमी होतेग्रामीण पर्यटनामुळे गावांचा आर्थिक व सामाजिक विकास होतो आणि संतुलित प्रादेशिक विकास साध्य होतो.

**स्थानिक व्यवसाय व लघुउद्योगांना चालना**

पर्यटनामुळे हस्तकला, मातीची भांडी, पारंपरिक दागिने, स्थानिक खाद्यपदार्थ, यांना मोठी बाजारपेठ मिळते. यामुळे स्वयंरोजगार आणि लघुउद्योगांना चालना मिळते. स्थानिक उद्योजकतेचा विकास होऊन आर्थिक स्वावलंबन वाढते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**महिलांचे सक्षमीकरण**

पर्यटन क्षेत्रात महिलांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. महिला स्वयं सहायता गटाद्वारे हस्तकला, खाद्यपदार्थ निर्मिती, होमस्टे-, मार्गदर्शन सेवा सुरू केल्या जातात यामुळे महिलांचे उत्पन्न वाढते, निर्णयक्षमतेत सुधारणा होते आणि सामाजिक सन्मान प्राप्त होतो.

**शिक्षण व कौशल्य विकास**

पर्यटनामुळे स्थानिक लोकांमध्ये भाषा ज्ञान, आतिथ्य व्यवस्थापन, संवाद कौशल्य, व्यवस्थापन, संगणक ज्ञान यांचा विकास होतो पर्यटनाशी संबंधित प्रशिक्षण संस्था व अभ्यासक्रम सुरू होतात. यामुळे युवकांची कौशल्ये वाढून त्यांना रोजगार मिळण्याच्या संधी वाढतात.

**सांस्कृतिक जतन व संवर्धन**

पर्यटनामुळे स्थानिक संस्कृती, कला, लोकनृत्य, लोकसंगीत, सण उत्सव, परंपरा यांचे जतन होते. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी या परंपरांना महत्त्व दिले जाते. यामुळे सांस्कृतिक वारसा टिकून राहतो आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतो.

**सामाजिक विकास व जीवनमानात सुधारणा**

पर्यटनामुळे स्थानिक भागात शिक्षण संस्था, आरोग्य केंद्रे, सामाजिक सेवा आणि सार्वजनिक सुविधा विकसित होतात. लोकांचे उत्पन्न वाढल्यामुळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा होते. स्वच्छता, आरोग्य व शिक्षणाबाबत जागरूकता वाढते

**सरकारी महसुलात वाढ**

पर्यटनातून कर, प्रवेश शुल्क, सेवा शुल्क व इतर माध्यमांतून सरकारला महसूल प्राप्त होतो हा महसूल स्थानिक विकास योजना, पायाभूत सुविधा व सामाजिक कल्याण योजनांसाठी वापरला जातो.

**पर्यावरण संवर्धनाला चालना**

योग्य नियोजनासह पर्यटन विकसित केल्यास निसर्ग संरक्षणाला चालना मिळते. इको टुरिझममुळे जंगल, वन्यजीव, नद्या व डोंगररांगांचे संरक्षण केले जाते. या पर्यावरणाबाबत स्थानिक लोक व पर्यटकांमध्ये जागरूकता वाढते.

**राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ओळख**

पर्यटनामुळे स्थानिक स्थळांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळते यामुळे त्या भागात गुंतवणुक, रोजगार आणि विकासाच्या नवीन संधी निर्माण होतात. स्थानिक विकासाला दीर्घकालीन गती मिळते.

**शाश्वत पर्यटन व स्थानिक विकास**

शाश्वत पर्यटन म्हणजे पर्यावरण, समाज व अर्थव्यवस्था यांचा समतोल राखून पर्यटनाचा विकास करणे.

शाश्वत पर्यटनामुळे :-

पर्यावरण संरक्षण होते

१. स्थानिक समाजाचा दीर्घकालीन विकास होतो.

२. नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर होतो.

३. शाश्वत पर्यटन हे स्थानिक विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**पर्यटनामुळे स्थानिक विकासावर होणारे तोटे**

**पर्यावरणाचा ऱ्हास**

पर्यटन वाढल्यामुळे जंगलतोड, पाण्याचे प्रदूषण, कचऱ्याचे प्रमाण वाढणे, ध्वनी व वायू प्रदूषण अशा समस्या निर्माण होतात. डोंगराळ व समुद्रकिनारी भागात नैसर्गिक

समतोल बिघडतो. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यास स्थानिक लोकांचे आरोग्य व उपजीविकेवर विपरीत परिणाम होतो.

**अतिपर्यटन**

मर्यादेपेक्षा जास्त पर्यटक आल्यामुळे स्थानिक संसाधनांवर ताण पडतो. पाणी, वीज, वाहतूक, निवास सुविधा अपुऱ्या पडतात यामुळे स्थानिक लोकांना दैनंदिन जीवनात अडचणी निर्माण होतात आणि जीवनमान खालावते.

**स्थानिक संस्कृतीवर नकारात्मक परिणाम**

पर्यटनाच्या व्यापारीकरणामुळे स्थानिक परंपरा, सण-उत्सव व संस्कृतीचा अपमान किंवा विकृती होऊ शकते. परकीय संस्कृतीचा अति प्रभाव पडल्यास स्थानिक सांस्कृतिक ओळख कमी होते.

**आर्थिक असमानता**

पर्यटनातून होणारा फायदा सर्व स्थानिक लोकांना समान प्रमाणात मिळत नाही मोठे उद्योग, हॉटेल मालक व बाहेरील गुंतवणूकदार अधिक फायदा घेतात, तर स्थानिक गरीब लोक मागे राहतातृ त्यामुळे आर्थिक विषमता वाढते.

**महागाईत वाढ**

पर्यटकांच्या वाढीमुळे घरभाडे, अन्नधान्य, वाहतूक व दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढतात. स्थानिक लोकांसाठी जीवनावश्यक वस्तू महाग होतात, ज्याचा त्यांच्या जीवनमानावर वाईट परिणाम होतो.

**स्थानिक लोकांचे विस्थापन**

पर्यटन प्रकल्प, रिसॉर्ट, हॉटेल्स, रस्ते बांधण्यासाठी स्थानिक लोकांना त्यांच्या जमिनी व घरांपासून दूर केले जाते पुनर्वसन नीट न झाल्यास सामाजिक समस्या निर्माण होतात.

**पारंपरिक व्यवसायांचा ऱ्हास**

पर्यटनावर अवलंबून राहिल्यामुळे शेती, मासेमारी, हस्तव्यवसाय यांसारखे पारंपरिक व्यवसाय दुर्लक्षित होतात पर्यटन हंगामी असल्याने उत्पन्नात अस्थिरता येते.

**सामाजिक समस्या**

पर्यटनामुळे गुन्हेगारी, मद्यपान, अंमली पदार्थांचे सेवन, अनैतिक व्यवसाय वाढण्याची शक्यता असते. याचा नकारात्मक परिणाम स्थानिक समाजावर होतो.

**पायाभूत सुविधांवर ताण**

रस्ते, वाहतूक, आरोग्य सेवा, स्वच्छता व्यवस्था यावर अतिरिक्त ताण येतो. सुविधांचा दर्जा घसरतो आणि स्थानिक लोकांना गैरसोय होते.

**पर्यावरणीय व सामाजिक असंतुलन**

अयोग्य नियोजनामुळे पर्यावरणीय नुकसान व सामाजिक असमतोल निर्माण होतो. विकास अल्पकालीन ठरतो आणि दीर्घकालीन स्थानिक विकास धोक्यात येतो.

**बाह्य अवलंबित्व वाढणे**

स्थानिक अर्थव्यवस्था पर्यटनावर अत्यंत अवलंबून राहिल्यास कोणत्याही संकटात मोठे आर्थिक नुकसान होते. स्थानिक विकास अस्थिर बनतो.

**शाश्वत विकासाला धोका**

पर्यावरण व समाजाचा विचार न करता पर्यटन वाढविल्यास शाश्वत विकासाचा समतोल बिघडतो. पुढील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होतो.

**निष्कर्ष**

पर्यटन हे स्थानिक विकासाचे एक प्रभावी व सर्वांगीण साधन आहे. योगय नियोजन, स्थानिक सहभाग आणि शाश्वत दृष्टिकोन स्वीकारल्यास पर्यटनामुळे आर्थिक समृद्धी, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक संवर्धन साध्य होऊ शकते. त्यामुळे पर्यटन विकास धोरणे आखताना स्थानिक गरजा व पर्यावरणीय संतुलन यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. पर्यटनामुळे स्थानिक विकासाला चालना मिळते, परंतु अयोग्य नियोजन, नियंत्रणाचा अभाव व स्थानिक सहभाग नसल्यास पर्यटनाचे तोटे अधिक ठळकपणे दिसून येतात. त्यामुळे पर्यटन विकास करताना शाश्वतता, पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक लोकांचा सहभाग अत्यावश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

१. डॉ. कठारे, डॉ. पाटील, डॉ. साखरे, पुरातत्वविद्या, वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन, विद्या बुक पब्लिशर्स, दुसरी आवृत्ती, मार्च २०१५.

२. डॉ. सुनिता शंकरराव शिंदे, पर्यटन भूगोल, एज्युकेशल पब्लिशर्स, प्रथम आवृत्ती, २०१३.

३. डॉ. जी. एस. पिसे, डॉ. एस. बी. नानवटे, ऐजुकेशनल पब्लिशिंग हाऊस, प्रथम आवृत्ती, २०२५.

४. एम. लक्ष्मीकांत, इंडियन पॉलिटी, McGraw Hill Education Private Limited २०२४.

५. के. दे. कावडकर, ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतनशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, २०२३.

६. मिलिंद गुणाजी, गडकिल्ले महाराष्ट्राचे, राजहंस प्रकाशन, १९९४.

७. डॉ. बी. के. कुलकर्णी, महाराष्ट्राची सांस्कृतिक वारसा स्थळे, श्रीविद्या प्रकाशन, २०११.

८. डॉ. प्रमोद पाटील, भारतातील जागतिक वारसा स्थळे, अथर्व पब्लिकेशन्स, २०१५.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळे

**प्रा. डॉ. मधुकर रामचंद्र साठे**

छत्रपती शाहू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासुर स्टेशन, ता. गंगापूर जि.औरंगाबाद

**Email:** madhukarsathe@rediffmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180145
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 184-187
January 2026

**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:***

*भारत हा समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक व स्थापत्य वारसा लाभलेला देश असून भारतीय पर्यटनामध्ये ऐतिहासिक वारसा स्थळांना विशेष महत्त्व आहे. प्रस्तुत लेखामध्ये भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळे यांच्यातील परस्परसंबंधाचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. किल्ले, मंदिरे, लेणी, स्तूप, राजवाडे, स्मारके व जागतिक वारसा स्थळे ही भारताच्या गौरवशाली भूतकाळाची साक्ष देतात आणि पर्यटनाची प्रमुख आकर्षणे ठरतात. पर्यटनामुळे या वारसा स्थळांचे जतन व संवर्धन होण्यास मदत होते तसेच स्थानिक व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला चालना मिळते. रोजगारनिर्मिती, परकीय चलनाची आवक, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि राष्ट्रीय ओळख बळकट होणे हे पर्यटनाचे महत्त्वाचे लाभ आहेत. तथापि, अति पर्यटन, प्रदूषण, अतिक्रमण, निधीची कमतरता आणि जनजागृतीचा अभाव ही वारसा स्थळांपुढील प्रमुख आव्हाने आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी शाश्वत व जबाबदार पर्यटन, स्थानिक समुदायांचा सहभाग, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रभावी शासकीय धोरणे आवश्यक आहेत. त्यामुळे भारतीय पर्यटनाचा विकास साधताना ऐतिहासिक वारसा स्थळांचे संरक्षण व संवर्धन करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय पर्यटन, ऐतिहासिक वारसा स्थळे, सांस्कृतिक वारसा, शाश्वत पर्यटन, वारसा संवर्धन, आर्थिक विकास.*

**प्रस्तावना:**

भारत हा विविधतेने नटलेला, समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक वारसा जपणारा देश आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत भारताने अनेक संस्कृती, परंपरा आणि राज्यसंस्थांचा वारसा अनुभवला आहे. हजारो वर्षांचा इतिहास लाभलेल्या भारतात अनेक राजवटी, धर्म, परंपरा आणि संस्कृतींचा संगम पाहायला मिळतो. या इतिहासाचे जिवंत पुरावे म्हणजे भारतातील ऐतिहासिक वारसा स्थळे. किल्ले, मंदिरे, लेणी, स्तूप, मशिदी, चर्च, राजवाडे आणि प्राचीन शहरे ही स्थळे भारतीय पर्यटनाचा कणा मानली जातात. या दीर्घ इतिहासाचे साक्षीदार म्हणून देशभर पसरलेली ऐतिहासिक स्मारके, मंदिरे, किल्ले, लेणी, राजवाडे आणि सांस्कृतिक स्थळे आजही अभिमानाने उभी आहेत. भारतीय पर्यटनामध्ये ऐतिहासिक वारसा स्थळांना विशेष महत्त्व आहे. भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळे यांचा परस्परांशी अतूट असा संबंध आहे. भारताचा समृद्ध इतिहास, विविध संस्कृती आणि भव्य स्थापत्यकला ही पर्यटनाची मुख्य आकर्षणे आहेत. देशभर विखुरलेली ऐतिहासिक वारसा स्थळे भारताच्या गौरवशाली भूतकाळाची साक्ष देतात आणि आजच्या पिढीला त्या इतिहासाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, वास्तुशिल्पीय आणि ऐतिहासिक अशा अनेक पैलूंनी भारत समृद्ध आहे. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने भारताला विशेष महत्त्व आहे. विशेषतः ऐतिहासिक स्थळे भारतीय पर्यटनाचा कणा मानली जातात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*प्रा. डॉ. मधुकर रामचंद्र साठे, छत्रपती शाहू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासुर स्टेशन, ता. गंगापूर जि.औरंगाबाद*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18480144

OPEN ACCESS

**How to cite this article:**

*साठे, . मधुकर . रामचंद्र. (2026). भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळे. Journal of Research & Development, 18(1(V)), 184–187. https://doi.org/10.5281/zenodo.18480144*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

या स्थळांमधून भारताचा प्राचीन वारसा, परंपरा, कला, राजकीय इतिहास आणि सामाजिक जीवनाचा मागोवा घेता येतो. भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळे यांचा परस्पर संबंध देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतो.

भारतामधील जास्तीत जास्त पर्यटन स्थळे हे जागतीक पर्यटन स्थळामध्ये समावेश केलेले आहेत ते पुढीलप्रमाणे ताजमहाल, अजंठा–वेरूळ लेणी, कोणार्कचे सूर्यमंदिर, हम्पी, कुतुबमिनार, लाल किल्ला, सांची स्तूप, आग्रा किल्ला, खजूराहो लेणी, महाबलीपूरम, गोव्यातील चर्चस, एलेफंटा लेणी, सुंदरबन राष्ट्रीय पार्क, हूमायूनचा थोंब, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल, जयपूरचे जंतरमंतर, पश्चिम घाट-महाराष्ट्र, नालंदा महाविहार, शांतीनिकेतन-पश्चिम बंगाल, तेलंगनामधील काकतीय रूद्रेश्वरा मंदिर, खान्गचेंदझोन्गा राष्ट्रीय पार्क, राणि-कि-वेव पाटण-गुजरात, राजस्थानमधील केवलादेव राष्ट्रीय पार्क-उत्तराखंड, चंपानेर-पावागड, पूरातत्वीय पार्क, होयसळचे नक्षीकाम-कर्नाटका, तसेच ऑग्ष्ट 2025 मध्ये महाराष्ट्रातील 11 किल्ले – रायगड, शिवनेरी, राजगड, सिंधुदूर्ग, विजयदूर्ग, लोहगड, साल्हेर, खांदेरी, प्रतापगड, पन्हाळ, सुवर्णदूर्ग व तामिळनाडूमधील जिंजी हा किल्ला यांसारखी स्थळे जागतीक वारसा स्थळामध्ये समावेश करण्यात आलेले आहेत. भारतीय पर्यटन स्थळे स्थापत्यकलेचे उत्कृष्ट नमुने नाहीत, तर त्या-त्या काळातील सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंबही आहेत. ही वारसा स्थळे देशाच्या गौरवशाली भूतकाळाची ओळख करून देतात.

पर्यटनामुळे या ऐतिहासिक स्थळांचे जतन व संवर्धन होण्यास मदत होते, तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. देशी-विदेशी पर्यटक भारतातील वारसा स्थळांना भेट देऊन भारतीय संस्कृतीची समृद्धी, कला, परंपरा आणि इतिहास अनुभवतात. त्यामुळे भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळे यांचा घनिष्ठ संबंध असून, ही स्थळे भारताच्या राष्ट्रीय ओळखीचा अविभाज्य भाग आहेत.

**भारतीय पर्यटन व ऐतिहासिक वारसा स्थळांची उद्दिष्टे :-**

1) भारतातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा स्थळांची ओळख देशी व विदेशी पर्यटकांना करून देणे.

2) प्राचीन स्मारके, किल्ले, मंदिरे, लेणी व इतर वारसा स्थळांचे जतन व संवर्धन करणे.

3) भारतीय इतिहास, संस्कृती व परंपरांविषयी जनजागृती निर्माण करणे.

4) पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

5) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची सांस्कृतिक ओळख बळकट करणे.

6) वारसा स्थळांच्या संरक्षणासाठी शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन देणे.

7) विद्यार्थ्यांमध्ये इतिहास व वारसा याविषयी अभ्यासाची आणि अभिमानाची भावना निर्माण करणे.

8) पर्यटन विकासातून आर्थिक प्रगती साधणे व ग्रामीण तसेच शहरी भागांचा विकास घडवून आणणे.

**भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांबाबतची गृहीतके**

1) ऐतिहासिक स्थळे ही भारतीय पर्यटनाची मुख्य आकर्षणे आहेत.
भारतात येणाऱ्या बहुतांश देशी-विदेशी पर्यटकांचे प्रमुख उद्दिष्ट ऐतिहासिक स्थळांना भेट देणे असते.

2) ऐतिहासिक स्थळांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर चालना मिळते.
पर्यटनातून रोजगार, उद्योग आणि स्थानिक अर्थचक्र वाढते असे गृहीत धरले जाते.

3) भारतीय सांस्कृतिक वारसा जतन करण्यास पर्यटन महत्त्वाची भूमिका निभावते.
पर्यटकांच्या वाढत्या आवडीमुळे सरकार आणि स्थानिक संस्था संवर्धनाकडे लक्ष देतात.

4) पर्यटनामुळे सांस्कृतिक देवाणघेवाण आणि सामाजिक समज वाढते.
विविध देश व प्रांतातील लोक एकमेकांच्या संस्कृतीशी परिचित होतात.

5) ऐतिहासिक स्थळांचे योग्य व्यवस्थापन केल्यास पर्यटन शाश्वत राहू शकते.
स्वच्छता, सुरक्षा, सुविधा यांची योग्य काळजी घेतली तर पर्यटन आणि संवर्धन यांचा समतोल राखता येतो.

6) पर्यटकांचे जागरूक व जबाबदार वर्तन वारसा संवर्धनाला हातभार लावते.
पर्यटक नियम पाळतात, प्रदूषण टाळतात असे गृहीत धरले जाते.

7) सरकारी धोरणे आणि निधीची उपलब्धता पर्यटनविकासात निर्णायक ठरतात.
नीट आखलेली पर्यटननीती असल्यास पर्यटनाचा दर्जा उंचावतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

8) डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानामुळे पर्यटनाची लोकप्रियता वाढते.
पर्यटक माहितीच्या आधारे निर्णय घेतात असे गृहीत मानले जाते.
9) स्थानिक लोकांचा सहकार्यभाव असेल तर पर्यटनाचा विकास अधिक परिणामकारक होतो.
स्थानिक समुदाय सहभागी असल्यास संघर्ष कमी आणि फायदे जास्त होतात.
10) ऐतिहासिक स्थळांवरील अतिक्रमण, प्रदूषण आणि गर्दी ही वारशासाठी धोकादायक ठरू शकते.
त्यामुळे संवर्धनासाठी नियोजन आवश्यक असल्याचे गृहीत धरले जाते.

**पर्यटनामुळे मिळणारे फायदे**

1) भारतातील ऐतिहासिक पर्यटन देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठा वाटा उचलते.

2) पर्यटनामुळे रोजगारनिर्मिती होते

3) स्थानिक उद्योगांना चालना मिळते

4) परकीय चलनाची आवक वाढते

5) सांस्कृतिक देवाणघेवाण घडते. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची सकारात्मक प्रतिमा मजबूत होते.

**ऐतिहासिक वारसा स्थळांचे महत्त्व**

ऐतिहासिक वारसा स्थळे ही केवळ वास्तू नसून त्या-त्या काळातील सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब आहेत. भारतामध्ये ताजमहाल, अजंठा-वेरूळ लेणी, सांची स्तूप, कोणार्कचे सूर्यमंदिर, लाल किल्ला, कुतुबमिनार, रायगड, चित्तोडगड यांसारखी स्थळे भारताच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देतात. ही स्थळे राष्ट्रीय अस्मिता आणि सांस्कृतिक ओळख जपण्याचे कार्य करतात. हम्पीची नगरी, मधुराईचे मंदिर, गेटवे ऑफ इंडिया अशी अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत. ही स्थळे केवळ पर्यटन आकर्षण नसून प्राचीन राजवंशांचा इतिहास सांगतात भारतीय वास्तुशिल्पाचा उत्कर्ष दर्शवतात सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतिक आहेत यामुळे पर्यटकांना भारतीय इतिहासाचा सजीव अनुभव मिळतो.

**ऐतिहासिक वारसा स्थळे आणि पर्यटनाचा विकास**

पर्यटनामुळे ऐतिहासिक वारसा स्थळांचा प्रचार-प्रसार होतो. देशी व विदेशी पर्यटक या स्थळांना भेट देऊन भारतीय इतिहास आणि संस्कृतीचा अभ्यास करतात. पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, जसे की मार्गदर्शक, हॉटेल व्यवसाय, हस्तकला विक्री, वाहतूक इत्यादी. त्यामुळे स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवर आर्थिक विकासाला चालना मिळते.

**वारसा स्थळांचे जतन व संवर्धन**

पर्यटनाच्या वाढीसोबतच ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतन आणि संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. अति पर्यटन, प्रदूषण, दुर्लक्ष आणि नैसर्गिक आपत्ती यांमुळे अनेक वारसा स्थळांना धोका निर्माण झाला आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI), युनेस्को आणि शासन विविध योजना राबवून या स्थळांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करत आहेत. शाश्वत आणि जबाबदार पर्यटन ही काळाची गरज आहे.

**ऐतिहासिक वारसा स्थळांपुढील आव्हाने**

1) वाढती लोकसंख्या व अति पर्यटन

2) प्रदूषण व पर्यावरणीय ऱ्हास

3) अपुरी देखभाल व निधीची कमतरता

4) जनजागृतीचा अभाव

5) नैसर्गिक आपत्ती व हवामान बदल

6) संवर्धनासाठी निधीची कमतरता

7) प्रदूषण आणि अतिक्रमणामुळे वारसास्थळांचे नुकसान

8) पर्यटकांची वाढती संख्या आणि व्यवस्थापनातील त्रुटी

9) स्थानिक पातळीवर जनजागृतीचा अभाव

या समस्या सोडवल्या नाहीत तर वारसा जतन करणे कठीण होऊ शकते. या आव्हानांवर मात करण्यासाठी शासन, स्थानिक प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांचे परिणामकारकरीत्या संवर्धन करण्यासाठी वारसा संवर्धनासाठी कठोर कायदे व अंमलबजावणी**

1) पर्यटक शिक्षण आणि जबाबदार पर्यटन

2) आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे संरक्षक उपाय

3) स्थानिक समुदायांचा सहभाग

4) स्वच्छता, सुविधा आणि सुरक्षेची पातळी उंचावणे

या उपाययोजना अत्यावश्यक आहेत.

**ऐतिहासिक वारसा स्थळे आणि शिक्षण**

ऐतिहासिक वारसा स्थळे विद्यार्थ्यांसाठी जिवंत शिक्षणाचे साधन आहेत. पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष स्थळभेटीमुळे इतिहास अधिक समजण्यास मदत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी आवड, जाणीव आणि संवर्धनाची भावना निर्माण होते.

**निष्कर्ष:-**

1. पर्यटनामुळे या वारसा स्थळांचे जतन व संवर्धन करण्यास मदत होते, तसेच स्थानिक लोकांना रोजगार व आर्थिक स्थैर्य मिळते. यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन देशाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. त्याचबरोबर, वारसा स्थळांचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, कारण ही स्थळे केवळ भूतकाळाची आठवण नसून भावी पिढीसाठी अमूल्य ठेवा आहेत.
2. भारतीय पर्यटनाचे खरे सौंदर्य ऐतिहासिक स्थळांत दडलेले आहे. ही स्थळे आपल्या भूतकाळाची साक्ष देतात आणि भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत ठरतात. त्यामुळे पर्यटनाच्या वाढीसोबतच या वारशाचे संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सुव्यवस्थित, शाश्वत आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील पर्यटनामुळेच भारताचे ऐतिहासिक वैभव जगासमोर तेजाळत राहील. म्हणूनच, शाश्वत आणि जबाबदार पर्यटनाच्या माध्यमातून भारतीय पर्यटनाचा विकास करताना ऐतिहासिक वारसा स्थळांचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. असे केल्यास भारताची सांस्कृतिक ओळख जागतिक स्तरावर अधिक दृढ होईल आणि देशाचा गौरव अधिक वाढेल.
3. पर्यटन म्हणजे व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनापासून दूर जाऊन नवीन स्थळांना भेट देणे, तेथील निसर्ग, संस्कृती, इतिहास आणि जीवनशैली अनुभवणे. भारतातील पर्यटन धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, वैद्यकीय आणि साहसी अशा विविध प्रकारांमध्ये विभागलेले आहे. यामध्ये ऐतिहासिक पर्यटनाला विशेष महत्त्व आहे, कारण भारताचा इतिहास आणि वारसा जगभर प्रसिद्ध आहे.
4. भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळे हे एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. ऐतिहासिक वारसा स्थळांमुळे भारतीय पर्यटन समृद्ध झाले असून पर्यटनामुळे या स्थळांचे जतन व संवर्धन शक्य झाले आहे. ही स्थळे केवळ भूतकाळाची आठवण नसून वर्तमान आणि भविष्याची जबाबदारी आहेत. त्यामुळे शाश्वत पर्यटनाचा अवलंब करून ऐतिहासिक वारसा स्थळांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. असे केल्यास भारताची सांस्कृतिक ओळख जागतिक स्तरावर अधिक दृढ होईल आणि देशाचा सर्वांगीण विकास साधता येईल.

**संदर्भ:**

1. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI), भारतातील संरक्षित स्मारके व वारसा स्थळे, नवी दिल्ली.
2. युनेस्को (UNESCO), World Heritage Sites in India, UNESCO Publications, Paris.
3. भारत सरकार, पर्यटन मंत्रालय, India Tourism Statistics, नवी दिल्ली.
4. देशपांडे, ग. प., भारतीय संस्कृती आणि वारसा, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
5. जोशी, म. रा., भारतीय इतिहास आणि पर्यटन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
6. कुलकर्णी, स. ना., भारतीय स्थापत्यकला आणि ऐतिहासिक स्मारके, कॉन्टिनेंटल प्रकाशन, दिल्ली.
7. Government of India, Incredible India Campaign Documents, Ministry of Tourism, New Delhi.
8. ASI & UNESCO संयुक्त अहवाल, Heritage Conservation and Sustainable Tourism in India.
9. पाटील, व्ही. डी., पर्यटन भूगोल, प्रशांत प्रकाशन, औरंगाबाद.
10. शिंदे, आर. बी., शाश्वत पर्यटन आणि वारसा संवर्धन, ओरिएंट ब्लॅकस्वान, हैदराबाद.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीमधील प्रसारमाध्यमांचा सहभाग

**डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे**
प्रोफेसर आणिसंशोधन मार्गदर्शक, वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**Manuscript ID:** JRD -2026-180146
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 188-192
January 2026
**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:***

*महाराष्ट्र राज्याला समृद्ध ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यटन वारसा लाभलेला आहे. अजिंठा–वेरूळ लेणी, किल्ले, तीर्थक्षेत्रे, समुद्रकिनारे, निसर्गरम्य स्थळे व ग्रामीण पर्यटन स्थळे ही राज्याच्या पर्यटनाची प्रमुख आकर्षणे आहेत. तथापि, अनेक महत्त्वपूर्ण पर्यटन स्थळांविषयी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पुरेशी माहिती व जनजागृती झालेली दिसून येत नाही. अशा परिस्थितीत पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीसाठी प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांची ओळख करून देताना वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी, रेडिओ व डिजिटल माध्यमे या प्रसारमाध्यमांचा लोकजागृतीमधील सहभाग अभ्यासला आहे. वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करून प्रसारमाध्यमांचे कार्य, मर्यादा व जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या आहेत. अभ्यासातून असे आढळून येते की पर्यटनाच्या प्रचंड शक्यता असूनही प्रसारमाध्यमांकडून पर्यटन स्थळांच्या सातत्यपूर्ण व सखोल लोकजागृतीकडे अपेक्षित प्रमाणात लक्ष दिले जात नाही. त्यामुळे पर्यटन विकास, स्थानिक रोजगारनिर्मिती व सांस्कृतिक वारशाचे संवर्धन यासाठी प्रसारमाध्यमांनी अधिक सक्रिय, नियोजनबद्ध व जबाबदार भूमिका घेण्याची आवश्यकता आहे, असा निष्कर्ष या शोधनिबंधातून मांडण्यात आला आहे.*

***मुख्यशब्द:*** *महाराष्ट्र पर्यटन, पर्यटन स्थळे, लोकजागृती, प्रसारमाध्यमे, पर्यटन विकास, जनसंवाद.*

## प्रस्तावना:

महाराष्ट्राला मोठा, समृद्ध जगप्रसिद्ध ऐतिहासिक वारवा मिळालेला आहे. येथे अजिंठा वेरूळ या जगप्रसिद्ध लेण्या वसलेल्या दिसतात. त्यामागे पवित्र प्रेमाची भावना जगभरातील पर्यटकांमध्ये प्रतिबिंबित होते. अफाट शक्तीचे प्रदर्शन करीत असलेले गड- किल्ले, पर्वत शिखरे, दऱ्या, खोरे, तळे, धबधबे नद्या, अभयराण्ये, थंड हवेची ठिकाणे, तीर्थक्षेत्रे, मंदिरे, पार्क, वाडे संपूर्ण जगाला पर्यटनासाठीची भुरळ घालतात. गाव, खेड्यातील मंदिरे, जत्रा, यात्रा ग्रामीण जनतेच्या जीवन जगण्याचा आधारस्तंभ बनलेले आहेत. जगणे समृद्ध, आनंदी करणाऱ्या स्थळांच्या पर्यटनाला जाणे हा एक अविस्मरणीय प्रसंग ठरतो; परंतु अनेक ठीकठिकाणच्या पर्यटन स्थळांविषयी संपूर्ण माहिती, जनजागृती झालेली दिसत नाही. त्यासाठी मोठी शक्ती असलेल्या प्रसारमाध्यमांनी पुढे येण्याची गरज आहे. पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीसाठी प्रसारमाध्यमांनी सक्रिय सहभागी झाले पाहिजे.

## उद्देश:-

1. महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांची माहिती देणे व त्यांचे सर्वांगीण महत्त्व स्पष्ट करून सांगणे.
2. महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीमधील प्रमुख प्रसारमाध्यमांच्या सहभागाची चर्चात्मक मांडणी करणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे, प्रोफेसर आणिसंशोधन मार्गदर्शक, वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*व्यवहारे, . रामानंद . बापुराव . (2026). महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीमधील प्रसारमाध्यमांचा सहभाग. Journal of Research & Development, 18(1(V)), 188–192. https://doi.org/10.5281/zenodo.18480202*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18480202
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

3. महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीसाठी प्रमुख प्रसारमाध्यमांनी करावयाच्या कार्यांची मांडणी करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय "महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीमध्ये प्रसारमाध्यमांचा सहभाग" असा आहे. महाराष्ट्रात अनेक महत्त्वपूर्ण पर्यटन स्थळे आहेत. काहीतर जगप्रसिद्ध आहेत. या पर्यटन स्थळाला भेट देण्यासाठी, ती पाहण्यासाठी पर्यटक परदेशातून येत असतात; परंतु या पर्यटनस्थळांची माहिती अनेक नागरिकांना नसल्याचे दिसून आले आहे. या पर्यटन स्थळांची माहिती देणे हे प्रसारमाध्यमांचे प्रमुख कार्य आहे. त्यासाठी लेखक, पत्रकार तयार झाले पाहिजेत.

महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पर्यटन स्थळांना ऐतिहासिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक अशा अनेक दृष्टिकोनातून खूप मोठे महत्त्व आहे. हे सांगण्याचा थोडक्यात प्रयत्न या शोधनिबंधाद्वारे केलेला आहे.

लोकजागृतीसाठी प्रसारमाध्यमे अत्यंत महत्वपूर्ण असतात. प्रसारमाध्यमांचे प्रमुख कार्य 'लोकजागृती करणे' हे असते. अनेक विषयांवर प्रसारमाध्यमे सातत्याने लोकजागृतीचे कार्ये करीत असतात. परंतू; महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांच्या बाबतीत ते किती, कशी आणि केव्हा लोकजागृती करतात. लोकजागृतीमध्ये प्रसारमाध्यमांचा सहभाग कसा आहे. या संदर्भातील अभ्यास, निरीक्षण मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधाव्दारे केला आहे. अर्थातच महाराष्ट्रातील सर्व प्रमुख प्रसारमाध्यमे महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीमध्ये कमी पुढाकार घेताना दिसून येतात.

नागरिकांच्या आयुष्यातील, जगण्यातील, आनंदातील पर्यटनाचे, पर्यटन स्थळांचे महत्व लक्षात घेतले तर पर्यटन स्थळांच्या लोकजागृतीमधील प्रसारमाध्यमांचा सहभाग वाढला पाहिजे. यासाठी प्रसारमाध्यमांना कृती आराखडा देण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाव्दारे केलेला आहे. त्यासाठी वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. तज्ञांच्या मतांचा, त्यांनी मांडलेल्या विचारांचा आधार घेतलेला असून लेखकाने, संशोधकाने स्वत:-ची मते, अनुभव, निरीक्षणे, दृष्टिकोन, अभ्यास, सत्य, सद्य परिस्थिती इत्यादींच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**संकल्पना:**

1) पर्यटन स्थळे:- पर्यटन हा शब्द इंग्रजीत Tourism या शब्दापासून आला आहे. या शब्दाचे मूळ Tour हा शब्द आहे. Tour म्हणजे प्रवास (Journey) होय. प्रा.व्ही.एस. हर्मन यांच्या मते "एखाद्या देशात किंवा शहरात परदेशी व्यक्तिंचे आगमन होऊन भ्रमंती करणे व परत स्वगृही जाणे म्हणजे पर्यटन होय. या भ्रमंतीत तो निरनिराळी ठिकाणे पाहतो व आनंद घेतो." याचा अर्थ पाहण्यासारखी, भेट देण्यासारखी, आनंद देणारी प्रसिध्द आणि मोठी स्थळ ठिकाणे म्हणजे पर्यटन स्थळे होय.
2) लोकजागृती:- सर्व प्रकारच्या संपूर्ण लोकांना, नागरिकांना, संपूर्ण माहिती देऊन त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करणे.
3) प्रसारमाध्यमे:- जनसंपर्क, लोकसंचार किंवा जनसंवाद माध्यम ज्यामध्ये वृत्तपत्रे (Newspapers), दुरचित्रवाणी (Television), रेडिओ (Radio), डिजिटल प्लॅटफॉर्म (Social Media) यासारखी माध्यमें ही प्रसारमाध्यमे एकाच वेळी मोठया आणि विस्तीर्ण पसरलेल्या जनसमुदायांपर्यंत माहिती पोहोचवतात.

**महाराष्ट्रातील प्रमुख पर्‌यटन स्थळ:-**

छत्रपती संभाजीनगरपासून जवळ असलेल्या वेरूळ, अजिंठा लेण्या जगप्रसिध्द आहेत. येथे भारतातील आणि परदेशातील पर्यटक भेटी देतात. अजिंठा लेणी छत्रपती संभाजीनगर शहरापासून सुमारे 103 कि.मी. दूर आहे. तेथे पोहोचण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे विमानतळ आहे. इण्डिया गेट, चौपाटी, मरीन ड्राइव्ह, छत्रपती शिवाजी टर्मिनस मुंबई येथे आहे. इस्कॉन मंदिर, बूट हाऊस, कमला नेहरू पार्क, शेर सफारी पार्क आणि इतर काही पर्यटन स्थळे मुंबईच्या आसपास आहेत. शनिवारवाडा पुणे येथे आहे. शिर्डी येथे साईबाबा मंदिर आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, उदगीर, कोल्हापूर, नळदुर्ग येथे किल्ले आहेत.

लोणावळा, गौताळा, खंडाळा, महाबळेश्वर, गणपतीपुळे, देहु, आळंदी, त्र्यंबकेश्वर, थेवूर, तोरणमाळ, पंढरपूर, पैठण, भिमाशंकर, माहूर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, गोरेगाव, शिखर शिंगणापूर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन, सोमनाथ, सौताडा, सिंहगड, सिध्दटेक, सिंधुदुर्ग, पन्हाळा, सहस्तकुंड, सप्तशृंगगड, सज्जनगड, शेगाव, शिवनेरी, विशालगड, म्हैसमाळ, माथेरान, भंडारदरा, पाचगणी, नेवासा, नांदेड, नळदुर्ग, नागझिरा, तूळजापूर, चिखलदरा, कोल्हापूर, अक्कलकोट, अलिबाग अशी कितीतरी पर्यटन स्थळे आहेत. महाराष्ट्राला लाभलेला 720 कि.मी.चा समुद्रकिनारा पर्यटनाला आकर्षित करतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**महाराष्ट्रातील प्रमुख प्रसारमाध्यमे:-**

1) वृत्तपत्र (Newspaper) :- महाराष्ट्राच्या राजधानीतून मुंबईतून लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, नवाकाळ, लोकमत, सकाळ, सामना, नवशक्ती, केसरी, मुंबई समाचार, पुण्यनगरी, द टाइम्स ऑफ इंडिया, मुंबई मीरर, मिड डे, हिंदुस्थान टाइम्स, इकॉनॉमिक टाइम्स, द इंडियन एक्सप्रेस, द फ्री प्रेस जनरल जनसत्ता, नवभारत टाइम्स, भास्कर, जागरण, द बॉम्बे, हेरॉल्ड, पुढारी, प्रहार, दिव्य मराठी, तरुण भारत, देशोन्नती, नवभारत ही प्रमुख वृत्तपत्रे मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतून प्रकाशित होतात. गुजराती उर्दू पंजाबी आदी भाषेतून प्रकाशित वृत्तपत्रे देखील आहेत. मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, अमरावती, जळगाव, नाशिक या महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमधून अनेक वृत्तपत्रे प्रकाशित होतात. लोकसत्ता एक्सप्रेस ग्रुप महाराष्ट्र टाइम्स टाइम्स ग्रुप, लोकमत, सकाळ, पुण्यनगरी, तरुण भारत या मराठी भाषेतील वृत्तपत्राच्या सर्वत्र आवृत्या आहेत.
2) दूरचित्रवाणी (Television Channels):- एबीपी माझा, झी २४ तास, न्यूज 18, लोकमत, पुढारी न्युज, एनटीडीटी मराठी, लोकशाही मराठी, साम टीव्ही, जय महाराष्ट्र, टीव्ही 9 मराठी, डी डी सह्याद्री या प्रमुख वृत्तवाहिन्या (न्यूज चॅनल) आहेत. त्या सर्व एअर टू फ्री आहेत. उपग्रहामार्फत आपले थेट प्रक्षेपण करतात. जवळपास 17 तास सतत बातम्या प्रसारण (ब्रॉडकास्टिंग) करतात.
3) रेडिओ (Radio) :- महाराष्ट्र, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, अमरावती, नांदेड, कोल्हापूर, अकोला, सांगली, बीड, मालेगाव, जळगाव, बीड, धुळे, अहिल्यानगर, सातारा, चंद्रपूर, ब्रह्मपुरी, परभणी, बुलढाणा, गोंदिया, जालना, अकोला, रत्नागिरी, शिर्डी, नाशिक, यवतमाळ, धाराशिव, वर्धा, यवतमाळ, बारामती, गडचिरोली येथे रेडिओ केंद्र आहेत. ही सर्व रेडिओ केंद्र सरकारच्या माहिती आणि प्रसारण खात्यामार्फत प्रसारभारती मार्फत चालविले जातात. मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव येथे एफएम केंद्र आहेत. रेडिओ मिर्ची नाशिक, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथे आहे. हे खाजगी (प्रावेट) एफ.एम. केंद्रे असून टाइम्स ग्रुपतर्फे चालविली जाते. रेड एफएम रेडिओ सिटी, बिग एफएम, फेअर एफ.एम. ही काही आणखीन खाजगी एफ.एम. रेडिओ केंद्र आहेत.
4) डिजिटल माध्यमे (Digital Platform):- यु टयूब, फेसबुक, इंस्टाग्राम, टिक टोक, ट्विटर, स्नॅपचॅट, व्हाट्सअप, टेलिग्राम, क्रेडिट लिंकिंग या डिजिटल प्लॅटफॉर्मवर माहिती छायाचित्रे बातमीपत्र शेअर करता येतात. युट्युबचा आधार घेऊन कितीतरी न्युज चैनल सुरू झालेली आहेत. सोशल मीडियाची मोठी चलती आहे.

**पर्यटन स्थळांच्या जनजागृतीसाठी प्रसारमाध्यमांचा सहभाग:-**

प्रसारमाध्यमे लोकशिक्षण करीत असतात. नागरिकांमध्ये जनजागृती घडवून आणतात. विविध प्रश्नांवर, समस्यांवर उपाय सुचवतात नागरिकांचे मनोरंजनही करीत असतात. थोडक्यात, लोकशाहीमध्ये प्रसारमाध्यमांचे कार्य हे जबाबदारीचे तसेच अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्वांगीण विकासाची एकूण जबाबदारी प्रसारमाध्यमांची आहे. पर्यटन हे मानवाला जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. ते सुख, समाधान, आनंद प्रदान करते. आर्थिक सुबत्तता प्रदान करते. रोजगार मिळवून देते. या दृष्टिकोनातून विचार केला असता प्रसारमाध्यमांची पर्यटन स्थळांच्या जनजागृतीसाठीची, विकासासाठीची जबाबदारी वाढते म्हणून प्रसारमाध्यमांनी पर्यटन स्थळांच्या जनजागृतीसाठी विशेष आणि सातत्याने प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रसारमाध्यमांनी स्वतःला पर्यटन स्थळाच्या जनजागृतीसाठी झोकून दिले पाहिजेत. संपूर्णपणे सहभागी झाले पाहिजे.

लोकांचे राहणीमान, आर्थिक सुबत्ता, तंत्रज्ञानात झालेला विकास, प्रसारमाध्यमातून पर्यटन स्थळांची जगभर होणारी जाहिरात, पर्यटनाच्या अद्यावत सोयी, उपग्रही व दळणवळण, इंटरनेट व संगणकामुळे जगातल्या कोणत्याही ठिकाणाची क्षणार्धात मिळणारी माहिती व त्यामुळे होणारा संपर्क या कारणांमुळे पर्यटन व्यवसाय अत्यंत गतिमान झाला आहे. जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेमुळे पर्यटन व्यवसायाच्या प्रगतीचे चक्र गतिमान झाले आहे. मागील काही वर्षात पर्यटन उद्योगाची प्रचंड वाढ घडून आली आहे. तुलनेत प्रसारमाध्यमे पर्यटनाच्या लोकजागृतीसाठी फारशी पुढे येताना दिसत नाहीत.

इ.स. 2006 मध्ये महाराष्ट्र शासनाने नवीन पर्यटन धोरण तयार केले. पर्यटनाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विविध धोरणे तयार केली. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्थापन केले. या महामंडळमार्फत प्रसारमाध्यमांना जाहिराती दिल्या जातात; परंतु प्रसारमाध्यमांनी बातम्या, वृत्तलेखाच्या माध्यमातून पर्यटनाबद्दलची सविस्तर माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे ती कमी प्रमाणात आढळून येते. पर्यटन स्थळी येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढावी यासाठी सर्वच प्रसारमाध्यमे परिपूर्ण माहिती देताना फारशी

आढळत नाही. पर्यटन स्थळी उभारावयाच्या मूलभूत सुविधांबद्दल, रस्ते, वीज, पाणी याबद्दल गांभीर्याने सविस्तर बातम्या, वृत्तलेख प्रकाशित प्रसारित, प्रक्षेपित करताना आढळत नाहीत. या प्रश्नांचा पाठपुरावा (Followup) करताना आढळत नाहीत. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातील गावागावात प्राचीन शिल्पकलेची साक्ष देणारे समृद्ध ऐतिहासिक वारसा सांगणारी मंदिरे, शिल्प, वारूळ, मुर्त्या आढळतात. त्यांचे जतन झाले पाहिजे. यासाठी ग्रामीण पत्रकार कमी पडतात. त्यांना प्रसारमाध्यमातील संपादक, वृत्त संपादक फारसे सहकार्य करीत नाहीत असे दिसून येते.

महाराष्ट्राला समृद्ध पर्यटनाचा मोठा वारसा लाभलेला आहे पर्यटन स्थळांना मोठा इतिहास आहे. तीर्थस्थळी लोक समर्पित होतात आयुष्याचे कल्याण झाल्याचे मानतात. या पवित्र भावनेने येणाऱ्या पर्यटकांना राहण्याची, जेवणाची, पूजा, प्रार्थना करण्याची सुविधा मोफत दिल्या पाहिजे; परंतु चित्र या उलट दिसून येते. पंढरपूरच्या आषाढी, कार्तिकीच्या वारीत ग्रामीण भागातील पर्यटक, भक्त जीव मुठीत धरून चेंगराचेंगरीला सामोरे जात विठोबाचे दर्शन घेतात. त्यांच्या असुविधांबद्दल प्रसारमाध्यमांमध्ये काहीही लिहिले, बोलले जात नाही. कमी अधिक प्रमाणात सर्व धार्मिक पर्यटनस्थळी मोठ्या असुविधा आहेत. याबद्दल प्रसारमाध्यमे फारसे लक्ष देताना आढळत नाहीत. पर्यटन, धार्मिक स्थळांचा इतिहास शौर्याचा, रंजक आहे. उदा. अजिंठा लेण्यातील रॉबर्ट आणि पारो यांची अमर प्रेमकथा, शिर्डीच्या साईबाबांचे बालपण गेलेल्या सेलू (जिल्हा परभणी) येथील माहिती. अशी अनेक उदाहरणे आहेत. याबद्दलची माहिती वेळोवेळी देऊन प्रसारमाध्यमे, त्यांचे पत्रकार, वार्ताहार, बातमीदार पर्यटनस्थळांच्या जनजागृतीसाठी फारसे सहभागी होताना दिसत नाहीत. त्यामुळे ग्रामीण जनतेच्या जगण्याचा आधार असलेली ग्रामदैवते, ऐतिहासिक परंपरा, आठवणी काळाच्या पडद्याआड जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**पर्यटन स्थळांच्या जनजागृतीसाठी प्रसारमाध्यमांसाठी कृती आराखडा:-**

पर्यटन हा आजच्या काळातील आपल्या सर्वांच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. सर्व लोक आपापल्या आर्थिक क्षमतेनुसार पर्यटनाला जातात. गावातला गुराखीदेखील आपल्या वेशीबाहेर असलेल्या ग्रामदेवताची पूजा अर्चा करून चटणी भाकरीची पार्टीद्वारे पर्यटनाचा आनंद लुटतो. या बाबी प्रसारमाध्यमांनी आपल्या बातमी, वृत्तलेख, स्टोरी, व्हिडिओ बाईट, टेलीफिल्म, शॉर्ट फिल्म अशा विविध घटकांमध्ये घेतल्या पाहिजेत. प्रसारमाध्यमांनी आता महानगरांकडून गावाकडे वळण्याची गरज वाटते. पर्यटन स्थळाच्या जनजागृतीसाठी प्रसारमाध्यमांनी खालील गोष्टी कराव्यात असे वाटते.

1) पर्यटन पत्रकारितेचे पत्रकारांना, वार्ताहरांना प्रशिक्षण द्यावे.
2) पर्यटनस्थळे पर्यटनातील समस्यांबद्दल सतत बातम्या, वृत्तलेख प्रकाशित कराव्यात.
3) पर्यटनस्थळाच्या समस्येबद्दलच्या बातम्याचा वृत्तलेखांचा पाठपुरावा करावा.
4) संपादक, वृत्त संपादक, स्टोरी हेड यांनी पत्रकारांच्या पर्यटनविषयक जनजागृतीच्या बातम्यांना, वृत्तलेखांना प्राधान्य द्यावे.
5) पर्यटन स्थळांची माहिती देणारे छायाचित्रे, वृत्तलेख, फोटो फीचर, सातत्याने प्रकाशित करावेत.
6) पर्यटन स्थळी आवश्यक त्या सर्व मूलभूत सुविधा उभारण्यासाठी स्थानिकांचा सहभाग वाढवण्याच्या योजना, कार्यक्रम, उपक्रम, मोहिमा याबद्दल लोकजागृती करावी.
7) पर्यटकांना स्थळांवर येण्यासाठी व स्थळावरून परत जाण्यासाठी सुरक्षित व वेगवान रस्ते उभारण्यासाठीच्या, विकसित करण्यासाठीच्या बातम्या वृत्तलेख प्रकाशित करावेत.
8) पर्यटकांसाठी तसेच तिथल्या सर्वांसाठी नियमावली तयार करावी त्याबद्दल लोक जागृती करावी.
9) पर्यटनस्थळांचे सुशोभीकरण करण्यासाठी लोकजागृती करावी.
10) पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा उपाययोजनाबद्दल लोकजागृती करावी.
11) पर्यटक माहिती व मदत केंद्र स्थापन करण्यासाठी योजना तयार करून प्रभावीपणे राबवण्यासाठी लोकजागृती करावी
12) पर्यटन स्थळाचा तिथल्या माहितीचा ठराविक आणि आवश्यक तेवढ्या कालावधीत सातत्याने प्रचार, प्रसार करावा.
13) पर्यटन स्थळी येणाऱ्या, मुक्कामी राहणाऱ्या पर्यटकांना अल्प किमतीमध्ये जेवण हॉटेल सुविधा पुरवण्यासाठी लोकजागृती करावी. त्यासाठी दानशूर, सेवाभावी, समाजसेवी लोकांना प्रोत्साहित, प्रेरित करावे. याबद्दलच्या बातम्या, वृत्तलेख प्रकाशित करावेत.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**समारोप:-**

भारतातील दुर्गम आणि मागासलेल्या राज्यांमध्ये रोजगार निर्मिती, आर्थिक विकासासाठी पर्यटन हा सर्वात मोठा उद्योग असल्याचे मत नियोजन आयोगाच्या पंचवार्षिक योजनेत नोंदवले गेले आहे महाराष्ट्रातील सर्व विभाग अति मागासलेले आणि अतिदुर्गम नाहीत, तरीही सर्वच पर्यटन स्थळी अनेक उद्योग व्यवसाय विकसित झालेले दिसून येतात. यामध्ये आणखीन नियोजनबद्ध वाढ होण्याची गरज आहे त्यासाठी प्रथम पर्यटन स्थळांच्या विकासाची, तिथल्या सोयीसुविधा निर्माण करून वाढवण्याची नितांत आवश्यकता आहे या कामी महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमांचा सहभाग मोलाचा आणि महत्त्वाचा ठरेल.

**संदर्भ ग्रंथसूची:-**

1) योजना मासिक, मुख्यसंपादक, सोनम थारगे, अंक 20, वर्ष 37, मे 2010 पृष्ठ 12.
2) महाराष्ट्र पर्यटन रोड ॲटलास, इंडियन मैप सर्विस, जोधपुर (राजस्थान)
3) योजना मासिक, मुख्यसंपादक, सोनम थारगे, अंक 10, वर्ष 37, मे 2010 पृष्ठ 12.
4) www.google.com
5) डॉ. समीरण वाळवेकर, आजच्या ठळक बातम्या, राजहंस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, 2009, पृष्ठ 94, 95, 96.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटनामुळे भारतीय शहरी, ग्रामीण आणि आदिवासी समाजात घडून आलेल्या सामाजिक बदलांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा डॉ एस पी ढोले**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगाव जि नांदेड
**Email:** drspdhole1999@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180147
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 193-198
January 2026
**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*पर्यटन हा समाजपरिवर्तनाचा एक प्रभावी घटक असून त्याचा परिणाम भारतीय शहरी, ग्रामीण आणि आदिवासी समाजावर वेगवेगळ्या स्वरूपात झालेला दिसून येतो. पर्यटनाच्या विस्तारामुळे केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि जीवनशैलीविषयक बदलही घडून आले आहेत. शहरी समाजात पर्यटनामुळे आर्थिक व व्यावसायिक गती वाढली आहे. हॉटेल, वाहतूक, करमणूक आणि सेवा क्षेत्राचा विस्तार होऊन रोजगारनिर्मिती झाली आहे. देशी-विदेशी पर्यटकांमुळे शहरी समाज अधिक बहुसांस्कृतिक, सहिष्णु आणि जागतिक दृष्टिकोन असलेला बनला आहे. शहरी जीवनशैलीत आधुनिकता, ग्राहककेंद्रीपणा आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. तथापि, गर्दी, महागाई, प्रदूषण आणि सामाजिक ताण ही आव्हानेही निर्माण झाली आहेत. ग्रामीण समाजात पर्यटनाने विकासाची नवी दारे उघडली आहेत. ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन आणि होम-स्टे यांमुळे गावातच रोजगार उपलब्ध झाला आहे. यामुळे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी झाले असून ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक स्वावलंबी बनली आहे. महिलांचे सक्षमीकरण, शिक्षणाविषयी जागरूकता आणि सामाजिक आत्मविश्वास यात वाढ झाली आहे. लोककला, परंपरा आणि ग्रामीण संस्कृतीला पर्यटनामुळे ओळख मिळाल्याने सांस्कृतिक जतनालाही चालना मिळाली आहे. आदिवासी समाजावर पर्यटनाचा परिणाम अधिक संवेदनशील आहे. पर्यटनामुळे आदिवासी हस्तकला, नृत्य, संगीत आणि पारंपरिक ज्ञानाला बाजारपेठ मिळून उत्पन्नात वाढ झाली आहे. शिक्षण, आरोग्य आणि हक्कांविषयी जागरूकता वाढली असून सांस्कृतिक ओळख बळकट झाली आहे. मात्र, अति पर्यटनामुळे संस्कृतीचे व्यापारीकरण, पर्यावरणीय ऱ्हास आणि सामाजिक शोषणाचे धोकेही संभवतात. एकूणच पर्यटनामुळे भारतीय शहरी, ग्रामीण आणि आदिवासी समाजात विकास, जागरूकता आणि बदल घडून आले आहेत. हे बदल सकारात्मक व दीर्घकालीन राहावेत यासाठी शाश्वत, नियोजित आणि समुदाय-केंद्रित पर्यटनाची आवश्यकता आहे.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन, समाजपरिवर्तन, शहरी समाज, ग्रामीण समाज, आदिवासी समाज, सामाजिक बदल, आर्थिक विकास, सांस्कृतिक परिवर्तन, लोकसंस्कृती, महिलांचे सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती, जीवनशैलीतील बदल, बहुसांस्कृतिकता, स्थलांतर, शाश्वत पर्यटन, समुदाय-केंद्रित पर्यटन, पर्यावरणीय परिणाम, सांस्कृतिक जतन, अतिपर्यटन.*

**प्रस्तावना:**

1. पर्यटन ही आधुनिक समाजातील एक महत्त्वाची व व्यापक संकल्पना आहे. मानवाच्या दैनंदिन जीवनातील एकसुरीपणा दूर करून निसर्ग, संस्कृती, इतिहास आणि विविध जीवनशैलींचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी पर्यटनामुळे मिळते. आज पर्यटन केवळ प्रवास किंवा मनोरंजनापुरते मर्यादित न राहता आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनले आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18480253
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रा डॉ एस पी ढोले, समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगाव जि नांदेड*

**How to cite this article:**
*ढोले, . एस . पी . (2026). पर्यटनामुळे भारतीय शहरी, ग्रामीण आणि आदिवासी समाजात घडून आलेल्या सामाजिक बदलांचा समाजशास्त्रीय अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 193–198. https://doi.org/10.5281/zenodo.18480253*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटन म्हणजे व्यक्तीने आपल्या नेहमीच्या वास्तवस्थानाबाहेर विश्रांती, मनोरंजन, धार्मिक, शैक्षणिक, व्यावसायिक किंवा आरोग्यविषयक कारणांसाठी ठरावीक कालावधीसाठी केलेला प्रवास व वास्तव होय. हा प्रवास तात्पुरता असतो आणि तो नोकरी, उपजीविका किंवा कायमस्वरूपी स्थलांतरासाठी केलेला नसतो. World Tourism Organization (UNWTO) नुसार, एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी केलेला असा प्रवास पर्यटनाच्या कक्षेत मोडतो. पर्यटनाची संकल्पना विविध अंगांनी स्पष्ट करता येते. प्रवासाच्या स्वरूपावरून पर्यटनाचे आंतरिक (देशांतर्गत) आणि आंतरराष्ट्रीय असे प्रकार पडतात. उद्देशाच्या आधारे सांस्कृतिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, शैक्षणिक पर्यटन, व्यावसायिक पर्यटन व साहसी पर्यटन असे प्रकार आढळतात. अलीकडच्या काळात ग्रामीण पर्यटन, पर्यावरणीय पर्यटन (इको-टुरिझम) आणि शाश्वत पर्यटन यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या प्रकारांमुळे स्थानिक समाजाचा सहभाग वाढतो आणि पर्यावरणसंरक्षणालाही चालना मिळते.

पर्यटनाची संकल्पना समजून घेण्यासाठी त्याचे घटक लक्षात घेणे आवश्यक आहे. पर्यटक, पर्यटनस्थळे व आकर्षणे, वाहतूक व्यवस्था, निवासाची साधने (हॉटेल, लॉज, होम-स्टे), तसेच मार्गदर्शक, माहिती केंद्रे, सुरक्षा आणि इतर सेवा हे पर्यटनाचे महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व घटकांच्या समन्वयातूनच पर्यटन उद्योग प्रभावीपणे कार्यरत राहतो. पर्यटनाचे महत्त्व बहुआयामी आहे. आर्थिक दृष्टिकोनातून पर्यटनामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होते, स्थानिक उद्योगांना चालना मिळते आणि विदेशी चलन प्राप्त होते. सामाजिक दृष्ट्या पर्यटनामुळे विविध समाजांमध्ये संपर्क वाढतो, सहिष्णुता व परस्पर समज निर्माण होते. सांस्कृतिक दृष्टिकोनातून लोककला, परंपरा, सण-उत्सव व ऐतिहासिक वारसा यांचे जतन व संवर्धन होते. भौगोलिकदृष्ट्या पाहता, दुर्गम व मागास भागांचा विकास होण्यास पर्यटन कारणीभूत ठरते.

तथापि, पर्यटनाचे काही नकारात्मक परिणामही दिसून येतात. अतिपर्यटनामुळे पर्यावरणीय ऱ्हास, स्थानिक संस्कृतीचे व्यापारीकरण, महागाई, वाहतूक व कचऱ्याच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे आज पर्यटन विकासात शाश्वत व जबाबदार पर्यटनाची गरज अधोरेखित केली जाते. पर्यावरणाचे संरक्षण, स्थानिक लोकांचा सहभाग आणि सांस्कृतिक संवेदनशीलता राखून पर्यटनाचा विकास करणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात पर्यटनाची संकल्पना अधिक गतिमान झाली आहे. ऑनलाइन बुकिंग, डिजिटल माहिती, सामाजिक माध्यमे यांमुळे पर्यटन अधिक सुलभ झाले आहे. अनुभवाधारित पर्यटन, स्थानिक जीवनशैली अनुभवण्यावर भर देणारे पर्यटन आणि शाश्वत विकासाशी सुसंगत पर्यटन ही आधुनिक पर्यटनाची नवी दिशा आहे. अखेर, पर्यटन ही संकल्पना केवळ प्रवासापुरती मर्यादित नसून ती आर्थिक प्रगती, सामाजिक बदल आणि सांस्कृतिक समृद्धी यांचा संगम आहे. योग्य नियोजन, जबाबदार धोरणे आणि शाश्वत दृष्टीकोन स्वीकारल्यास पर्यटन हे राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन ठरू शकते.

**संशोधन पद्धत :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्य सामग्रीचा आधार घेतलेला आहे. प्रत्यक्ष नमुना पाहणी बरोबरच, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, नियतकालिक, इंटरनेट इत्यादी बाबींचा आधार घेतला आहे.

**शोध अध्ययनाचे उद्देश:**

प्रस्तुत शोध अध्ययनाचे पुढील उद्देश निश्चित करता येतील.

१) पर्यटनामुळे शहरी, ग्रामीण व आदिवासी समाजात झालेल्या आर्थिक बदलांचा अभ्यास करणे.
२) पर्यटनाचा सामाजिक रचना व जीवनशैलीवर झालेला प्रभाव विश्लेषित करणे.
३) पर्यटनामुळे सांस्कृतिक जतन व सांस्कृतिक परिवर्तन कसे घडले आहे याचा अभ्यास करणे.
४) ग्रामीण व आदिवासी समाजाच्या विकासात पर्यटनाची भूमिका स्पष्ट करणे.
५) पर्यटनामुळे निर्माण झालेल्या सकारात्मक व नकारात्मक सामाजिक परिणामांचे तुलनात्मक विश्लेषण करणे.
६) शहरी, ग्रामीण व आदिवासी समाजावर पर्यटनाचा वेगवेगळ्या स्वरूपात होणारा परिणाम समजून घेणे.
७) शाश्वत व समुदाय-केंद्रित पर्यटनाच्या माध्यमातून संतुलित सामाजिक विकासाची शक्यता अभ्यासणे.

**शोध अध्ययनाचे गृहीत कृत्ये:**

प्रस्तुत शोध अध्ययनाच्या गृहीतकृत्यांची पुढील प्रमाणे मांडणी केलेली आहे.

१) पर्यटनामुळे शहरी, ग्रामीण व आदिवासी समाजात रोजगाराच्या संधींमध्ये वाढ झाली आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

२) पर्यटनामुळे शहरी समाजात बहुसांस्कृतिकता, आधुनिक जीवनशैली व जागतिक दृष्टिकोन विकसित झाला.

३) पर्यटनामुळे ग्रामीण व आदिवासी समाजात लोकसंस्कृती, परंपरा व सांस्कृतिक ओळखीचे जतन व पुनरुज्जीवन झाले आहे.

४) पर्यटनाच्या प्रभावामुळे महिलांचे सामाजिक-आर्थिक सक्षमीकरण वाढले आहे.

५) अतिपर्यटनामुळे काही भागांत पर्यावरणीय ऱ्हास व सांस्कृतिक व्यापारीकरण वाढले आहे.

६) शाश्वत व समुदाय-केंद्रित पर्यटन राबविल्यास सकारात्मक बदल अधिक संतुलित व दीर्घकालीन ठरतात.

**शोध-अध्ययन विषयाचे महत्त्व:**

पर्यटनामुळे भारतीय शहरी, ग्रामीण व आदिवासी समाजात झालेला बदल यावर आधारित शोध अध्ययनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते:

१) पर्यटनामुळे शहरी, ग्रामीण व आदिवासी समाजाच्या सामाजिक रचनेत आणि जीवनशैलीत मूलभूत बदल घडून येतात.

२) शहरी, ग्रामीण आणि आदिवासी समाजांवर पर्यटनाचा परिणाम वेगवेगळया स्वरूपात कसा होतो.

३) ग्रामीण व आदिवासी समाजाच्या आर्थिक स्वावलंबनात पर्यटनाची भूमिका स्पष्ट होते.

४) पर्यटनामुळे होणाऱ्या सांस्कृतिक जतन व सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करता येतो.

५) पर्यटनाशी संबंधित सामाजिक समस्या व आव्हाने ओळखण्यास मदत होते. उपाययोजना सुचविता येतात.

६) शाश्वत व समुदाय-केंद्रित पर्यटन धोरणांसाठी हे अध्ययन मार्गदर्शक ठरते.

७) समाजशास्त्र, पर्यटनशास्त्र व ग्रामीण-अभ्यास विषयातील विद्यार्थ्यांसाठी हे अध्ययन शैक्षणिक व संशोधनदृष्ट्या अत्यंत उपयुक्त आहे, तसेच धोरणनिर्मितीसाठीही आधारभूत ठरते.

**पर्यटनामुळे शहरी समाजातील बदल:**

शहरी समाज हा आधुनिकतेचा, उद्योगांचा आणि सांस्कृतिक संमिश्रतेचा केंद्रबिंदू मानला जातो. गेल्या काही दशकांत पर्यटनाचा झपाट्याने झालेला विस्तार शहरी समाजाच्या रचनेत, जीवनशैलीत आणि मूल्यव्यवस्थेत मोठे परिवर्तन घडवून आणत आहे. भारतामध्ये ऐतिहासिक शहरे, धार्मिक केंद्रे, औद्योगिक महानगरे आणि सांस्कृतिक राजधानी या सर्व ठिकाणी पर्यटनाचा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. शहरी घडून आलेला बदल म्हणजे आर्थिक व व्यावसायिक परिवर्तन आहे. शहरांमध्ये पर्यटनामुळे हॉटेल व्यवसाय, रेस्टॉरंट्स, वाहतूक सेवा, ट्रॅव्हल एजन्सी, करमणूक उद्योग आणि खरेदी केंद्रांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. यामुळे रोजगाराच्या संधी वाढल्या असून सेवा क्षेत्राला प्रचंड चालना मिळाली आहे. पर्यटनामुळे शहरी अर्थव्यवस्था अधिक सेवा-केंद्रित, स्पर्धात्मक आणि गतिमान बनली आहे.

सामाजिक पातळीवर पर्यटनामुळे शहरी समाजात बहुसांस्कृतिकता आणि जागतिक दृष्टिकोन विकसित झाला आहे. देशी-विदेशी पर्यटकांशी सततच्या संपर्कामुळे विविध भाषा, संस्कृती, परंपरा आणि विचारसरणी यांचा परिचय होतो. यामुळे सहिष्णुता, खुलेपणा आणि स्वीकारशीलता वाढते. शहरी समाज अधिक बहुविध आणि समावेशक बनत असल्याचे चित्र दिसून येते.

पर्यटनाचा प्रभाव शहरी जीवनशैलीवरही स्पष्टपणे जाणवतो. वेळेचे नियोजन, ग्राहकसेवा, स्वच्छता, शिस्त आणि तंत्रज्ञानाचा वापर या बाबींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. खाद्यसंस्कृती, फॅशन, करमणूक आणि विरंगुळयाच्या साधनांत बदल झाले असून शहरी जीवन अधिक वेगवान आणि उपभोगकेंद्रित झाले आहे. सांस्कृतिक दृष्टिकोनातून पर्यटनामुळे शहरी वारसा आणि संस्कृतीचे जतन व पुनरुज्जीवन झाले आहे. ऐतिहासिक इमारती, संग्रहालये, कला दालन, नाट्यगृहे आणि उत्सव यांना पर्यटनामुळे नवे महत्त्व प्राप्त झाले आहे. शहरांमधील सांस्कृतिक कार्यक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचू लागले असून शहरी समाजाला आपल्या सांस्कृतिक ओळखीचा अभिमान वाटू लागला आहे. मात्र, काही ठिकाणी संस्कृतीचे व्यापारीकरण होऊन तिचा मूळ आशय कमी होण्याचा धोका देखील निर्माण झाला आहे.

पर्यटनामुळे शहरी पायाभूत सुविधांमध्ये मोठे बदल झाले आहेत. रस्ते, विमानतळ, रेल्वे स्थानके, सार्वजनिक वाहतूक, स्वच्छता व्यवस्था, डिजिटल सुविधा यांचा विकास पर्यटनाच्या गरजांमुळे झाला आहे. या सुविधांचा फायदा पर्यटकांसोबतच स्थानिक नागरिकांनाही होतो, त्यामुळे एकूणच शहरी जीवनमान उंचावते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटनामुळे शहरी समाजात काही नकारात्मक बदलही घडून आले आहेत. वाढती गर्दी, वाहतूक कोंडी, महागाई, पर्यावरणीय प्रदूषण आणि सामाजिक विषमता या समस्या गंभीर स्वरूप धारण करू शकतात. काही शहरांमध्ये स्थानिक रहिवाशांच्या दैनंदिन जीवनावर पर्यटनाचा ताण वाढल्याचे दिसून येते.

पर्यटनामुळे शहरी समाजात आर्थिक प्रगती, सांस्कृतिक जागरूकता आणि आधुनिक जीवनशैलीचा प्रसार झाला आहे. मात्र हे बदल सकारात्मक व दीर्घकालीन राहावेत यासाठी शाश्वत आणि नियोजित शहरी पर्यटन आवश्यक आहे. पर्यावरणसंरक्षण, स्थानिक समाजाचा सहभाग आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांचा समतोल साधणे अत्यंत महत्त्वाचे आहे.पर्यटन हे शहरी समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन ठरले आहे. योग्य नियोजन आणि जबाबदार धोरणांच्या माध्यमातून पर्यटनामुळे शहरी समाजात घडून आलेले बदल अधिक संतुलित, सर्वसमावेशक आणि टिकाऊ बनविता येऊ शकतात.

**पर्यटनामुळे ग्रामीण समाजातील बदल:**

ग्रामीण समाज हा भारतीय समाजव्यवस्थेचा कणा मानला जातो. शेती, निसर्गाशी जवळीक, परंपरा, लोकसंस्कृती आणि सामूहिक जीवनपद्धती ही ग्रामीण समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. अलीकडच्या काळात पर्यटनाचा विस्तार ग्रामीण भागात होत असून त्यामुळे ग्रामीण समाजात लक्षणीय आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि जीवनशैलीविषयक बदल घडून येत आहेत. भारतामध्ये ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन आणि होम-स्टे संकल्पनांमुळे ग्रामीण समाजाच्या विकासाला नवी दिशा मिळत आहे.

पूर्वी ग्रामीण समाज प्रामुख्याने शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून होता. पर्यटनाच्या आगमनामुळे होम-स्टे, स्थानिक खाद्यपदार्थ, हस्तकला विक्री, मार्गदर्शक सेवा, लोकनृत्य-लोकसंगीत कार्यक्रम यांसारख्या नव्या उत्पन्नाच्या संधी निर्माण झाल्या आहेत. यामुळे ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढले असून आर्थिक स्थैर्य प्राप्त होत आहे. पर्यटनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था एकाच व्यवसायावर अवलंबून न राहता बहुविध व सक्षम बनत आहे.

पर्यटनाचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे गावातच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने तरुण पिढी शहरांकडे जाण्याऐवजी स्थानिक स्तरावरच काम करू लागली आहे. सामाजिक पातळीवर पर्यटनामुळे ग्रामीण समाजात जागतिक व आधुनिक दृष्टिकोनाचा विकास होत आहे. स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, वेळेचे नियोजन आणि सेवाभाव यांविषयी जागरूकता निर्माण झाली आहे. महिलांचे सक्षमीकरण हा या प्रक्रियेतील महत्त्वाचा बदल आहे. स्वयं-सहायता गट, होम-स्टे व्यवस्थापन आणि स्थानिक उत्पादनांच्या विक्रीत महिलांचा सहभाग वाढल्याने त्यांचे सामाजिक स्थान अधिक बळकट झाले आहे.

सांस्कृतिक दृष्टीने पर्यटनामुळे ग्रामीण समाजात लोकसंस्कृतीचे जतन व पुनरुज्जीवन होत आहे. लोकनृत्य, लोकसंगीत, सण-उत्सव, पारंपरिक कला व हस्तकला यांना पर्यटनामुळे नवे व्यासपीठ मिळाले आहे. ग्रामीण लोकांना आपल्या सांस्कृतिक ओळखीचा अभिमान वाटू लागला आहे. मात्र, अति पर्यटनामुळे संस्कृतीचे व्यापारीकरण होण्याचा धोका देखील निर्माण होऊ शकतो. पर्यटनाचा प्रभाव पायाभूत सुविधांवरही दिसून येतो. रस्ते, वीज, पाणीपुरवठा, स्वच्छता, दळणवळण आणि आरोग्यसेवा यामध्ये सुधारणा झाल्या आहेत. या सुविधा पर्यटनासाठी उभारल्या असल्या तरी त्यांचा थेट लाभ स्थानिक ग्रामीण समाजालाच होतो.

पर्यटनामुळे ग्रामीण समाजात काही नकारात्मक बदलही संभवतात. नैसर्गिक संसाधनांवर ताण, वाढती महागाई, पारंपरिक शेतीकडे दुर्लक्ष आणि जीवनशैलीतील अति बदल यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच पर्यटनाचा विकास नियोजनबद्ध आणि संतुलित असणे अत्यावश्यक आहे.योग्य नियोजन आणि स्थानिक लोकांच्या सक्रिय सहभागातून पर्यटन हे ग्रामीण समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते.

**पर्यटनामुळे आदिवासी समाजातील बदल:**

आदिवासी समाज हा भारतीय समाजरचनेचा एक अत्यंत महत्त्वाचा व संवेदनशील घटक आहे. निसर्गाशी सुसंगत जीवनशैली, परंपरागत ज्ञान, सांस्कृतिक वैशिष्ट्ये आणि सामूहिक जीवनपद्धती ही आदिवासी समाजाची ओळख आहे. भारतामध्ये पर्यटनाचा विस्तार होत असताना त्याचा प्रभाव आदिवासी समाजावरही पडत आहे. पर्यटनामुळे आदिवासी समाजात सकारात्मक तसेच नकारात्मक असे दोन्ही प्रकारचे बदल घडून येऊ शकतात.

आदिवासी पर्यटनाच्या माध्यमातून हस्तकला, पारंपरिक दागिने, नृत्य-संगीत, लोककला, जंगल उत्पादने आणि मार्गदर्शक सेवा यांना बाजारपेठ उपलब्ध होत आहे. यामुळे आदिवासी कुटुंबांचे उत्पन्न वाढते. आर्थिक स्वावलंबनाची प्रक्रिया सुरू होते. पर्यटनामुळे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था केवळ उपजीविकेपुरती मर्यादित न राहता बाजाराभिमुख बनू लागते. सामाजिक पातळीवर पर्यटनामुळे बाह्य जगाशी संपर्क वाढतो. पर्यटक, स्वयंसेवी संस्था आणि प्रशासकीय यंत्रणांशी संपर्क आल्याने आदिवासी समाजात शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि हक्कांविषयी जागरूकता निर्माण होते. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष वाढते आणि आधुनिक सुविधांची ओळख होते. या प्रक्रियेमुळे आदिवासी समाज अधिक आत्मविश्वासी व जागरूक बनतो.

सांस्कृतिक दृष्टिकोनातून पर्यटनाचा प्रभाव दुहेरी स्वरूपाचा आहे. एकीकडे पर्यटनामुळे आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन होते. पारंपरिक नृत्ये, वाद्ये, पोशाख, उत्सव आणि कला यांना प्रसिद्धी मिळते. आदिवासी समाजाला आपल्या सांस्कृतिक ओळखीचा अभिमान वाटू लागतो. मात्र दुसरीकडे, अति पर्यटनामुळे संस्कृतीचे व्यापारीकरण होण्याचा धोका निर्माण होतो. काही परंपरा केवळ पर्यटकांच्या करमणुकीपुरत्या मर्यादित राहण्याची शक्यता असते, ज्यामुळे त्यांच्या मूळ अर्थाला धक्का बसू शकतो.

पर्यटनामुळे आदिवासी समाजाच्या जीवनशैलीतही बदल दिसून येतात. पारंपरिक जीवनपद्धतीत आधुनिक साधनांचा वापर वाढतो. पोशाख, आहार, दैनंदिन सवयी यांत बदल होतात. हे बदल काही प्रमाणात विकासाचे द्योतक असले, तरी अति प्रभावामुळे सांस्कृतिक विस्थापनाचा धोका निर्माण होऊ शकतो. पर्यावरणाच्या दृष्टीने आदिवासी पर्यटन अत्यंत संवेदनशील आहे. आदिवासी समाज निसर्गाशी घट्ट जोडलेला असल्याने पर्यटनामुळे पर्यावरणीय ऱ्हास झाला तर त्याचा थेट परिणाम त्यांच्या जीवनावर होतो. जंगलतोड, कचरा, पाण्याचे प्रदूषण यामुळे आदिवासी उपजीविकेवर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच येथे शाश्वत व पर्यावरणपूरक पर्यटनाची नितांत गरज आहे.

पर्यटनामुळे आदिवासी समाजात आर्थिक संधी, सामाजिक जागरूकता आणि सांस्कृतिक ओळख यांसारखे सकारात्मक बदल घडून येऊ शकतात. मात्र योग्य नियोजनाअभावी पर्यटन हे शोषण, संस्कृतीचा ऱ्हास आणि पर्यावरणीय संकट निर्माण करू शकते. त्यामुळे आदिवासी समाजासाठी समुदाय-केंद्रित, नियंत्रित आणि शाश्वत पर्यटन राबविणे अत्यावश्यक आहे.

**शोध अध्ययनाचे निष्कर्ष:**

प्रस्तुत शोध अध्ययनाच्या निष्कर्षाची पुढीलप्रमाणे मांडणी करण्यात आलेली आहे.

१) पर्यटनामुळे शहरी, ग्रामीण आणि आदिवासी समाजात आर्थिक विकासाला गती मिळत आहे.

२) ग्रामीण व आदिवासी भागात पर्यटनामुळे स्थानिक पातळीवर स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्याने शहरांकडे होणारे स्थलांतर काही प्रमाणात कमी झाले आहे.

३) शहरी समाजात पर्यटनामुळे बहुसांस्कृतिकता, आधुनिक जीवनशैली, जागतिक दृष्टिकोन विकसित झाला.

४) ग्रामीण समाजात पर्यटनामुळे सामाजिक जागरूकता, शिक्षणाचे महत्त्व आणि महिलांचे सक्षमीकरण वाढले.

५) आदिवासी समाजात पर्यटनामुळे सांस्कृतिक ओळख, आत्मसन्मान आणि पारंपरिक कला-कौशल्यांना नवी मान्यता मिळत आहे.

६) पर्यटनामुळे लोककला, परंपरा, सण-उत्सव आणि सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन होण्यास मदत झाली.

७) पर्यटन विकासामुळे रस्ते, दळणवळण, स्वच्छता, आरोग्य व इतर पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाल्या.

८) अतिपर्यटनामुळे काही ठिकाणी पर्यावरणीय ऱ्हास, महागाई आणि संस्कृतीचे व्यापारीकरण यांसारख्या नकारात्मक परिणामांचीही नोंद आढळते.

९) शाश्वत, नियोजित आणि समुदाय-केंद्रित पर्यटन राबविल्यास पर्यटनामुळे होणारे सामाजिक बदल अधिक संतुलित, सकारात्मक आणि दीर्घकालीन ठरू शकतात.

**शोध अध्ययनाच्या शिफारशी:**

भारतात पर्यटन व समाज परिवर्तनाच्या अभ्यासाच्या आधारे पुढील शिफारशी मांडता येतात:

१) पर्यटन विकास करताना शाश्वत पर्यटन धोरणे प्रभावीपणे राबवावीत.

२) शहरी, ग्रामीण व आदिवासी समाजासाठी समुदाय-केंद्रित पर्यटन प्रोत्साहित करावे.

३) ग्रामीण व आदिवासी भागात स्थानिकसाठी कौशल्यविकास व प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.

४) आदिवासी पर्यटन विकसित करताना सांस्कृतिक संवेदनशीलता व आदिवासी हक्कांचे संरक्षण अनिवार्य करावे, जेणेकरून संस्कृतीचे व्यापारीकरण व शोषण टाळता येईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

५) शहरी पर्यटन केंद्रांमध्ये गर्दी व्यवस्थापन व पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा विकसित कराव्यात.

६) ग्रामीण पर्यटनाला शेती, हस्तकला व स्थानिक उत्पादनांशी जोडून एकात्मिक विकास साधावा.

७) पर्यटनस्थळी स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व पर्यावरणजागरूकता कार्यक्रम सक्तीचे करावेत.

८) पर्यटनाच्या सामाजिक परिणामांचे नियमित मूल्यमापन करणे बंधनकारक करावे.

९) स्थानिक भाषा, परंपरा व लोकसंस्कृतीचे जतन करणाऱ्या पर्यटन उपक्रमांना प्राधान्य द्यावे.

**संदर्भसूची:**

१) बर्वे इरावती, ‘भारतीय समाज: रचना आणि परिवर्तन’, पुणे, पॉप्युलर प्रकाशन, २०१०.

२) भोसले रमेश, ‘पर्यटनशास्त्र: संकल्पना आणि विकास’, औरंगाबाद, विद्या प्रकाशन, २०१५.

३) जाधव शरद, ‘ग्रामीण समाजशास्त्र’, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, २०११.

४) पाटील अंजली, ‘पर्यटन आणि समाजपरिवर्तन’, नाशिक, प्रशांत पब्लिकेशन, २०१८.

५) गायकवाड विलास, ‘आदिवासी समाज: संस्कृती आणि विकास’, नागपूर, साकेत प्रकाशन, २०१४.

६) सरकार भारत सरकार, ‘पर्यटन धोरण अहवाल’, नवी दिल्ली, पर्यटन मंत्रालय, २०१७.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटनाचा सांस्कृतिक प्रभाव

**प्रा. परमेश्वर नारायणराव वांगकर**
परभणी
**Email:** pwangkar555@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180148
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 199-202
January 2026
**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश (Abstract):***

*पर्यटन हा केवळ आर्थिक उपक्रम न राहता सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन घडविणारा एक महत्त्वाचा घटक ठरला आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये पर्यटनाचा स्थानिक समुदायांच्या सांस्कृतिक संरचनेवर होणारा प्रभाव सैद्धांतिक व विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून अभ्यासण्यात आला आहे. या संशोधनासाठी गुणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून दुय्यम माहिती स्रोतांमध्ये शैक्षणिक संशोधन लेख, शासकीय अहवाल, सांख्यिकीय माहिती व संबंधित साहित्याचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासातून असे निदर्शनास येते की पर्यटनामुळे सांस्कृतिक देवाणघेवाण, पारंपरिक कला-हस्तकलेचे पुनरुज्जीवन, सांस्कृतिक ओळखीचे संवर्धन व जागतिक स्तरावर स्थानिक संस्कृतीचे सादरीकरण घडून येते. तथापि, अनियंत्रित पर्यटन विकासामुळे संस्कृतीचे व्यापारीकरण, सांस्कृतिक एकसुरीकरण, स्थानिक मूल्यव्यवस्थेचा ऱ्हास व सामाजिक तणाव यांसारखे नकारात्मक परिणामही दिसून येतात. त्यामुळे पर्यटन विकास आणि सांस्कृतिक संरक्षण यांमध्ये संतुलन राखण्यासाठी शाश्वत, समुदाय-केंद्रित व सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील पर्यटन धोरणांची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक असल्याचे या संशोधनातून अधोरेखित होते.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन, सांस्कृतिक प्रभाव, सांस्कृतिक परिवर्तन, शाश्वत पर्यटन, स्थानिक समुदाय, सांस्कृतिक वारसा.*

## प्रस्तावना:

मानवाच्या भ्रमंतीची प्रवृत्ती ही आदिम काळापासून अस्तित्वात आहे. आधुनिक काळात वाहतूक व दळणवळणाच्या साधनांच्या विकासामुळे पर्यटनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटन केवळ आर्थिक उत्पन्नाचे साधन नसून ते विविध संस्कृतींमधील संपर्काचे माध्यम आहे. त्यामुळे पर्यटनाचा थेट परिणाम स्थानिक समाजाच्या सांस्कृतिक रचनेवर होतो. पर्यटनामुळे विविध संस्कृती, परंपरा आणि समाज यांचा परस्पर संपर्क वाढतो. या संपर्कातून सांस्कृतिक देवाणघेवाण घडते. भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, ऐतिहासिक घटकांचा पर्यटनाच्या विकासावरही परिणाम होतो. कोणत्याही प्रदेशातील पर्यटन केंद्राचा विकास होण्यासाठी तेथील भौगोलिक परिस्थिती कारणीभूत असते. ज्या प्रदेशांमध्ये पर्यटनाचा विकास झालेला आहे त्या प्रदेशांमध्ये पर्यटनाचे परिणाम दिसून येतात. त्यामध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय परिणाम होतात. त्यापैकी आपण पर्यटनाचा सांस्कृतिक प्रभाव कशा पद्धतीने होतो ते पाहुयात :

## संशोधनाची उद्दिष्टे:

1. पर्यटनामुळे स्थानिक संस्कृतीवर होणाऱ्या सकारात्मक परिणामांचा अभ्यास करणे.
2. पर्यटनामुळे उद्भवणाऱ्या सांस्कृतिक नकारात्मक परिणामांचे विश्लेषण करणे.
3. सांस्कृतिक संवर्धनात पर्यटनाची भूमिका स्पष्ट करणे.
4. शाश्वत पर्यटनाच्या दृष्टीने सांस्कृतिक संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. परमेश्वर नारायणराव वांगकर, परभणी*

**How to cite this article:**
*वांगकर, . परमेश्वर . नारायणराव . (2026). पर्यटनाचा सांस्कृतिक प्रभाव. Journal of Research & Development, 18(1(V)), 199–202. https://doi.org/10.5281/zenodo.18480307*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18480307
OPEN ACCESS

**संशोधन पद्धती:** या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. दुय्यम माहिती स्त्रोतांमध्ये पुस्तके, संशोधन निबंध, शासकीय अहवाल, मासिके व विश्वसनीय संकेतस्थळांचा उपयोग करण्यात आला आहे.

**भारतातील पर्यटनाचा सांस्कृतिक प्रभाव:**

संस्कृती म्हणजे एखाद्या समाजाची जीवनशैली, श्रद्धा, परंपरा, कला, भाषा आणि मूल्यव्यवस्था. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक संस्कृतीचे जागतिकीकरण होते. पर्यटक स्थानिक संस्कृतीचा अनुभव घेतात, तर स्थानिक समाज बाह्य संस्कृतीच्या प्रभावाखाली येतो.

भारतामध्ये धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन मोठ्या प्रमाणावर आढळते. अजिंठा-वेरूळ, ताजमहाल, वाराणसी, पंढरपूर यांसारख्या स्थळांमुळे भारतीय संस्कृतीला जागतिक ओळख मिळाली आहे. मात्र अति-पर्यटनामुळे काही ठिकाणी सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्या आहेत. भारत हा विविधतेने नटलेला देश असून येथे धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन मोठ्या प्रमाणावर आढळते. ताजमहाल, अजंठा-एलोरा, वाराणसी, जयपूर, गोवा इत्यादी पर्यटनस्थळांवर पर्यटनामुळे स्थानिक संस्कृतीवर प्रभाव पडलेला दिसून येतो. काही ठिकाणी सांस्कृतिक संवर्धन झाले असले तरी काही ठिकाणी पारंपरिक मूल्यांवर विपरीत परिणाम झाला आहे. पर्यटनाचे सामाजिक जीवनावर बरेवाईट परिणाम होत असतात. पर्यटक हे देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले असतात त्यामुळे त्यांच्या भागातील वेगवेगळ्या जीवन पद्धती, चालीरिती, भाषा, वागणे इत्यादीचा नाही म्हटले तर स्थानिक समाजावर प्रभाव पडतो. परदेशातून येणारे पर्यटक तर सर्वच बाबतीत भिन्न असतात त्यांचा ही सामाजिक जीवनावर परिणाम होतो. पर्यटनामुळे सामाजिक व सांस्कृतिक बदलाची प्रक्रिया सुरू होते. या बदलाचा वेग मंद असतो. त्यातील काही ठळक परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील

**पर्यटनाचे सांस्कृतिक सकारात्मक परिणाम:**

**1. सांस्कृतिक वारशाचे संवर्धन:** ऐतिहासिक स्मारके, धार्मिक स्थळे, किल्ले, संग्रहालये यांचे जतन व संवर्धन पर्यटनामुळे होते. धार्मिक पर्यटन हे पर्यटनाचे एक महत्त्वाचे अंग आहे. अनेक पर्यटक धार्मिक स्थळांना भेटी देतात. या धार्मिक स्थळी धर्माची शिकवण देणारी भजने, कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम होतात. यातून सहिष्णुता शिकवली जाते. सर्व भाविक पर्यटक एकत्र येऊन धार्मिक उसावात सहभागी होतात त्यामुळेच धार्मिक स्थळाचा विकास होतो.

**2. लोककला व हस्तकलेला प्रोत्साहन:** पर्यटनामुळे लोककला, हस्तकला, नृत्य, संगीत यांना प्रोत्साहन मिळते. तसेच स्थानिक लोककला, नृत्य, संगीत, हस्तकला यांना बाजारपेठ मिळते व कलाकारांना रोजगार उपलब्ध होतो.

**3. सांस्कृतिक देवाणघेवाण:** पर्यटक व स्थानिक लोक यांच्यातील संवादामुळे सांस्कृतिक समज वाढते व सहिष्णुता निर्माण होते. विविध देशांतील व प्रदेशांतील लोकांच्या संपर्कामुळे संस्कृतींची देवाणघेवाण होते. पर्यटन ठिकाणांकडे जर पाश्चिमात्त्य देशाचे पर्यटक आले तर त्याठिकाणी मागासलेल्या विचाराचे पर्यटक सुधारलेल्या विचाराकडे आकर्षित होतात त्यामुळेच पर्यटकांमध्ये सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढीस लागून सांस्कृतिक विकास घडून येतो.

**4. सामाजिक परिवर्तन घडते:** पर्यटनाचा हा सर्वात मोठा सामाजिक परिणाम दिसून येतो. पर्यटनाच्या निमित्ताने देशाच्या व जगाच्या वेगवेगळ्या भागातून वेगवेगळ्या धर्माचे, पंथाचे, जातीचे लोक येतात त्या प्रत्येकाचे सामाजिक आचरण भिन्न प्रकारचे असते. सुधारलेले लोक आले की त्यांच्याबरोबर विविध सुधारित विचारप्रवाह येऊ लागतात व त्यांचा परिणाम असा होतो की स्थानिक लोकांच्या जगण्यात बदल होतो जुने विचार मागे पडून नव्या विचारांची निर्मिती होऊन सामाजिक परिवर्तन घडून येते.

**5. सामाजिक ऐक्य निर्माण होते:** पर्यटन केंद्राला भेट देणारा पर्यटक धर्म, पंत, समाज विसरून एकत्र पर्यटनाचा आनंद लुटत असतो. पर्यटन केंद्राच्या ठिकाणी एकमेका सहाय्य करू अशा भावनेने पर्यटक वागतात. एखादा पर्यटक अडचणीत सापडला तर बाकीचे अनोळखी पर्यटक सुद्धा मदतीला धावतात यातूनच सामाजिक ऐक्याची भावना वाढीस लागते.

**6. देशाची एकात्मता वाढीस लागते:** पर्यटनातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागते कारण पर्यटन केंद्राच्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रांतातील लोक एकत्र येतात त्यांची भाषा, त्यांचा धर्म, त्यांची जात वेगळी असते परंतु पर्यटन केंद्राच्या ठिकाणी एक मानव जात म्हणून हे लोक एकमेकाशी वर्तन करतात. आपापल्या प्रांताची वैशिटे सांगून आपण सर्व एकाच देशाचे नागरिक आहोत हे दाखवून देतात. एका विशिष्ट सांस्कृतिक कार्यक्रमात सर्व जण सहभागी होऊन राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवितात यातून देशाच्या एकात्मतेची भावना वाढीस लागते.

**7. शैक्षणिक विकास होतो:** बरेचसे पर्यटक सुशिक्षित व उच्च आर्थिक गटातील असतात त्यांचा स्थानिक लोकांवर प्रभाव पडतो, पर्यटकांच्या सहवासामुळे स्थानिक लोकांना शिक्षणाबद्दल आवड निर्माण होते यातूनच स्थानिकांचा शैक्षणिक विकास घडून येतो

**पर्यटनाचे सांस्कृतिक नकारात्मक परिणाम:**

**1. सामाजिक संघर्ष निर्माण होतात:** पर्यटनामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. पर्यटक एका वयोगटाचे नसतात यामध्ये तरुण, हौशी पर्यटकांची संख्या जास्त असते. काही पर्यटक तर केवळ मौजमजा, दंगा करण्यासाठीच पर्यटन स्थळी येत असतात. इतर पर्यटकांची

टिंगल करणे, मुलीची छेड काढणे, उघड्यावर नाचणे, मोठ्या आवाजात गाणी वाजवणे, मद्यपान करणे, स्थानिकांना त्रास देणे इत्यादी गोष्टीतून सामाजिक शांतता भंग पावते त्यामुळे पर्यटक आणि स्थानिक लोक यांच्यात संघर्ष निर्माण होतात.

**2. सांस्कृतिक व्यापारीकरण:** पर्यटनामुळे परंपरा व सण-उत्सव केवळ पर्यटकांच्या मनोरंजनासाठी सादर होण्याचा धोका वाढतो.

**3. सांस्कृतिक प्रदूषण:** पर्यटनामुळे बाह्य संस्कृतीच्या प्रभावामुळे स्थानिक भाषा, वेशभूषा व परंपरा लुप्त होण्याची शक्यता असते.

**4. सामाजिक मूल्यांतील बदल:** पर्यटनामुळे पारंपरिक जीवनपद्धतीत बदल होऊन सामाजिक असंतुलन निर्माण होऊ शकते.

**5. गुन्हेगारी वाढीस लागते:** पर्यटन केंद्राच्या ठिकाणी देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो पर्यटक येतात त्यांना पर्यटन केंद्राची फारशी माहिती नसते त्यांचा गैरफायदा घेऊन काही गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांना लुटण्याचा प्रयत्न करतात. काही वेळा हे गुंड लोक तरुणीवर अत्याचार करतात. चोऱ्या, दंगल, मध्यपान, जुगार इत्यादी अवैद्य प्रवृत्तीमुळे पर्यटन केंद्र जवळ गुन्हेगारी वाढत आहे.

**शाश्वत पर्यटन व सांस्कृतिक संरक्षण:**

जगामध्ये आज पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय बनलेला आहे, हजारो पर्यटक भारतात पर्यटन ठिकाणांना भेटी देत असतात. या पर्यटकांमुळे पर्यावरणाचाही ऱ्हास होत आहे. हा पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून पर्यटन भूगोलात पर्यटनाचा शाश्वत विकास ही संकल्पना अभ्यासली जात आहे. शाश्वत पर्यटन ही संकल्पना सांस्कृतिक वारशाचे संरक्षण व विकास यामध्ये संतुलन राखण्यावर भर देते. स्थानिक समुदायांचा सहभाग, सांस्कृतिक नियमांचे पालन व जबाबदार पर्यटन यामुळे नकारात्मक परिणाम टाळता येऊ शकतात. स्थानिक समुदायाचा सहभाग, सांस्कृतिक नियमांचे पालन, व जबाबदार पर्यटन धोरणे राबविल्यास सांस्कृतिक वारशाचे संरक्षण होऊ शकते.

शाश्वत विकास म्हणजे आपल्या वर्तमानातील गरजा पूर्ण करताना आपल्या पुढील पिढ्यांच्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न येऊ देता साध्य केलेला विकास होय. शाश्वत विकास म्हणजे पृथ्वीवरील संसाधनांचा उपयोग करून आपला विकास करताना पुढील पिढ्यांच्या विकासासाठी संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करणे होय. शाश्वत विकास या शब्दात नैसर्गिक आणि मानवनिर्मित संसाधनांचा जपून आणि योग्य तितका वापर करणे अपेक्षित आहे. जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक संसाधने आज मोठ्या प्रमाणात आणि अनियंत्रितपणे वापरली जात आहेत. आपल्या येणाऱ्या पिढ्यांचा विचार करून जी मर्यादित संसाधने आहेत त्यांचा नियंत्रित वापर शाश्वत विकासात अपेक्षित आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या नवीकरणक्षम ऊर्जास्रोतांचा जास्तीत जास्त वापर शाश्वत विकासाचा पाया आहे. अनियंत्रित इंधनउपसा, जंगलतोड, अनिर्बंध जलउपसा आणि वापर, औद्योगिकीकरण आणि लोकसंख्यावाढ, प्रदूषण या सर्वांमुळे शाश्वत विकासाला बाधा निर्माण होते. शाश्वत विकासात माणसांबरोबरच पृथ्वीवरील इतर जीवसृष्टीचाही विचार केला जातो. माणूस हा पृथ्वीवरील एका साखळीचा भाग आहे, त्या साखळीच्या मर्यादा लक्षात घेऊनच त्याची वागणूक असली पाहिजे हा याचा मुख्य उद्देश आहे.

शाश्वत पर्यटन म्हणजे वर्तमान व भावी पिढीला स्वच्छ व सुंदर प्रदूषित न होता पर्यटन स्थळ राखून ठेवणे. शाश्वत पर्यटन करताना पर्यावरणामध्ये होणारा त्रास लक्षात घेऊन नवनवीन योजना चा वापर करून पर्यटन स्थळे प्रदूषित होण्यापासून वाचवली जातात. महाराष्ट्रातील पर्यटनाला चालना देत असतानाच पर्यावरण संरक्षण ही व्हावे यासाठी जागतिक पर्यटन दिनानिमित्त, महाराष्ट्र पर्यटन मंडळ आणि शाश्वत पर्यटनाच्यादृष्टीने दिशेने वाटचाल सुरू केली आहे. मंडळाच्या काही रिसॉर्टवर आता रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प तर काही ठिकाणी बायो डिजास्टर )टॉयलेट( बसवण्याचे काम सुरू आहे. जागतिक पर्यटन संस्थेने या टुरिझम एनर्जी पॉवरिंग सस्टेनेबल डेव्हलपमेंट ही संकल्पना निश्चित केलेली आहे. यानुसार जगभरातील पर्यटन मंडळ आणि शाश्वत ऊर्जा आणि पर्यटनाला चालना द्यावी असे आवाहन संस्थेने केले आहे. महाराष्ट्र पर्यटन मंडळांनीही याची दखल घेतली असून आगामी वर्षात राज्यातील विविध रिसॉर्टवर पर्यावरण पूरक सुविधा सुरू केल्या जाणार आहेत. रिसॉर्टच्या भौगोलिक रचनेनुसार काही ठिकाणीं सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून यासाठी )मेढा( सहकार्य करणार आहे. बायो टॉयलेटला आम्ही विशेष प्राधान्य देत असून सध्या अक्कलकोट आणि धारागिरी च्या लेण्या जवळील रिसॉर्ट मध्ये या प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. याशिवाय ज्या भागात पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात जाणवतो अशा रिसॉर्टच्या जागेत रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प उभारण्याचे नियोजन केले जात आहे. शाश्वत पर्यटनाविषयी जागृती करण्यासाठी मंडळाने ग्रिनी द ग्रेट हे नवीन कार्टून विकसित केले असून मंडळाचा ब्रँड अॅम्बेसिडर म्हणून ग्रिनी काम करणार आहे. ग्रिनीचा सहभाग असलेले रिस्पॉन्सिबल टुरिझमचे धडे देणारे लघुपटही तयार करण्यात आले आहेत. मंडळाच्या वेबसाईटवर हे लघुपट प्रदर्शित केले आहेत.

थोडक्यात पर्यटन स्थळे भविष्यात वाचवण्यासाठी शाश्वत विकासाकडे डोळे उघडे ठेवून बघणे गरजेचे आहे. पर्यटन स्थळाचे संवर्धन करण्यासाठी पुढील ठळक वैशिष्ट्याकडे लक्ष द्यावे लागेल.

**ठळक वैशिष्ट्ये:**

1. पर्यटकांनी कोठेही गेल्यानंतर आपण केलेला कचरा कचरापेटीत टाकावा.

2. ऐतिहासिक पर्यटन स्थळी गेल्यानंतर आपण तेथे आपली नावे कोरण्याचा मोह टाळावा.

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

3. पर्यावरण स्नेही वाहतूक साधनाचा वापर करावा जसे आग्रा येथे विजेवर चालणाऱ्या रिक्षा.
4. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी लोकांनी अस्वच्छता टाळावी.
5. जिथे आपण पर्यटनाला जातो तेथील संस्कृतीची चेष्टा करू नये.
6. पर्यटन स्थळाचा शाश्वत विकास करण्यासाठी पर्यटनस्थळी सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा प्रकल्प यांसारख्या अपारंपारिक ऊर्जास्रोतांचा वापर करावा.
7. शाश्वत पर्यटना मधून किल्ल्याचे संवर्धन करावे.
8. पर्यटनस्थळी बायो टॉयलेट प्रकल्प उभा करावेत.

**निष्कर्ष:**

पर्यटनाचा सांस्कृतिक प्रभाव सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही स्वरूपाचा आहे. म्हणजेच पर्यटन हे एक दुधारी शस्त्र आहे; त्याचे सांस्कृतिक परिणाम व्यवस्थापनावर अवलंबून असतात. योग्य व्यवस्थापन केल्यास, ते संस्कृतीला समृद्ध करते, तर चुकीच्या व्यवस्थापनामुळे संस्कृतीची हानी होऊ शकते. जगामध्ये पर्यटन हा एक आर्थिक उद्योग बनला असला तरीसुद्धा वाढती लोकसंख्या आणि वाढते पर्यटक लक्षात घेऊन भविष्यामध्ये जे काही पर्यटन स्थळे आहेत त्या पर्यटन स्थळे प्रदूषीत होण्याची शक्यता आहे. तरी पर्यटन स्थळाचे संवर्धन व जतन करण्यासाठी, भावी पिढीस पर्यटन स्थळ दाखविण्यासाठी पर्यटनाचा शाश्वत विकास करणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. डॉ. शिंदे एस. बी. )2006(: पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर
2. डॉ. शिंदे सुनिता शंकरराव )2013(: पर्यटन भूगोल, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद
3. डॉ. घारपुरे विठ्ठल )2001(: पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर
4. खतीब के. ए )2006(: पर्यटन भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
5. प्रकाश सावंतः भारताचा भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर
6. प्रा. अ. वि. भागवत )1998(: पर्यटन भूगोल, अश्वमेध प्रकाशन, पुणे
7. दूरशिक्षण केंद्र )2009(: पर्यटन भूगोल, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन व मराठी साहित्य

**प्रा. डॉ. आर. एस. बडूरे**
प्राध्यापक, मराठी विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180149
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 203-205
January 2026
**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:***

*भारतीय पर्यटन व मराठी साहित्य यांचे नाते अत्यंत घनिष्ठ आणि परस्परपूरक आहे. भारताच्या भौगोलिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व धार्मिक वैविध्यामुळे पर्यटनाला मोठे महत्त्व प्राप्त झाले असून त्याचे प्रतिबिंब मराठी साहित्यात विविध साहित्यप्रकारांतून उमटलेले दिसते. मराठी साहित्यामध्ये प्रवासवर्णने, काव्य, कथा, कादंबऱ्या, नाटके आणि लोकसाहित्य यांच्या माध्यमातून पर्यटनाचे बहुआयामी चित्र रेखाटले गेले आहे. संतसाहित्यापासून आधुनिक काळापर्यंत तीर्थयात्रा, निसर्ग, ऐतिहासिक स्थळे, किल्ले, नद्या, गावे व शहरजीवन यांचे चित्रण साहित्यिकांनी केले आहे. प्रवासवर्णनांनी समाजजीवन, लोकसंस्कृती व मानवी अनुभव उलगडले; काव्याने निसर्गसौंदर्याचे भावपूर्ण दर्शन घडवले; तर कथा-कादंबऱ्या व नाटकांनी ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटनाला चालना दिली. अशा प्रकारे मराठी साहित्याने भारतीय पर्यटनाला सांस्कृतिक व भावनिक अधिष्ठान दिले असून पर्यटनामुळे साहित्याला अनुभवांची समृद्धी व विषयवैविध्य प्राप्त झाले आहे.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय पर्यटन, मराठी साहित्य, प्रवासवर्णन, निसर्गचित्रण, सांस्कृतिक पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, लोकसाहित्य, काव्य, कथा-कादंबऱ्या, नाटक, समाज आणि संस्कृती, साहित्यिक प्रतिबिंब.*

**प्रस्तावना :**

भारत हा विविधतेने नटलेला, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक आणि भाषिक दृष्ट्या समृद्ध असा प्रगतशील देश आहे. हिमालयाच्या बर्फाच्छादित पर्वतरांगा, विस्तीर्ण समुद्रकिनारे, घनदाट अरण्ये, वाळवंटे, नद्या, तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक किल्ले, राजवाडे आणि आधुनिक महानगरे – या सर्व घटकांमुळे भारत हा जगातील एक महत्त्वाचा पर्यटनदेश ठरतो. पर्यटन ही केवळ प्रवासाची प्रक्रिया नसून ती अनुभव, संस्कृतीचा साक्षात्कार, मानवी भावभावना आणि साहित्यनिर्मितीचे महत्त्वाचे प्रेरणास्थान आहे. मराठी साहित्यातील पर्यटन विचार हा फक्त स्थळ, काळवर्णनापुरता मर्यादित न राहता समाज, संस्कुती, निसर्ग आणि मानवी अनुभव यांचा विचार मांडणारा एक महत्त्वाचा प्रकार आहे. मराठी साहित्याने भारतीय पर्यटनाचा विविध अंगांनी विचार केला असून प्रवासवर्णने, काव्य, कथा, कादंबऱ्या, नाटके, निबंध आणि लोकसाहित्य यांमधून पर्यटनाचे बहुआयामी चित्र रेखाटले आहे.

**भारतीय पर्यटन : संकल्पना व स्वरूप :**

पर्यटन म्हणजे नुसते एकाद्या भागाला भेट देणे नसून पर्यटन म्हणजे व्यक्तीने आपल्या नेहमीच्या निवासस्थानाबाहेर विश्रांती, ज्ञानप्राप्ती, आरोग्य, मनोरंजन, धार्मिक, शैक्षणिक किंवा व्यावसायिक उद्देशाने केलेला प्रवास होय. भारतीय परंपरेत 'अतिथी देवो भवः' ही भावना असल्यामुळे प्रवाशांचे स्वागत व सत्कार ही संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. भारतीय पर्यटनाचा विचार केल्यास आपणास धार्मिक, निसर्ग, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन असे पर्यटनाचे प्रकार पाहवयास येतात. या सर्व प्रकारांचे प्रतिबिंब आपणांस मराठी साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतीत विविध स्वरूपांत चित्रित केले आहे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. आर. एस. बडूरे, प्राध्यापक, मराठी विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18480376
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*बडूरे, . आर . एस . (2026). भारतीय पर्यटन व मराठी साहित्य. Journal of Research & Development, 18(1(V)), 203–205. https://doi.org/10.5281/zenodo.18480376*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**मराठी साहित्याची परंपरा आणि प्रवासवर्णन :**

मराठी साहित्याची परंपरा ही बाराव्या शतकापासून म्हणजे संतसाहित्यापासून ते आधुनिक काळापर्यंत विस्तृत आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत रामदास, संत जनाबाई इत्यादी संतांनी आपल्या अभंगांतून तीर्थयात्रा, पंढरपूर, आळंदी, देहू यांचे वर्णन केले आहे. ही सर्व वर्णने ही धार्मिक पर्यटनाची आद्य रूपे मानता येतील. मराठीत फार पूर्वीपासून स्थळवर्णने आढळत असली तरी प्रवासवर्णन हा प्रकार आपल्याकडे फारसा प्रचलित नव्हता. ब्रिटिश काळात आधुनिक शिक्षणामुळे प्रवासाची दृष्टी बदलली. या काळात प्रवासवर्णन हा स्वतंत्र साहित्यप्रकार विकसित झाला. गोडसे भटजी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, हरिभाऊ आपटे, लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रवासवर्णनातून देश-विदेशातील स्थळांचे वास्तववादी चित्रण केले आहे.

**मराठी प्रवासवर्णनांमध्ये भारतीय पर्यटन :**

मराठी प्रवासवर्णनांनी भारतीय पर्यटनाला साहित्यिक अधिष्ठान दिले. या लेखनातून केवळ स्थळांचे वर्णन नव्हे, तर तेथील समाजजीवन, लोकसंस्कृती, आर्थिक स्थिती, भाषा व मानसिकता यांचेही दर्शन घडते. पु. ल. देशपांडे यांच्या 'अपुर्वाई' मध्ये युरोप प्रवास असला तरी त्यातून भारतीय मनाची तुलना परदेशी संस्कृतीशी होते. गो.नी. दांडेकर यांनी 'कुणा एकाची भ्रमणगाथा' या प्रवासवर्णनातून नर्मदा नदीच्या काठाचे वर्णन करतांना त्या परिक्रमेत भेटलेले तऱ्हेतऱ्हेचे लोक, नदीची निरनिराळी रूपे तसेच प्रत्येक ऋतुत वेगवेगळ्या रुपात भेटलेल्या निसर्गाचे वर्णन केले आहे. त्याचप्रमाणे भाऊसाहेब पाटणकर, अनंत काणेकर, गंगाधर गाडगीळ, अण्णा भाऊ साठे इत्यादी साहित्यिकांनी आपल्या प्रवासवर्णनांतून भारतातील व विदेशातील विविध प्रदेशांचे चित्रण केले आहे.

**काव्यातील पर्यटन आणि निसर्गचित्रण :**

मराठी काव्यात निसर्ग आणि प्रवास यांचे अतूट नाते आहे. कवी केशवसुत, रे. नारायण वामन टिळक, गोविंदाग्रज, बालकवी, माधव ज्युलियन, कवी यशवंत, साने गुरुजी, कवी गेस, बी. रघुनाथ, नारायण सुर्वे, ना. धों. महानोर, फ.मु. शिंदे, इंद्रजीत भालेराव आदी कवींनी आपल्या कवितांत सह्याद्री, नद्या, गावे, शेतजमीन, डोंगर-दऱ्या, निसर्ग, गड किल्ले आदींचे मनोहारी चित्रण केलेले आढळते. निसर्गकविता ही अप्रत्यक्षपणे निसर्ग पर्यटनाला चालना देणारी ठरते. कवितांमधील स्थळवर्णने वाचकाला त्या जागा प्रत्यक्ष पाहण्याची प्रेरणा देतात.

**कथा व कादंबऱ्यांमधील पर्यटन :**

मराठी कथा व कादंबऱ्यांमध्ये पर्यटन हे पार्श्वभूमी किंवा कथानकाचा अविभाज्य भाग म्हणून दिसते. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतून महाराष्ट्रातील सामाजिक जीवनाचे आणि स्थळांचे दर्शन घडते. नाथ माधव यांनी स्वराज्याचा श्रीगणेशा, स्वराज्याची घटना, स्वराज्याची स्थापना, स्वराज्याचा कारभार, स्वराज्य संकट आदी कादंबऱ्यातून मराठ्यांच्या इतिहासाचे, वेगवेगळ्या स्थळांचे वर्णन केले आहे. रणजीत स्वामी यांच्या 'स्वामी', शिवाजी सावंत यांच्या 'छावा', 'श्रीमान योगी' या ऐतिहासिक कादंबऱ्यांमधून रायगड, प्रतापगड, पन्हाळा यांसारख्या किल्ल्यांचे सजीव चित्र उभे राहते. या साहित्यामुळे ऐतिहासिक पर्यटनाची जाणीव व अभिमान वाढीस लागतो.

**नाटक व लोकसाहित्यातील पर्यटन :**

ज्या नाटकात भूतकाळातील ऐतिहासिक घटना, व्यक्ती, राजकीय सामाजिक परिस्थिती यांचे नाट्यरूपातर केले जाते त्यांना ऐतिहासिक नाटके असे म्हणतात. ऐतिहासिक मराठी नाटकात विष्णुदास भावे, अण्णासाहेब किर्लोस्कर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, राम गणेश गडकरी, वसंत कानेटकर, विजय तेंडूलकर, बाबासाहेब पुरंदरे आदी नाटककारांनी आपल्या नाटकात इतिहास, समाज, संकुतीचे वर्णन केले आहे. मराठी लोकसाहित्य – पोवाडे, ओव्या, भारुडे – यांतून स्थानिक स्थळे, यात्रा, जत्रा, उत्सव यांचे वर्णन आढळते. पोवाड्यांमधील किल्ल्यांचे वर्णन ऐतिहासिक पर्यटनाचे महत्त्व अधोरेखित करते. नाटकांमधूनही शहरजीवन, ग्रामीण भाग, तीर्थक्षेत्रे यांचे चित्रण होताना दिसते.

**निष्कर्ष व समारोप :**

भारतीय पर्यटन आणि मराठी साहित्य यांचे नाते अतूट आहे. पर्यटनाने मराठी साहित्याला विषयवैविध्य, अनुभवांची समृद्धी आणि व्यापक दृष्टिकोन दिला; तर मराठी साहित्याने भारतीय पर्यटनाला सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि भावनिक अधिष्ठान दिले. भविष्यातही हे परस्परसंबंध अधिक दृढ होतील आणि भारतीय सांस्कृतिक ओळख अधिक समृद्ध करतील.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**संदर्भ ग्रंथ :**

1. प्र. न. जोशी : मराठी वांगमयाचा विवेचक इतिहास
2. डॉ. अ. ना. देशपांडे : आधुनिक मराठी वांगमयाचा इतिहास
3. नरहर कुरुंदकर : धार आणि काठ
4. संपा. डॉ. रवींद्र शोभणे : मराठी कविता : परंपरा आणि दर्शन
5. दिगंबर पाध्ये : साहित्य, समाज आणि संस्कृती

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# किल्ले पर्यटन आणि ऐतिहासिक जाणीव

**प्रो.डॉ. नितीन बावळे[1], प्रेमला आश्रोबा माने[2]**
[1,2]इतिहास विभागप्रमुख, शारदा महाविद्यालय, परभणी
**Email:** bawalenitin@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180150
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 206-208
January 2026
**Submitted:** 14 Dec. 2025
**Revised:** 24 Dec. 2025
**Accepted:** 14 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:***

*किल्ले पर्यटन हे ऐतिहासिक पर्यटनाचे एक महत्त्वपूर्ण अंग असून ते समाजात इतिहासाची जाणीव, सांस्कृतिक अभिमान आणि राष्ट्रीय अस्मिता निर्माण करण्याचे कार्य करते. किल्ले हे केवळ दगड–मातीच्या वास्तू नसून ते तत्कालीन राजकीय, सामाजिक, सामरिक आणि स्थापत्य परंपरेचे सजीव साक्षीदार आहेत. महाराष्ट्रातील किल्ले विशेषतः मराठा साम्राज्याच्या शौर्य, पराक्रम आणि कुशल राज्यकारभाराची साक्ष देतात. किल्ले पर्यटनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनुभवाधारित शिक्षण मिळते तसेच इतिहास, भूगोल, समाजशास्त्र आणि स्थापत्यकला यांचा प्रत्यक्ष अभ्यास घडतो. सामाजिक-सांस्कृतिक दृष्टिकोनातून किल्ले पर्यटनामुळे लोककथा, पोवाडे, उत्सव आणि परंपरा यांचे जतन होते, तर आर्थिकदृष्ट्या स्थानिक रोजगारनिर्मिती व पर्यटनविकासाला चालना मिळते. तथापि, अतिक्रमण, कचरा, तोडफोड व संवर्धनाचा अभाव यांमुळे किल्ल्यांचा वारसा धोक्यात आला आहे. म्हणूनच शाश्वत पर्यटन धोरणे, जनजागृती आणि स्थानिक सहभागाच्या माध्यमातून किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यावश्यक आहे.*

***मुख्यशब्द:*** *किल्ले पर्यटन, ऐतिहासिक जाणीव, ऐतिहासिक वारसा, मराठा साम्राज्य, सांस्कृतिक अस्मिता, शैक्षणिक पर्यटन, साहसी पर्यटन, निसर्ग पर्यटन, समाज व संस्कृती, स्थापत्य कला, किल्ले संवर्धन, शाश्वत पर्यटन, स्थानिक रोजगार, ऐतिहासिक स्थळे.*

**प्रस्तावना :-**

माणूस हा जसा समाजशील प्राणी आहे तसाच तो निसर्गप्रेमी सुद्धा आहे. पानाफुलांची सळसळ, वाऱ्याने घातलेली साद, सह्याद्रीच्या कड्या कपाऱ्यांचा मोह, घनदाट जंगल वा खोल समुद्र तळ, आदिवासी लोकांचे कला, सण, उत्सव असो की त्यांच्या हस्तकलेवरील प्रेम, रानमाळावरील फुले किंवा परदेशी प्रवासी पक्षी. यांच्यावरील प्रेमातूनच या सर्व गोष्टी पाहण्यासाठी, अनुभवण्यासाठी या ठिकाणांना भेट देण्यातूनच जी पाऊले पुढे पडत गेली तोच पर्यटनाच्या दिशेने सुरू झालेला मार्गक्रम ठरला असे आपणास म्हणता येईल.

आधुनिक काळातील पर्यटन हा महत्त्वाचा सामाजिक आणि आर्थिक घटक आहे. पर्यटनाच्या अनेक प्रकारापैकी किल्ले पर्यटन हे देखील ऐतिहासिक पर्यटनाचे एक महत्त्वाचे अंग बनले आहे. किल्ले हे नुसते निर्जीव दगड- मातीचे बांधकाम नसून ते तेथील राजकीय व सामाजिक जीवनाचे, शौर्याचे सजीव असे प्रतीक असते. भारतासारख्या पुरातन परंपरा असलेल्या देशात किल्ल्यांना विशेष अशी ओळख व महत्त्व प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर येथील किल्ले मराठा साम्राज्याच्या वैभवशाली, संपन्न इतिहासाची साक्ष देतात. किल्ले पर्यटना मार्फत इतिहासाची ओळख तर होतेच सोबतच समाजामध्ये ऐतिहासिक जाणीवा ही निर्माण होतात. हे येथे अधोरेखित करणे क्रमप्राप्त ठरते.

सर्वप्रथम आपण पर्यटन म्हणजे नेमके काय ते पाहू," एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय."[1]

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18480475
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रो.डॉ. नितीन बावळे, इतिहास विभागप्रमुख, शारदा महाविद्यालय, परभणी.*

**How to cite this article:**
*बावळे, . नितीन ., & माने, . प्रेमला . आश्रोबा . (2026). किल्ले पर्यटन आणि ऐतिहासिक जाणीव. Journal of Research & Development, 18(1(V)), 206–208.* https://doi.org/10.5281/zenodo.18480475

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

असे आपल्याला ढोबळ मानाने म्हणता येईल. "किल्ले हे महाराष्ट्राचे भूषण आहे. महाराष्ट्र हा किल्ल्यांचा प्रदेश आहे. महाराष्ट्रात नांदलेल्या अनेक राजवटीने महाराष्ट्राच्या भूमीमध्ये किल्ले उभारलेले आहेत."[2] किल्ल्यांच्या बांधकामातून बांधकाम तंत्र, नियोजन लक्षात येते. सोबतच त्यांच्याकडे तत्कालीन स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणूनही पाहिले जाते.

**किल्ले: ऐतिहासिक वारसा :-**

किल्ल्यांकडे प्रशासन, संरक्षण, सामरिक व वैयक्तिक राहण्याच्या उद्देशाने बांधलेली एक मजबूत वास्तू म्हणून पाहिले जाते. अगदी प्राचीन काळापासूनच किल्ल्यांचा उपयोग राज्याच्या रक्षणासाठी, शत्रूंवर नजर ठेवण्यासाठी, युद्ध नियोजन व सत्ता टिकवण्यासाठी केला गेलेला आहे. "महाराष्ट्रातील गड, कोट व किल्ले यांना प्रत्येक महाराष्ट्रीयन न चुकता भेट देतो, कारण मराठ्यांचा इतिहास हा या किल्ल्यांचा इतिहास आहे. भौगोलिक पर्यटन स्थळे ज्याप्रमाणे विशिष्ट भौगोलिक महत्त्वामुळे विकसित होतात तसेच ऐतिहासिक स्थळे त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वामुळे विकसित होतात. महाराष्ट्रात अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत आणि ही स्थळे पर्यटकांचे आकर्षण बनलेली असून पर्यटन स्थळे म्हणून प्रसिद्धीस आलेली आहेत."[3]

महाराष्ट्राला "किल्ल्यांची भूमी" म्हणून संबोधल्या जाते. डोंगरी किल्ले, भुईकोट किल्ले आणि जलदुर्ग असे किल्ल्यांचे प्रकार आढळतात. सुमारे साडेतीनशे पेक्षा जास्त किल्ले या महाराष्ट्र भूमीत आहेत. शिवनेरी, रायगड, सिंहगड, तोरणा, प्रतापगड, पन्हाळा, राजगड, विशालगड, पुरंदर, कुलाबा, रोहिडा, रांगणा, पद्मदुर्ग, वज्रगड, तळा, घोसळा हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची व कुशल राज्यकारभाराची साक्ष देतात. रायगड हे स्वराज्याची राजधानी आणि अनेक शिवप्रेमींना आत्मबल देणारे स्थान. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ म्हणून शिवनेरी किल्ल्याला अभूतपूर्व ऐतिहासिक व भावनिक महत्त्व तर प्रतापगडावरील अफजलखानाचा वध. यासर्वच घटना मराठ्यांच्या इतिहासाला वैभव प्राप्त करून देणाऱ्या ठरतात. "दुर्ग निर्मिती आणि त्याचा उपयोग प्राचीन काळापासून जगभर होत आलेला आहे. एकट्या महाराष्ट्रात भौगोलिक रचना लक्षात घेऊन विविध प्रकारचे किल्ले निर्माण केलेली आहेत. गडकोट,किल्ले आणि दुर्ग या नावाने ओळखल्या जाणारी वास्तू ही सर्वच राज्यकर्त्यांची भूराजनैतिक गरज होती. येथे होऊन गेलेल्या अनेक राजवटीने किल्ले स्थापत्य निर्मितीमध्ये आपले योगदान दिलेले आहे. छत्रपती शिवाजीराजेंनी तर किल्ल्यांच्या साह्याने शत्रू पक्षाचे नामोहरण केले आणि आपला गौरवशाली इतिहास रचला आहे."[4] हे सर्व ज्ञात आहे. "किल्ले भविष्यातील पिढीसाठी त्या ठिकाणाचा इतिहास सांगतात जे केवळ महान योद्धे आणि शासकांबद्दलच बोलत नाही तर त्या काळात प्रचलित असलेल्या स्थापत्य शैलीबद्दल देखील बोलतात."[5] या किल्ल्यांमुळेच मराठ्यांचा इतिहास जिवंत झाल्याचा भास आज ही आपणास अनुभवता येतो.

**शैक्षणिक दृष्टिकोनातून किल्ले पर्यटन :-**

किल्ले पर्यटनाचा मुख्य उद्देश पर्यटकांनी ऐतिहासिक किल्ल्यांना भेटी देऊन या भेटीमार्फत किल्ल्यांचा इतिहास जाणून घेणे हा असतो. शिवाय उंचावरची किल्ले चढताना साहस अनुभवने, निसर्ग सौंदर्य न्याहाळणे व आपल्या पूर्वजांच्या शौर्य पराक्रमाचा सांस्कृतिक अभिमान आपल्या मनात जागवणे हा देखील असतो. किल्ले हे समुद्रसपाटी पासून उंच डोंगर माथ्यावर असल्याकारणाने ट्रेकिंग, गिर्यारोहोण या सारख्या साहसी पर्यटनाशीही त्याचा संबंध जोडला गेलेला आहे आणि म्हणूनच किल्ले पर्यटन हे ऐतिहासिक, साहसी व निसर्ग पर्यटनाचे एक मिश्र स्वरूप म्हणून आपल्यासमोर येते. किल्ले "या ऐतिहासिक वास्तूंना भेटी देण्यासाठी आज मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होत असलेली दिसून येते सध्या पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र म्हणून किल्ल्याचे ठिकाण असल्याचे दिसून येते."[6]

विद्यार्थ्यांसाठी किल्ले पर्यटन हे प्रत्यक्ष अनुभवी शिक्षण ठरते. या पर्यटनात विद्यार्थी किल्ल्यांचा इतिहास जाणून घेतो सोबतच तेथील भूगोल, समाजशास्त्र, वास्तुशास्त्र स्थापत्य कलेचा ही जवळून अनुभव घेऊन अभ्यास करीत असतो. अनुभवी व अभ्यासू शिक्षकांसोबत अशी अभ्यासभ्रमंती केल्याने विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची गोडी निर्माण होते व त्यामुळे अध्यापन व अध्ययन दोन्ही परिणामकारक ठरते म्हणूनच शैक्षणिक पर्यटनात किल्ल्याचे स्थान महत्त्वाचे ठरते. ऐतिहासिक स्थळे पर्यटनाला एक वेगळी दिशा देतात त्यामुळे शिक्षण आणि मनोरंजनाचा संगम होतो, असे आपण म्हणू शकतो.

**सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक परिणाम :-**

किल्ले हे महाराष्ट्राच्या सामाजिक तसेच सांस्कृतिक जीवनाचा अतूट असा भाग आहे. किल्ल्यांशी निगडित लोककथा, पोवाडे, शाहिरीपरंपरा यामुळेच इतिहास हा लोक माणसात जिवंत राहिलेला आहे. किल्ले पर्यटनामुळे समाजात सामाजिक व सांस्कृतिक ऐक्य वाढीस लागते. विविध प्रांतात विविध भाषिक लोकांकडून एकाच वेळी किल्ल्यांना भेटी दिल्यामुळे सांस्कृतिक देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात होते. शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यासारख्या उपक्रमामुळे ही गड-किल्ल्यांचे सांस्कृतिक महत्त्व विशेष लक्षणीय ठरते. स्थानिक समाजाने आपले वैशिष्ट्ये व संस्कृती जपलेली असते अशा पर्यटनामुळे स्थानिक संस्कृती व समाज अगदी जवळून पाहता येतो. सोबतच स्थानिक लोकांना रोजगार मिळतो. नुकतेच आपले बारा किल्ले 'युनेस्कोच्या' यादीत आले आहेत. ते पुढील प्रमाणे 1) रायगड (स्वराज्याची राजधानी), 2) राजगड (स्वराज्याची पहिली राजधानी), 3)प्रतापगड (अफजलखानाचे वधस्थळ), 4) पन्हाळा, 5) शिवनेरी (जन्मस्थान), 6) लोहगड, 7) साल्हेर, 8) सिंधुदुर्ग (जलदुर्ग), 9) विजयदुर्ग (जलदुर्ग), 10) सुवर्णदुर्ग (जलदुर्ग ), 11) खांदेरी (सागरी

किल्ला), 12) जिंजी (तामिळनाडू) हे किल्ले जगाच्या नकाशावर आल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रमाला आणि स्वराज्याच्या इतिहासाला जागतिक स्तरावर एक नवीन झळाळी मिळाली आहे. अर्थात हे किल्ले जगाच्या नकाशावर आले आहेत. त्यामुळे आता हे किल्ले पाहण्यासाठी परदेशी पर्यटकही निश्चितच येतील. त्यातून देशाला परकीय चलन मिळेल. स्थानिक लोकांना रोजगारातून आर्थिक हातभार नक्कीच मिळेल. हे किल्ले पर्यटनाचे यश असे आपणास म्हणता येईल.

**किल्ले संवर्धनातील समस्या :-**

अनेकदा लोक किल्ल्यांवर सहलीला आल्यासारखे येतात. सोबत आणलेले सामान, प्लास्टिकच्या बाटल्या, खाद्यपदार्थाचे पाकिटे तेथेच टाकून जातात. काही महाभाग तर आपले नाव गड किल्ल्यांवर लिहून/ कोरुन नवा पराक्रमच गाजवतात. यासोबत अतिक्रमण,तोडफोड,कचरा आणि नैसर्गिक झिज यामुळे ही अनेक किल्ल्यांची दुरावस्था झाली आहे. शासनाची उदासीनता, योग्य व्यवस्थापन व देखभालीचा अभाव यासारख्या समस्या ही मोठ्या प्रमाणात 'आ'वासून उभ्या टाकल्या आहेत. यामुळे ऐतिहासिक किल्ल्यांचा वारसा धोक्यात आला आहे. आपला दैदीप्यमान वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करणे ही आपल्या प्रत्येकाचीच नैतिक जबाबदारी आहे, पण याकडे मुक्तपणे डोळेझाक होताना जरा जास्तच दिसते.

**किल्ले संवर्धनासाठी उपाय :-**

१) किल्ले पर्यटनासाठी येणाऱ्या प्रत्येकासाठी कठोर नियमांची नियमावली अंमलात आणणे.
२) पर्यटकांमध्ये ऐतिहासिक व पर्यावरणीय जागृती निर्माण करणे.
३) स्थानिक लोकांचा किल्ले संवर्धनात सहभाग नोंदवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहणे.
४) स्वयंसेवी व शासकीय संस्थांची किल्ले संवर्धनासाठी स्थानिक लोकांनी मदत घेणे.
५) शाश्वत पर्यटन धोरणाचा अवलंब करणे.
६) डिजिटल मार्गदर्शन, माहिती फलक, ऑडिओ-व्हिज्युअल साधने, आभासी भ्रमंती (visual tour)चा वापर करणे.

**समारोप :-**

किल्ले पर्यटनातून आपण आपला इतिहास परत समजून घेत असतो. या वास्तू आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या, शौर्याच्या गाथा आहेत. ज्या आजपर्यंत टिकवून आपल्यात प्रेरणा, उत्साह व ऊर्जा भरण्याचे काम करीत आहेत. इतिहासाच्या पुस्तकाच्या पानात असणाऱ्या गोष्टी, माणसाच्या मनात जागवण्याचे कार्य हे किल्ले करीत असतात. त्यामुळे आपल्या पुढील पिढ्यांसाठी हा वारसा जपणे आपल्या सर्वांची वैयक्तिक व सामूहिक जबाबदारी आहे.

**निष्कर्ष :-**

१) किल्ले हे प्रेरणास्थान बनवून समाजाला मूल्य शिक्षण देतात.
२) महाराष्ट्रातील किल्ल्यांमुळेच महाराष्ट्राची ओळख, अस्मिता व ऐतिहासिक जाणीव टिकून आहे.
३) किल्ले हे केवळ भूतकाळातील वास्तूंची अवशेष नसून ते मराठा साम्राज्याचे अस्सल साक्षीदार आहेत.
४) किल्ले पर्यटनामुळे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास साध्य होण्यास हातभार लागतो.
५) किल्ले पर्यटनातून त्या ठिकाणची संस्कृती, निसर्ग आणि इतिहास अनुभवता येतो.
६) अर्थव्यवस्था, रोजगाराला चालना मिळते.
७) किल्ले पर्यटनामुळे ऐतिहासिक जाणीव वाढण्यास मदत मिळते.
८) किल्ल्यांचा हा उज्वल वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणे हेच खरे केले पर्यटनाचे मुख्य उद्देश असायला हवे असे लक्षात येते.

**संदर्भ :-**

1) https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AA%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%AF%E0%A4%9F%E0%A4%A8
2) डॉ.जी. एस. पिसे/डॉ. एस. बी. नानवटे(डोल्हारे), पर्यटनशास्त्र, एज्युकेशन पब्लिकेशन हाऊस, एच. ओ.डि1/16, अन्सारी रोड, दर्यागंज, न्यू दिल्ली- 110002,पृ. क्र.15
3) डॉ.आर. एस. कोंडेकर, पर्यटन, अरुणा प्रकाशन,103, ओमकार कॉम्प्लेक्स-अ, खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर, प्रथम आवृत्ती- 8 जानेवारी2018 पृ.क्र.128-129
4) उपरोक्त (2), पृ.क्र.14
5) https://www.researchgate.net/publication/378523490_maharastratila_kille_ani_paryatana_anvesana
6) डॉ. ओमशिवा लिगाडे, डॉ.अरविंद कदम,प्रा. संगमेश्वर साकोळे, पर्यटनशास्त्र, अरुणा प्रकाशन, 103, ओमकार कॉम्प्लेक्स-अ, खर्डेकर स्टॉप, औसा रोड,लातूर, प्रथम आवृत्ती 22 ऑगस्ट 2018 पृ. क्र.53

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांचा वारसा एक चिकित्सक अभ्यास

**संदीप सोमनाथ भेंडेकर**

संशोधक विद्यार्थी

**Email:** sandeepbhendekar@ gmail.com

**Manuscript ID**:

JRD -2026-180151

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(V)

Pp. 209-211

January 2026

**Submitted:** 15 Dec. 2025

**Revised:** 25 Dec. 2025

**Accepted:** 15 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:***

*भारताचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा हा पर्यटन विकासाचा कणा असून तो देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावतो. प्रस्तुत अभ्यासात भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांचा वारसा यांचा चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे. भारतातील किल्ले, मंदिरे, लेणी, राजवाडे आणि स्मारके ही केवळ स्थापत्यकलेची उदाहरणे नसून त्या त्या काळातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचे सजीव दस्तऐवज आहेत. या स्थळांना भेट देण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने येतात, ज्यामुळे परकीय चलनप्राप्ती, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि पर्यटनाशी संबंधित उद्योगांना चालना मिळते. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, युनेस्को यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून वारसा स्थळांचे जतन व संवर्धन केले जात असले तरी वाढते पर्यटन, शहरीकरण व दुर्लक्ष यामुळे अनेक स्थळांना धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे शाश्वत पर्यटन धोरणे राबवून ऐतिहासिक वारशाचे संरक्षण, संशोधन आणि पर्यटन विकास यांचा समतोल साधणे अत्यावश्यक आहे.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय पर्यटन, ऐतिहासिक स्थळे, सांस्कृतिक वारसा, वारसा संवर्धन, पर्यटन विकास, शाश्वत पर्यटन, परकीय चलन, रोजगारनिर्मिती, स्थापत्यकला, सामाजिक व आर्थिक विकास, पुरातत्त्व संशोधन, पर्यटन उद्योग.*

**प्रस्तावना:**

भारताच्या समृद्ध इतिहासातून आणि विविध संस्कृतीतून निर्माण होणाऱ्या पर्यटन क्षेत्राचे महत्त्व, त्याचे आर्थिक आणि सामाजिक फायदे, वारसा स्थळांचे जतन करण्याची गरज, आणि या वारशाचा उपयोग देशाच्या विकासासाठी कसा करता येईल, यावर लक्ष केंद्रित करते. पर्यटन हा आधुनिक जगातील सर्वात वेगाने वाढणारा उद्योग आहे भारतासाठी पर्यटन उत्पन्नाचे साधन असून ते देशाची संस्कृती आणि वारसा जगा समोर मांडण्याचे माध्यम आहे.अतिथी देवो भव ' ही भारताची मूळ संकल्पना पर्यटनाचा पाया आहे.भारत हा प्राचीन संस्कृती आणि समृद्ध इतिहासाचा देश आहे, जिथे भौगोलिक विविधता आणि ऐतिहासिक वारसा मोठ्या प्रमाणात आहे. या वारशाचा अभ्यास करणे आणि तो पर्यटनाशी जोडणे, हे केवळ मनोरंजक नसून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे. हा चिकित्सक अभ्यास, भारताच्या ऐतिहासिक वारशाचे पर्यटनाच्या संदर्भात विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो.

भारत हा जगातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध संस्कृती असलेला देश आहे. "विविधतेत एकता" हे भारताचे सर्वात मोठे वैशिष्ट्य असून, इथला ऐतिहासिक वारसा पर्यटकांना मंत्रमुग्ध करणारा आहे. उत्तरेकडील हिमाच्छादित शिखरांपासून ते दक्षिणेकडील विशाल समुद्रकिनाऱ्यांपर्यंत आणि पश्चिमेकडील वाळवंटापासून ते पूर्वेकडील घनदाट जंगलांपर्यंत भारताचे नैसर्गिक सौंदर्य अफाट आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (MTDC) माध्यमातून या वारशाची माहिती जगभरात पोहोचवली जाते.

भारताचा इतिहास हा हजारो वर्षांचा आहे. सिंधू संस्कृतीपासून ते मौर्य, गुप्त, मराठा आणि मुघल साम्राज्यापर्यंतच्या खुणा आजही किल्ल्यांच्या, मंदिरांच्या आणि लेण्यांच्या रूपाने जिवंत आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18480658

OPEN ACCESS

**Address for correspondence:**

*संदीप सोमनाथ भेंडेकर*, संशोधक विद्यार्थी

**How to cite this article:**

*भेंडेकर, . संदीप . सोमनाथ. (2026). भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांचा वारसा एक चिकित्सक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 209–211. https://doi.org/10.5281/zenodo.18480658*

अजिंठा-वेरूळची लेणी, ताजमहाल, किल्ले रायगड, हंपीचे अवशेष आणि खजुराहोची मंदिरे ही केवळ बांधकामे नसून आपल्या पूर्वजांच्या प्रगत स्थापत्यशास्त्राचा आणि कलेचा तो एक अनमोल ठेवा आहे. या ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी दरवर्षी जगभरातून लाखो पर्यटक भारतात येतात, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) यांसारख्या संस्था या ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि संवर्धन करण्याचे महत्त्वाचे कार्य करत आहेत. अनादिकाळापासून मानवाला पर्यटन करण्याबद्दल प्रचंड कुतूहल असल्याचे प्रकर्षाने दिसून येते. मानवाला गतकालीन ऐतिहासिक घटना, ऐतिहासिक स्मारके, मंदिरे, राजवाडे, घरे, किल्ले, गुहा, लेणी इत्यादी भारताच्या ऐतिहासिक प्राचीन ठेव्याला भेटी देऊन त्या स्थळांबद्दल महत्त्वपूर्ण माहितीचे ज्ञान अर्जित करावे, अशी तीव्र स्वरूपाची जिज्ञासा मानवाच्या मनात प्रामुख्याने आढळून येते.

**भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांची व्याख्या:**

**पर्यटनाचा अर्थ व व्याख्याः**

"पर्यटक या शब्दाला इंग्रजीमध्ये Tourist असे म्हंटले जाते. ज्याचा लॅटिन भाषेमध्ये Tornus असे म्हंटले जाते. पर्यटनाला इंग्रजीमध्ये Tourism असे म्हटले जाते. Tourism हा शब्द १) लॅटिन भाषेतील Tornus या शब्दापासून तयार झाला आहे. Tourn याचा अर्थ Journey / प्रवास असा होतो."[१] थोडक्यात नवीन स्थळासंदर्भातील माहिती घेणे, अभ्यास करणे तसेच आनंद व मनोरंजनासाठी नव्या स्थळांना भेटी देणे या गोष्टींसाठी चालेला प्रवास यामध्ये अंतर्भूत आहे.

आयसेटनुसार, "लोकांनी आपल्या घराबाहेर आपल्या इच्छेनुसार केलेल्या प्रवास म्हणजे पर्यटन होय."

**ऐतिहासिक स्थळांची व्याख्या :**

"ऐतिहासिक स्थळ" म्हणजे अशी जागा किंवा वास्तू जिचा संबंध मानवी इतिहासातील महत्त्वाच्या घटना, व्यक्ती, संस्कृती किंवा वास्तुशिल्पाशी असतो.

**१. युनेस्को (UNESCO) च्या मते:**

युनेस्कोनुसार, "ऐतिहासिक स्थळ म्हणजे अशी जागा जिचे "उत्कृष्ट वैश्विक मूल्य" (Outstanding Universal Value) असते. ही स्थळे मानवी इतिहासातील महत्त्वाचा टप्पा दर्शवणारी वास्तू, स्थापत्य किंवा भूप्रदेश असू शकतात"[२]

**२. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग (ASI):**

भारतीय कायद्यानुसार (AMASR Act, १९५८)," 'प्राचीन स्मारक' किंवा ऐतिहासिक स्थळ म्हणजे अशी कोणतीही वास्तू, शिल्प, शिलालेख किंवा दगडी बांधकाम जे किमान १०० वर्षांपासून अस्तित्वात आहे"[३] आणि ज्याला ऐतिहासिक, पुरातत्व किंवा कलात्मक महत्त्व आहे.

**भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांच्या संशोधनाची उद्दिष्टे :**

भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांच्या संशोधनाची उद्दिष्टे अत्यंत व्यापक आणि बहुआयामी आहेत. भारताचा इतिहास, संस्कृती आणि भूगोल इतका समृद्ध आहे की, त्यातील प्रत्येक घटकाचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते. खाली भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांच्या संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे सविस्तरपणे दिली आहेत.

१. सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करणे. (Preservation and Conservation)

ऐतिहासिक संशोधनाचे प्राथमिक उद्दिष्ट हे प्राचीन स्मारके, किल्ले, मंदिरे आणि लेण्यांचे जतन करणे आहे. काळाच्या ओघात अनेक वास्तूंची झीज होते. संशोधनाद्वारे या वास्तूंचे मूळ स्वरूप, त्यावेळचे स्थापत्यशास्त्र आणि वापरलेले साहित्य यांची माहिती मिळते, ज्यामुळे त्यांचे संवर्धन करणे सोपे जाते. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग (ASI) याद्वारे अशा स्थळांचे रक्षण करते.

२. अज्ञात इतिहासाचा शोध घेणे (Uncovering Unknown History)

भारतात अजूनही अशी अनेक स्थळे आहेत जी काळाच्या पडद्याआड गेली आहेत. उत्खनन आणि संशोधनाद्वारे नवीन ऐतिहासिक पुराव्यांचा शोध घेणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

३. पर्यटनाचा आर्थिक विकास (Economic Development through Tourism)

पर्यटन हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक मोठा कणा आहे. संशोधनामुळे नवीन पर्यटन स्थळे विकसित करता येतात. एखाद्या स्थळाचा ऐतिहासिक संदर्भ व्यवस्थित मांडल्यास तिथे पर्यटकांची संख्या वाढते. यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळतो आणि हस्तकला, हॉटेल व्यवसाय तसेच वाहतूक व्यवस्थेला चालना मिळते. पर्यटन मंत्रालयाची Incredible India ही मोहीम याच संशोधनावर आधारित आहे.

४. स्थापत्य आणि कलाकुसरीचा अभ्यास (Study of Architecture and Art)

भारतीय ऐतिहासिक स्थळे ही त्यांच्या अजोड स्थापत्यशैलीसाठी ओळखली जातात. अजिंठा-वेरूळची लेणी, खजुराहोची मंदिरे किंवा मुघलकालीन वास्तू यांच्या निर्मितीमागील तंत्रज्ञान काय होते, याचा अभ्यास करणे हे संशोधनाचे उद्दिष्ट आहे. हे संशोधन आधुनिक वास्तुविशारदांना प्रेरणा देऊ शकते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

५. सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे विश्लेषण (Analysis of Social and Political Context)

ऐतिहासिक स्थळे ही त्या काळातील राजांची विचारसरणी, धार्मिक सलोखा आणि सामाजिक रचनेचा आरसा असतात. किल्ल्यांचे बांधकाम हे त्या काळातील संरक्षण रणनीती स्पष्ट करते, तर मंदिरे आणि मशिदी त्या काळातील धार्मिक जीवनावर प्रकाश टाकतात. संशोधनाद्वारे आपल्याला पूर्वजांच्या जीवनशैलीची अचूक माहिती मिळते.

**संशोधनाचे महत्त्व :**

भारतीय पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांच्या संशोधनाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. भारत हा जगातील प्राचीन संस्कृतींपैकी एक असून येथे इतिहासाच्या प्रत्येक कालखंडातील खुणा आढळतात. हे संशोधन केवळ जुन्या वास्तूंची माहिती मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते आपल्या देशाच्या आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीचा आधार आहे.

प्रत्येक देश पर्यटन सेवेला उद्योगाचा दर्जा देऊन जास्तीत जास्त परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करतात. पर्यटनाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक प्रगती ही वेगाने होते. आंतरराष्ट्रीय पर्यटनामधील सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणून व्हिसा कडे पाहिले जाते. विकसनशील देश हे विकसित देशांतील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व्हिसा प्रणालीमध्ये सुलभता आणत आहेत. कारण पर्यटक हेच परकीय चलनाचे मुख्य स्त्रोत आहेत.

"पूर्वी काळातील प्रवासाची संकल्पना व आजची संकल्पना यात फरक आहे. पूर्वी काळी प्रवासाचा उद्देश शोध घेणे, व्यापार करणे व धार्मिक स्थळांना भेटी देणे हा होता. आज पर्यटनाची व्याख्या बदलती आहे. आनंद मिळविण्यासाठी मनोरंजनासाठी विरंगुळा मिळविण्यासाठी माणूस प्रवास करतो. दैनंदिन जीवनात काहीतरी बदल व्हावा असे प्रत्येकास वाटते. म्हणून माणूस प्रवासात जातो."[४]

**पर्यटन आणि अतिथ्य क्षेत्रातील व्यवसायिक संधी :**

पर्यटन हा सर्वाधिक रोजगार निर्माण करणारा उद्योग होऊ शकतो.जर आपण त्याकडे व्यावसायिक पद्धतीने लक्ष दिले तर हा एक कायमस्वरूपी व्यवसाय आहे.यात नावीन्यपूर्ण प्रयोग करण्यास प्रचंड संधी आहेत."पर्यटनामुळे अनेक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतात."[५]

परदेशी पर्यटकाने विमानतळावर पाऊल ठेवण्याआधीपासून तो भेट देणाऱ्या देशाला उत्पन्न मिळवून देण्यास सुरुवात करतो.त्याने भरलेल्या व्हिसा फीमुळे आपल्या देशाला महसूल मिळतो. प्रवासखर्च, हॉटेलमध्ये राहणे, खाणे, दुभाष्याची मदत घेणे, वर्तमानपत्रे, संदर्भ साहित्य विकत घेणे, आठवण म्हणून स्थानिक वस्तू विकत घेणे एवढ्या गोष्टी पर्यटक मायदेशी जाईपर्यंत करतो.पर्यटन केंद्रांच्या परिसरात बाजारपेठांचा विस्तार होतो.तेथील हस्तोद्योग व कुटीरोद्योग यांचा विकास होतो.त्या वस्तूंच्या खरेदी-विक्रीत वाढ होते.

"एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक उत्पादन व देशाच्या सखल घरेलू उत्पादनात (GDP )लक्षणीय भर घालण्यात महत्त्वपूर्ण सहभाग पर्यटन उद्योगाणे नोंदविला आहे."[५]

**निष्कर्ष**

१) भारताकडे जागतिक स्तरावर 'पर्यटन महासत्ता' बनण्याची क्षमता आहे.
२) शाश्वत पर्यटन संकल्पना याकडे लक्ष देणे भविष्यासाठी गरजेचे आहे.
३) पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांची जतन आणि संवर्धनाची गरज आहे.
४) सांस्कृतिक आणि आर्थिक कणा देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक मुख्य आधार आहे.
५) पर्यटनामुळे परकीय चलन आणि स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते.

**संदर्भ**

1. डॉ. एस. आर. कट्टीमनी, ऐतिहासिक पर्यटन. सिद्धार्थ प्रकाशन, कोल्हापूर.2023 पृष्ठ 5
2. UNESCO World Heritage Convention.
3. Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1958, professional book publishers, 2021
4. भिवापूर महाविद्यालय नागपूर. लघुशोध प्रबंध "इतिहास अध्यापनात पर्यटनाचे महत्त्व" 2023
5. मराठी समाजशास्त्र परिषदेचे 28 वे राष्ट्रीय अधिवेशन. फेब्रुवारी 2018.'भारतातील पर्यटन आणि विकास समस्या आणि चिंतन'

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# महाराष्ट्र पर्यटनाचा वारसा जोपासणारे राज्य: एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. काशीनाथ चव्हाण**
इतिहास विभागप्रमुख श्री. योगानंद स्वमी कला महाविद्यालय, वसमत, जि.हिंगोली
**Email:** dr.knchavan123@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180152
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 212-215
January 2026
**Submitted:** 15 Dec. 2025
**Revised:** 25 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:***

*हा लेख महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन वारशाचा ऐतिहासिक अभ्यास मांडतो. महाराष्ट्राला लाभलेला समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि नैसर्गिक वारसा पर्यटन विकासासाठी महत्त्वाचा ठरला आहे. अजिंठा–वेरुळ–एलिफंटा लेणी, ऐतिहासिक शहरे, तीर्थक्षेत्रे, थंड हवेची ठिकाणे, अभयारण्ये आणि समुद्रकिनारे यांमुळे राज्य जागतिक पर्यटन नकाशावर स्थान मिळवते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) आणि पर्यटन संचालनालयाच्या स्थापनेनंतर निवास, भोजन, वाहतूक, सहली, मोटेल्स आणि कोकण–मुंबई–मागास भागांतील विकास योजनांमुळे पर्यटनाला चालना मिळाली. पंचवार्षिक योजनांतील तरतुदी, किल्ल्यांचा विकास व पर्यावरण-संवर्धन यांवरही भर देण्यात आला आहे. तरीही पर्यटन उद्योगाचा अर्थव्यवस्थेवरील प्रभाव वाढवण्यासाठी पायाभूत सुविधा, डिजिटल प्रमोशन, स्थानिक सहभाग, सुरक्षा व स्वच्छता यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे.*

***मुख्यशब्द:*** *महाराष्ट्र पर्यटन, सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक स्थळे, MTDC, पर्यटन विकास, धार्मिक पर्यटन, निसर्ग पर्यटन, किल्ले, पंचवार्षिक योजना, स्थानिक सहभाग.*

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र हे भारतातील एक विकसित राज्य असुन येथे मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्यांचा विकास सर्वाधिक झालेला आहे. पर्यटन विकासाच्या दृष्टीने या राज्याला ऐतिहासिक, सांस्कृतीक, धार्मीक परंपरा लाभलेली आहे. या शिवाय नैसर्गिक सृष्टी सौंदर्यस्थळे, थंड हवेची ठिकाणे यांचाही विकास झालेला आहे. महाराष्ट्र राज्यात पर्यटन विकासाला अलीकडे सुरुवात झाली आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना इ.स. 1975 मध्ये करण्यात आली. खऱ्या अर्थाने यानंतर महाराष्ट्रात पर्यटन विकासाला चालना मिळाली. महाराष्ट्रामध्ये पर्यटन स्थ्ळामध्ये कमालीची विविधता आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये पर्यटन व्यवसायाचे भवितव्य् अतिशय उत्तम आहे. महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने वैभवशाली, वारसा असलेले राज्य आहे. प्रदीर्घ ऐतिहासिक परंपरा समृद्ध सांस्कृतीक वारसा, निसर्गाचा वरदहस्त लाभलेला प्राकृतिक सौंदर्याची स्थळे यामुळे हे राज्य जागतीक पर्यटन नकाशावर विराजमान झालेले दिसते.[१]

अजिंठा, वेरुळ, एलिफंटा या सारखी जागतीक किर्तीची लेणी व शिल्पे पुणे, संभाजीनगर, सातारा, कोल्हापूर यासारखी ऐतिहासिक नगरे येथे आहेत. धार्मीक स्थळांनी या राज्यांत जनमताची पकड घेतली आहे. महाराष्ट्राची अध्यात्मिक राजधानी असलेले पंढरपूर, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पैठण, देहू, आळंदी, जेजुरी, शिर्डी, शेगाव, तुळजापूर, कोल्हापूर देवस्थाने आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18480702
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. काशीनाथ चव्हाण, इतिहास विभागप्रमुख श्री. योगानंद स्वमी कला महाविद्यालय, वसमत, जि.हिंगोली*

**How to cite this article:**
*चव्हाण, . काशीनाथ . (2026). महाराष्ट्र पर्यटनाचा वारसा जोपासणारे राज्य: एक ऐतिहासिक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 212–215.* https://doi.org/10.5281/zenodo.18480702

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

महाबळेश्वर, पाचगणी, खंडाळा, लोणावळा, माथेरान, चिखलदरा ही थंड हवेची ठिकाणे आणि कोयनागड, जायकवाडी, भाटघर, चांदोली, धरणे, पर्यटन स्थळे म्हणून दिवसेंदिवस महत्वाची ठरत आहेत. सध्याची आवड असणाऱ्या पर्यटकांसाठी दाजीपूर, सागरेश्वर, चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा यासारखी अभयारण्ये उपब्ध आहेत. महाराष्ट्राची राजधानी असणारी मुंबई नगरी ही संपुर्ण भारताची औद्योगिक व आर्थिक राजधीनी मानली जाते. तसेच एक प्रमुख पर्यटन केंद्रही आहे. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्रात विकास झाला आहे. परंतु अद्यापही अर्थव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या या व्यवसायाकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. महाहराष्ट्रात पर्यटन विकासाला भरपुर वाव आहे. अर्थातच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातुन केलेल्या सुधारणा मांडता येतील.[२]

**१) पर्यटन संचालनायल:**

कोणत्याही गोष्टीचा विकास त्यासंबंधी स्वतंत्र खाते असल्याशिवाय होऊ शकत नाही. या दृष्टीकोणातून महाराष्ट्रात इ.स. १९६९ पासून पर्यटन संचालनालयाची स्थापना करण्यात आली. यालाच पर्यटनाचा विकास करण्यासाठी राज्यसरकारने उचललेले हे महत्वाचे पाऊल मानले जाते.[३]

**२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC):**

इ.स. १९६९ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळे स्थापन करण्यात आले तर राज्यातील पर्यटन विकासाची जबाबदारी इ.स. १९७५ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, अमरावती येथे विभागीय कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. पर्यटन क्षेत्रांचा शोध, विकास, मार्गदर्शन इ. कार्ये या कार्यालयात केली जातात. या मंडळातर्फे राज्यात ४७ ठिकाणी पर्यटन निवासाची सोय केली आहे. एकुण ४१५० पर्यटकांची राहण्याची व्यवस्था केली गेली आहे. पुणे, पाचगणी, शिर्डी, पंढरपूर इत्यादी ठिकाणी पर्यटन स्थळांच्या सहलीसाठी महामंडळाने काही बसगाड्या खरेदी केलेल्या आहेत. महाबळेश्वर, पुणे, मुंबई, लोणावळा, संभाजीनगर इत्यादी ठिकाणी स्थळ दर्शविणारी दररोज सहली आयोजित केल्या जातात. आठव्या योजना काळात या सर्व उपक्रमावर ६ कोटी रुपये खर्च केला गेला.[४]

महामंडळाकडे विस्ताराच्या व विकासाच्या अनेक योजना आहेत. यामध्ये महाबळेश्वर, गणपती पुळे या लोकप्रिय पर्यटन स्थळाच्या ठिकाणी असलेलया पर्यटन विकासांचा विकचार करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील किल्यांचा पर्यटन स्थळ म्हणून उपयोग करण्यासाठी प्राथमिक तयारी सुरु आहे. काही महत्त्वाच्या मार्गावर मोठेल्स सुरु करण्याचा प्रस्ताव महामंडळाकडे आहे. गेल्या पंचवार्षीक योजनेमध्ये तुळजापूर पर्यटन स्थळांचा विकास करण्यात आला. सध्या सागर किनाऱ्याचे आकर्षण पर्यटक वाढलेले आहे. त्याला योग्य तो प्रतिसाद देण्यासाठी किनाऱ्यावरील जमीनीवर हॉटेल्स व पर्यटन विकास बांधण्याची योजना करण्यात येत आहे. यदांच्या वर्षी महाराष्ट्राने संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला आहे. पर्यटनाचा विकास करण्यासाठी निरनिराळया क्रिडाप्रकारांचा विकास करण्यात येत आहे. भारतात येणाऱ्या एकूण परदेशी पर्यटकांपैकी निम्मे पर्यटक महाराष्ट्राला भेट देतात. राज्यातील वन्य पशुपक्षी हा सामाजीक ठेवा आहे. त्याविषयी जनमाणसात उत्सुकता वाढावी यासाठी वणखात्यामार्फत काही पर्यटक योजना करण्यात येत आहेत. राज्यातील संपन्न ऐतिहासिक वारसा पर्यटकांनी जपावा म्हणुन छत्रपती शिवरायांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्याचा विकास करण्यात येत आहे. महाराष्ट्रामध्ये महामंडळातर्फे ४७ पर्यटन ठिकठिकाणी निवास व्यवस्था सुर केलेली आहे. त्यामध्ये अजींठा, संभाजीनगर, भंडारदरा, चिखलदरा, औंढा नागनाथ, गणपती पुळे, माथेरान, महाबळेश्वर, पन्हाळा, पांचगणी, तोरणामाळ, त्र्यंबकेश्वर, रायगड व शिर्डी इत्यादी पर्यटन स्थळांचा समावेश होतो.

**३) पर्यटकांसाठी निवासस्थाने:**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्थापन झाल्यानंतर या महामंडळाने पर्यटकांसाठी ठिकठिकाणी विश्रामालये बांधली आहेत. हे महामंडळाच्या वतीने राज्यात ४७ ठिकाणी पर्यटन निवासस्थाने चालविले जातात. ज्यामध्ये ४००० हजाराहून अधिक पर्यटकांची निासाची साये केली जाते.[६]

**४) भोजन व्यवस्था:**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अनेक ठिकाणी पर्यटकांसाठी भोजनालयांची व्यवस्था केली आहे. हे महामंडळ पुणे, शिर्डी व पांचगणी येथे स्वत्:ची हॉटेल चालविते. या हॉटेलमधून पर्यटकांना भोजन पुरविले जाते.[७]

**५) मोटेक्स:**

महाराष्ट्रात पुणे-मुंबई, नाशिक-पुणे, संभाजीनगर-पुणे, कोल्हापूर, पुणे या महामार्गावर पर्यटकांसाठी मोटेल्स बांधण्यात येत आहेत. अशी ४० मोटेल्स बांधण्याची योजना आहे. त्यामुळे महामार्गाने जाणाऱ्या पर्यटकांची उत्तम सोय होईल. आणि त्यामुळे पर्यटनाच्या विकासाला आणखी चालना मिळेल.[८]

**६) वाहनांची व्यवस्थापन व सहलीचे आयोजन:**

पर्यटन विकास महामंडळाकडे मंडळाच्या मालकीच्या २८ आराम बसेस व ०२ मिनी बसेस आहेत. राज्यातील प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी महामंडळे सहलीचे आयोजन करते. स्थानिक सहली या महा मंडळामार्फत आयोजित केल्या जातात. तसेच सागर दर्शन, तीर्थक्षेत्र, सांस्कृतीक, धार्मिक आणि वन पर्यटने आयोजित केली जातात.[९]

**७) कोकणातील पर्यटन विकास:**

कोकण हा भाग पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा मानला जातो. कोकणात पर्यटनाचा विाकस करण्यात येत आहे. यासाठी समूद्र किनाऱ्यावर ठिकठिकाणी 32 हॉटेल्स व पर्यटक निवास बांधण्याची शासनाची योजना आहे.[१०]

**८) मुंबई येथील पर्यटन विकासाची योजना:**

मुंबई हे महाराष्ट्रातील एक औद्योगिक व्यापारी, सांस्कृतिक व शैक्षणीक केंद्र आहे. येथे परदेशातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त असते म्हणून नव्या मुंबई जवळ अनिवासी भारतीय पर्यटकांना एका नगरीची उभारणी करण्याची योजना विचाराधीन आहे. ब्लायडिंग, जलक्रिडा इ. पर्यटन विषयक उपक्रमांना चालना देण्यासाठी व परदेशी पर्यटक आकर्षित करुन धेण्यासाठीही महत्वाची योजना आहे. त्यामुळे पर्यटकांचा अधिक विकास होणार आहे.[११]

**९) मागास भागात पर्यटनाचा विकास:**

पर्यटनाला उद्योगाचा दर्जा देण्याचे वित्तपुरवठा करुन पर्यटनाचा विकास करण्याची योजना आहे. याशिवाय अनिवासी भारतीयांना या पर्यटन उद्योगात गुंतवणेक करण्यास परवानगी, तसेच खाजगी उद्योगांची पर्यटन केंद्राचा विकास करण्यासाठी मदत घेण्याचे शासनाने ठरविले आहे.[११]

**१०) पंचवार्षिक योजनेतील पर्यटन विकास:**

महाराष्ट्र राज्याची निम्रिती ०१ मे १९६० मध्ये झाली तोपर्यंत भारताच्या पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या होत्या. तिसऱ्या व चौथ्या योजनेत राज्यातील योजना व पर्यटन विकासाकडे लक्ष दिले गेले नाही. ५ व्या व ६ व्या पंचवार्षिक योजनेत महाराष्ट्रातील पर्यटन केंद्राच्या विकासासाठी तरतुदी करण्यात आल्या.

अ) ७ व्या पंचवार्षिक योजनेत माहूरगड, तिटवाळा, तुळजापूर, अक्कलकोट, इत्यादी ठिकाणी पर्यटक निवास बांधण्यात आले.

ब) रायगड जिल्ह्यातील काशिद, सिंदुदुर्ग येथील वेंगुर्ला येथे पर्यटक निवासस्थाने बांधण्यात आले.

क) चिखलदरा, भंडारदरा, महाबळेश्वर, गणपतीपूळे या पर्यटन केंद्राचा विस्तार व विकास करण्यात आला. राज्यातील 41 किल्याची दुरुस्ती आखण्यात आली.

ड) राज्यातील विविध भागातील किल्यांच्या डागडूजीचे काम आखण्यात येत आहे. किल्याची डागडूजी पुरातत्व खात्याच्या माध्यमातूनही होत आहे.[१३]

**निष्कर्ष:**

१) महामंडळाने पर्यटल क्षेत्राच्या विकासाठी अनेक महत्वपूर्ण पावले उचलली आहेत.

२) सर्व स्थळांना निधीचे समान वाटप.

३) पर्यटन विकास योजनांची अंमलबाजवणी करणे.

४) पर्यटकांना पर्यटनस्थळाकडे आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

५) पर्यटन स्थळाचे वर्गीकरण करणे.

६) महामंडळाच्या वतीने पर्यावरण संरक्षण करणे हे काम केले जाते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

७) हे महामंडळ सांस्कृतीक वारसा जपण्याचा प्रयत्न करते इत्यादी.

**उपाययोजना:**

**१) भौतिक सूधारणा:** चांगले रस्ते, हवाई संपर्क, आणि सार्वजनिक वाहणाची व्यवस्था करणे.

**२) स्थानिक संस्कृतीला प्रोत्साहन देणे:** पर्यटन स्थळावर आजुबाजुच्या परिसराविषयी म्हणजेच स्थानिक संस्कृतीचा प्रसार करणे.

**३) सुरक्षा आणि स्वच्छता:** पर्यटकांसाठी सुरक्षित वातावरण आणि स्वच्छ परिसर ठेवणे.

**४) डिजिटल प्रमोशन:** सोशल मिडीया आणि वेबसाईटवर पर्यटनस्थळांचे आकर्षक प्रमोशन.

**५) स्थानिक समुदायाचा सहभाग वाढवणे:** स्थानिक लोकांना रोजगार आणि व्यवसायाची संधी मिळवूण देणे.

**संदर्भग्रंथ सुची / तळटिप:**

1. डॉ. शितलकुमार कपूर- पर्यटन भूगोल विश्वभारती पब्लिकेशन्स नवी दिल्ली.
2. प्रा.डॉ. उत्तम सावंत- मराठवाड्यातील किल्ले.
3. डॉ. प्रभाकर देव – कंधार एक ऐतिहासिक शहर.
4. प्रा. म.श्री. माटे- मराठवाड्याचे कलावैभव.
5. प्रा. भगवान काळे- मराठवाडा काल आणि आज.
6. सांची – भालचंद्र - एक संत, दरियागंज, नई दिल्ली.
7. डॉ. सोमनाथ रोडे- मराठवाड्याचा इतिहास.
8. डॉ. विठ्ठल घारापुरे- पर्यटन भूगोल, पिंपळापूरे, ॲण्ड पब्लिशर्स.
9. Gupta V.N. Tourism to India.
10. Bhatia A.K. Tourism Development.
11. Bryden J.M. Tourism Development.
12. शिंदे एस.बी. पर्यटन भुगोल.
13. डॉ. आर.एस. कोंडेंकर - पर्यटन
14. ओम शिवा लिंगाडे, डॉ. अरविंद कदम, प्रा.संगमेश्वर साकोळे - पर्यटन.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटनस्थळ लोणार सरोवर : संवर्धन व जनजागृती

**प्रा. पल्लवी शिवाजीराव जाधव**
सहाय्यक प्राध्यापक भूगोल विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.
**Email:** Pallavishivajiraojadhav@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180153
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 216-219
January 2026

**Submitted:** 15 Dec. 2025
**Revised:** 25 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:-***

*लोणार सरोवर हे एक केवळ पर्यटन स्थळ नाही तर ती एक निसर्गाची अनमोल देणगी आहे आणि तिचे जतन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. आपण सर्वांनी मिळून हे नैसर्गिक अद्भुत असे सौंदर्य जपले पाहिजे आणि स्थानिक संस्कृती आणि परंपरेचा आदर केला पाहिजे. लोणार विवर हे ऐतिहासिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक ठेवा असलेले नैसर्गिक सौंदर्य आहे. निसर्गाच्या या अद्भुत चमत्काराचे वैज्ञानिक आणि पर्यावरणीय दृष्ट्या संरक्षण आणि संवर्धन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे त्यासाठी आपण सर्वांनी मिळून हे अवलौकिक सौंदर्य जपले पाहिजे.*

***मुख्यशब्द:*** *लोणार सरोवर, पर्यटनस्थळ, संवर्धन, जनजागृती, भूगर्भीय आश्चर्य, जैवविविधता, पर्यावरण संरक्षण, मानवी हस्तक्षेप, शाश्वत पर्यटन विकास, प्रदूषण व्यवस्थापन.*

**प्रस्तावना**:

"एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय." पर्यटन हे फुरसतीचा वेळ घालविण्याचे साधन म्हणून जगभरात अतिशय लोकप्रिय झाले आहे. प्राचीन काळापासून लोक विविध कारणांनी प्रवास करत त्यातूनही त्यांचे पर्यटन होत असे.आजही पर्यटनाला जगात अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. जगात पर्यटनाच्या बाबतीत आपला भारत देशही अग्रेसर आहे. इतर देशाच्या तुलनेत आपल्या भारत देशाला ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक व नैसर्गिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे स्थान लाभलेले आहे, त्यापैकीच एक असलेले 'लोणार सरोवर' होय. हे सरोवर महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यात असलेले एक नैसर्गिक भूगर्भीय आश्चर्य आहे. याची निर्मिती सुमारे पाच लाख वर्षांपूर्वी एका उल्कापातामुळे झालेली असून बेसॉल्ट खडकातील एकमेव मोठे उल्कापात विवर आहे. हे सरोवर खारे आणि अल्क धर्मी पाण्यामुळे तसेच त्याच्या बदलणाऱ्या रंगामुळे,आसपासची ऐतिहासिक मंदिरे आणि अद्वितीय सूक्ष्म जीवामुळे जगभरातील शास्त्रज्ञ आणि पर्यटकांसाठी कुतूहलाचा विषय ठरले आहे.

लोणार सरोवर हे साहस, इतिहास आणि निसर्गाचा अद्वितीय संगम आहे. निसर्गाच्या अद्भुत चमत्कारांपैकी एक असलेल्या या विवराला मात्र अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. हे सरोवर स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडत आहे. लोणार विवर आणि त्याच्या तळाशी असणारे एकमेवाद्वितीय असे पर्यावरण व जगाचा अनमोल असा ठेवा असलेले सरोवर अनेक संकटाच्या घेरात सापडत चाललेला आहे. ही अधोगती इतक्या वेगाने होत आहे की आत्ताच काही केलं तरच हे विज्ञानाचे अवलौकिक आश्चर्य पुढे वाचेल नाहीतर उद्या खूप उशीर झालेला असेल.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. पल्लवी शिवाजीराव जाधव, सहाय्यक प्राध्यापक भूगोल विभाग श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.*

**How to cite this article:**
*जाधव, . पल्लवी . शिवाजीराव . (2026). पर्यटनस्थळ लोणार सरोवर : संवर्धन व जनजागृती. Journal of Research & Development, 18(1(V)), 216–219.* https://doi.org/10.5281/zenodo.18480738

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18480738
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

वैज्ञानिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या या स्थळाचे जतन व्हावे आणि याची माहिती सर्वांना व्हावी या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. या विवराला हजारो पर्यटक भेट देण्यासाठी येतात त्यांच्यासाठी ठराविक नियमावली करून लोकांमध्ये जनजागृती करून या सरोवराचे संरक्षण व संवर्धन होण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लिखाणासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक व परिचयात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून त्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे.

**समस्यासूत्रन :-**

१) लोणार सरोवर परिसरात नागरी वस्त्यांमधून जाणाऱ्या सांडपाण्याची व्यवस्था नियोजनबद्ध करण्यात आली आहे काय?

२) लोणार सरोवर परिसरात प्लास्टिकचा घनकचरा अडथळा ठरतो काय?

३) लोणार सरोवर परिसरास भूस्खलनाचा धोका निर्माण होत आहे काय?

४) लोणार सरोवराची पाणीपातळी नियंत्रणात ठेवता येऊ शकते काय?

५) लोणार सरोवर परिसरात अधिक मानवी हस्तक्षेप संभवतो काय?

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) लोणार सरोवराची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) लोणार सरोवराचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी उपाययोजनात्मक शोध घेणे.

३) लोणार सरोवराच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने अध्ययन करणे.

४) लोणार सरोवरातील जैवविविधता जतन करण्याच्या दृष्टीने विशेष घटकांचे अध्ययन करणे.

५) लोणार सरोवरातील मानवी हस्तक्षेपाच्या कारणांचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये :-**

१) लोणार सरोवर परिसरात नागरी वस्त्यांमधून जाणाऱ्या सांडपाण्याची व्यवस्था नियोजनबद्ध करण्यात आलेली दिसत नाही.

२) लोणार सरोवर परिसरात दिवसेंदिवस प्लास्टिकच्या घनकचऱ्यात वाढ होत आहे.

३) लोणार सरोवर परिसरास भूस्खलनाचा धोका निर्माण होत आहे.

४) लोणार सरोवरातील मानवी हस्तक्षेप अधिक असल्याचे जाणवते.

५) लोणार सरोवराची पाणीपातळी नियंत्रणात ठेवता येऊ शकते.

**विषय प्रतिपादन** :-

लोणार सरोवर हे साहस, इतिहास आणि निसर्गाचा अनमोल ठेवा आहे.या जागेचे भूगर्भशास्त्रीय व वैज्ञानिक महत्त्व,निसर्गरम्य वातावरण, प्राचीन मंदिरे यामुळे येथील सौंदर्यात अजूनच भर पडते. हा अनमोल ठेवा जतन करण्यासाठी 'लोणार' या जागतिक वारसा स्थळाचा शाश्वत विकास घडून आणण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना करता येतील.

**१) सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे :-** लोणार शहरातील व आजूबाजूच्या वस्तीतील सांडपाणी सरोवरात मिसळत आहे आणि त्यामुळे सरोवरातील रासायनिक संतुलन बिघडून पीएच पातळी व मोठ्या प्रमाणात क्षारतेत बदल होत आहेत. गाव वस्तीतील सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावली तर थेट शहरातील पाणी सरोवरात जाण्यापासून थांबवता येईल आणि सरोवरातील पाणी दूषित होण्यापासून वाचेल.त्यातील असलेले सूक्ष्मजीव व इतर वनस्पतींना हानी पोहोचणार नाही.सरोवरात सांडपाणी मिसळणे ही एक मोठी समस्या आहे.त्यासाठी सांडपाणी प्रक्रिया किंवा भूमिगत गटार व्यवस्था करून सरोवराचे प्रदूषण थांबवण्यास मदत होईल व त्याचे संवर्धन करणे सोपे होईल. सरोवरात मिसळल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे पाण्याची क्षारता व पीएच पातळी कमी होत असल्याकारणाने नैसर्गिक परिसंस्थेवर त्याचा परिणाम जाणवत आहे. तसेच प्रदूषणामुळे शेवाळांची मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पण दिसून येत आहे ज्यामुळे पाण्याचा रंग बदलताना दिसतो. पूर्वी या सरोवरात कधीही न दिसलेले मासे आता काही प्रमाणात त्या ठिकाणी मासे आढळून आलेले आहेत. त्यामुळे वेळोवेळी पाण्याची गुणवत्ता तपासणी होणे आवश्यक आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**२) प्लास्टिक कचऱ्यावर बंदी करणे :-** सौंदर्याने नटलेले विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखले जाणारे लोणार विवर अनेक संकटांना सामोरे जात आहे. त्यापैकीच एक संकट म्हणजे प्लास्टिक कचरा होय. या सरोवराला प्लास्टिक कचऱ्याचा मोठ्या प्रमाणात धोका आहे.ज्यामुळे तेथील प्लास्टिकचे सूक्ष्म कण पाण्यात मिसळले जाऊन पाणी दूषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याचा विपरीत परिणाम पाण्यात असणाऱ्या जलचरावर होत आहे.सरोवराला भेट देण्यासाठी आलेल्या पर्यटकांकडून होणारा प्लास्टिक आणि इतर कचरा यामुळे हे सरोवर प्रदूषित होत आहे,यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी पाण्याच्या बॉटल्स,खाद्यपदार्थांचे रॅपर, इत्यादी कचऱ्यावर बंदी घालणे गरजेचे आहे. कचरा योग्य ठिकाणी गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रभावी यंत्रणा ही उभारणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक नागरिक, पर्यटक आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामध्ये प्लास्टिक कचरा कमी करण्याबाबत आणि जबाबदार वर्तनाबद्दल जनजागृती करणे आवश्यक आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वर कठोर कारवाई करण्यात यावी. सरोवरा जवळ ठीक - ठिकाणी कचरा टाकण्यासाठी कचराकुंडीची व्यवस्था करावी ज्यामुळे पर्यटक कचरा कुठेही टाकणार नाहीत. सरोवराचे नैसर्गिक आणि वैज्ञानिक महत्त्व लक्षात घेता प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी तातडीची आणि प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**३) पाणी पातळी नियंत्रणात ठेवणे :-** नैसर्गिक ठेवा असलेले लोणार सरोवराच्या पाण्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे . ज्यामुळे सरोवर परिसरातील जी अनेक पुरातने मंदिरे आहेत ती पाण्याखाली गेल्याची दिसून येते.ल्लोणार अभयारण्यातील विविध वन्य प्राणी जे आहेत,ते बाहेर पडत असल्याची सुरुवात झाली आहे. याचा परिणाम वन्यजीव प्राणी मानवी वस्तीत घुसत असल्याकारणाने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. सरोवराच्या आसपास वाढलेले मानवी हस्तक्षेप व इतर पाण्याचे स्त्रोत मिसळल्याने पाण्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झालेली आहे तसेच मागील काळात झालेल्या मुसळधार पावसामुळे पाण्याच्या पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन पाण्याचा नैसर्गिक खारटपणा कमी झाला आहे. सरोवरात असलेली अनेक प्राचीन मंदिरे पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने बुडाली आहेत. सरोवरातील पाणी पातळीच्या वाढीची गंभीर दखल वैज्ञानिक व शास्त्रज्ञांनी घेणे आवश्यक आहे.

**४) भूस्खलनामुळे लोणार परिसरातील अस्तित्व धोक्यात :-** जगप्रसिद्ध असणाऱ्या लोणार सरोवराच्या परिसराचे अस्तित्व धोक्यात येत आहे. लोणार सरोवराच्या काठावरून दोन महामार्ग जातात. त्यात पूर्व दिशेने जाणारा शेगाव - पंढरपूर महामार्ग तर उत्तर दिशेने जाणारा वाशिम - जालना महामार्ग आहे .या दोन्हीही महामार्गावरून नियमित मोठ्या प्रमाणात अवजड वाहतूक सुरू असते.या अवजड वाहतुकीच्या कंपनामुळे सरोवराच्या काठांना कंपने बसतात व तेथील माती भुसभुशीत होऊन भूस्खलन होण्याची क्रिया घडते त्यामुळे भविष्यात होणारा हा मोठा धोका असून यावर उपाययोजना म्हणून महामार्गांना वळण रस्ता केला तर सरोवराचे अस्तित्व टिकून राहील. सरोवराच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत आहे. वृक्षतोडीमुळे जमिनीची धूप होते तसेच झाडांची मुळे माती घट्ट धरून ठेवण्याचे काम करतात. अवजड वाहतूक आणि वृक्ष तोड या महत्त्वाच्या कारणामुळे सरोवराच्या काठावरील माती भुसभुशीत व अस्थिर होऊन सरकली जात आहे व भूस्खलन होण्याची क्रिया सतत घडत आहे. यासाठी त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**५) मानवी हस्तक्षेप कमी करणे :-** जगभरातील वैज्ञानिकांसाठी आकर्षणाचे केंद्र असलेल्या खाऱ्या पाण्याचे विवर मानवी हस्तक्षेपामुळे अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. सरोवराभोवती असणाऱ्या नागरी वस्त्या, वस्त्यातील सांडपाणी, प्लास्टिक कचरा,लोणार अभयारण्यातील होणारी वृक्षतोड व त्या वृक्षतोडीमुळे होणारी मातीची झीज व त्याचे रूपांतर भूस्खलनात होणे ही चिंतेची बाब आहे. एवढंच नाही तर स्थानिक लोक, पर्यटक,यात्रेकरू सरोवरातील पुरातन मंदिराजवळील असणाऱ्या पाण्यात आंघोळ करतात व कपडे धुतात. सरोवरा भोवती असणारे गाव वस्तीतील लोक आपले गुरेढोरे धुण्यासाठी व इतर घरगुती कारणासाठी येथील पाण्याचा वापर करतात तसेच डिटर्जंट युक्त असलेले घरगुती सांडपाणी येथे नियमितपणे टाकले जाते त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी प्रदूषित होते. आजूबाजूच्या परिसरात बेकायदेशीरपणे वृक्षतोड केली जाते आणि गुरे चरण्यासाठी आणली जातात. सरोवराच्या जवळ चरल्याने त्यांच्या विष्टेपासून प्रदूषण निर्माण होते. व्यावसायिक क्रियाकलाप व तलावाच्या परिसरात बेकायदेशीर बांधकामामुळे नैसर्गिक भूसंरचनेचे मोठे नुकसान झाल्याचे आढळून येत आहे. मानवी हस्तक्षेपामुळे होणारे विपरीत परिणाम रोखण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**ठळक निष्कर्ष :-**

१) लोणार सरोवर संवर्धनाबाबतीत स्थानिक लोकांमध्ये जनजागृती घडून येत आहे.

२) लोणार सरोवर पर्यटन विकास घडवून आणण्यासाठी शासकीय संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

३) लोणार सरोवरातील जैवविविधतेची काळजी घेणे व संवर्धनात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी यशस्वीपणे सुरू आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

४) लोणार सरोवराच्या पर्यटन विकासामुळे देशाच्या आर्थिक,सामाजिक,सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक ठेवा जतन करण्यास हातभार लागतो आहे.

५) लोणार सरोवराच्या पर्यटनामुळे नागरिकांना नैसर्गिक व भूगर्भीय आश्चर्य अनुभवता येत आहेत.

**उपाययोजना :-**

१) पर्यटकांसाठी व स्थानिक लोकांसाठी नियमावली अंमलात आणणे.

२) पर्यटन स्थळांना भेट देताना जबाबदारीने वागणे व पर्यावरणाची योग्य ती काळजी घेणे.

३) स्थानिक स्वराज्य संस्थांनी लक्ष घालून सरोवराच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी.

४) पर्यटकांमध्ये वैज्ञानिक व संशोधनात्मक जाणीव निर्माण करणे.

५) स्थानिक लोक, पर्यटक, स्वयंसेवक यांचा लोणार संवर्धनासाठी सहभाग वाढविणे.

६) 'लोणार सरोवर वाचवा' ही मोहीम तीव्रतेने सुरू करणे.

७) पर्यटनाचा शाश्वत विकास धोरणाचा अवलंब करणे.

८) भूवैज्ञानिक आश्चर्य,जैवविविधता आणि ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी जागरूकता निर्माण करणे.

९) स्थानिक संस्था आणि पर्यटन विभागाच्या उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे.

१०) सरोवर परिसरात 'प्लास्टिक मुक्त लोणार' अभियान राबविणे.

**संदर्भ** :-

१) पर्यटन भूगोल : डॉ.विठ्ठल घारपुरे

२) विदर्भाचा विज्ञान वैभव वारसा: लोणार:- प्र. के. घाणेकर

३) Maharashtratourism.gov.in/mr/nature/lonar-crater/

४) टुरिझम डेव्हलपमेंट- भाटिया ए.के.

५) टुरिझम इन इंडिया - गुप्ता व्ही. एन.

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026


Original Article

# जिंतूरच्या नेमगिरी लेण्या: एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ


**प्रा. डॉ. उद्धव उमाजी राऊत**

बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत जि. हिंगोली



**Manuscript ID:**
JRD -2026-180154

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(V)

Pp. 220-223

January 2026

**Submitted:** 15 Dec. 2025

**Revised:** 25 Dec. 2025

**Accepted:** 15 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026



***सारांश***

*महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागातील परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात वसलेल्या नेमगिरी लेण्या या जैन धर्माशी संबंधित एक महत्त्वाचे ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे. या लेण्या प्राचीन काळातील जैन साधना, तपश्चर्या, अहिंसा आणि आत्मसंयमाच्या परंपरेचे द्योतक असून दिगंबर जैन परंपरेशी निगडित आहेत. डोंगराळ व शांत नैसर्गिक परिसरात कोरलेल्या या लेण्यांमध्ये साधी पण अर्थपूर्ण स्थापत्यरचना, ध्यानासाठी कक्ष, दगडी टाक्या आणि तीर्थंकरांच्या मूर्ती आढळतात. सातवाहन काळात जैन धर्माच्या प्रसाराच्या पार्श्वभूमीवर या लेण्यांची निर्मिती झाल्याचे अभ्यासकांचे मत आहे. आजच्या काळात नेमगिरी लेण्या इतिहास, धर्म, स्थापत्यकला आणि पर्यटन यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. योग्य जतन, संवर्धन व पर्यटन विकासाच्या माध्यमातून हे स्थळ एक प्रमुख ऐतिहासिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित होऊ शकते.*

***मुख्यशब्द:*** *नेमगिरी लेण्या, जिंतूर, जैन धर्म, दिगंबर परंपरा, ऐतिहासिक पर्यटन, स्थापत्यकला, तपश्चर्या, अहिंसा, सांस्कृतिक वारसा, संवर्धन.*


**संशोधन पद्धती:**

सदरील लघुशोध निबंध लिहिण्यासाठी लेण्यांना प्रत्यक्ष भेट व सर्वेक्षण, निरीक्षण पद्धती, मुलाखत पद्धतीचा अवलंब करून शासकीय कागदपत्रे, ऐतिहासिक कागदपत्रे या माध्यमातून सदरील लघुशोध निबंध लिहिण्यासाठी इत्यादी पद्धतीचा उपयोग केला आहे.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागात अनेक प्राचीन धार्मिक स्थळे असून, त्यामध्ये परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात वसलेल्या नेमगिरी जैन धर्मीय लेण्या यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. या लेण्या जैन धर्माशी संबंधित असून, त्या जैन साधना, तपश्चर्या आणि अहिंसेच्या परंपरेचे प्राचीन प्रतीक आहेत. एखाद्या पर्वतात खडक-कातळ खोदून तयार केलेल्या गुहा म्हणजे लेणी, गुंफा, शैलगृह, शैलमंदिर प्रस्तरशालय अशा अन्य नावाने ओळखला जाणारा हा वास्तूअलंकार होय. महाराष्ट्र ही संत, विचारवंत, योद्धे आणि विविध धार्मिक परंपरांची भूमी म्हणून ओळखली जाते. या भूमीवर बौद्ध, जैन, हिंदू आणि इस्लाम अशा विविध धर्मांनी आपापले सांस्कृतिक व स्थापत्यकलेचे ठसे उमटवले आहेत. अजिंठा–वेरूळसारखी जागतिक कीर्तीची लेणी जशी महाराष्ट्राचा गौरव वाढवतात, तशाच कमी अधिक ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांनी या परंपरेला समृद्ध केले आहे. मराठवाडा विभागातील परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात वसलेल्या नेमगिरी लेण्या हे असेच एक महत्त्वाचे ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे. हे स्थळ परभणी पासून 43 कि.मी. उत्तर दिशेला आहे.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*प्रा. डॉ. उद्धव उमाजी राऊत, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत जि. हिंगोली*



**How to cite this article:**

*राऊत, . उद्धव . उमाजी. (2026). जिंतूरच्या नेमगिरी लेण्या: एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ. Journal of Research & Development, 18(1(V)), 220–223.* https://doi.org/10.5281/zenodo.18480818

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18480818

OPEN ACCESS

नेमगिरी लेण्या या दिगंबर जैन धर्माशी संबंधित असून, त्या जैन साधना, तपश्चर्या, अहिंसा आणि आत्मसंयमाच्या परंपरेचे द्योतक आहेत.जैन धर्मीय लेण्या इतिहास, धर्म, स्थापत्यकला आणि पर्यटन या सर्व दृष्टीने त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**नेमगिरीचा भौगोलिक व नैसर्गिक परिसर: अतिशय क्षेत्र**

नेमगिरी हा जिंतूर शहराच्या जवळ असलेला डोंगराळ भाग आहे. याच पहाडावर सात गुंफांचे मिळून मंदिर असून त्याचा आकार चक्राकार आहे. एका मोठ्या आकाराच्या पहाडात वीस फूट खोल खोदकाम करून गुंफेची निर्मिती केली असून प्रत्येक गुंफेत तीर्थकाराच्या मूर्ती गुंफेला ठेवलेल्या झरोक्यातून प्रवेश केलेली प्रकाश किरणे तीर्थकरांना पदस्पर्श करतात. हा परिसर खडकाळ टेकड्यांनी वेढलेला असून, नैसर्गिकदृष्ट्या शांत आणि रमणीय आहे. पावसाळ्यात येथे हिरवीगार वनराई दिसून येते, तर हिवाळ्यात हवामान आल्हाददायक असते. प्राचीन काळात अशा प्रकारचे डोंगराळ व एकांत परिसर धार्मिक साधनेसाठी अत्यंत योग्य मानले जात होते. जैन धर्मात विशेषतः डोंगर, पर्वत आणि एकांतस्थळांना तपश्चर्येसाठी महत्त्व दिले जाते. त्यामुळे नेमगिरी पर्वतावर लेण्यांची निर्मिती होणे हे स्वाभाविक वाटते.

**नेमगिरी लेण्यांचा ऐतिहासिक कालखंड:**

इतिहास तज्ज्ञांच्या मते नेमगिरी लेण्यांची निर्मिती इ.स.पूर्व शेवटच्या शतकांपासून इ.स.च्या प्रारंभीच्या काळात झाली असावी. हा काळ दख्खन प्रदेशात जैन धर्माच्या प्रसाराचा महत्त्वाचा टप्पा होता. सातवाहन काळात जैन धर्माला व्यापारी वर्गाकडून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत होता. व्यापारी, श्रेष्ठी आणि दानशूर लोक जैन मुनींसाठी लेण्या, उपाश्रय आणि मठ उभारण्यासाठी आर्थिक मदत करत असत. नेमगिरी लेण्या याच सामाजिक व धार्मिक पार्श्वभूमीत निर्माण झाल्या असाव्यात.

**जैन धर्म आणि नेमगिरी लेण्या:**

जैन धर्माचा मूलभूत आधार अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि तपश्चर्या या तत्त्वांवर आहे. जैन मुनींचे जीवन अत्यंत संयमी आणि कठोर तपश्चर्येचे असते. नेमगिरी लेण्या या जैन मुनींसाठी ध्यान, उपवास, मौन आणि कायोत्सर्ग यांसारख्या साधनांसाठी वापरल्या जात असाव्यात. लेण्यांमधील साधी रचना, अलंकारांचा अभाव आणि शांत वातावरण हे जैन जीवनपद्धतीशी पूर्णतः सुसंगत आहे.

**लेण्यांची संख्या व रचना:**

- **प्रमुख गुंफा:** भगवान महावीर गुंफा, भगवान आदिनाथ गुंफा, भगवान शांतिनाथ गुंफा, भगवान नेमिनाथ गुंफा, भगवान पार्श्वनाथ गुंफा, भगवान नंदेश्वरजी गुंफा, भगवान बाहुबली गुंफा.
- **इतर:** चंद्रनाथाचे मंदिर सुद्धा निमगिरी पर्वताच्या उत्तरेस आहे.
- लेण्या डोंगराच्या उतारावर आणि काही ठिकाणी उंच भागात कोरलेल्या आहेत.

**लेण्यांच्या रचनेत पुढील घटक दिसून येतात:**

- ध्यानासाठी प्रशस्त कक्ष.
- जमिनीवर कोरलेली सपाट आसने.
- पावसाचे पाणी साठवण्यासाठी दगडी टाक्या.
- साधी प्रवेशद्वारे.
- या सर्व घटकांवरून या लेण्या दीर्घकालीन वास्तव्यासाठी वापरल्या जात असल्याचे दिसून येते.

**स्थापत्यकलेची वैशिष्ट्ये:**

नेमगिरी लेण्यांची स्थापत्यकला भव्य नसली, तरी ती अत्यंत अर्थपूर्ण आहे. येथे अलंकरणपेक्षा उपयोगितेला प्राधान्य दिलेले दिसते. दगडात कोरलेल्या भिंती, साधे स्तंभ, चौकोनी किंवा आयताकृती कक्ष यांमधून तत्कालीन शिल्पकारांचे कौशल्य स्पष्ट होते. जैन स्थापत्यकलेतील साधेपणा आणि संयम या लेण्यांमध्ये ठळकपणे जाणवतो.

**मूर्ती व धार्मिक प्रतीके:**

काही लेण्यांमध्ये तीर्थंकरांच्या ध्यानमुद्रेतील मूर्ती किंवा त्यांचे अवशेष आढळल्याचे उल्लेख आहेत. मूर्तींची वैशिष्ट्ये:

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

- पद्मासनातील ध्यानमुद्रा.
- शांत, निर्विकार भाव.
- दागिन्यांचा अभाव.

ही वैशिष्ट्ये जैन मूर्तिशास्त्राशी सुसंगत आहेत, ज्यामुळे नेमगिरी लेण्या जैन धर्माशी संबंधित असल्याचे ठोस पुरावे मिळतात.

**तपश्चर्या व साधना केंद्र म्हणून महत्त्व:**

नेमगिरी लेण्या या केवळ निवासस्थान नव्हत्या, तर त्या कठोर तपश्चर्येची केंद्रे होती. जैन मुनी येथे दीर्घकाळ वास्तव्य करून आत्मशुद्धी आणि मोक्षप्राप्तीच्या मार्गावर साधना करत असत. चातुर्मास काळात अशा लेण्यांचे विशेष महत्त्व असायचे.

**सामाजिक व आर्थिक संदर्भ:**

जैन धर्माचा व्यापारी वर्गाशी घनिष्ठ संबंध राहिला आहे. प्राचीन व्यापारमार्गाजवळ असलेल्या नेमगिरी परिसरात व्यापाऱ्यांकडून जैन मुनींना अन्न, वस्त्रे आणि इतर आवश्यक वस्तू मिळत असाव्यात. दानधर्मातूनच अशा लेण्यांची निर्मिती आणि देखभाल केली जात असे.

**स्थानिक श्रद्धा व लोकपरंपरा:**

आजही जिंतूर आणि आसपासच्या परिसरातील लोक नेमगिरी लेण्यांकडे आदराने पाहतात. स्थानिक जैन समाजासाठी हे ठिकाण धार्मिक महत्त्वाचे मानले जाते. काही लोककथा आणि श्रद्धा या लेण्यांशी जोडलेल्या असून, त्या स्थानिक संस्कृतीचा भाग बनल्या आहेत.

**जिंतूरच्या नेमगिरी लेण्या: एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ:**

1. आजच्या काळात नेमगिरी लेण्या ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित होण्याची मोठी क्षमता बाळगतात. इतिहासप्रेमी, संशोधक, विद्यार्थी आणि पर्यटकांसाठी हे ठिकाण आकर्षक ठरते. निसर्ग, इतिहास आणि धर्म यांचा संगम येथे अनुभवता येतो.
2. पर्यटन विकासाचे योग्य नियोजन केल्यास नेमगिरी लेण्या एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र बनू शकतात. यासाठी पुढील बाबी आवश्यक आहेत:
   - माहितीफलकांची उभारणी.
   - रस्ते व दळणवळण सुविधा.
   - मार्गदर्शक सेवा.
   - स्वच्छता व सुरक्षा.
3. यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील.
4. **जतन व संवर्धनाची गरज:** नेमगिरी लेण्या हा जैन धर्माचा आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचा मौल्यवान ठेवा आहे. या लेण्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही शासन, पुरातत्त्व विभाग आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.
5. संशोधन, दस्तऐजीकरण आणि जनजागृती केल्यास हा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत सुरक्षित राहील.

**शैक्षणिक व संशोधनात्मक महत्त्व:**

इतिहास, पुरातत्त्व, धर्मशास्त्र आणि पर्यटन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नेमगिरी लेण्या एक जिवंत प्रयोगशाळा आहेत. येथे क्षेत्रभेटी, प्रकल्प आणि संशोधनासाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

**निष्कर्ष:**

जिंतूरच्या नेमगिरी लेण्या ह्या केवळ गुहा नसून, त्या जैन धर्माच्या तपश्चर्येची, अहिंसेची आणि साधेपणाची साक्ष देतात. इतिहास, स्थापत्यकला, धर्म आणि पर्यटन या सर्व दृष्टीने या लेण्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योग्य जतन, संवर्धन आणि प्रचार केल्यास नेमगिरी लेण्या भविष्यात महाराष्ट्राच्या ऐतिहासिक पर्यटन नकाशावर एक मानाचे स्थान मिळवू शकतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**संदर्भ ग्रंथ (References):**

1. महाराष्ट्र शासन, परभणी जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य गॅझेटियर विभाग, मुंबई.
2. नेमगिरी तीर्थ श्री. दिगंबर जैन अतिशय क्षेत्र निमगिरी ता. जिंतूर जि. परभणी.
3. जैन लीलावती प्रा. धर्ममंगल, मराठी पाक्षिक अंक नं. 22, 16 जानेवारी 1991, पृ.क्र. 6.
4. डॉ. काला अरुणा: आचार्य जिनसेनांचे आदी-महापुराण, निर्मल प्रकाशन, नांदेड, 2001.
5. डॉ. अनिल कटारे: मराठवाड्यातील लेणी, कल्पना प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती 2001.
6. मोरेश्वर कुंठे, सौ. विजया कुंठे: परभणी-हिंगोली जिल्हा.

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026


Original Article

# शिवकालीन किल्ले व पर्यटन :रायगड -एक अभ्यास


**डॉ. बोकारे तुकाराम एकनाथराव**

सहयोगी प्राध्यापक तथा संशोधन पर्यवेक्षक इतिहास विभाग प्रमुख श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगाव

**Email:** tukarambokare58@gmail.com



**Manuscript ID:**
JRD -2026-180155
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(V)
Pp. 224-227
January 2026

**Submitted:** 15 Dec. 2025
**Revised:** 25 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026



## सारांश

*शिवछत्रपतीच्या पदस्पर्शाने पावन झालेला, स्वराज्याची राजधानी म्हणून प्रसिद्ध पावलेला, इतिहासाच्या अनेक पाऊल खुणा जपलेला, अनेक संघर्षाला समर्थपणे तोंड देणारा, बेलाग असा रायगड किल्ला मराठी अस्मितेचे प्रतीक म्हणून आजही दिमाखात उभा आहे. इतिहास संशोधक, इतिहास प्रेमी, देशविदेशातील पर्यटक या किल्ल्यास भेटी देत असतात. रायगडावर पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. रायगड ऐतिहासिक किल्ला असल्यामुळे किल्ल्याचे पावित्र्य जपणे, किल्ल्यावर स्वच्छता ठेवणे हे आपले आद्यकर्तव्य आहे.*

***मुख्यशब्द:*** *रायगड किल्ला, शिवकालीन इतिहास, छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्याची राजधानी, ऐतिहासिक पर्यटन, मराठा साम्राज्य, किल्ल्यांची वास्तुरचना, राज्याभिषेक, महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा, पर्यटन विकास, रोपवे सुविधा, इतिहास संशोधन.*


## प्रस्तावना:

महाराष्ट्राला अतिशय प्राचीन असा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभला आहे.त्यामध्ये कोकणची प्राचीन भूमी, सह्याद्रीच्या उत्तुंग आणि अभेद्य पर्वतरांगा,गोदावरी, कृष्णा,कोयना,भीमा यासारख्या नद्यांच्या काठी असलेल्या प्राचीन ऐतिहासिक स्थळांनी सुशोभित केली आहे. मौर्य काळापासून, सातवाहन ते मराठ्यांच्या संघर्षशील इतिहासाच्या काळात देखील येथे अनेक धर्माची, अनेक संप्रदायाची तीर्थक्षेत्र निर्माण झाली आहेत.छत्रपती संभाजीनगर येथे वेरूळ आणि अजिंठाच्या लेण्या अतिशय प्राचीन असून या जगप्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रात प्राचीन,मध्ययुगीन काळातील अनेक मंदिरे आजही सुस्थितीत आहेत. यामध्ये कोल्हापूर अंबाबाईचे मंदिर,तुळजापूर तुळजाभवानीचे मंदिर, पंढरपूर विठ्ठलाचे मंदिर, नांदेड येथील शिखांचे दहावे व शेवटचे गुरु गोविंदसिंग यांचा गुरुद्वारा, वेरूळच्या लेणी मधील कैलास मंदिर,अष्टविनायक मंदिरे तसेच बौद्ध, जैन मंदिरे महाराष्ट्राच्या भव्यतेची साक्ष देतात.समुद्रकिनारा महाराष्ट्राच्या सौंदर्यात,पर्यटनात आर्थिक विकासात मोलाची भर घालतो.शिवकालीन किल्ले ही महाराष्ट्राच्या संपन्न इतिहासाची,संघर्षाची, शौर्याची साक्ष देतात. हे किल्ले आजही मराठ्यांचा इतिहासाच्या पाऊलखुणा बाळगून आहेत.

महाराष्ट्राला लाभलेला हा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक पातळीवरील विदेशी पर्यटकांना आकर्षित करत आहे.भारतात दरवर्षी लाखो विदेशी पर्यटक भेट देत असतात.तसेच महाराष्ट्रालाही विदेशी पर्यटक, देशांतर्गत पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात. त्यामुळे महाराष्ट्र हे पर्यटकांसाठी, संशोधकांसाठी, इतिहास प्रेमींसाठी 'नंदनवन' बनले आहे. इसवी सन 1969 महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ 'MTDC' स्थापना झाली. 'पर्यटनात 'पर्यटक' हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. पर्यटकाला इंग्रजीतील 'Tourist' हा शब्द वापरला जातो. लॅटिन भाषेतील Turnus पासून Tour आणि Tour पासून Tourist हा शब्द बनला आहे.'[1]

संस्कृत साहित्यात धार्मिक हेतूने प्रवास करण्यास 'तीर्थाटन', आर्थिक हेतु प्राप्तीसाठी प्रवास करणे 'देशाटन' आणि आराम व ज्ञानप्राप्तीच्या उद्देशाने प्रवास करणे त्यास 'पर्यटन' असे म्हटले आहे.मराठ्यांच्या इतिहासात किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*डॉ. बोकारे तुकाराम एकनाथराव, सहयोगी प्राध्यापक तथा संशोधन पर्यवेक्षक इतिहास विभाग प्रमुख श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगाव*



**How to cite this article:**

*बोकारे, . तुकाराम . एकनाथराव . (2026). शिवकालीन किल्ले व पर्यटन :रायगड -एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 224–227. https://doi.org/10.5281/zenodo.18480861*

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18480861

हे किल्ले मराठा साम्राज्याच्या संरक्षणाचे प्रतीक आहेत. 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांना "मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया" या नावाने युनेस्कोने रायगड, राजगड,प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी,लोहगड, साल्हेर,सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी व जिंजी यांना जागतिक वारसा दिला आहे.'[2]

**उद्दिष्टे:**

१. रायगड किल्ल्याच्या शिवकालीन ऐतिहासिक भूमिकेचा आढावा घेणे.
२. रायगड किल्ल्याचा पर्यटन वाढीतील योगदानाचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

१. रायगड किल्ल्यास शिवकाळात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.
२. रायगड किल्ल्याची पर्यटन वाढीमध्ये महत्त्वाची भूमिका आहे.

**रायगडाचे ऐतिहासिक महत्त्व:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांना अननसाधारण महत्व दिले.किल्ल्यांचे महत्त्व विशद करताना छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात,'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्गे नसता मोकला देश.परचक्र येताच निराश्रय प्रजा भग्न होऊन देश उध्वस होतो. देश उध्वस झाल्यावर राज्य यैसें कोण्हास म्हणावे.'[3] 'केळंदिनूपविजयम्'या ऐतिहासिक कानडी काव्यात रायगडाचे वर्णन करताना 'भूतलात आश्चर्यकारक गणला जाणारा रायरी' असे वर्णन कवीने केले आहे. शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा वध प्रतापगडाच्या पायथ्याशी केला आणि काही दिवसातच जावळीच्या मोरे यांना ठार मारून शिवरायांनी मे 1656 रोजी 'रायरी' ताब्यात घेतला.रायगडाला पूर्वी विविध पंधरा नावाने ओळखले जात होते. त्यामध्ये युरोपचे लोक रायगडास 'पूर्वेचे जिब्राल्टर' असे म्हणतात. तसेच रासिवटा,तणस,नंदादीप जम्बुद्वीप, इस्लामगड अशी अनेक नावे रायगडाची पाहायला मिळतात.शिवरायांनी रायगडाची निवड राजधानी म्हणून का केली तर रायगडाचा माथा राजधानी बनवण्यास सोयीचा होता, तसेच शत्रूला अवघड वाटणाऱ्या प्रदेशातील ते अतिशय अभेद्य व अवघड ठिकाण होते. त्यावर सभासद बखरकाराच्या मते, 'राजा खासा जाऊन पाहता गड बहुत चखोटा. चौतर्फा गडाचे कडे तासील्याप्रमाणे दिड गाव उंच. पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबाद पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीने थोडका. दौलताबादचे दशगुणी गड उंच, असें देखोन बहुत संतुष्ट जाले आणि बोलिले,'तक्तास जागा हाच गड करावा.'[4]

या किल्ल्याचा विस्तार प्रचंड असून समुद्रसपाटीपासून किल्ल्याची उंची 2900 फूट आहे. गडाला सुमारे 1435 पायऱ्या आहेत.'इंग्रज अधिकारी टॉमस निकल्स हा रायगड येथे शिवाजी महाराजांना भेटण्यासाठी आला.त्यांने त्याच्या रोजनिशीत 1673 च्या मे महिन्याच्या 23 तारखेला केलेल्या वर्णावरून रायगडाचे बांधकाम पूर्ण झाले होते असे लक्षात येते.'[5]

शिवराज्याभिषेक सोहळा :

6 जून 1674 रोजी म्हणजेच ज्येष्ठ शुद्ध त्रयोदिशीच्या दिवशी रायगडावर शिवरायांचा राज्याभिषेक झाला. शिवराज छत्रपती झाले, शककर्ते झाले. हा भारताच्या इतिहासातील ऐतिहासिक आणि महत्त्वाचा प्रसंग होता, कारण मोघलांच्या पाच-शाह्यांच्या आणि विदेशी डच, इंग्रज,पोर्तुगीज या सर्व शक्तींना विरोध करून शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले आणि ते स्वराज्याचे छत्रपती बनले.

शिवरायांनी रायगडाच्या बांधकामाची जबाबदारी 'हिरोजी इंदलकर'यांना दिली.हिरोजी इंदलकर यांनी रायगडावरील अनेक बांधकाम केले, त्यामधील जगदीश्वराच्या मंदिरात प्रवेश करताना पायरीवर त्यांचे नाव कोरले आहे.

रायगडावरील ऐतिहासिक पाहण्यासारखी ठिकाणे:

छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज यांच्या कारकिर्दीत रायगडावर इंग्रज,पोर्तुगीज,डच इत्यादींच्या वकिलांनी भेटी देऊन या किल्ल्याचे वर्णन करून ठेवले आहे. त्यातही इंग्रज वकील हेन्री ऑक्सिडेंन हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी प्रत्यक्ष गडावर उपस्थित होता. तसेच गोन्कालो,मर्तिन्स, टॉमस निकल्स रायगडाला भेट दिली आहेत. त्यामध्ये त्यांनी रायगडावरील बांधकामाचे वर्णन करून ठेवले आहे.

**महादरवाजा:**

रायगड किल्ल्याच्या पश्चिमेकडे महादरवाजा असून हा रायगडावरील मुख्य प्रवेशद्वार आहे. महादरवाजा हा किल्ल्यावर जाण्याचा एकमेव मार्ग आहे. या दरवाज्यास ऐतिहासिक तसेच युद्ध शास्त्रीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. हा दरवाजा दगडी बांधकामाचा असून अत्यंत मजबूत आहे. महादरवाजाला दोन्ही बाजूस उंच बुरुज असून ते भक्कम स्थितीत आहेत. एका बुरुजाची उंची 75 फूट व दुसऱ्या बुरुजाची उंची 65 फूट अशी आहे. या दरवाजास दोन्ही बाजूस 'कमळपुष्प' आहेत याचा अर्थ या ठिकाणी 'लक्ष्मी आणि सरस्वती' एकत्र नांदत आहेत.दरवाजाचे गोमुखी वळण पार केल्यावर परत दोन बुरुज लागतात या दरवाजाची रचना शत्रूस चक्रावते.

नाणे दरवाजा: 'नाणे दरवाजास दोन कमानी आहेत. या दोन कमानी मधील अंतर 10 फुट आहे. या कमानीची उंची अनुक्रमे बारा व चौदा फूट आहे. या दोन्ही कमानीच्या दरम्यान सतरा पायऱ्या आहेत. नाणे दरवाजापासून महादरवाजा एक हजार फूट उंचावर आहे.'[6]

**वाघ दरवाजा:**

वाघ दरवाज्यासच चोर दरवाजा असे देखील म्हणतात. 'किल्ल्यास एक दरवाजा थोर अयब आहे'. म्हणजेच 'किल्ल्यास एक दरवाजा असणे चुकीचे आहे' याकरिता दोन-तीन दरवाजे तसेच चोर दिंड्या करून ठेवाव्यात असे रामचंद्रपंत अमात्यांनी त्यांच्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

आज्ञापत्रात लिहून ठेवले आहे. रायगडावर असलेल्या मुख्य दरवाजा व्यतिरिक्त शत्रूच्या आक्रमणावेळी उपयोगाला पडावा यासाठी हा दरवाजा बांधण्यात आला होता. हा दरवाजा कुशावर्त तलावाच्या पुढे उतारावर आहे.राजाराम महाराजांनी याच मार्गाने रायगड सोडला असावा,अशी शक्यता वर्तवली जाते.

उंच मनोरे : गंगासागर तलावाच्या दक्षिणेस दोन उंच मनोरे असून सध्या ते भग्न अवस्थेत आहेत पूर्वी ते पाच मजली होते.

बालेकिल्ला : किल्ल्याचा प्रमुख भाग म्हणून बालेकिल्ला ओळखला जातो. हा अतिशय महत्त्वाचा असून याची पूर्व-पश्चिम लांबी तिनशे यार्ड असून दक्षिणोत्तर रुंदी दीडशे मीटर आहे. बालेकिल्ल्याच्या उजव्या बाजूस राण्यांचे सात महाल किंवा वाड्यांचे अवशेष लागतात.

**सिंहासनाची जागा:**

बालेकिल्ल्याच्या मध्यभागी गंगासागर तलावाच्या पूर्वेला सिंहासनाची जागा आहे. सिंहासनाभोवती बांधिव चौथरा आहे. तो सुस्थितीत आहे. पूर्वी सिंहासनासमोर पाच फूट रुंदीचा मोकळा मार्ग ठेवलेला असे. 'सिंहासनासमोर बालेकिल्ल्याच्या पूर्वेकडील तटात बारा कमानदार खिडक्या आहेत. शिवकाळात सिंहासना समोरच्या मोकळया जागेत कारंजे फवारत असे, त्यांचे अवशेष अजूनही शिल्लक आहेत या कारंजा शेजारी नगर खाना आणि बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे.'[7]

**नगारखाना:**

सिंहासनाच्या समोर भव्य प्रवेशद्वार आहे तो हाच नगारखाना, नगार खाण्याजवळ बोललेले सिंहासनाच्या जवळ स्पष्ट ऐकू येते, हे शिवकाळातील बांधकामाचा अतिशय उत्कृष्ट असा नमुना आहे. किल्ल्यावरील मनोऱ्याचे व नगारखाण्याचे शिल्प सारासीन पद्धतीचे असावे. नगारखाना हे बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे.

**बाजारपेठ:**

नगारखान्याकडून डावीकडे उतरून आले की समोर जी मोकळी जागा आहे ती 'होळीचा माळ'. तेथे छत्रपती शिवरायांचा भव्य पुतळा आहे. या ठिकाणी जे अवशेष दिसतात तीच भव्य अशी बाजारपेठ असून या पेठेच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी बावीस दुकाने असून या पेठेमधून चाळीस फूट रुंदीचा रस्ता आहे.

शिरकाई देवीचे मंदिर : ही रायगडावरील मुख्य देवता असून पाचव्या शतकापासून शिर्के हे रायगडाचे स्वामी होते याची ही गडस्वामिनी आठवण करून देते.

**जगदीश्वर मंदिर:** गडावरील महत्त्वाची वास्तू म्हणजे जगदीश्वराचे मंदिर होय. हे महादेवाचे भव्य असे मंदिर आहे मंदिरासमोर नंदीची भव्य व सुबक मूर्ती भग्न अवस्थेत आहे.मंदिराच्या सभामंडपात मध्यभागी कासवमूर्ती आहे.तसेच गाभाऱ्याच्या भिंतीस हनुमानाची उत्कृष्ट मूर्ती दिसते. मंदिराच्या पहिल्या पायरीवर 'सेवेची ठाई तत्पर हिरोजी इंदलकर' असा शिलालेख कोरलेला आहे.

**शिवछत्रपतींची समाधी:**

शिवरायांची समाधी देखील गडावरील महत्त्वाची अशी वास्तू आहे ही समाधी अष्टकोणी चौथऱ्यावर आहे. सध्या या चौथ्यावर घूमटाकृती स्मारक उभारले असून या समाधीच्या समोरील दरवाजाच्या उजव्या बाजूस भिंतीवर शिलालेख कोरलेला आहे.

याबरोबरच रायगडावर कुशावर्त तलाव,हत्ती तलाव,हिरकणी बुरुज, पालखी दरवाजा,टकमक टोक, राणीमहाल इत्यादी वास्तु व स्थळे संशोधकांना, पर्यटकांना व इतिहास प्रेमींना पाहण्यासारखी आहेत.

रायगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व :

रायगड ही स्वराज्याची राजधानी म्हणून संपूर्ण विश्वात प्रसिद्ध आहे. शिवरायांनी राजधानीसाठी रायगडाची निवड केली ती रायगडाने सार्थ ठरवली. रायगड किल्ला हा लष्करी दृष्ट्या आणि प्रशासकीय दृष्ट्या अभेद्य किल्ला आहे. रायगडाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा रोमांच अनुभवला.छत्रपती संभाजी महाराजांचा ही राज्याभिषेक या किल्ल्यावर झाला आहे. राजमाता जिजाऊ,राजाराम महाराज तसेच शिवकाळातील अनेक महान आणि कर्तबगार अशा व्यक्तींचे येथे वास्तव्य होते. मराठा अस्मितेचा मानबिंदू म्हणून तसेच मराठा साम्राज्याच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतीक म्हणून रायगड किल्ल्यास अनन्य साधारण महत्व आहे.

**रायगड आणि पर्यटन:**

रायगडावर दरवर्षी लाखो इतिहासप्रेमी,इतिहास संशोधक,पर्यटक येत असतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनी तर लाखो शिवप्रेमी शिवरायांचा 'राज्याभिषेक सोहळा याची देही याची डोळा' अनुभवण्यास येतात.रायगडावर आलेल्या पर्यटक इतिहासातील रोमांचकारी प्रसंग अनुभव आपल्या स्मृतीत साठवून जातो. रायगडावर इतिहासाच्या पाऊलखुणा आजही पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करतात. रायगडाचे वैभव पृथ्वीवरील स्वर्गासारखे होते.शिवरायांनी रायगडाहून स्वराज्याचा कारभार पाहिला. येथे शिवकाळातील अनेक वास्तू पाहण्यासारख्या आहेत. रायगडाला भेट दिल्यानंतर एक वेगळी उर्जा प्राप्त होते.तसेच जगण्याची उमेद निर्माण होते. निसर्गरम्य वातावरण,उंच-उंच डोंगररांगा,त्यातून वाहणारे धबधबे,नागमोडी वळणाच्या पाऊलवाटा या ट्रेकर व पर्यटकांना आकर्षित करतात. रायगडावर देशविदेशातील पर्यटकही भेट देण्यासाठी येतात. रायगड हे ऐतिहासिक पर्यटन स्थळ आहे. पावसाळ्यात देखील मोठ्या प्रमाणामध्ये दररोज पर्यटक रायगडाला भेट देत असतात. त्यामुळे रायगडाच्या पर्यटनामध्ये भर पडत आहे. याचाच फायदा हॉटेल व्यवसायिक, दुकानदार तसेच स्थानिकांना रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला आहे. रायगडावर जाण्यासाठी रोपवेची व्यवस्था केली आहे. त्यामुळे लहान मुले,वृद्ध यांना देखील रायगडाचे दर्शन घेता येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

रायगड किल्ल्याच्या परिसरात उत्तम हॉटेल आणि रिसॉर्ट उपलब्ध आहेत.तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने MTDC चे पर्यटकांसाठी उत्तम रिसॉर्ट उपलब्ध आहे. महाड शहरात काही चांगले हॉटेल उपलब्ध आहेत.

रायगड किल्ल्यावर जाण्याचे मार्ग :

पुण्याहून रायगड किल्ल्याचे अंतर एकशे तीस किलोमीटर आहे. कारने किंवा बसने रायगडला जाता येऊ शकते. तसेच मुंबईहून रायगड किल्ल्याचे अंतर सुमारे 170 किलोमीटर आहे. रायगड किल्ल्याजवळचे रेल्वे स्टेशन माणगाव आहे. रायगड किल्ल्याजवळ थेट विमानतळ नाही. रायगड किल्ला हा पर्यटकांसाठी वर्षभर उघड असतो, परंतु ऑक्टोबर ते मार्च हा भेट देण्यासाठी सर्वोत्तम काळ आहे.

**संदर्भ:**

1. प्रा. डॉ. घारपुरे विठ्ठल, पर्यटन भूगोल,पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर,प्र., आ.,जून, 2001 ,पृ.5.
2. www.wikipedia.com.
3. ढेरे रां.ची., जोशी प्र. न .(संपा.) रामचंद्र अमात्य प्रणीत स्वराज्यनीती आज्ञापत्र,ओरा अँड कंपनी पब्लिशर्स, प्रा.,लि., 1960, पृ. 91.
4. जोशी श.ना., कृष्णाजी अनंत सभासद विरचित आद्य छत्रपती श्री शिवाजी राजे यांची बखर, पृ.67.
5. जोशी श. ना.,( संपा.),शिवकालीन पत्र सार संग्रह, खंड 2, लेखांक 1536,पृ. 439, 440.
6. आवळसकर शां.वि., महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,1995, पृ.7.
7. उपरोक्त कित्ता ,पृ. 10.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन आणि भारत

**डॉ. राहुल चोखाजी साळवे**

इतिहास विभाग प्रमुख, राजमाता जिजाऊ महाविद्यालय, ता. किल्ले-धारूर, जिल्हा. बीड

**Manuscript ID:**

JRD -2026-180156

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 1(V)

Pp. 228-232

January 2026

**Submitted:** 15 Dec. 2025

**Revised:** 25 Dec. 2025

**Accepted:** 15 Jan.2026

**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:***

*भारतामध्ये प्राचीन काळापासून पर्यटन, तीर्थाटन आणि देशाटन यांची परंपरा आढळते. पर्यटनामुळे ज्ञान, संस्कृती आणि कला यांचा प्रसार झाला असून आधुनिक काळात ते एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाले आहे. पर्यटनामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते, रोजगारनिर्मिती होते आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढते. भारतात पर्यटन क्षेत्राचा जीडीपीमध्ये मोठा वाटा असून वैद्यकीय, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाला विशेष संधी आहे. तथापि, व्हिसा प्रक्रिया, पायाभूत सुविधांची कमतरता, स्वच्छतेचा अभाव, सुरक्षा आणि जागतिक स्तरावरील अपुरा प्रचार ही काही प्रमुख आव्हाने आहेत. प्रवेश सुलभ करणे, प्रीमियम अनुभव विकसित करणे, सेवा गुणवत्ता सुधारणे आणि जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करणे यामुळे भारत उच्च-मूल्यवान पर्यटकांना आकर्षित करू शकतो. २०४७ पर्यंत भारताला जागतिक पर्यटन नकाशावर ठळक स्थान मिळवून देण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न आवश्यक आहेत.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन, भारत, पर्यटन उद्योग, आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती, सांस्कृतिक देवाणघेवाण, पायाभूत सुविधा, वैद्यकीय पर्यटन, उच्च-मूल्यवान पर्यटक, जागतिक ब्रँडिंग.*

## प्रस्तावना

भारताच्या प्राचीन इतिहासाची पाने उलटून पाहिली, तर लक्षात येते की, पर्यटन, तीर्थाटन आणि देशाटन यासाठी लोक प्रवास करत असत आणि त्याचा उपयोग कला-सौंदर्याचा विकास, ज्ञानार्जन अन् आध्यात्मिक उन्नती यांसाठी करण्यात येत असे, हे स्पष्ट कळून येते. इतिहासाचीही साक्ष आहे की, अरबस्तान आणि ग्रीस देशांत गणित, तत्त्वज्ञान अन् ज्योतिष इत्यादींचे अमूल्य ज्ञान तिथल्या पर्यटकांनीच इथून नेले होते. चीन देशाचे पर्यटक ह्येन सांग आणि फाहियान यांची कथा तर सर्वच जाणतात. त्यांनी भारतीय ज्ञान आणि संस्कृतीच्या अनेक मूल्यवान गोष्टी इथे ग्रहण केल्या अन् स्वत:च्या देशात जाऊन तेथील लोकांना त्यांनी ते ज्ञान दिले. अशाच प्रकारे भारताचे पर्यटक कुमारजीव, कौंडिण्य, बोधिधर्म यांनीही आपल्या आचरणाने, तपश्चर्येने आणि ज्ञानाने तेथील देशाच्या रहिवाशांना कृतार्थ केले. प्राचीन काळात हे जे घडले त्याचे पुनः मूल्यांकन करणे, त्यांचे नव्याने चलन चालू करणे, ही आजच्या काळाची सर्वांत मोठी आवश्यकता आहे. पर्यटन म्हणजे प्रवास. इंग्रजी भाषेतील 'टूरिझम' या संज्ञेचा हा पर्याय आहे. इंग्रजी भाषेत 'टूरिस्ट' म्हणजे 'पर्यटक' ही संज्ञा 'ट्रॅव्हलर' (प्रवासी) या शब्दाऐवजी एकोणिसाव्या शतकारंभी वापरण्यात येऊ लागली.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*डॉ. राहुल चोखाजी साळवे, इतिहास विभाग प्रमुख, राजमाता जिजाऊ महाविद्यालय, ता. किल्ले-धारूर, जिल्हा. बीड*

**How to cite this article:**

*साळवे, . राहुल . चोखाजी. (2026). पर्यटन आणि भारत. Journal of Research & Development, 18(1(V)), 228–232. https://doi.org/10.5281/zenodo.18480914*

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18480914

OPEN ACCESS

आधुनिक काळात पर्यटन हा एक स्वतंत्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाल्याचे दिसून येते. देशातील व परदेशांतील पुरावास्तू, इतिहासप्रसिद्ध व निसर्गरम्य स्थळे, प्राचीन कलानिर्मितीची केंद्रे, पवित्र तीर्थक्षेत्रे, प्रचंड औद्योगिक व इतर प्रकल्प इत्यादींचे आकर्षण ही पर्यटनामागील मुख्य प्रेरणा होय. ही प्रेरणा सार्वत्रिक व सर्वकालीन असली, तरी आधुनिक काळातील ज्ञानप्रसाराची व दळणवळणाची सुलभ साधने विकसित झाल्याने आधुनिक पर्यटन-उद्योगास विशेष चालना मिळाली. निसर्गनिर्मित व मानवनिर्मित रम्य व भव्य असे इहलोकीचे जे सौंदर्य आहे, त्याची खास आस्था हा आधुनिक माणसाचा धर्म आहे. ते सौंदर्य सर्वांसाठी आहे, अशीही आधुनिक माणसाची धारणा आहे. पर्यटनामागील आधुनिक माणसाची प्रेरणा वरील भूमिकेचा निर्वाळा देते. "पर्यटन" या शब्दाबद्दल एक मनोरंजक तथ्य - या शब्दाची उत्पत्ती स्वतः संशोधनात आहे. पर्यटन संशोधक थिओबाल्ड यांच्या मते, "टूर" हा शब्द लॅटिन शब्द "टॉर्नरे/टॉर्नस" आणि ग्रीक शब्द "टॉर्नोस" पासून आला आहे, ज्याचा आधुनिक इंग्रजीमध्ये अर्थ "एखाद्याच्या वळणाचे प्रतिनिधित्व करणे" असा होतो. असे आढळून आले आहे की पर्यटनाच्या व्याख्या स्त्रोतानुसार वेगवेगळया असतात. पर्यटनाच्या व्याख्येबाबत कोणतेही स्पष्ट एकमत नाही. हे युनिट फक्त काही सामान्यतः संदर्भित व्याख्यांचे वर्णन करते.

पर्यटनाचे वर्णन "अनिवासी लोकांच्या प्रवास आणि स्थलांतरातून उद्भवणाऱ्या घटना आणि संबंधांचा योग" असे केले जाते. यामध्ये, लोक त्यांच्या घरांपासून दूर प्रवास करतात आणि कोणत्याही उत्पन्न देणाऱ्या कार्यात गुंतलेले नसतात."

आधुनिक काळातील पर्यटकांच्या वर्गात विविध उद्देशांनी प्रवास करणाऱ्यांचा अंतर्भाव होतो. मुख्यतः पर्यटनकाळ हा मर्यादित असतो. आठवड्यातील सुट्या, रजा तसेच एखाद्या कार्याचा वा कार्यक्रमाचा भाग म्हणून नियोजित कालावधीत पर्यटन केले जाते. प्रेक्षणीय स्थळे पाहणे, आरोग्यधामात निवास करणे. अभ्यास वा संशोधन करणे, सदिच्छा भेटीचा घटक म्हणून प्रसिद्ध स्थळे पाहणे यांसारख्या विविध हेतूंनी पर्यटकांची ये-जा चालू असते. उत्प्रवासी (एमिग्रंट), आप्रवासी (इमिग्रंट) आणि स्थलांतर करणारे मजूर इत्यादींपेक्षा पर्यटक हे वेगळे समजले जातात. आधुनिक अर्थशास्त्रीय परिभाषेत पर्यटक हा सामान्यतः ग्राहक वा उपभोक्ता समजला जातो. तो उत्पादक नसतो. पर्यटनाचे क्षेत्र अंतर्देशीय तसेच आंतरराष्ट्रीय असते. जुन्या पर्यटनस्थळांची व्यवस्था राखणे व नवीन पर्यटनस्थळे विकसित करणे, ही पर्यटन उद्योगाची महत्त्वाची अंगे होत. अनुषंगाने देशी-परदेशी पर्यटकांना आकृष्ट करणे, त्यासाठी नियोजनपूर्वक प्रसिद्धियंत्रणा उभी करणे, पर्यटकांना वाहतुकीच्या तसेच निवास-भोजनादी सुखसोयी उपलब्ध करून देणे, हेदेखील पर्यटन उद्योगाचे महत्त्वाचे घटक ठरतात. पर्यटनाद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळ्यांवर परस्परांविषयी सामंजस्य व सद्भाव निर्माण करण्याचे कार्यही साधले जाते. आधुनिकपूर्व काळातील प्रवासाची उद्दिष्टे प्राधान्याने धार्मिक, व्यापारी व विद्याध्ययनात्मक असत. पश्चिमी प्रबोधनकाळापासून एकूणच जीवनविषयक दृष्टिकोन हा इहलोकनिष्ठ होऊ लागला व सांस्कृतिक, ऐतिहासिक, कालवाङ्मयीन, नव्याजुन्या निर्मितीबद्दल नवे आकर्षण निर्माण झाले. आधुनिक पर्यटनदृष्टीचा आरंभ तेव्हापासूनच झाला, असे म्हणता येईल. ही दृष्टी केवळ धनिक वर्गापुरतीच मर्यादित न राहता, ती सर्वसामान्य लोकांतही निर्माण होऊ लागली.

पश्चिमी प्रबोधनकाळात पर्यटनाचे उद्दिष्ट अधिक मौलिक स्वरूपाचे ठरले. टॉमस कुकने ६०० लोकांची लीसेस्टर ते लाफबरो अशी रेल्वेसहल आयोजित केली, १८५५ च्या पॅरिस प्रदर्शन काळात, कुकने लीसेस्टर-कॅले अशा सहली काढल्या व पुढल्याच वर्षी संबंध यूरोपची भव्य अशी पहिली वर्तुळाकार सहल यशस्वीपणे घडवून आणली. काही वर्षांनंतर कुकने मोठ्या प्रमाणात पर्यटक तिकिटे विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला. अशा तऱ्हेने आधुनिकपर्यटनयुगाचा प्रारंभ झाला.

**आर्थिक दृष्टिकोन :** आर्थिक दृष्टिकोनातून पर्यटन उद्योग महत्त्वाचा ठरतो. पर्यटन उद्योगमुळे सेवाउद्योगांना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. वस्तू, त्यांचे उत्पादन, वितरण व सेवन हेच दीर्घकाळ आर्थिक विश्लेषणाचे प्रमुख चर्चाविषय होते आणि परिणामी सेवाउद्योगांकडे दुर्लक्ष झाले होते. पर्यटनाच्या योगे देशांत-परदेशांत होणारी माणसांची वाढती वर्दळ व हालचाल ह्यांमुळे सेवाक्षेत्राला एकूण उत्पादनाच्या वर्तुळात महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊ लागले. पर्यटनामुळे व्यापाराचे प्रमाण व परिणाम यांचा विस्तार झाला. हिमाच्छादित पर्वतशिखरे, निर्मनुष्य समुद्रकिनारा, निर्मनुष्य वनप्रदेश या उपेक्षणीय गोष्टी पर्यटनक्षेत्रात येऊ लागल्या व त्या प्रथम दर्जाच्या आर्थिक मत्ता ठरल्या.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटनामुळे जो प्रत्यक्ष पैसा मिळतो, त्याहीपेक्षा राष्ट्रीय उत्पन्नामध्ये गुणक परिणामामुळे जी भर पडते किंवा पर्यटक खर्चाच्या उलाढालींमुळे निर्माण होणाऱ्या पैशाची जी भर पडते, तिचे महत्त्व अधिक असते. याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे करता येईल : पर्यटनावर पैशाचा जो प्रत्येक एकक खर्च होत असतो, तो सबंध अर्थव्यवस्थेत फिरत राहतो आणि त्यायोगे त्याच्याशी ज्या ज्या लोकांचा संबंध येत राहतो, त्यांचा वाढीव प्रमाणात फायदा होत राहतो. अर्थशास्त्रज्ञांनी पर्यटनाचा गुणक परिणाम भारताच्या बाबतीत ३·५ एवढा काढला आहे. सोप्या शब्दांत सांगायचे तर, एका पर्यटकाचा एक रुपया खर्च झाल्यास, त्यायोगे अर्थव्यवस्थेमध्ये ३·५ रुपये किंमतीची उलाढाल होते.

आंतरराष्ट्रीय पर्यटनाप्रमाणेच अंतर्गत पर्यटनाचाही देशाच्या आर्थिक स्थितीवर अनुकूल परिणाम होत असतो. मात्र याबाबतची आकडेवारी आंतरराष्ट्रीय पर्यटनाप्रमाणे सुलभपणे मिळू शकत नाही. ढोबळ अंदाजाप्रमाणे अंतर्गत पर्यटनामुळे जी आर्थिक उलाढाल निर्माण होते, ती आंतरराष्ट्रीय पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या उलाढालीच्या दसपटींनी अधिक असते.

पर्यटनामुळे होणारा आणखी एक अतिशय महत्त्वाचा लाभ म्हणजे मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या रोजगारसंधी. पर्यटन हा श्रमप्रधान सेवाउद्योग असल्यामुळे आणि विकसनशील देशांमध्ये मोठ्या संख्येने श्रमिकांची उपलब्धता असल्याने, पर्यटनउद्योगाचा विकास बेकारी व अर्धरोजगारी या समस्यांचे काही प्रमाणात निराकरण करू शकतो.

पर्यटन क्षेत्रातील रोजगारक्षमतेचा आणखी एक फायदा रोजगाराचे विविधांगी स्वरूप हा होय. लहानमोठ्या वयोगटांतील माणसे, शिक्षित व अशिक्षित, कुशल व अकुशल, नागरी व ग्रामीण अशा प्रकारच्या लोकांना पर्यटनामुळे रोजगार मिळू शकतो. उदा., पर्यटन-प्रतिनिधी (एजंट), सहल-संयोजक, मार्गदर्शक किंवा वाटाड्या, हॉटेल-व्यवस्थापक, स्वागतकार, कारकून, हिशेबनीस, आचारी व त्यांचे साहाय्यक, मनोरंजनकार, जाहिरातदार, छायाचित्रकार, पुष्परचनाकार, सुशोभनकार, हमाल इत्यादी. स्पेनमध्ये कामकरी लोकसंख्येच्या ८% लोक व स्वित्झर्लंड या ६२·९७ लक्ष लोकसंख्येच्या छोट्या देशातील कामकरी लोकांपैकी ५% लोक पर्यटन उद्योगात गुंतलेले आहेत. स्पेन, हाँगकाँग, बहामा, थायलंड यांसारखे देश तर आपल्या अर्थव्यवस्था या उद्योगाभोवतीच गुंफण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसतात.

भारताच्या पर्यटन हे देशातील अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे आणि ते वेगाने वाढत आहे. वर्ल्ड ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम कौन्सिलने असे अनुमान काढले आहे की २०१८ मध्ये पर्यटनाने १६.९१ लाख कोटी रुपये (यूएस डॉलर २४० अब्ज) किंवा भारताच्या जीडीपीच्या ९.२% उत्पन्न कमावले. पर्यटनाने ४२.६७३ दशलक्ष रोजगारांना पाठिंबा दिला, जे एकूण रोजगारातील ८.१% आहे. या क्षेत्राची वार्षिक वाढ ६.९% दराने होईल असा अंदाज आहे. हैदराबाद आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भारताच्या एकमेव विमानतळ आहे जे जगातील पहिल्या दहा विमानतळांपैकी एक आहे. ऑक्टोबर २०१५ मध्ये भारताच्या वैद्यकीय पर्यटन क्षेत्राची किंमत ३ अब्ज अमेरिकी डॉलर इतकी होती. २०१४ मध्ये १.८ लाख परदेशी रुग्णांनी वैद्यकीय उपचार घेण्यासाठी भारतात प्रवास केला.

**पर्यटन क्षेत्रातील अडथळे:**

**व्हिसा आणि प्रवासातील अडथळे:** कागदपत्रे, गुंतागुंतीच्या मंजुरी आणि मर्यादित व्हिसा-मुक्त प्रवेश यामुळे परदेशी पर्यटकांना (FTAs) भारतात प्रवेश करणे कठीण होते. उदाहरणार्थ, फक्त भूतान, नेपाळ आणि मालदीवचे नागरिकच व्हिसाशिवाय भारतात प्रवास करू शकतात, तर चीन ७० देशांमध्ये आणि थायलंड ९० देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेशाची परवानगी देतो.

**कमकुवत पायाभूत सुविधा:** मर्यादित हॉटेल खोल्या आणि अविकसित वाहतूक नेटवर्क पर्यटकांच्या सोयींमध्ये अडथळा आणतात. चीनमध्ये २ कोटींच्या तुलनेत भारतात अंदाजे २००,००० हॉटेल खोल्या आहेत. अनेक सरकारी मालकीची हॉटेल्स तोट्यात चालत आहेत, ज्यामुळे गुंतवणूक निराश होत आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**स्वच्छतेचा अभाव:** विमानतळ आणि सार्वजनिक क्षेत्रांभोवती कचरा व्यवस्थापनाचा अभाव आणि अस्वच्छ वातावरण पर्यटकांवर नकारात्मक प्रभाव पाडते, विशेषतः स्वच्छ आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळांच्या तुलनेत.

**सुरक्षा चिंता:** अपुरी सुरक्षा आणि आपत्कालीन सेवा पर्यटकांसाठी धोका निर्माण करतात, विशेषतः दुर्गम किंवा जास्त रहदारी असलेल्या भागात.

**जागतिक स्तरावर कमी प्रचार:** भारतात मजबूत, शाश्वत आंतरराष्ट्रीय विपणन मोहिमेचा अभाव आहे. "अतुल्य भारत" सारखे मागील उपक्रम यशस्वी झाले होते, परंतु गेल्या दशकात कोणतीही मोठी मोहीम झालेली नाही. जुलै २०२५ पर्यंत, भारतात युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांची संख्या ४४ असेल, तर ग्रीसमध्ये जवळपास निम्मी आहे, परंतु तिप्पट पर्यटक आकर्षित करतात. हे सांस्कृतिक संसाधनांचा अपुरा वापर, कमकुवत जागतिक ब्रँडिंग, असमाधानकारक पर्यटक सुविधा आणि मर्यादित प्रचार दर्शवते, ज्यामुळे भारताला उच्च-मूल्याच्या पर्यटकांना आकर्षित करणे कठीण होत आहे.

**शहरी आणि कनेक्टिव्हिटी अंतर:** दुर्गम किंवा उच्च-संभाव्य स्थळांपर्यंत पोहोचण्यास कठीण असल्याने पर्यटकांचे आगमन कमी होते. हिमालयीन धार्मिक सर्किटसारखे क्षेत्र रस्ते, विमानतळ आणि निवासस्थानांच्या बाबतीत अविकसित राहतात.

### भारत उच्च-मूल्यवान पर्यटकांना कसे आकर्षित करू शकतो?

**प्रवेश आणि प्रवास सुलभ करणे:** ई-टूरिस्ट व्हिसा आणि व्हिसा-ऑन-अरायव्हल अधिकाधिक देशांमध्ये वाढवणे आणि त्यांना जलद आणि अधिक परवडणारे बनवणे आगमन वाढवू शकते. उच्च-मूल्यवान पर्यटकांना सुधारित विमानतळांद्वारे अखंड प्रवास, जलद इमिग्रेशन आणि बहुभाषिक समर्थन आवश्यक आहे.

**विशेष, प्रीमियम अनुभवांना प्रोत्साहन देणे:** आयुर्वेद रिट्रीट, लक्झरी वन्यजीव सफारी, आध्यात्मिक कल्याण टूर, उच्च-स्तरीय सांस्कृतिक उत्सव आणि नदी क्रूझ यासारख्या विशिष्ट पर्यटन उपक्रमांना प्रोत्साहन देणे अशा पर्यटकांना आकर्षित करते जे अधिक पैसे देण्यास तयार असतात. लक्षद्वीप, त्याचे निर्मळ समुद्रकिनारे, प्रवाळ खडक आणि स्वच्छ पाणी असलेले, उच्च-मूल्यवान पर्यटन स्थळ म्हणून प्रचंड क्षमता आहे. शाश्वत पर्यटन पद्धती आणि काळजीपूर्वक नियोजित पायाभूत सुविधांसह, ही बेटे एक प्रमुख पर्यटन केंद्र बनू शकतात.

लक्झरी अनुभवांचे प्रदर्शन करण्यासाठी प्रभावशाली, प्रवास लेखक आणि मत निर्मात्यांना आमंत्रित केल्याने आकांक्षा निर्माण होतील आणि जनजागृती वाढेल.

**सर्किटद्वारे पर्यटन स्थळांची विविधता दाखवणे:** स्वदेश दर्शन आणि प्रसाद सारख्या योजनांचा वापर अनुभवांना प्रीमियम प्रवास कार्यक्रमांमध्ये पॅकेज करण्यासाठी केला जाऊ शकतो, जसे की आंतरराष्ट्रीय यात्रेकरूंसाठी बौद्ध सर्किट, कल्याण आणि साहस यांचे संयोजन करणारे लक्झरी हिमालयीन सर्किट आणि उच्च दर्जाचे प्रसाद स्थळांसह आध्यात्मिक सर्किट. हे उपक्रम भारताला एका सिंगल-स्टॉप डेस्टिनेशनपासून बहु-दिवसांच्या, तल्लीन करणाऱ्या प्रवासात रूपांतरित करतात, पर्यटकांना जास्त काळ राहण्यासाठी आणि अधिक खर्च करण्यास प्रोत्साहित करतात.

**जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटी:** राज्यांसोबत आव्हान-मोड भागीदारीद्वारे ५० शीर्ष पर्यटन स्थळे विकसित करण्याचा उपक्रम प्रीमियम सुविधा, लक्झरी हॉटेल्स आणि अखंड कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करतो. इन्फ्रास्ट्रक्चर हार्मोनाइज्ड मास्टर लिस्ट (HML) अंतर्गत हॉटेल्सचे वर्गीकरण केल्याने उच्च दर्जाच्या हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात खाजगी गुंतवणूक आकर्षित होईल, जे श्रीमंत पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

**सेवा गुणवत्ता सुधारणे:** उच्च दर्जाचे पर्यटक आराम आणि सुविधा शोधतात. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात मानवी संसाधनांना (शेफ, मार्गदर्शक, सेवा कर्मचारी) प्रशिक्षण देण्यावर अधिक लक्ष केंद्रित करणे महत्वाचे आहे. जागतिक दर्जाची हॉटेल्स, बुटीक स्टे, लक्झरी ट्रेन आणि क्रूझला प्रोत्साहन देणे.

**वैद्यकीय आणि आरोग्य पर्यटन:** आयुर्वेद, योग आणि निरोगीपणासह आधुनिक औषधांचा मेळ घालणारा 'हील इन इंडिया' उपक्रम भारताला जागतिक आरोग्य केंद्र म्हणून स्थान देतो. २०२६ पर्यंत वैद्यकीय प्रवासाचे मूल्य १३.४२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज असल्याने, भारत समग्र, उच्च-गुणवत्तेची काळजी घेणाऱ्या रुग्णांना आकर्षित करू शकतो.

**मूल्यवर्धन म्हणून ज्ञान:** ज्ञान भारतम मिशन (हस्तलिखितांचे डिजिटायझेशन, वारशाचे जतन) सारखे उपक्रम विद्वान आणि वारसा उत्साहींना लक्ष्य करणाऱ्या सांस्कृतिक पर्यटनाला पाठिंबा देऊ शकतात.

**सुरक्षितता आणि सुविधा मजबूत करणे:** २४x७ हेल्पलाइन, पर्यटक पोलिस, स्वागत पुस्तिका आणि बहुभाषिक मार्गदर्शक विश्वास निर्माण करू शकतात आणि अधिक पर्यटकांना आकर्षित करू शकतात.

पर्यटनामुळे भारताला रोजगार निर्मिती, परकीय चलन कमाई आणि जागतिक ब्रँडिंग मजबूत करून कोणत्याही शुल्काशिवाय जुळवून घेण्याचा मार्ग मिळतो. 'सेवा' आणि 'पाहुणे हेच देव आहे' यासारख्या मार्गदर्शक मूल्यांसह, भारत आपल्या पर्यटनाच्या लँडस्केपची पुनर्परिभाषा करू शकतो आणि २०४७ पर्यंत जागतिक दर्जाचे ठिकाण म्हणून उदयास येऊ शकतो.अशा प्रकारे पर्यटन उद्योग आपली आयुष्ये आर्थिक व सांस्कृतिक दृष्टिकोनांतून अधिक चांगल्या तऱ्हेने घडविण्याच्या अनेक संधी आपणास उपलब्ध करून देत असतो. या संधीचा लाभ उठविण्याकरिता, आपण आपली सर्व कल्पनाशक्ती, प्रदर्शनकला आणि प्रवर्तकीय चातुर्य पणास लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उत्तुंग पर्वतराजी, वन्य प्राणिजीवन प्रकर्षाने भरलेली घनदाट अरण्ये, थंड हिरव्यागार दऱ्या व खोरी, सुंदर व रम्य पुळणी यांच्या स्वरूपात निसर्गाने आपल्यावर वरदहस्त ठेवलेला असून अनन्य स्मारकशिल्पे, वैभवशाली सांस्कृतिक वारसा, रंगीबेरंगी मेळे व सण-उत्सव यांच्या स्वरूपात सबंध भारतवर्ष पर्यटकांचे स्वागत करण्यास उत्सुक झाला आहे. आपणास हे सर्व लक्षात येऊन आपला पर्यटन उद्योग अशा तऱ्हेने कार्यान्वित करावयास हवा की, येत्या काही वर्षांत जागतिक पर्यटनकारावर भारताचे स्थान ठळकपणे प्रतिबिंबित होऊ शकेल.

**संदर्भ ग्रंथ :**

संदर्भग्रंथ सूची

1. डॉ. विठ्ठल घारपुरे, पर्यटन भूगोल, पिंपळापुरे एंड. कंपनी पब्लिशर्स, नागपुर, २०१०, पृष्ठ ०२
2. कित्ता, पृष्ठ ०२.
3. डॉ. सुशीलकुमार छिल्लर, भारत में पर्यटन का विकास व संभावनाएँ. राहुल पब्लिशिंग हाउस. शास्त्री नगर, मेरठ २०१३, पृष्ठ ६५
4. डॉ. प्रमोद चव्हाण, उदयोन्मुख प्रवाह पर्यटन, संकल्प प्रकाशन, लातूर. २०१७, पृष्ठ २४
5. कित्ता, पृष्ठ २४.
6. अनुपम पांडे पर्यटन कां स्वरूप डिस्कव्हरी पब्लिशिंग हाउस नवी दिल्ली. २००७, पृष्ठ ११९
7. डॉ. विठ्ठल घारपुरे, पर्यटन भूगोल, पिंपळापुरे एंड. कंपनी पब्लिशर्स, नागपुर, २०१०, पृष्ठ १२५.
8. डॉ. सुरेशचंद्र बंसल, पर्यटन भूगोल व यात्रा प्रबंधन, मीनाक्षी प्रकाशन, मेरठ, २०११, पृष्ठ २२.
9. डॉ. प्रमोद चव्हाण, उदयोन्मुख प्रवाह पर्यटन, संकल्प प्रकाशन, लातूर. २०१७, पृष्ठ २५

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026


Original Article

# परभणी जिल्ह्यातील महत्वपूर्ण मंदिरे व पर्यटन स्थळे :एक अभ्यास


**नागेश सखारामपंत जोशी**
संशोधक विद्यार्थी प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड
**Email:** Nsj.joshi89@gmail.com



**Manuscript ID**:
JRD -2026-180157
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 233-239
January 2026
**Submitted:** 15 Dec. 2025
**Revised:** 25 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026



***सारांश***

*परभणी जिल्हा हा गोदावरी नदीच्या खोऱ्यात वसलेला असून ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक वारशाने समृद्ध आहे. सातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य आणि यादव यांसारख्या राजवंशांच्या पाऊलखुणांमुळे या प्रदेशाला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. धारासूरचे गुप्तेश्वर व केशवराज मंदिर, चारठाणा येथील हेमाडपंथी स्थापत्यकलेची मंदिरे, हजरत सय्यद शाह तुराबुल हक दर्गा तसेच जिंतूर येथील नेमगिरी जैन तीर्थक्षेत्र ही परभणीतील प्रमुख पर्यटन स्थळे आहेत. या स्थळांमुळे धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाला चालना मिळते; मात्र स्वच्छता, पिण्याचे पाणी, शौचालये आणि इतर मूलभूत सुविधांचा अभाव ही महत्त्वाची समस्या आहे. योग्य नियोजन करून आवश्यक सुविधा उपलब्ध केल्यास परभणी जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास होऊन पर्यटकांची संख्या वाढू शकते.*

***मुख्यशब्द:*** *परभणी जिल्हा, पर्यटन स्थळे, मंदिरे, धार्मिक पर्यटन, सांस्कृतिक वारसा, नेमगिरी, धारासूर, चारठाणा, पायाभूत सुविधा, पर्यटन विकास.*


## प्रस्तावना

भारतीय इतिहासाच्या पाऊलखुणा महाराष्ट्राच्या दर्याखोऱ्यातून विखुरलेल्या आहेत. यात प्राचीन शिल्प वैभवशाली परंपरा महाराष्ट्राच्या मातीचा व या ठिकाणी असलेल्या समृद्ध संस्कृतीचा गौरवशाली इतिहास अधोरेखित करतात महाराष्ट्र राज्याच्या हृदय भाग म्हणून मराठवाडा प्रदेश ओळखला जातो. दक्षिणगंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीच्या खोऱ्यात वसलेल्या परभणी हा मराठवाड्यातील मध्यवर्ती जिल्हा आहे. प्राचीन काळी परभणी या गावाला प्रभावती असे म्हणत असत. पुढे या नावाचा अपभ्रंश होऊन परभणी हे नाव झाले असावे.गोदावरी व तिच्या उपनद्यांनी संपन्न झालेला प्रदेश आहे.गोदावरी दुधना पूर्ण इत्यादी नद्यांनी समृद्ध असलेल्या परभणी जिल्ह्याला हजारो वर्षाची ऐतिहासिक परंपरा लाभलेली असून या ठिकाणी सातवाहन, राष्ट्रकूट चालुक्य व यादव राजवंशाच्या साम्राज्याच्या पाऊलखुणा आपल्याला आढळतात.सातवाहनांचा व्यापार तर रोम या राष्ट्राशी चालत होता.त्याचे काही प्राचीन मार्ग सुद्धा मराठवाड्याच्या या पावन भूमीत असल्याचे आपल्याला आढळून येतात. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून परभणी जिल्हा हा अतिशय समृद्ध असून या ठिकाणी प्राचीन मंदिरे व शिल्पकला विकसित होत गेल्याचे आपल्याला पाहायला मिळते जांभूळ बेट सारखे निसर्गरम्य ठिकाण तर येलदरी जलाशय चारठाणा येथील मंदिर स्थापत्य व शिल्प वैभव तसेच जिंतूर येथील नेमगिरीच्या लेण्या या परभणीच्या पर्यटनाच्या दृष्टीने पर्यटकांनी पाहण्याच्या महत्त्वपूर्ण बाबी आहेत. याची माहिती या संशोधनात देण्यात आली आहे.

## उद्दिष्टे

1. परभणी जिल्ह्यातील महत्वपूर्ण पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे
2. बाहेर गावाहून पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी गावात आवश्यक मूलभूत सोयी सुविधांची व्यवस्था उभी करणे


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**
*नागेश सखारामपंत जोशी, संशोधक विद्यार्थी प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड*



**How to cite this article:**
*जोशी, . नागेश . सखारामपंत . (2026). परभणी जिल्ह्यातील महत्वपूर्ण मंदिरे व पर्यटन स्थळे :एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 233–239.* https://doi.org/10.5281/zenodo.18480957

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18480957
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**संशोधन पद्धती**: प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक इतिहास संशोधन पद्धतीचा वापर करून पुस्तके तसेच आंतरजालावरील माहिती इत्यादी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**महत्वपूर्ण शब्द:** पर्यटन,पर्यटक,मंदिरे,परभणी जिल्हा ई.

### पर्यटन म्हणजे काय?

पर्यटन ही एक मानवी प्रवृत्ती व क्रिया असून तिचा सैद्धांतिक पातळीवरून शास्त्रोक्त पद्धतीने विश्लेषण करणारे शास्त्र म्हणजे पर्यटन शास्त्र होय.

पर्यटन हा शब्द इंग्रजीतील Tourism शब्दाचे मराठी रूपांतर आहे. Tourism हा शब्द (प्रवास) या शब्दापासून आणि हा शब्द लँटिन भाषेतील Tornus या शब्दापासून तयार झाला आहे.पुढे २० व्या शतकात पर्यटनशास्त्राच्या विकासाबरोबर टुरिझम या शब्दातील Tour शब्दाची संकल्पना निश्चित करण्यासाठीची प्रक्रिया सुरू झाली.1

### पर्यटनाचे उद्देश

प्रवास किंवा पर्यटन म्हणजे एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणे होय. प्रवासी हा आपला हेतू साध्य करण्यासाठी एखाद्या ठिकाणी जातो व परत आपल्या मूळ ठिकाणी येतो,असे म्हणता येईल.दिवसेंदिवस पर्यटनाच्या स्वरूपामध्ये आमुलाग्र बदल होत आहेत.याचे कारण म्हणजे पर्यटनाचे स्वरूप, व्याप्ती,कार्य यात बदल होत आहेत.

पर्यटनाचे मुख्य उद्देश पाहत असताना त्यात खालील काही महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश होतो.

१) आनंद प्राप्ती करणे
२) मौजमजा करणे
३) संशोधन करणे
४) करमणूक करणे
५) मनोरंजन करणे
६) देव देवतांचे दर्शन करणे
७) आपल्या देशाचा इतिहास व संस्कृती समजून घेणे
८) आपल्या परिसरातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक स्थळांना भेट देणे
९) कलास्थापत्य व मूर्तीकलांची पाहणी करणे
१०) शिक्षण तसेच आरोग्य, व्यापार व व्यवसायातून पर्यटन करणे.2

### पर्यटनाचे स्वरूप

पर्यटन ही एक क्रिया नसून ती एक चळवळ आहे. पर्यटनाचे हे स्वरूप स्थळ काल वेळेनुसार सातत्याने बदलत असल्याचे आपल्याला पाहायला मिळते.पर्यटनाचे स्वरूप हे प्राकृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक अशा मुद्यावर आधारलेले असल्याचे आपल्याला दिसून येते.

### पर्यटनाचे ऐतिहासिक स्वरूप

पर्यटनाचे क्षेत्र हे खूप व्यापक असून या पर्यटनाच्या क्षेत्रात दिवसेंदिवस झपाट्याने बदल होत आहेत.यापैकी ऐतिहासिक पर्यटन हा सुद्धा एक महत्त्वाचा भाग आहे. ऐतिहासिक विषयाअंतर्गत लेणी, चैत्यगृह, विहार, गडकिल्ले, स्मारके, मंदिरे,बारव अशी वारसा स्थळे प्रमुख भूमिका निभावतात.3

### पर्यटनाचे सांस्कृतिक आणि सामाजिक स्वरूप

सांस्कृतिक,सामाजिक घटकांअंतर्गत लोककला, कला, संगीत, नृत्य, साहित्य, सण-उत्सव, व्यापार इत्यादीं विषयांचा समावेश पर्यटनात होतो. एकमेकांच्या भाषा,संस्कृती,सभ्यतांची ओळख त्या माध्यमातून होऊ लागली आहे. म्हणजे पर्यटन विश्व बंधुत्व अथवा 'वसुधैव कुटुंबकम' या उक्तीला सार्थक करताना दिसत आहे. विविध जाहिराती मधून, भारतातील प्रसिद्ध खेळाडू व व्यक्ती यांच्या माध्यमातून अनेकदा स्थानिक पर्यटनावर भर देण्याचे आवाहन करण्यात आल्याचे आपल्याला दिसून येते.

### पर्यटनाचे धार्मिक स्वरूप

मानव हा समाजशील प्राणी आहे, संस्कृती ही मानवी बंध अधिक घट्ट करते.मानव संस्कृतीच्या विकासात भौतिक उन्नतीबरोबरच मानवाचा आध्यात्मिक विकास तथा आत्मोन्नती विशेष महत्त्वाची असते. याचा फायदा समाजाबरोबरच राष्ट्र विकासासाठी मोठ्या प्रमाणावर होतो.

### परभणी जिल्ह्यातील महत्वपूर्ण पर्यटन स्थळे

परभणी जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण विविध धर्माची प्रार्थना स्थळे आहेत.यामध्ये मंदिरे,दर्गा,जैन लेणी,बारव यांचा प्रामुख्याने समावेश होतो.या ठिकाणी यात्रा, महोत्सव,उरुस व विविध उत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक यात्रा व कार्यक्रम मोठ्या प्रमाणात आयोजित केले जातात.या माध्यमातून पारंपारिक व धार्मिक पर्यटन यावर प्रामुख्याने भर दिला जातो.यापैकीच काही महत्त्वपूर्ण मंदिरे, लेणी व पर्यटनस्थळे यांना भेट देण्यासाठी पर्यटकांनी नेमके या ठिकाणी कसे पोहोचावे? या ठिकाणी नेमके पाहण्यासारखी काय आहे? या सर्व वैशिष्ट्यपूर्ण बाबीवर प्रस्तुत संशोधन कार्यातून प्रामुख्याने प्रकाश टाकला जाणार आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**धारासुरचे गुप्तेश्वर मंदिर,केशवराज मंदिर,धारासुर ता.गंगाखेड**

पर्यटनाची व मंदिरे शिल्प आणि स्थापत्याच्या आवडीने पर्यटन करणाऱ्या सर्वांना धारासूरच्या मंदिराने, तेथील स्वर्गीय शिल्पांनी जणू भुरळ घालावी अशी रचना या मंदिराची आहे. गोदावरीच्या सानिध्याने येणारी समृद्धी, सांस्कृतिक वारसा या गावाला लाभलेला आहे. परभणी जिल्ह्यातील सर्वात सुंदर मंदिर,त्यावरील सुरसुंदरी,गोदावरीचे विशालपात्र या सर्व बाबी अभ्यासक, पर्यटक,भाविक भक्त या सर्वांनाच कायम आकर्षित करतात. धारासूर हे गाव परभणी जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारे असू पर्यटकांना मोहित करणारे आहे.

धारासूर येथे उत्तर चालुक्यकालीन गुप्तेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर पायापासून ते शिखरापर्यंत जसेच्या तसे उभे आहे. प्राचीन शिखर अस्तित्वात असणारे मराठवाड्यातील एकमेव मंदिर प्राचीन मंदिर आहे. अशा प्रकारचे हे मराठवाडयातील एकमेवाद्वितीय मंदिर आहे. या मंदिरावरील शिल्पकला विशेषतः सुरसुंदरीची शिल्पे पर्यटकांना कायमच आकर्षित करतात.4

सध्या या मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व खाते अंतर्गत सवानी कन्स्ट्रक्शन, मुंबई द्वारे सुरू आहे. येथील केशवाची विष्णू रूपातील नितांत सुंदर मूर्ती पर्यटक,भाविक,भक्तांसोबतच अभ्यासकांनाही मोहित पाडून भुरळ घालेल अशी आहे. महाराष्ट्रात नाशिक वगळता केवळ येथेच सिंहस्थपर्वावर कुंभमेळा भरतो. हा कुंभमेळा लघु स्वरूपाचा असतो.यामुळे धारासूरचे सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित होते.

**कसे पोहोचाल?**

परभणी शहरापासून हे ठिकाण सुमारे 32 किमी अंतरावर आहे. परभणी-गंगाखेड मार्गावर दैठण्याच्या थोडे पुढे गेल्यावार धारासूर फाटा लागतो. या फाट्यावरून 7 कि.मी आत गेल्यावर धारासूर हे गाव लागते.येथून बस तसेच खासगी वाहनांची सुविधा उपलब्ध आहे.

**जवळचे रेल्वेस्थानक: परभणी.**
**विमानतळ: छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद),नांदेड**
**मंदिरांचे गाव- चारठाणा**

चारठाणा येथील यादवकालीन शिल्पकला स्थापत्य आणि परिपूर्ण असलेली मंदिरे आपल्याला पाहायला मिळतात. तालुका असलेल्या जिंतूरपासून १८ किलोमीटर अंतरावर असलेले चारठाणा अथवा चारुक्षेत्र हे गाव ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय महत्वाचे आहे.5

चारठाणा या संपूर्ण दगडी बांधणीच्या यादवकालीन शिल्पकलेने नटलेल्या गावास हेमाडपंथी स्थापत्यकलेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. या गावात गोकुळेश्वर महादेव मंदिर,जोड महादेव मंदिर,खुराची देवी मंदिर, उकंडेश्वर मंदिर, नरसिंह तीर्थ मंदिर तसेच दीपमाळ म्हणून ओळखला जाणारा येथील मानस्तंभ पर्यटकांना आकर्षित करतो. हा स्तंभ या गावाचे वैभव मानला जातो. या ठिकाणी असलेली गोकुळेश्वर पुष्करणी (बारव)सुद्धा वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. या ठिकाणी प्राचीन शिल्पावशेष मोठ्या प्रमाणात आढळतात.

**कसे पोहोचाल?**

परभणी शहरापासून साधारणतः ६२ किमी तर तालुका जिंतूर पासून 18 किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे.परभणी, जिंतूर येथून एसटीची तसेच खाजगी वाहनांची व्यवस्था आहे.

**जवळचे रेल्वेस्थानक:सेलू**
**विमानतळ: छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद),नांदेड**
**हजरत सय्यद शाह तुराबुल हक दर्गा**

हजरत सय्यद शाह तुराबुल हक (रहे) यांचा अनेक वर्षाची परंपरा असणारा उरुस 31 जानेवारी ते 12 फेब्रुवारी या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा होतो. असंख्य भाविक सय्यद शाह तुराबुल हक यांच्या दर्शनासाठी येतात. त्यांना श्रद्धेने तुरतपीर बाबा म्हणूनही ओळखतात. सय्यद शाह तुराबुल हक (रहे) हे सुफी पंथाचे मुस्लीम साधू समर्थ रामदास स्वामी यांचे शिष्य मानले जातात. त्यांनी समर्थ रामदास स्वामींच्या दासबोध या ग्रंथाचे उर्दूत भाषांतर केले आहे. मनाच्या श्लोकांना उर्दूत 'मनसमझावन' असे नाव देण्यात आले आहे.6

**कसे पोहोचाल?**

परभणी बस स्थानकापासून हे ठिकाण 3 किमी अंतरावर आहे. येथून यात्रा काळात बस तसेच खासगी वाहनांची सुविधा उपलब्ध आहे.

**जवळचे रेल्वेस्थानक: परभणी.**
**विमानतळ: छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद),नांदेड**
**अतिशय क्षेत्र नेमगिरी जैन मंदिर**

श्री दिगंबर जैन अतिशय क्षेत्र नेमगिरी तीर्थक्षेत्र जिंतूर येथे आहे. जिंतूरचे प्राचीन नाव जिनपूर असे होते. प्राचीन काळात जिनपूर आर्थिक संपन्नतेने पटलेले समुद्र असे वैभवशाली नगर होते. येथे जैन लेणी असून या ठिकाणी मूल नायक भगवान नेमिनाथ तसेच अंतरिक्ष भगवान पार्श्वनाथ यांच्या सुंदर मूर्ती असून इतरही अनेक जैन तीर्थकर मूर्ती आहेत. याशिवाय जिंतूर शहरात जैन मंदिर आहे. हे क्षेत्र जैन धर्मियांचे श्रध्दा स्थान असून दूरपर्यंत सुविख्यात आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

हे क्षेत्र श्रीदिगंबर जैन अतिशय क्षेत्र नेमगिरी संस्थान ता जिंतूर, जि. परभणी या नावाने परिचित आहे परभणी पासून उत्तरेस ४२ कि.मी. अंतरावर जिंतूर हे गाव आहे. परभणी रेल्वे स्टेशनवर उतरुन परभणीहून जिंतुरकडे बसमार्गे जावे लागते. तेथून तीन कि. मी. अंतरावर अजिंठ्याच्या डोंगर रांगातील शाखेवर नेमगिरी अतिशय क्षेत्र मंदिर आहे. येथे दोन टेकड्यांवर दोन वेगवगळी मंदिरे आहेत एक मंदिर नेमगिरी टेकडीवर तर दुसरे राबुलमती मंदिर चंद्रगिरी टेकडीवर आहे. डोंगरावरील मंदिरापर्यंत जाण्यास पक्का रस्ता आहे.

**अतिशय क्षेत्र नेमगिरीचे ऐतिहासिक महत्त्व**

अतिशय क्षेत्र नेमगिरी हे ठिकाण प्राचीन आहे. लोकोक्ती अनुसार शेवटचे तीर्थकर भगवान महावीर यांचे समवसरण तेर क्षेत्राकडे जातांना जिंतूर येथील चंद्रगिरी पर्वतावर आले होते. हे क्षेत्र भगवान महावीरांच्या चरण स्पर्शाने पावन झालेले आहे. या शिवाय या क्षेत्रासंबधी चंद्रगुप्त मौर्यकालीन माहिती उपलब्ध होते. भद्रबाहू आचार्य आपल्या चंद्रगुप्त आणि १२००० शिष्य मुनीसोबत या क्षेत्रावर आले होते. येथे त्यांनी पार्श्वनाथाच्या मूर्तीची पुनः प्रतिष्ठा करुन मूर्तीला सुरीमंत्र दिला होता.सुरीमंत्र व भद्रबाह आचार्याच्या अचिंत तपस्येच्या प्रभावाने भगवान पार्श्वनाथांची मूर्ती जमिनीच्या वर अधर अंतरिक्ष झाली.आज पण ओंकारवत फणा मंडपने युक्त पार्श्वनाथांची प्रतिमा विश्वाच्या इतिहासात लोकांसाठी आकर्षण व आश्चर्याचे कारण बनून आहे.7 ही मूर्ती पाहण्यासाठी पर्यटक प्रामुख्याने या ठिकाणी भेट देतात.

**कसे पोहोचाल?**

परभणी शहरापासून हे ठिकाण 45 किमी अंतरावर आहे. परभणी, जिंतूर येथून बस तसेच खासगी वाहनांची सुविधा उपलब्ध आहे.

**जवळचे रेल्वेस्थानक: परभणी.**

**विमानतळ: छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद),नांदेड**

**निष्कर्ष**

परभणी जिल्ह्याला प्राचीन असा सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रातील गोदावरीच्या खोऱ्यात वसलेल्या परभणी जिल्हा मध्यवर्ती ठिकाणी असून हा परिसर पवित्र भूमी म्हणून ओळखली जाते. परभणी जिल्ह्यातील गावागावात समृद्ध व कलेने परिपूर्ण अशा कला स्थापत्यतून परंपरेचा प्राचीन वारसा उभा राहिलेला दिसतो. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून हा अतिशय संपन्न असा प्रदेश असून मात्र या ठिकाणी भौतिक सुविधा मात्र तेवढ्या प्रमाणात उपलब्ध असल्याचे आढळून येत नाही. या ठिकाणी असलेल्या प्राचीन तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी सण उत्सव व यात्रा काळात लाखोंच्या संख्येने भाविक येतात, परंतु त्यावेळेला उपलब्ध साधने ही तोकडी व मर्यादित असल्याचे दिसून येते. यात स्वच्छतागृहे, शौचालयासारखी मूलभूत सुविधा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या बाबींचा अनेक ठिकाणी आभाव आढळतो. तर काही ठिकाणी या बाबी असून सुद्धा अडगळीत असल्याचे दिसून येतात. या ठिकाणी स्वच्छतेचा अभाव दिसून येतो. या बाबी धार्मिक पर्यटनाच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येवर निश्चित परिणाम करणारे आहेत. यावर प्रामुख्याने काम करून मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन पर्यटकांचा वाढता ओघ या परभणी जिल्ह्याच्या प्राचीन कलास्थापत्याच्या संपन्न अशा प्रदेशात नेहमी कसा वाढता राहील याकडे तातडीने लक्ष देऊन आवश्यक त्या सुविधा पुरवणे गरजेचे आहे. असे झाले तरच खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम अशा असलेल्या या परभणी जिल्ह्यातून पर्यटनाचा हा अखंड झरा वाहता राहील.

**संदर्भ ग्रंथ**

1. एस.जी.पिसे,एस.बी.नानवटे,पर्यटनशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, पृष्ठ क्र.1.
2. उपरोक्त पृष्ठ क्र.2.
3. उपरोक्त पृष्ठ क्र.3
4. परभणी जिल्हा प्राचीन ऐतिहासिक वारसा, प्रकाशक जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी २०२३,पृष्ठ क्र.23
5. लोकराज्य, व्हिजीट महाराष्ट्र,जानेवारी 2017 पृष्ठ क्र.20
6. लोकराज्य,व्हिजीट महाराष्ट्र,जानेवारी 2017 पृष्ठ क्र.19
7. परभणी जिल्हा प्राचीन ऐतिहासिक वारसा, प्रकाशक जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी २०२३,पृष्ठ क्र.35
8. संशोधकाचे प्रत्यक्ष सर्वेक्षण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026



धारासूर येथील गोदावरी नदीचे विशाल पात्र




धारासूर येथील केशवराज मंदिर व मूर्ती

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026







**चारठाणा येथील प्रसिद्ध दीपमाळ (मानस्तंभ)**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026



धारासूरचे गुप्तेश्वर मंदिर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# पर्यटन आणि वाढत जाणारा चंगळवाद - एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा डॉ तुकाराम फिसफिसे[1], डॉ विश्वनाथ सूर्यवंशी[2]**
[1,2]समाजशास्त्र विभागप्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180158
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 240-244
January 2026
**Submitted:** 15 Dec. 2025
**Revised:** 25 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश***

*"पर्यटन आणि वाढत जाणारा चंगळवाद – एक समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधनात पर्यटनाच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे समाजात चंगळवादी वृत्ती कशी वाढत आहे याचा सखोल आढावा घेतला आहे. पर्यटनामुळे ज्ञान, अनुभव आणि मनोरंजन मिळत असले तरी गरजेपेक्षा अधिक उपभोग, दिखाऊपणा आणि प्रतिष्ठा मिळवण्याची स्पर्धा यांमुळे आर्थिक, सामाजिक, मानसिक आणि पर्यावरणीय समस्या निर्माण होत असल्याचे दिसून येते. कर्जबाजारीपणा, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, तणाव, सामाजिक विषमता आणि नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास हे चंगळवादाचे प्रमुख दुष्परिणाम आहेत. या समस्येवर मात करण्यासाठी मूल्याधिष्ठित शिक्षण, साधी जीवनशैली, आर्थिक नियोजन, जनजागृती आणि मनोवृत्तीतील बदल आवश्यक असल्याचे संशोधन सुचवते. विवेकपूर्ण उपभोग आणि जबाबदार पर्यटन हे संतुलित समाजनिर्मितीसाठी अत्यंत गरजेचे आहे.*

***मुख्यशब्द:*** *पर्यटन, चंगळवाद, उपभोगवाद, समाजशास्त्रीय अभ्यास, सामाजिक समस्या, आर्थिक विषमता, नैतिक मूल्ये, पर्यावरणीय परिणाम, जीवनशैली, जनजागृती, जबाबदार पर्यटन.*

**प्रस्तावना:**

पर्यटन हे फुरसतीचा वेळ घालविण्याचे एक साधन म्हणून आज जगभरात अतिशय लोकप्रिय झाले आहे. आनंद मिळविण्यासाठी, मनोरंजनासाठी प्रवास करणे ही संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली दिसून येते. पर्यटन ही संकल्पना युरोपातील रोमन लोकांनी रूजवली. रोमन साम्राज्याच्या काळात तेथील लोक इजिप्तमधील पिरॅमिड्स, ग्रीसमधील अथेन्स व स्मार्टा या नगरांची भव्य नगररचना, तेथील देव देवतांची मंदिरे, मूर्ती, तेथील क्रीडांगणे पाहण्यासाठी जात असत. नंतरच्या काळात जगभरातील वसाहतींचा व साम्राज्याचा विस्तार, औद्योगिक क्रांती व यातून युरोपमध्ये सुरू झालेला संपत्तीचा ओघ यांमुळे तेथे पर्यटनही श्रीमंतांची मक्तेदारी न राहता मध्यम वर्गसुद्धा पर्यटनात सहभागी होऊ लागला. त्यात धर्मप्रसारक, विद्वान, लेखक, कवी व व्यापारी इत्यादींचा समावेश होता. युरोपियन पर्यटकांनी आधुनिक पर्यटनाचा पाया घातला आहे असे म्हणता येईल.

भारतीय समाजातही अलीकडील काळात धार्मिक, सामाजिक कारणाने पर्यटन ही संकल्पना समाजजीवनात रुजलेली दिसून येते. भारतात प्राचीन काळापासून धार्मिक ठिकाणी पर्यटन कण्यास विशेष महत्व दिले जाते. आजही ते कमी झालेले नाही. धार्मिक स्थळी आजही पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी झालेली दिसून येते. अनेक कारणातून पर्यटन करणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

माणसाला पर्यटनामुळे अनेक अनुभव येतात, विविध बाबींची माहिती होते, ज्ञानात वाढ होते. अनुभव येतो व यातून आनंद, मनोरंजन होते. यामुळे माणसाने पर्यटन केलेच पाहिजे असा सूर सर्वत्र दिसून येतो. यामुळेच आज पर्यटन फक्त श्रीमंत लोकांपुरतेच मर्यादित राहिले नाही तर मध्यम वर्गीयाबरोबरच गरीब असणारा वर्गही पर्यटन करताना मागे दिसून येत नाही.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*
Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18481009
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रा डॉ तुकाराम फिसफिसे, समाजशास्त्र विभागप्रमुख श्री शिवाजी महाविद्यालय परभणी*

**How to cite this article:**
*फिसफिसे, . तुकाराम ., & सूर्यवंशी, . विश्वनाथ . (2026). पर्यटन आणि वाढत जाणारा चंगळवाद - एक समाजशास्त्रीय अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 240–244.*
*https://doi.org/10.5281/zenodo.18481009*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

पर्यटन हे अनेक दृष्टीने उपयोगी असले तरी भारतीय समाजाच्या दृष्टीने विचार केला तर या पर्यटनातून चंगळवादी वृत्ती मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे दिसून येते. यातून अनेक सामाजिक समस्या निर्माण होण्यास मदतच झाली आहे. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधाद्वारे पर्यटनातून वाढत जाणाऱ्या चंगळवादाचा आढावा घेण्यात आला आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश**

१. पर्यटन आणि चंगळवाद संकल्पनेचा अभ्यास करणे

२. पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या चंगळवादाचे दुष्परिणाम अभ्यासणे

३. पर्यटनामुळे वाढणाऱ्या चंगळवावादावर उपाय सुचविणे

**गृहीत कृत्ये**

१. पर्यटन आणि चंगळवाद ह्या संकल्पना सार्वत्रिक आहेत.

२. पर्यटनाचे भारतीय समाजावर अनेक प्रतिकूल परिणाम दिसून येतात

३. चंगळवादावरील उपायाकडे दुर्लक्ष केले जाते.

चंगळवाद समस्या ही सार्वत्रिक समस्या आहे. जगातील कोणताही देश, समाज समस्येपासून मुक्त नाही. भारतीय समाजातही अनेक समस्या आढळून येतात. जसजसा समाजाचा विकास होत आहे तसतश्या समस्याही वाढ होत आहे. आज तर नवनवीन समस्या समाजासमोर आव्हान म्हणून उभ्या आहेत. अनेक समस्येपैकीच अलीकडील काळात भारतीय समाजात आढळून येणारी समस्या चंगळवादाची आहे. आज चंगळवादाची समस्या मोठ्या प्रमाणात भारतीय समाजात फोफावली आहे. चंगळवाद म्हणजे गरजेपेक्षा जास्त उपभोग करण्याची वृत्ती. आधुनिक काळात विज्ञान, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेच्या प्रगतीमुळे मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर झाले, पण त्याचबरोबर चंगळवादाची मानसिकताही वाढली आहे. आजच्या समाजात 'अधिक मिळवणे, अधिक वापरणे' हीच जीवनशैली झाली आहे. ही वृत्ती अनेक सामाजिक, आर्थिक आणि नैतिक समस्यांना जन्म देते.

चंगळवादामुळे लोकांचे आर्थिक, नैतिक, मानसिक, सामाजिक स्वातंत्र्य हटवून त्यांना गुलाम बनवले जाते. आर्थिक कमतरता, अनियमित उत्पन्न इत्यादीमुळे कर्जाच्या जाळयात अनेक लोक ओढले जात आहेत. पर्यटनाच्या हव्यासापायी चंगळवादाचा प्रश्न सतत गंभीर रूपात वाढतो आहे.

**चंगळवादाची लक्षणे**

1. गरज नसतानाही वस्तू खरेदी करणे, सतत बदलत्या फॅशनचा पाठपुरावा करणे म्हणजेच अत्याधिक उपभोग.
2. समाजात प्रतिष्ठा मिळवण्यासाठी महागड्या वस्तूंचा आणि सेवांचा वापर.
3. आंतरिक समाधान न मिळाल्याने बाह्य वस्तूंमधून सुख शोधण्याचा प्रयत्न.
4. भपकेबाज खर्च करण्याची प्रवृत्ती
5. अनावश्यक विलासी वस्तू व सेवा वापरणे
6. ब्रँड-केंद्रितता आणि प्रतिष्ठेचा आग्रह
7. सोशल मीडियावर जीवनशैलीचे प्रदर्शन
8. कर्ज करूनही लक्झरी अनुभव घेण्याची तयारी

**पर्यटन वाढत्या चंगळवादाचे प्रमुख कारण**

चंगळवाद )Consumerism) ही केवळ एक जीवनशैली नसून आजच्या काळातील एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. यामागे अनेक सामाजिक, आर्थिक, आणि मानसिक कारणे कार्यरत असल्याचे दिसून येते. अलीकडील काळात चंगळवादाला कारणीभूत ठरणारे एक महत्वाचे कारण म्हणून पर्यटनाकडे पाहिले जाते. पर्यटनामुळे आज मोठ्या प्रमाणावर चंगळवादी वृत्ती वाढीस लागल्याचे दिसते. टीव्ही, सोशल मीडिया, इंटरनेट आणि अन्य माध्यमांतून सतत पर्यटनास प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती पाहायला मिळतात. यातून जिवंत आहोत तोपर्यंत पर्यटन करून घ्यावे ही भावना लोकांमध्ये वाढीस लागली आहे. पर्यटकांची गरज लक्षात घेऊन भांडवलदाराकडून नवीन वस्तू तयार केल्या जातात आणि यातून लोक चंगळवादाकडे ओढले जातात. अलीकडील काळात दिखाऊ पणाला खूप महत्व प्राप्त झालेले आहे. इतरांपेक्षा आपण काहीतरी वेगळे करत आहोत हे दाखवण्यासाठी पर्यटनाचा अट्टहास केला जात आहे. आज पर्यटनाच्या आधारे यश मोजले जात आहे. जेव्हा माणसाला आंतरिक समाधान मिळत नाही तेव्हा तो पर्यटनकरून बाह्य गोष्टींमध्ये सुख शोधत आहे. यामुळे तो परिस्थितीचा विचार न करता माणूस अधिकाधिक पर्यटन करण्याकडे झुकत आहे. शहरीकरणामुळे आज जीवन झपाट्याने बदलले आहे. त्यामुळे ऐसो-आराम करणे, फिरणे विविध सुविधांचा उपभोग घेणे यांच्याशिवाय माणसाला जीवन अपूर्ण वाटत आहे. पर्यटन दरम्यान ऑनलाइन शॉपिंग, कर्जसुविधा, 'बाय नाउ पे लेटर' यांमुळे खर्च करणे अधिक सोपे झाले आहे. यामुळे गरज नसलेल्या वस्तूही खरेदी

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

केल्या जातात. आज संयम, समाधान, साधेपणा यासारखी मूल्ये दुर्बल होतात यामुळे लोकांना तात्काळ सुख,समाधान मिळविण्याची वृत्ती वाढत आहे यासाठी पर्यटनाचा साधन म्हणून वापर केला जात आहे. महात्मा फुले म्हणायचे ऋण काढून सण साजरे करू नये, आज मात्र ऋण काढून पर्यटन करू नये अशी म्हणायची वेळ आली आहे. कारण पैसे नसतानाही कर्जाने पैसे घेऊन किंवा उसनवारी करून पर्यटनाचा अट्टाहास भारतीय समाजातील लोक करू लागल्याचे दिसून येते. याला समाजातील मध्यमवर्गीय व्यक्ती बळी पडल्याचे दिसते एवढेच नाही तर शिक्षित वर्गही आज पर्यटनातून वाढणाऱ्या चंगळवादाचा बळी ठरत आहे.

**चंगळवादाचे दुष्परिणाम**

चंगळवादी जीवनशैली फक्त पोकळ आणि असमाधानकारक आहे असे नाही तर हि शैली आपल्या सुंदर पृथ्वीला विनाशाकडे नेते आहे आणि इथले जीवनच धोक्यात आणत आहे, चंगळवाद ही अशी वृत्ती आहे ज्यामध्ये माणूस आपल्याला गरजेपेक्षा अधिक वस्तू, सेवा आणि सुविधा उपभोगतो. ही वृत्ती दिसायला आकर्षक वाटत असली तरी तिचे अनेक नकारात्मक परिणाम समाजावर, पर्यावरणावर आणि व्यक्तीच्या मानसिकतेवर होतात. पर्यटनातून निर्माण होणाऱ्या चंगळवादामुळे खालील समस्या निर्माण होतात.

**1. आर्थिक समस्या**

**कर्जबाजारीपणात वाढ**

पर्यटनासाठी गेलेल्या व्यक्तीकडून अनेकदा वस्तूची गरज नसतानाही मोठ्या प्रमाणावर वस्तूची खरेदी केली जाते. गरज नसतानाही वस्तू विकत घेण्याच्या सवयीमुळे लोक कर्जात ढकलले जातात. क्रेडिट कार्ड्स, 'ईएमआय' सुविधा यामुळे खर्च वाढत असला तरी उत्पन्न स्थिर असल्याने कर्जबाजारीपणा वाढत जातो. एकदा कर्जाच्या ओझ्याखाली व्यक्ती अडकला की त्यातून बाहेर पडणे शक्य होत नाही. कामगार, शेतकरी किंवा उद्योजक दिवाळखोरीत जातात.

**गरिब-श्रीमंत दरी वाढते:**

चंगळवादी जीवनशैली फक्त श्रीमंतांना परवडनारी आहे. त्यांना पर्यटनामुळे कितीही खर्च झाला तरी फारसा परिणाम होत नाही परंतु मध्यम वर्गीय, गरीब व्यक्ती केवळ दिखाऊ पणामुळे पर्यटन करू लागला तर तो अधिक गरीबी होतो ज्यामुळे समाजात विषमता वाढत जाते.

**2. मानसिक आणि भावनिक समस्या**

**सतत असमाधानी वृत्ती निर्माण होते:**

एकदा पर्यटनाला जाऊन माणसाचे समाधान होत नाही उलट परत परत पर्यटनाला जाण्याचा मोह होण्याचीच जास्त शक्यता असते. तसेच पर्यटनादरम्यान एक गोष्ट घेतली तरी लगेच दुसऱ्याची हाव लागते यातून माणसाचे समाधान हरवते आणि सतत अजून काही हवे अशी भावना निर्माण होते.

**तणाव व नैराश्य वाढते:**

इतरांशी तुलना करणे, सामाजिक माध्यमावर दिखुपणा करणे लोक तणावग्रस्त होतात. यातून नैराश्य वाढते तसेच कुटुंबात तणाव, दुःख, आत्महत्येचे प्रमाण वाढते.

**3. सामाजिक समस्या**

**नैतिक मूल्यांचा ऱ्हास:**

माणसाची किंमत आज त्याच्या विचारांनी नव्हे तर दिखाऊ पाने तसेच त्याने खरेदी केलेल्या वस्तूंवरून ठरवली जाते. त्यातून संयम, सादगी, सहवेदना यांसारखी मूल्ये दुर्लक्षित होतात.

**स्पर्धात्मक मानसिकता वाढते**

आज एखादी व्यक्ती कुठे पर्यटनाला जातो तो तिथे दुसरा व्यक्ती काय करतो, काय घेतो हे पाहून व्यक्ती आपले निर्णय घेत असते. त्यामुळे मत्सर, अहंकार आणि असंवेदनशीलता वाढते.

**सामाजिक विस्कळीतता वाढते**

लोक चंगळबाजांचे बळी होऊन गहाणधारक बनतात. त्यातून सामाजिक जीवनात विस्कळीतपणा निर्माण होतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**4. पर्यावरणीय समस्या**

**नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास:**

अधिक उत्पादनासाठी होणारी वृक्षतोड, खनिजांचा अति वापर, प्रदूषण वाढते. पर्यटनकाना आकर्षित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक संसाधनाचा दुरुपयोग केला जातो. अनेक ठिकाणी तर नदी, डोंगर, जंगल इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बांधकाम केल्याने पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. भारतातील अनेक पर्यटन स्थळी गर्दी वाढल्याने नैसर्गिक संसाधनावरील ताण वाढला आहे.

**कचऱ्यात वाढ**

पर्यटनाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याने मोठ्या प्रमाणावर कचऱ्याची समस्या निर्माण झाली आहे. पाणी बॉटल, प्लस्टिक बग, ई-वेस्ट सामग्री इत्यादींचा साठा वाढत आहे. कचऱ्याच्या विल्हेवाटाची समस्या गंभीर बनली आहे.

**5. सांस्कृतिक दुष्परिणाम:**

**पारंपरिक जीवनशैलीचा ऱ्हास:**

पर्यटनामुळे चंगळवादी जीवनशैली वाढीस लागते. पर्यटनाच्या ठिकाणी विविध वर्गाचे, विविध विचाराचे, विविध संस्कृतीचे लोक एकत्र येतात. यातून लोक पारंपरिक कला, संस्कृती, वेशभूषा यांना मागे टाकून परकीय फॅशनकडे झुकतात. त्यामुळे पारंपारिक भारतीय जीवनशैलीचा ऱ्हास होतो.

**कुटुंबव्यवस्थेवर परिणाम:**

चंगळवाढ फक्त "स्वतःला काय हवे?" यावर भर देतो. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांची एकमेकांप्रती समजूत आणि सहकार्य कमी होते. व्यक्ती स्वत: जीवनाची मजा घेण्यासाठी अनेकदा कुटुंबाला सोडून पर्यटनात मित्रांना प्राधान्य देते. यातून अनेकदा कुटुंबात कलह निर्माण होतात. कुटुंबातील मुलाकडून वारंवार पर्यटनाला जायची मागणी पुढे येते यामुळे कुटुंबाचे बजेट कोलमडते आणि पर्यटनाला विरोध केल्यास कुटुंबात ताण-तणाव वाढत जातात. अनेकदा कुटुंबातील सदस्याचे पर्यटन होते मात्र कुटुंबप्रमुखाची मात्र फरफट होते.

चंगळवाद हे आधुनिक समाजासाठी एक गंभीर आव्हान आहे. याचे दुष्परिणाम केवळ व्यक्तीपुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण समाज, पर्यावरण आणि भावी पिढ्यांवरही प्रभाव टाकतात. त्यामुळे पर्यटन करताना विवेकाने उपभोग करण्याची सवय, मूल्याधारित जीवनशैलीचा अंगीकार आणि संयम राखणे ही काळाची खरी गरज बनली आहे.

**चंगळवादावर उपाय:**

1. **मूल्याधिष्ठित शिक्षण**

   लहान वयातच मुलांना संयम, समाधान आणि जबाबदारी इत्यादी गोष्टी शिकवणे आवश्यक आहे.

2. **साधी जीवनशैली स्वीकारणे**

   पर्यटन करण्यास मनाई नाही परंतु यावेळी 'साधे जीवन, उच्च विचार' या तत्त्वावर भर देने गरजेचे आहे.

3. **जनजागृती**

   सामाजिक माध्यमांतून आणि शैक्षणिक कार्यक्रमांतून पर्यटनावेळी विवेकी उपभोगाचे महत्त्व लोकांना पडून देणे

4. **कायमस्वरूपी समाधान शोधणे**

   पर्यटनातून माणसाला समाधान, आनंद मिळतोच परंतु आर्थिक परिस्थितीचा विचार करून माणसांने अध्यात्म, कला, निसर्ग इत्यादी मार्गाद्वारे अंतःकरणातून येणारे समाधान अनुभवने आवश्यक आहे.

5. **नैतिक प्रचार व प्रसार**

   समाजमाध्यमे, साहित्य, चित्रपट यांद्वारे नैतिकतेचा प्रसार करणे.

6. **शिक्षण व जागरूकता** आर्थिक नियोजन, बचत, आर्थिक अधिकार यांवर समाजप्रबोधन करणे.

7. **सुलभ कर्ज सुविधा-** शासकीय बँक, महिला बचत गट, स्वयं-सहायता गट यांद्वारे सुलभ कर्ज सुविधा उपलब्ध करणे जेने करून पर्यटनामुळे अधिक आर्थिक ताण येणार नाही.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**8. कडक कायद्याची निर्मिती व अंमलबजावणी -** चंगळवाद प्रतिबंधक कायद्याची कडक निर्मिती व प्रभावी अंमलबजावणी करणे जेणे करून वाढत्या चंगळवादाला प्रतिबंध बसेल.

**9. सामाजिक सुरक्षा जाळे निर्माण करणे-** पर्यटकांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी स्वरोजगार धोरनाची निर्मिती, पर्यटनादरम्यान होणाऱ्या आकस्मिक घटनापासून संरक्षण करण्यासाठी विमा योजना, बचत योजना अमलात आणणे.

10. **मनोवृतीत बदल करणे-** चंगळवादाची मुळे ही केवळ बाह्य परिस्थितीत नाहीत, तर माणसाच्या मनोवृत्तीतही आहेत. बऱ्याच लोकांना आपण स्वत: चंगळवादी आहोत हेच मुळात माहित नाहीये. म्हणून माणसाने मनोवृत्तीत बदल करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष

पर्यटनातून वाढत जाणारा चंगळवाद ही केवळ आर्थिक समस्याच नाही तर सामाजिक, मानसिक प्रश्नदेखील आहे. या समस्येवर प्रभावी उपाय केल्याने गरीबांना आत्मनिर्भरता वाढण्याची संधी मिळेल, समाजात आर्थिक समता व सामाजिक न्याय स्थापन होईल तसेच देशाच्या प्रगतीला वेग मिळेल. चंगळवाद हा केवळ वैयक्तिक नव्हे तर एक व्यापक सामाजिक प्रश्न आहे. मानवाने विकासाच्या नावाखाली जेव्हा गरजा, इच्छांचे रूप धारण करतो, तेव्हा समाजात असंतुलन निर्माण होते. त्यामुळे प्रत्येकाने विवेकाने उपभोग करणे, साधेपणा स्वीकारणे आणि जबाबदारीने जीवन जगणे हेच समाजाचे खरे भले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. डॉ योगेश कोरडे -महाराष्ट्र प्रवास आणि पर्यटन भाग-१,अथर्व पुब्लीकेशन पुणे
२. डॉ निशांत शेंडे – भारत प्रवास आणि पर्यटन अथर्व पुब्लीकेशन पुणे
३. डॉ शिंदे एस बी –पर्यटन भूगोल फडके प्रकाशन कोल्हापूर
४. अच्युत गोडबोले – थैमान चंगळवादाचे, साधना प्रकाशन
५. डॉ सुधा काळदाते – भारतीय सामाजिक समस्या, विद्या बुक्स पुब्लीकेशन, औरंगाबाद
६. डॉ प्रदीप आगलावे- सामाजिक संशासोधन,श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व परिणाम व उपाययोजना : एक अभ्यास

**श्रीकांत बापूराव बोकारे**
पानसरे महाविद्यालय अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड
**Email:** Shrikantbokare@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180159
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 245-249
January 2026
**Submitted:** 15 Dec. 2025
**Revised:** 25 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश:***

*"ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व, परिणाम व उपाययोजना: एक अभ्यास" या संशोधनात ऐतिहासिक वास्तू आणि वस्तू या समाजाच्या सांस्कृतिक वारशाच्या जिवंत साक्षीदार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या वास्तूंमुळे भूतकाळातील समाजजीवन, कला, तंत्रज्ञान आणि परंपरा समजण्यास मदत होते तसेच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाला चालना मिळते. मात्र शहरीकरण, प्रदूषण, अतिक्रमण, नैसर्गिक घटक आणि मानवी दुर्लक्ष यांमुळे अनेक ऐतिहासिक वास्तू धोक्यात आल्या आहेत. त्यामुळे त्यांचे संवर्धन करण्यासाठी कायदेशीर संरक्षण, नियमित देखभाल, जनजागृती, तज्ञ मार्गदर्शन, डिजिटल दस्तऐवजीकरण आणि स्थानिक सहभाग आवश्यक असल्याचे संशोधन अधोरेखित करते. ऐतिहासिक वास्तूंचे जतन करणे म्हणजे आपल्या ओळखीचे, संस्कृतीचे आणि भविष्यकालीन ज्ञानसंपत्तीचे संरक्षण होय.*

***मुख्यशब्द:*** *ऐतिहासिक वास्तू, सांस्कृतिक वारसा, संवर्धन, संरक्षण, सामाजिक महत्त्व, शैक्षणिक मूल्य, आर्थिक परिणाम, जनजागृती, वारसा व्यवस्थापन, पुरातत्त्व, पर्यटन.*

## प्रस्तावना

मानवाच्या इतिहासाचा अभ्यास करताना केवळ लिखित साधनांवर अवलंबून राहणे अपुरे ठरते. कारण भूतकाळातील समाजजीवन, संस्कृती, कला, तंत्रज्ञान आणि राजकीय परिस्थिती यांचे खरे प्रतिबिंब ऐतिहासिक वस्तूंमध्ये आढळते. शिलालेख, नाणी, मूर्ती, हस्तलिखिते, भांडी, शस्त्रे, किल्ले, मंदिरे, प्राचीन वास्तू इत्यादी ऐतिहासिक वस्तू मानवाच्या सांस्कृतिक वारशाचे जिवंत साक्षीदार आहेत. या वस्तूंच्या माध्यमातून भूतकाळातील जीवनपद्धती समजून घेण्यास मदत होते. ऐतिहासिक वस्तू म्हणजे केवळ जुनी सामग्री नसून त्या समाजाच्या ओळखीचे, परंपरेचे आणि अस्मितेचे प्रतीक असतात. प्रत्येक ऐतिहासिक वस्तूमागे एक कथा, एक संघर्ष, एक संस्कृती आणि एक परंपरा दडलेली असते. म्हणूनच इतिहासाच्या अभ्यासात या वस्तूंना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. पुरातत्त्वशास्त्र, इतिहास, मानवशास्त्र आणि कला इतिहास या सर्व शाखांचा पाया ऐतिहासिक वस्तूंवर आधारित आहे. आजच्या आधुनिक युगात शहरीकरण, औद्योगिकीकरण, लोकसंख्यावाढ आणि मानवी हस्तक्षेप यांमुळे अनेक ऐतिहासिक वस्तू नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक ठिकाणी तोडफोड, अतिक्रमण, प्रदूषण आणि चोरी यामुळे आपला मौल्यवान वारसा धोक्यात येत आहे. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे, कारण एकदा नष्ट झालेली ऐतिहासिक वस्तू पुन्हा निर्माण होऊ शकत नाही. ऐतिहासिक वस्तूंचे संरक्षण करणे म्हणजे केवळ भूतकाळ जपणे नाही, तर भविष्यकालीन पिढ्यांसाठी ज्ञानाचा अमूल्य ठेवा सुरक्षित ठेवणे होय.

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.18481044

OPEN ACCESS

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्रीकांत बापूराव बोकारे, पानसरे महाविद्यालय अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड*

**How to cite this article:**
*बोकारे, . श्रीकांत . बापूराव . (2026). ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व परिणाम व उपाययोजना : एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 245–249.* https://doi.org/10.5281/zenodo.18481044

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

त्यामुळे या वस्तूंचे महत्त्व समजून घेणे, त्यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे आणि त्यांच्या संवर्धनासाठी योग्य उपाययोजना सुचवणे ही काळाची गरज बनली आहे. या संशोधन लेखामध्ये ऐतिहासिक वस्तूंचे शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व राष्ट्रीय महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच त्यांच्यावर होणारे नकारात्मक परिणाम आणि त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करून ऐतिहासिक वारशाच्या संरक्षणासाठी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या अभ्यासातून समाजामध्ये ऐतिहासिक वस्तूंविषयी आदरभाव आणि जबाबदारीची भावना निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येते.

**प्रस्तुत संशोधनाचा उद्देश**

१. ऐतिहासिक वास्तूंचे सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक महत्त्व स्पष्ट करणे.

२. ऐतिहासिक वास्तूंवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक )Descriptive) व विश्लेषणात्मक )Analytical) या संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आलेला आहे. संशोधन विषयाच्या ऐतिहासिक, सामाजिक व समकालीन पैलूंचे सुस्पष्ट वर्णन करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच उपलब्ध माहितीचे अर्थ लावणे, तुलना करणे व त्यातून निष्कर्ष काढण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. माहिती संकलनासाठी दुय्यम साधनांचा (Secondary Sources) उपयोग करण्यात आला असून त्यामध्ये पुस्तके, संशोधन लेख, शोधनिबंध, संदर्भग्रंथ, तसेच विश्वासार्ह वृत्तपत्रे व नियतकालिके यांचा समावेश आहे. या सर्व स्रोतांमधून प्राप्त माहितीचे चिकित्सक विश्लेषण करून विषयाशी संबंधित निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व**

**ऐतिहासिक वास्तूंचे सामाजिक महत्त्व**

ऐतिहासिक वास्तू या समाजाच्या इतिहास, संस्कृती आणि ओळखीचे जिवंत प्रतीक असतात. किल्ले, मंदिरे, मशिदी, वाडे, राजवाडे, स्मारके, प्राचीन इमारती आणि सार्वजनिक बांधकामे यांमधून त्या काळातील सामाजिक रचना, जीवनशैली, कला आणि परंपरा यांचे दर्शन घडते. त्यामुळे ऐतिहासिक वास्तूंचे सामाजिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.प्रथम, ऐतिहासिक वास्तूंमुळे समाजाला आपल्या भूतकाळाची जाणीव होते. या वास्तूंमधून पूर्वजांचे कार्य, त्यांचे जीवनमान, शासनपद्धती आणि सामाजिक व्यवस्था समजते. यामुळे समाजात इतिहासाबद्दल आदर आणि अभिमान निर्माण होतो. लोकांना आपल्या मुळांची ओळख पटते आणि सांस्कृतिक जाणीव वाढते.दुसरे म्हणजे, ऐतिहासिक वास्तू समाजातील एकात्मता आणि ऐक्य वाढवतात. विविध धर्म, जाती आणि समुदायांशी संबंधित वास्तू एकाच परिसरात आढळतात. त्यामुळे परस्पर आदर, सहिष्णुता आणि सामाजिक सलोखा निर्माण होतो. या वास्तू समाजाला एकत्र आणण्याचे कार्य करतात.तिसरे म्हणजे, ऐतिहासिक वास्तू या शैक्षणिक आणि प्रेरणादायी साधन ठरतात. विद्यार्थी, संशोधक आणि पर्यटक या वास्तूंना भेट देऊन इतिहास प्रत्यक्ष अनुभवतात. यामुळे सामाजिक ज्ञान वाढते आणि नवीन पिढीमध्ये वारसा जपण्याची भावना निर्माण होते.चौथे म्हणजे, ऐतिहासिक वास्तूंमुळे स्थानिक समाजात सांस्कृतिक उपक्रम आणि कार्यक्रम आयोजित केले जातात. जत्रा, उत्सव, सांस्कृतिक मेळावे यांमुळे समाजातील लोकांमध्ये परस्पर संवाद वाढतो आणि सामाजिक बंध दृढ होतात.याशिवाय, ऐतिहासिक वास्तू समाजाच्या ओळखीचे केंद्र बनतात. त्या परिसराची वेगळी ओळख निर्माण होते. स्थानिक लोकांना त्या वास्तूंशी भावनिक नाते निर्माण होते, ज्यामुळे त्या जपण्याची सामूहिक जबाबदारी निर्माण होते.म्हणूनच, ऐतिहासिक वास्तू या समाजाच्या सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक जाणीव आणि सामूहिक अभिमान वाढविणाऱ्या महत्त्वपूर्ण घटक आहेत. त्यांच्या जतन आणि संवर्धनातून समाज अधिक सुदृढ, सजग आणि एकात्म बनतो.

**ऐतिहासिक वस्तूंचे सांस्कृतिक महत्त्व**

ऐतिहासिक वस्तू या कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे जिवंत प्रतीक असतात. प्राचीन काळातील भांडी, दागिने, शस्त्रे, नाणी, हस्तलिखिते, मूर्ती, ताम्रपट, शिलालेख, वस्त्रे, संगीत वाद्ये इत्यादी वस्तूंमधून त्या काळातील लोकांचे जीवन, परंपरा, श्रद्धा, कला आणि विचारसरणी यांचे स्पष्ट चित्र आपल्यासमोर उभे राहते. त्यामुळे ऐतिहासिक वस्तू या केवळ जुनी सामग्री नसून त्या आपल्या सांस्कृतिक वारशाचा अमूल्य ठेवा आहेत.

प्रत्येक समाजाची एक स्वतंत्र ओळख असते आणि ती ओळख त्याच्या संस्कृतीतून दिसून येते. ऐतिहासिक वस्तूंमुळे त्या संस्कृतीचे मूळ स्वरूप समजते. उदाहरणार्थ, प्राचीन दागिन्यांमधून त्या काळातील सौंदर्यदृष्टी आणि कारागिरीचे ज्ञान मिळते; मातीच्या भांड्यांमधून जीवनशैली व तंत्रज्ञानाची माहिती मिळते; तर शिलालेख आणि ताम्रपटांमधून भाषा, लिपी आणि प्रशासन व्यवस्था समजते.ऐतिहासिक वस्तू या परंपरा आणि रूढी जपण्याचे कार्य करतात. त्या पिढ्यान् पिढ्या संस्कृतीचा वारसा पोहोचवतात. लोककला, हस्तकला,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

वेशभूषा, आहारपद्धती, धार्मिक आचार-विचार यांची माहिती या वस्तूंमधून मिळते. त्यामुळे नवीन पिढीला आपल्या पूर्वजांची जीवनपद्धती समजून घेता येते आणि सांस्कृतिक अभिमान निर्माण होतो.सांस्कृतिक एकात्मता वाढविण्यातही ऐतिहासिक वस्तूंची मोठी भूमिका आहे. विविध प्रदेशांतील वस्तूंच्या अभ्यासातून त्या समाजांतील साम्य व वैशिष्ट्ये लक्षात येतात. यामुळे परस्पर आदर, समज आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ होते.याशिवाय, संग्रहालये आणि वारसास्थळांमध्ये जतन केलेल्या ऐतिहासिक वस्तूंमुळे सांस्कृतिक पर्यटनाला चालना मिळते. लोकांना आपल्या संस्कृतीबद्दल प्रत्यक्ष अनुभव मिळतो. यामुळे संस्कृतीचे संवर्धन होते तसेच पुढील पिढ्यांसाठी हा अमूल्य ठेवा सुरक्षित राहतो.म्हणूनच, ऐतिहासिक वस्तू या संस्कृतीचे जतन करणाऱ्या, समाजाला आपल्या मुळांची जाणीव करून देणाऱ्या आणि सांस्कृतिक अभिमान वाढविणाऱ्या महत्त्वपूर्ण साधन आहेत. त्यांच्या जतन आणि संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे.

**ऐतिहासिक वस्तूंचे आर्थिक महत्त्व**

ऐतिहासिक वस्तू या केवळ सांस्कृतिक वारसा नसून त्या अर्थव्यवस्थेलाही महत्त्वपूर्ण हातभार लावतात. प्राचीन नाणी, दागिने, शिलालेख, मूर्ती, हस्तकला वस्तू, शस्त्रे, मातीची भांडी, पारंपरिक साधने इत्यादी वस्तूंमुळे पर्यटन, संशोधन, संग्रहालय व्यवस्था आणि स्थानिक उद्योगांना चालना मिळते. त्यामुळे ऐतिहासिक वस्तूंचा थेट व अप्रत्यक्ष असा आर्थिक परिणाम दिसून येतो.सर्वप्रथम, ऐतिहासिक वस्तूंमुळे सांस्कृतिक पर्यटन वाढते. संग्रहालये, वारसास्थळे आणि प्रदर्शने पाहण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक येतात. यामुळे स्थानिक हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा, मार्गदर्शक (गाईड), हस्तकला विक्रेते आणि लहान व्यावसायिक यांना रोजगार मिळतो. पर्यटनामुळे स्थानिक बाजारपेठेत उलाढाल वाढते आणि अर्थचक्र गतिमान होते.दुसरे म्हणजे, ऐतिहासिक वस्तूंच्या जतनासाठी उभारण्यात आलेली संग्रहालये व संशोधन केंद्रे ही रोजगारनिर्मितीची केंद्रे ठरतात. पुरातत्त्वतज्ज्ञ, संशोधक, संग्रहालय कर्मचारी, संवर्धन तज्ज्ञ, सुरक्षा कर्मचारी अशा विविध क्षेत्रांत नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. यामुळे ज्ञानाधारित अर्थव्यवस्था विकसित होते.तिसरे म्हणजे, ऐतिहासिक वस्तूंवर आधारित हस्तकला आणि प्रतिकृती (replicas) उद्योग विकसित होतो. प्राचीन वस्तूंच्या प्रतिकृती तयार करून त्यांची विक्री केली जाते. यामुळे स्थानिक कारागिरांना रोजगार मिळतो आणि पारंपरिक कौशल्य टिकून राहते.

चौथे म्हणजे, ऐतिहासिक वस्तूंच्या अभ्यासामुळे संशोधन व शैक्षणिक क्षेत्रात गुंतवणूक वाढते. विविध विद्यापीठे, संस्था आणि शासन संशोधन प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देतात. यामुळे शैक्षणिक अर्थव्यवस्था मजबूत होते.याशिवाय, ऐतिहासिक वस्तूंचे योग्य संवर्धन केल्यास त्या दीर्घकाळ टिकतात आणि सतत पर्यटन व अभ्यासासाठी उपयोगी पडतात. यामुळे दीर्घकालीन आर्थिक लाभ मिळतो.म्हणूनच, ऐतिहासिक वस्तू या केवळ भूतकाळाची स्मृती नसून त्या वर्तमान आणि भविष्याच्या आर्थिक विकासातही महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या जतन व संवर्धनातून सांस्कृतिक समृद्धीबरोबर आर्थिक समृद्धीही साध्य होते.

**ऐतिहासिक वास्तूंचे शैक्षणिक महत्त्व**

ऐतिहासिक वास्तू या शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी आणि जिवंत साधन मानल्या जातात. किल्ले, मंदिरे, वाडे, राजवाडे, स्मारके, प्राचीन इमारती आणि सार्वजनिक बांधकामे यांमधून विद्यार्थ्यांना इतिहास, वास्तुशास्त्र, कला, संस्कृती आणि समाजजीवन यांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळते. पुस्तकी माहितीपेक्षा प्रत्यक्ष वास्तू पाहिल्याने शिक्षण अधिक स्पष्ट, समजण्यास सोपे आणि लक्षात राहणारे होते.प्रथम, ऐतिहासिक वास्तूंमुळे विद्यार्थ्यांना इतिहासाचे प्रत्यक्ष दर्शन घडते. कोणत्या काळात कोणती वास्तुशैली प्रचलित होती, कोणत्या प्रकारची बांधकाम सामग्री वापरली जात होती, संरक्षणासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात होत्या, याची माहिती मिळते. यामुळे इतिहास हा केवळ वाचनापुरता मर्यादित न राहता अनुभवाधारित शिक्षण बनतो.दुसरे म्हणजे, ऐतिहासिक वास्तू या वास्तुशास्त्र आणि अभियांत्रिकी या विषयांसाठी अभ्यासाची महत्त्वपूर्ण साधने आहेत. प्राचीन काळातील बांधकाम कौशल्य, रचना, जलव्यवस्था, वायुवीजन, प्रकाशयोजना यांचे ज्ञान मिळते. आजच्या आधुनिक अभियांत्रिकी शिक्षणालाही या गोष्टी मार्गदर्शक ठरतात.तिसरे म्हणजे, ऐतिहासिक वास्तूंमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती विकसित होते. विविध वास्तूंचा अभ्यास करून त्यांच्या इतिहासाचा शोध घेण्याची प्रेरणा मिळते. यामुळे पुरातत्त्व, इतिहास, समाजशास्त्र आणि सांस्कृतिक अभ्यास या क्षेत्रात संशोधनाला चालना मिळते.

चौथे म्हणजे, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक वास्तूंच्या शैक्षणिक सहली (study tours) अत्यंत उपयुक्त ठरतात. या सहलींमधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि वारसा जपण्याची भावना निर्माण होते.याशिवाय, ऐतिहासिक वास्तू विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव आणि अभिमान निर्माण करतात. आपल्या पूर्वजांनी उभारलेल्या वास्तू पाहून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते आणि सांस्कृतिक वारशाबद्दल आदर निर्माण होतो.म्हणूनच, ऐतिहासिक वास्तू या शिक्षण क्षेत्रातील प्रभावी, प्रेरणादायी आणि अनुभवाधारित साधन आहेत. त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे ज्ञान, संशोधन वृत्ती आणि सांस्कृतिक जाणीव यांचा सर्वांगीण विकास होतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**ऐतिहासिक वास्तूंवर होणारे परिणाम**

ऐतिहासिक वस्तू )Historical Objects) या आपल्या सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक वारशाच्या महत्त्वाच्या साक्षीदार आहेत. शिल्प, नाणी, शस्त्रे, हस्तलिखिते, चित्रे, मातीची भांडी, दागिने, लाकडी वस्तू अशा अनेक प्रकारच्या वस्तू प्राचीन काळाची माहिती जतन करून ठेवतात. मात्र काळाच्या ओघात, नैसर्गिक घटक आणि मानवी हस्तक्षेप यांमुळे या वस्तूंवर विविध प्रकारचे दुष्परिणाम होत असतात.

नैसर्गिक परिणामांमध्ये तापमानातील बदल, आर्द्रता, पावसाचे पाणी, सूर्यप्रकाश आणि धूळ यांचा मोठा प्रभाव दिसून येतो. आर्द्रतेमुळे धातूंची गंज )corrosion) होते, कागद व कापड कुजते, तर लाकूड फुगते किंवा तडे जाते. सूर्यप्रकाशातील अल्ट्राव्हायोलेट किरणांमुळे चित्रे व रंग फिके पडतात. धुळीचे थर बसल्याने वस्तूंचे सौंदर्य आणि मूळ स्वरूप नष्ट होते.जैविक परिणाम देखील गंभीर असतात. बुरशी, कवक, शेवाळ, कीटक आणि उंदीर यांमुळे कागद, कापड आणि लाकडी वस्तूंचे नुकसान होते. पक्ष्यांच्या विष्ठेमुळे रासायनिक प्रतिक्रिया होऊन पृष्ठभाग खराब होतो.मानवनिर्मित परिणामांमध्ये सर्वात मोठा धोका म्हणजे दुर्लक्ष, अयोग्य साठवण आणि हाताळणी. संग्रहालयात किंवा घरगुती पातळीवर योग्य तापमान-आर्द्रता न राखल्यास वस्तू झपाट्याने खराब होतात. काही वेळा अज्ञानामुळे लोक वस्तूंना हात लावतात, स्वच्छतेच्या नावाखाली घासून पुसतात, ज्यामुळे मूळ पृष्ठभाग झिजतो. चोरी, तस्करी आणि तोडफोड )vandalism) हेही मोठे धोके आहेत.रासायनिक परिणामांमध्ये हवेत असलेले प्रदूषण, आम्लवृष्टी आणि क्षार यांचा समावेश होतो. यांमुळे धातू, दगड आणि कागद यांची रासायनिक झीज होते. विशेषतः जुन्या हस्तलिखितांवर शाई पसरते किंवा अक्षरे अस्पष्ट होतात.या सर्व परिणामांमुळे ऐतिहासिक वस्तूंचे मूळ रूप, सौंदर्य आणि माहितीमूल्य कमी होते. त्यामुळे त्यांचे शास्त्रीय पद्धतीने जतन, योग्य साठवण, नियमित तपासणी आणि जनजागृती अत्यंत आवश्यक आहे. ऐतिहासिक वस्तूंचे संरक्षण म्हणजे आपल्या भूतकाळाचे संरक्षण होय.

**ऐतिहासिक वास्तूसाठी उपाययोजना**

ऐतिहासिक वास्तू या आपल्या सांस्कृतिक, सामाजिक व ऐतिहासिक वारशाच्या जिवंत साक्षी आहेत. काळाच्या ओघात नैसर्गिक आपत्ती, मानवी दुर्लक्ष, अतिक्रमण, प्रदूषण व अयोग्य दुरुस्ती यामुळे या वास्तूंचे नुकसान होत आहे. त्यामुळे त्यांचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

१) नियमित देखभाल व संवर्धन

वास्तूंची वेळोवेळी तपासणी करून भेगा, गळती, झीज यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मूळ बांधकाम शैली व साहित्य लक्षात घेऊनच दुरुस्ती केली पाहिजे.

२) कायदेशीर संरक्षण

पुरातत्व विभाग व शासनाने ऐतिहासिक वास्तूंना संरक्षित स्मारकांचा दर्जा देऊन त्यांच्याभोवती अतिक्रमण, तोडफोड व अनधिकृत बांधकाम रोखले पाहिजे. संबंधित कायद्यांची कडक अंमलबजावणी गरजेची आहे.

३) जनजागृती व शिक्षण

स्थानिक नागरिक, विद्यार्थी व पर्यटकांमध्ये ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी मोहिमा राबवाव्यात. शालेय अभ्यासक्रमात यासंबंधी माहिती समाविष्ट करावी.

४) तज्ञ मार्गदर्शनाचा वापर

संवर्धन कार्य करताना पुरातत्त्ववेत्ते, वास्तुविशारद व इतिहासतज्ञ यांचे मार्गदर्शन घ्यावे, जेणेकरून मूळ स्वरूप अबाधित राहील.

५) पर्यावरणीय संरक्षण

प्रदूषण, आर्द्रता, पावसाचे पाणी व वनस्पतींची वाढ यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी योग्य जलनिस्सारण, स्वच्छता व परिसर व्यवस्थापन करावे.

६) डिजिटल नोंद व दस्तऐवजीकरण

वास्तूंचे छायाचित्रण, नकाशे, 3D स्कॅनिंग करून डिजिटल रेकॉर्ड तयार करावा, जेणेकरून भविष्यातील दुरुस्तीला मदत होईल.

७) स्थानिक सहभाग व जबाबदारी

ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था व स्थानिक प्रशासन यांच्या सहभागातून 'आपली वास्तू–आपली जबाबदारी' ही भावना विकसित करावी.

८) पर्यटन व्यवस्थापन

पर्यटकांसाठी नियमावली तयार करून कचरा, भित्तीचित्रे (graffiti), तोडफोड यावर नियंत्रण ठेवावे. मार्गदर्शक फलक व सुरक्षा व्यवस्था ठेवावी.

**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

**निष्कर्ष**

ऐतिहासिक वास्तू या आपल्या सांस्कृतिक वारशाचे, इतिहासाचे आणि सामाजिक जीवनाचे जिवंत प्रतीक आहेत. त्या भूतकाळातील घडामोडी, परंपरा, कला आणि स्थापत्य कौशल्य यांची साक्ष देतात. त्यामुळे ऐतिहासिक वास्तूंचे जतन करणे म्हणजे केवळ दगड-मातीचे संरक्षण नव्हे, तर आपल्या ओळखीचे, अभिमानाचे आणि संस्कृतीचे रक्षण होय.आजच्या वेगवान आधुनिकीकरणाच्या युगात अतिक्रमण, प्रदूषण, दुर्लक्ष आणि मानवी हस्तक्षेप यांमुळे अनेक ऐतिहासिक वास्तू धोक्यात आल्या आहेत. याचा परिणाम म्हणून आपल्या इतिहासाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा कमकुवत होत आहे. जर या वास्तूंचे योग्य संवर्धन झाले नाही, तर भविष्यातील पिढ्यांना आपल्या समृद्ध वारशाची जाणीव होणार नाही. तसेच पर्यटन, शैक्षणिक अभ्यास आणि सांस्कृतिक अभिमान यांवरही प्रतिकूल परिणाम होईल.
म्हणूनच शासन, पुरातत्त्व विभाग, तज्ज्ञ आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. कायदेशीर संरक्षण, तांत्रिक संवर्धन, जनजागृती, स्थानिक सहभाग आणि डिजिटल नोंदणी यांसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यास ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण शक्य आहे. शालेय व महाविद्यालयीन स्तरावर या विषयाची जाणीव निर्माण केल्यास भविष्यात संवर्धनाची भावना अधिक बळकट होईल.अखेरीस, ऐतिहासिक वास्तू या आपल्या भूतकाळाचा वारसा आणि भविष्याचा मार्गदर्शक आहेत. त्यांचे जतन व संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. योग्य प्रयत्न आणि जनसहभाग यांच्या साहाय्याने आपण हा अमूल्य वारसा सुरक्षित ठेवून पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठेवा म्हणून जपून ठेवू शकतो.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१ युनेस्को जागतिक वारसा केंद्र. (२०११). जागतिक वारसा संसाधन पुस्तिका. युनेस्को.
२ भारत सरकार. (१९५८). प्राचीन स्मारके आणि पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष कायदा, १९५८. सरकारी मुद्रणालय.
३ नाथ, आर. (१९८२). मुघल वास्तुकलेचा इतिहास. अभिनव प्रकाशने.
४ भारतीय पुरातत्व सर्वेक्षण. (२०१४). स्मारके आणि स्थळांचे संवर्धन. भारत सरकार.
५ सिंग, ए. पी. (२०१०). भारतातील वारसा संवर्धन: मुद्दे आणि आव्हाने. जर्नल ऑफ कल्चरल हेरिटेज मॅनेजमेंट अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट, १(१), ४५-५६.
६ फेल्डेन, बी. एम. (२००३). ऐतिहासिक इमारतींचे संवर्धन (तिसरी आवृत्ती). आर्किटेक्चरल प्रेस.

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

Original Article

# परभणी जिल्हयातील धार्मिक (यात्रा उत्सव) पर्यटन एक अभ्यास

**विश्वमित्र गाडगे [1] प्रा. डॉ. नितीन बावळे[2]**
[1]संशोधक ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी
[2]मार्गदर्शक, शारदा महाविद्यालय परभणी

**Manuscript ID:**
JRD -2026-180160
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 1(V)
Pp. 250-254
January 2026
**Submitted:** 15 Dec. 2025
**Revised:** 25 Dec. 2025
**Accepted:** 15 Jan.2026
**Published:** 31 Jan. 2026

***सारांश :***

*परभणी जिल्हा हा ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक वारशाने समृद्ध असा महाराष्ट्रातील महत्त्वाचा जिल्हा आहे. येथील समाजजीवन ग्रामीण संस्कृतीशी घट्ट जोडलेले असून धार्मिक श्रद्धा, परंपरा व यात्रा-उत्सवांना विशेष महत्त्व आहे. या संशोधनात परभणी जिल्ह्यातील प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळे व यात्रा-उत्सवांचा अभ्यास करण्यात आला आहे. हजरत तुराबुल हक्क दर्गा, इंद्रायणी देवी माळ, पाथरी येथील साईबाबा जन्मस्थान, जिंतूर येथील नेमगिरी जैन तीर्थक्षेत्र, चारठाणा व श्री क्षेत्र नरसिंह पोखर्णी ही स्थळे धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. या धार्मिक यात्रा-उत्सवांमुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते, रोजगाराच्या संधी निर्माण होतात तसेच सामाजिक सलोखा व धार्मिक सहअस्तित्वाची भावना दृढ होते. मात्र, वाढत्या पर्यटक संख्येमुळे स्वच्छता, पाणीपुरवठा, शौचालये, वाहतूक व पर्यटक सुरक्षेच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे धार्मिक पर्यटनाचा शाश्वत विकास साधण्यासाठी योग्य नियोजन, मूलभूत सुविधा व पर्यावरणपूरक उपाययोजना राबविणे आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.*

***बीजशब्द :*** *धार्मिक पर्यटन, यात्रा-उत्सव, परभणी जिल्हा, सांस्कृतिक वारसा, तीर्थक्षेत्रे, ग्रामीण पर्यटन, सामाजिक एकोपा, स्थानिक अर्थव्यवस्था*

**प्रस्तावना** :-

प्रभावती देवीं मंदिराच्या नावावरुन परभणी शहराचे नाव प्रभावती नगर पडले कालांतराने त्याचे परभणी झाले. स्वातंत्र्यापुर्वी निजाम सरकारच्या अधिकाराखाली या जिल्ह्याचे प्रशासन चालत असे नंतर हैद्राबाद स्टेट भारतामध्ये विलिन होऊन पुढे १९६० साली संयुक्त महाराष्ट्राचा प्रशासकीय जिल्हा झाला परभणी जिल्हयातील लोक हे शेतीप्रधान व ग्रामीण संस्कृतीशी फार जुटलेला आहे. त्यासोबतच येथील समुदायात धार्मिक सांस्कृतीक, पारंपारिक उत्सवाचे आयोजन केले जाते. "परभणी जिल्ह्यामध्ये धार्मिक ऐतिहासीक पर्यटन होते त्यासोबत धार्मिक यात्रा उत्सव त्या ठिकानी पर्यटकांना आकर्षित करणारे धार्मिक ठिकाणे मोठ्या संखेने आहेत. त्याची माहिती या संशोधनात देण्यात आली आहे.

**उद्दिष्ट्य** :- परभणी जिल्हयामध्ये विविध धार्मिक स्थळे सांस्कृतीक, ऐतीहासीक स्थळे असुन त्याचा अभ्यास करणे, धार्मिक यात्रा उत्सवाचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करून पारंपारीक पद्धतीने पर्यटन केले जाते. ठिकाणी स्थापीत होणाऱ्या अल्पकालावधीच्या बाजारपेठा पर्यटकांना आकर्षित करतात, या ठिकाणी येणारया पर्यटकांची व्यवस्था, सुरक्षा याकडे संशोधकाचे फारसे लक्ष नसते, यावर प्रकाश टाकनज आवश्यक ठरते.

**परभणी जिल्हयातील धार्मिक पर्यटनाचे महत्व :-**

परभणी जिल्यातील लोक ग्रामीण संस्कृतीशी निगडीत असल्याने पुर्वीपासून आपल्या भागातील धार्मिक व पाश्वशिक यात्रा उत्सवाचे आयोजन करुण अल्पकालावधीच्या पर्यटनाचा आनंद उत्सव साजरा करतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18627651
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*विश्वमित्र गाडगे,संशोधक ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी*

**How to cite this article:**
*विश्वमित्र गाडगे . डॉ. नितीन बावळे . (2026). परभणी जिल्हयातील धार्मिक (यात्रा उत्सव) पर्यटन एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(V)), 250-254.* https://doi.org/10.5281/zenodo.18627651

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

या जिल्ह्यामध्ये व विविध धर्माचे, समुदायाचे लोक एकत्र येवून कोणताही भेदभावा शिवाय धार्मिक उत्सव साजरे करतात. त्यामध्ये हिंदू-मुस्लीम एकतेचे प्रतिक हजरत एक तुराबुल हक दर्गा आहे, या ठिकाणी पंधरा दिवसाच्या धार्मिक यात्रा उत्सवाचे आयोजन केले जाते. दिवस-रात्र या ठिकाणी महाराष्ट्रातून हजारो पर्यटक भेटी देतात. बाहेरील पर्यटकांना आकर्षित करते येथील बाजारपेठ, इंद्रायणी देवी माळ या ठिकाणी देखिल १५ दिवसांची धार्मिक याचा उत्सवाचे आयोजन केले जाते. त्यानंतर चारठाणा परभणी जिल्ह्यातील नृसिंह पोखर्णी, पाथरी येथील साई जमस्थळ जिंतूर येथील, जैन नेमिनाथांची नेमगिरी संस्थान या सारख्या ठिकाणी विविध भागातील व स्थानिक लोक पर्यटनासाठी येतात. यातून धार्मिक पर्यटन मोठ्या प्रमाणावर केले जाते.

**जिल्हयातील धार्मिक पर्यटन :-**

धार्मिक तिर्थस्थानाला भेटि देणे हा धार्मिक पर्यटनाचा उद्देश असतो. भारतामध्ये प्रत्येक वर्षी लाखो लोक धार्मिक पर्यटनस्थळी भेटी देण्यासाठी पर्यटन करतात तसेच परभणी जिल्ह्यात देखिल पर्यटक मोठ्या संख्येने येथील धार्मिक ठिकाणाला भेटि देतात. त्यामध्ये काही प्रमुख पर्यटनस्थळांचा पुढिल प्रमाणे अभ्यास कला जाणार आहे.

१) **हजरत तुराबुल हक्क दर्गा :-**



परभणी शहराच्या पश्चिमेस हजरत तुराकुल हक्क दर्गा आहे. हा दर्गा हिंदु-मुस्लिम समाजाचे एकतेचं धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. हा दर्गा सुफि संत परंपरेतील हजरत निजामुद्दीन अवलिया यांच्या परंपरेतील होते. ते मध्ययुगीन काळात दख्खन मध्ये प्रवास करत असतांना परभणी येथे एका शेतामध्ये मुक्कामी थांबले होते. तेव्हा तेथील शेत जमीन जांब येथील रेंगे कुटूंबाची होती. पिर बाबांच्या प्रसिद्धीमुळे लोक त्यांच्याकडे दुःख, समस्या घेवून येत असत बाबा त्यांच्या दुःखाचे, समस्यांचे निवारण करत. रंगे कुटुबाने आपल्या शेतामध्ये त्यांना कायमस्वरूपी आश्रय दिला. तेव्हापासुन दर्ग्याच्या सेवेमध्ये आज देखील रेंगे कुटूंबांना मान सन्मान आहे.

निजाम शासन काळात तालुकाद्वार अहमद मोहुद्दीन यांनी दर्ग्यावर भव्य घुमटाचे बांधकाम केले व पाण्याची व्यवस्था केली होती. पिर बाबांच्या सेवेमुळे होणाऱ्या दुःख निवारण कृपेमुळे हिंदू - मुस्लीम समाजातील लोक दर्शनासाठी येतात.

१०८ वर्षापूर्वी येथील परिसरात संदल यात्रेचे आयोजनास सुरूवात झाली, तेव्हापासून आजपर्यंत २ फेब्रुवारी रोजी जिल्हाधीकार कार्यालयाचा मानाच्या संदलने (चादर) सुरुवात होते1 . या ठिकाणी महाराष्ट्रातील व्यापरि विविध गृहउपयोगी वस्तूची, खेळणी, मनोरंजनाची दुकाने स्थापन करूण पर्यटकांना आकर्षित करतात १५ दिवसाच्या यात्रा उत्सवाला भोट देण्यासाठी देखिल यात्रा उत्सवाच्या जिल्लाभरातून अनेक महराष्ट्रातील लाखो पर्यटक भेटि देतात. पर्यटकांमुळे या ठिकाणच्या स्थानिक वाहतूक हॉटेल, दुकाणे यांना रोजगार प्राप्त होतो. तसेच शाषणाला उत्सवाच्या करातून उत्पन प्राप्त होतो2. पोलिस प्रशासन सुरक्षा व्यवस्ता देखिल लावली जाते. परंतू या ठिकाणी शासनाकडून कोणत्याही प्रकारची म्हणावे तशी स्वच्छतेची पावले उचली जात नाहीत. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होतांना दिसून येते.

२) **इंद्रायणी देवीचा माळा यात्रा-उत्सव :-**



Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

परभणीपासून नैऋत्य दिशेला एक डोंगर आहे. डोंगरावरती इंद्रायणी देवीचे पुरातन मंदिर आहे. शारदेय नवरात्र महोत्सव संपुर्ण महाराष्ट्रात साजरा होत, असतांना या ठिकाणी शारदेय नवरात्री उत्सवाचे आयोजन केले जाते. डोंगरावर १५ दिवस भक्त दर्शनासाठी येतात. या कालावधीमध्ये येथे विविध प्रकारची दुकाने स्थापण करतात, खाध्य पदार्थ, गृहपयोगी वसर खेळणी, प्रसादाची दुकाने इत्यादि. या धार्मिक स्थळा विषयी स्थानिकांच्या काही मान्यता आहेत3, पुर्वी वैद्यकीय व्यवस्था नसल्याने निर्माण होणाऱ्या रोग-राईच निवारणाकरीता येथील देवीची उपासना केली जात असे, त्यातून त्यांचे दुःख नाहिसे होते. त्यामधे या डोंगराला हजारो भक्त प्रदक्षिणा घालतांना दिसतात. यापासून देवीचे संरक्षण प्राप्त होते, यासारख्या मान्यता आहेत.

आज देखिल ग्रामीण समुदाय पारंपरिक पध्दतीन उपासना करतात. नवरात्र दिवशी पंचक्रोशीतील लाखो पर्यटक या ठिकाणी यात्रा उत्सवाला येतात. वाढत जाणारे धार्मिक पर्यटक याचा विचार करून परभणी आगाराने बसची व्यवस्था देखिल सुरु केळी आहे . यातून प्रत्येक वर्षी परभणी आगारास लाखो रुपयाचे उत्पन्न प्राप्त होते. पूर्वी पायाभूत सुविधेचा अभाव असत्वाने ग्रामीण भागातील लोक बैलगाडी किंवा पायी या ठिकाणी येत असत आता, या ठिकाणी झालेल्या व्यवस्थेमुळे खाजगी रिक्षा, वाहने, बसेस सहज वरली जातात, त्यामुळे लाखो पर्यटक येथे येतात. यामध्ये प्रत्येक वर्षी भर पडतांना दिसुन येत आहे.

३) **श्री साईबाबा जन्मस्थाण** :-

परभणी जिल्यापासुन पश्चिमेकडे पाथरी तालूक्यात साइबाबांचे जन्मस्थान आहे. १९७० मधील संशोधनानूसार साईबाबा पाथरी येथील होते हे सिद्ध झाले आहे. नंतर साई स्मारक समितीने १९९४ मध्ये मंदिराची उभारणी केली मात्र भक्तांसाठी १९९९ साली मंदिर खुले केले. येथे साईबाबांनी वापरलेल्या बालपणीच्या विविध वस्तु आजही आपल्याला पहायला मिळतात. वेगवेगळी भांडी चुल, रांजण, दळणाचे जातं इत्यादी साईबाबांच्या जन्मस्थळाच्या विकासासाठी शासनाने मोठा निधी मंजुरी देखिल केला आहे.4

**३) नेमगिरी जैन मंदिर जिंतूर :-**




नेमगिरी हे देवस्थान परभणी पासुन उत्तर दिशेला जिंतूर तालुक्यामध येते. हे दिगंबर जैन धार्मिक स्थळ ओह. या ठिकाणी देखील दोन नेमगिरी व चंद्रगिरी या दोन टेकड्या असून जैन तिर्थंकराच्या मुर्ति आहेत. प्राचिन काळी जौनपुर किंवा जैनपुर या नावात हा परिसर प्रसिद्ध होता. राष्ट्रकुट राजा अमोघवर्षाने जैन धर्मप्रसारात मोठे योगदान दिले होते. त्याच कालखंडामध्ये या जैन गुफांची निर्मिती झाली असावी. येथील नेमगिरी व चंद्रगीरी दोन्ही ठिकाणी जैन शिल्प आहेत. येथे तिनं क्रमांकाची लेणीमध्ये नेमिनाथांची सहा फुटाची मूर्ती आहे. गुहा चारमध्ये मुख्य देवत्ता भगवान नेमिनाथांची ७.५ फूट उंचीची मुर्ती आहे. गुहा क्रमांक पाच भगवान पार्श्वनाथ यांना समर्पित असून या मुर्तिला अंतरिक्ष पार्श्वनाथ म्हणून ओळखले जाते. हे शिल्प जमिनीपासून तीन इंच वर तरंगतांना दिसते खालून कागद, कपडा, आरपार जातो, येथील मुर्तीची स्थापना गुरुत्वाकर्षन पद्धतीने स्थापना केलेली दिसते. येथील प्रत्येक मुर्तीवरती लेख असून हा लेख आठव्य -नवव्या शतकामध्ये कोरल्या गेला आहे.

चंद्रगिरी टेकडीवर देखिल अशाच जैन तिर्थंकराच्या २४ आश्चर्यकारक मूर्ती आहेत. डोंगराचा निसर्गरम्य परिसर असल्याने प्रसन्नतेत व सुंदरतेत आणखीनच भर पडते. या ठिकाणी जैन समाजातील लोक भाद्रपद कृष्णपंचमी दिवशी विशेष विधी व प्रार्थना करून सामुदायीक मेळाव्याचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षि नेमिनाथांच्या जन्माचे स्मरण केले जाते5. नेमगिरी या जैन समाजाच्या प्रार्थनास्थळाला भेट देण्यासाठी महाराष्ट्र व संपूर्ण भारतातून पर्यटक येथे येतात. जैन समाजाचे भक्त, इतिहासप्रेमी अभ्यासक महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थी, शालेख सहली मोठ्या संख्येने येथे गर्दी करतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

४) **चारठाणा** :-



चारठाणा हे जिंतूर तालुक्यातील एक प्राचिन गावं आहे. या गावांमध्ये ३६५ मंदिरे होती. अशी आध्यायिका आहे. सध्या ३६५ मंदिर 'आढळून येत नाहीत; परंतू आजही या गावामध्ये १०-१२ मंदिरे दिसून येतात. त्यामध्ये शिवमंदिर, गोकुळेश्वर मंदिर, काशिविश्वेर मंदिर, श्री नृसिंह मंदिर, उकंडेश्वर यासोबतच मंदिराचे विविध अवशेष विखुरलेले दिसतात, येथे झुलता मनोरा आहे. या विषयी अख्यायिका व गावकरी सांगतात की हा मनोर हलतांना भास होतो. तेव्हापासुन याला झुलता मनोरा म्हटले जाते. परंतू हे तात्कालिन एक प्रार्थनास्थळ होते. या ठिकाणी सध्या राज्य पुरातत्व विभागामार्फत उत्खनन चालू आहे. येथे आणखी एक जलस्त्रोताचा उत्तम नमुना म्हणजे अष्टकोनी बारख हि वास्तू काशीविश्वेश्वर मंदिराच्या पाठिमागील जागेवर आहे. त्यात १२ देवकोष्टक असून यातील मुर्ति सध्या अस्तित्वात नाहीत. या गावाला मंदिराचे गाव म्हणून महाराष्ट्र सर प्रसिद्धी मिळाली आहे. येथे इतिहास प्रेमी अभ्यासक आवर्जुन चारठाणा गावाला भेटी देतात. तसेच महाविद्यालयीन सहली, शालेय सहली येतात. परभणी जिल्यातील हे गाव एक धार्मिक पर्यटन म्हणुन मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धीस आले आहे.6

५) **श्री क्षेत्र नरसिंह पोखर्णी** :-



श्री क्षेत्र पोखर्णी देवस्थान परभणीपासून १६ कि.मी अंतरावर दक्षिणेस स्थित आहे. या मंदिराची निर्मिती सुमारे १००० वर्षापूर्वी झाली आहे. या मंदिराचा परिसर मोठा असून मुख्य गाभार्याचे प्रवेशद्वार खुप छोटे आहे. हे पवित्र तिर्थस्थल वैष्णव संप्रदायाचे या भागातील सर्वात मोठे व भक्तीचे केंद्र आहे. श्रावण महिण्यात व अधिक मासामध्ये या ठिकाणी लाखोंच्या संख्येने धार्मिक पर्यटक भेटी देतात7.

निष्कर्ष :-

१. परभणी जिल्ह्याला प्राचीन सांस्कृतीक, व ऐतिहासिक वारसा आहे.
२. परभणी जिल्हयामध्ये प्राचिन धार्मिक स्थळे मोठ्या प्रमाणात आहेत, त्याद्वारे समाजातील सर्व लोक एकत्र येवून उत्सवाचे आयोजन करतात कोणतादी भेदाभेद न बाळगता सहभाग दर्शवतात.

*Journal of Research and Development*
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(V)| January- 2026

३. यासारख्या धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने पर्यटक भेटी देतात त्यातून स्थानिक उद्योगांना चालणा मिळते व अल्पकालावधीच्या रोजगाराची निर्मिती होते.

४. या ठिकाणी होणाऱ्या उत्सवाचे स्वरूप मोठे असल्याने लाखोच्या संख्येने पर्यटक येतात, येथे ठिकाणी स्वच्छतेची व्यवस्था जसे कि सौचालय व्यवस्था, पाणी व्यवस्था, याचा खुप मोठा अभाव दिसुन आला आहे.

५. उत्सव किंवा यात्रा संपल्यानंतर प्लास्टिकचा कचरा प्लास्टिकचे आवरणे हे येथेच पडून राहतात नंतर तेथील स्थानिक पशु जनावरे सेवून करतात, त्यांच्या जिवीततााला धोका निर्माण होत आहे.

संदर्भ :-

१) https://en.wikipedia.org/wiki/Turabul_Haq_Dargah

२) https://timesofindia.indiatimes.com/city/aurangabad/waqf-board- gets-record-2-8cr-bid-for-parbhani-dargah-urs/art

३) ,भोसा, लोहरा, व इंद्रायणी देवी मंदिरातील पुजारी यांची मुलाखत

४) https://www.bbc.com/marathi/india-51167382 २० जानेवारी २०२०

५) ttps://www.jaintirthtourism.com/maharashtra-jaintirthkshetra/shri-digambar-jain-atishay-kshetra-nemgiri-sansthan,-nemgiri,-jintur,-maharashtra-tirthkshetra-in-parbhani.php.

६) परभणी जिल्हा प्राचीन ऐतिहासिक वारसा, प्रकाशक जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी में २०२३, पृ. क्र. (७०,७१,)

७) परभणी जिल्हाधिकारी कार्यालय अधिकृत संकेतस्थळ https://parbhani.gov.in/en/website-policies/h